म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ५५३

# जोसेफ मॅझिनी

# आत्मचरित्र नि राजकारण.

ले. वि. दा. सावरकर.

१६

REFBK-0006733

# जोसेफ मॅझिनी

## आत्मचरित्र नि राजकारण

म. ग्रं. सं. ...णे.
ग्रं. क्र. नं. २६७

स्वातंत्र्यवीर

विनायक दामोदर सावरकर

दा. क्र. ६७३३

REFBK-0006733

पुणे २

पहिली आवृत्ति १९०७
दुसरी आवृत्ति १९४६

मूल्य रुपये पांच

मुद्रक : पृष्ठें १ ते २८८ वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई
व उरलेलीं वि. गं. केतकर, लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव पुणें
प्रकाशक : सदाशिव कृष्ण पाध्ये, संचालक, व्हीनस बुक स्टॉल,
अप्पा बलवंत चौक, पुणें २.

# मॅझिनीचे लेख

## आत्मचरित्र नि राजकारण

१८५७ पासून १९४६ पर्यंतच्या

सर्व भारतीय क्रांतिवीरांना

**सादर अर्पण**

# अनुक्रमणिका

कंसांत ज्या सालीं लेख लिहिले तें साल दिलें आहे


पृष्ठें

**प्रकाशकाचें निवेदन**—

**प्रस्तावना**—( भाषांतरकर्त्याची )........................................१–२६

**प्रस्तावना**—( मॅझिनीची )........................................२७–२८

**भाग पहिला—आत्मचरित्र खंड १**:—आत्मचरित्र ( १८६१ ), चार्लस आल्बर्टला पत्र (१८३१), आत्मचरित्र पुढें चालू ( १८६१ ) २९–६८

**भाग दुसरा—'तरुण इटली'** 'तरुण इटली'चें दिग्दर्शन (१८३१), 'तरुण इटली'ची शपथ (१८३१), 'तरुण इटली' वर्तमानपत्राचें प्रसिद्धीपत्रक, 'तरुण इटली' वर्तमान पत्रांतील विषयांचा गोषवारा (१८३२) ६९–९८

**भाग तिसरा—आत्मचरित्र खंड २**:—आत्मचरित्र ( १८६१ ) तक्रार ( १८३२ सप्टेंबर ), आत्मचरित्र, तरुण इटलीची रचनापद्धति ( १८३३ ), धर्मोपदेशकांस विनंति (१८३४), आत्मचरित्र (पुढें चालू) ९९–१५२

**भाग चवथा—आत्मचरित्र खंड ३** :—आत्मचरित्र (१८६२) हद्दपार देशभक्तांस पत्र (१८३४), आत्मचरित्र (१८६२), सर जेम्स ग्रॅहम यांस पत्र (१८४५) आत्मचरित्र (१८६२) १५३–२३०

**भाग पांचवा**—(१)खंजिराची उपपत्ति, (२)गनिमी काव्याचे नियम, (३) देशवीर बन्डीएरा. २३१–२८३

# प्रकाशकाचें निवेदन

मॅझिनीच्या चरित्राची पहिली आवृत्ति १९०७ मध्यें निघाल्यानंतर थोड्याच अवधींत अनेक गंडांतरें या पुस्तकावर येऊन तें दुर्मिळ झालें आणि लोकांची जिज्ञासा अतृप्त राहिली. अनुकूल परिस्थितीमुळें आज या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढणें शक्य झालें आहे. ही आवृत्ति अद्यावत् केल्यानें या पुस्तकाची गोडी वाचकांस नव्यानें चाखावयास मिळत आहे. पुस्तक प्रकाशनाचा हा मान आम्हास दिल्याबद्दल आम्ही स्वातत्र्यवीर सावरकर यांचे ऋणी आहों. या पुस्तकाचे प्रकाशनाचे कामीं श्री. बाबूराव तथा ज. सी. करमरकर, यांची अमूल्य मदत झाली आहे. तसेंच श्री. काकासाहेब जोशी व श्री. ग. प. पाटणकर यांचेही आम्ही आभारी आहों. मुंबईच्या मौज मुद्रणालयाचे चालक श्री. वि. पु. भागवत यांनीं अत्यंत थोड्या अवधींत पुस्तक छापून दिल्याबद्दल त्यांचेही आम्ही आभारी आहों.

**प्रकाशक**

६७३३

## मॅझिनीच्या आत्मवृत्ताच्या या भाषांतराचें छोटेसें आत्मवृत्त

मॅझिनीच्या आत्मवृत्ताच्या (Autobiography च्या) ह्या प्रस्तुत पुस्तकाचेंही अेक छोटेसें आत्मवृत्त जितकें अुद्‌बोधक तितकेंच मनोरंजकही आहे.

ह्या पुस्तकाचे लेखक स्वातन्त्र्यवीर सावरकर हे आपल्या वयाच्या २२ व्या वर्षाचे संधीस (ख्रि. १९०६) अिंग्लंडमध्यें गेले. त्याचे आधींच त्यांच्या आतां सुप्रसिद्ध असलेल्या 'अभिनव भारत' ह्या गुप्त संस्थेच्या संघटनेचें जाळें महाराष्ट्रभर पसरलेलें होतें. आणि त्यांतील अनेक कर्तृत्ववान क्रांतिकारक तरुणांनीं स्वातंत्र्याचें ध्येय नि त्याप्रीत्यर्थ अपरिहार्य असलेल्या सशस्त्र क्रांतीच्या अुठावणीचा कार्यक्रम ह्यांविषयीं महाराष्ट्रांत तेजस्वी प्रचार चालविलेला होता. कॉलेजमध्यें असतांनाच स्वा. वी. सावरकर अिटलीच्या अितिहासावर व्याख्यानें देत असत. सुप्रसिद्ध 'काळ' पत्रांत "तरुण अिटली" हें काय होतें या विषयावर अभिनव भारताचे गुरुस्थानी असलेल्या सुविख्यात कै. श्री. शिवराम महादेव परांजपे यांचे क्रांतिप्रवण लेख येत असत. तथापि मॅझिनीच्या लेखांचा परिचय महाराष्ट्रास झालेला नव्हता. अिंग्लंडमध्यें पाअूल टाकतांच मॅझिनीच्या लेखांचे अिंग्रजी अनुवाद केलेले सहा भाग शोधांतीं स्वा. वी. सावरकरांना अुपलब्ध झाले. त्यांचें अत्यंत अुत्सुकतेनें त्यांनीं जेव्हां पारायण केलें तेव्हां आपण अभिनव भारत संस्थे-पुढें क्रांतीचा जो कार्यक्रम आजवर गुप्तपणें आखीत आलों त्याचाच अधिकारयुक्त वाणीनें मॅझिनीच्या आत्मवृत्तांत नि लेखांत प्रबळ पुरस्कार केलेला त्यांस आढळून आला. तेव्हां त्या लेखांना मराठींत भाषांतरिलें असतांना आपणास हिंदुस्थानच्या सद्य:परिस्थितींत जें केवळ गुप्तपणेंच सांगतां येत होतें तेंच मॅझिनीच्या लेखांच्या पडद्याआडून अुघडपणें लक्षावधी स्वदेश बांधवांना अगदीं प्रकटपणें सांगता येअील हें पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. आणि त्यांनीं त्यांच्या अिंग्लंडमधील वास्तव्याच्या पहिल्या सहा महिन्यांतच म्हणजे ख्रि. १९०६ मध्यें मॅझिनीच्या "आत्मचरित्र आणि राज-

कारण" ह्या लेखांचें हें मराठी भाषांतर पूर्ण केलें. मॅझिनीसारख्या जगद्-विख्यात् पुरुषाच्या अुक्तीचा आणि कृतीचा आधार आपण हातीं घेतलेल्या कार्यास लाभला तर 'अभिनव भारत' संघटनेंतील क्रांतिकारकांची आणि असंख्य स्वदेश बांधवांचाही आत्मविश्वास आणि कार्यप्रवणता हीं शतपटीनें वाढल्यावाचून रहाणार नाहींत या निष्ठेनें त्यांनीं तें भाषांतर प्रसिद्धिण्या-साठीं त्यांचे कर्तृत्वशाली ज्येष्ठ बंधू देशवीर बाबाराव सावरकर यांचेकडे हिंदुस्थानांत धाडून दिलें. पण असलें क्रांतिप्रवण भाषांतराचें पुस्तक छाप-ण्यासही त्या ४० वर्षांपूर्वींच्या काळांत कोण धजणार! तथापि असल्या सर्व अडचणींना तोंड देअून आणि ह्या भाषांतराचे प्रकाशकत्वाचा धोका पत-करूनही तें पुस्तक अवघ्या २।३ महिन्यांतच छापून देशवीर बाबाराव सावरकर ह्यांनीं ख्रि. १९०७ मध्यें प्रसिद्धिलें.

ह्या भाषांतराच्या पुस्तकाचें अत्यंत महत्त्वाचें अंग म्हणजे स्वा. वी. सावरकरांनीं स्वतः लिहिलेली त्याची प्रस्तावना होय. हिंदुस्थानांतील परि-स्थितींतही आपल्या देशाच्या दास्यशृंखला तोडून त्यास स्वतंत्र करण्यासाठीं अपरिहार्य असलेली सशस्त्र अुठावणी कशीनशी करतां येअील हें ज्यायोगें सर्वसाधारण जनतेच्या लक्षांत येअील अशा सूचक रचनेनें आणि तेजस्वी भाषाशैलीनें मॅझिनीच्या लेखांतील आणि अिटलीच्या क्रांतीतील विचारांची आणि घटनांची जुळणी ह्या प्रस्तावनेंत किती चातुर्यानें केलेली आहे ते ती प्रस्तावना वाचतांच क्रांतिप्रवण अशा कोणाच्याही दृष्टीला सहज आढळून येअील. अुदाहरणार्थ पुढील आशयाचें वाक्य पहा: "अिटलीची लोकसंख्या अवघी दोन कोटी होती. तरी तेवढ्याच लहानशा बळावर मॅझिनीसारख्या अिटालियन क्रांतिकारक पुढाऱ्यांनीं क्रांतियुद्धाचें रणशिंग फुंकलें. मग जर कां अिटलीचें संख्याबळ केवळ दोन कोटींपेक्षां १०-२० पटींनीं अधिक असतें तर त्यांचा अुत्साह आणि धडाडी केवढी अपरिमितपणें वाढली असती! क्रांतीची अुठावणी करण्यास आणि अेकदां अपयश आलें तरी पुनः पुनः झुंजत रहाण्यास अेक दिवसही ते थांबले नसते!" या प्रस्तावनेंत साधारणतः जेथें 'अिटली' शब्द आहे तेथें 'अिंडिया' किंवा हिंदुस्थान हा शब्द वाचला कीं तो सारा अुपदेश प्रकटपणें आपल्यालाच केला जात आहे असें कोणाही भारतीय वाचकास वाटल्यावाचून रहाणार नाहीं, अितकी ती सर्वच्या सर्व

प्रस्तावना सूचक, कूटस्थ लाक्षणिक आणि अत्यंत स्फूर्तिप्रद भाषेंत लहिली आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध होतांच अभिनव भारताच्या प्रचारामुळें आधींच क्रांति-प्रवण झालेल्या सहस्रावधी तरुणांनीं नि प्रौढांनीं कोणा देवदूतानें अुद्घोषिलेल्या अेखाद्या दिव्य संदेशाप्रमाणें त्या पुस्तकाचें स्वागत केलें. काळकर्त्यांनीं तर अेक स्वतंत्र अग्रलेख लिहून त्या पुस्तकाचा आणि त्याच्या तरुण लेखकाचा अपरंपार गौरव केला. त्या लेखाचें ओघांत काळकर्ते लिहितात :—

"..........अद्‌भुत सामर्थ्याचे मॅझिनीचे जे महामंत्र ते देशभक्त सावरकर यांनीं आपल्या महाराष्ट्र देश भाषेंत आणून त्यांचा सर्व लोकांस परिचय करून दिला याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडे आहेत. ज्याला वाचतां येतें त्यांनीं असलीं पुस्तकें वाचल्याशिवाय कधींही राहूं नये. आणि ज्यांना वाचतां येत नसेल पण कान आहेत त्यांनीं, असलीं पुस्तकें अैकल्यावांचून कधींही राहूं नये. या भगवद्‌गीतेचें श्रवण, मनन आणि निदिध्यासन आपल्या प्रत्येक भक्ताला जीवन्मुक्तच करून सोडील, असें अलौकिक सामर्थ्य यांत आहे ? "

महाराष्ट्राचें मुखच असलेल्या त्या प्रमुख 'केसरी' पत्रासुद्धां सर्व राष्ट्रीय वृत्तपत्रांनीं स्वतंत्र लेख लिहून ह्या पुस्तकाची प्रशसा केली. सर्वसामान्य वाचक वर्गांतही हें पुस्तक त्या वेळीं अितकें लोकप्रिय झालें कीं कांहीं कांहीं गांवांतून शिवलीलामृत, हरिविजय, रामविजय प्रभृति धार्मिक ग्रंथाप्रमाणें या ग्रंथास पालखींतून मिरविण्यांत आलें ! महाराष्ट्राचे मनोभूमींत स्वातंत्र्याची अिच्छा (आकांक्षा) ही निसर्गतःच मुरलेली, स्वातंत्र्यासाठीं झुंजण्याची वीरवृत्ती महाराष्ट्राच्या रक्तांत भिनलेली आहे ! त्या परंपरेचा अग्नि शतकानुशतकें संधी साधित पुनःपुनः पेट घेत राहिलेला! अशा क्रांतिप्रवण जनतेनें अशा पुस्तकास स्वागतिलें नसतें तरच नवल ! उन्हाळ्याचे शेवटीं तृषाक्रांत झालेली भूमि जशी पावसाच्या पहिल्या सरींना घटघट पिअून टाकते तद्वतच स्वातंत्र्योत्सुक परंतु त्या वेळच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत किंकर्तव्यमूढ झालेल्या महाराष्ट्रीय तरुणांच्या मनोभूमीनें ह्या पुस्तकांतील मॅझिनीच्या उपदेशामृताचें आकंठ ( पान ) सेवन केलें. तरुणांची तर गोष्ट काय पण कित्येक वृद्धांनीदेखील आपल्या मुलांमुलींकडून या पुस्तकाची प्रस्तावना तोंडपाठ करवून घेतली! अशीं कित्येक अुदाहरणें प्रसिद्धच आहेत.

अर्थातच असें पुस्तक सरकारी अधिकाऱ्यांच्या वक्रदृष्टीतून सुटणें शक्यच नव्हतें. या पुस्तकाची पहिली आवृत्ती हातोहात अुडाली. आणि देशवीर बाबाराव सावरकरांनीं दुसरी आवृत्ती छापण्याची सिद्धता केली. तोंच हें पुस्तक जप्त झाल्याची वार्ता येअून धडकली आणि महाराष्ट्रभर त्या पुस्तकाच्या प्रती जप्त करण्यासाठीं शेंकडों ठिकाणीं घरांच्या आणि छापखान्यांच्या झडत्या चालू झाल्या. कांहीं ठिकाणीं प्रती आडांतील आणि विहीरींतील कोनाड्यांत लपविलेल्या सांपडल्या. पुढें जेव्हां "अभिनव भारतां"तील क्रांतिकारकाच्या झडत्यांचें आणि धरपकडीचें सत्रच सुरू झालें तेव्हां ह्या मॅझिनीच्या पुस्तकाची प्रत घरांत सांपडणें हा क्रांतिकारक असल्याचा अेक प्रबळ पुरावाच समजला जाअी !

अिंग्रज सरकारच्या अशा कडक वक्रदृष्टींतूनही अनेक संकटें सोसून लोकांनीं ह्या पुस्तकाचें जतन केलें. हें पुस्तक जप्त झाल्यास आज उणीपुरीं ४० वर्षें अुलटून गेलीं आहेत. या ४० वर्षांत अेखाद्या मोहोरांच्या निधीप्रमाणें ह्या पुस्तकाच्या प्रती कडक शिक्षेची क्षिती न बाळगतां घरोघरीं दडवून ठेवल्या गेल्या. अेखाद्या धर्मग्रंथाप्रमाणें पिढीमागून पिढी त्याचीं पारायणें करीत आली. अेकाद्या दुर्मिळ प्रतीचा सुगावा लागतांच मूळ मूल्याच्या तिपटी चौपटीनें मूल्य देअून क्रांतिकारकांनीं ती गुप्तपणें विकत घ्यावी ! ह्या पुस्तकांतील शतावधी सूत्रमय वाक्यें, त्यांतील उपमा, त्याची भाषाशैली हीं महाराष्ट्रीय वाङ्मयांत अुतरली जाऊन आतां तीं मूळची कुठलीं हें कळतांही येअूं नये अितकीं अेकजीव झालेलीं आहेत.

ह्या पुस्तकावरील जप्ती अुठवण्याचे प्रकट प्रयत्नहि जनतेनें अनेक वेळां केले. सभांतून त्यांतील अुतारे उघडपणें वाचून दाखवून कित्येकांनीं निर्बंध-भंग केला आणि देहदंडहि भोगला. तथापि अिंग्रज सरकारनें तर ती बंदी उठविली नाहींच परंतु ९।१० वर्षांपूर्वीं जेव्हां जनतेचें म्हणविणारे कॉंग्रेसचें मंत्रिमडळ अधिकारावर आलें होतें तेव्हां त्या कॉंग्रेसच्या मत्रिमंडळाचीहि ह्या पुस्तकांवरील बंदी अुठविण्याची छाती झाली नाहीं. त्याना तशी अिच्छाहि झाली नाहीं, परंतु ह्या पुस्तकांतील स्वातंत्र्याच्या ध्येयाचा आणि क्रांतिशील कार्यक्रमाचा फैलाव जनतेंत सारखा होत होता, आज काळ इतका बदलून गेला कीं, यापुढें ती बंदी न अुठविणें हेंच अशक्य होअून बसलें !

आजच्या काँग्रेस, हिंदुमहासभा, रॉयिस्ट, सोशॅलिस्ट प्रभृति पक्षांच्या धुरिणांपैकीं अनेकजणांना देशभक्तीची, स्वातंत्र्यप्रेमाची आणि क्रांतिप्रवणतेची स्फूर्ति ह्या पुस्तकाच्या वाचनानें मिळाली होती आणि त्यापैकीं कित्येकांनीं तर त्यांतील प्रस्तावनेचा भाग ते "अभिनव भारत" या गुप्त मंडळाचे सदस्य असतां तोंडपाठ केलेलें होते. तथापि अनुकूल संधी मिळेतों त्यांच्यापैकीं ज्यांच्या हातीं मध्यंतरीं सत्ता आली त्यांनाही या पुस्तकावरील बंदी आजवर उठवितां आली नाहीं.

तथापि ४० वर्षांनंतर कां होईना पण मुंबई सरकारचे आजचें मुख्य प्रधान आणि त्यांचे तरुणपणी अभिनव भारताचे सदस्य असलेले श्री. बाळासाहेब खेर यांच्या प्रमुखत्वाखालीं अधिकारावर झालेल्या काँग्रेस मंत्रिमंडळानें ह्या पुस्तकावरील आणि एकंदर सावरकर वाङ्मयावरील बंदी शेवटीं उठविली त्याविषयीं जनता त्यांची आभारी आहे.

## अेक अैतिहासिक चमत्कार

ह्या प्रसिद्ध होणाऱ्या जोसेफ मॅझिनीचे आत्मवृत्तांत हें दिसून येअीलच कीं मॅझिनीनें आपल्या जीवनाच्या राजकीय ध्येयांची परंपरा पुढीलप्रमाणें ठेवलेली होती :— (१) अिटलीचें राजकीय स्वातंत्र्य; (२) अिटलीचें अैक्य नि (३) अिटलींत स्वतंत्र लोकसत्तात्मक राज्यघटना.

ह्या तीन ध्येयांपैकीं मॅझिनीचे आयुष्यांतच त्याचां पहिलीं दोन अत्यंत दुःसाध्य ध्येयें आधींच वास्तवांत अवतरलीं. अिटली स्वतंत्र झाला; अिटली अनेक भागांत छिन्नविच्छिन्न झालेला अिटली—एकाच स्वतंत्र राजसत्तेखालीं एकजीव नि एकसंघ झाला. परंतु मॅझिनी—गॅरिबाल्डीचें तिसरें ध्येय जें लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापणें तें मॅझिनीचे जीवनकालांत प्रत्यक्षांत उतरवितां आलें नाहीं.

परंतु मॅझिनी स्वतः म्हणत असे कीं व्यक्तीचें जीवन हें राष्ट्रीय जीवनापेक्षां केव्हांही अत्यंत अल्पकालीन असावयाचेंच. माझा देश स्वतंत्र झाला आणि सर्वांआधीं स्वातंत्र्य हेंच राष्ट्राचें पहिलें ध्येय! माझा देश तीन परकीय सत्तांखालीं छिन्नविच्छिन्न झाला होता तो त्या तीनही परकी सत्तांचा चक्काचूर करून आज माझ्या डोळ्यासमोर अभंग नि अविभाज्य

असा अेकसंघ नि अेकध्वज झाला ! आतां या दोन्ही ध्येयांच्यापेक्षां अर्थातच दुय्यम महत्त्वाचे असलेले आणि वहुधा दोन्ही ध्येयांनंतरच शक्य असलेलें तिसरें ध्येय जे अिटली देशांत प्राजक (Republic) स्थापन करण्याचें कार्य, तेवढें अुरलें आहे. तें माझ्या नाहींतर पुढील पिढींत केव्हां पूर्ण झाल्याविना राहणार नाहीं !

मॅझिनीचे आयुष्यांतच त्याच्या आत्मवृत्तांत वर्णिल्याप्रमाणें मॅझिनी आणि गॅरिबॉल्डी यांनी खि. १८४८ केलेल्या क्रांतिकारक अुठावणींत रोममध्यें प्राजकच स्थापन केलेलें होतें आणि रोमवर त्यांनीं त्या स्वतंत्र प्राजकाच्या अुभारलेल्या ध्वजाखालीं अेक अतुलनीय समर झुंजविलें होतें. परंतु त्या वेळीं फरान्संच्या तिसऱ्या नेपोलिअननें रोमवर चढाअी करून त्या प्राजकाचा पराभव करून स्वतंत्र अिटलीचा तो ध्वज अुखडून फेकून दिला होता.

## मॅझिनीचें तिसरें स्वप्नही शेवटीं सत्य ठरलें

परंतु केव्हां केव्हां नैसर्गिक चमत्कारांअितकेच आश्चर्यकारक असे अैतिहासिक चमत्कार घडतात. असाच अेक चमत्कार या चालू खिर. १९४६ च्या जून महिन्यांत अिटलींत अलीकडेच घडला आहे. अिटलीमध्यें राजसत्तेचें विसर्जन करून रोममध्यें शेवटीं प्राजक स्थापन झाल्याची अुद्घोषणा करण्यांत आली. मॅझिनी–गॅरिबाल्डी यांनीं रोममध्यें खिर. १८४८–४९ त जो स्वतंत्र प्राजकाचा लोकसत्ताक ध्वज अुभारला होता, तो जुनाट संग्रहालयांत कुठेंतरी खुपसून ठेवलेला होता त्यासच त्या वेळीं हुडकून बाहेर काढण्यांत आलें. तो अनेक ठिकाणीं फाटून गेलेला होता. त्याला टाचण्यांनीं ठिकठिकाणीं जुळविण्यांत आलें. आणि मॅझिनी–गॅरिबाल्डींचा स्वतंत्र प्राजकाचा तोच ध्वज लक्षावधी अिटालिअन नागरिकांच्या प्रचंड जयघोषांत रोमवर न्यूनाधिक शंभर वर्षांनंतर पुनः अुभारण्यांत आला हें केवढें आश्चर्य ! ! कोणत्याहि स्वाभिमानी राष्ट्रास आपल्या परंपरेचा केवढा अभिमान असतो पहा ! किंबहुना ही अैतिहासिक स्मृतिसंततता, हा परंपरागत अभिमान म्हणजेच राष्ट्रीय जीवन, राष्ट्रीय सत्त्वाची जाणीव, राष्ट्रीय आत्मा होय.



वि. दा. सावरकर

# भाषांतरकर्त्यांची प्रस्तावना

६७३३

शास्त्रांचीं प्रमेयें हीं कालदेशांनीं मर्यादित नसतात. भूमितीचे सिद्धांत हे ग्रीसमध्यें जितके सत्य आहेत तितकेच ते हिंदुस्थानांतही आहेत व ते युक्लिडच्या काळीं जितके यथार्थ होते तितकेच आजही आहेत. मानवी जातीचें विस्तृत क्षेत्र व कालाची अनंतता ध्यानांत घेऊन त्यांच्या अनुरोधानें बसविलेले जे सिद्धान्त असतात ते सर्व कालीं व सर्व मनुष्यांना सारखेच लागू आहेत. असले सर्वसाधारण सिद्धांत पठन करणें व त्यांचा आपल्या स्वतःचे उन्नतीसाठीं उपयोग करणें हें अत्यंत अवश्यक आहे. प्रत्येक मनुष्य मागच्या इतिहासाचा व अनुभवाचा फायदा न घेतां मनुष्यजातीनें आरंभीं केलेल्या चुका पुन्हां करूं लागल्यास मानवी उत्क्रांति खुंटली असेंच ह्मणावें लागेल. मनुष्य जातीनें जे प्रश्न सोडवून ठेविले आहेत ते पुन्हां सोडविण्यांत काल व्यर्थ घालविण्यापेक्षां त्या प्रश्नांचीं कालदेशांनीं अमर्यादित अशीं उत्तरें जीं अनेक तत्त्ववेत्त्यांनीं सिद्धांतरूपानें ग्रथित केलेलीं आहेत, तीं समजावून घेऊन ज्या प्रश्नांचीं उत्तरें मनुष्यजातीला अजून मिळालीं नाहींत ते प्रश्न सोडविण्यांत तो काल घालविणें हेंच श्रेयस्कर आहे. मानवी उत्क्रांति सुलभ करण्यासाठीं तत्त्ववेत्त्यांनीं जगाचा आजपर्यंतचा अनुभव व्यर्थ न जाऊं देतां त्याचें सूक्ष्म परीक्षण करून सर्वव्यापी तत्त्वें सिद्ध केलेलीं आहेत. ज्योतिषशास्त्र, भूमितिशास्त्र, रसायनशास्त्र वगैरे शास्त्रांचीं आज जीं रूपें दिसत आहेत तीं मनुष्यांच्या निरनिराळ्या अनुभवावरून सर्वमान्य ठरलेलीं तत्वें संग्रहित केल्यानेंच शक्य झालेलीं आहेत. त्या शास्त्रांतील तीं सर्वव्यापी तत्त्वें सर्व देशांना व सर्व कालीं लागू होणारीं असल्यानें त्यांचा फायदा मुद्दाम करून न घेतां पुन्हां ‘ पहिले पाढे पढ पंचावन ’ करीत बसणें हा मूर्खपणाचा कळस आहे. ही गोष्ट जशी ज्योतिषशास्त्र, भूमितिशास्त्र व रसायनशास्त्र वगैरेंना लागू आहे, तशीच ती राजकारणशास्त्रालाही लागू आहे. राजकारणशास्त्राची उत्क्रांति मनुष्याच्या प्रगमनाबरोबरच होत आलेली आहे. राजकारणशास्त्रांतही इतर शास्त्रसत्यांप्रमाणेंच कांहीं तत्त्वें कालदेशानें अमर्यादित अशा महत् सत्यांच्या योग्यतेला पावलेलीं आहेत. त्या सत्यांचें ज्ञान असणें, मनुष्यजातीच्या आजपर्यंतच्या अनुभवाचा फायदा

घेणें, भूतकालाच्या यष्टीचा भविष्यन्मार्गगमनास आधार घेणें व " इतिहासप्रदीपेन मोहावरणघातिना लोकगर्भ–गृहं कृत्स्नं यथावत् " संप्रकाशित करण्यास तत्पर होणें हें अत्यंत श्रेयस्कर आहे. इतर राष्ट्रांनीं अनेक शतकें त्रास सोसून व अनेक देहांचे बळी देऊन जीं महत् तत्त्वें शोधून काढलीं आहेत त्यांचा उपयोग न करून घेतां जर एखादा देश अज्ञानांत जाणून बुजून चांचपडत राहत असेल तर ह्या राष्ट्रीय आंधळेपणाबद्दल त्यास परिणामीं भयंकर पश्चात्ताप झाल्याशिवाय राहणार नाहीं. आग लागली असतां त्यावर पाणी ओतावें हें सर्वमान्य तत्त्व मुद्दाम फेंटाळून त्या आगीवर घृताचा वर्षाव करून ती विझते कीं नाहीं म्हणून धिमेपणानें प्रयत्न करणाऱ्या पढतमूर्खाला त्या आगीच्या डोंबांत दग्ध होण्याशिवाय दुसरें काय बक्षिस मिळणार आहे ? अशी स्थिति माझ्या प्रिय आर्यभूमीची होऊं नये म्हणून माझ्या तरुण देशबंधूंनीं राजकारणांतील अंतिम सत्यें व महत् सिद्धांत शिकावे अशी माझी उत्कट इच्छा आहे. हीं सत्यें शिकण्यास राजकारणशास्त्रांत ज्यांनीं अग्रेसरत्व मिळविलें आहे त्यांच्या उपदेशामृताच्या प्राशनाशिवाय दुसरा उत्तम मार्ग नाहीं; व राजकारणशास्त्रांत ज्यांनीं अग्रेसरत्व मिळविलें आहे, अशा तत्त्ववेत्त्यांमध्यें महाभाग मॅझिनीशिवाय तरुण राष्ट्रभक्तांना उत्साहक, दिव्य, प्रेमळ, व उदात्त अशा राष्ट्रमंत्रांची दीक्षा देण्यास कोणता गुरु सांपडणार आहे ?

" नाहीं, नाहीं, राष्ट्रें कधींही मरत नाहींत. परमेश्वर गांजलेल्यांचा कैवारी आहे. त्यानें मनुष्याला स्वातंत्र्यांत राहण्यासाठीं उत्पन्न केलें आहे. तुम्हीं मनांत आणा कीं तुमचा देश स्वतंत्र झालाच ! " याहून अधिक उत्साहक असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? " एकदां मनुष्यानें असा निश्चय केला कीं मी स्वातंत्र्य, स्वदेश व मानव्य यांवर भक्ति करितों कीं मग त्यानें स्वातंत्र्यासाठीं, स्वदेशासाठीं व मानव्यासाठीं लढलेंच पाहिजे, अखंड लढलें पाहिजे, सर्व आयुष्यभर लढलें पाहिजे, शक्य त्या त्या शस्त्रानें लढलें पाहिजे, तिरस्कारापासून तों मरणापर्यंत सर्व संकटें तुच्छ मानिलीं पाहिजेत, द्वेषाला व निंदेला तोंड दिलें पाहिजे, दुसऱ्या कोणच्याही फलाची आकांक्षा न करितां फक्त कर्तव्य म्हणून त्यानें तत्पर झालें पाहिजे ! " याहून अधिक दिव्य असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? " प्रीति करा, तरुणहो, प्रीति करा, मनुष्याला परमेश्वराकडे नेणारी प्रीति ही सोपानपरंपरा

आहे. कुटुंबावर प्रीति करा, स्वदेशावर प्रीति करा. तरुण हो, मनुष्य जातीवर प्रीति करा !" याहून अधिक प्रेमळ असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? व "नुसती इटली स्वतंत्र होऊन काय उपयोग ! आपण स्वतंत्र होतांच दुसऱ्यांना स्वतंत्र केलें पाहिजे." याहून अधिक उदात्त असा दुसरा कोणचा राष्ट्रमंत्र आहे ? अशा या राष्ट्रीय मंत्रांचा मंत्रद्रष्टा जो इटलीचा स्वातंत्र्यदाता देशभक्त मॅझिनी त्याचें आत्मचरित्र व कांहीं राजकीय लेख यांचें भाषांतर या ठिकाणीं केलें जात आहे. या लेखांनीं दोन कोटी लोकांना चैतन्य आलें. या लेखांचें पाणी ग्यॅरिबाल्डीच्या तरवारीवर झळकत होतें. या लेखांनीं युरोपचीं सिंहासनें उलथींच्या पालथीं केलेलीं आहेत. या लेखांनीं इटली देश स्वतंत्र झाला आहे. व सर्व परतंत्र देशांना स्वातंत्र्य देण्याचें सामर्थ्य या लेखांमध्यें भरलेलें आहे ! मॅझिनीनें हीं तत्त्वें केवळ इटलीकरितांच सांगितलेलीं नाहींत. इटली निमित्त मात्र असून हीं राजकारणशास्त्रांतील महत्सत्यें त्या महात्म्यानें सर्व मनुष्यजातीसाठीं प्रकट केलेलीं आहेत. हा स्वातंत्र्यसुधेचा मेवा सर्व संतप्त भूमिकांकडे वळला आहे. चातकांनों, ही संधी साधून आपापल्या तृषा भागवून घेणें हें आतां तुमच्या हातीं आहे !

यापेक्षां मॅझिनीचे लेखांची **प्रस्तावना** मी पामर जास्त ती काय लिहिणार ? तथापि या पुस्तकांत त्याचे निवडक लेख तुटक रीतीनें भाषांतर केलेले असल्यानें मॅझिनीच्या सर्व मतांची बरोबर सांखळी जुळविणें हें जरा अवघड जाणार आहे. एतदर्थ या महात्म्याच्या राजकीय मतांची दिग्दर्शना होईल तितकी त्याच्याच वाक्यांत गुंफून संक्षिप्त व साररूपानें तयार केली असतां ती समजण्याला सुलभ पडेल अशा आशेनें मी तसें करण्याचा प्रयत्न करीत आहें.

जगामध्यें आजपर्यंत जेवढ्या राज्यक्रांत्या झाल्या त्या सर्वांहून इटलीच्या राज्यक्रांतींत उदात्त वृत्तींचा कळस झालेला आहे. स्वदेशाभिमानाची ज्योत इतकी प्रज्वलित झालेली होती, प्रत्येक देशभक्त व्यक्तिविषयक सुखाबद्दल इतका उदासीन होता, स्वदेशासाठीं सर्वस्व वाहण्याची इतकी चढाओढ सुरू होती, परक्या सत्तेकडून हें चैतन्य दाबून टाकण्यासाठीं इतके भयंकर जुलूम करण्यांत येत होते, त्या जुलमांत देशभक्तांचे तांडे चिरडले जात असतांही प्रत्येक वर्षी लोकक्षोभाची उसळी इतकी विलक्षण व निधड्या छातीची होत होती व अखेर साठ वर्षांवर लढून लढून देशवीरांनीं इतक्या

चिकाटीनें यश मिळविलें कीं, या सर्व महत्कृत्यांनीं व महनीय नरमण्यांनीं अलंकृत अशी दुसरी राज्यक्रांती आजपर्यंत झालेली नाहीं, असें इतिहासास कबूल करावें लागतें. या इटलीच्या राज्यक्रांतींत सद्‌गुणांचा जो इतका उत्कर्ष झाला याचें मुख्य कारण हें आहे कीं, ती राज्यक्रांती ही व्यक्तीसाठीं, लोभासाठीं किंवा **त्वेषासाठीं** झालेली नसून तिचा पाया अत्यंत उन्नत अशा महत्तत्त्वांवर रचलेला होता. "मोठाल्या क्रांत्या ह्या तरवारीपेक्षां तत्त्वांनींच घडवून आणलेल्या असतात." तरवारीशिवाय तत्त्वांचा जय होत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे व म्हणून इटलीनें तरवार उपसली. परंतु "त्या तरवारीचे अग्रभागीं जर सत्याचें अधिष्ठान नसतें तर त्या तरवारीला तिनें स्पर्शही केला नसता." ज्या तत्त्वांवर या पवित्र स्वातंत्र्य-युद्धाचा पाया रचला होता तीं तत्त्वें प्रथमतः मॅझिनीनें इटलीस शिकविलीं. इटलीच्यासाठीं लढलेल्या देशभक्तांमध्यें मॅझिनीच्या "तरुण इटलींत" ज्यांनीं शिक्षण घेतलें नव्हतें असे लोक फारच थोडे होते. ह्या तत्त्वविचारांत व इतर राजकारणपटु कारस्थान्यांच्या उपदेशांत एक महत्त्वाचा भेद आहे. मॅझिनीचें राजकारण हें केवळ ऐहिक व स्वार्थ-प्रवृत्तीचें नव्हतें. तसें असतें तर त्या राजकारणानें प्रवृत्त झालेल्या देशवीरांचे अंतःकरणांत इतक्या उदात्त वृत्तीचा उदय झाला नसता. मॅझिनीचें राजकारण हें प्रवृत्ति व निवृत्ति ह्यांचें एकीकरण होतें. त्याच्या राजकारणाची इमारत ही नीतीच्या पायावर उभारलेली होती. हें सिद्ध केल्यानें त्या वेळपर्यंत राजकारणाची थोर पुरुषांकडून जी अवहेलना होत असे ती नष्ट झाली. राजकारण हें स्वार्थाचें व अप्पलपोटेपणाचें शास्त्र आहे व यांत जो बळी तो कानपिळी या पशुवृत्तीचाच अंमल आहे अशी सर्वत्र समजूत असल्यानें या राजकारणाचा साधुपुरुषांना तिटकारा येणें साहजिक होतें. दुसऱ्याच्या देशावर घाला घालणें, त्याचें स्वातंत्र्य लुबाडून घेणें, हें जर राजकारण असेल–तोंपर्यंत व अजूनही तें बहुतेक राष्ट्रांकडून तसेंच आहे असें मानण्यांत येतें–तर मग त्या राजकारणांत व नरकांत भेद कोठें राहिला? मॅझिनीनें राजकारणास या नरकगामी कल्पनेपासून मुक्त केलें. राजकारण हें परमेश्वरी कर्तव्य आहे असें त्यानें स्पष्ट रीतीनें सिद्ध केलें. प्रवृत्ति व निवृत्ति हीं दोन परस्परविरोधी तत्त्वें नसून तीं एकाच मार्गाच्या दोन भिन्न भागांचीं नांवें आहेत असें

त्यानें प्रतिपादन केलें. " नाहीं, स्वर्ग व पृथ्वी यांच्यामध्यें विरोध आहे किंवा तीं भिन्न आहेत हें सत्य नाहीं. नाहीं, स्वर्गांत सत्य व न्याय्यांचें ईश्वरी राज्य चालावें व पृथ्वीवर असत्य व अन्याय्य यांचा अंमल चालावा हें खरें नाहीं. पृथ्वी ही स्वर्गाची शिडी आहे." राजकारणाला स्वार्थपरायणतेचें हिडिस स्वरूप देणाऱ्या लोकांची चुकी अशा रीतीनें उघडकीस आणून मग मॅझिनीनें फाजिल धर्माभिमान्यांचा समाचार घेतला आहे. धर्मानें राजकारणांत लक्ष घालणें अवश्य आहे. इतकेंच नव्हे तर तें त्याचें कर्तव्य आहे. राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमोचना व संवर्धना होय. तिकडे दुर्लक्ष करणें म्हणजे मनुष्यजातीवर आलेलें भयंकर संकट निमूटपणें पहाण्याचें अक्षम्य पातक करणें होय. धर्माची खरी व्याख्या ह्मणजे मनुष्यमात्राचें धारण करणें ही होय. मनुष्यमात्र दास्यपंकांत किंवा अनीतींत पचत असतां आपण तेवढें स्वतःस मुक्त करून घेऊं ही समजूत ढोंगीपणाची आहे. भूतदयेशिवाय स्वतःच्या मुक्तीला दुसरा मार्ग नाहीं. " तुमची जेव्हां चौकशी होईल तेव्हां परमेश्वर तुह्मांला असें विचारणार नाहीं कीं 'तुह्मीं स्वतःच्या कल्याणासाठीं काय केलेंत ?' तर तो तुम्हांला असेंच विचारणार आहे कीं 'तुम्हीं भूतमात्रांच्या कल्याणाकरितां काय केलें आहे ? मी जे स्वदेशबंधू तुह्मांला दिले त्यांच्या कल्याणाकरितां काय केलें आहे ?" हें भूतमात्रांचें अंतिम कल्याण करण्यासाठीं, त्यांची ज्ञानानें व पावित्र्यानें आत्मोन्नति होण्यासाठीं व त्यांना सत्कृत्यें करण्यास सामर्थ्य येण्यासाठीं पहिली अत्यंत अवश्यक गोष्ट ह्मटली ह्मणजे त्यांचें दास्यविमोचन करणें—त्यांस स्वातंत्र्य मिळवून देणें—ही होय. जोंपर्यंत एखाद्या व्यक्तीला तुरुंगांत बांधून टाकिलें आहे तोंपर्यंत, तिच्या हातून सत्कृत्यें घडणें व प्रगमन होणें हें जितकें अशक्य आहे तितकेंच जोंपर्यंत एखादा देश राजकीय पारतंत्र्यांत खिळून टाकलेला आहे तोंपर्यंत त्याच्या हातून मानवी प्रगमनाला मदत होणें हें अशक्य आहे. अशा स्थितींत, " आपण सर्वजण एकमेकांच्या मुक्ततेबद्दल जबाबदार आहोंत. जर आपण आपल्या इतर मानवी बंधूंस परवशतेंत व अज्ञानांत तसेंच पडूं देऊं, तर परमेश्वराचा द्रोह केल्याचें महत्पाप आपल्या माथीं बसेल. स्वतःची उन्नति व मुक्तता करण्याचा एकच मार्ग आहे. व तो सर्वांना मुक्ति मिळेल असा प्रयत्न करणें हा होय." आपण ज्या देशांत जन्मलों व ज्या देशाचें अन्न खाल्लें त्याचें कर्ज फेडल्याशिवाय

आपणास स्वर्गाचीं दारें खुलीं होणार नाहींत, हें व्यक्तिविषयक मोक्षासाठीं धडपडणाऱ्या ढोंगी साधूंस किंवा अभिष्ट धर्माभिमान्यांस कळलें पाहिजे.

"भूतांची दया हें भांडवल संतां। आपुल्या ममता नाहीं देहीं॥
तुका ह्मणे सुख पराचिया सुखें। अमृत हें मुखें स्रवतसे॥"

हें खरें धर्मरहस्य होय. व ह्मणून धर्माभिमान्यांस व धर्मोपदेशकांस मॅझिनी विचारतो, "अहो धर्माधिकारी हो, तुमचाही जन्म या भूमींतच झाला नाहीं काय? तुह्मांलाही या भूमीनेंच पोसलें नाहीं काय? हिच्याच दुधावर तुह्मी वाढलां नाहीं काय? मग ती जुलुमाखालीं चिरडत असतां तुह्मी स्वस्थ बसून स्वर्गांत कसे चढाल? तुह्मांला देश नाहीं काय? तुह्मांला भूतदया नाहीं काय? तुमच्या या कृतघ्नतेनें तुह्मीं पापी ठरत आहां. धर्म हा आतां तुमच्या छावणींत नसून तो आमच्या छावणींत आलेला आहे. बायबलमध्यें स्वातंत्र्य पवित्र मानलें नाहीं काय? व तुमचा देश पारतंत्र्यानें अपवित्र झालेला नाहीं काय? मग सर्वत्र स्वातंत्र्य नांदावें, मनुष्यांतील द्वेषभाव नष्ट व्हावा, धर्माचा खरा जयजयकार व्हावा, अशी जर तुमची खरी इच्छा असेल तर तुह्मीं आह्मांस मिळा." अशा रीतीनें धर्म हा राजकारणाचा विरोधी नाहीं हें मॅझिनीनें आपल्या अधिकारयुक्त वाणीनें प्रतिपादन केलें. तो स्वतःच एका ठिकाणीं ह्मणतो कीं, "राजकारणाला आह्मीं धर्माच्या उच्चतेप्रत नेलें." जे कारस्थानपटु धर्माचा व नीतीचा धिक्कार करून राजकारणाला धर्म नाहीं ह्मणून ह्मणत होते व जे धर्मपटु राजकीय स्थितीकडे दुर्लक्ष करून धर्माला राजकारण नाहीं ह्मणून ह्मणत होते त्या दोन्ही पक्षांचे अपराध व दोष उघडकीस आणून, "आयुष्यांत भिन्नता नाहीं, आयुष्य एकरूप आहे. परमेश्वराच्या आज्ञा परस्परविरोधी नाहींत. परमेश्वरी आज्ञा एकच आहे व ती सर्वांना सारखी लागू आहे." अशा पवित्र व उदात्त तत्त्वाचा मॅझिनीनें उच्चार केला. राज्यक्रांतिकारक पुढाऱ्यांत नीति व धर्म यांच्या पावित्र्यांतून ज्याला राज्यक्रांतीची स्फूर्ति मिळाली आहे असा महात्मा मॅझिनीशिवाय अन्यत्र सांपडणें हें यूरोपच्या इतिहासांत दुर्लभ आहे. हें मॅझिनीचें विशिष्ट कर्तृत्व आहे. त्याच्या व त्याच्या उपदेशानें प्रवृत्त झालेल्या तत्कालीन इटालियन देशवीरांच्या आयुष्यांत जो उदात्तपणा व जें पावनत्व दिसून येतें तें सर्व वरील नीतितत्त्वाचें फल आहे. स्वार्थासाठीं नव्हे तर परमेश्वरी कर्तव्य ह्मणून स्वदेश स्वतंत्र करण्यास जे देशवीर तयार

होतात त्यांच्या तरवारीपुढें ऑस्ट्रियाच काय, पण गर्वानें मदांध झालेला वाटेल तो देश चळचळ कांपूं लागेल. जर सर्व लोकांचीं मनें राजकारण व धर्म हे एकरूपच आहेत अशा पूत निष्ठेनें उद्युक्त होतील तर या जगांत पारतंत्र्याचें नांव देखील उरणार नाहीं. **राजकारणाला धर्म आहे व धर्माला राजकारण आहे,** हें महत् सत्य, हें कालदेशाबाधित सत्य, हें परमेश्वरी सत्य ओळखून " जर माझ्या प्रिय देशभूमीचे दोन कोटी लोक ' आतां स्वातंत्र्य मिळवावयाचेंच ' असें म्हणून उठले तर त्यांना एक ऑस्ट्रिया तर काय पण असे तीन ऑस्ट्रिया एकत्र झाले तरी त्यांचा उच्छेद करून आपलें स्वातंत्र्य परत मिळवितां येईल !" दोन कोटी देशबंधूंवरच त्या महात्म्याची ही केवढी उडी ! मग जर त्याच्या देशाची लोकसंख्या याहून दहा पांच पट असती व त्याचा शत्रु जर ऑस्ट्रिया एवढाच असता तर त्यानें स्वदेशस्वातंत्र्य मिळवावयास एक क्षणही लागूं दिला नसता ! मर्दांची गोष्ट अशीच आहे. धर्म व स्वराज्य या तत्त्वद्वयाची एकरूपता मॅझिनीचे शब्दांत ऐकिल्यावर कोणाही महाराष्ट्रीयाला महाराष्ट्राच्या मॅझिनीची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. सत्पुरुष हे परमेश्वराच्या अंशानें संभूत झालेले असल्यानें त्यांचे आत्मे हे भिन्न नसतात व म्हणूनच त्यांचे विचारही परस्परांशीं विसंगत होत नाहींत. निरनिराळ्या देशांतील त्यांचीं नांवें तेवढीं वेगळीं, बाकी तत्त्व एकच. इटलीमध्यें जन्मलेल्या रामदासांना मॅझिनी म्हणतात व हिंदुस्थानांत जन्मलेल्या मॅझिनीला रामदास म्हणतात. बाकी दोघेही एकच तत्व सांगतात कीं, राजकारण धार्मिक असेल तरच तें पवित्र आहे व धर्म राजकीय असेल तरच तो पवित्र आहे. " अमका मनुष्य धार्मिक आहे असें मला कळतांच मी पहिला प्रश्न हा विचारीन कीं त्यानें लोकांच्या मुक्ततेसाठीं काय केलें आहे व काय सोसलें आहे ? अमका ' मनुष्य ' आहे असें कळतांच मी पहिला प्रश्न हा विचारीन कीं तो गुलाम आहे काय ? कारण जो गुलामगिरींत स्वस्थ रहातो तो मनुष्य नसून ती नुसती जड माती आहे !"

राजकारणाला स्वार्थलंपटतेच्या तावडींतून सोडवून त्याला ईश्वरी कर्तव्याचें उच्च स्वरूप दिल्यानंतर मग अर्थातच त्या कर्तव्यासाठीं प्रत्येक मनुष्यानें कशा रीतीनें उद्योग करावा हें सांगणें प्राप्त होतें. मॅझिनीची कर्तव्यमीमांसा फारच उदात्त तत्त्वांवर रचलेली आहे, परंतु येथें मी त्या महात्म्याच्या राजकीय मतांचीच सांखळी देण्याचा प्रयत्न करीत असल्यानें त्या मीमां-

सेचें यथास्थित विवेचन करणें शक्य नाहीं. मॅझिनीच्या "मानवी कर्तव्यें" या नांवाच्या अत्यंत चटकदार निबंधाचें भाषांतर करण्याचा हेतु आहे. तो जर सफल झाला तर ही कर्तव्यमीमांसा केवळ मराठी वाचकांना मॅझिनीचे शब्दांतूनच वाचावयास मिळेल. येथें इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, जें कर्तव्य म्हणून ठरत असेल तें मनुष्यानें वाटेल तें संकट आलें तरी पार पाडलेंच पाहिजे, असें मॅझिनीचें मत आहे. "**कर्तव्यासाठीं कर्तव्य करा.** कर्तव्याच्या तत्त्वानें आत्मार्पणाचें सामर्थ्य येतें. ह्या उदात्त कल्पनेनें आत्मा परमेश्वराच्या रूपांत लीन होतो. या कर्तव्यनिष्ठेनें मनुष्याच्या अंगांत विलक्षण चैतन्य येतें. मनुष्य अचाट कर्मे करूं शकतो. या कर्तव्याच्या फलाशाविरहित निष्ठेनें देशवीरांच्या फांशीचे खांब हे स्वर्गाकडे नेणारे जिने होतात." आयुष्य हें सुखलंपटतेंत न घालवितां तें कर्तव्यलंपटतेंत घालवावें. "**आयुष्य हें चैन नसून आयुष्य हें कर्तव्य आहे.**" राजकारणांतील अगदीं प्रथम आधारभूत कर्तव्य म्हटलें म्हणजे स्वदेश-स्वातंत्र्य हें होय. मनुष्यजाति, स्वदेश, कुटुंब व व्यक्ति अशा पायरीनें मनुष्यांची कर्तव्यतारतम्यता आहे. या परंपरेच्या वांट्याला जीं राजकीय कर्तव्यें आलीं आहेत त्यांमध्यें स्वदेशस्वातंत्र्य हें प्रधान कर्तव्य आहेच आहे, परंतु राजकीय कर्तव्यासाठींच केवळ नव्हे तर इतर सर्व कर्तव्यें मनुष्याकडून यथास्थित रीतीनें पार पाडण्यास स्वदेशस्वातंत्र्य आधीं मिळविलें पाहिजे. व्यक्तीचीं किंवा कुटुंबांचीं कर्तव्यें जर त्यांच्या स्वदेशपारतंत्र्यांत असतील तर कधींहि यथास्थित चालावयाचीं नाहींत. लोकांत असत्य व दारिद्र्य माजून तो देश भ्याड व कमकुवत होतो. त्या देशाला ज्ञान देणें अशक्य होतें. "जेथें शिकण्यास दारिद्र्यानें वेळ मिळत नाहीं तेथें नुसत्या शाळा उघडून काय होणार?" या राजकीय पारतंत्र्यानें देशांतील व्यक्ति व कुटुंब यांचीच वाढ खुंटते असें नाहीं, तर मनुष्य जातीची वाढही तितक्या प्रमाणानें खुरटत जाते. "प्रत्येक देशाला मनुष्य जातीच्या उत्क्रांतींत भर टाकण्यासाठीं एक विशिष्ट कामगिरी सांगितलेली असते. परंतु पारतंत्र्यामुळें तो देशच अस्तित्वांत आहे असें म्हणतां येत नसल्यानें त्याच्या वांट्याला आलेलें कर्तव्य त्या देशाकडून घडणें अशक्य होतें व म्हणून तितक्या मानानें मनुष्य जातीची उन्नति अडकून राहते. सर्व देशाची उन्नति म्हणजे मानव्याची उन्नति. परंतु जोंवर पारतंत्र्यानें कांहीं देश नीचतेला खिळून टाकलेले आहेत, तोंवर

मानव्य उन्नतीला जाणार कसें ? म्हणून **व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या व मनुष्य जातीच्या सर्व प्रकारच्या उन्नतीचें मुख्य साधन जें राजकीय स्वातंत्र्य तें संपादन व संरक्षण करणें हें प्रथम कर्तव्य होय.** ही परमेश्वराची आज्ञा होय. ही धर्माची आज्ञा होय.

परंतु हें राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचें कर्तव्य पार पाडण्यास मार्ग कोणचा योजावा ? त्या वेळेस इटलीची स्थिति अशी होती कीं तिचें स्वामित्व ऑस्ट्रियाकडे गेलेलें आहे. पंचाहत्तर हजार आस्ट्रियन शिपायी इटलीवर राज्य करीत आहेत. पारतंत्र्याचें दुःख, दारिद्र्य व अज्ञानादिक परिणाम घडून आलेले आहेत. व्हेनिस व मिलन वगैरे व्यापारांत पूर्वी अत्यंत नाणावलेल्या प्रांतांतील लोकांस खावयाला मिळत नाहीं. शिक्षण परक्यांच्या हातीं. व्यापार परक्यांच्या हातीं, जीवन परक्यांच्या हातीं, स्वातंत्र्य परक्यांचे हातीं, इटली हा गुलामांचा बाजार बनला होता. तेथें जीं कांहीं थोडीं बहुत नेटिव संस्थानें होतीं तीं आस्ट्रियाच्या ताटाखालचीं मांजरें बनलीं होतीं. " इटलीचें नांव पुसून गेलें होतें. इटलीचें निशाण फाटून गेलें होतें." " ज्या रोमनें दोन वेळां सर्व जगाचें पुढारीपण स्वीकारलें होतें तें रोम मेलें आहे ! इटली हा एक भला थोरला तुरुंग बनला आहे व त्यावर आस्ट्रियन शिपायांचा पहारा बसलेला आहे " इटलींत शांतता आहे. " परंतु ती शांतता जिवंत मनुष्यांची नसून ती मेलेल्यांची शांतता आहे !" या अत्यंत अपमानकारक स्थितींतून स्वदेश वर कसा आणावा ? स्वातंत्र्य परत कसें मिळवावें ? मॅझिनी जन्मला त्याच वेळेस इटलीच्या लोकांनीं एक प्रश्न सोडविलेला होता कीं, स्वदेशाची उन्नति ही भिक्षांदेहीनें किंवा परक्यांच्या मदतीनें केव्हांहि होणार नाहीं. "तुह्मांला भिक्षा मागून स्वातंत्र्य मिळेल अशी आशा आहे काय ? नाहीं, नाहीं, या भिक्षांदेहीनें स्वातंत्र्य मिळणार नाहीं." त्यांच्यापुढें जें काम होतें तें उंच व धिप्पाड मनुष्यांचें होतें. व तें काम करण्यासाठीं ते जमिनीवर सपशेल पसरले. " त्यांनीं प्रत्येक मुख्य प्रधानाच्या थापांनीं भुलून जावें. त्यांनीं भिकार सवलतींत संतुष्ट रहावें, व त्यांनीं प्रचंड लोकशक्तीवर विश्वास ठेवण्याचें सोडून देऊन परक्यांच्या दाराशीं जोगवा मागण्याचा उपक्रम करावा." परंतु या उपक्रमाचा उपसंहार लवकरच झाला. इटलीचे धूर्त पुढारी या परक्यांच्या थापाथापीला फार दिवस भुलले नाहींत. त्यांच्या तेव्हांच ध्यानांत आलें कीं, आस्ट्रियानें जें आपणांस जिंकिलें आहे तें आपल्या अर्जांच्या चिटोऱ्यांनीं आपणांस

मुक्त करण्याकरितां नव्हे. राष्ट्रांच्या इतिहासांत बहुश: आढळून येणारें हें भिक्षांदेहीचें व्यसन इटलीस लागलें होतें. पण तें तावडतोब सुटलें. शंभर शंभर वर्षे परक्यांच्या दारीं लाथा बसत असतां व हजारों वेळां विश्वासभंग झाला असतांही पुन्हां एकदां कटोरा घेऊन भिक्षा मागण्याइतका इटलीदेश राजनिष्ठ झालेला नव्हता. त्याच वेळेस पोलंड, स्पेन वगैरे देशांत राज्यक्रांतीची लाट उसळली होती. तीमुळेंहि इटलींतील लोकांत आत्म–निष्ठा उत्पन्न झाली. परंतु अशा भयंकर राज्यक्रांत्या आजूबाजूस चालत असतांहि त्यांच्याकडे पाहून ज्यांना आपल्या गुलामगिरीची व भिक्षांदेहीची शरम वाटत नाहीं, असे देश या भूमीवर काय थोडे आहेत! पण इटली इतकी मंदट झालेली नव्हती. ती खडबडून जागी झाली. या जागृतीचा परिणाम चहूंकडे दिसूं लागला. स्वदेशाची प्रीति ही वाङ्मयांत प्रथम प्रादुर्भूत झाली. नंतर इटलीमध्यें स्वदेशी चळवळ सुरू झाली. मिलनमध्यें तर या स्वदेशी चळवळीचा कळसच झाला होता. प्रत्येक उदात्त व धाडसी कृत्यांत तरुणवर्ग जसा सदोदित अघाडीवर असतो तसाच तो इटलीच्या राज्यक्रांतींतहि होता. मिलनमध्यें ऑस्ट्रियाच्या तंबाखूवर विद्यार्थ्यांनीं कडक बहिष्कार टाकला. रस्त्यारस्त्यांतून विद्यार्थ्यांनीं नाकेबंदी केली व कोणी ऑस्ट्रियाची विडी ओढतांना पाहिला कीं त्याला हाणमार करून देण्याचा सपाटा चालविला. या स्वदेशी चळवळीला लवकरच पूर्ण राजकीय स्वरूप प्राप्त झालें. अमेरिकेंतहि स्वातंत्र्ययुद्धाच्या आधीं अशीच स्वदेशी चळवळ उत्पन्न झाली होती. काय विलक्षण प्रकार आहे! इतिहासाची पुनरावृत्ति होते ती अशी. इतिहासांत स्वदेशी चळवळीचें पर्यवसान राज्यक्रांतींत व स्वातंत्र्यप्राप्तींत झाल्याचीं हीं उदाहरणें कांहीं आकस्मिक रीतीनें घडून आलेलीं नाहींत. ते कांहीं अपघात नाहींत. त्यांच्या या विलक्षण साम्याचें विवरण करतां येणें शक्य आहे. स्वदेशी चळवळ म्हणजे 'दुसऱ्याच्या लुटारूपणास आळा घालून आपल्या हक्कांचा बचाव करणें, होय. आपले हक्क काय आहेत' हें सामान्य लोकांस एकदम कळत नाहीं. म्हणून प्रथमत: त्यांच्या ग्राहकशक्तीला इतकेंच कळतें कीं परक्यांच्या व्यापारानें आपण बुडत आहोंत. म्हणून ते त्या व्यापारावर बहिष्कार घालण्यास तयार होतात. इतकी त्यांची तयारी झाली कीं अर्थातच परके लोक आपल्या व्यापाराच्या संरक्षणार्थ जुलमी उपाय योजूं लागतात. हा जुलूम सुरू झाला कीं प्रथमत:

व्यापारावरच बहिष्कार घालणारे लोक अनायासेंच सत्य मार्गाला लागतात. त्यांना कळूं लागतें कीं निर्जीव परदेशी कापडावर किंवा तंबाखूवर अगर चहावर बहिष्कार घालून कांहीं उपयोग नाहीं. या निर्जीव वस्तूंवर राग काढण्यांत काय अर्थ आहे ? खरा राग या निर्जीव वस्तूंना ज्या सजीव वस्तूंचा आधार आहे त्यांच्यावरच उगविला पाहिजे. परक्या मालाला नव्हे तर परक्यांनाच बहिष्कार घातला पाहिजे. तंबाखूलाच नव्हे तर या ऑस्ट्रियन लोकांना व चहालाच नव्हे तर या इंग्रज लोकांनाच आपल्या देशांतून हुसकून दिलें पाहिजे. अशा विचारपरंपरेनें इटालियन व अमेरिकन लोकांमध्यें स्वदेशी चळवळीचें स्वातंत्र्य-युद्धांत रूपांतर झालें. मॅझिनीचे आधीं जे देशभक्त होऊन गेले, त्यांनीं इटलीचें राजकारण या स्थितींत आणून ठेविलेलें होतें. चहूंकडे परक्या सत्तेबद्दल असंतोष माजला होता. आपलीं दुःखें भिक्षावृत्तीनें कमी होणार नाहींत ही बहुतेकांची खात्री झालेली होती व स्वदेशी चळवळीसारख्या आत्मनिष्ठेच्या चळवळींचा प्रादुर्भाव झालेला होता. इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं पुढाऱ्यांना स्वातंत्र्याची लालसाहि उत्पन्न झाली होती. परंतु ही स्वातंत्र्याची लालसा सर्व लोकांना कशी कळवावी ? परक्यांना इटलींतून घालवून दिल्याशिवाय इटली देश कधींहि वर यावयाचा नाहीं हें लोकांना कसें शिकवावें ? वर्तमानपत्रें व उघड सभा असंतोष उत्पन्न करीत होत्या. परंतु या असंतोषाला कृत्याचें स्वरूप देणें आवश्यक होतें. कारण ऑस्ट्रियाला हुसकून द्या असें उघड रीतीनें कोणालाच सांगतां येईना व लाक्षणिक भाषेंत सांगितलें असतां तें सामान्य जनांना कळेना. याहीपेक्षां मोठी अडचण म्हणजे ही असे कीं, नुसतें ऑस्ट्रियाला हुसका इतकेंच म्हणून कार्य भागत नाहीं तर त्या राष्ट्रकृत्यासाठीं काय उपाय योजावे याचें शिक्षण व याची सामुग्रीहि जमविली पाहिजे होती. स्वातंत्र्य मिळवा इतकेंच म्हणून स्वस्थ बसावयाचें नव्हतें तर त्या स्वातंत्र्ययुद्धाची तयारी करणेंहि अवश्य होतें. हीं दोन कृत्यें कशीं पार पाडावीं. ? परक्यांच्या जुलुमाखालीं, " इटलीला पार्लमेंट नाहीं, व्यास-पीठ नाहीं, मुद्रण-स्वातंत्र्य नाहीं, वाक्-स्वातंत्र्य नाहीं, सभास्वातंत्र्य नाहीं, ज्यामुळें आमच्या मनांत स्फुरण पावत असलेलें सत्य स्पष्ट रीतीनें बोलतां येईल असें एकहि साधन नाहीं ! " अशी स्थिति झालेली असतांना इटलीमध्यें स्वातंत्र्यप्रेमाची लालसा व स्वातंत्र्ययुद्धाची तयारी हीं कशीं करावींत ? हा

प्रश्न सोडविण्याचा कारबोनारी वगैरे एक दोन गुप्त मंडळ्यांनीं प्रयत्न केला, तथापि त्यांत त्यांस यश आलें नाहीं. त्याचीं कारणें सांगत बसण्याचें हें स्थल नाहीं. या सर्व स्थितीचा विचार करून व इटलीच्या पूर्वीच्या इतिहासाचें नीट अध्ययन करून, " माझी अशी खात्री झाली आहे कीं या जुन्या यंत्रांना वितळवून पुन्हां नवीन यंत्र बनविल्याशिवाय इटलीचा भाग्योदय व्हावयाचा नाहीं. " या नवीन यंत्राचें साहित्य तरुण लोक होत. जुन्या विचारांनीं ज्यांचीं मनें जखडलीं गेलीं नाहींत, ज्यांचे आत्मे हे गुलामगिरीच्या विटाळानें भ्रष्ट झालेले नाहींत व ज्यांच्या अंगांत ध्येयासाठीं वाटेल तें संकट सोसण्याची धमक आहे, असे तरुण लोक आतां पुढें आले पाहिजेत. नवीन परिस्थितीला नवीन माणसें पाहिजेत. " दोन कोटी लोकांनीं मनांत आणलें तर त्यांना या जगांत काय करणें अशक्य आहे ! "माझ्या इटलीची लोकसंख्या दोन कोटी आहे ! या दोन कोटी लोकांच्या मनांत आल्यावर त्यांना परक्यांचे पंचाहत्तर हजार शिपुर्डे दाबून ठेवणार आहेत ? दोन कोटी लोक व त्यांचे बाजूला परमेश्वर ! " अशा स्थितींत परक्यांचा निःपात इटली एका निमिषमात्रांत करून टाकील. " **आजपर्यंत तिला स्वतंत्र होतां आलें नाहीं याचें कारण तिच्यांत स्वशक्ति नव्हती हें नव्हे तर तिला स्वशक्तिज्ञान नव्हतें** " हा आत्मविश्वास उत्पन्न करण्याचें पहिलें काम होते व हें काम पूर्ण होतांच इटलीला स्वातंत्र्याची तळमळ व तें आपण आपल्या करामतीनें मिळवावयाचें ही निष्ठा आली कीं तिला रणांत उडी टाकावयास सशक्तता आणण्याचें दुसरें काम होतें. इटलीमध्यें प्रथम मनः–प्रवर्तन करावयाचें व त्याबरोबरच शरीर–प्रवर्तन करावयाचें. इटलीचें मन स्वतंत्र व समर्थ करावयाचें व इटलीचें शरीर स्वतंत्र व सशस्त्र करावयाचें.

परंतु हीं कृत्यें उघडरीतीनें घडवून आणणे अशक्य होतें हें वर सांगितलेंच आहे. कोणत्याही परतंत्र राष्ट्राची ह्या पायरीपर्यंत मजल आली कीं त्याच्यापुढें हाच महत्वाचा प्रश्न येऊन पडतो. स्वातंत्र्य पाहिजे ही अस्पष्ट इच्छा उत्पन्न झालेली असते. पण बहुजनसमाजाला ती स्पष्टपणें कशी कळवावी ? भिक्षा मागून कांहींहि प्राप्ति होणार नाहीं व शेवटीं शक्तिदेवीचीच उपासना करावी लागणार, हें त्यांस अंधुक रीतीनें कळूं लागतें. परंतु राष्ट्राला सशक्त व सशस्त्र कसें करावें हें मात्र त्यांस सांगतां येत नाहीं. " अशा स्थितींत **' गुप्त मंडळ्या '** शिवाय परवशतेंतून सुटण्याचा दुसरा उपाय नाहीं.

जेव्हां सत्यप्रतिपादनाची बंदी झालेली असते, जेव्हां पवित्र कार्यालाही आरंभ करण्याची चोरी झालेली असते, जेव्हां स्वदेश हा एक भला थोरला तुरुंग बनलेला असतो, तेव्हां त्या तुरुंगांतून सुटून स्वातंत्र्याचे पवित्र वातावरणांत श्वासोच्छ्वास करण्याचा ईश्वरी हक्क शाबित करण्यासाठीं आम्हां कैद्यांना **गुप्त कट** हा एकच मार्ग आहे. आम्हीं गुप्त मंडळ्या करूं, गुप्त कट करूं, वेळ येतांच त्या तुरुंगाच्या खिडक्या उघडून टाकूं, त्यांच्या गजाचे तुकडे उडवूं, त्यांच्या दरवाज्यांना लाथेसरशीं फोडून टाकूं व त्या तुरुंगवाल्यांच्या छातीवर नाचत नाचत आम्हीं मोकळ्या हवेंत येऊं–आम्हीं स्वतंत्र होऊं!" जेथें सत्य प्रतिपादनाची अधम सत्तेनें बंदी केलेली नाहीं तेथें गुप्त मंडळ्या व गुप्त कट हा गुन्हा होय. "**परंतु जेथें सत्य प्रतिपादनाची अधमांच्या जुलुमानें बंदी झालेली आहे तेथें गुप्त मंडळ्या ह्या पवित्रतम आहेत. नव्हे, नव्हे, सत्य प्रतिपादनाचा तो एकच मार्ग आहे.**" या गुप्त मंडळ्यांचा आधार यूरोपमधल्या बहुतेक स्वातंत्र्योन्मुख राष्ट्रांनीं घेतलेला आहे. या गुप्त मंडळ्यांच्या योगानें बहुजन-समाजाला स्वातंत्र्याचें शिक्षण फार सोप्या रीतीनें देतां येतें. वर्तमानपत्रांतून उघड लिहून किंवा सार्वजनिक भाषणें करून परक्यांना हुसकून देण्याचा प्रयत्न करणें अशक्य असतें व तरुण लोक व सामान्य वर्ग यांची ग्राहकशक्ति फार सूक्ष्म नसल्यानें त्यांना वर्तमानपत्रें किंवा सार्वजनिक भाषणें यांच्यांतील लपलेला अर्थ ग्रहण करितां येत नाहीं. परंतु गुप्त मंडळ्यांचा पहिला फायदा असा आहे कीं, गुप्त सभा भरवून त्यांत स्वातंत्र्याचें शिक्षण स्पष्ट व उत्तम रीतीनें देतां येतें, तें लोकांस ताबडतोब कळतें व परकीय सरकारास दाबणें अशक्य होतें. मॅझिनी म्हणतो, "या मार्गानें तुम्हीं तरुणांस जें सत्य तें स्पष्ट रीतीनें सांगा. त्यांच्यापासून कांहीं लपवून ठेवूं नका. त्यांना निर्जीव यंत्रां-प्रमाणें न वागवितां त्यांना जिवंत व चैतन्ययुक्त मनुष्यांप्रमाणें आदरानें वागवा म्हणजे त्यांच्यांत काय तेज आहे तें तुम्हांस कळून येईल." गुप्त मंडळ्यांचा प्रसार परकी सरकारास दाबणें अगदीं अशक्य होतें इतकेंच नाहीं, तर एखादी दुसरी गुप्त मंडळी उघडकीस आणली असतां त्यापासून त्यांचा तोटाच होतो. गुप्त मंडळीचा स्फोट हा ज्वालामुखीच्या स्फोटासारखा आहे. तो दबून असतो तोंपर्यंतच परकीयांचें जीवन सुरक्षित असतें. परंतु तो स्फोट होतांच त्यांतील तप्त रसानें परवश लोकांवर चैतन्याची जंगी लाट

पसरते. जेथें नसतात तेथें गुप्त मंडळ्या उत्पन्न होतात. व विशेषतः परक्यांचें धैर्य छिन्नभिन्न होऊन जातें. पाय टेवावा तेथें भुयार आहे कीं काय अशी त्यांना भीति पडून त्यांची गति कुंठित होते व कोठें फटाका उडाला कीं त्यांना बॉम्बशेल आल्याचा भास होतो. त्यांच्या अधिकारीवर्गास जिवाच्या आशेनें नोकऱ्या सोडाव्या लागतात. अशा रीतीनें सर्वत्र भीति उत्पन्न होते आणि भीक नको पण कुत्रा आटप अशी परक्यांची त्रेधा उडते. सारांश, दुसरा फायदा असा आहे कीं फार थोड्या शक्तीनें गुप्त मंडळ्यांना परकी सरकारास गांगरून सोडतां येतें. मॅझिनी म्हणतो, "ते शंभर होते, पण त्यांनीं यूरोपचीं सिंहासनें, साम्राज्यें, आज्ञापत्रकें, तुरुंग, फांशी वगैरे सर्व राक्षसांना थरथर कांपविलें होतें." तिसरा फायदा म्हणजे, लढाईची तयारी करतां येते. हें काम उघड रीतीनें करणें अगदीं अशक्य होतें. तें अशक्य कार्य मॅझिनीनें आपल्या गुप्त कटांनीं शक्य करून दाखविलें. याशिवाय एक केंद्र उत्पन्न होते. संघशक्तीनें सर्व बेत पार पाडतां येतात व सर्व लोकांना एक मार्ग, एक दिशा व एक उद्दिष्ट देतां येतें. अशा अनेक फायद्यांचा विचार करून मॅझिनीनें "**तरुण इटली**" स्थापन केली. या प्रस्तावनेंत मॅझिनीच्या राजकीय मतांचीच सांखळी जुळविण्याचा संकल्प असल्यानें या 'तरुण इटली'च्या इतिहासाकडे वळणें इष्ट नाहीं. तिनें इटली देशांत काय केलें किंबहुना सर्व यूरोपभर प्रत्येक देशावर तिचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम कसे घडत गेले या अत्यंत महत्वाच्या विषयास बाजूला सारणें भाग आहे. साधारण कल्पना यावयास इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, या 'तरुण इटली'च्या उपदेशानेंच इटलीला स्वातंत्र्य मिळालें व इटलीचें ऐक्य झालें. इटलीच्या स्वातंत्र्यार्थ झगडलेल्या अनंत देशवीरांचें शिक्षण 'तरुण इटली'त झालेलें होतें. "'तरुण इटली'नें माझ्या देशांतील भिन्न पंथ मोडून टाकून स्वदेश एक केला. त्यापूर्वीं इटलीच्या ऐक्याला लोक हांसत होते. इटलीचें राष्ट्रैक्य मनोराज्य आहे, असे सर्व पुढारी म्हणत होते. परंतु तरुण इटलीनें माझ्या देशांत नवीन युगाला प्रारंभ केला." तरुण इटलीनें हें युगांतर करण्याचें कार्य कसें सिद्धीस नेलें याची फोड करण्याकरितां तिच्यांतील श्रमविभागांचें निरनिराळें विवेचन केलें पाहिजे. "तरुण इटलीचें साह्य मिळविण्यासाठीं ती दुहेरी कार्यक्रमाची योजना करीत आहे. शिक्षण व युद्ध—शिक्षण युद्धाला मदत

करील व युद्ध शिक्षणाला मदत करील." अशा दुहेरी कार्यक्रमाचें वर्गशः विवरण केलें म्हणजे मॅझिनीनें आपलें अचाट कर्म कसें सिद्धीस नेलें व नेवविलें हें स्पष्ट होईल.

प्रथमतः मॅझिनीनें इटलीला कोणचें शिक्षण दिलें हें पाहिलें असतां या महात्म्याचे विचार किती प्रगल्भ व पवित्र होते, हें सहज दिसून येतें. पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, मॅझिनीचें सर्व राजकारण नीतीच्या पायावर उभारलेलें होतें. "**आपल्यापुढें जें कार्य आहे तें लहानसहान कार्य नाहीं. आपण देवानें जें कार्य केलें तेंच करीत आहोंत. आपण लोकनिर्मिति करीत आहोंत! आपण स्वराष्ट्र उत्पन्न करीत आहोंत.**" याहून दिव्यतर कर्तव्य तें कोणचें असणार? "परमेश्वरानें अगदीं स्पष्ट अशा आज्ञेनें सांगितलें आहे कीं, इटली हा एक स्वतंत्र देश आहे. समुद्राच्या व पर्वताच्या रेखा आपल्या दिव्य करांगुलीनें आंखून देवानें इटली देश इटालियनांस दिलेला आहे." तेव्हां इटालियन लोकांचें पहिलें कर्तव्य म्हणजे ह्या ईश्वरी आज्ञेप्रमाणें इटली स्वतंत्र करणें हें होय. "तरुण बंधू हो, स्वदेश हें परमेश्वरानें आपणांस दिलेलें घर आहे. या घरांत राहून त्याच्या आश्रयाखालीं तुम्ही वाढावें व वाढत वाढत अखेर मनुष्यजातीसह अंतिम स्वरूपाला जावें अशी त्याची इच्छा आहे." हें निसर्गनिर्मित गृह इटालियनांना वाढण्याकरितां आश्रय म्हणून दिलेलें असून परक्यांनीं एक तुरुंग बनवून ठेवला आहे. म्हणून इटलीच्या पुत्रांचें पहिलें कर्तव्य म्हणज स्वदेश स्वतंत्र करणें हें होय. मॅझिनीनें आपल्या गुप्त संस्थेंतून पहिलें शिक्षण या तत्त्वाचें दिलें. "प्रथम स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे. दास्यमुक्तता झाली पाहिजे. इतर सर्व प्रश्न मागाहून सुटतील. आल्पसकडे धांवा ! चला ! ऑस्ट्रियाशीं लढाई !" अशा स्पष्ट रीतीनें इटालियन तरुणांत स्वातंत्र्याचें चैतन्य उत्पन्न झाल्यामुळें मॅझिनीचे पूर्वीं जीं भिकारडीं मतें प्रचलित होतीं त्यांचा एकदम नाश झाला. अमका कर माफ झाला पाहिजे व तमका हक्क मिळाला पाहिजे असें म्हणणारा पंथ निर्माल्यवत् झाला. कारण सर्वांची अशी खात्री झाली कीं, "आपणांस अनेक हक्क नको असून एकच हक्क पाहिजे आहे व तो हक्क म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य–दास्यमुक्तता–हा होय." **व हें स्वातंत्र्य तें फायद्याचें आहे म्हणूनच नव्हे, तर तें मर्दांचें कर्तव्य आहे म्हणून मिळविलें पाहिजे.** "इटलीमध्यें भाकर स्वस्त आहे किंवा महाग आहे हा मुख्य

प्रश्न नाहीं. त्या भाकरीवर गुलामगिरीचा शिक्का आहे कीं नाहीं हा मुख्य प्रश्न आहे." मग आस्ट्रियानें अनंत हक्क जरी दिले असते तरी इटलीचे लोक स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय राहतेना. मॅझिनीनें स्वातंत्र्याला कर्तव्याचें स्वरूप दिल्यानें आस्ट्रिया एकदम हतवीर्य झाला. त्या वेळेपर्यंत जरा जास्त कमी चळवळ झाली कीं लहान-लहान हक्क देऊन ऑस्ट्रिया खुबीनें चळवळी मारून टाकीत असे. परंतु आतां, "हक्कांचा प्रश्न नसून हक्काचा आहे." शिवाय आपण स्वातंत्र्यसंपादनांत एक अत्यंत पवित्र कर्तव्य करीत आहोंत अशी तरुणांची भावना झाल्यानें त्यांच्या उदात्त वृत्ति जाग्या झाल्या. तुरुंगांत देशवीर राष्ट्रगीतें गाऊं लागले व फांशीवर "जो स्वदेशासाठीं मरतो तो चिरंजीव होतो." या महामंत्राचा जयघोष करूं लागले. "तरुणांना कर्तव्यबुद्धीनें उद्दीपित करा, ध्येयाची भक्ति शिकवा, म्हणजे त्यांच्या अंगांत काय सामर्थ्य आहे हें तुम्हांला कळेल." असें तो महात्मा उगीच म्हणत नसे. इटलींत १८३१ पासून तों १८७० पर्यंत दरसाल कोठेंना कोठें तरी एक बंड होतच असे. इतकी चिकाटी धरून स्वदेशभक्तांनीं अखेर विजय संपादन केला. बंडामध्यें बायकांनीं जे पराक्रम केले ते इतर निर्जीव देशांतील पुरुषांना देखील लाज आणतील! रोममध्यें १८४८ सालीं फ्रेंच लोकांशीं लढाई चालली असतां, "ग्यारीबाल्डी सैन्यांत उडी टाकून बेहोष लढत होता. इतक्यांत त्यास सीनेटचें बोलावणें आल्यामुळें तो तिकडे गेला. त्याला पहातांच सीनेटनें टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. ग्यारीबाल्डीला प्रथम त्या जयनादाचें कारण कळेना. इतक्यांत त्यानें स्वतःकडे पाहिलें तों रक्ताच्या धारा नखानखांतून गळत आहेत, शस्त्रांनीं व निसटत्या लागलेल्या गोळ्यांनीं कपड्यांचीं जाळीं झालीं आहेत व हातांतील तरवार वार करतां करतां इतकी वांकली आहे कीं म्यानांत ती अर्धी देखील शिरत नाहीं!" अशा त्या तरवारीला अनंत प्रणाम असोत! जोंपर्यंत अशी एक तरी तरवार जगांत कायम आहे तोंपर्यंत परतंत्र देशांनीं स्वतंत्र होण्याची आशा धरण्यास हरकत नाहीं! मिलनमध्यें बंड सुरू करण्याचे आधीं पुढारी म्हणूं लागले, "तुम्ही उठूं नका, तुमच्याजवळ शस्त्रें नाहींत." दुसऱ्या दिवशीं लोक म्हणाले, "उठा, दगड घ्या, सुऱ्या घ्या, काठ्या घ्या व उठा! म्हणजे आतां शस्त्रें चालत येतील." ते उठले व ऑस्ट्रियनांवर छापा घालून त्यांचीं शस्त्रें लुटून आणलीं! गुप्त मंडळ्यांची

जमवाजमव इतकी उत्तम असे कीं बायका पोरेंसुद्धां त्याचीं तत्त्वें शिकविलीं गेलीं होतीं. मिलनमध्यें व व्हेनिसमध्यें राज्यक्रांतीची नौबत धडधडतांच, "बायका रस्त्यांत सज्ज होऊन उभ्या राहिल्या. एक म्हातारा लंगडत लंगडत गवताचा भारा घेऊन सरकारी ठाण्यांत गेला व त्या भाऱ्यास आग लावून देऊन तें ठाणें भस्म करून परत आला ! तरुण लोक पुस्तकें टाकून बाहेर पडले, तरुण स्त्रिया फंडासाठीं रस्तोरस्तीं भिक्षा मागूं लागल्या, स्वयंपाकी लोक आपल्या सोधण्यासुद्धां रस्त्यांत उड्या घेऊं लागले व ऑस्ट्रियन शिपायी शहरांत शिरूं पहातांच त्यांच्यावर टेबलें, कौलें, सुऱ्या, खांब, दगड, तापलेल्या सळ्या, कढणारें तेल यांचा वर्षाव होऊं लागला !" अशा कृतनिश्चयानें इटली लढली ! अनंत अपजय आले तरी ती लढली. कारण, " प्रत्येक अपजय ही जयाची एक पायरी आहे." अशी त्यांना 'तरुण इटली'नें दीक्षा दिली होती. १८२० सालीं पराजय झाला. १८३१ सालीं पराजय झाला, १८४८ सालीं पराजय झाला; तथापि मॅझिनी म्हणाला, "फिरून प्रयत्न करा. यश किंवा अपयश हा विचार नसून कर्तव्यतेचा विचार असला पाहिजे. तुमच्या पक्षास परमेश्वर आहे. तुम्हांस अंतीं जय मिळालाच पाहिजे. इटलीनें या महर्षीच्या उपदेशाप्रमाणें फिरून प्रयत्न केला व इटली स्वार्थत्याग, शौर्य, तेज, तत्त्व–निष्ठा आदिकरून सद्गुणांनीं युक्त आहे असें पाहून १८५९ सालापासून त्यांच्या श्रमाला परमेश्वरही फलें देऊं लागला. हीं स्वातंत्र्याचीं गोड फळें चाखावयास मिळण्यासाठीं इटलीला जी किंमत द्यावी लागली ती 'तरुण इटली'च्या खजिन्यांतून दिली गेली. अशा रीतीनें मॅझिनीनें स्वातंत्र्याचें शिक्षण इटलीच्या तरुणांस दिलें. परंतु नुसतें स्वातंत्र्यप्राप्तीचें कार्य म्हणजे कांहीं अंतिम कार्य नव्हे. कारण, " जोंपर्यंत लढाई सुरू आहे तोंपर्यंत लोक एकत्र राहतील, परंतु ती बंद होतांच इटलीदेशांतील निरनिराळ्या प्रांतांत यादवी माजूं लागेल. " म्हणून मॅझिनीचें दुसरें तत्त्व म्हणजे " **राष्ट्रैक्य** " हें होय. इटलीचे भिन्न भिन्न प्रांतांत पूर्वीपासून इतकी यादवी माजलेली होती कीं, ते निरनिराळे देशच झालेले होते. लहान लहान संस्थानें हीं एकमेकांशीं अखंड लढाया करीत होतीं. शहरें एकमेकांशीं भांडत होतीं. अशा स्थितींत इटली देशाचें मिळविलेलें स्वातंत्र्य कायम राहण्यास त्यांचें राष्ट्रैक्य होणें अवश्यक होतें. संयुक्त-संस्थानपद्धति ठेवून भागलें नसतें. कारण निरनिराळीं संस्थानें ठेवलीं कीं

प्रांतिक अभिमानाला आरंभ होतो व त्या राष्ट्रांत एकरूपता नाहींशी होऊन तें राष्ट्र परक्यांच्या पाशांत लवकरच पडतें. म्हणून मॅझिनीचें आग्रहाचें सांगणें असें कीं, इटलीनें प्रांतिक अभिमान सोडून देऊन सर्व राष्ट्र एकीकृत झालें पाहिजे. ही गोष्ट मॅझिनीपूर्वी कोणासच समजली नव्हती. इतकेंच नव्हे तर ह्या मताबद्दल मॅझिनीला सर्वजण प्रथम प्रथम हांसत होते. परंतु तिकडे लक्ष न देतां या भविष्यवाद्यानें ' तरुण इटली'च्या द्वारें, " इटलीचें राष्ट्रैक्य झालेंच पाहिजे, कारण ऐक्याशिवाय देशत्व नाहीं. ऐक्याशिवाय शक्ति नाहीं. इटलीच्या भोंवतीं बलवंतांचीं राष्ट्रें पसरलेलीं असल्यानें स्वातंत्र्य कायम रहावें अशी इच्छा असेल तर इटलीनें एक राष्ट्र झालें पाहिजे." असा उपदेश दिला. " जेव्हां जेव्हां एखादा प्रांत युद्धाला आरंभ करील तेव्हां तेव्हां तें युद्ध इटलीचे नांवानें केलें जाईल व त्या युद्धाचें निशाण हें इटलीचें एकराष्ट्रीय निशाण असेल. " सर्व इटलीमध्यें जें मनोराज्य म्हणून समजलें जात होतें, तें इटलीचें राष्ट्रैक्य या महात्म्याच्या दिव्य दृष्टीस सॅव्होनाचें तुरुंगांतून दिसलें. त्यानें आपल्या देशबांधवांस ती गोष्ट कळविली. ज्यांचा यांच्यावर विश्वास बसला ते त्याच्या मागें गेले व अखेर खडतर मार्गाचें अक्रमण करतां करतां तें मनोराज्य खरें झालेले पहाण्याची धन्यता त्यांनां मिळाली ! अशा रीतीनें प्रथम दास्यमुक्तता व मग राष्ट्रैक्य हीं दोन तत्त्वें सांगितलीं. परंतु, " आपलें काम नुसनें नाशकारक नाहीं. तर आपणांश नाश केल्यानंतर त्या नाशांतूनच सृष्टि उत्पन्न केली पाहिजेः " ही सृष्टि उत्पन्न करावयाला इटलीच्या सुदैवानें योग्यतम असाच सृष्टिकर्ता मिळाला होता यांत शंका नाहीं. राष्ट्र स्वतंत्र झालें व त्यांतील निरनिराळे प्रांतिक भेद मोडून व द्वेष नाहींसे करून तें एक झालें म्हणजे मग तेथें तें स्वातंत्र्य व ती एकराष्ट्रीयता कायम राहण्यास अंतर्गत स्वतंत्रता मिळाली पाहिजे. "जुलम म्हटला कीं तो त्याज्य आहे. मग तो परक्यांचा असो किंवा स्वकीयांचा असो. तो धार्मिक असो किंवा राजकीय असो." म्हणून राष्ट्रामध्यें व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य हीं अवश्य असलीं पाहिजेत. परंतु जेथें राजसत्ता आहे तेथें असमता उत्पन्न होतेच होते. मनुष्यांत सद्गुण व योग्यता या योगानीं जेवढे भेद झाले असतील. तेवढेच भेद न्याय्य व उन्नतिमूलक आहेत, बाकी सर्व प्रकारची असमता ही अत्यंत गर्हणीय होय. व म्हणून राजसत्ता ही गर्हणीय आहे. मॅझिनीचें सर्व राजकारण जसें नीतिमत्तेला धरून होतें तसेंच त्याचें

**लोकसत्तावादित्व**ही नीतीच्या भक्कम पायावर उभारलेलें होतें. शिवाय इटलीसारख्या देशाला कायमपणा देणारी लोकसत्तेशिवाय दुसरी राज्यपद्धति शक्य नव्हती. मॅझिनी स्वतः राष्ट्राच्या बहुमताला विरुद्ध नव्हता. " राष्ट्रीय आज्ञेचा मी बंदा आहे. परंतु माझी अशी खात्री आहे कीं, **लोकसत्तेशिवाय दुसऱ्या सर्व राज्यपद्धति अन्यायमूलक व अनीतिमान आहेत.**" इटलीमध्यें अनंत प्रांत, अनंत संस्थानें व अनंत दुरभिमान सुरू असल्यानें त्या सर्वांना सारखे हक्क दिल्याशिवाय त्यांची एकी फार दिवस टिकणार नाहीं अशी त्याची पक्की समजूत असे. एका संस्थानाला राजा केलें कीं इतर संस्थानें त्याच्या ताब्यांत जाऊं इच्छिणार नाहींत. एका प्रांताचा अंमल कबूल केला कीं इतर प्रांतांतील लोक आपली सत्ता त्याच्या हातीं देणार नाहींत. अशा स्थितींत खरी खरी राज्यपद्धति म्हणजे लोकसत्ता हीच होय. लोकसत्ता स्थापिली म्हणजे कोणालाहि विशिष्टाधिकार दिल्यासारखें किंवा पक्षपात केल्यासारखें होणार नाहीं. जी व्यक्ति खाजगी व सार्वजनिक वर्तणुकीनें योग्यतम असेल ती सर्वानुमतानें अधिकृत केली जाईल. " शिवाय मनुष्यजातीच्या उत्क्रांतीप्रमाणें पाहिलें असतां लोकांचें युग आलें आहे. देव व लोक हीं तत्त्वें आतां सुटलीं आहेत. राजाचा किंवा पोपचा जुलूम यापुढें चालणार नाहीं. यूरोपमध्यें सर्वत्र लोकसत्तेकडे प्रवृत्ति होत आहे." म्हणून इटलीनेंही लोकसत्तेचीच योजना करावी असा मॅझिनीचा अत्याग्रह होता. " तुम्हीं राजसत्ता नेमाल तर कांहीं दिवस शांतता राहील. परंतु कायमची शांतता राहणार नाहीं. पहिली राज्यक्रांति संपतांच दुसरी सुरू होईल;" अशा अर्थी त्यानें वारंवार सूचना द्याव्या. व त्या भविष्याचें सत्यत्व लोकांच्या निदर्शनास आपल्या आयुष्यांत आलें नाहीं तथापि भावी कालांत तें आल्याशिवाय, राहणार नाहीं अशी त्याची पक्की भावना होती. व एतदर्थ 'तरुण इटलीं'त लोकसत्तेचें तत्त्व अंगीकृत केलेलें होतें. अशा रीतीनें **दास्यमुक्तता-राष्ट्रैक्य-समता-व लोकसत्ता** ह्या तत्त्वचतुष्टयाचें शिक्षण 'तरुण इटलीं'त दिलें जाई. हीं तत्त्वें इटलीच्या अंतःकरणावर मॅझिनीनें कोरून ठेविलीं आहेत. त्यांचा बहुतेक जय झालेलाच आहे व जो थोडा राहिला आहे तोही भविष्यत्कालीं होणारच होणार यांत कोणालाही शंका नाहीं.

'तरुण इटली'च्या 'शिक्षणा'च्या कार्यक्रमाचा हा विस्तार झाला. आतां 'युद्ध' कांडाचा थोडासा प्रपंच केला पाहिजे. ऑस्ट्रियाशीं युद्ध केल्याशिवाय

आपलें स्वातंत्र्य परत मिळणार नाहीं ही मॅझिनीची पूर्ण खात्री होती. "**लढाईशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं**. भयंकर, तुमुल, दीर्घ, निकराची लढाई केल्याशिवाय आपणांस दुसरा मार्ग नाहीं." असल्या वेळीं लढाई करणें हें पाप नाहीं. "जेव्हां एखाद्या सत्याचा जयजयकार करावयाचा असतो किंवा एखाद्या असत्याचा विनाश करावयाचा. असतो तेव्हां लढाई पवित्र आहे." इटलीमध्यें ही लढाई करणें हें फार कठिण झालें होतें. त्यांच्यापाशीं युद्धोपयोगी हत्यारें नव्हतीं किंवा तीं बाळगण्याची परवानगी नव्हती. अशा स्थितींत इटलीशिवाय दुसरें एखादें राष्ट्र सांपडलें असतें तर तें गर्भगळित होऊन लढाईचें नांव काढण्यासही भिऊं लागलें असतें. परंतु इटली असल्या संकटांना भीक घालणारी नव्हती. तिच्यांतील शूर व तरुण लोक हे स्पेन, अमेरिका, जर्मनी, पोलंड वगैरे देशांत गेले व तेथें युद्धकलेचें ज्ञान शिकले. ग्यारिबाल्डी, रिसीओटी वगैरे 'तरुण इटली'चे सभासद अशाच रीतीनें युद्धकलेंत निष्णात झाले. दुसरा बेत असा योजला होता कीं, इटलीच्या हद्दीबाहेर परंतु लगत्या लगत्यांनीं जर्मनी वगैरे देशांतून हत्यारें विकत घेऊन त्यांचे खजिने करून ठेवावयाचे व स्वदेशांत गडबड झाली कीं लगेच हद्द फोडून आंत घुसण्याचा प्रयत्न सिद्धीस न्यावयाचा. एकदां हद्द फोडली कीं मग बाहेरून शस्त्रें आंत आणण्यास मार्ग मोकळा झाला. मॅझिनीच्या सॅव्हॉयवरल्या स्वारींत हाच बेत योजण्यांत आला होता. हा मार्ग फारच उत्तम होता. ह्या युक्तीनें एकदां स्वातंत्र्ययुद्धाचें निशाण उभारलें गेलें कीं बाहेरून शस्त्रांचा उत्तम पुरवठा करतां येतो. तिसरा उपाय असा योजला होता कीं, स्वदेशांत गुप्त रीतीनें हत्यारें तयार करण्याचे अगदीं लहान परंतु पुष्कळ व अंतराअंतरावर असे गुप्त कारखाने काढावे. चवथी युक्ति अशी योजली होती कीं गुप्त मंडळ्यांनीं इतर देशांत हत्यारें खरेदी करून तीं मालाचे जहाजांतून लपवून धाडावीं. पुष्कळ वेळां हें उघडकीसही येत असे. एकदां मॅझिनीच्या फ्रेंच मित्रानें मार्सेलीसहून इटलीकडे शस्त्रें नेण्याचें काम अंगावर घेतलें. त्यानें शस्त्रें भरून जहाज हाकारलें. परंतु इटलीच्या किनाऱ्याला लागावयाचे आधींच त्याला पाळत ठेवून पकडण्यांत आलें. तें जहाज जप्त करून त्यावरचा सर्व माल हिसकण्यांत आला. परंतु स्वातंत्र्ययुद्धासारख्या महत्कार्यांत संकटें हीं यावयाचीच. त्यांना भिऊन हे भ्याड लोक गुलामगिरींत तसेच पचतात. व त्या संकटाशीं टक्कर घेऊन मर्द लोक हे स्वातंत्र्य मिळवितात. या सर्व

युक्त्यांहून मॅझिनीनें व त्या काळच्या इटालियन देशभक्तांनीं मुख्य उपाय जो योजला तो सैन्य वळविण्याचा होय. ऑस्ट्रियाचे लष्करांत जेवढे इटालियन होते तेवढ्यांवरील अंमलदारांनां 'तरुण इटली'ची दीक्षा मिळालेली होती. परकीय सरकाराला तद्देशीय सैन्य ठेवल्यावांचून कोणच्याही देशावर राज्य करितां येणें शक्य नसतें. अशा स्थितींत लष्करी शिपायांना जर स्वदेशाकडे वळवितां आलें तर त्याचा दुहेरी उपयोग होतो. एक तर परक्यांचा विश्वास उडून जातो व आयत्या वेळीं ते घाबरे होतात. व दुसरें असें कीं राष्ट्रपक्षास आयते शिकलेले व सशस्त्र लोक मिळूं शकतात. "लष्करी शिपाई वळवितांना त्यांच्या वरचे अधिकारी तेवढे वळविले म्हणजे झालें. तेही अगदीं वरचे अधिकारी नव्हेत. तर दुय्यम प्रतीचे सुभेदार, मेजर वगैरे अधिकारी वळवावे." हें लष्कर वळविण्याचें काम रशियामध्यें फार कठिण जातें आहे; कारण तेथें दोन्ही पक्ष एकाच जातीचे व देशाचे आहेत. परंतु इटलींत हें काम सहज करतां आलें. कारण परकीयांचा तिरस्कार व स्वकीयांचा लोभ हा मनुष्य मात्रांत निसर्गतःच कायम असतो. त्यास चेतना देणारा मॅझिनी मात्र भेटला पाहिजे. असो, थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे स्वातंत्र्ययुद्धाची तयारी अशा रीतीनें करावी असा मॅझिनीचा कार्यक्रम होता. परंतु ही तयारी साधारण झाली म्हणजे युद्ध जें करावयाचें तें मोठमोठ्या लढाया देण्याचें नसून 'गनिमी काव्याचें' होय. मॅझिनीचा या गनिमी काव्यावर पूर्ण भरंवसा होता. ग्यॉरिबाल्डीही गनिमी युद्धांत निष्णात होता. "परक्यांच्या जोखडाला झुगारून देण्याची ज्यांची ज्यांची इच्छा असेल त्या त्या राष्ट्रांनां गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचाच आश्रय केला पाहिजे." गनिमी काव्यानें शत्रूप्रमाणें आपल्या सैन्यास कवाईत येत नसल्यानें जी उणीव राहिलेली असते ती भरून निघते. शिवाय लोकपक्षाच्या लहान लहान टोळ्या चोहोंकडे पसरून दिल्या म्हणजे शत्रूच्या विस्तीर्ण सैन्याला देशभक्तांच्या मूठभर सैन्यानें गुंतवून ठेवितां येतें. गनिमी काव्याला युद्धकलेचें कांहीं विशेषसें ज्ञान लागत नसल्यानें निश्चयी व करारी अशा देशभक्तांच्या मनांत येतांच त्याला आरंभ करतां येतो. व जसजसें युद्ध जुंपत जातें तसतसें त्या देशभक्तांस लढाईचें ज्ञान व अनुभव मिळूं लागतो. 'गनिमी काव्यानें जंगी पराभवाचें भय नसतें." गनिमी टोळ्या सुटसुटीत असल्यानें त्या वाऱ्यासारख्या चहूंकडून हिंडूं लागतात व शत्रूचें

अवजड सैन्य वेड्यासारखें मागून पुढें व पुढून मागें हेलपाटे घालीत बसतें. शिवाय, परक्यांना गनिमी काव्याचा केव्हांही आश्रय करतां येत नाहीं. कारण त्यांस या मुलुखाचें ज्ञान नसतें व त्यांना तेथील लोक अनुकूल नसतात. त्यांनीं गनिमी काव्याचा अंगीकार करून लहान लहान टोळ्या केल्या कीं त्यांचा नाश एका क्षणांत झालाच असें समजावें. अशा रीतीनें परतंत्र देशांना गनिमी युद्ध फारच फायदेशीर असतें असें पाहून मॅझिनीनें या युद्धाची योजना केली. या युद्धपद्धतीचा त्यानें किती खोल अभ्यास केला होता हें पुढील लेखांवरून दिसून येईलच. अशा रीतीनें सर्व देशभर लढाई सुरू झाली असतां ऑस्ट्रियाला इटलींत राहणें अशक्य होईल अशी मॅझिनीची युद्धयोजना होती.

सारांश, प्रथमतः राजकारणाला नीति आहे व आपलें स्वातंत्र्य मिळविणें हें न्याय्य आहे अशी इटलीची मनःप्रवृत्ति झाली कीं, मग गनिमी काव्यानें युद्ध सुरू करावें असा एकंदर कार्यक्रम होता. वरील विवेचनाचा मथितार्थ थोडक्यांत असा काढतां येईलः—राजकारण हें नीतीला धरून असावें. राजकारणांतील प्रथम कर्तव्य स्वातंत्र्यसंपादन होय. ज्या राष्ट्रांत हें सत्य-प्रतिपादन करण्याची बंदी झालेली असेल त्यांनीं गुप्त मंडळ्या स्थापाव्या. त्या गुप्त मंडळ्यांचें कर्तव्य दुहेरी असावें. पहिलें कर्तव्य म्हणजे मानसिक शिक्षण हें होय. या मानसिक शिक्षणानें गुप्त व उघड रीतीनें चार तत्त्वांचें मुख्यतः शिक्षण द्यावें. स्वातंत्र्य–समता–राष्ट्रैक्य–लोकसत्ता हीं तीं चार तत्त्वें होत. दुसरें कर्तव्य असें कीं, या चार तत्त्वांच्या जयासाठीं धर्मयुद्ध करण्याची तयारी करणें. हें युद्ध गनिमी काव्यानें करावें. मानसिक शिक्षणानें युद्धास साह्य मिळेल व युद्धानें मानसिक शिक्षण वाढेल. अशा रीतीनें स्वदेश परक्यांच्या ताब्यांतून मुक्त झाला म्हणजे त्यांचें वर्तन असें ठेवावें कीं त्या योगानें मनुष्यजातीच्या उन्नतीला व प्रगमनाला साह्य व्हावें. आपणांस सामर्थ्य येतांच इतर गांजलेल्या राष्ट्रांना मुक्त करावें. व सर्व मनुष्यजातीनें स्वतंत्रतेनें, समतेनें व बंधुभावानें परमेश्वरी आज्ञेचें पालन करावें.

हा मॅझिनीच्या राजकीय मतांचा व कार्यक्रमाचा मथितार्थ आहे. हा नकाशा पुढें ठेवून इटली स्वतंत्र झाली. या कार्यांत मॅझिनीप्रमाणेंच अनेक थोर विभूतींनीं दिव्य कृत्यें केलेलीं आहेत व ते सर्व इतिहासाला वंदनीय झाले आहेत. इटलीच्या भाग्याची धन्य आहे! जिच्यामध्यें भगवान् **मॅझिनी** जन्मास

येतो, जिच्यासाठीं **ग्यारिबाल्डीचे** रक्तबिंदु खर्च होतात, जिच्या सेवेसाठीं **मानिन** हा बद्ध परिकर होऊन सज्ज होतो, जिच्यावर **मामेली** हा कवि कविता करतो व जिला स्वातंत्र्यदेवी वश होते त्या इटलीच्या भाग्याची धन्य आहे! अनेक देश पारतंत्र्यांत पडलेले असतांना आपल्या सत्कृत्यानें जी भूमि स्वातंत्र्यलक्ष्मीला आपल्याकडे सर्वांचे आधीं वेधून नेते त्या इटलीच्या भाग्याची धन्य आहे! ज्यांचा जन्म परतंत्रतेंत झालेला आहे, परंतु जे आपल्या पराक्रमानें त्या परतंत्रतेचें निर्दालन करून आपला स्वदेश स्वतंत्र झालेला पाहतात व त्या स्वतःचे कर्तत्रगारीनें दास्यमुक्त केलेल्या भूदेवीचे अंकावर आपलें शुभ्र मस्तक ठेवून चिन्मय होतात, त्यांच्या आनंदाला सीमा नाहीं! जर जगांत कांहीं निर्मल सुखाचे क्षण असतील तर त्यांच्यांत तो क्षण शुद्ध सुखाची परम सीमा करणारा होय कीं, ज्या क्षणीं, आपल्या अत्यंत प्रिय देशजननीला ज्यानें असह्य दुःख दिलें तो शत्रु मार खात खात देशाच्या हद्दीबाहेर पळून चाललेला आहे हें पाहतां येतें. जर निर्भेळ धन्यतेचा एखादा दिवस असेल तर तोच होय कीं, ज्या दिवशीं देशजननीला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून रणांगणांतून देशभक्त परतत आहेत व त्या स्वातंत्र्यासाठीं पतन पावलेल्या देशवीरांच्या आत्म्यांना संबोधून अशी गर्जना करीत आहेत कीं, "देशवीर हो, आपला देश स्वतंत्र झाला आहे! तुमच्या रक्ताचा सूड उगविला आहे!" हें सुख व ही धन्यता ज्या थोड्या महात्म्यांच्या नशिबीं आहे, त्यांत भगवान् मॅझिनीची गणना आहे. पुढील लेखांत १८४८ पर्यंतची आत्म–वृत्तांतर्गत हकीकत आलेली आहे. त्यानंतरचा वृत्तांत मॅझिनीनें लिहिलेला नाहीं. १८५९ सालीं इटलीमध्यें राज्यक्रांतीची दुसरी लाट उसळली. पुन्हां मॅझिनीनें रणांत उडी घेतली. त्या वेळेला निम्मेवर इटली स्वतंत्र झाली. मग १८६६ सालीं व्हेनिस स्वतंत्र झालें. व १८७० सालीं रोम स्वतंत्र झालें. १८७१ सालीं मॅझिनीच्या आयुष्याचीं तीन चतुर्थांश स्वप्नें खरीं झालीं. १८७१ सालीं त्या महात्म्याच्या नेत्रांचें बहुतेक पारणें फिटलें! सर्व इटली स्वतंत्र झाली. सर्व इटली एक राष्ट्र झाली. सर्व इटली जिवंत झाली. व त्या स्वतंत्र, एकराष्ट्रीय आणि चैतन्ययुक्त इटलीची रोम राजधानी झाली. हजारों वर्षे रोमची व इटलीची ताटातूट झाली होती. ती ताटातूट संपून या भाग्यशाली दिवशीं रोमवर स्वतंत्र इटलीचें निशाण फडकूं लागलें! तीस वर्षांपूर्वी ज्या रोममध्यें लोक–सत्तेच्या प्रतिनिधित्वाचा अधिकार गाज-

विला होता, ज्या रोमसाठीं " रोम, रोम ! रोममध्यें मृत्यु नाहीं, रोममध्यें अशुभ नाहीं, रोम माझी प्रीति आहे, रोम माझा प्राण आहे !" ह्मणून सदोदित टाहो फोडला जात होता, त्या रोममध्यें मॅझिनी प्रवेश करता झाला ! त्या वेळेस त्याच्या हृदयांत काय विचार असतील ? अखेर इटली स्वतंत्र झाली ! रोमवर स्वातंत्र्याचें निशाण डोलत आहे व आस्ट्रियाच्या निशाणाचे तुकडे रस्त्यांतून पोरासोरांच्या पायांखालीं तुडविले जात आहेत ! हें पाहून चाळीस वर्षें जरी स्वतःचा असा देश नव्हता व हद्दपार होऊन देशोधडीला लागून सर्व आयुष्य जरी गेलें होतें तरी त्या कडक देशव्रताचें पारणें त्या दिवशीं फिटलें असें त्यास वाटलें असेल नाहीं बरें ? सॅव्होनाचे तुरुंगांत कोंडून ठेवलेला १८३१ सालचा मॅझिनी व १८७१ सालीं स्वतंत्र इटलीच्या, एकराष्ट्रीय इटलीच्या, त्या स्वतंत्र राजधानींत–रोममध्यें–प्रवेश करणारा मॅझिनी ! कोणी इटलीचा चित्रकार हीं दोन चित्रें रंगवील काय ?

इटली देश स्वतंत्र व एकीकृत झाल्यावर मॅझिनीची एक इच्छा राहिली होती. ती इच्छा म्हणजे लोकसत्ता ही होय. परंतु त्याला या लोकसत्तेची कांहीं घाई झालेली नव्हती. " या जन्मांत नाहीं तर इतरत्र कोठें तरी इटलीवर लोकसत्तेचें निशाण फडकलेलें पाहून मी कृतकृत्य होईन." ही त्याची खात्री होती. परंतु दुःखाची गोष्ट अशी आहे कीं बहुतेक इंग्रजी ग्रंथकारांनीं मॅझिनीला या 'वेडेपणा'बद्दल दोष दिलेला आहे. त्यांच्या मतानें मॅझिनी हा महान् तत्त्ववेत्ता व भविष्यवादी होता. परंतु त्याला व्यवहारज्ञान नव्हतें. त्याला लोकसत्तेचा 'भ्रम' झालेला होता ! लोकसत्तेचाच कां ? मॅझिनीला इटलीच्या स्वातंत्र्याचा, राष्ट्रैक्याचा व समतेचाही 'भ्रम' झाला नव्हता का ? त्या वेळच्या लोकांनीं मॅझिनीच्या ह्या महत्वाकांक्षांनांही मनोराज्येंच म्हटलें नव्हतें काय ? पण तीं मनोराज्यें आज सत्य झालेलीं दिसत आहेत. तसाच हा लोकसत्तेचा 'भ्रम' ही सत्य कशावरून होणार नाहीं ? ज्यानें राखेच्या ढिगाऱ्यांतून जिवंत राष्ट्र निर्माण केलें, त्या मॅझिनीला इंग्रज ग्रंथकार 'व्यवहारचतुरते'चें शिक्षण देत आहेत ! मॅझिनीची महत्वाकांक्षा लोकसत्तेपर्यंत पोंचली ह्यांतच त्याच्या भविष्यवादित्वाचा विजय आहे. तशी ती पोंचली नसती तर मात्र त्याची दृष्टि इंग्रजी राष्ट्राच्या इतकीच खुरटी होती व ती राजसत्तेच्या पलीकडे जाऊं शकली नाहीं असें म्हणावें लागतें. परंतु मॅझिनीची नीति–मीमांसा ही इंग्रजांच्या नीतिमीमांसेसारखी पोटभरू नव्हती. त्यानें इंग्रजी राष्ट्रांतील अनीतिमान

व पापकारक राजनीतीवर येतां जातां कडाके उडविले आहेत म्हणून का तो व्यवहारकुशल ठरत नाहीं ? मॅझिनी व्यवहारकुशल नाहीं हें उघडच आहे, कारण त्यानें कोठें दुसऱ्याचीं पत्रें फोडून, वाचून व त्यांतील मजकूर दुसऱ्यास कळवून आपलें व्यवहारकौशल्य गाजविलें आहे ! मॅझिनी व्यवहार-कुशल नाहीं हें उघडच आहे, कारण त्यानें, " इटली स्वतंत्र होतांच तिनें बाकी सगळया राष्ट्रांनां गुलाम करीत सुटावें. " असें सांगण्याचे ऐवजीं, " आपण स्वतंत्र होऊनच काम भागत नाहीं, तर आपण इतर देशांना स्वतंत्र केलें पाहिजे. " असें सांगण्याचा बिनधोरणीपणा केला ! मॅझिनीची परीक्षा स्वार्थलंपट राष्ट्राला कशी व्हावी ? परंतु त्यांनीं जरी त्याला वेडा ठरविला तरी अखेर तो इतिहासदेवीचा ताईत झालाच झाला. मॅझिनीनें लोक-सत्तेसाठीं जरी अश्रांत श्रम केले तरी त्यानें हें हजारों वेळां स्पष्ट जाहीर केलें होतें कीं, " प्रथम स्वातंत्र्य, मग एकी व मग लोकसत्ता." याच प्रमाणें त्यानें शक्य तेव्हां तेव्हां वर्तनही केलें. व इटली स्वतंत्र झाल्यावर त्यानें लोकसत्तेचा जो उपदेश केला, तो प्रसिद्ध रीतीनें केलेला आहे. कारण त्याची व मनुष्य-जातीच्या उत्क्रांतीचें ज्यानें ज्यानें सूक्ष्म निरीक्षण केलें आहे त्याची त्याची अशीच खात्री आहे कीं, " आतां लोकांचें युग आलेलें आहे. " आतां, आज नाहीं उद्यां, पण लोकसत्तेचाच जयजयकार होणार आहे ! मॅझिनीनें जें निशाण उभारलेलें होतें, तें परमेश्वरापर्यंत पोंचणारें निशाण होतें. या निशाणाचा अग्रभाग जरी अदूरदृष्टि लोकांना दिसला नाहीं तरी तो त्याला स्पष्ट दिसत होता. लहान पक्षी एखाद्या टेंकडावर उडत जाऊन बसले म्हणजे त्याना शतकृत्य केलेंसें वाटतें. मॅझिनी हा गरूड होता. त्यानें त्या टेंकाडावरच समाधान कसें मानावें ? तो कालाच्या आकाशांत भराऱ्या घेत गेला व तेथून लोकसत्तेच्या स्तोत्रांचें गीत गाऊं लागला. मॅझिनीचे आयुष्यांत दोनदां लोकसत्तेचा विजय होण्याचा बेत आला होता. तेव्हां जर तो इतर लोकांच्या स्वार्थपरायणतेनें फसला नसता, तर मॅझिनीच्या इतर ' स्वप्नां 'प्रमाणेंच तेंहि स्वप्न आज खरें झालें असतें. तें आज तसें झालें नाहीं म्हणून काय झालें ? मॅझिनीचा आत्म्याच्या अमरत्वांत व कालाच्या अनंततेंत विश्वास होता, आणि लोकसत्ता ही नीतियुक्त राज्यपद्धति आहे हें त्यानें सिद्ध केलें होतें. तत्त्व बरोबर आहे कीं नाहीं हा मुख्य प्रश्न होता. त्याचा विजय आज होणार कीं उद्यां होणार हा गौण भाग आहे. अत्यंत आनंदाची गोष्ट ही

आहे कीं भगवान् मॅझिनीची खरी योग्यता इतर कोणी न जाणली तरी ती त्याच्या स्वदेशबंधूंनीं पूर्ण जाणलेली आहे. तो महात्मा ज्या दिवशीं इहलोकाचीं सर्व कर्तव्यें पूर्ण करून–ऑस्ट्रियाच्या निशाणाखालीं नव्हे तर–स्वतंत्र इटलीचे निशाणाखालीं पंचत्वाप्रत पावला त्या दिवशीं रोममध्यें इटलीच्या पार्लमेंटनें राष्ट्रीय सुतक पाळण्याचा ठराव केला. त्याच्या अपरिमित स्वार्थत्यागाची व त्याच्या अनवरत स्वदेशसेवेची मुख्य प्रधानानें वक्तृत्वपूर्ण भाषेंत प्रशंसा केली. जिनोआमध्यें त्या महात्म्याच्या जडदेहाचा उत्तरविधि चालला असतांना हजारों इटालियन लोक आपल्या देशपित्याच्या शेवटच्या दर्शनासाठीं दाटी करूं लागले व तें शेवटचें दर्शन होतांच अर्भकासारखे रडूं लागले. एका मनुष्याच्या मृत्यूसाठीं इतका अश्रुपात जगावर केव्हांहि झाला नसेल !

परमेश्वराचे घरीं प्रत्येक देशाकरितां एक एक मॅझिनी ठेवला असेल तर कोणालाच इटलीचा हेवा करण्याचें कारण नाहीं !

लंडन,<br>
इंडिया हाउस,<br>
ता. २८ सप्टेंबर १९०६.

**विनायक दामोदर सावरकर**

# प्रस्तावना.

( इ. स. १८६१. )

जेव्हां माझ्या राजकीय व वाङ्मयात्मक लेखसंग्रहाची प्रस्तावना लिहिण्याची व त्या बरोबरच माझा आयुर्वृत्तांत देण्याची मला प्रथम विनंति करण्यांत आली, तेव्हां मी तसें करण्याचें नाकारिलें होतें व अझूनही मी तें लिहिण्याचें नाकारूं इच्छित आहें. माझें आयुष्य तुरळक सुखें व अनंत दुःखें यांनीं भरलेलें आहे व माझ्यावर जे प्रेम करितात किंवा मी ज्यांच्यावर प्रेम करतों अशा व्यक्तिविशेषांशिवाय इतरांस त्यांत कांहीं महत्त्वाचें सांपडणार नाहीं. माझ्या आयुष्याचें जें कांहीं सार्वजनिक स्वरूप आहे तें सर्व माझ्या लेखांत प्रतिबिंबित झालेलें आहे व त्या लेखांचा सांप्रतच्या इतिहासावर काय परिणाम घडला आहे हें ठरविणें माझें काम नसून तें जनसमूहाकडे आहे. ज्या पोकळ बडबडीला लोक कीर्ति म्हणून म्हणतात तिच्याबद्दल माझ्या नैसर्गिक प्रवृत्तीनेंच मी उदासीन असल्यानें व स्वभावजन्य अभिमान व शुद्ध अंतःकरण यांचे बलावर, माझ्या आयुष्याला कालिमा लावण्यासाठीं करण्यांत आलेल्या शेंकडों आरोपांचा व लोकनिंदेचा मी तिरस्कार करीत आलों असल्यानें, आपल्या शक्तीनें व कालस्थितीनें जें साध्य म्हणून ठरत असेल त्या साध्यांत आपलें व्यक्तित्व विसरून जाणें हेंच त्या ऐहिक अस्तित्वांतील मुख्य कर्तव्य आहे ही माझी पक्की खात्री—अशी माझी पक्की निष्ठा—असल्यानें मी माझ्या चरित्रांतील तारखा व ठळक गोष्टी यांचीं टिपणें ठेविली नाहींत किंवा पत्रांची यादीही केली नाहीं.

परंतु जरी मी तीं सर्व टिपणें ठेविलीं असतीं तथापि त्यांचा उपयोग करण्याचें धाष्टर्य मजकडून प्रस्तुत कालीं झालें नसतें. फक्त ज्या लोकांनांच, त्यांच्या अस्तित्वांतील प्रत्येक महत्वाच्या भागांत सर्व यूरोपची क्रांति घडवून आणण्याचा परमेश्वरानें अधिकार दिलेला आहे. त्या लोकांची राष्ट्रीय पुनर्जागृति होत असतांना तिच्यापुढें प्रत्येक आत्मचरित्र हें अत्यंत क्षुल्लक आहे. श्री सूर्यनारायण उदयाचलावरून आकाशांत चढत असतांना मेणबत्ती पेटवीत बसणें हा शुद्ध वेडेपणा आहे.

'तथापि या लेखांत, मी स्वतः पाहिलेल्या गोष्टींचें वर्णन व मला माहीत

असलेल्या व्यक्तींची हकीकत ही यूरोपच्या गेल्या शतकांतील शेवटच्या भागाच्या हालचाली समजण्यास सुलभ व्हावें एतदर्थ जरूर तेवढी देणार आहें. व त्या बरोबरच ह्या लेखाचें कारण व त्याचा उद्देश याचा नीट उलगडा होण्यासाठीं आगामी कालांत राष्ट्र व लोक या महातत्त्वांचा विजय होण्याची जीं पूर्व चिन्हें आहेत अशा प्रसंगाच्या प्रगतीशीं व उन्नतीशीं अत्यंत निकट संबंध असलेली कांहीं व्यक्तिविषयक माहिती देणार आहें.

बहुतेक वेळां माझा शब्द म्हणजे बहुजनसमाजाचाच शब्द झालेला आहे. माझा शब्द म्हणजे भविष्यकाळाला घडविणाऱ्या आमच्या राष्ट्रतरुणांचाच संघशब्द होय.

माझ्या लेखाची जी कांहीं किंमत असेल ती ऐतिहासिक कागदपत्र या नात्यानेंच आहे व म्हणून त्याचे सत्याचे समर्थनार्थ व इटलीच्या खऱ्या खऱ्या अंतर्वृत्तीशीं त्यांचा असलेला निकट संबंध सिद्ध करण्यास्तव पुढें दिलेल्या गोष्टींचा आज नाहीं पण उद्यां उपयोग होईल.

इटलीच्या कृत्यांचा उगम व त्यांचें साहित्य यांचा शोध केल्यानें, माझ्या देशबांधवांनां, प्रस्तुत घडणाऱ्या चुका व असलेल्या उणीवा यांचें बरोबर ज्ञान जास्त सुलभ रीतींनें होईल असें वाटतें.

जोसेफ मॅझिनी.

# भाग पहिला.

( आत्मचरित्र, खंड १ )

दा. क्र. ६०३३
शाखा

दिशः प्रसेदुर्मरुतो ववुः सुखाः । प्रदक्षिणार्चिर्हविरग्निराददे ॥
बभूव सर्वं शुभशंसि तत्क्षणम् । भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् ॥१॥

—' कालिदास '—

माझ्या लहानपणीं इ. स. १८२१ सालच्या एप्रिल महिन्यांतील एका रविवारीं जिनोआ शहरीं मी आपले आईबरोबर स्ट्रॅन्डानोव्हामधून चाललों होतों. आमचे बरोबर आमच्या कुटुंबाचा एक जुना मित्रही होता. कांहीं अंशीं ऑस्ट्रियाकडून, कांहीं अंशीं विश्वासघातानें व कांहीं अंशीं दुसऱ्याच्या कमकुवतपणामुळें पिडमांट येथील बंड हें नुकतेंच मोडलें गेलें होतें.

स्वसंरक्षणासाठीं सर्व बंडवाले जलमार्गानें येऊन जिनोआस पोंचले होते व तेथें साधनांचा अभाव पाहून, स्पेन देशामध्यें राज्यक्रांतीचा प्रयत्न विजयी होत चालला असल्यानें तिकडे जाण्याचें योजून त्यासाठीं मदत मिळावी म्हणून याचना करीत होते. त्यांपैकीं पुष्कळ जण बंदरावर जिनोआ सोडण्याची संधि पहात राहिले होते. परंतु कांहींजण निरनिराळ्या बहाण्यानें शहरांत एक एकटे शिरले होते. त्यांच्या चेहऱ्यावरून, त्यांच्या पोषाखाच्या धर्तीवरून, त्यांच्या लष्करी बाण्यावरून किंवा त्यांच्या अत्यंत दुःखी व मुग्ध चर्येवरून मी त्यांना आमच्या इतर लोकांतून ओळखून काढीत असें.

समाजांत एक विशेष प्रकारची सहानुभूति उत्पन्न झाली होती व त्यांतील कांहीं धैर्यवान् मंडळींनीं सान्टारोसा व अन्साल्डी या बंडवाल्यांच्या मुख्य पुढाऱ्यांस, शहरांत एकत्र होऊन शहराचा ताबा घ्यावा व अडथळा करण्यास पुन्हां तयारी करावी, असें सुचविलें. परंतु बंडाला विजय येण्यासारखें जिनोआस कोणचेंच साधन नव्हतें. तेथील किल्ल्यावर तोफखाना नव्हता. व म्हणून त्या पुढाऱ्यांनीं त्या सूचनेचा स्वीकार केला नाहीं व जिनोआनें अनुकूल काल येईतोंपर्यंत थांबावें असें सांगितलें.

आम्हीं रस्त्यानें चाललों असतांना आम्हांस एका उंच मनुष्यानें थांबविलें. त्याची दाढी काळीभोर असून त्याची मुद्रा पाणीदार व करारी दिसत होती व

त्याच्या दृष्टीची सतेजता तर मी कधींहि विसरणार नाहीं. आपल्या हातांतला एक पांढरा रुमाल आमचेपुढें पसरून, "इटलींतील निराश्रितांसाठीं" असें तो म्हणाला. माझ्या आईनें व स्नेह्यानें कांहीं पैसे त्यांत टाकले व तो भिक्षेकरी दुसऱ्या लोकांकडे तीच विनंति करण्यासाठीं वळला. बंडाच्या आरंभीं तयार केलेल्या राष्ट्रीय सैन्यांतील तो एक कमांडर असून त्याचें नांव रिनी असल्याचें मला नंतर कळलें. ज्यांच्यासाठीं तो अशा रीतीनें पैसे गोळा करीत होता त्यांचेबरोबर पुढें तो स्पेनमध्यें गेला व बहुधा आपल्यांतील शेंकडों लोकांप्रमाणेंच तोही स्पेन देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढतां लढतांच मेला असावा.

त्या दिवशीं प्रथमतः माझ्या मनांत एक अस्पष्ट विचार उत्पन्न झाला. तो स्वातंत्र्याचाच किंवा स्वदेशाचाच होता हें नक्की जरी सांगतां येत नाहीं तथापि मला असें वाटूं लागलें, कीं आपल्या स्वदेशाला स्वातंत्र्य देण्यासाठीं लढणें हें आपणां इटालियन लोकांना शक्य आहे व म्हणून तसें करणें हें आपलें कर्तव्य आहे. श्रीमंत किंवा गरीब दर्जाच्या सर्व लोकांशीं माझ्या आईबापांचें वर्तन सदोदित सारखेंच असे व त्यांच्या या लोकपक्षीय तत्त्वांचा परिणाम मजवर नकळत होत जाऊन समतेबद्दल माझे मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होत आली होती. व्यक्तीचा दर्जा कोणचाही असो, तींत मनुष्यत्व किती आहे हें पाहण्याकडे त्यांचें लक्ष असे व फक्त इमानी मनुष्याचीच त्यांना चाड असे. वर सांगितलेल्या मित्राबरोबर माझे वडील फ्रान्स मधल्या नुकत्याच घडलेल्या लोकसत्ताक पक्षाच्या इतिहासाबद्दल नेहमीं संवाद करीत असत. व तो ऐकून माझे अंतःकरणांतील नैसर्गिक स्वातंत्र्येच्छेला जास्त जास्त बळकटी येत चालली. माझ्या लॅटिनच्या शिक्षकानें भाषांतरासाठीं दिलेल्या लिव्ही व टॅसिटसच्या ग्रंथांचे वाचनानें व माझ्या वडिलांच्या वैद्यकीच्या पुस्तकांचे मागें लपवून ठेविलेल्या कांहीं जुन्या फ्रेंच वर्तमानपत्रांनीं तर ती माझी स्वदेशाला स्वतंत्र करण्याची महत्वाकांक्षा प्रबळतम झाली. या फ्रेंच वर्तमानपत्रांत फ्रेंच लोकांच्या पहिल्या क्रांतीचे वेळेस प्रसिद्ध झालेल्या Chronigue de mois नांवाच्या पत्राचे कांहीं अंक होते.

परंतु माझ्या देशांतील अस्तित्वांत असलेल्या जुलमाचा चुराडा करण्यासाठीं झटणें हें मुख्य कर्तव्य असून त्या युद्धांतील माझा भाग मलाच उचलला पाहिजे, याचा त्या दिवशीं प्रादुर्भूत झालेला विचार पुन्हां केव्हांही नष्ट झाला नाहीं. ज्यांच्यापैकीं पुढें बरेच जण माझे मित्र झाले अशा त्या

"इटलीच्या निराश्रितांचें" स्मरण हें दिवसां मी ज्या ज्या स्थळीं जाईं व रात्रीं मला जीं जीं स्वप्नें पडत त्यांत त्यांत माझा पाठलाग करीत असे. त्या लोकांच्या मार्गें जाण्यासाठीं मी काय पाहिजे तें केलें असतें. त्या लोकांनीं केलेल्या पिडमांटमधील त्या राज्यक्रांतीच्या थोर व वीर्यशाली प्रयत्नाला अपयश कसें आलें याचीं कारणें शोधून काढण्यासाठीं नांवें व हकीकती मिळवून त्यांचा अभ्यास करण्यास मी आरंभ केला.

त्या स्वातंत्र्याच्या सामन्यांत वाटेल तें कृत्य करण्याची ज्यांनीं प्रतिज्ञा केली होती त्यांनीं आयत्या वेळेस दगा देऊन विश्वासघात केला. व पुढाऱ्यांनीं पहिल्या चकमकी सरशीच धीर सोडून प्रतिकार करण्याचा कांहींच प्रयत्न केला नाहीं. सर्व वृत्तांत व स्थिति समजून घेतल्यावर मला असें वाटलें कीं जर सर्वांनीं आपआपलें कर्तव्य केलें असतें तर त्यांस जय आला असता; तर मग पुन्हां प्रयत्न करण्यास हरकत कोणची ?

या विचाराशिवाय मला दुसरें कांहीं सुचेनासें झालें. परंतु त्या विचारानुरूप कृति कशी करावयाची याची कल्पनाही त्या वेळेस मला आकलन होईना व म्हणून माझा उत्साहभंग होत चालला. युनिव्हर्सिटीच्या बांकावर बाकीचे विद्यार्थी खिदळत असतांना व मजा मारीत असतांना मी मात्र त्यांच्यामध्यें आपल्याच विचारांत गढून गेलेला असा गंभीर रीतीनें बसलेला असें. त्या वयांतच मजवर वार्धक्याची कळा आल्यासारखी झाली. **माझ्या प्रिय देशाला पारतंत्र्याचें सुतक आलें आहे असें मला वाटूं लागलें. व म्हणून मी काळ्या रंगाचा सुतकी पोषाख धारण करण्याचा निश्चय केला.** त्याच वेळीं "जाकोपो ऑर्टिस" (jokopo ortis) हें पुस्तक माझ्या हातीं पडलें व त्याचे वाचनाची मला विलक्षण चटक लागली. मीं तें सर्व तोंडपाठ करून टाकलें. स्थिति इतकी भयंकर होत चालली कीं मी आतां आत्महत्या करतों कीं काय अशी बिचाऱ्या माझे आईला भीति पडली.

हलके हलके मनोविकारांचें हें पहिलें वादळ शांत होत चाललें. याच वेळीं तरुण रफिनी बंधूंशीं माझी मैत्री जुळली. मैत्री जुळली म्हणण्यापेक्षां त्यांच्यावर व त्यांच्या त्या पवित्र मातेवर माझें प्रेम बसलें व त्यांच्या या सख्यत्वानें मला पुन्हा जगांत आणून बसविलें. माझ्या मनाला आंतल्याआंत जाळून टाकणारा मनोविकार, त्यांच्याशीं वाङ्मय, इटलीचें बौद्धिक पुनरुज्जीवन, तत्त्वज्ञान, धर्मात्मक चर्चा वगैरे विषयांवर संवाद केल्यानें जरा हलका होऊं लागला. शिवाय

आम्ही लहान लहान संस्था, पुढील भयंकर संस्थानांच्या पुरोगामीच कीं काय अशा, पोलीसनें मना केलेलीं पुस्तकें गुप्त रीतीनें प्रसृत करण्यासाठीं स्थापन केल्या. अशा रीतीनें लहान प्रमाणावर कां होईना परंतु मला कृति करण्यास मार्ग सांपडल्याकारणानें माझ्या मनास किंचित् समाधान वाटूं लागलें. आपल्याला चांगली स्थिति यावी अशी महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या निवडक मित्रांचें मंडळ माझेभोंवतीं जमा होऊं लागलें. ज्याची स्मृति एखाद्या अपूर्व रचनाप्रमाणें माझे अंतःकरणांत राहिली आहे, अशा त्या मित्रमंडळापैकीं, या वेळेस फेडेरिको कॅम्पानेला शिवाय ( हे हल्लीं रोम व व्हेनिसच्या कमेटीचे सभासद आहेत, ) आमचा जुना बेत सिद्धीस नेण्यास कोणीही शिल्लक राहिलेले नाहींत. त्यांपैकीं कांहीं मृत्युमुखीं पडलेले आहेत. काहींनीं आम्हांस सोडलेलें आहे. बाकीचे इमानें इतबारें जरी अझून आमच्या तत्वाला धरून आहेत तरी हताश होऊन स्वस्थ बसले आहेत. त्या वेळेला तें मंडळ मला " प्लीआडच्या *" संघासारखें वाटे व माझ्या त्रस्त झालेल्या हृदयाचें शांतवन असे. आतां यापुढें मी असहाय्य राहिलों नव्हतों.

माझें स्वतःचें चरित्र देण्याचा माझा विचार नसल्यानें मी एकदम १८२७ सालाकडे वळतों. त्याच्या मागील वर्षाचे शेवटीं, मला वाटतें कीं, मी माझा पहिला वाङ्मयविषयक लेख लिहून तो फ्लारेन्सच्या एका पत्राकडे प्रसिद्धी करितां पाठविण्याचें धाडस केलें होतें. परंतु साहजिक रीतीनेंच त्या पत्रानें तो लेख छापला नाहीं. त्या लेखांचा विषय मला देशपिता वाटूं लागलेला अत्यंत प्रख्यात कवि डँटे ( Dante ) हा होता.

१८२७ मध्यें पूर्वरचनावादी व अद्भुतरचनावादी अशा ग्रंथकर्त्यांच्या दोन पक्षांमध्यें रण-माजून राहिलेलें होतें. त्यांपैकीं पहिल्या पक्षाचें मत वाङ्मयावर जुलमाचा ताबा अबाधित रहावा असें होतें. हजार दोन हजार वर्षांपूर्वी ठरलेल्या व अमलांत आलेल्या जुन्या पुराण्या नियमांनीं वाङ्मय नेहमीं जखडलेलें असावें—इटलीचें वाङ्मय देखील गुलामगिरींत असावें—असा त्या पक्षाचा मथितार्थ होता. दुसरा पक्ष इटलीच्या सरस्वतीला या दास्यांतून सोडवून तिला तिच्या अंतःस्फूर्तीनें राहूं देण्याचा प्रयत्न करीत होता. आह्मीं तरुण तरुण मंडळी ही सर्व या स्वातंत्र्यशील पक्षाकडे होतों. परंतु

* " प्लीआडचा संघ " हें नांव एका तारकासमूहाचें आहे व तें फ्रान्स वगैरेमध्यें सप्तकविसमूहाला लाविलेलें होतें.

मला असें दिसून आलें कीं, त्या वादाचा गर्भितार्थ फारच थोड्यांच्या ध्यानांत आलेला होता. वृद्धपक्षाकडे जुनें शास्त्रीमंडळ व विद्यापीठांतील शिक्षकवर्ग वगैरे लोक होते. व त्यांचा सर्व प्रयत्न निर्जीव, निःसत्व व "हटादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता" अशा वर्गाचा होता. व इकडे वाटेल त्याच्या लहरीप्रमाणें वाटेल त्यानें विचित्रपणा करीत सुटावें असा नवीन जागृतीचा परिणाम होऊं लागला. नवीन पंथाला जुलुमाचा तिटकारा आलेला होता, परंतु त्या गर्दीत जगांतील प्रत्येक गोष्टीप्रमाणें ललितकलाही विशिष्ट नियमांनीं बद्ध असल्याच पाहिजेत याचें त्यांना भान राहिलें नाहीं.

कलेचें खरें स्वरूप म्हणजे केवळ व्यक्तीची लहर नव्हे. तें स्वरूप म्हणजे भूतकालाचा परिणाम किंवा भविष्यकालाचें निदर्शक असावें लागतें. आणि जेव्हां डँटे किंवा बायरन यांच्याप्रमाणें त्या स्वरूपांत भूत व भविष्य यांचें संमिश्रण व समानता झालेली असते त्याचवेळेस ती कला पूर्ण स्वरूपाप्रत आली असें समजावें. ( आपल्याइकडे श्रीसमर्थ रामदासांच्या ग्रंथांत हें कवित्वाचें पूर्ण स्वरूप भाषेंत व तत्त्वदृष्टींत दिसून येतें. )

परंतु हें भूतकालाचें व भविष्यकालाचें संमिश्रण आपल्या इटली देशांत कसें व्हावयाचें? तीन शतकें झालीं. इटलीला भूतकालच नाहीं! तीन शतकें आपलें व्यक्तिस्फूर्तीचें स्वातंत्र्य नष्ट झालेलें असून आपण स्वत्व विसरलेल्या गुलामांचा बाजार बनलों आहोंत. कोणच्याही कलेचा उदय जर करावयाचा असेल तर प्रथमतः गुलामगिरीच्या काळाचे और्ध्वदेहिक मंत्र जपून मग भविष्य काळाच्या उदयार्थ प्रभातस्तोत्रें गाइलीं पाहिजेत. व हीं प्रभातस्तोत्रें रचतेवेळीं आपल्या लोकांच्या या सुप्त व नकळत गुप्त रीतीनें अजून जीव धरून राहिलेल्या मनोवृत्तींची माहिती करून घेतली पाहिजे. आपल्या देशाच्या निम्में निर्जीव झालेल्या अंतःकरणावर हात ठेवून त्याचे अत्यंत मंदगतीनें पडणारे ठोके मोजून मग त्याप्रमाणें आपली इटलीची बुद्धि प्रथम कोणत्या उद्देशाकडे व कर्तव्याकडे लावली पाहिजे हें ठरविणें भाग आहे. व्यक्तिस्फूर्तीला समाजस्फूर्तीचें साह्य मिळेल तरच ती व्यक्तिस्फूर्ति उपयोगी आहे. ज्याप्रमाणें निरनिराळीं पुष्पें निरनिराळें सौंदर्य व सुवास हे एकाच जमिनीपासून स्वीकारतात, त्याचप्रमाणें व्यक्तिस्फूर्तीची विविधताही एकाच समाजस्फूर्तीपासून उत्पन्न झाली पाहिजे. परंतु ही समाजस्फूर्ति इटलीमध्यें आहे कोठें? कोणत्याही कलेच्या उन्नतीला मूलभूत अशी ही

समाजस्फूर्ति इटलीमध्यें नष्ट झालेली आहे. समाजचैतन्याची उत्क्रांति व्यवस्थित रीतीनें होण्यास अवश्य असणारें केंद्रस्थान कोठें आहे ? स्वदेश कोठें आहे ? स्वातंत्र्य कोठें आहे ? **स्वदेशाशिवाय व स्वातंत्र्याशिवाय कोणच्याही कलेची उन्नति होणें अशक्य आहे.** व म्हणून प्रथमतः आपलें लक्ष सर्व कलेला मूलभूत असलेलें " देशचैतन्य आम्हांस आहे काय ?" या प्रश्नाकडे लाविलें पाहिजे व " स्वदेश प्रथमतः पाहिजे." असें म्हणून सर्वांनीं सर्व शक्ती राजकीय स्थितीकडे आधीं लाविल्या पाहिजेत. आपल्या आयुष्यांत या कार्यांत जर आपण विजयी झालों तर इटलींतील कला आपल्या थडग्यावर विलास पावतील, त्यांना फुलांचा बहार येईल, असल्या प्रकारचे विचार–जे स्वदेशाभिमानी व बुद्धिमान माझोनी या कवीला आधींच सुचलेले होते व जे त्याच्या नाटकांतून पदोपदीं दृग्गोचर होत होते ते हे विचार–त्या वेळेस फारच थोड्या लोकांचे ध्यानांत आलेले होते. बहुतेक लोक कलेचें प्रयोजन कलाच होय या असत्य तत्त्वाला धरून बसलेले होते.

१८२७ सालीं माझ्या मनांत प्रादुर्भूत झालेली विचारक्रांति ही अजून जाज्वल्य रीतीनें वास्तव्य करीत होती. शेवटीं मी वाङ्मयाचा मार्ग सोडून देऊन राजकीय दिशेनें खटपट करण्याच्या सरळ व प्रमुख मार्गाचें अवलंबन केलें.

व हा माझा पहिला महत्वाचा स्वार्थत्याग होय. ऐतिहासिक व काल्पनिक कथानकांतील हजारों देखावे माझ्या अंतःकरणासमोर नेहमीं खेळत असत. व एकांतवासांतील मनुष्याला सुंदर व रम्य तरुणींचीं कल्पनेंतील प्रतिबिंबेंही ज्याप्रमाणें समाधान देतात त्याप्रमाणें माझ्या हृदयाला ते प्रसंग व देखावे शांतिदायक वाटत असत. माझ्या मनाची नैसर्गिक प्रवृत्ति ही फार वेगळी आहे. परंतु ज्यां कालांत मला जन्म आला आहे, त्या कालाच्या स्थितीनें व माझ्या देशाच्या अपमानानें माझें कर्तव्य माझ्या नैसर्गिक प्रवृत्तीहून भिन्न ठरलें. परंतु या कर्तव्याप्रमाणें प्रत्यक्ष कृति करण्याला त्या वेळेस साधन नसल्यानें मी वाङ्मय प्रश्नाच्या चर्चेंतूनच त्या कर्तव्याची दिशा स्पष्ट दाखविण्याचा निश्चय केला.

व्यापारविषयक बातम्या प्रसिद्ध करीत असलेलें एक पत्र जिनोआस निघत असे. त्या पत्राचे संपादकांस पुस्तकांच्या जाहिराती द्याव्या असें सुचवून त्या पुस्तकांचेबद्दल थोडथोडे शिफारसीचे लेख लिहिण्याचें मी पत्करिलें.

परंतु हे जाहिरातीसाठीं म्हणून लिहिलेले लेख वाढतां वाढतां स्वतंत्र निबंधच झाला. सरकाराला लोकांप्रमाणें झोंप लागली असल्याकारणानें त्याचें तिकडे लक्ष गेलें नाहीं. किंवा त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं. तें पत्र वाङ्मयाच्या चर्चेचें एक महत्त्वाचें साधन झालें. व ते सर्व लेख स्वतंत्र रीतीनें छापण्यांत आले. त्या लेखांची खरी किंमत विशेषशी नाहीं. परंतु त्यावरून मी व आणखी कांहीं तरुण मंडळी कोणत्या उद्देशानें लिहीत होतों हें दिसून येईल. त्या लेखनविषयक चर्चेला लवकरच राजकीय स्वरूप प्राप्त झालें व फक्त एखादा दुसरा शब्द बदलला कीं तें राजकीय स्वरूप स्पष्ट दिसून येऊं लागलें. आमच्या मनानें लेखनस्वातंत्र्य हें निराळ्याच एका महत्त्वाच्या स्वातंत्र्याची पहिली पायरी होय. समाजाच्या गुप्त शक्तीमध्यें तरुणांनीं आपलें सजीवत्व ओतून त्यांना जागृती यावी अशी सूचनाच या मार्गानें करण्यांत येत होती. आमच्या या प्रयत्नास परक्यांकडून व आमच्या स्वतःच्या लोकांकडून, असे दुहेरी अडथळे येतील व या खटपटीस हाणून पाडण्यासाठीं ते सज्ज होतील हें आम्ही जाणून होतों.

अखेर सरकाराचे वाचनांत ते लेख आले व त्या विरुद्ध प्रयत्न सुरू झाले. जेव्हां पहिल्या वर्षाच्या शेवटीं, आजपर्यंत आलेल्या यशानें उत्साहित होऊन, आम्हीं तें पत्र वाढविण्याचें आमचे वाचकांस कळविलें तेव्हां सरकारानें तें अजिबात बंद करण्याचा हुकूम केला. परंतु या किरकोळ लेखां-मध्यें दिसून आलेली तारुण्याची धमक व अवसान व त्यांच्यांत गर्भित असलेला धाडसी उद्देश यांच्या योगानें जिनोआमध्यें माझी बरीचशी ख्याती झाली. कार्लोबोटा नावांच्या इतिहासकाराविरुद्ध मी एक पत्र प्रसिद्ध केलें होतें. त्या पत्रानें माझी फ्लॉरेन्स.मधील ॲटोलॉजिआचे चालकांशीं ओळख पडली. हे चालक मनांतून पूर्ण इटालियन होते. परंतु त्यांतील बहुतेक जण मित्रे होते. त्याच वेळेस ग्यूएराझी नांवाच्या प्रख्यात नाटककाराचें एक नाटक माझे वाचनांत आलें. त्यावर माझ्या एका तरुण मित्रानें–जो अतिशय देशाभिमानी होता परंतु गृहसौख्याची अनिवार लालसा असल्यानें जो पुढें निरुपयोगी झाला–त्यानें त्यावर निबंध लिहिला. तेव्हां ग्यूराझीनें आम्हांस एक पत्र टाकलें. त्या पत्राचें उत्तर मींच लिहिलें. एव्हांपासून ग्यूराझीमध्यें व मजमध्यें पत्रव्यवहार सुरू झाला. व त्यावेळेस स्नेहात्मक मजकूर व इटलीची सुधारणा कशी घडवावी याची अवसानपूर्ण चर्चा सुरू असे.

ज्या वेळेस तें जीनोआमधील पत्र बंद करण्यांत आलें त्यावेळेस ग्यूएराझीच्या जवळ जमा झालेली तरुण मंडळी व आम्ही मिळून लेगहॉर्नमध्यें दुसऱ्या एका नांवाखालीं आमचें पत्र काढण्याचें ठरविलें. आमच्या लेखांचा राजकीय उद्देश आतां अधिक स्पष्ट रीतीनें दृग्गोचर होऊं लागला. जवळ जवळ कोणचाही पडदा न ठेवितां मी, ग्यूएराझी व कार्लोविनी हे मुख्य लेख लिहूं लागलों. ज्या फास्कोलोनें प्रथमतः वाङ्मयास देशोन्नतीचें मुख्य कर्तव्य करणें भाग पाडिलें व ज्याला इतर सर्व गोष्टी बाजूस ठेऊन या देश प्रीतीबद्दल इटलीनें मान दिलाच पाहिजे त्या फास्कोलोबद्दल आम्ही लेख लिहिले. आम्ही दिवसेंदिवस इतकें स्पष्ट लिहूं लागलों कीं, टरकीनीच्या त्या सुप्त संस्थानानें सुद्धां आमचें पत्र बंद करण्याचा हुकुम सोडला. पहिल्या वर्षाच्या शेवटींच आम्ही तें बंद केलें. परंतु या दोन पत्रांतील लेख वाचून अवसानाची अशी बरीच तरुण मंडळी तयार झाली होती व आतां त्या अवसानाला बाहेर पडण्यासाठीं कांहीं तरी मार्ग शोधिलाच पाहिजे होता. आमच्या देशबांधवांच्या अंगांतील गूढ विचारांना जागृत करण्यांत आम्हांला यश आलें होतें व याहूनही ज्यास्त महत्वाचें काम म्हटलें म्हणजे आमच्या इटलीच्या तरुणांना खरी स्थिति कळून चुकली. त्यांना हें पक्कें समजलें कीं, इटलीवरील सत्ताधारी परके हे आपल्या सर्व प्रकारच्या प्रगतीच्या जाणून बुजून विरुद्ध जात आहेत व त्यांना उलथून पाडून स्वतंत्रता मिळविल्याशिवाय कोणत्याही प्रकारची प्रगति होणें हें अशक्य आहे.

हे लेखनविषयक प्रयत्न चालले असतांना माझा मुख्य हेतु मी विसरलों नव्हतों व साहसाचीं कृत्यें करण्याची ज्यांचे अंगांत ताकद आहे असे तरुण लोक निवडून काढण्याचें काम मीं चालविलेंच होतें. आमच्यांत कारबोनारी मंडळींचें पुनरुज्जीवन सुरू झाल्याची बातमी पसरली होती. मी त्या मंडळींच्या तपासांत होतों व बारीक निरीक्षणानें व प्रश्न करून करून सर्व बाजूनें त्यांना सांपडून काढण्याचा उद्योग करीत होतों. अखेर टॉरी नांवाच्या एका मित्रानें आपण त्या मंडळीच्या एका शाखेचा सभासद असल्याचें मजपाशीं कबूल केलें व मला त्या मंडळींतील पहिल्या वर्गाची दीक्षा देण्याचें ठरविलें. मीही तयारच होतों.

१८२० ते १८२१ सालांतील ठळक गोष्टींचा मी अभ्यास करीत होतों तेव्हां कारबोनारीझमची बरीच माहिती मला झाली होती व त्यांचे विधिवैचित्र्य,

फाजील गौप्यता व त्यांचीं तीं राजकीय मतें–किंवा खरें म्हटलें म्हणजे राजकीय मतांचा अभाव–या गोष्टी मला फारशा आवडल्या नाहींत. परंतु त्या वेळेला माझी स्वतःची अशी एखादी राजकीय मंडळी स्थापण्याचें मला अशक्य होतें. व कारबोनारी मंडळीही त्यांच्या मुख्य तत्त्वाच्या स्थितीच्या मानानें कितीही कमी दर्जाची असली तरी, ज्यांच्या बोलांत कृति आहे, बोलतात तसें जे करावयासही तयार आहेत, अशांचें एकीकरण करण्याचें ती साधन होती. धार्मिक बहिष्कार व देहत्यागाच्या शिक्षा यांनाही न जुमानतां ज्यांनीं आपल्या प्रयत्नांचा चिवटपणा सोडला नाहीं व जे जुनें जाळें फाटत असतांच नवीन तयार करून सिद्ध असतात, असे लोक तिच्यामध्यें होते व माझें नांव व श्रम तिला अर्पण करण्यास ही गोष्ट पुरेशी होती.

मी आतां वृद्ध झालों आहे तरी अझून माझी अशीच समजूत आहे कीं, **लोकांस बरोबर मार्गानें नेणाऱ्या पुढारीपणाचे खालोखाल दुसरा अत्युत्तम सद्गुण म्हटला म्हणजे केव्हां व कशा रीतीनें अनुयायी व्हावें हें कळणें होय.** जे सत्याकडे व कल्याणाकडे नेतात, त्यांच्याच अनुयायित्वाबद्दल अर्थात मी बोलत आहें. सर्व प्रकारच्या संघवर्धक संस्थांपासून किंवा रचनाबद्ध पंथांपासून अलग राहून आपल्या व्यक्तिविशेषत्वाच्या डौलांतच जे मग्न असतात अशा प्रकारच्या तरुण लोकांपैकींच पुष्कळजण प्रबल व सुघटित सत्तेच्यापुढें हताश होऊन एखाद्या गुलामाप्रमाणें शरण रिघतात. मनापासून कबूल असलेल्या व संमति दिलेल्या पवित्र सत्तेबद्दल पूर्ण पूज्यभाव बाळगिला पाहिजे, म्हणजे दाबादाबीनें स्थापित केलेल्या खोट्या सत्तेचें भय उरत नाहीं. म्हणून मी कारबोनारी सभेचा सभासद झालों.

एके दिवशीं संध्याकाळीं सेंट जार्जिओजवळच्या एका घरांत मला नेलें गेलें. त्या घराच्या अगदीं वरच्या मजल्यावर गेल्यानंतर ज्या मनुष्याकडे मला दीक्षा देण्याचें काम होतें तो मला दिसला. या गृहस्थाचें नांव रामोनडो डोरिया असें असून तो बराच वयातीत होता. त्याची मुद्रा तुसडी होती. बऱ्याच गंभीरपणानें त्यानें मला असें सांगितलें कीं, सरकारची कडक चौकशी व आपल्या उद्देशाची प्राप्ति करून घेण्यास लागणारें ज्ञान व सावधगिरी यांचे योगानें शेंकडों संस्थाचीं कामें अशक्य झालीं आहेत. मला बऱ्याचशा विधिविधानांची सूट देण्यांत आली. त्यांनीं मला, मी कृति करण्यास तयार आहे कीं नाहीं, असा प्रश्न केला. वेळोवेळीं ज्या आज्ञा मला केल्या जातील

त्या मी मानल्या पाहिजेत व भाग पडतांच त्या " संस्थेच्या " कारणार्थ मी आपला प्राणही दिला पाहिजे असें सांगण्यांत आलें. नंतर त्यांनीं मला गुडघे टेंकण्यास सांगितलें. मीं गुडघे टेंकले. त्यांनीं एक खंजीर म्यानांतून काढून पहिल्या वर्गांतील नूतन दीक्षा घेणाऱ्यांनां जी शपथ द्यावयाची ती म्हणावयास आरंभ केला. मी त्याच्याप्रमाणें ती शपथ उच्चारीत गेलों. नंतर त्यांनीं दोनतीन खुणा सभासदांस ओळखण्यासाठीं सांगून मला रजा दिली. मी कारबोनारी झालों.

तेथून निघाल्यानंतर त्या संस्थेचा उद्देश–लक्ष्य–काय, त्यांत माणसें कोण आहेत, काम काय करावयाचें, वगैरे प्रश्न माझ्यासाठीं वाट पहात उभा असलेल्या त्या स्नेहास विचारतां विचारतां मी दमून गेलों. परंतु सर्व व्यर्थ ! आमचें कर्तव्य स्तब्ध रहावयाचें, होतील ते हुकूम पाळावयाचे, व हलके हलके योग्यता वाढवीत विश्वासाला पात्र व्हावयाचें. माझ्या मित्रानें आनंद प्रदर्शित केला कीं, सुदैवानें मला नेहमींच्या बऱ्याच विधींचा त्रास चुकवितां आला. मी किंचित् हसलोंसें पाहून त्यानें जरा कडक रीतीनें विचारलें कीं, नेहमींप्रमाणें माझ्या डोळ्यादेखत पिस्तूल भरून मग तें माझे स्वतःचे कानांत उडवून द्यावयास सांगितलें असतें तर मी कसें केलें असतें ? मीं उत्तर केलें कीं, मीं तसें करण्याचें साफ नाकारिलें असतें. मीं त्या दीक्षा देणारे गृहस्थास सांगितलें असतें कीं, एक तर त्या पिस्तूलांत एखादा खोलगा असून त्यांत ती गोळी रुतून बसत असेल व असेंच असेल तर तें पिस्तूल उडवून घेणें म्हणजे निव्वळ चेष्टा होय. तसें करणें हें आपणां दोघांनाही अनुचित आहे. किंवा जर ती गोळी खरोखरच पिस्तूलांतून उडण्यासारखी असेल, तर मला हें अतिशयच चमत्कारिक दिसतें कीं, ज्या मनुष्याला त्याच्या स्वदेशासाठीं लढण्याची आज्ञा करावयाची त्यालाच प्रथम परमेश्वरानें दिलेल्या त्याच्या थोड्या फार मेंदूला वार करून उडवून द्यावयास सांगावयाचें !

विचार करतां मला त्या शपथेबद्दल फारच अचंबा व अविश्वास वाटूं लागला. त्यांत आज्ञाधारकत्वाच्या प्रतिज्ञेशिवाय दुसरें कांहीं एक नव्हतें. अंतिम साध्य काय याचें नांव नाहीं. राष्ट्रैकता किंवा संयुक्त संस्थानता, लोकसत्ता कीं राजसत्ता, याबद्दल त्या दीक्षा देणाऱ्याचे तोंडून एकही शब्द निघाला नाहीं. सरकार विरुद्ध लढाई–यापुढें कांहीं नाहीं.

संस्थेच्या खजिन्याच्या मदतीकरितां म्हणून प्रत्येक सभासदाला जी वर्गणी द्यावी लागे तीपैकीं दीक्षा घेण्याचे वेळीं २० फ्रॅंक ( सुमारें १२–१३ रुपये )

द्यावे व पुढें दर महिन्यास ५ फ्रँक द्यावे असा नियम होता. माझ्यासारख्या विद्यार्थ्याला ही रक्कम देणें पुष्कळ जड जाई. तथापि ती गोष्ट चांगली होती. वाईट कामासाठीं जेव्हां पैसे गोळा केले जातात तेव्हां ती गोष्ट पापकारक असते. परंतु एखाद्या पवित्र कृत्याला मदत होण्याचा संभव असतांनांही पैसे देण्यास मागें मागें घेणें हें त्याहून ज्यास्त पापकारक होय.

सद्यःस्थितींत सर्वत्र दिसणारे व हाडी मासी खिळलेले असे जे आपमतलबीपणाचे कांहीं दुःखदायक प्रकार आहेत, त्यांपैकींच हा एक प्रकार आहे कीं, एका फ्रँक करितां देखील मनुष्यें यादवी ( वादक बखेडा ) करीत बसतील. स्वतःच्या चैनीसाठीं किंवा सुखासाठीं–व तें सुखही बहुधा खरें नसून काल्पनिकच असावयाचें–जे लोक लाखों रुपये उधळण्यास एका पायावर तयार होतील, व वेळ पडली तर ज्यांनीं आपल्या स्वदेशासाठीं व स्वातंत्र्यासाठीं रक्ताचीं नाणीं पाडणें अवश्य आहे, तेच लोक वारंवार द्रव्यत्याग करावा लागतो म्हणून रडगाणें गातात! आपल्या मानास, आपल्या आयुष्यास, व आपल्या बांधवांच्या आत्म्यास काळोखी लागली तरी ती पत्करतील, परंतु आपल्या पिशवीचें तोंड सैल करणार नाहींत!

प्राचीन ख्रिश्चन लोक आपल्या गरीब बांधवांचे कल्याणासाठीं पोटाला अगदींच अवश्य तितकें ठेऊन बाकीची सगळी संपत्ति आपले धर्माध्यक्षाचे पायापुढें आणून ओतीत असत. आतां व्हेनिशिया प्रांताला परक्यांचे ताब्यांतून सोडवून स्वतंत्र करण्यासाठीं आपल्या दोन कोटी पन्नास लक्ष लोकांमध्यें प्रत्येक जण एक फ्रँक देणारे असे दहा लक्ष निघतील तरी तें अत्यंत प्रचंड मनोराज्यच फलद्रुप झालें असें समजलें पाहिजे. याचें कारण असें आहे कीं, त्या पहिल्या वर्गांत निष्ठा होती, आपल्यांत नुसतीं मतें आहेत.

या नंतर लवकरच कारबोनारी मंडळीच्या दुसऱ्या वर्गाची मला दीक्षा देण्यांत आली. आतां मला दुसऱ्यांना दीक्षा देण्याचा अधिकार मिळाला. दोघांतिघां कारबोनारी मंडळींशीं माझी ओळख झाली. मंडळींतल्या एका मोठ्या अधिकारावर असलेला व पूर्वी फ्रेंच कॉन्सलचे हुद्द्यावर असलेला पॅसानो नांवाचा गृहस्थही माझे ओळखीचा झाला. तो वृद्ध होता तथापि त्याचे अंगांत अवसान व करारीपणा कायम होता. परंतु त्या संस्थेच्या अंतिम उद्देशाचे सिद्धीसाठीं धीराचा किंवा युक्तीचा प्रयत्न करण्याचे ऐवजीं तो बारीकसारीक राजकीय कटांत वेळ दवडीत बसला होता. मला तर ते काय

करीत होते किंवा त्यांचा कार्यक्रम काय होता हें अजूनही ठाऊक नव्हतें. व मला अशी शंका येऊं लागली कीं बहुधा कांहींच केलें जात नव्हतें.

ते नेहमीं म्हणत असत कीं, इटली देशांतील कृति करण्याची सर्व शक्ति नष्ट झाली आहे. ते म्हणत कीं, आम्हीं "वसुधैव कुटुंबकम्" या वर्गांतील आहोंत.

"वसुधैव कुटुंबकम्" हा फार गोड शब्द आहे. पण त्याचा अर्थ सर्व जगाचें स्वातंत्र्य असा जर असेल तर. परंतु प्रत्येक उन्नयन दंडाला उपस्तंभ लागत असतो, मी तो उपस्तंभ इटलीमध्यें शोधीत असतां ही कार्बोनारी मंडळी त्याचे शोधार्थ पारिसकडे पळत सुटलेली होती.

फ्रेंच भाषेमध्यें, कोणाला हें मला नक्की आठवत नाहीं, एक लेख लिहून धाडण्याचा मला हुकूम झाला. त्या लेखांत स्पेनच्या स्वातंत्र्याचा पक्ष समर्थन करून १८२३ सालच्या बर्बोनमध्यस्तीचा बेकायदेशीरपणा व दुष्ट परिणाम हे उघडकीस आणावयाचे होते. मी तो लिहून दिला. हें काम केल्यानंतर मी मला मिळालेल्या अधिकाराचा उपयोग करून घेण्यास आरंभ केला. विद्यार्थीवर्गाला तयार करण्याचे कामांत मी मन घातलें. माझा असा बेत होता कीं, आज नाहीं उद्यां, आपण आपल्या पूर्ण मताच्या सभासदांचा एक बळकट संघ करून त्या कार्बोनारी मंडळीच्या निर्जीव होत चाललेल्या संस्थेंत नवीन चैतन्य उत्पन्न करूं.

सरतेशेवटीं फ्रान्समध्यें क्रांतीचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागल्यावर मग आमच्या मंडळींत थोडीशी चळवळ सुरू झाली. मला टस्कनीमध्यें कार्बोनारीची स्थापना करण्यासाठीं पाठविण्याचें ठरलें. त्यांना वाटत होतें त्यापेक्षां माझ्या मानानें हें काम फारच कठीण होतें. माझ्या कुटुंबांतील सर्व वळण या कामाला हात घालण्याकडे माझी प्रवृत्ति होऊं देईना. व हें कर्तव्य सिद्धीस नेण्यासाठीं लागणारा पैसा मिळणें हें अगदीं अशक्य झालें होतें. परंतु पुष्कळ विचारानंतर मी ती कामगिरी पत्करण्याचें ठरविलें. अरेंझानो गांवामध्यें माझ्या कुटुंबाच्या ओळखीचा एक विद्यार्थी होता. त्याचे भेटीला मी कांहीं दिवस जाऊं इच्छितों असें निमित्त सांगून व इतर शेंकडों लटपटी करून मी माझ्या सच्छील आईपासून थोडेसे पैसे काढले व घर सोडून निघालों.

मी निघावयाचे आदले दिवशीं एका विवक्षित स्थलीं मध्यरात्रीच्या वेळीं मी हजर व्हावें असें मला सांगण्यांत आलें. मी ही गोष्ट मुद्दाम यासाठींच सांगत

आहे कीं, कारबोनारीझम् ही किती कनिष्ट स्थितीला पोहोंचली होती हें स्पष्ट व्हावें. पुढें मी तेथें गेलों. मी दीक्षा दिलेले बहुतेक तरुण लोकही तेथें जमा झालेले मला दिसले. कशासाठीं जमावयाचें हें न सांगतां त्यांनाही मजप्रमाणेंच नुसतें तेथें येण्याचें फर्माविलें होतें. तेथें बराच वेळपर्यंत आम्हीं थांबलों. मग डोरिया, आमच्या ओळखीचे नसलेले कोणी दोघे गृहस्थ बरोबर घेऊन तेथें आला. त्या गृहस्थांनीं फक्त डोळे उघडे ठेऊन बाकी सर्व अंगाभोंवतीं एक झगा गुंडाळलेला होता व एखाद्या भुताप्रमाणें ते अगदीं स्तब्ध होऊन उभे राहिले होते. हें पहातांच आतां मात्र कांहीं तरी कृति करण्याची वेळ आली आहे असें वाटून आमचें अंतःकरण उल्हसित झालें.

आम्हां सर्वांनां एका वर्तुलांत उभें करून डोरिया मला उद्देशून बोलूं लागला. कारबोनारी संस्थेविरुद्ध कांहीं अननुभवी व मूर्ख तरुण लोकांनीं निंदा केल्याच्या अपराधाबद्दल सांगून त्या झग्यांत गुंडाळलेल्या दोन मनुष्यांकडे बोट करून तो म्हणाला कीं, हे उद्यां बोलोग्नामध्यें पुढाऱ्यांच्या विरुद्ध निंदा करणाऱ्या एका सभासदास ठार मारण्याकरितां जाणार आहेत. कारण, संस्थेचा असा प्रघात आहे कीं, कोणी तिच्या सत्तेविरुद्ध बंड करण्यास आरंभ केला कीं तत्क्षणीं त्याचा नायनाट करावयाचा. मी त्या संस्थेविरुद्ध ज्या तक्रारी केल्या होत्या व ज्या कोणातरी फाजील कळकळीच्या सभासदानें त्यांना जाऊन कळविल्या असाव्या, त्यांना अनुलक्षून हें उत्तर मिळालें. त्या मूर्खपणाच्या धमकाविण्यानें माझ्या अंगाचा कसा तिळपापड झाला हें मला अजून स्मरत आहे. संतापाच्या पहिल्या भरांत मी टस्कनीस जात नाहीं म्हणून निरोप धाडिला. व याबद्दल संस्थेनें माझें काय करतां येईल तें करून घ्यावें असें कळविलें.

परंतु मी थोडासा शांत झाल्यावर माझ्या मित्रांनीं जरा कान उघाडणी केली कीं, अशा रीतीनें मी माझ्या व्यक्तीच्या अपमानासाठीं नकळत देशकार्याला बळी देत आहें. माझें मन बदललें व माझ्या कुटुंबाचे खात्रीसाठीं एक पत्र देऊन मीं टस्कनीकडे जावयास निघालों.

लेगहॉर्नला गेल्यावर मी एक शाखा उघडली व पुष्कळ टस्कनीचे लोक व कांहीं इतर प्रांतांतील लोक यांना वळविलें. यांमध्येंच ऑस्ट्रियापासून बोलोग्नाचें संरक्षण करतां करतां रणांगणांत धारातीर्थी पडलेला मार्लियानी हाही होता. बाकीचें काम मी कार्लोविनीया या तरुणाकडे सोपविलें. त्याची

पवित्र व उदात्त वर्तणूक शेवटपर्यंत कायम होती. त्याची बुद्धि विलक्षण होती. परंतु ती व्यापारांत गुंतल्यामुळें तिचा विकास झाला नाहीं व तत्त्वांबद्दल जरी त्यास कांहीं एक शंका नव्हती. तथापि त्याच्या समकालीन असणारे लोक व स्थिति याबद्दलच्या संशयी वृत्तीनें सुस्तपणा वाढत गेला व फक्त क्वचित् प्रसंगींच त्या बुद्धीचा प्रभाव दिसून आला. अपूर्व नीतिमत्ता व विलक्षण स्वार्थत्याग हे त्याचे नैसर्गिक सद्‌गुण होते. माझ्याशीं बोलत असतां कारबोनारिझममधल्या विधिनिषेधांच्याबद्दल तो तिरस्कार व्यक्त करीत असे. परंतु मजप्रमाणें त्याचेंही असेंच मत होतें कीं, कार्याला यश येण्यासाठीं सर्वांचें, या नाहीं त्या, पण कोणत्या तरी व्यवस्थित स्वरूपानें एकीकरण करणें हें अत्यंत महत्वाचें होतें. तो व मी मिळून मान्टेयल शिआमो येथें गेलों. या ठिकाणीं ग्युएराझी कैदेंत होता. या देशभक्तानें कासिमो नांवाच्या एका इटालियन शूर शिपायाच्या स्तुतिपर कांहीं कविता केल्या होत्या, म्हणून या अपराधाबद्दल त्यास कैदेंत टाकण्यांत आलें होतें. आपणांस आपल्या प्रस्तुत स्त्रैण्याचा तिटकारा जेणेंकरून येईल असा कोणचाही प्रयत्न झाला असतां त्या वेळच्या त्या भिकारड्या सरकाराला किती धास्ती पडत असे हें यावरून दिसून येईल. जर इतिहासच नष्ट करण्याची त्यांच्यांत ताकद असती तर त्यांनीं तसें देखील केलें असतें.

मी ग्युएराझीची नंतर गांठ घेतली. त्यानें आपल्या एका अपूर्ण ग्रंथांचे पूर्व भाग आम्हांस वाचून दाखविले. त्या वेळेस वाचतां वाचतां अवसानानें त्याचें तोंड लाल पडलें व त्यानें गार वाटण्यासाठीं डोक्यावर गार पाणी ओतलें. त्याला स्वतःबद्दल फारच अभिमान होता. परंतु त्याच्या स्वदेशाबद्दलही त्याला अतिशय कळकळ वाटे, त्याला स्वदेशाच्या भूतकालीन थोरवीबद्दल व भविष्यकालींही इटली देशाचें भाग्य वर येणार याबद्दल फारच अभिमान व आनंद होत असे.

ग्युएराझी त्याच्या त्या अत्युत्तम व इटलीच्या प्रत्येक तरुणाच्या तोंडपाठ असलेल्या लेखाचा वरील भाग वाचीत असतां कार्लोविनीचें हृदय उचंबळून आलें व तो एखाद्या आईनें बघावें तसें त्या ग्रंथकाराचे तोंडाकडे बघत बसला. त्याच्या दुःखाबद्दल विचार करण्यांत गढून गेला. कार्लोविनीच्या दृष्टींत चकाकणाऱ्या या प्रेमळपणाची छटा ग्युएराझीमध्यें मला आढळली नाहीं.

त्यावेळीं ग्यूझाट व कूसिन यांची तत्वज्ञानविषयक लेखमाला मधून मधून

प्रसिद्ध होत होती. या लेखांत नवीन प्रसृत होत असलेल्या प्रगतितत्वाचा अनुवाद केलेला असे. हें जगाच्या प्रगमनाचें तत्व मी डँटेच्या " डेलामानर्किया " या पुस्तकांतून शिकलों होतों. हा प्रगमनाचा–हा जगाच्या उत्क्रांतीचा–नियम परमेश्वरानें प्राणिमात्रांसाठीं घालून दिला आहे. तो नियम नीट समजावून घेऊन त्याप्रमाणें वर्तन घडत गेल्यास आज नाहीं उद्यां पण तो विभवशाली भविष्यकाल प्राप्त झालाच पाहिजे. या मुद्यावर मी ग्यूएराझीशीं संवाद केला. व त्या लेखमालेबद्दल फारच उल्हासानें मनापासून स्तुति केली.

ग्युएराझी किंचित् हंसला. त्या हंसण्यांत कांहींसें दुःख व कांहींशीं खोंच ही गर्भित होती व त्या अधिकारी बुद्धीवर पुढें जे प्रसंग यावयाचे होते ते मला तेव्हांच कळल्यानें कीं काय, त्या हसण्यानें मला फार वाईट वाटलें. तें इतकें कीं, मी ज्या कामाकरितां म्हणून आलों होतों तें मुख्य काम कार्लोविनी याजकडे सोंपवून मी ताबडतोब तेथून परत फिरलों. तथापि त्याच्या अंगीं सुदैवानें असलेलें थोर सामर्थ्य व त्याचें महानुभावत्व याबद्दल मी फार प्रशंसा केली. व त्याचा तो स्वाभिमान हा भविष्यकालीं त्याचे हातून नीच कृत्यें घडणार नाहींत, अशी मला हमी देऊं लागला. त्यावेळेस आमचा बराच स्नेह जुळला. तो पुढें मोडावयाचा होता, तथापि माझ्या दोषानें नव्हे.

मी जिनोआला परत आलों तों संस्थेंत मोठमोठ्या अधिकाऱ्यांमध्यें बराच बेबनाव झाल्याचें मला आढळून आलें. डोरियाला माझ्या कामगिरीची हकीकत मी कळवूं नये असें ठरलें होतें व लवकरच त्यानें कांहीं दिवस शहर सोडावें अशी शिक्षा, कोठच्या अपराधाबद्दल कोण जाणे त्याला देण्यांत आली. पुढें एके दिवशीं मी माझ्या आईला भेटण्यासाठीं नजीकच्या एका खेड्याकडे चाललों असतांना डोरिया मला भेटला. तो तेथें इतक्या सकाळीं कोठून आला हें मला सांगतां येत नाहीं, परंतु तो संतापानें कार्बोनारी, त्यांचे व्रेत व ती नवीन घेतलेली मंडळी यांना हात दाखविण्याचा निश्चय करीत होता.

१८३० मध्यें फ्रेंच लोकांनीं उठावणी केली. आमचे पुढारी थोडीशीं हालचाल करूं लागले, परंतु उद्दिष्ट असें कांहींच ठरलें नव्हतें. कारण त्यांना लुई फिलीपकडून स्वातंत्र्य मिळणार होतें.

आम्ही सर्व तरुण लोकांनीं गोळ्या तयार करण्यास प्रारंभ केला. आमच्या कल्पनेप्रमाणें लवकरच लढाई होणार व तींत कायमचा निकाल लागणार

असें ठरून त्या आनंदाच्या भरांत आम्ही सर्व सिद्धता करूं लागलों.

नक्की दिवस मला आठवत नाहीं, परंतु पारिस मधले ते प्रख्यात तीन दिवस उलटल्यानंतर लवकरच मला एक हुकूम आला कीं, एका खाणावळींत एका ठरलेल्या वेळीं मीं जावें. तेथें मेजर कॉटिन नांवाचा मनुष्य मला भेटेल. त्याला कारबोनारीच्या पहिल्या वर्गांत पूर्वींच घेतलेलें होतें, मी त्याला दुसऱ्या वर्गाची दीक्षा द्यावी.

आमचे पुढारी आम्हां तरुण लोकांस निर्जीव यंत्राप्रमाणें वागवीत असत. या मेजर कॉटिनच्या ओळखीचा एखादा मनुष्य नेमण्याचे ऐवजीं माझीच नेमणूक कां केली हें विचारणें व्यर्थ होतें. म्हणून मी मुकाट्यानें ती कामगिरी पत्करली. परंतु जाण्यापूर्वीं, कोणत्या स्फूर्तीमुळें असेल तें असो, परंतु मी रफिनी बंधुद्वयाबरोबर गुप्त पत्रव्यवहार करण्याची एक व्यवस्था ठरवून ठेविली. माझ्या आईशीं यांचा दाट परिचय होता म्हणून घरच्या पत्रांतच मी त्यांना त्या ठरलेल्या रीतीनें क्वचित् तुरुंगांत पडावें लागलें तर हकीकत कळवावी असें ठरलें होतें. व या दूरदृष्टीचा पुढें फार उपयोग झाला.

ठरलेल्या वेळीं मी त्या खानावळींत गेलों. त्या वसतिगृहांतील एका खोलींत मी पॅसानोला पाहिलें. परंतु त्यानें मला ओळखलें न ओळखलें असें केलें. मीं कॉटिन कोठें आहे म्हणून विचारिलें. तो मला दाखविला गेला. लहानसा बांधा, चंचलदृष्टी; त्याला पाहून मला फारसें बरें वाटलें नाहीं. ठरलेला पोषाख त्याचे अंगावर नव्हता. तो फ्रेंच बोलत होता. नेहमीच्या खुणांनीं मी तुझा सख्खा बंधु आहे असें त्यास जाणवून, माझ्या भेटीचा उद्देश आपण जाणतच असाल असें म्हटलें.

नंतर त्यानें मला आपले खोलींत नेलें व तो गुडघे टेंकून मजपुढें उभा राहिला. मी माझ्या हातांतील काठींतून तरवार उपसली. व रीतीप्रमाणें त्याला शपथ सांगणार तों त्याच्या खोलीच्या भिंतीला असलेली एक लहानशी खिडकी धाडकन उघडली गेली व एक अपरिचित मनुष्य तेथें येऊन उभा राहिला.

कॉटिन मला म्हणाला, "आपण बुचकळ्यांत पडण्याचें कांहीं एक कारण नाहीं. तो माझा अत्यंत विश्वासू नोकर आहे. मी ही खिडकी लावावयास विसरलों याची मला माफी करावी." मी त्याला दीक्षा दिली. तो मला सांगूं लागला कीं, "थोडक्या दिवसांत मी नाइस येथें गेल्यानंतर लष्करी लोकां-

मध्यें पुष्कळ काम करितां येईल. परंतु माझी स्मरणशक्ति चांगली नसल्यानें शपथेचा मसुदा जर आपण लिहून दिला तर फार बरें होईल." "मी अशा गोष्टी कधींही लिहून देत नसतों. परंतु मी सांगतों तसें पाहिजे असल्यास तुम्ही लिहून घ्यावें." असें मीं उत्तर दिलें.

मी त्याला शपथ सांगत गेलों व त्यानें ती उतरून घेतली. तथापि हा एकंदर प्रकार चांगला झाला नाहीं असें मनांत म्हणत म्हणत मी परत जावयास निघालों.

तो अपरिचित मनुष्य, मला मागाहून कळलें कीं, एक गुप्त पोलीस होता. थोडेच दिवसांत मी पकडलों गेलों.

ज्या वेळेस मी पकडलों गेलों त्या वेळेस मी घरांतून नुकताच बाहेर पडत होतों व मजजवळ तीन प्रकारचे आरोप ठेवितां येतील इतकें सामान होतें. रायफलच्या गोळया, कॉलोंविनी याचें आंकड्यांत लिहिलेलें पत्र, जुलईच्या तीन दिवसांची छापलेली बखर, कारबोनारीच्या दुसऱ्या वर्गाच्या शपथेचा मसुदा व हातांत असलेली तरवारीची काठी. परंतु त्या सर्व गोष्टी नाहींशा करण्यांत मला यश आलें. त्या पोलिसांना जुलुम करण्याची जरी इच्छा होती तरी अक्कल बिलकूल नव्हती. आमच्या घराचा बारीक झाडा घेतला असतांही भयंकर असें कांहींच सांपडलें नाहीं.

त्या पोलीसानें मला त्यांच्या बराकींत नेलें. तेथें एका म्हाताऱ्याशा कमिशनरानें चवकशीस आरंभ केला. त्यानें मला सर्व प्रकारचे शेंकडो प्रश्न विचारले. माझी खुषीनें परीक्षा करण्याचा प्रयत्न केला. अखेर माझ्या शांतपणानें त्रासून जाऊन व संतापून माझ्या गौप्याचा आधींच स्फोट झालेला आहे असें कळवून मला भिवविण्याचा प्रयत्न करण्यासाठीं त्यानें मला सांगितलें कीं, मीं अमक्या दिवशीं अमक्या ठिकाणीं मेजर कॉटिन याला कारबोनारी मंडळीची दुसऱ्या वर्गाची दीक्षा दिली.

हें ऐकतांच मला किंचित् थरारल्यासारखें झालें, परंतु तें दाबून टाकून मी जोरानें उत्तर केलें कीं, रचलेल्या कुभांडाला खोडीत तें काय बसावें! हा मेजर कॉटिन कोण आहे तो त्यांनीं मजसमोर आणावा. मेजर कॉटिनला मजसमोर केव्हांही आणलें नाहीं. कारण विश्वासघाताचें तें कृत्य करण्याचा ठराव करतेवेळींच त्यांनीं असें ठरविलें होतें कीं, चौकशीचे वेळीं त्याला पुढें आणूं नये.

पुढें मी कांहीं दिवस त्या बराकींतच काढले. तेथील शिपायांच्या शिव्यांचा व चेष्टांचा मारा आमच्यावर एकसारखा चालला होता. त्यांच्यापैकीं ज्यानें अतिशय वाचलें होतें त्यानें मला जाकोपोची नवीन आवृत्ति म्हणून दाखवीत फिरावें ! मला माझ्या मित्रांशीं पत्रव्यवहार करण्याची एक विलक्षण संधि आली. घरून येणाऱ्या अन्नांत, जेवीत असतां मला एक लहानशी शिसपेन्सिल सांपडली. या शिसपेन्सिलीनें माझ्या कपड्यांवर लिहावें व ते धुण्यास घरीं पाठवून द्यावें, अशा साधनानेंच मी टस्कनीच्या आमच्या संस्थाबंधूंस घातक असे कांहीं कागद नष्ट करण्याचें माझे मित्रांस कळविलें. मला नंतर कळलें कीं, मला पकडलें त्याच वेळेला आणखी बऱ्याच जणांना पकडलें होतें. परंतु त्यांत मी दीक्षा दिल्यापैकीं कोणीही नव्हतें.

माझे वडील जिनोआच्या युनिव्हर्सिटीमध्यें शारीरिक शास्त्राचे प्रोफेसर होते. ते त्या शहरच्या गव्हर्नराकडे जाऊन मला पकडण्याचें कारण विचारूं लागले असतां, त्यांना असें सांगण्यांत आलें कीं, तुमच्या मुलाला रात्रीं बेरात्रीं दुःखाचे विचारांत गढून जाऊन शहराच्या आजूबाजूनें एकटें फिरण्याची फार चटक लागली आहे. खरें पाहतां या वयामध्यें इतका विचार तो कसला करावयाचा आहे ? वयानें तरुण व आम्हांस ठाऊक नसलेल्या विषयाबद्दलच्या विचारांत निमग्न असणारे असे लोक आम्हाला बिलकूल आवडत नाहींत.

एके दिवशीं रात्रीं कांहीं शिपायांनीं मला एकदम जागें केलें व झटकन उठून त्यांच्या मागोमाग चालावयास सांगितलें. प्रथम मला वाटलें कीं, पुन्हां एखादी चौकशी करण्यासाठीं हे मला नेत असतील; पण जेव्हां त्यांनीं मला आपला अंगरखा वगैरे घ्यावयास सांगितलें तेव्हां मला कळून आलें कीं, मला बराकींतून काढून दुसरीकडे नेत आहेत. मीं त्यांना मला कोठें नेतां म्हणून विचारलें. परंतु आम्हांला तें सांगण्याची परवानगी नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. मला माझ्या आईची धास्ती पडली. मी येथून एकाएकी नाहींसा झालों हें जर दुसऱ्या दिवशीं तिला कळलें तर तिला भलतीच शंका आल्याशिवाय रहाणार नाहीं. मी शेवटीं त्यांना स्पष्ट सांगितलें कीं, माझ्या घरीं पत्र धाडण्याची परवानगी मिळाल्याशिवाय मी एक पाऊल टाकणार नाहीं. बळजबरीनेंच नेऊं लागलात तर नाइलाज आहे. हो ना करितां करितां त्यांच्या अधिकाऱ्याशीं बरेंच खलबत होऊन त्यांनीं परवानगी दिली.

मी आईला पत्रांत लिहून कळविलें कीं, बराक सोडली आहे. तथापि भीति

वाटूं देण्याचें कांहीं एक प्रयोजन नाहीं. मग मी त्यांच्यामागें गेलों. दाराशीं पोंचतांच मला नेण्यासाठीं एक पेटीसारखें वाहन केलेलें होतें. मी त्यांत बसतांच तें बाजूनें बंद करण्यांत आलें. थोड्या अंतरावर येतांच आम्ही थांबलों तों घोड्यांचा आवाज ऐकूं आला. मी तेव्हांच ताडिलें कीं, पुष्कळ लांब प्रवास करावा लागणार. इतक्यांत माझ्या वडिलांनीं मला धीर देण्यासाठीं उच्चारलेले शब्द मीं ओळखले.

त्यांना माझ्या या प्रवासाची बातमी कशी लागली हें मला कळेना. ती जागा कोणची होती किंवा ती वेळ कोणची होती हेंही मला माहीत नव्हतें. परंतु त्या अधिकाऱ्यांचें तें पशुतुल्य रानटी वर्तमान मला अजून आठवत आहे. त्यांनीं माझ्या वडिलांना हुसकून देण्याचा प्रयत्न केला. मला त्या पेटींतून त्या गाडींत झटकन ढकलून देऊन माझ्या बापाचा हात प्रेमानें दाबण्याची देखील संधी त्यांनीं मिळूं दिली नाहीं. तो पिसाळल्यासारखा शेजारीं उभा राहिलेला बुवा कोण आहे हें ओळखण्यास त्याचे अंगावर धांवून गेले. हा बुवा अगॉस्टिनो रफिनी हा होय. या रफिनी कुटुंबावर मी सख्या भावाप्रमाणें प्रेम करीत असें. अगॉस्टिनो हा अक्षय्य कीर्तीला मागें ठेऊन कांहीं वर्षांपूर्वी मरण पावला. त्याची कीर्ति ही फक्त इटालियन लोकांतच आहे असें नाहीं. हद्दपार झाल्यानंतर स्कॉटलंडमध्यें असतां दिसून आलेल्या त्याच्या सद्गुणी स्वभावाची, त्याच्या बुद्धिगांभीर्याची व निष्कलंक इमानीपणाची स्तुति स्कॉच लोक अजूनही करीत आहेत. अगॉस्टिनो रफिनी चिरूट ओढीत लांब उभा राहिला व मला तेथून मानेनेंच निरोप देता झाला.

सेन्ट अन्ड्रियाच्या तुरुंगाजवळ आतां आम्हीं आलों. तेथें येतांच डोळ्या-शिवाय सर्व अंग गुंडाळून घेतलेला एक मनुष्य आमचे गाडींत कोंबण्यांत आला. मागोमाग हातांत एकेक बंदुक घेऊन दोन शिपाई आंत चढून बसले. तो पहिला मनुष्य कैदी असून पॅसानोच होता व त्या दोन शिपायां-पैकीं एकजण तो वसतिगृहांतील अपरिचित हेर होता. आम्हांला लगेच सॅव्होनाच्या किल्ल्याकडे नेलें. माझें जाणें हें एकाएकीं घडल्यामुळें मजसाठीं तुरुंगांतील खोली राखलेली नव्हती. एका अत्यंत अंधःकारप्रचुर मार्गांतच मला बसविलें. नंतर एक ७०।७२ वर्षांचा वृद्ध पुरुष, तेथील गव्हर्नर, मजकडे आला. खुनी व अपराधी मंडळयांत व सभेंत मीं शेंकडों रात्री व्यर्थ

खर्च केल्या वगैरे विषयावर एक लांबलचक व्याख्यान देऊन त्या किल्ल्यांत मला फार शांतता अनुभवावयास मिळेल असें त्यानें सांगितलें. जातां जातां मी त्याला एका सिगारेटच्या तुकड्याबद्दल विचारलें असतां तो म्हणाला, "सिगारेट देण्याची परवानगी आहे कीं नाहीं, हें मी जिनोआच्या अधिकाऱ्यास लिहून विचारतों." या शेवटच्या लहानशा गोष्टीनें, तो तेथून जातांच, माझ्या डोळ्यांत अश्रु आणले ! मी तुरुंगांत पडल्यापासून हे माझे पहिलेच अश्रु होते ! मी ज्यांचा अत्यंत तिरस्कार करतों त्या नीचांचेच हातीं मी पूर्ण रीतीनें सांपडलों याबद्दलच्या त्वेषाचे ते अश्रु होते !

एका तासानंतर मला माझ्या कोंडवाड्यांत नेण्यांत आलें. त्या किल्ल्याच्या सर्वांत वरच्या मजल्यावर ती खोली होती. तेथून समुद्र दिसत होता. व तेवढें माझ्या मनाला समाधान वाटत होतें. तो समुद्र व तें आकाश ! आल्पस खेरीज करून अनंततेचीं तीं मूर्तिमंत स्वरूपें ! जगांतील उदात्ततम वस्तु ! जेव्हां जेव्हां मी त्या लहानशा गजाच्या खिडकीकडे वळे तेव्हां तेव्हां त्या मजसमोर असत. खालील भूमीवर माझी दृष्टि पोंचत नसे. परंतु वारा माझ्या दिशेकडे वाहूं लागला म्हणजे मात्र मच्छी लोकांचे कांहीं शब्द मला ऐकूं येत.

पहिल्या महिन्यांत मला कोणचेंही पुस्तक मिळालें नाहीं. परंतु माझ्या सुदैवानें पहिला गव्हर्नर बदलून दुसरा जो आला त्यानें मला बायरन, टॅसिटस व बायबल हीं तीन पुस्तकें दिलीं. त्या तुरुंगांतही मला एक स्नेही मिळाला होता. अल्लड व लडिवाळ स्वभावाचा एक लहानसा पक्षी नेहमीं माझ्या खोलींत येई. माझें त्याच्यावर विलक्षण प्रेम होतें. मनुष्यें अशीं म्हटलीं म्हणजे, माझा कनवाळू तुरुंगवाला, दिवसाचा पहारेकरी, जो दिवसांतून फक्त एकदां कैदी ठीक आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं डोकावून जात असे तो, व मला ताट वाढून आणणारी एक म्हातारी बाई, इतकींच कायतीं. तो तुरुंगावरचा अधिकारी मला रोज मोठ्या गंभीरपणानें विचारीत असे, "कांहीं हुकूम आहे काय ?" मीही त्याला उत्तर रोज देत असें, "होय, जिनोआस जावयास गाडी पाहिजे !"

फान्टोना, तुरुंगावरील नवीन अधिकारी, ह्याच्यांत इटालियनांचें पाणी मुळींच नव्हतें असें नाहीं. परंतु त्याची खात्री झाली होती कीं, कारबोनारी मंडळीचा उद्देश लुटालूट, धर्मच्छेद, भररस्त्यांतून खून करणें, वगैरे शिवाय दुसरा कांहीं एक नव्हता व माझ्यासारख्या तरुणाचे हातून अशा चुका

घडाव्या याबद्दल हळहळ वाटून त्यानें त्याच्या हुकुमाबाहेर जाऊनही मला सन्मार्गाकडे आणण्यासाठीं स्वतःचें घरीं कॉफी पिण्यास बोलावीत असावें.

मध्यंतरीं जिनोआ मधल्या माझे मित्रांचे साह्यानें मीं कारबोनारी मंडळींत नवीन तेज आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. दर दहा दिवसांनीं माझ्या आईचें पत्र मला मिळत असे. तें अर्थातच उघडें असून अधिकाऱ्यांनीं तपासलेलें असे. या पत्राचें उत्तर मीं अधिकाऱ्यांसमक्ष लिहावें व तें पत्र बंद न करितां त्यांचे हातीं द्यावें असा प्रघात असे. परंतु त्यांच्या या सर्व बंदोबस्तांतूनही माझ्या मित्राशीं पूर्वींच ठरवून ठेविलेल्या गुप्त रीतीनें पत्रव्यवहार करण्यास कांहीं एक अडचण पडत नसे. ती रीत अशी कीं, पत्रांत जीं वाक्यें लिहावयाचीं तीं अशा रीतीनें रचलेलीं असत कीं, एक टाकून एका शब्दाचें आद्याक्षर घेत गेलें कीं, मुख्य मुद्याचा मजकूर लिहिला जावा. त्यांतही विशेष सावधगिरी अशी होती कीं, तीं आद्याक्षरें मिळवून झालेलीं वाक्यें हीं लॅटिन भाषेंतील असत. माझ्या आईकडून येणाऱ्या पहिल्या ओळी या कारणासाठींच माझ्या मित्रांनीं लिहिलेल्या असत. माझे उत्तरांत लिहिण्यासाठीं वाक्यांची जुळणी करून तीं पाठ करण्यास मला मुबलक वेळ असे.

या रीतीनें मी माझ्या मित्रांना दिशा दाखविण्याची युक्ति शोधून काढिली. माझ्या ओळखीच्या अशा पुष्कळ कारबोनारी मंडळींच्या गांठी घेण्याची मीं त्यांना विनंति केली. परंतु त्या मंडळीं पैकीं बहुतेक जण भयानें गांगरून गेल्यानें माझ्या मित्रांच्या गांठी घ्यावयास किंवा त्यांचें म्हणणें ऐकावयास धजत नव्हते. त्यावर खुबीनें मला पॉलिश लोकांच्या उठावणीची बातमी कळली. ही बातमी कळतांच तरुणपणांतील उच्छृंखल वृत्तीनें मी तुरुंगावरील त्या गव्हर्नराकडे जाऊन, त्यानें मला नुकेंच युरोपांत शांतता आहे म्हणून जें सांगितलें, तें खोटें पाडण्यासाठीं त्याला ती बातमी कळविली. आमच्या अंगांत कांहीं तरी भूतचेष्टांची शक्ति आहे अशी त्याची खात्री झाली असावी.

या प्रसंगांत कारबोनारी संस्थेनें दाखविलेला मूर्ख भ्याडपणा; त्या मंडळीला विश्वास किंवा निष्ठा यांचा गंधही नसल्यानें त्यांचा अपरिहार्य परिणाम काय होणार याचें पुष्कळ विचारांतीं मीं ठरविलेलें निदान; व शिवाय मी एकदां तुरुंगांतील बोळकुंडींत पिसानोला भेटून हलकेंच "माझ्यापाशीं पत्रव्यवहाराचीं साधनें आहेत. आपण पाहिजे तर नांवें सांगावीं." असें म्हणतांच त्यानें माझ्या डोक्यावर हात ठेऊन, कोणचा कोण जाणें, एक थोर

अधिकार व अगदीं वरिष्ठ दर्जाची दीक्षा हीं अर्पण करण्यांत केलेला हास्यास्पद प्रकार; या सर्व गोष्टींनीं माझी खात्री झाली कीं, आपल्यास कांहीं महिन्यापूर्वीं वाटलें होतें तेंच सत्य आहे. कारबोनारीझम् ही मृत संस्था आहे. व एखाद्या मढ्यामध्यें पुन्हां चैतन्य भरविण्याच्या प्रयत्नांत काल व शक्ति व्यर्थ खर्चण्यापेक्षां जर आपण स्वतःच जिवंत माणसांना संबोधूं लागलों व नवीन इमारत उभारण्याचा प्रयत्न करूं लागलों तर फार बरें होणार आहे.

व म्हणून या कैदेमधल्या दिवसांतच मी " तरुण इटली "च्या संभवाचा विचार केला. त्या पंथाची रचना कोणत्या तत्वांवर करावी, त्याच्या सर्व श्रमाचें प्रयोजन काय असावें, उद्दिष्ट काय असावें, तें स्पष्टरीत्या प्रसिद्ध करण्याचें मी ठरविलें होतें. त्याची रचनापद्धति कशी असावी; त्याच्या उभारणीसाठीं कोणत्या व्यक्तींची मदत घ्यावी; व यूरोपमधील प्रस्तुत कालीं अस्तित्वांत असलेल्या क्रांतिकारक पक्षाशीं संगनमत करण्याची शक्यता आहे कीं नाहीं; या सर्व गोष्टींचा मी खोल रीतीनें विचार करूं लागलों.

आमची संस्था थोडी; वय तरुण; पैशाचें बळ नाहीं; लोकांत मोठेसें वजन नाहीं; अशी परिस्थिति होती. परंतु माझ्या मतानें मुख्य काम म्हटलें म्हणजे इटलीच्या मनोविकारांना व मनोवृत्तींना जागृत करणें हें होतें. इटलीचें अंतःकरण त्या वेळेस जरी स्तब्ध होतें तथापि इतिहासानें व भविष्याचे आकलनानें त्या अंतःकरणाच्या वृत्ती सहज दृग्गोचर होणाऱ्या होत्या. त्या मनोवृत्तींचें व मनोविकारांचें बरोबर ज्ञान करून घेण्यांतच आमचें सर्व सामर्थ्य होतें.

सर्व मोठमोठीं राष्ट्रकार्यें हीं लोकपक्षाच्या पुढाऱ्यांकडूनच आरंभिलेलीं आहेत. त्या पुढाऱ्यांचें सर्व सामर्थ्य त्यांच्या इच्छाशक्तींत व निष्ठाशक्तींत असतें. या शक्ति अडचणीला भीक घालीत नाहींत किंवा दिवस मोजीत स्वस्थ बसत नाहींत. श्रीमान व वजनदार लोक हे नेहमीं मागाहून मिळतात व लोकपक्षांनीं आरंभिलेल्या कार्यास मदत करण्यासाठीं, तें पुढें ढकलण्यासाठीं, किंवा बहुधा घडतें त्याप्रमाणें त्या कार्याला मुख्य उद्देश सोडून भलतीकडेच नेण्यासाठीं प्रयत्न सुरू करतात.

इतिहासाच्या व समाजरचनेच्या गूढ अभ्यासानें राष्ट्रैक्य व लोकसत्ता (Unity, Republic) हीं दोन महत्तत्वें आमच्या पंथाचीं लक्ष्य असावीं असें अखेर निश्चित करण्यास मी विचारसरणी कशी कशी योजीत गेलों हें

६०३३

सांगण्याची येथें कांहीं जरूरी नाहीं. या माझ्या लेखमालेंत प्रसिद्ध झालेले बहुतेक हे लेख त्याच विषयावर लिहिलेले आहेत.

तथापि, मीं इतकें सांगतों कीं माझ्या मनांत फक्त राजकीय विचारच काय तो होता, किंवा छिन्नविच्छिन्न केलेल्या, नीचतेला पोंचविलेल्या व जुलमाखालीं चिरडलेल्या अशा एकच देशाला वर आणण्यासाठीं मी धडपडत होतों, असें नाहीं. माझ्या सर्व बेताचे मुळाशीं एकच विचार असे. तो हा कीं, एकदां माझा इटाली देश स्वतंत्र झाला कीं सर्व युरोपांत नवीन ऐक्य व नवीन चैतन्य उत्पन्न करण्यास आरंभ केल्याशिवाय स्वस्थ बसावयाचें नाहीं.

हें ऐक्य व हें चैतन्य उत्पन्न करण्यास काय अधिकार असावा लागतो वगैरेबद्दलचे माझे विचार व तो अधिकार इटालीकडे कसा येतो, याचें स्पष्टीकरण करण्याबद्दलची माझी इच्छा अजून अपुरी राहिली आहे. व जर माझी प्रिय भूमी, माझा इटाली देश, माझ्या डोळ्यांदेखत स्वतंत्र व एक झाला व त्या माझ्या हक्काच्या देशांतील कोणत्याही एका कोपऱ्यांत एकांतवासामध्यें एक वर्ष खर्च करतां आलें तर मी या महत्वाच्या विषयावरील माझे विचार ग्रथित करीन.

त्या वेळेस या विचाराचे अस्पष्ट स्वरूपानें ही माझ्या अंतःकरणांत आशेचा पूर्ण संचार झाला. माझ्या समोर ती आशा एखाद्या ताऱ्याप्रमाणें चमकूं लागली. मला पुनरुज्जीवित इटाली देश मूर्तिमंत दिसूं लागला. व भूतकाळीं मानवी समाजाला दिलेल्या धर्मबोधाहूनही अत्यंत उदात्त व महत्तर अशा प्रगमनात्मक व बंधुत्वात्मक धर्मोपदेशाचे शब्द मला ऐकूं येऊं लागले.

रोम ! रोमची पूजा ! रोम माझ्या जिवाचा कलिजा होतें ! जगाला सन्मार्गाकडे नेण्याचें महद्भाग्य रोम शिवाय दोनदां कोणाच्या नशिबीं आलेलें आहे ! त्या रोममध्यें जीवित अमर आहे ! त्या रोममध्यें मृत्यूला कोणी विचारीत नाहीं ! स्वतंत्रतेची वल्ली व नैसर्गिक हक्कांची औषधी सर्व जगावर पसरविण्यासाठीं रोमचा गरुडपक्षी (रोमच्या झेंड्यावर गरुडाचें चित्र असे) ज्ञात तितक्या जगद्भागांच्या मर्यादा अतिक्रांत करून आला. पुन्हां एकदां रोम जिवंत व्यक्तीचें धडगें आहे असें सर्वत्र वाटूं लागलें असतांना रोम खडबडून जागें झालें, व पोपला पुढें करून ऐक्याचीं व कर्तव्याचीं तत्वें जगभर प्रसृत करतें झालें. पहिलें सीझरचें रोम होतें व दुसरें पोपचें रोम होतें. तर मग नवीन रोम—जिचा उदय मला दिसूं लागत होता त्या लोकसत्तेचें

रोम—पुन्हां एकदां तिसरें व अत्यंत महत्तम असें जगदैक्य करण्यास कशावरून पुढें येणार नाहीं ? पृथ्वीची व स्वर्गाची, हक्काची व कर्तव्याची, एकतानता करण्यास; व्यक्तींना नव्हे, लोकांना एकजीवित्वाचा महामंत्र शिकविण्यास, स्वतंत्र व समान मानवी जातीला या आयुष्यांतील कामगिरींचें ज्ञान देण्यास, रोमनें पुढें आलेंच पाहिजे !

सॅव्होना येथील तुरुंगांतील कोठडीमध्यें असतांना तेथील अधिकाऱ्याचे सायंकालचे प्रश्न व फॉन्टेनाचे मला वळविण्याचे प्रयत्न या मधल्या वेळांत माझे सर्व विचार असे असत. व आतां त्या तुरुंगांतील कोठडीप्रमाणेंच लहानशा खोलींमध्यें बसून मी हा लेख लिहीत असतांनाहीं जास्त साधारण व जास्त प्रमाणावर तेच विचार कायम आहेत. माझ्या सर्व आयुष्यभर त्या विचारांच्यामुळें मला भ्रमिष्ट व मनोराज्यवादी म्हटलें गेलें आहे व हे आरोप इतक्या जुलमानें व तीव्रतेनें लादले गेले आहेत कीं, अशा वेळेला दुःखानें जोंपर्यंत व्यक्तिविषयक आयुष्याची लालसा माझ्यामध्यें कायम होती तोंपर्यंत—त्या सॅव्होनाच्या कोठडीकडे-वर आकाश व खालीं समुद्र पसरलेला आहे व जेथें मनुष्यांचा वाराही येत नाहीं अशा त्या कोठडीकडे—हें माझें मन धांव घेऊं लागे.

**माझे विचार ही स्वप्न सृष्टि होती कीं तो भविष्यवाद होता हें आगामी काल निश्चित करील.** त्या वेळेस या विचारांचा तात्कालिक परिणाम असा झाला कीं, आपण जें कार्य हातीं घ्यावयाचें तें फक्त राजकीय असूनच भागावयाचें नाहीं. तें राजकीय तर असलेंच पाहिजे, पण त्याला नीतिमत्तेचा पाठिंबा पाहिजे आहे. तें नुसतें विनाशकारक नसलें पाहिजे, तर त्याला धर्मबलाचा आधार पाहिजे. तें आपस्वार्थीपणावर रचलें गेलेलें नसून विशिष्ट तत्वांवर व कर्तव्यावरच त्याची उभारणी केली पाहिजे.

माझ्या युनिव्हर्सिटीमधील काळांत पहिल्यानें परक्यांच्या द्रव्यवादित्वाचा पगडा माझे मनावर बसला होता. परंतु इतिहासाच्या अभ्यासानें व विवेकबुद्धीच्या स्फूर्तीनें-सत्याचीं हींच दोन लक्षणें आहेत—आपल्या पूर्वजांच्या आत्मविचाराकडे माझी पुन्हा प्रवृत्ति झाली.

माझ्या चौकशीचें काम ट्यूरिनच्या सीनेटर्सकडे सोंपविलें होतें. मेजर कॉटिन—ज्याला मी दीक्षा दिली होती—त्याच्याशीं चौकशी करण्यांत त्याला पुढें न आणण्याचा करार केला असल्याचें मी पूर्वीच लिहिलें आहे. तेव्हां

माझेविरुद्ध साक्ष द्यावयास त्या खोलींत एकदम आलेला अपरिचित हेर हाच काय तो उरला, त्यानें मी तरवार उपसून त्या खोलींत उभा होतों हें पाहिल्याची साक्ष दिली. उलटपक्षीं मी तें साफ नाकारिलें. अशा स्थितींत कांहींच ठरविणें शक्य नसल्यानें मला सोडून देणेंच भाग होतें. माझी पूर्ण मुक्तता होतांच मी माझ्या कामाला निर्विघ्नपणें आरंभ केला असता म्हणून सीनेटनें जरी मला निर्दोषी ठरवून सोडून दिलें, तथापि जिनोआच्या गव्हर्नरला तें रुचलें नाहीं. त्या गव्हर्नराचा सर्व शहर द्वेष करीत होतें व तोही लोकांवर यथेच्छ सूड उगवीत होता. परंतु या पराभवानें संतापून व मी पूर्ण मुक्त झालों असतां लोकनिंदेला पारावार रहाणार नाहीं या धास्तीनें त्यानें राजाच्या पायावर डोकें ठेविलें व सांगितलें कीं, कांहीं पुरावे फक्त त्यालाच ठाऊक होते व त्यावरून मी भयंकर वृत्तीचा गुन्हेगार मनुष्य होतों याबद्दल त्याला काडीचीही शंका नव्हती. राजाच्या दयेला पूर आला. व आपल्या गव्हर्नराची विपत्ति दूर करण्यासाठीं म्हणून त्या सीनेटच्या निकालास, माझ्या मातापितरांना आंतल्याआंत जाळणाऱ्या काळजीला व माझ्या स्वतःच्या व्यक्तिविषयक हक्काला पायाखालीं तुडविण्यास तो तयार झाला. मला जिनोआस किंवा ट्युरिनमध्यें किंवा लुगेरियन किनाऱ्यावर कोठेंही रहाण्याची सक्त मनाई असून, पाहिजे असल्यास मध्यप्रांतांतील एखाद्या लहान गांवीं जाऊन रहावें किंवा त्रिनमुदतीची व माझ्या भावी वर्तनावर राजाच्या मर्जीवर अवलंबून असणारी हद्दपारीची शिक्षा भोगावी असा मला हुकुम झाला ! या शिक्षेची बातमी मला माझ्या वडिलांनीं येऊन कळविली. ते सॅव्होनास स्वतःच आले होते. कारण मी माझ्या मातापितरांशिवाय जिनोआमध्यें कोणासही भेटूं नये असेंही एक कलम शिक्षेंत होतेंच. तेव्हां जिनोआस पोलिसच्या त्रासाखालीं जाण्याचें संकट टळावें म्हणून तेच सॅव्होनाला आले होते.

इटलीच्या मध्यप्रांतांतील बंड हें माझी सुटका होण्याचे आधीं नुकतेंच १८३१ सालीं उभारलें गेलें होतें. परंतु मी जिनोआला आलों तोंच मला कळलें कीं, हद्दपारीची शिक्षा होऊन शेंकडोंजण फ्रान्सच्या झालेल्या मदतीनें व अजून दाखविल्या जाणाऱ्या आशेनें भुलून जाऊन सरहद्दीवर गोळा होत होते. अशा वेळीं मी जर एखाद्या लहान गांवीं जाऊन राहण्याचें पत्करिलें असतें, तर त्या अज्ञ लोकांत एका कोपऱ्यांत जाऊन पडलों असतों. पोलिसच्या करड्या पहाणीखालीं कांहीं एक चळवळ करितां आली नसती; व

यकःश्चित संशयावरून सुद्धां पाहिजे तेव्हां त्यांना मला कैद करितां आलें असतें. यासाठीं मी हद्दपारीची शिक्षा पत्करिली. त्या योगानें मला योग्य वाटेल तें करण्याची स्वतंत्रता मिळणारी होती व शिवाय त्या वेळेस माझी अशी समजूत झाली कीं, ती हद्दपारीची शिक्षा फार दिवस टिकत नाहीं. मी माझ्या कुटुंबाचा निरोप घेतला. माझा वियोग कांहीं दिवसांनींच संपेल तेव्हां आपण दुःख करूं नये असें माझ्या वडिलांस निघतांना सांगितलें; त्या माझ्या वडिलांचें दर्शन पुन्हां घडण्याचें माझ्या नशिबीं नव्हतें !

मी सॅव्हॉयमधून फ्रान्सकडे गेलों. माझ्या आईच्या काळजीनें, त्या प्रांतांत पुष्कळच वापरलेल्या माझ्या एका चुलत्यानें मजबरोबर यावें, अशी व्यवस्था केली होती. मी वाटेमध्यें आपल्या प्रजासत्ताक कालाचा इतिहासकार सिस्मॉन्डी याला भेटलों. त्यानें व त्याच्या पत्नीनें शिष्टाचारापेक्षां जास्त रीतीनें माझें स्वागत केलें. सिस्मॉडीनें इटलीच्या स्थितीबद्दल कळकळीनें प्रश्न केले. परंतु मला वाटत होतीं इतकीं कांहीं त्याचीं मतें उदात्त झालेलीं नव्हतीं. त्याची कल्पना त्याच्या स्विट्झर्लंड देशाच्या परिस्थितीनें तितकींच खुरटलेलीं होतीं. संयुक्त-संस्थानांच्या कल्पनेपलीकडे त्याची दृष्टि पोंचत नव्हती. व इटलीमधील तिकडे गेलेल्या सर्व हद्दपार देशभक्तांना इटलींत संयुक्तसंस्थानपद्धति हेंच राजकीय अंतिम असलें पाहिजे असें तो सांगे. त्या सर्वांमध्यें असा एकही मनुष्य नव्हता कीं, ज्याला इटलीच्या ऐक्याची शक्यता किंवा निदान उपयुक्तता तरी वाटत होती. इटलीच्या तेथें असणाऱ्या हद्दपार देशभक्तांची एकंदर स्थिति बारीक रीतीनें पाहतां माझी हलके हलके फारच निराशा होत चालली. या हद्दपार लोकांत इटलीचें खरें अंतःकरण प्रतिबिंबित झालेलें असावें असा माझा तोंपर्यंत दृढ विश्वास होता. परंतु त्यांच्या संभाषणावरून तो खोटा झाला. यांची सर्व भिस्त फ्रान्सवर होती. त्यांच्या मतें राजकीय चळवळीला नीति नको होती, निष्ठा नको होती. अनीतिकारक तडजोडीनें व कारस्थानी दिरंगाईनें त्याना स्वातंत्र्य मिळवावयाचें होतें. व तें परकीयांच्या आधारावर! शेवटीं मी सिस्मॉडीची रजा घेण्याचें ठरविलें. मी निघतांना सिस्मॉडीस पारिसमध्यें त्याचें कांहीं काम असलें तर मी करीन असें सांगितलें. या वेळेला लॉम्बर्डीतून हद्दपार झालेला एक देशभक्त हलकेंच कांहीं म्हणाला. हा मनुष्य मी बोलत असतांना नेहमीं लक्ष देऊन ऐकत असे. परंतु मजपाशीं त्याचें भाषण केव्हांही झालें नाहीं. तो म्हणाला, जर मला कांहीं तरी करण्याची

उत्कंठा लागली असेल, तर मी लॉयनमधल्या एका वसतिगृहांत जाऊन तेथील इटालियन देशभक्तांस मिळावें. मी मनापासून त्याचे आभार मानून त्याला त्याचें नांव विचारलें. १८२१ सालीं ऑस्ट्रियानें मरणाची शिक्षा दिलेला हा एक देशभक्त होता. मी लॉयन ( फ्रान्स ) ला गेलों. तेथें असणाऱ्या इटालियन लोकांमध्यें मात्र कांहीं तेज चमकत होतें. तेथें आधींच जमलेल्या व रोज वाढत जाणाऱ्या हद्दपारांपैकीं बहुतेक लोक लष्करांतील होते. ज्यांना वर्षापूर्वी निराशाग्रस्त होत्साते जिनोआचे रस्त्यांतून फिरतांना मीं पाहिलें होतें; ज्यांनीं त्या नंतर स्पेनमध्यें व ग्रीसमध्यें स्वातंत्र्यार्थ लढून इटलीच्या नांवाला उज्वलता आणिली होती, ते बहुतेक देशभक्त मला तेथें भेटले. पिआझाब्रँची येथें सैन्याला लोकांवर गोळ्या घालण्याचा हुकुम झाला असतांना ज्या शूर अधिकाऱ्यानें तत्प्रतिकारार्थ आपण लोकांच्या व सैन्याच्यामध्यें उडी घेतली व उभा राहिला, तो देशभक्त बार्सो हाही मला भेटला. तेथें जमलेले बहुतेक लोक राजसत्तावादी होते. तें मत त्यांच्या स्वतःच्या विचारानें बनलेलें नसून केवळ फ्रान्समध्यें त्या वेळेस राजसत्ता होती म्हणून तेही राजसत्तेच्या पक्षास मिळत होते. तथापि त्यांच्यांत लोकसत्तावादीही बरेच होते.

ते सर्वजण तेथें जमले होते. कारण एका कमेटीच्या विचारानें सॅव्हायवर लवकरच स्वारी करावयाचा बेत ठरला होता. त्या स्वारींत त्या वेळेसच सुमारें २००० इटालियन व कांहीं फ्रेंच कामकरी मिळालेले होते. त्यांचा राजसत्तात्मक कार्यक्रम व त्या योगानें फ्रेंच सरकारचें त्यांना असलेलें पाठबळ. या कारणांनीं श्रीमान वर्गांतील पुष्कळ हद्दपार तेथें येऊन मिळाले होते व म्हणून त्यांचेपाशीं पैसाही मुबलक होता. राजपुत्र, सरदार, सर्व दर्जांचे व सर्व मताचे लोक एकत्र झालेले होते. त्यांची लष्करी तयारी उघड रीतीनें सुरू होती. इटलीचें त्रिरंगयुक्त निशाण हें फ्रेंच निशाणाशीं संमिश्र होऊन त्या वसतिगृहावर फडकत होतें. शस्त्रांचा सांठा सर्वांना माहीत होता, व खुद्द फ्रेंचांच्या लॉयन मधल्या अधिकाऱ्याशीं त्यांचें दळणवळण होतें. स्पॅनिश सरहद्दीवरही याच वेळेस असाच प्रकार सुरू होता. फ्रेंचांच्या या सहानुभूतीचें कारण उघडच होतें कीं, लुई फिलिपी याला इतर राजांनीं अजून मान्यता दिली नव्हती. तेव्हां त्यांच्याविरुद्ध क्रांतिपक्षाला यशस्वी करण्याचा प्रयत्न केला म्हणजे ते घाबरून जातील व मान्यता देतील असा तो

डाव होता. व त्याचा उलगडा लवकरच झाला. एक दिवस त्या आमच्या वसतिगृहाकडे मी घाईघाईनें जात होतों. आतां लवकरच उठावणी होणार या विचारानें माझें मन प्रफुल्लित झालेलें होतें. तोंच एका भिंतीला चिकटविलेली एक मुद्रित सरकारी नोटीस वाचण्यासाठीं जमलेल्या लोकांचा घोळका माझ्या दृष्टीस पडला. इटालियनांच्या स्वारीच्याविरुद्ध काढलेला तो अतिशय कडक असा सरकारी जाहिरनामा होता. इटालियन सैन्य मोडून टाकलें पाहिजे. फ्रेंच सरकाराशीं स्नेहसंबंध असलेल्या कोणत्याही सरकारच्या विरुद्ध फ्रेंच सरहद्दीवर जर कोणी कांहीं भयंकर कृत्य करील तर त्यांस कडक शासन देण्यांत येईल. हा जाहिरनामा त्या लॉयनच्या ऑफिसमधूनच निघालेला होता.

या जाहीरनाम्यानें त्या आमच्या कमेटीची सर्व हिंमत खचली व धैर्य गळून गेलें. निशाणें नाहींशीं झालीं. व हत्यारांपैकीं पुष्कळशीं हत्यारें लपवून ठेवण्यांत आलीं. त्यांचा कमांडर वृद्ध रोजिस याचे डोळयांत अश्रू आले व बाकीचे हद्दपार ज्यांनीं विश्वासघात केला होता त्यांना शिव्या देऊं लागले! स्वदेशकार्य करण्यांत जे दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करीत बसतात, त्यांना फसगत झाल्यावर या शिव्याशापांशिवाय सूड उगविण्याचा दुसरा मार्गच नसतो. त्यांच्यापैकीं जे कांहीं हट्टानें आंधळे बनलेले होते किंवा फाजील थोर मनाचे होते त्यांचा विश्वास अजूनही उडेना! ते म्हणूं लागले कीं, फ्रेंच लोकांतील उदारमतवादी ( Liberal ) पक्ष आपणास अशा रीतीनें एकदम फसविणार नाहीं. फ्रेंचांच्या कावेबाज व सावध सरकारनें आपलें या स्वारीला कोणत्याही प्रकारचें साह्य नाहीं असें लोकांस कळविण्यासाठींच कायतो हा जाहिरनामा वरवर काढला, बाकी मनांतून ते कांहीं विरुद्ध नसतील! मी लगेच एक तोड सुचविली कीं आतांच्या आतां होईल तितकी फ्रेंच कामकऱ्यांची भर करून व त्या पलटणीला हत्यारबंद करून स्वारीला विनीऐवजीं सॅव्हॉयकडे धाडावें म्हणजे फ्रेंच सरकारच्या मनांत खरें काय आहे हें बाहेर येईल. तसें ताबडतोब करण्यांत आलें. तेव्हां फ्रेंचांनीं घोडेस्वार धाडून त्या पलटणीला आडकाठी घातली व त्यांना पिटाळून लावलें. त्या पलटणीपैकीं जे फ्रेंच होते ते आधींच निघून गेले! व अशा रीतीनें ती स्वारी करणें अशक्य झालें.

नंतर पकडापकडीला आरंभ झाला. शेंकडों लोकांच्या हातांत बेड्या ठोकून कॅलेपर्यंत त्यांची धिंड काढिली व तेथून त्यांना मोकळे करून इंग्लंड-

मध्यें घालून दिलें. त्या वेळीं कैद, पळापळी, धाकदपटशा, निराशी आशा एकच गर्दी उडाली. तितक्यांत वास्लें यानें मला कळविलें कीं, कांहीं क्रांतिकारक मंडळी रात्रीचे रात्रीं निघून कार्सिका बेटाकडे जाणार आहेत; कारण तेथून इटलीच्या मध्यप्रांतांत सुरू असलेल्या बंडाला शस्त्रांची कुमक चांगली करतां येईल. माझी खुषी असल्यास मीही यावें. मीं तें लागलेंच कबूल केलें. चुलत्याला मात्र तो बेत न कळवितां, फक्त माझ्यासाठीं घाबरूं नये व मेहरबानीनें थोडे दिवस ही बातमी घरीं कळवूं नये, अशा अर्थी एक पत्र लिहून ठेऊन मी निघालों. आम्हीं मध्यंतरीं कोठेंही न थांबतां मार्सेलिसला येऊन पोंचलों. तेथून ट्यूलोनला आलों. व तेथून एका जहाजांत बसून आम्हीं कार्सिकामध्यें येऊन पोंचलों. स्वदेशाला परत आल्यावर साहजिक रीतीनेंच एकाद्याला जसा आनंद व्हावा तसें मला झालें. कारण त्या वेळेस कार्सिका बेट हें अगदीं इटलीसारखेंच होतें. हवामान, देखावा, भाषा व विशेषतः उदात्त स्वदेशाभिमान ह्या सर्व गोष्टींमध्यें कार्सिका व इटली यांत बिलकूल भेद नव्हता. तेथील लोकांना इटलीबद्दल अत्यंत प्रेम असे. ते मध्यप्रांतांतील बंडाच्या निकालाकडे एकसारखी टक लावून बसले होते. त्यांना अशी आशा होती कीं, लवकरच तें बेट त्याच्या मातेला भेटून प्रेमालिंगन देईल. तेथील आडदांड परंतु माननीय डोंगरी लोक हे सशस्त्र होते. व त्या वेळेस इटलीमध्यें जाऊन लढावयाचें याशिवाय दुसरा विषय त्यांना माहीत नव्हता. आम्हीं तेथें जातांच त्यांना पुढारी मिळाल्यासारखें वाटलें. अपमानाचा सूड घेतल्याशिवाय ते कधींही रहात नसत. प्राण गेला तरी लढाईंतून मागें येत नसत. त्या कार्सिकन लोकांवर माझें अतिशय प्रेम बसलें आहे. व लवकरच त्यांची व आपली एकी होईल अशी मला आशा आहे.

निओपॉलिटन देशभक्तांनीं कार्सिका बेटांतही कार्बोनारीच्या शाखा स्थापल्या होत्या. व त्या मताचाच सर्वत्र पगडा बसला होता. कार्सिकन लोकांना ती संस्था एखाद्या धर्मसंस्थेप्रमाणें पूज्य झाली. एकमेकांचा सूड घेण्याची ज्यांनीं प्रतिज्ञा केलेली असे ते देखील त्या संस्थेमध्यें शपथ घेऊन एकदां शिरले म्हणजे एकमेकांस बंधू बंधू समजूं लागत. त्यांतील २०००–३००० कार्सिकन लोक घेऊन इटलीचे मध्यप्रदेशांत घुसावयाचा आमचा बेत ठरला होता. परंतु जहाजें मिळविण्यास पैसा नव्हता. शिवाय जे लोक आमचे बरोबर निघणार होते त्यांच्या बायकामुलांनाही थोडी थोडी रक्कम

डाव होता होतें. एका नेटिव्ह संस्थानाला पैशाची मदत द्यावी म्हणून वसतिगृहाले असतां, परक्या सत्तेप्रमाणें त्यानें उत्तर धाडलें कीं, ज्यांना स्वातंत्र्य या.हजे असेल त्यांनीं तें स्वतःच विकत घ्यावें ! या सर्व दिरंगाईचा परिणाम असा झाला कीं, ऑस्ट्रियाच्या सैन्यानें बंडाचा मोड केला व पारतंत्र्याची बेडी माझे देशाचे पायांत पुन्हां ठोकली. अशा रीतीनें कार्सिकामधून काहीं करण्याची आशा खुंटली. माझी तुटपुंजी रक्कमही संपून गेली. माझ्या चुलत्यानें माझ्या मातापित्यांची शपथ घालून मार्सेलिसला निघून येण्याचा अत्याग्रह केला. म्हणून मग मी कार्सिका सोडून मार्सेलिसला आलों.

मार्सेलिसला आल्यानंतर सॅव्होनाचे तुरुंगांत योजून ठेविलेल्या "तरुण इटलीच्या" पवित्र कार्यास आरंभ करावा असें मला वाटूं लागलें व मी तत्कालीन स्थितीचा बारीक विचार करूं लागलों.

मी मार्सेलिसला आलों त्याच सुमारास चार्ल्स् ऑल्बर्ट हा गादीवर बसला. हा राजपुत्र कारबोनारी मंडळीचा सभासद होता. व पूर्वी १८२१ सालीं हा एका बंडाचा कांहीं वेळ मुख्य चालकही होता. इटलीमधील एका संस्थानाचें अधिपतित्व कारबोनारी मंडळीच्या एका सभासदाकडे आलेलें पाहातांच कांहीं अदूरदृष्टि लोकांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. परंतु **यःकश्चित व स्वतःच परतंत्र असलेल्या एकाद्या संस्थानिकाकडून इटलीचें ऐक्य व स्वातंत्र्य स्थापित होणें हें अगदीं अशक्य आहे,** अशी माझी पूर्ण समजूत होती व अजूनही ती कायम आहे. इटलीचें ऐक्य जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंत लहान संस्थानें परतंत्र राहणारच व आपसांत लढाया करीत बसणारच. मला जी इटली पाहिजे होती ती फार निराळी होती. **एक-राष्ट्र झालेली, स्वातंत्र्यानें मंडित असलेली, परक्यांचा जिच्या-वर अप्रत्यक्षरीत्या सुद्धां दाब उरलेला नाहीं, शक्तिमत्वानें बलिष्ट व नीतिमत्तेनें वरिष्ट अशा प्रकारची इटली मला पाहिजे होती ! परंतु ही स्थिति येण्यास इटलीच्या प्रयत्नांचें पुढारी-पण लोकांनीच स्वीकारलें पाहिजे होतें.** ही गोष्ट एकाद्या दुबळ्या राजाकडून सिद्धीस जाणें अगदीं अशक्य होतें. परंतु लोकांचा भ्रम दूर होईना म्हणून अशा बाहुल्याकडून प्रत्यक्षरीत्या कांहींही व्हावयाचें नाहीं व मुख्य आरंभ लोकांनीच केला पाहिजे, हें सिद्ध करण्यासाठीं मी चार्ल्स् ऑल्बर्टला एक सार्वजनिक पत्र पाठविण्याचें ठरविलें. जे लोक त्या

पत्राचा आधार घेऊन मी त्या संस्थानिकापासून देशोन्नति होण्याची आशा करीत होतों असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करितात ते वस्तुविपर्यास करीत आहेत. मला ती आशा केव्हांही नव्हती. माझी पक्की खात्री आहे कीं, ज्या वेळेस लोकसत्तेचा जयजयकार होईल, पिढीजाद राजपुत्राहून एकादा कामकरी हा यत्किंचितही कमी योग्यतेचा नाहीं अशी जेव्हां मनुष्याची खात्री पटेल, दुसऱ्याच्या हातांत हात घालणें हें पहिल्याच्या हस्तस्पर्शाइतकेंच मानार्ह आहे अशी समजूत जेव्हां होईल व खाजगी व्यवस्थेप्रमाणेंच सरकारची व्यवस्थाही ज्यावेळेस सर्वांपेक्षां जास्त हुषार, कर्तृत्वदक्ष व इमानी अशा लोकांच्या हातीं–मग ते वाटेल त्या दर्जाचे असोत–जाईल त्या वेळेसच आपल्या देशाची खरी उन्नति होणारी आहे. परंतु राजांवर विश्वास ठेवणें हें मूर्खपणाचें आहे हें सिद्ध करण्यासाठींच लोकांची खुळचट आशा व चार्लस ऑल्बर्ट यांच्यामध्यें मी फक्त अडत करण्याचें पत्करलें. तें पत्र माझ्या लिब्री नांवाच्या मित्रास मीं दाखविलें, तेव्हां त्यानें तें प्रसिद्ध करूं नये म्हणून मला सांगितलें. जर मी तें प्रसिद्ध केलें तर माझी हद्दपारीची शिक्षा जन्मभर कायम करण्यांत येईल, आयुष्यांत जें जें प्रेममय आहे त्याचा मला कायमचा त्याग करावा लागेल, व सर्व आयुष्य दुःख व निराशा यांनीं ग्रस्त होईल असें तो आग्रहानें व कळकळीनें सांगत होता. तथापि मी सार्वजनिक हितार्थ तें पत्र प्रसिद्ध केलें. हें पत्र माझा पहिला महत्त्वाचा राजकीय लेख होय.

( चार्लस् ऑल्बर्टच्या पत्रांतील निवडक व उपदेशपर तेवढाच भाग खालीं दिला आहे. ) "**जर लोकांना जुलुमानें व जबरदस्तीनें दाबण्याचा प्रयत्न कोणी करीत असेल तर त्यांनीं पक्कें समजावें कीं, रक्ताची तृषा रक्तानेंच शांत होते.** कटाच्या सुरीची धार ही देशवीरांच्या थडग्यावर जेव्हां पाजळली जाते तेव्हां ती तीक्ष्णतम झालेली असते. हा परक्यांचा तिरस्कार आतां सर्व लोकांना आलेला आहे. या ऑस्ट्रियाच्या गुलामगिरीचा तिटकारा आलेला आहे. या ऑस्ट्रियाचा द्वेष इटलीचे अंतःकरणांत धगधगलेला आहे. **आतां एकट्या दुकट्या हक्कांनीं किंवा यःकश्चित् सवलतींनीं लोक शांत होणारे नाहींत. पिढ्यान्‌पिढ्या हिसकावून नेलेले आमचे नैसर्गिक हक्क, आमचें मनुष्यत्व आतां आम्हांस परत पाहिजे आहे.** आम्हांला व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे आहे, आम्हाला स्वतःचे कायदे पाहिजे आहेत, स्वदेशाचें ऐक्य पाहिजे आहे, एकराष्ट्रीयत्व

पाहिजे आहे, स्वराज्य पाहिजे आहे, **आम्हांला आतां पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे आहे.** फूट पाडलेले, छिन्नभिन्न झालेले, जुलुमाच्या पायाखालीं तुडविलेले; त्यांना नांव नाहीं, त्यांना देश नाहीं ! त्यांच्या तोंडावर "तुम्हीं गुलामांचें राष्ट्र आहे" म्हणून परके लोक थुंकत आहेत. स्वतंत्र देशांतील लोक आमच्या देशांतून प्रवास करून गेल्यानंतर येथें सर्व मढीं भरलेलीं आहेत म्हणून सांगतांना आम्हीं ऐकत आहोंत. **गुलामगिरीचा पेला तळच्या खळमळासुद्धां आम्हीं पिऊन टाकला आहे. परंतु तो पुन्हां न भरण्याची मात्र आम्हीं आतां शपथ घेतलेली आहे.** अशा वेळेला आपण जर पुढाकार घ्याल तर त्या पिडमाँट संस्थानच्या यःकश्चित् मुकुटाहून अत्यंत श्रेष्ठ अशा मुकुटानें आपलें मस्तक शोभूं लागेल ! परंतु जर आपण यावरही आम्हांस मिळणार नाहीं, इटलीच्या स्वातंत्र्ययुद्धाची धुरा धारण करणार नाहीं, तर त्याच्या योगानें स्वातंत्र्यप्राप्तीचें पवित्र कर्तव्य पार पाडण्यास थोडासा उशीर लागेल इतकेंच काय तें. **परंतु खुद्द जगच्चालकानें इटली देशाच्या भाग्यावर लिहून ठेवलेली स्वातंत्र्यपत्रिका अजिबात पुसून टाकण्यास कोण समर्थ आहे ?** हें कर्तव्य करण्यास तूं धजणार नसशील तर इतर पुढें येतील. ते पुढें येतील व तुमच्याशिवाय व तुमच्याविरुद्ध इच्छित साध्याकडे जातील ! आम्ही स्वातंत्र्येच्छु लोक या पत्राचें उत्तर आपण आपल्या कृत्यानें द्याल अशी आशा धरून आहों. आपण हें ध्यानांत ठेवा कीं, आपलें नांव मनुष्य जातींतील पहिला महात्मा म्हणून किंवा इटलीवरचा शेवटला जुलमी राजा म्हणून घेतलें जाणें हें याच उत्तरावर अवलंबून राहील. काय पाहिजे तें पसंत करा."

**"जोसेफ मॅझिनी"**

हें पत्र मार्सेलिसमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें. प्रथम कांहीं प्रती इटलीमध्यें पत्रांतूनच धाडण्यांत आल्या. सर्व मोठमोठ्या लोकांचे पत्यावर तीं पत्रें पाठविलीं. लवकरच गुप्त छापखान्यांतून त्याच्या प्रती काढविल्या व मग त्या पत्राचा सर्वत्र प्रसार झाला. चार्ल्स् ऑल्बर्ट याला त्याची एक प्रत मिळाली व ती त्यानें वाचली.

थोड्या दिवसांनीं त्या संस्थानिकाकडून एक हुकूम सुटला. सरहद्दीवरील सर्व अधिकाऱ्यांस कळविण्यांत आलें कीं, इटलीमध्यें येण्याचा प्रयत्न करतांच मॅझिनीला कैद करावा. माझा मित्र लिब्री यांचें भविष्य खरें झालें. परंतु त्यांत मला एक गोष्ट अतिशय उत्साहवर्धक वाटली. ती ही कीं, तें पत्र इटलीमधल्या

तरुणांना अतिशय पसंत पडलें. स्वतंत्रतेच्या नांवाचा मी उघड रीतीनें केलेल जयजयकार ऐकून त्या तरुणांच्या अंतःकरणांतील गुप्त व सुप्त असलेल्या मनोवृत्तींनीं गंभीर प्रतिध्वनि दिला. या शुभ शकुनाचा मीं आनंदानें स्वीकार केला व इटलीच्या तत्कालीन स्थितीचा बारीक विचार करूं लागलों. इटलीमधल्या बहुतेक थोर पुरुषांच्या हृदयांत इटली देशाच्या ऐक्याची कल्पना जरी पूर्वीपासून प्रतिबिंबित झालेली दिसत आहे, तथापि त्या वेळेस इटलीच्या ऐक्यास मनोराज्य असें नांव देण्यांत येत असे. त्या वेळच्या अत्यंत सुशिक्षित अशा देशभक्त पुढाऱ्यांनाही ती कल्पना अशक्य वाटे. त्यांची आशा व इच्छा संयुक्तसंस्थानांपुढें गेली नव्हती. कोणत्याही लेखकानें ऐक्याचा–एकराष्ट्रीयत्वाचा–उपदेश केलेला नव्हता. सर्व संस्थानांनीं मिळून बंधुत्वानें रहावें हीच कायती राजकीय उन्नतीची परमावधि होती. याच वेळेला चार्ल्स् ऑल्बर्टबद्दलच्या मूर्ख आशेचा निकाल लागला. त्यानें पूर्वी हद्दपार केलेल्यांनाही परत बोलाविलें नाहीं. इकडे मार्सेलिसमध्यें दुसरी एक गुप्त मंडळी असल्याचें मला कॉर्लोबिएन्को याजकडून कळलें. हा तिचा स्थापक होता. **ही मंडळी फक्त लष्करी तयारीकडेच लक्ष देत असल्यानें मनःप्रवर्तनाचें मुख्य कामच लंगडें होतें.** व त्या योगानें स्वातंत्र्ययुद्धाला मनाची जी उदात्तता व सुशिक्षितता अवश्य असते ती मिळण्याचा संभव नव्हता.

आतां माझी स्वतःची गुप्त मंडळीची कल्पना म्हटली म्हणजे तीमध्यें दोन अंगें पाहिजे आहेत. **मनःसंस्कृति व युद्धसंस्कृति**; मनःप्रवर्तकता व शरीरप्रवर्तकता; विचारक्षमता व कृतितत्परता. या दोन मुख्यांगांचें समतोलन करणें हें अवश्यक व पहिलें कर्तव्य होय. मध्यप्रांतांतील बंडाला जें नुकतेंच अपयश आलें, त्याचेंही कारण असें होतें कीं, त्यांच्या पुढाऱ्यांत मनाचा जोर कमी होता. मी कारबोनारीच्या व वरील संस्थेच्या अशा दोन्हीही गुप्त मंडळ्यांच्या पुढाऱ्यांची गांठ घेतलेली होती. त्यावरून मला हें स्पष्ट दिसून आलें कीं, या सर्व विस्कळित झालेल्या यंत्रांना पुन्हां एकदां नवीन सांच्यांत ओतून नवें यंत्र तयार केल्याशिवाय जयाची आशा करणें व्यर्थ होय. या नवीन यंत्राची सामग्री म्हटली म्हणजे तरुण अंतःकरणें हीं होत.

तेव्हां मुख्य काम लोकशिक्षणाला आरंभ करणें हें होतें. आमचें कर्तव्य इटली उत्पन्न करणें इतकेंच नसून ती बलिष्ठ व श्रेष्ठ व्हावी, तिच्या भूतकालीन वैभवाला ती शोभावी व तिच्या भविष्यकालीन कर्तव्याला ती योग्य

व्हावी, असा प्रयत्न करण्याचें होतें. परंतु माझीं मतें हीं त्या वेळच्या मतांहून अगदीं विरुद्ध होतीं. त्यांच्या मतें परक्यांच्या हातून राष्ट्रीय उन्नति होईल असें होतें. माझें मतें पहिली गोष्ट जर कोणची करावयाची असेल तर ती ही होय कीं, आत्मनिष्ठा उत्पन्न करणें. माझी पक्की खात्री आहे कीं, कोणचेंही राष्ट्र आत्मावलंबनाशिवाय—आत्मनिष्ठेशिवाय—कधींही वर येणार नाहीं, वर येऊं शकणार नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, कारबोनारीचा सर्व विश्वास बड्या बड्या लोकांवर होता. परंतु राज्यक्रांत्या ह्या लोकांकडून घडत असतात. ह्यासाठीं राज्यक्रांति करून स्वातंत्र्य मिळविणें हें आपलें मुख्य कर्तव्य होय, ही गोष्ट सर्व लोकांना समजावून दिली पाहिजे. लोकांना तें आपलें कर्तव्य आहे असें मनापासून वाटूं लागलें पाहिजे. तिसरी गोष्ट अशी कीं, कारबोनारी मंडळीमध्यें उदात्त लक्ष्य असें कोणचेंच नव्हतें. त्यांचा कार्यक्रम फक्त नाशमय होता. संघटनाची ताकद त्यांच्यांत मुळींच नव्हती. 'एकराष्ट्रीयत्व' (Unity) ह्या शब्दाचे ऐवजीं त्यांनीं नुस्ता 'ऐक्य' (Union) हा शब्द योजला होता. कारण, संयुक्तसंस्थानपद्धति हाही ऐक्य शब्दांतील गर्भित अर्थ होऊं शकेल. अशा रीतीनें मुख्य तत्त्वांतच धरसोड सुरू झालेली होती. तत्त्वप्रेम नसल्यानें त्यांच्यांत निष्ठेचें सामर्थ्य बिलकुल नव्हतें. लोकांच्या मनांतील चुकीच्या कल्पना काढून टाकून त्यांचें मनःप्रवर्तन करण्याचें काम बिलकुलच चाललेलें नव्हतें. कारण, खुद्द पुढाऱ्यांनाच त्याबद्दल पूर्ण अज्ञान होतें. व हें अज्ञान झांकण्यासाठीं फाजील गुप्ततेचें महत्त्व वाढलें. खरी कृति करण्यासाठीं ती गुप्तता नव्हती, तर खरी दुःस्थिति छपविण्यासाठीं केलेलें तें ढोंग होतें. कारबोनारीचा प्रसार मात्र विलक्षण झालेला होता. तिच्या पूर्वीं कोणच्याही संस्थेची इतकी प्रसृति झालेली नव्हती. परंतु तिच्यामध्यें असलेल्या तरुणांच्या अवसानाचा, जोमाचा व स्वातंत्र्यप्रेमाचा उपयोग त्यांना करून घेतां आला नाहीं. **त्या उदात्त व कर्तृत्ववान् तरुणांवर शिथिलत्व आलेल्या वृद्धांचा दाब ठेवण्यांत येत असे. त्या वृद्धांना निष्ठा नव्हती, त्यांना भविष्य नव्हतें. स्वदेशभक्त, लोकसत्तावादी, युद्धप्रिय व विजयाकांक्षी अशा इटलीच्या तारुण्याचा जोम वाढविण्याचे ऐवजीं ते त्याला कोमेजून टाकीत असत.** अखेर त्या मंडळींची संख्या जेव्हां अवाढव्य झाली तेव्हां गुप्तता राहणें अशक्य झालें. मग कांहींतरी करण्यास आरंभ झाला. परंतु काय करावयाचें व कसें करावयाचें ? एक तत्त्वाचा

अभाव, उच्च लक्ष्याचा अभाव, असल्यानें ऐक्य होईना. एक उद्देशाचें बंधन नसल्यानें एकी होणें दुरापास्त झालें. अर्थातच तत्त्वनिष्ठेच्या बंधनाच्या ऐवजीं मग व्यक्तिनिष्ठेचें बंधन शोधावें लागलें—कारबोनारी एका राजपुत्रासाठीं लढूं लागली; कारण, तिला एक तत्वासाठीं लढणें मुष्कील झालें. त्यांचीं मतें द्रव्यवादी बनलेलीं होतीं, त्यांच्यात निष्ठा उरलेली नव्हती.

निष्ठा नव्हती म्हणून भिक्षा मागून परके लोक आपल्यास तारतील अशी त्यांची समजूत झाली. अखेरच्या परिणामावरून दिसून आलें कीं, **खरें सामर्थ्य हें केवळ संख्येमध्यें नसून तें त्यांच्या साधनांच्या संघट्टनेवर अवलंबून असतें.**

परंतु कारबोनारीझम्‌मध्यें समतेचें तत्त्व मात्र पूर्ण रीतीनें दृग्गोचर झालेलें होतें. सर्व प्रांतांतील व सर्व दर्जांतील लोकांना, धर्मोपदेशक, सरदार, लेखक, विद्वान्, शिपाई व सामान्य वर्ग, या सर्वांना एकच दीक्षा देऊन एकत्र केल्यानें एकीचा मार्ग सुलभ झाला पण कार्यक्रम ठरलेला नसल्यानें त्यांचा हात पोंचतो न पोंचतो तोंच विजयश्री दूर जात असे. कारबोनारी मंडळींच्या हातून घडलेल्या चुकांचें मीं बारीक परीक्षण केलें. व १८३१ सालीं घडलेल्या बंडाचा इतिहास सूक्ष्म रीतीनें तपासला.

१८३१ सालीं जें बंड झालें त्या बंडामध्यें पहिली गोष्ट जर कोणची दिसून झाली असेल तर ती ही होय कीं, क्रांतिकारक चळवळीचे शास्त्रांत राष्ट्र बरेंच पुढें गेलें आहे हें स्पष्ट झालें. मागील बंडाप्रमाणें या वेळेला लोकसमूह थोर लोकांच्या किंवा शिपायांच्या आधारावर खोळंबून बसला नव्हता, हें पहिलें तत्त्व आहे. क्रांतिशास्त्रांतील हा पहिला सिद्धांत आहे. **बहुजनसमाजानेंच उठावणी केली पाहिजे. थोर लोक व शिपाई लोक मागाहून मिळतात.**

तेही आधीं मिळतील तर सोन्याहून पिवळें होणार आहे. परंतु बहुजनसमाजाची तयारी असतांना थोर व्यक्तींच्या मदतीवर किंवा शिपायांच्या आशेवर अवलंबून राहतां कामा नये. हें तत्त्व १८३१ च्या बंडांत पाळलें गेलें. फ्रान्समधल्या त्या क्रांतिकारक तीन दिवसांची बातमी पोंचतांच सर्व लोक जागजागीं जमूं लागले. तरुण तरुण मंडळींनीं फ्रान्सच्या हकीकतीनें व स्वातंत्र्यप्रीतीनें भरलेलीं वर्तमानपत्रें व लेख उंच ठिकाणीं उभें राहून चव्हाट्यावर जमलेल्या लोकांस वाचून दाखविले. शस्त्रें परजलीं, स्वयंसेवकांनें

सैन्य संघटित केलें, व कोणाही शिपायानें नागरिकांस त्रास देऊं नये म्हणून सक्त हुकूम सुटले.

ही बोलोग्नाची बातमी कळतांच उठावणीचा वणवा चहूंकडे पेटूं लागला. मॉडेनाच्या गुप्त मंडळीची तयारी होतीच. अधिकाऱ्यांच्या तळावर रोंखलेल्या तोफेचा बार होतांच, ती खूण ओळखून, सर्वजण उठले. तारीख २ ला ही गोष्ट घडली. ता. ४ ला बोलोग्ना मध्यें सर्वत्र उठावणी झाली. ता.५ ला मॉडेनाचे लोकांनीं जुलमी अधिकाऱ्यांस शहराबाहेर हुसकून दिलें. इमोला, फाएन्झा, फॉर्ली, कॉसेना, रव्हेना; एकामागून एक स्वतंत्र झाले. फेरारा ७ व्या तारखेला बंधमुक्त झालें. पेसरो, फोसोंब्रोन, फेनो व अरबिनो ह्यांनीं ८ व्या तारखेस पारतंत्र्याचें जूं काडकन् मोडून टाकिलें. ऑस्ट्रियाला पळतां भुई थोडी झाली. रोज नवीन शहरें स्वतंत्र झाल्याची बातमी येऊं लागली. व हें सर्व कृत्य बहुजनसमाजाच्या स्फूर्तीनें घडून आलें. तरुण व वृद्ध, पुरुष व बायका, या सर्वांना विलक्षण अवसान चढलें. बायकांनीं निशाणें तयार करून उभारलीं, व एखादा तरुण वीर लढाईंत जरा कचरूं लागला कीं, वृद्ध लोक मागलि बंडांतील झालेले घाव त्याच्यापुढें उघडे करून, "ह्या जखमा स्वदेश स्वतंत्र करतांना लाभल्या आहेत." असें सांगूं लागले.

अशा रीतीनें फेब्रुवारीच्या २५ व्या तारखेच्या सुमारास जवळ जवळ पंचवीस लक्ष इटालियन लोक परवशतेंतून मुक्त झाले. त्यांना स्वसामर्थ्यांत निष्ठा आली, व स्वसंरक्षणासाठींच नव्हे तर इतर देशबंधूंची सुटका करण्यासाठीं सशस्त्र होऊन पुढें घुसूं लागले. मागच्या बंडांतील आणखी एक चुकी टाळली गेली ती ही होय कीं, बंडाला राष्ट्रीय स्वरूप मिळालें. इटलीचे त्रिरंगभूपित निशाणाखालीं सर्व बंड चाललेलें होतें. व स्वतःचे प्रांतच मुक्त करून स्वस्थ न बसतां तरुण लोक सर्व इटली मुक्त झाल्यासच आपलाही प्रांत मुक्त असणें शक्य आहे असें जाणून व एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेनें प्रेरित होऊन बाहेर पडत होते. **कारण क्रांतिशास्त्रांतील मुख्य मुख्य तत्त्वांपैकीं प्रसृति हें फार महत्वाचें तत्त्व आहे.** बंडाचा प्रसार जितक्या जास्त भागांवर करितां येईल तितका चांगला, इतकेंच नव्हे तर क्रांतीचें प्रत्यक्ष जीवितच या प्रसारावर अवलंबून असतें.

एकसमयावच्छेदेंकरून सर्वत्र उठावणी झाली असतां शत्रूचें बल छिन्नभिन्न होतें. व इकडे क्रांतिपक्षांत एकमेकांचे आधारानें एकमेकांस धीर येऊं

लागतो. म्हणून क्रांतीचा पाया जितका रुंदावेल तितका रुंद करणें हें अत्यंत अवश्य आहे. व १८३१ सालीं लोकांनीं या तत्त्वावर आरंभ केल्यानें मागचीं बंडें व्यर्थ केलीं नाहींत असें सिद्ध झालें.

परंतु लोकांच्या हातून सत्ता निघाली, व ती पुढाऱ्यांच्या हातीं पडली मात्र, तोंच अदूरदृष्टीपणा व भ्याडपणा यांनां आरंभ झाला. ऑस्ट्रियाला चेंपीत नेण्यासाठीं आघातक व आक्रमक पद्धतीचें अवलंबन करण्याचे ऐवजीं यांनीं संरक्षक पद्धतीचाच अवलंब केला व लढाईचा पाया ऑस्ट्रियाचे प्रदेशांत ढकलण्याचे ऐवजीं तो आपल्याच शहरच्या तटाशीं ओढून आणला. **प्रत्येक क्रांतीनें प्रथमतः आघातक पद्धतीचेंच अवलंबन केलें पाहिजे.** बंडाचे आरंभीं शत्रू साहजिकरीत्याच गैरसावध असतो. अशा वेळेला त्यास एकदम चेंपीत नेणें फार सुलभ असतें. व म्हणून आघातक पद्धतीशिवाय केवळ संरक्षक पद्धतीनें केलेली क्रांति ही आपलें थडगें आपल्याच हातानें खणीत बसते. शत्रूंवर आपण आघात करीत गेलों कीं, ठिकठिकाणच्या लोकांनाही आघात करण्याचें अवसान चढतें. अशा क्रांती-समयीं इतरत्र उठावणी व्हावी म्हणून आपण उठावणी करीत राहिलें पाहिजे. इतरांना अवसान चढण्यास आपण अवसान दाखविलें पाहिजे. इतरांमध्यें सामर्थ्यनिष्ठा उत्पन्न करावयास आपण सामर्थ्यनिष्ठा धरली पाहिजे. परंतु त्या वृद्ध व मूर्ख पुढाऱ्यांनीं प्रत्येक कृत्यांत भ्याडपणा दाखवून सर्व इटलींत निरुत्साह पसरविला. ते इतरांशीं आपला संबंध नाहीं असें दाखवूं लागले. लोकांनां तत्त्वभक्तीच्या ऐवजीं व्यक्तिभक्ती शिकवूं लागले. लोकसत्ताक व्यवस्थेला लाथ मारून राजसत्तेचें खूळ माजवूं लागले. **स्वतः लढाईची कांहीं एक तयारी न करितां फ्रेंच लोकांतील "उदार मतवाद्यां"च्या ( Liberals ) विश्वासघातकी थापांवर भुलून गेले.** स्वाव-लंबन विसरले. व मध्यंतरीं ऑस्ट्रिया लढाईची जारीनें तयारी करीत असतां आपण शहरांतल्या शहरांत घोरत पडले ! नंतर पुन्हां कायदेशीर चळवळीला आरंभ झाला ! जें तलवारीचे जोरावरच मिळविलें जावयाचें व "परत देतोस कां घेऊं प्राण ?" असें म्हटल्याशिवाय कधींही मिळावयाचें नाहीं, तें राष्ट्रीय स्वातंत्र्य यांना कायदेशीर चळवळीनें पाहिजे होतें ! त्यांनीं एक जंगी अर्ज केला व त्यांत कायद्याचे आधार दाखवून त्या आधारांवर आम्हांला स्वातंत्र्य असावें म्हणून सिद्ध करण्यासाठीं एक नीच लेख लिहिला.

**स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्राचा अबाधित हक्क आहे, हा परमेश्वराचा कायदा आहे, व म्हणून आम्हीं आमच्या प्रयत्नांनीं स्वतंत्र होणार, असें जाहीर करण्याचे ऐवजीं अमक्या कलमाच्या अमक्या आधारानें आम्हीं स्वातंत्र्याची भिक्षा मागतों अशी भ्याड व निंद्य भाषा वापरली.** आस्ट्रियाला हेंच पाहिजे होतें. या मृगजळाचे शोधांत बंडाच्या वळें वळेंच झालेल्या स्वयमधिकृत पुढाऱ्यांस गुंतवून त्यानें इटलीच्या नूतन सौभाग्य-कुंकुमावर पुन्हां घाला घातला ! आघातक पद्धतीनें बंडाचा विस्तृत प्रसार न होतां उलटें धैर्य गळून कोठेंही नवीन उठावणी होईना. **क्रांतीच्या जीविताला ठार मारणारें थिल्लरपणासारखें दुसरें विष नाहीं.** परंतु त्या कायदेशीर पुढाऱ्यांना या थिल्लरपणांतच आपण मोठा विचारीपणा दाखवितों आहोंत असें वाटलें ! या फाजील आंकडेशास्त्रांत व या फाजील कारस्थानीपणांत अत्यंत विश्वास; व अवसान, पौरुष व समकालीन उठावणी–ज्या तीन शब्दांत सर्व क्रांतिशास्त्र भरलेलें आहे–त्या ह्या तीन शब्दांत अत्यंत अविश्वास; हे रोग इटलीला प्राणनाशक झालेले आहेत. आपण वाट पहात बसतों, परीक्षा करीत बसतों, परिस्थितीचे गुलाम बनतों; परिस्थितीला आपले गुलाम करण्याचा किंवा नवीन परिस्थिति निर्माण करण्याचा प्रयत्न आपण केव्हांही करीत नाहीं, विचार करण्यास फार वेळ घेणें हें बुद्धिमांद्याचें लक्षण समजण्याचे ऐवजीं त्यांतच कांहीं लोकांना मोठा डौल वाटतो.

या सर्व दोषांचा परिणाम व्हावयाचा तसाच झाला. आस्ट्रियानें स्वतःची तयारी होतांच एकदम स्वारी करण्याचें प्रसिद्ध केलें. अजून तरी सावध व्हावयाचें होतें; व एकराष्ट्रीयत्वाच्या तत्त्वानें प्रेरित होऊन जोर धरावयाचा होता. परंतु भ्याड व वयोवृद्ध पुढाऱ्यांच्या मूर्खपणापुढें सर्व व्यर्थ झालें. तरुण लोकांस अवसान चढलेलें असूनही तें या क्षैण लोकांनीं ठार मारिलें. व वर्तमानपत्रांपैकीं कोणीं लढाईचें नांव काढलें कीं, त्याला कडक शिक्षा करण्याचा हुकूम सुटला. ऑस्ट्रियानें मॉडनावर स्वारी केली. तेव्हां बोलोग्ना शहरानें जाहिरनामा काढिला कीं, " मॉडेनीज लोकांच्या संकटाशीं आपला कांहींएक संबंध नाहीं. व म्हणून त्या लोकांनीं योजिलेल्या युद्धपद्धतींत आपण मिसळण्याचें कांहींएक कारण नाहीं, त्यांच्यावर आणीबाणीची वेळ आली आहे !" मॉडेनावर आणीबाणीची वेळ आली असतांनाही बोलोग्नाला वाटलें कीं

आपल्यावर कांहीं आणीबाणीची वेळ आली नाहीं! सैन्य ठेवावयाचा नियम पुढें आला असतां धुडकावला गेला. दुसरीं शहरें स्वतंत्रतेंतून पारतंत्र्यगर्तेत ढांसळत असतां बोलोग्नाला स्वस्थ बसावेंसें वाटलें. कारण त्याचें स्वातंत्र्य कायदेशीर अर्जावर अवलंबून होतें! अखेर २० तारखेला बोलोग्नाच्या दरवाज्यावर ऑस्ट्रियानें लाथ मारिली! तरी कायदेशीर चळवळ कायमच होती. पुढाऱ्यांना अजून वाटत होतें कीं, पूर्वींचीं वचनें कायम ठेवलीं जातील! त्या सर्व वचनांना गुंडाळून ठेवून ऑस्ट्रियानें परवशतेच्या शृंखलेंत पुन्हां सर्वांना पक्कें आंवळून टाकलें!!!

१८२० व १८३१ या वेळच्या दुर्दैवी उठावण्यांच्या इतिहासाचें वरील धर्तीनें पर्यालोचन केल्यावर भावी प्रयत्नांत काय काय चुक्या टाळल्या पाहिजेत हें मीं ठरविलें. इटालियन लोकांतील बहुतेक जण क्रांति व तिचे पुढारी यांचें निरनिराळें परीक्षण करण्यास विसरल्यामुळें वरील पराजयांपासून निराशेशिवाय दुसरें कांहीं शिकले नाहींत.

माझी पक्की खात्री झाली कीं, यश येण्यास फक्त योग्य दिशेचा अवकाश आहे. **सर्वांत मुख्य चुकी घडत होती ती ही कीं, बंडाचें पुढारीपण ज्यांनीं त्याला आरंभ केला नव्हता अशा लोकांना देण्यांत येई.** तरुण लोक व सामान्य वर्ग यांनींच इटलीच्या प्रत्येक क्रांतीला आरंभ केलेला आहे. परंतु त्यांनीं थोड्या कालांतच वृद्ध लोकांना पुढारीपणावर बसवून दिलेलें आहे. वयोवृद्ध लोकांच्या सल्यानें चालावें हा नियम समाजाच्या सामान्य स्थितीमध्यें योग्य आहे. परंतु विलक्षण कालक्रांतींत वृद्ध लोक साहजिक रीतीनेंच अयोग्य ठरतात. कारण **क्रांतीला आरंभ तरुणांकडून व मध्यवर्गाकडून होतो.** पुढें जेव्हां पहिलीं महत्संकटें दूर होतात, व क्रांतिपक्षास जय येतो, तेव्हां हलकेच हे वृद्ध लोक पुढें सरकतात. व पहिल्यास झुगारून देऊन आपण अधिकृत होतात. जी त्यांची नसते त्या क्रांतिकल्पनेचे हे मार्गदर्शक होतात. जो यांनीं जुळवून आणलेला नसतो तो बेत पुरा करावयास हे पाहतात व ज्यांचा अभ्यास यांनीं जन्मांत केलेला नसतो अशा अडचणी व परिस्थिति, अवमान व स्वार्थत्याग, यांच्यावर ताबा ठेवावयास पाहतात.

यांचें सर्व शिक्षण जुन्या विचारपद्धतीनें झालेलें असतें. यांचा तारुण्यावरचा विश्वास उडालेला असतो. यांचा उदारमतवादीपणा म्हणजे हल्लीं इटलींत जीव भरून असलेल्या नेमस्तपणा (Moderation हे नांव इटली-

तील एका पक्षाला देत होते. ) प्रमाणेंच असे. कारण तेहि या नेमस्तांसारखेच भ्याड व दुर्बल; बारिकसारिक मुद्यांवर घासाघीस करणारे; कायदेशीर चळवळीच्या नेभळ्या प्रतिकारावर अवलंबणारे; परंतु नैसर्गिक हक्कांच्या मूलतत्त्वापर्यंत जाण्याची धमक नसणारे—असे असत.

हे लोक पुढारीपणावर येतांच आपल्या हाताखालीं अधिकारीही आपल्या मताचे असे निवडतात. पिढीजाद लोक, वकील, प्रोफेसर वगैरेंतून निवड केली जाते. अर्थात् त्यांपैकीं सर्वजण दुबळे असून त्यांच्यांत राज्यक्रांतीला लागणारी धमक, हिंमत व अक्कल हीं मुळींच नसतात. आमचे तरुण लोक अनुभवानें व विश्वासानें हातीं सत्ता देऊन मागें सरतात. त्यांनीं हें विसरूं नये कीं, **स्वतंत्र अंतःकरणांच्या महत्वाकांक्षा व गुलामांच्या महत्वाकांक्षा यांत फार मोठें अंतर असतें; व म्हणूनच गुलामांचे प्रतिनिधित्वाला योग्य ठरलेल्या या जुन्या लोकांनाच स्वतंत्रतेचें पुढारीपण केव्हांही करतां येणार नाहीं.**

या सर्व गोष्टींचा विचार करून अखेर मीं माझ्या अंतःस्फूर्तीनें चालण्याचें ठरविलें. व ' तरुण इटली ' च्या संस्थापनेला आरंभ केला.

# भाग दुसरा.

## तरुण इटली.

( La Giovine Italia ).

**मावळे—** श्रीमत्स्वातंत्र्याचा ठेवा कैसा मिळवावा ।
अम्हां नसे रे ठावा **शिवबा** कवण देव ध्यावा ॥
**शिवराय—** करी ती धरा भक्त शंकरा भवानि तलवार ।
अविंध सारा चिरा चरचरा व्हाल दास्यपार ॥
'**गोविंद.**'

( तरुण इटलीची स्थापना करते वेळीं खालील नियम प्रत्येक सभासदाला पाळावे लागत. ज्यांचीं मतें खालीं दिलेल्या सर्व तत्त्वाना अनुकूल असतील त्यांनाच सभासद होतां येत असे. त्या मतांचा सूत्ररीत्या निष्कर्ष काढण्यासाठीं खालील लेख मॅझिनीनें लिहिला आहे. त्यांतील प्रत्येक शब्द म्हणजे इतिहासशास्त्रांतील एकेक महत्तत्त्व आहे प्रत्येक वाक्य हें एक स्वतंत्र व्याख्यान आहे. व तो सर्व लेख मेलेल्या राष्ट्रांचा संजीवनीमंत्र आहे. )

## तरुण इटलीच्या सभासदांसाठीं सामान्य दिग्दर्शन.

'स्वतंत्रता–समता–मानुषता–दास्यमुक्तता–राष्ट्रैकता.'

### खंड १.

ज्यांचा **प्रगति व कर्तव्य** या दोन महत्तत्त्वांवर विश्वास आहे, अशा इटालियनांची 'तरुण इटली'ही सहकारी संस्था आहे. हिचा असा दृढ विश्वास आहे कीं, इटली ही एकराष्ट्र होणारच होणार. त्या एकराष्ट्रीयत्वाची प्राप्ति करून घ्यावयास ती आत्मसमर्थ आहे. तिच्या आजपर्यंतच्या प्रयत्नांतील अपयशाचें खरें कारण तिचें अंतर्दुर्बलत्व नसून तिच्या क्रांतिशक्तीची दिशाभूल हें होय. एकवटून व एकसारखे प्रयत्न करीत राहणें यांतच विजयाचें रहस्य भरलेलें आहे. अशा विश्वासानें जे या संस्थेचे सभासद झाले आहेत त्यांचें मुख्य उद्दिष्ट इटली देशाला स्वतंत्र करून तीमध्यें स्ववश व समसमान लोकांची एक राष्ट्रसत्ता उत्पन्न करणें हें होय. इटलीच्या या स्वातंत्र्यासाठीं, या राष्ट्रैक्यासाठीं व ह्या लोकसत्तेसाठीं आम्हीं आमचें बुद्धिसामर्थ्य व कृतिसामर्थ्य सर्वस्वी अर्पण केलेलें आहे.

## खंड २.

इटली देशाच्या मर्यादा आम्ही अशा समजतों. १ यूरोपखंडाला लागून असलेली व पुढें द्वीपकल्पाकृति झालेली, जिच्या उत्तरमर्यादेला आल्प्स् पर्वत वर्तुलाकृति पसरलेला आहे, दक्षिण भागीं जी समुद्रवलयांकित आहे, पश्चिम दिशेला व्हरो नदीचें मुख आहे व जिच्या पूर्वसीमेवर ट्रिस्टी नगर वसलेलें आहे. २ व जीं लगत्याचीं बेटें तेथील लोकांच्या मातृभाषेनें इटलीचेच भाग म्हणून ठरत आहेत व राज्यपद्धतीची योग्य रचना झाली असतां जीं इटलीच्या राष्ट्रैक्यसीमेंत आल्यावांचून रहाणें अशक्य आहे, तीं सर्व बेटेंही इटली देशांतच मोडतात.

'राष्ट्र' शब्दाचा अर्थ असा आहे कीं, सर्वसंमतीनें एकजीव झालेले व एकाच शासनपद्धतीनें शासित असलेले सर्व इटालियन लोक.

---

## खंड ३.
## संस्थेचीं मूलतत्त्वें.

कोणत्याही संस्थेची सुरक्षितता, उपयुक्तता व भरभराट हीं तिच्या उद्दिष्ट लक्ष्याच्या निश्चिततेवर, स्पष्टतेवर व सुव्यक्ततेवर अवलंबून असतात.

कोणत्याही संस्थेचें बल हें तिच्यांतील सभासदांच्या नुसत्या संख्येवर अवलंबून नसतें; तर त्या सभासदांच्या एकवाक्यतेवर अवलंबून असतें. ज्या मार्गानें जावयाचें त्याबद्दल पूर्ण संमति व वेळ येतांच सर्वजण एकजिवानें, एकदिलानें व खांद्याशीं खांदा भिडवून एका झेंड्याखालीं अभेद्य व्यूह रचतील अशी खात्री, ह्या गोष्टींतच खरें सामर्थ्य असतें.

ज्या क्रांतिकारक संस्थांमध्यें निरनिराळ्या विरुद्ध मताचे लोक घेतले जातात व ज्यांच्यापुढें निश्चित कार्यक्रम असा नसतोच त्या संस्था नाश करीतोंपर्यंत जरी एकमताच्या दिसल्या तथापि लढाईच्या दुसऱ्याच दिवशीं त्या चळवळीला योग्य वळण देण्यास समर्थ नसल्यानें, आपसांतील यादवीनें त्यांचा अंत होईल. व ही यादवी उद्देशाच्या व क्रियेच्या एकरूपतेची जितकी ज्यास्त महती असेल तितकी जास्तच माजत जाईल.

प्रत्येक तत्त्वामध्यें त्याच्या साधनांचाही अंतर्भाव होतो. हेंच दुसऱ्या

रीतीनें सांगावयाचें म्हणजे जसें साध्य असेल तशींच साधनेंही असावयाचीं.

जोंपर्यंत क्रांति कां करावयाची, ती करुन काय मिळवावयाचें, हें निश्चित नसतें तोंपर्यंत ती घडवून आणण्याचीं किंवा तिला कायम रूप द्यावयाचीं साधनें हींही अनिश्चित व अपयशी अशींच असतात. दृढ विश्वासाशिवाय ती चळवळ कांहीं वेळ चालेल व म्हणूनच तिची प्रगतीही लटपटीत व मंद अशी राहील. भूतकालीं ही गोष्ट प्रत्ययास आलेलीच आहे.

एतदर्थ जी संस्था किंवा जी व्यक्ति यापुढें राष्ट्रक्रांतीच्या प्रवर्तनाला हात घालील तिला चळवळीच्या मुळाशीं काय आहे, व त्या क्रांतीचें पर्यवसान कशांत आहे, याचें स्पष्ट ज्ञान असलें पाहिजे. लोकांनीं शस्त्र उचलावें म्हणून जो आज्ञा करील त्यानें तें कशासाठीं उचलावयाचें हेंही सांगितलें पाहिजे. जो कोणी पुनरुज्जीवन करूं पाहील त्याच्यामध्यें श्रद्धा असली पाहिजे. जर त्या श्रद्धेचाच अभाव असेल तर तिचा बंदोबस्त करणें किंवा योग्य वळण देणें हें त्याला अशक्य होईल. अशा बेबंदशाहीचा आरंभ करण्यापलीकडे त्याचे हातून कांहीं एक व्हावयाचें नाहीं. कारण कशासाठीं झगडावयाचें व विजय मिळवून कशाची सिद्धि करावयाची ह्याचेंच अज्ञान असतां सर्व राष्ट्र असें केव्हांच रणांगणांत उतरणार नाहीं.

यास्तव, आमच्या ' तरुण इटली 'चें उद्दिष्ट, साध्य–ज्याच्यासाठीं तिला झगडावयाचें आहे तें लक्ष्य–कोणत्याही प्रकारची छपवाछपवी न करतां आम्ही आमच्या स्वदेशबांधवांस कळवीत राहूं.

**आमच्या संस्थेचा उद्देश राज्यक्रांति हा आहे.** तिचे प्रयत्न हे राज्यक्रांतीचे पूर्वीं व नंतरही शिक्षणात्मकच असतील. ज्या तत्वांचे शिक्षणानेंच राष्ट्रीय मन सुसंस्कृत करणें शक्य आहे व ज्यांच्या प्रभावानेंच इटलीचें पुनरुज्जीवन व रक्षण घडण्याचा संभव आहे अशा तत्वांचा व विचारांचा उद्बोध होण्यासाठीं तरुण इटली त्यांचें विवेचन करीत राहील.

तिला जें सत्य म्हणून वाटत आहे त्याचा उपदेश करणें हें तिचें कर्तव्य आहे, अशी ' तरुण इटली 'ची समजूत आहे. यांत ती कोणाचाही हक्क लुबाडून घेत नाहीं. राज्यक्रांतीला आरंभ करण्याचे आधीं कोणच्या मार्गानें इच्छित फल प्राप्त करून घेण्यासाठीं झटलें पाहिजे ह्याचा उपदेश करण्यांत; इटलीच्या समोर स्वातंत्र्ययुद्धाचें निशाण फडकत ठेवण्यांत; तो स्वातंत्र्य-समरांतील झेंडा हा स्वदेशाच्या पुनरुज्जीवनाची गुढी आहे अशी ज्यांची

खात्री असेल त्यांना त्यांना त्या झेंड्याखालीं येण्याचें आमंत्रण करण्यांत; व त्या स्वयंसेवकांचे सैन्याचा व्यूह रचण्यांत; ही संस्था आपलें कर्तव्य बजावीत आहे. परंतु तें निशाण स्वदेशाच्या भावी राष्ट्रीय झेंड्याचे ऐवजीं उभारण्याचा आमचा उद्देश नाहीं. जेव्हां हा आमचा इटली देश पूर्ण स्वतंत्र होईल व केवळ त्याचेंच असणारें स्वामित्व पुन्हां एकदां आपले हातीं घेईल, तेव्हां मग त्या भाग्योदयाचे दिवशीं तो आपलें स्वतःचें निशाण उभारील व कोणच्या तत्वांवर व नियमांवर राष्ट्रानें वागावें याबद्दलची स्वयंस्वतंत्र इच्छा तो प्रकट करील. स्वतंत्र स्वदेशाची ती इच्छा ही सर्वपूज्य व सर्वसंमत अशी राहील.

'तरुण इटली' ही **लोकसत्ताप्रिय व राष्ट्रैक्यवादी** आहे. ती लोकसत्ताप्रिय आहे, कारण तत्वतः परमेश्वराची व मानव्याची अशीच आज्ञा आहे कीं, प्रत्येक राष्ट्र हें सम व स्वतंत्र अशा देशबंधूंनीं बनलेलें असावें. व लोकसत्ताक राज्यपद्धतीशिवाय स्वदेशाची ही स्थिति अबाधित टिकवील अशी दुसरी राज्यपद्धतीच नाहीं.

कारण कीं, खरी खरी राज्यसत्ता म्हटली म्हणजे जें त्या अत्युच्च नीतिसिद्धांताचें प्रगमनशाली व अखंड असें निदर्शक असतें त्या राष्ट्रशरीरांतच प्रतिष्ठित झालेली असते.

कारण कीं, ह्या राष्ट्रशरीरांतून राज्यसत्ता काढून ती कोणत्याही विशिष्ट हक्काचे रूपानें एखाद्या विशिष्ट व्यक्तींत ठेवली व त्या व्यक्तीला सर्वांचे डोक्यावर चढविलें कीं, हीच अधिकाराची चटक इतर वर्गांतही पसरत जाते व मग त्या योगानें नागरिकांची समता नाश पावत जाऊन अखेर स्वदेशस्वातंत्र्य नष्ट होतें.

कारण कीं, एकदां सत्ताधीशत्व राष्ट्रपुरुषांतून निघून तें निरनिराळ्या भागांकडे गेलें कीं, दावादावीला आरंभ होतो व एकदां दावादावी सुरू झाली कीं, या निरनिराळ्या भागांत स्वामित्वाबद्दल लढाई जुंपलीच पाहिजे. एकदिल नाहींसें होऊन भेद तर माजलेच पाहिजेत. अविश्वास व द्वेष यांचा अंमल चढून राष्ट्राची प्रत्यक्ष जीवनशक्ति अशी जी त्याची एकतानता तिचा भंग झालाच पाहिजे.

कारण कीं, राजा म्हटला म्हणजे त्याचा लोकांशीं प्रत्यक्ष संबंध असणें शक्यच नसतें. तेव्हां लोकांचें पाठबळ नसल्यानें त्याला एक सरदारांचा मध्यवर्ती वर्ग निर्माण करावा लागतो. हा सरदारवर्ग झाला कीं, असमता व दुराचार हे राष्ट्रांत उत्पन्न झालेच म्हणून समजावें.

कारण कीं, निसर्गव्यवस्था व इतिहास या दोहोंचाही हाच उपदेश आहे कीं, राजा निवडण्याची पद्धति ठेविली कीं, बेबंदशाहीला आरंभ होतो; व तें संकट टाळण्यासाठीं राजाची आनुवंशिक पद्धति ठेविली कीं जुलमाला आरंभ होतो.

कारण कीं, जो जो राजा तो तो विष्णूचा अंश या दुष्ट समजुतीचा आतां नायनाट होत आल्यानें राजसत्तेमध्यें अधिकार बजावण्याची व एकी कायम ठेवण्याची धमक उरलेली नाहीं.

कारण कीं, यूरोपखंडभर उत्क्रांतिदर्शक अशीं जीं अनिवार्य रूपांतरें घडत चाललीं आहेत त्यांवरून हें स्पष्ट होत आहे कीं, लोकसत्तातत्त्वच सिंहासनारूढ होणार. व अशा स्थितीमध्यें इटलींत जर राजसत्ता स्वीकारिली तर तींतच लवकर घडणाऱ्या क्रांतीचीं बीजें पेरिलीं जातील.

'तरुण इटली' ही लोकसत्ताप्रिय आहे. कारण कीं, इटलीमध्यें वास्तविकरीत्या राजसत्तेचीं कांहींच चिन्हें अस्तित्वांत नाहींत. राजामध्यें व लोकांमध्यें सन्माननीय असा सरदारांचा वर्ग कायम नाहीं. सर्व इटलीला राष्ट्रीय स्वरूप देणारा व म्हणूनच सर्व देशाला ममत्व लावणारा असा एकही राजवंश हल्लीं कायम नाहीं. कारण कीं, आपल्या इटलीचा प्राचीन बाणा लोकसत्ताप्रियत्व हाच आहे. आपलीं श्रेष्ठ पूर्वस्मारकें लोकसत्तावादी आहेत. आपल्या राष्ट्रोत्क्रांतीचा सर्व इतिहास लोकसत्ताप्रिय आहे. व जेव्हां आपल्या देशांत राजसत्तेला प्रारंभ झाला तेव्हांच नाश, परसत्तेच्या अवलंबनानें आलेली अवनति, लोकद्वेष व राष्ट्रैक्याचा बीमोड यांचाही आरंभ झाला.

कारण कीं, इटलींतील **लोक हे एका मनुष्याला राज्य मिळावें म्हणून केव्हांही लढणार नाहींत. कोणच्याही एका संस्थानाला राज्यपद देण्यास इतर संस्थानांचे हक्क नष्ट करतां येणार नाहींत; व ते संयुक्तसंस्थानपद्धतीचा हट्ट सोडणार नाहींत. परंतु या व्यक्ति-महत्त्वाचे ऐवजीं जर असें एखादें महत्तत्त्व पुढें धरलें कीं त्या तत्वाचे अनुगमनानें स्थानिक महत्त्वाकांक्षा गळून पडतील, तर त्या तत्वासाठीं सर्व इटालियन लोक आनंदानें एक होऊं शकतील. असें सर्वसंमत होणारें लक्ष्य म्हणजे लोकसत्ताकपद्धति होय.**

कारण कीं, सर्व राष्ट्रानें उठावणी करावी असें लोकमत तयार होण्यास एकच उपाय आहे. ज्याच्या योगानें त्यांचें प्रत्यक्ष रीतीनें कल्याण होईल व

त्यांचे जन्मसिद्ध हक्क परत मिळतील असेंच एखादें उद्दिष्ट लोकांच्या तत्काल पसंतीस पडेल. म्हणून लोकसत्ता हीच त्यांची आशा असली पाहिजे.

कारण कीं, हल्लीं सर्व संस्थानांची स्थिति ही खेळांतील बाहुल्याप्रमाणेंच असल्यानें आपल्या राष्ट्रीय स्वतंत्रतेच्या पवित्र प्रयत्नांत त्यांच्या भ्याडपणामुळें व दुष्ट नीतीमुळें त्यांचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. म्हणून रणांगणांत उतरून आपण लोकांना हांक मारली पाहिजे. **आपण जनपदालाच त्या स्वातंत्र्याच्या व लोकसत्तेच्या श्रेष्ठ तत्वांचा उच्चार करून चैतन्यपूरित केलें पाहिजे.** व यूरोपखंडभर होणाऱ्या क्रांतीच्या प्रत्येक प्रादुर्भावांत जें प्रकटीभूत झालेलें आहे, तें लोकसत्तातत्त्वच अंगिकारिलें पाहिजे.

या सर्व कारणांसाठीं 'तरुण इटली' ही लोकसत्ताप्रिय आहे. इटली स्वतंत्र करून तीमध्यें लोकसत्तापद्धति स्थापण्याचा तिचा अंतिम हेतु आहे.

तरुण इटलीही राष्ट्रैक्यवादी आहे.

कारण, ऐक्याशिवाय खरें खरें राष्ट्रत्व संभवतच नाहीं.

कारण, राष्ट्रैक्याशिवाय खरी शक्तिमत्ता कधींहि येणारी नाहीं. व इटली देश हा समर्थ, एकीकृत व महत्वाकांक्षी अशा राष्ट्रांच्यामध्यें बसला असल्यानें तिला तर सर्व गोष्टींचे आधीं शक्तिमत्ताच मिळविली पाहिजे.

कारण, एकराष्ट्र करण्याचे ऐवजीं जर संयुक्तसंस्थानपद्धति स्वीकारली तर स्विट्झलंडप्रमाणेंच इटली देशहि दुर्बलतेंत राहील. व शेजारच्या कोणत्या तरी राष्ट्राच्या कह्यांत त्यास वागावें लागेल.

कारण, **सर्व देश एक राष्ट्र आहे अशी स्थिति झाल्याशिवाय निरनिराळे लोक एकमेकांवर प्रेम करणार नाहींत. व संयुक्तसंस्थानपद्धतीचा अंगिकार केल्याबरोबर नुकतेच मावळत चाललेले स्थानिक व प्रांतिक अभिमान वाढत जाऊन इटली पुन्हां मध्ययुगांतल्या अंतर्गत यादवींत जाऊन पडेल.**

**कारण, संयुक्तसंस्थानपद्धति ही इटली देशाचें विस्तृत क्षेत्र मोडून त्याचे लहान लहान तुकडे करील, व हे तुकडे झाले कीं, ह्या आकुंचित क्षेत्रांमध्यें मत्सर सुरू होईल; व पुन्हां राजेलोकांच्या जुलुमाला आरंभ होईल.**

कारण, संयुक्तसंस्थानपद्धति ही इटली देशाच्या नैसर्गिक राष्ट्रकुटुंबत्वाचा विध्वंस करून इटली देशाला मनुष्यजातीच्या उत्क्रांतींत जें महत्कर्तव्य

करावयाचें आहे त्याच्या मुळावरच घाव घालील. अर्थातच गुप्त
कारण, यूरोपखंड हें प्रगमनात्मक रूपांतरातून जात असतनें दिलें जाईल.
व एकीकृत राष्ट्रें बनत चाललीं आहेत. व यावरून अनिवार्या जाणाऱ्या व
असा हाच सिद्धांत निघतो कीं, मनुष्यजातीनें विस्तृत केल्या द्रव्यनिधीस
घटना करावी. ...टपट करतील.

कारण कीं, इटलीमध्यें अंतर्गत मुख्यांचें मुख्य कर्तव्य हेंच होय कीं,
सूक्ष्म रीतीनें अभ्यास केला असतां अ
पासून राष्ट्रैकतेकडेच इटलीची प्रवृत्ति ही सर्व गुप्तपणें केली जाईल. तिच्या-
कारण कीं, राष्ट्रैक्याविरुद्ध जे जे इटलींत व इटलीच्या बाहेरही अत्यंत
घेतलें जातें कीं, मुख्य सरकार प्रत्येक
जुलूम करूं लागेल. 'तरुण इट-ली कीं, योग्य संधी पाहून बंडास आरंभ
म्हटली म्हणजे त्यांत कोणच्य हें नेहमीं राष्ट्रीय ठेवलें जाईल. त्या बंडाचा
कारितां, व सर्वसंमतता यांचा येईल कीं, त्यांत भावी राष्ट्रैक्याचीं बीजें अंकु-
हात्म्य हें पवित्र आहे. 'तरुण चा आरंभ कोणत्याही ठिकाणीं जरी झाला
व्यवस्थेच्या रचनेंत प्रत्येक प्रांता पुढें धरलेलें साध्य हीं एकराष्ट्रीयच अस-
बुद्धीनें सन्मानिली जावी, परंतु केलेलें असल्यानें तें राष्ट्राचे नांवानेंच केलें
इटलीदेश एकीभूत व केंद्रीभूत व्हा त्या गेलेल्या जनपदावरच सर्व भरंवसा
नात्यानें त्यानें वागावें. एतदर्थ 'त सर्व राष्ट्र स्वतंत्र करणें हा होय. आमचा
अशा रीतीनें तरुण इटलीचीं मूल लकानें मंडित व्हावा अशी आमची
लिक परिणाम यांचें हें साररूप दि जरी एखाद्या विवक्षित प्रांतांत
धर्ममत आहे. व ज्यांची या राष्ट्रीय ...दास्यमुक्त करण्यासाठीं
स्वीकारावयास कबूल असतील त्यांनाच 'तरुण इटली' ते ...पुढें व स्वारी
या मूलभूत तत्त्वाचा बारिक सारिक प्रश्नांत कसा उपयोग ...रीत राहूं.
व त्या तत्त्वांपासून व त्या विविध प्रश्नांपासून उत्पन्न होणाऱ्या चा पाया
घटनांची कशी व्यवस्था करावयाची वगैरे मुद्दे हे 'तरुण इटली' ...
आपल्या पूर्ण विचारांत घेत आहे व घेत जाईल. अशा दुय्यम प्रतीच्या
मुद्यांचा निकाल करतेवेळीं सभासदांचें म्हणणें ऐकलें जाईल व त्यांच्या
मतभेदांची योग्य रीतीनें वासलात लावण्यांत येईल.

ही संस्था वरील मुख्य तत्त्वांचे स्पष्टीकरणार्थ व प्रसारार्थ वेळोवेळीं लेख
प्रसिद्ध करीत जाईल. या लेखमालेंत या तत्त्वांचा व तदंगभूत सर्व महत्त्वाच्या

मनुष्यजातीचें नियमन करणाऱ्या उत्क्रांतिनियमाला लीच्या ऐतिहासिक प्रवृत्तीला धरून केला जाईल.

र्व राष्ट्रांना सामान्य असणारीं अशीं जीं महतत्त्वें तरुण इटलीचे सदांस मान्य आहेत व वर सांगितलेल्यापैकीं जीं इटलीलाच लागू असणारीं विशिष्ट तत्त्वें आहेत, तीं सर्व दीक्षा देणाऱ्यांकडून दीक्षा घेणाऱ्यांना स्पष्टीकरण करून सोप्या रीतीनें शिकविलीं जातील. दीक्षा घेणारे दीक्षित होतांच तींच तत्त्वें शक्य त्या त्या मार्गानें सर्व इटालियन लोकांस उपदेशितील.

दीक्षाधिकारी व दीक्षितवर्ग या दोघांनींही हें पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, प्रत्येक तत्त्वाप्रमाणें नैतिक आचरण हें अत्यंत महत्वाचें आहे. **नीतीशिवाय नागरिकत्व शक्य नाहीं.** कोणच्याही पवित्र महत्कार्याला आरंभ करतांना पहिली गोष्ट म्हणजे सद्गुणानें आपली अंतःशुद्धि करून घेणें ही होय. जेव्हां आपण शिकवितों त्या तत्वांचा व दैनिक कृत्यांचा मेळ बसत नाहीं, जेव्हां ‘ जगीं बोलण्यासारखें चालणें ’ होत नाहीं तेव्हां तीं तत्वें प्रसृत व्हावीं म्हणून केला जाणारा प्रयत्न हें केवळ ढोंग असतें. हें अत्यंत भ्रष्टतेचें चिन्ह केवळ सद्गुण व पवित्राचरण यांनींच ‘ तरुण इटली ’ला इतरांस आपल्या मतांकडे वळवितां येईल. जर जे आपलीं मतें मान्य करीत नाहींत त्यांच्याहून अत्यंत श्रेष्ठ अशा आचारानें आपण भूषित नसलों, तर आपण एका अभागी व हट्टी पंथाचे अनुयायी ठरूं. परंतु ‘ तरुण इटली ’ हा एक अभागी तट किंवा हट्टी पक्ष नसून तो राष्ट्रधर्म आहे, ती देवदूतांची समिती आहे !

व आपण इटली देशाच्या भाग्यरवीचे अरुण आहोंत. इटलीच्या राष्ट्रधर्माची मुहूर्तमेढ रोंविणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे.

## खंड ४.

आतां ज्या साधनांनीं ह्या वर सांगितलेल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या श्रेष्ठ उद्देशाची सिद्धि करावयाची आहे, तीं **साधनें दोन आहेत–शिक्षण व उठावणी.** ह्या दोन साधनांचा उपयोग समकालींच सुरू राहील व त्यांची पूर्ण एकतानता करण्यांत येईल. शिक्षण हें उदाहरणानें, वक्तृत्वानें व लेखणीनें दिलें जाऊन त्याचा सर्व रोख उठावणीचें महत्त्व व आवश्यकता हीं लोकांचे मनांत ठिबविण्याकडे राहील. उठावणी ही शक्य तेव्हां तेव्हां अशा रीतीनें केली जाईल कीं, तिच्या योगानें राष्ट्रीय मनाला उच्च प्रकारचें शिक्षण दिलें जावें.

स्वातंत्र्ययुद्धाचें व स्वातंत्र्यप्रीतीचें शिक्षण इटलीमध्यें अर्थातच गुप्त रीतीनें दिलें जाईल. परंतु इतर देशांमध्यें तें उघड उघड रीतीनें दिलें जाईल.

'यंग इटली'चे सभासद हे, त्या संस्थेकडून छापविल्या जाणाऱ्या व करविलेल्या लेखमालेचा खर्च भागविण्यासाठीं उभारलेल्या द्रव्यनिधीस यथाशक्ति मदत देतील व ती पाठविण्याची खटपट करतील.

जे देशभक्त हद्दपार झालेले आहेत, त्यांचें मुख्य कर्तव्य हेंच होय कीं, त्यांनीं राष्ट्रधर्मप्रवर्तनसमिति स्थापावी.

बंडाला आरंभ करण्याची तयारी ही सर्व गुप्तपणें केली जाईल. तिच्याबद्दलचें शिक्षण व तिची माहिती हीं इटलींत व इटलीच्या बाहेरही अत्यंत गुप्तरीतीनें दिलीं जातील.

'तरुण इटली'ची पूर्ण तयारी झालीं कीं, योग्य संधी पाहून बंडास आरंभ केला जाईल. त्या बंडाचें स्वरूप हें नेहमीं राष्ट्रीय ठेवलें जाईल. त्या बंडाचा कार्यक्रम असाच ठरविण्यांत येईल कीं, त्यांत भावी राष्ट्रैक्याचीं बीजें अंकुरित केलीं जावीं. ह्या उठावणीचा आरंभ कोणत्याही ठिकाणीं जरी झाला तरी उभारलें जाणारें निशाण व पुढें धरलेलें साध्य हीं एकराष्ट्रीयच असतील. तें बंड हें राष्ट्रसंघटनेसाठीं केलेलें असल्यानें तें राष्ट्राचे नांवानेंच केलें जाईल. व आजपर्यंत तिरस्कृत केल्या गेलेल्या जनपदावरच सर्व भरंवसा ठेवला जाईल. त्या बंडाचा उद्देश सर्व राष्ट्र स्वतंत्र करणें हा होय. **आमचा सर्व इटली देश हा स्वातंत्र्यतिलकानें मंडित व्हावा अशी आमची इच्छा असल्यानें बंडाचा प्रारंभ जरी एखाद्या विवक्षित प्रांतांत झाला तरी आमच्या इतर देशबंधूंना दास्यमुक्त करण्यासाठीं आम्हीं आमचे स्वतःचे प्रांतापुरतेंच न पाहतां बाहेर पडूं व स्वारी करून चोहोंकडे एकदम उठावणी करण्याची व्यवस्था करीत राहूं.** या क्रांतीचा प्रसार जितक्या जास्त भागावर करतां येईल, तिचा पाया जितका जास्त रुंदवितां येईल व ती प्रसृति व तें रुंदविणें हें जितकें झपाट्यांत करतां येईल तितकें करण्याचा प्रयत्न केला जाईल.

स्वदेशस्वातंत्र्याची खरी महती लोकांना कळावी व त्यांच्या हृदयमंदिरांत स्वदेशाची मूर्ति सहानुभूतीच्या व दिव्य प्रेमाच्या कमलांत आरूढ व्हावी असा आमचा उद्देश असल्यानें उभारलेली क्रांतीची लढाई ही अशा रीतीनें चालविली जाईल कीं, **स्वदेशहित हेंच आपलें हित** अशी सर्व लोकांची दृढ श्रद्धा व्हावी.

**आमची अशी पक्की समजूत आहे कीं, आमची ही पितृभूमि स्वतःचें स्वातंत्र्य मिळविण्यास सर्वसमर्थ आहे.** जर एक राष्ट्र निर्माण करावयाचें असेल तर राष्ट्रनिष्ठा ही प्रथम उत्पन्न केली पाहिजे; ती राष्ट्रनिष्ठा परक्यांच्या सहाय्यानें मिळविलेल्या पूर्ण अशा जयानेंहि कधीं उत्पन्न होणार नाहीं; जी उठावणी परक्यांचें आधारावर केलेली असते तिचें प्रारब्धही त्या परक्यांचे परिस्थितीवर अवलंबून असल्यानें तिला जय येईलच याची निश्चितता व शाश्वतता मुळींच धरतां येत नाहीं; या सर्व ऐतिहासिक सत्यांत आमचा पूर्ण विश्वास असल्यानें 'तरुण इटली' ही परक्यांच्या मदतीचा शक्य तितका फायदा घेण्यास जरी सोडणार नाहीं तथापि आमच्या उठावणीची वेळ, स्थळ, व स्वरूप हीं आमचीं आम्हींच ठरवूं. कोणत्या मार्गानें जावयाचें हें आपणच ठरविलें पाहिजे.

क्रांतिप्रिय यूरोप हा बंडाचें निशाण फडकण्याची वाट पहात आहे. मग तें निशाण इटलीनें कां फडकवूं नये ? कोणी तरी आरंभ करण्याचीच खोटी आहे. मग तो आरंभ इटलीनेंच कां करूं नये ? परवशतेचे पाश तोडण्यासाठीं 'तरुण इटली' ला ज्या क्षेत्राकडे जावयाचें आहे तें क्षेत्र अजून कोणाच्याही पादस्पर्शानें विटाळलेलें नाहीं. परदास्याचा नाश करण्यासाठीं 'यंग इटली' नें जो प्रयोग करण्याचें योजिलें आहे तो प्रयोग अजून कोणीच केलेला नाहीं. आजपर्यंत जेवढी उभारणी करण्यांत आली तेवढी फक्त एका विशिष्ट वर्गानें केलेली आहे. तींत जानपद मिळालेलें नव्हतें. परंतु आतां राष्ट्राचा एकच भाग चळवळ करीत नसून त्याचा विराट् देह हा नखशिखांत चैतन्ययुक्त होऊन उभा टाकणार आहे. रणांगणावर तो विजयी होणारच !

कारण **जय येण्यासाठीं जिची उणीव होती ती गोष्ट आमचें दुर्बलत्व नसून आमच्यांतील आत्मनिष्ठेचा अभाव ही होय. परंतु जेव्हां एकदां या आत्मनिष्ठेनें युक्त असलेले व आतां स्वातंत्र्यच पाहिजे अशी प्रतिज्ञा केलेले इटली देशाचे दोन कोटी लोक दंड ठोकून उभे राहतील तेव्हां त्यांना काय करणें शक्य आहे ? आतां परदास्याची बेडी तोडावयाचीच म्हणून जेव्हां दोन कोटी लोकांचें राष्ट्र प्रण उचलतें तेव्हां त्या बेडीचे तुकडे उडालेच पाहिजेत.**

ही आत्मनिष्ठा व हें स्वातंत्र्यप्रेम उत्पन्न करण्याचें पहिलें कर्तव्य प्रथम

त्या मतांच्या उपदेशानें व नंतर जोमाची उठावणी करून पार पाडलें जाईल. **प्रथम मनःप्रवर्तन व नंतर उठावणी केली जाईल.**

'तरुण इटली' चें असें मत आहे कीं, उठावणी व क्रांति यांच्यामध्यें अंतर आहे. उठावणीचा जय झाला म्हणजे क्रांतीला प्रारंभ होतो. म्हणून पहिली उठावणी होऊन बंडाला आरंभ होण्यांत व इटलीदेश पूर्ण स्वतंत्र होण्यांत जो मध्यवर्ती काळ लागेल, त्या अवधींत एका तात्पुरत्या व थोड्या लोकांच्या हातांत केंद्रीभूत झालेल्या अशा सत्तेचा अंमल चालेल.

परंतु मातृभूमि एकदां स्वतंत्र झाली कीं, मग प्रत्येक अधिकार राष्ट्रीय समितीच्या हातीं दिला जाईल. ही राष्ट्रसमिति हाच राष्ट्राधिकाराचा उगम असल्यानें प्रत्येक जण तिची आज्ञा शिरसामान्य करील.

**स्वातंत्र्ययुद्ध हें गनिमी काव्याच्या पद्धतीनें केलें जाईल.**

सबल परक्या सत्तेचा धुव्वा उडवून देऊन ज्यांना स्वदेश मुक्त करावयाचा असेल त्यांनीं गनिमी काव्याचीच युद्धपद्धति योजिली पाहिजे. लढाईच्या आरंभीं परसत्तेचा डोळा चुकवून शिस्तवार सैन्य तयार करणें अशक्य असते. परंतु गनिमी काव्याच्या पद्धतीनें ती उणीव भरून काढतां येते. या काव्यांत **लहान लहान टोळ्यांचीच जरूर असल्यानें त्या तावडतोब तयार करतां येतात.** व त्यांच्या सुटसुटितपणानें परक्यांची नजर सहज चुकवितां येते. दुसरा फायदा असा होतो कीं, गनिमी काव्याच्यीं टोळकीं ठिकठिकाणीं पसरलेलीं असल्यानें शत्रूस फार मोठें सैन्य रणांगणावर आणावें लागतें. परंतु त्याला भंडावून सोडण्यास लहान लहान टोळ्याही समर्थ होतात. सारांश, **शत्रूच्या अतिशय मोठ्या सैन्याला देशोद्धारकांच्या अतिशय लहान सैन्यानें गुंतवून टाकतां येतें.** तिसरा फायदा असा कीं, पारतंत्र्यामध्यें लोकांस लष्करी शिक्षण देणें अगदीं अशक्य होतें व लष्करी शिक्षण लोकांस मिळाल्याशिवाय पारतंत्र्य संपत नाहीं. अशा या वर्तुलाकार कोटिक्रमाचा उच्छेद करावयास गनिमी काव्याशिवाय दुसरें शस्त्र नाहीं. कारण, गनिमी काव्याला आरंभ करावयास फार थोडें लष्करी शिक्षण लागतें. तें इतक्या बेताचें असतें कीं, पारतंत्र्यांत तें सहज देतां यावें. परंतु एकदां या काव्याच्या युद्धपद्धतीला आरंभ झाला कीं, बाकीचें लष्करी शिक्षण स्वानुभवानें व आपोआपच मिळूं लागून राष्ट्र युद्धक्षम बनतें. तेव्हां **पारतंत्र्यांतील सर्व दाबादाबीला गुंडाळून ठेवून राष्ट्राला**

**लष्करी शिक्षणांत तरबेज करण्यास गनिमी कावा हा एकच मार्ग** आहे. चवथा फायदा असा आहे कीं, बंडाचें यश हें त्याच्या प्रसृतीवर अवलंबून असतें व गनिमी काव्याच्या टोळया चहूंकडे भटकत ठेवणें शक्य असल्यानें ही प्रसृति ताबडतोब करतां येते. **गनिमी काव्यानें पितृ-भूमींत प्रत्येक पावलाला देशवीर्यत्वाच्या कृत्यानें पावनता येते;** प्रत्येक ठिकाण स्वातंत्र्ययुद्धाच्या संगतीनें राष्ट्रक्षेत्र बनतें; व असलें एकेक क्षेत्र स्वस्मृतीनें हजारों देशवीर उत्पन्न करीत जातें ! या युद्धपद्धतींत मोठें सैन्य सहसा जमवावें लागत नसल्यानें ज्यानें त्यानें आपापलें संरक्षण केलें तरी पुरेसें होतें व म्हणून पांचवा फायदा असा आहे कीं, **प्रत्येक ठिकाणीं लढाईचें तोंड जुंपलेलें असल्यानें स्थानिक शौर्याला आपली करा-मत दाखविण्याला झेंपेल इतकेंच क्षेत्र मिळतें.** शिवाय संधि सांप-डली किंवा जरूर पडली कीं, त्यांना चटकन् एकत्र होतां येतें. परंतु हा सुटसुटीतपणा शत्रूच्या शिस्तवार व अवजड सैन्यांत असणें अशक्य असल्यानें सहावा फायदा असा होतो कीं, **शत्रूंस जन्मांत माहीत नस-लेल्या युद्धपद्धतीनें घाबरून सोडतां येतें.** त्यांतही एकदां पराभव मिळालाच तर फारतर एखादी टोळी बुडेल, परंतु बाकी सर्व सुरक्षितच रहातील. म्हणून सातवा फायदा असा आहे कीं, **कितीही पराभव झाले तरी गनिमी काव्यानें लढत असतां निर्मूलन होण्याची केव्हांही भीति नसते.** पराभव होतोसा वाटला कीं गेलें पळून. जवळचा खजिना हरवावयाचा नाहीं किंवा शत्रूंस मोठी लूट सांपडावयाची नाहीं. सर्व टोळ्या ह्या एका उद्देशानें व एकाच स्वदेशप्रेमानें बद्ध असतात म्हणून त्यांच्यांत बेबंदशाही माजत नाहीं. परंतु त्या बहुतेक जमाव करून रहात नसल्यानें त्यांच्यापैकीं एखाद्या टोळीचा जरी मागमूस लागला तरी इतरांचे बेत सुरक्षित रहातात हा आठवा फायदा होय. **गनिमी काव्यानें राष्ट्रीय युद्धाचें विश्वासघातापासून संरक्षण करतां येतें.** व अशा रीतीनें एखाद्या स्थलीं विश्वासघात झाल्यानें किंवा शत्रूच्या तावडींत तें स्थळ सांप-डल्यानें मोठीशी नुकसानी होत नाहीं. कारण त्या युद्धाचा पाया हा एकाच ठिकाणीं नसतो. एखादें शहर सुटलें तर दुसरीकडे जाऊन दुसरें बळकावून बसतां येतें. यांत नववा फायदा होतो तो असा कीं, **एकाच निश्चित स्थलीं लढाईचा पाया ठेवला असतां जो अनर्थ घडण्याचा संभव असतो**

**तो सहज रीतीनें टाळतां येतो.** स्वातंत्र्यदेवीचे मंदिराकडे जावयास, बरोबर रीतीनें आक्रमण केल्यास, गनिमी कावा हा एकच मार्ग होय. गनिमी कावा हा अजिंक्य आहे. गनिमी कावा हा अविनाशी आहे. (इटलीच्या रामदासाचें हें गनिमी काव्याचें स्तोत्र वाचीत असतां, त्याचें मनन करीत असतां व त्याचें पठन करीत असतां कोणाला महाराष्ट्राच्या मॅझिनीची आठवण होणार नाहीं ? समर्थांचे उपदेशांत 'वृकयुद्धा' वर कटाक्ष ठेवलेला आहे. व श्रीमच्छत्रपतींपासून तों स्वातंत्र्यप्राप्तीच्या राजारामीय युद्धाचे अंतापर्यंत मराठेवीरांनीं ह्याच गनिमी काव्याचें अवलंबन केलें होतें. परंतु या इटलीच्या थोर पुरुषासारखे भविष्यवादी महात्मे आपल्यांतही उत्पन्न झाले होते याबद्दल अभिमान बाळगावा किंवा त्या महात्म्यांचा जन्म व उपदेश इटलीप्रमाणें सार्थ न करतां हिंदुस्थान पुन्हां जसें होतें तसेंच मेलेलें आहे याबद्दल लज्जा मानावी हें कांहींच कळत नाहीं ! ही राष्ट्रीय लज्जा केव्हां जाईल ? )

अशा रीतीनें युद्धाचा आरंभ गनिमी काव्यानें करावा. परंतु शक्य झाल्याबरोबर शिस्तवार सैन्याची रचना निवडक शिपाई मिळवून फार काळजीनें करूं लागावी. बंडानें आरंभिलेलें कार्य या सैन्याचे साह्यानें सुरू झालेलें क्रांतियुद्ध शेवटास नेईल.

लढाईचीं हीं मूलतत्वें सर्वत्र प्रसृत करण्यास 'तरुण इटली' चे सर्व सभासद झटून प्रयत्न करतील. ह्या तत्वांचें विवरण, स्पष्टीकरण व त्यांचा बंड चालू असतांना कसा उपयोग करावयाचा हें वेळोवेळीं तरुण इटलीच्या लेखमालेंतून प्रसिद्ध केलें जाईल.

## खंड ५

तरुण इटलीचे सर्व सभासद प्रत्येकीं दरमहा ५० सेंटियस् ( सुमारें सात आणे ) याप्रमाणें संस्थेच्या खजिन्याकडे देत जातील. ज्यांना अनुकूल असेल ते यापेक्षां जास्त रक्कम देण्याचें कबूल करतील.

## खंड ६

तरुण इटलीचे रंग श्वेत, रक्त व हरित् हे तीन आहेत. तरुण इटलीचें निशाण ह्या रंगत्रयीनें भूषित झालेलें असेल. त्याच्या एका बाजूवर स्वतंत्रता, समता, मानुषता, हें तत्वत्रय व दुसऱ्या बाजूवर राष्ट्रैकता व दास्यमुक्तता हें तत्वद्वय झळकत राहील.

## खंड ७

तरुण इटलीचा सभासद होऊं इच्छिणारा प्रत्येकजण, तरुण इटलीची दीक्षा घेते वेळीं आपल्या दीक्षागुरूंचे समक्ष खालील **शपथ** घेईल.

जगज्जनक **परमेश्वराला स्मरून**; माझ्या परमपवित्र **स्वदेशभूला स्मरून**; परक्या किंवा अंतर्गत शत्रूंच्या जुलमाला स्वदेशसंरक्षणाच्या पवित्र कार्यासाठीं जे जे देशवीर बळी पडलेले आहेत, त्या **देशवीरांना स्मरून**:—

परमेश्वरानें जे देशबंधु मला दिलेले आहेत, त्यांच्या प्रीत्यर्थ व ज्या देशामध्यें जन्म घेण्याचें महद्भाग्य माझ्या वांट्याला आलेलें आहे त्या देशमातेप्रीत्यर्थ, माझीं आवश्यक अशीं जीं कर्तव्यें आहेत त्या **कर्तव्यांना स्मरून**:—

जिनें माझ्या पूर्वजांना जन्म दिला व जीमध्यें माझीं मुलेंबाळें नांदावयाचीं आहेत त्या भूमीबद्दल मानवी प्राण्यांत निसर्गतः उत्पन्न झालेली जी पवित्र प्रीति त्या **देशप्रीतिला स्मरून**:—

दुष्टता, कुटिलता, अपहार, जुलूम व गुलामगिरी ह्यांच्याबद्दल मानवी प्राण्यांत निसर्गतः असलेला जो अत्यंत तिटकारा व द्वेष **त्या अधम द्वेषाला स्मरून**:—

**इतर स्वतंत्र देशांतील नागरिकांमध्यें मी उभा राहिलों असतां जेव्हां मला असें दिसून येतें कीं, मला नागरिकत्वाचे कोणतेच हक्क नाहींत, मला ज्याला माझा म्हणतां येईल असा स्वदेश नाहीं, व मला स्वदेशाचें निशाण नाहीं, तेव्हां जी अत्यंत लज्जा वाटून माझें तोंड काळें ठिक्कर पडतें त्या लज्जेला स्मरून**:—

स्वातंत्र्यासाठींच उत्पन्न झालेला असतांनाही माझ्या आत्म्याला त्याचा उपभोग घेतां येत नाहीं व सत्कृत्य करण्यासाठींच त्याची उत्पत्ति असतांनाही गुलामगिरीच्या भयाण व शून्यशब्द अशा कोंडवाड्यांत पडल्यानें माझ्या आत्म्यास तीं सत्कृत्यें करतां येत नाहींत, तथापि या स्वयंस्वतंत्र आत्म्याची जी निसर्ग प्रवृत्ति स्वतंत्रतेकडेच व सत्कृत्यांकडेच ओढा घेत आहे त्या माझ्या **निसर्ग प्रवृत्तींनां स्मरून**:—

आपल्या **पूर्वकालीन थोरपदाच्या स्मृतीला व प्रस्तुतच्या नीचतेला स्मरून**:—

स्वातंत्र्यकार्यासाठीं झुंजत असतांना फांशीवर, तुरुंगांत किंवा वनवासांत देहपात झालेल्या देशवीरांच्या मातांनीं जे अश्रू ढाळले आहेत **त्या पवित्र**

**अश्रूंना स्मरूनः—**

माझ्या कोट्यवधी बंधूंच्या तळमळणाऱ्या आत्म्यांना स्मरूनः—

मी अमुक एक मनुष्य—

परमेश्वरानें इटली देशाला जी विशिष्ट कामगिरी सांगितली आहे तीमध्यें व ती पूर्ण करण्यासाठीं प्रत्येक इटालियनानें झटलें पाहिजे या कर्तव्यामध्यें पूर्ण विश्वास ठेवूनः—

**जेथें जेथें ईश्वरी सत्तेनें 'येथें राष्ट्र निर्माण झालेंच पाहिजे' म्हणून आज्ञा केलेली आहे तेथें तेथें त्या राष्ट्राच्या निर्मितीची शक्तीही त्यानें उत्पन्न केलीच आहे.** ती शक्ति जानपदामध्यें वास्तव्य करीत आहे व जर त्या शक्तीचा उपयोग जानपदाकडून व जानपदासाठींच केला जाईल, तर विजयश्री माळ घालीलच घालील. असा माझा पूर्ण विश्वास असल्यानेंः—

क्रियाकर्तृत्व व स्वार्थत्याग हाच सद्गुण आहे आणि संहति व हेतुसातत्य हेंच सद्बल आहे असें जाणूनः—

मी ह्याच राष्ट्रधर्मानें चालणाऱ्या 'तरुण इटली' नांवाच्या संस्थेंत माझें नांव घालतों आणि अशी शपथ घेतों कीं, त्यांच्याबरोबर इटली देशाला एक, स्वतंत्र, दास्यमुक्त, व लोकसत्ताक राष्ट्र करण्याचा प्रयत्न मी आजन्म करीत राहीन.

'तरुण इटली' च्या उद्दिष्ट हेतूंचें, त्या हेतूंची पूर्तता करण्याचें जें एकच साधन त्या संहतीचें व ज्याच्याशिवाय विजयश्री सतत राहावयाची नाहीं अशा सद्गुणांचें शिक्षण हें मी स्वदेशबंधूंना वक्तृत्वानें, लेखानें, किंवा कृतीनें देत जाण्याचा प्रयत्न यथाशक्ति व शक्य तितका करीत राहीन.

यापुढें मी दुसऱ्या कोणत्याही संस्थेंत नांव घालणार नाहीं.

'तरुण इटली' च्या अंतिम तत्त्वांना धरून जेवढे हुकूम होतील तेवढे मी पाळीत जाईन. मी ह्या संस्थेचे सर्व नियम प्रसंगीं प्राण गेला तरी गुप्त ठेवीन.

माझ्या सहकारी बंधूंना उपदेश व कृति यांनीं साहाय्य करण्यासाठीं आतां व यापुढें आजन्म ही शपथ मी पाळीन.

व जर ही सर्व किंवा तिच्यांतील एक शब्द मीं विश्वासघात करून मोडीन तर ह्या माझ्या मस्तकावर परमेश्वराच्या कोपाचा भडिमार होवो! मनुष्यजाति माझा धिक्कार करो! व असत्य प्रतिज्ञेचें लांछन माझ्या तोंडास काळोखी लावो!!!

( अशा रीतीनें 'तरुण इटली' या संस्थेच्या कामाला आरंभ केल्यानंतर तिच्या 'शिक्षण व उठावणी' ह्या परस्परावलंबी कर्तव्यद्वयापैकीं पहिलें कर्तव्य प्रथम पार पाडलें पाहिजे होतें. व तें जितक्या प्रमाणानें उत्तम होईल तितक्या प्रमाणानें उठावणी यशस्वी होण्याचा ज्यास्त संभव होता. एतदर्थ राष्ट्रामध्यें स्वतंत्र व सत्यमार्गी विचारांची प्रसृति करून तरुणांच्या अंतःकरणांची एकवाक्यता करण्यास मॅझिनीनें "यंग इटली," "तरुण इटली," या नांवाचेंच पत्र मार्सेलिसला काढलें. मार्सेलिस हें फ्रेंचांचे हद्दींत असल्यानें मॅझिनी त्या 'तरुण इटली' पत्राच्या द्वारें स्वातंत्र्याचें शिक्षण उघड उघड रीतीनें देऊं लागला. त्या पत्राचे आरंभापूर्वी प्रसिद्धीपत्रक काढलें होतें तें अत्यंत महत्त्वाचें असल्यानें त्यांतील उतारे खालीं दिलेले आहेत. )

## 'तरुण इटली' चें प्रसिद्धीपत्रक

इटलींतून स्वदेशाची सेवा केल्याचे अपराधावरून ज्यांना स्वदेशत्याग करावा लागला आहे व जे हल्लीं परकीय देशांत कालक्रमणा करीत आहेत, त्यांच्या मतानें आजपर्यंत आपण बोललों तितकें पुरें आहे, आतां शक्य तेव्हां क्रियाच करून दाखवूं. मनांतल्या मनांत जाळून टाकणाऱ्या संतापाची ज्वाला ही योग्य वेळ येईपर्यंत आंतल्या आंतच दाबून ठेवूं. मध्यंतरीं कांहीं एक वाच्यता करावयाची नाहीं.

परंतु वास्तविक स्थितीचें परीक्षण करतां असेंच दिसून येत आहे कीं, इटलीचे लोकांत अजून मुख्य मुख्य तत्त्वांबद्दल भयंकर अज्ञान आहे. तीं तत्त्वें शिकविल्याशिवाय व त्या तत्त्वांचीं पारायणें करून इटलीचें मनःप्रवर्तन केल्याशिवाय उठावणीचा प्रयत्न सिद्धीस जावयाचा नाहीं.

**मोठाल्या राज्यक्रांत्या ह्या तत्त्वांनींच घडवून आणलेल्या असतात.** त्या क्रांत्या आधीं मनामध्यें होतात व मग व्यवहारांत होतात. जेव्हां त्या क्रांत्या कशासाठीं करावयाच्या व कशा करावयाच्या याचें बरोबर ग्रहण मनास करतां येतें तेव्हां हातून तदनुसार कृति घडते. ज्या वेळेस एखाद्या निसर्गदत्त किंवा महत्वाच्या पवित्र हक्कासाठीं तरवारीचा उपयोग केला जातो तेव्हांच काय तो तरवारीस जय मिळतो. परंतु हे हक्क कोणाचे आहेत हें आधीं कळलें पाहिजे. सर्व समाजाचें आत्मशिक्षण उत्तम चाललें कीं मगच हक्क व कर्तव्यें कळूं लागतात. मन तयार नसतांना नुस्तीच सुरू झालेली दांडगाई ही पशूंच्या टकरी इतकीच असारभूत असते. **जेव्हां स्वातंत्र्यप्रीति, परव-**

**शतेचा पूर्ण तिरस्कार, आपले शत्रू कसें फसवीत आहेत याचें पूर्ण ज्ञान व त्या शत्रूंच्या नायनाटाचा मार्ग कसा आंखावयाचा ह्याची स्पष्ट कल्पना इत्यादि तत्वांचा लोकांना उत्तम बोध होतो तेव्हांच मग त्यांच्या हातून यशस्वी क्रांत्या घडतात.** तत्त्वें पूर्ण समजावून दिलीं गेलीं म्हणजे लोकांना आपले हक्क कळूं लागतात. हक्क कळले कीं त्यांना स्वातंत्र्याची जबरदस्त इच्छा उत्पन्न होते. व अशा रीतीनें लोकांना शिक्षण देतां देतां त्यांना स्वतंत्रतेची जरूर भासूं लागली व तिच्या प्राप्तीची अनिवार्य इच्छा उत्पन्न झाली कीं, त्यांच्या अंगांत शक्तिमत्व उत्पन्न झालेंच म्हणून समजावें.

यासाठीं इटलींतील लोकांना मुख्य तत्त्वांची माहिती व शिक्षण देण्यासाठीं आम्हीं एक वर्तमानपत्र काढण्याचें योजिलें आहे. त्यांत हलके हलके व प्रगमनाचे प्रमाणानें निरनिराळ्या विषयांची चर्चा केली जाईल व त्या प्रत्येक विषयावरून मूलतत्त्वांची आवश्यकता शिकविली जाईल.

स्वदेशप्रीति; त्या परक्या जोखडाचा, त्या परवशतेच्या शृंखलेचा, त्या परदास्याच्या तुरुंगाचा, त्या ऑस्ट्रियाच्या जुलमी अमलाचा पूर्ण तिटकारा; व त्यांचें तें जोखड झुगारून द्यावयाचा, ती शृंखला तोडण्याचा, तो तुरुंग फोडण्याचा, त्या परकी अमलाचा नायनाट करण्याचा पूर्ण संकल्प चहूंकडे झाला पाहिजे. हें तत्त्व सर्वमान्य झालें पाहिजे, तें होईल, तें होत आलें आहे. परंतु हें अंतिम साध्य कसें साधावयाचें याबद्दलच्या प्रश्नांत मात्र बरीच भानगड उत्पन्न होत आहे.

आपल्यांत स्थानिक कर्तृत्व व स्थानिक महत्व असलेले बरेच जुने लोक आहेत. त्यांचें असें म्हणणें पडतें कीं, राजकीय हक्क हे कारस्थानीपणानें संभाळून संभाळून थोडे थोडे असे मिळविले पाहिजेत. त्यांना आपलीं तत्वें कबूल आहेत, पण त्यापासून होणारे परिणाम मात्र नको आहेत. जुलमाचा व परवशतेचा अतिरेक झालेला आहे हें ते दुःखानें कबूल करतात; परंतु अतिरेकी उपाय योजण्यास मात्र धजत नाहींत. (ज्या कारस्थानपद्धतीनें व युक्तीनें परक्यांनीं आपल्याला बद्ध केलें त्याच कारस्थानाच्या व लपंडावीच्या खेळानें ते मुक्त होऊं पहात आहेत ! त्यांचीं गुलामानांच योग्य अशीं मतें आहेत यांत कांहीं आश्चर्य नाहीं.) इटलीमध्यें ज्या वेळेस स्वतंत्र मनोवृत्तींचा गंधही नव्हता तेव्हां त्या गुलाम स्थितींत यांचा जन्म झालेला व त्या गुलाम स्थितींतच त्यांचें शिक्षण झालेलें; तेव्हां आपल्यां हक्कासाठीं, आपल्या

पूर्ववैभवासाठीं व आपल्या प्रत्यक्ष अस्तित्वासाठीं दंड ठोकून उठणाऱ्या लोकांचा त्यांना भरंवसा नाहीं ह्यांत काय आश्चर्य आहे ! अवसानाचा जोर कसा असतो हें त्यांना माहित नाहीं. त्यांची सर्व मदार काय ती कारस्थानी व कायदेशीर चळवळीवर ! तरी बरें; ह्याच कारस्थानीपणाचे वेडानें आपणांस हजारों वेळां फसविलें आहे !

त्यांच्या हें अजून ध्यानांत येत नाहीं कीं, गेल्या अर्ध शतकभर इटली देशामध्यें पुनरुज्जीवनाच्या साहित्याची जोपासना होत आली आहे. व आपल्या लोकांस आतां स्थिति सुधारलीच पाहिजे असें वाटूं लागलें आहे.

त्यांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं, गुलामगिरींत अनंत शतकें रुपलेला हा इटली देश वर यावयास दोनच मार्ग आहेत–सद्‌गुण किंवा सन्मरण.

**त्यांना कळत नाहीं कीं, दोन कोटी साठ लक्ष लोक, पवित्र कार्यांत ' देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत् " म्हणून गर्जना करून ठाकले असतां त्रिभुवनांतही अजिंक्य होतात !**

त्यांनां हें शक्य वाटत नाहीं कीं, सर्व इटली एका तत्त्वासाठीं व एका उद्देशासाठीं एकत्र करतां येईल. परंतु असें करण्याचा त्यांनीं मनापासून प्रयत्न एकदां तरी केला आहे काय ? या प्रयत्नांत मरण पत्करावयास ते कधीं तरी तयार झाले आहेत काय? त्यानें सर्व इटलीच्या नांवानें संराष्ट्र युद्ध केव्हां तरी सुरू केलें होतें काय ? लोकांस त्यांनीं कधीं तरी असें शिक्षण दिलें होतें काय कीं मोक्ष मिळवावयास एकच मार्ग आहे; कीं आत्मोन्नति ही आत्म-बलावर करावी लागते; कीं **लढाईशिवाय केव्हांही स्वातंत्र्यप्राप्ति शक्य नाहीं. लढाई–निकराची, तुमुल, जिला विजयाशिवाय किंवा स्वर्गाशिवाय दुसरा तह ठाऊक नाहीं** ! 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ' अशा निर्धाराची ! अशा लढाईशिवाय स्वातंत्र्याची आशा नको ! हें शिक्षण लोकांस दिलें होतें काय? नाहीं? तर हिंमतीच्या प्रयत्नाला भिऊन ते बाजूबाजूला दबून बसले किंवा दचकत दचकत व भीतभीत पाउलें टाकीत बसले, जणूं काय ज्या परम पवित्र स्वातंत्र्य–समराच्या मार्गांत ते उभे होते, तो बेकायदेशीर मार्ग होता ! जणूं काय स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न हा एक गुन्हाच होता ! त्यांनीं राष्ट्रसभा ( Congress ) व प्रधानमंडळ ( Cabinets ) यांच्या गयाळ व नेभळया संस्थांकडे बोट दाखवून लोकांना फसविलें आहे. परक्यांच्या मदतीचीं वचनें देऊन लोकांतील आत्मनिष्ठेच्या व आत्मत्यागाच्य

ज्योतीला त्यांनीं विझविलें आहे व जो काळ त्यांनीं लोकांच्या मनःप्रवर्तनांत किंवा समरांत खर्चावयाचा तो काळ त्यांनीं कायद्यांच्या घासाघिसींत व्यर्थ दवडला आहे व अखेर आतां राष्ट्रमध्येंच आत्मनिष्ठा नाहीं म्हणून ते रडत आहेत. ते–ज्यांनीं त्या आत्मनिष्ठेला आपल्या उदाहरणानें केव्हांच प्रदीप्त करण्याचा प्रयत्न केला नाहीं !–ते आपल्याच भ्याडपणानें व चंचलत्वानें मारून टाकलेल्या लोकांच्या अवसानाची चेष्टा करूं पहात आहेत.

परंतु ते बिचारे सुखी असोत, कारण त्यांच्याकडून ज्या चुका घडल्या त्या त्यांच्या नीचतेपासून नसून भित्रेपणामुळें घडल्या आहेत. **शिवाय क्रांतीच्या स्थितींत घडलेली प्रत्येक चुकी ही अंतिम सत्याची एकेक पायरीच होते.** नुकत्याच घडलेल्या चुक्या ह्या क्रांतिशास्त्रावरील हजारों पुस्तकांपेक्षां ज्यास्त उत्तम रीतीनें तरुण पिढीला उपदेश देतील. त्यांच्या चुक्यांचा तरुण पिढीला फायदा मिळेल. याचे आधींच हा फायदा वास्तविक घ्यावयास पाहिजे होता. तो घेतला गेला असता व राष्ट्र याचे आधींच सावध झालें असतें तर नवीन चुक्या टाळतां आल्या असत्या. परंतु क्वचित् दहा शतकांच्या इतिहासाचें सार पुरेसें नसेल ! आजपर्यंत परक्यांच्या वचनांनीं व आशेनें केलेला घात हा आत्मनिष्ठा उत्पन्न करण्यास पुरेसा नव्हता ! आतां तरी सावध व्हावयाचें आहे का ? **हे इटली देशा ! अजून तरी तुझी खातरी झाली आहे काय कीं परमेश्वर व जयश्री हीं शूर पुरुषालाच वश असतात ! कायदेशीर कारस्थानांत विजयदेवी रहात नसून ती तुझ्या तरवारीचे अग्रभागीं रहात असते ! इटलीची अजून तरी खातरी झाली आहे काय ?**

होय, खातरी झाली आहे व "तरुण इटली" हें त्याचेंच फळ आहे. या एकोणिसाव्या शतकांत इटलीला कळून चुकलें आहे कीं लढाईशिवाय स्वातंत्र्यप्राप्ति नाहीं. लोकांशिवाय–लढाई नाहीं. बहुजनसमाज शिक्षणाशिवाय-राजकीय शिक्षणाशिवाय–लढाईस प्रवृत्त होत नाहीं. व हें शिक्षण देण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे त्यांच्याबरोबर स्वार्थत्याग व देहत्याग करावयास सज्ज असणें हा होय. इटलीला आतां कळलें आहे कीं, या नवीन कार्यांत जुन्या मढ्यांचा उपयोग नाहीं. **नवीन परिस्थितीला नवीन माणसें उत्पन्न व्हावीं लागतात. नवीन तरुण–ज्यांनां जुन्यां विचारांनीं किंवा संवयींनीं दूषित केलेलें नाहीं, ज्यांचे आत्मे स्वार्थाच्या किंवा**

**लोभाच्या स्पर्शानें भ्रष्ट झालेले नाहींत, जे प्रतिभेचे जिवंत झरे आहेत !** अशा तरुणांनीं युक्त असलेल्या "तरुण इटली"ला ह्या गोष्टी कळल्या आहेत. तिच्या कर्तव्याची पवित्रता तिला संवेदित झालेली आहे. त्या कर्तव्याची सांगता ती करणारच करणार, तें करण्याची तिनें शपथ घेतली आहे. जे हजारों देशभक्त स्वदेशाला बळी पडले आहेत त्यांची शपथ घेऊन आम्हीं प्रतिज्ञा केलेली आहे कीं, जुलमानें विचार मरत नाहींत तर सुदृढ होत जातात हें सिद्ध करावयाचें. आम्ही, प्रगतीकडे जो सदासर्वदा अभिमुख आहे, त्या मानवी आत्म्याची शपथ घेतली आहे. त्या तरुण बंड रिमिनीच्या लढवय्यांची शपथ आहे. मॉडेनाच्या देशवीरांच्या रक्ताची शपथ आहे !

अहो ! देशवीरांचें रक्त ! त्या रक्तांत मूर्तिमंत राष्ट्रधर्म भरलेला आहे. **स्वातंत्र्याचें बीज देशवीरांच्या रक्तांत एकदां का रुजलें कीं, मग त्याचा नाश करण्यास समर्थ "असा सर्व भूमंडळीं कोण आहे"?** आज आमचा मुख्य धर्म देशवीरत्वाचा आहे. पण तो उद्यां विजयाचा धर्म होणार आहे. आणि अशा स्थितींत आम्ही तरुण लोक–त्याच देशवीरांच्या धर्मांत विश्वास ठेवणारे–आमचें कर्तव्य हेंच आहे कीं, त्या पवित्र कार्यासाठीं आजन्म यथाशक्ति शक्य तितका प्रयत्न करावयाचा. ज्या अर्थी सध्यांच शस्त्र उचलतां येत नाहीं, त्या अर्थी आम्हीं लेखणी उचलणार. जे विचार अपूर्ण व अव्यवस्थित रीतीनें इतस्ततः पसरलेले आहेत ते एकत्र करून त्यांना स्वातंत्र्यप्रीतीचें व्यवस्थित वळण देणें व त्यांच्यांत आत्मनिष्ठेची ज्योत लावणें ह्या कामासाठीं लेखणी उचलणें भाग आहे. म्हणून आम्ही असा विचार केला आहे कीं, ठरलेल्या वेळीं भागाभागानें आमच्या तत्वांच्या स्पष्टीकरणार्थ व प्रसृतिकार्यार्थ आमच्या देशबंधूंच्या मदतीनें स्वातंत्र्य-प्राप्तीच्या अंतिम उद्देशानुरूप लेखमाला प्रसिद्ध करावी.

आमचा मुख्य उद्देश इटलीचें स्वातंत्र्य हा असल्यानें त्याला अनुरूप तितकाच भाग इतर देशांच्या राजकारणांतून विवर्णिला जाईल. भूतदया हा मानव्याचा निसर्ग आहे म्हणून सर्व राष्ट्रांशीं भूतदयेनें वागावें हा अबाधित धर्म आहे. परंतु भूतदया ही नेहमीं समसमानांमध्येंच शक्य असते. **म्हणून प्रथम स्वातंत्र्यसंपादन व मग भूतदया. त्याशिवाय आपण भूत-दयेला योग्य नाहीं.** आम्हीं परक्यांच्या मदतीची आशा धरणारांचा धिक्कार करतों. परंतु इतर राष्ट्रांना इटलीची खरी माहिती करून देण्याचा प्रयत्न आम्ही

करूं. आम्हीं हें सर्व जगास सिद्ध करून दाखवूं कीं, इटली ही आंधळी नाहीं, ती भ्याडही नाहीं; परंतु दुर्दैवी आहे. इटली ही अज्ञात आहे. पोकळ डौल, अविचार; व चालविलेल्या जुलमांचें ढोंगी मंडन करण्याची आवश्यकता उत्पन्न झाल्यामुळें मुद्दामच पिकविलेला गैरसमज, या सर्व रीतींनीं परक्यांनीं इटलीबद्दल सर्व जगांत वाईट मत पसरविलें आहे. आमचे मनोविकार, स्थिति, चाली व रीती यांचा जाणून बुजून विपर्यास चालविलेला आहे.

आमचे देशास शांतता दिली म्हणून परके डौल मारीत आहेत. शांतता! आम्ही आमच्या जखमा उघड्या करूं व त्यांतील रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या म्हणजे सर्व जगास सांगूं कीं, त्या शांततेसाठीं ही किंमत आम्हांला द्यावी लागत आहे. आम्ही कोठड्यांतून व अंधेरांतून जुलमाचे कागदपत्र ओढून काढून परक्यांनीं आम्हांस किती छळलें आहे याचा लेखी पुरावा सादर करूं; आम्ही आमच्या थडग्यांत उतरूं व आमच्या देशवीरांच्या अस्थि व त्या हजारों अज्ञात योध्यांचे इतिहास जगाचे समोर धरूं; ते आमच्या गांजणुकीचे, आमच्या दृढ निश्चयाचे, व जगाच्या दूषणीय दुर्लक्षाचे मुके साक्षीदार होतील! त्या महात्म्यांकडे बोट दाखवून आम्हीं सर्व जगास सांगूं कीं, ज्यांना तुम्ही परवशतेंत चिरडूं दिलेंत, ते आत्मे असे आहेत! ज्याला एकाकी सोडून अखंड गुलामगिरींत ढकललात तो हा इटली देश असा आहे!

(यानंतर थोडेच दिवसांनीं "यंग इटली" हें पत्र सुरू झालें. या पत्रांत वरील प्रसिद्धीपत्रकांत कळविल्याप्रमाणें स्वातंत्र्यप्रीति, स्वातंत्र्ययुद्धाची अवश्यकता व त्याचे मार्ग याबद्दल चर्चा चालू ठेवली होती. मॅझिनीच्या लेखांचा परिणाम कसा झाला हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. जे शब्द इतका काळ लोटल्यानंतरही व परदेशस्थांसही अजून स्फूर्तीचे जिवंत झरे वाटत आहेत, व ज्यांना ऐकतांच जुलमाला व परवशतेला अजून कंप सुटत आहे ते शब्द ज्या वेळेस त्या स्वातंत्र्यवीराच्या लेखणींतून प्रथम बाहेर पडले असतील व तत्कालीन महत्वाच्या प्रश्नांचा निकाल सिंहगर्जितानें इटालियन तरुणांच्या अंतःकरणास कळवीत असतील तेव्हां त्यांचा परिणाम काय होत होता हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. मार्सेलिसहून ते शब्द बाहेर पडत नव्हते, तर पवित्र त्वेषाच्या ह्या धगधगलेल्या ज्वाला इटलीच्या पारतंत्र्यास भस्म करण्यासाठीं धांवत असत! मॅझिनीच्या लेखणीनें मुकुट उलथे पाडले; सिंहासनें पालथीं घातलीं; बादशाह्यांचे तुकडे उडविले; इटलीच्या समशेरीला स्वातंत्र्याचें

पाणी दिलें; 'मोठाल्या राज्यक्रांत्या ह्या तरवारीपेक्षां तत्त्वांनींच घडवून आणलेल्या असतात, त्या क्रांत्या आधीं मनामध्यें होतात व मग व्यवहारांत होतात.' हें सिद्ध करून दाखविलें. मॅझिनीच्या लेखणीनें राष्ट्रीय मोक्षसाधनासाठीं चतुर्वेद निर्माण केले ! कालाकालाचा विचार करून जे त्या वेदांचें श्रवण, मनन व निदिध्यास करीत जातील त्यांना परवशतेच्या भुताची बाधा कधींही होणार नाहीं.

त्या "यंग इटली" पत्रांत मॅझिनीबरोबर आणखीही बरेच स्वदेशभक्त लेखक लेख लिहीत असत. हें पत्र दर आठवड्यास निघत नसे. त्याचे मधून मधून भाग प्रसिद्ध होत. त्यांतील मॅझिनीचे बहुतेक लेख हे तत्कालीन मुद्यांवर, कायद्यांवर, व त्या विशिष्ट परिस्थितीवर असल्यानें हल्लीं सामान्य वाचकांच्या ते फारसे उपयोगी नाहींत. व जीं महत्तत्त्वें त्या लेखांत विवर्णिलीं आहेत तीं वरच्या प्रसिद्धिपत्रकांत व "यंग इटली" या गुप्त मंडळींचे नियमपत्रकांत आलेलींच आहेत. पुढेंही तीं येतीलच. म्हणून त्या लेखांचें शब्दशः भाषांतर करण्याची विशेष आवश्यकता नाहीं. वर्तमानपत्रांत एकच तत्त्व वेळोवेळीं पुढें मांडणें भाग पडतें; परंतु कांहीं कालानंतर तेंच तेंच विवरण कंटाळवाणें होतें.

मॅझिनीच्या 'यंग इटलीं' तील लेखांनीं इटलीवर काय परिणाम केला हें त्या लेखांच्या प्रसाराविरुद्ध किती कडक नियम केलेले होते हें पाहिलें असतां ध्यानांत येईल. ती हकीकत पुढें 'आत्मचरित्रांत' मॅझिनीनेंच दिल्याप्रमाणें येईल.

तथापि "यंग इटली" पत्राचें साधारण स्वरूप ध्यानांत यावयास मॅझिनीच्या लेखांची याद, व त्यांतील अत्यंत महत्त्वाचा भाग हल्लीं मनोरंजक व उपदेशक होण्यासारखा तेवढा पुढें दिलेला आहे.)

'तरुण इटली' हें पत्र सुरू होतांच पहिले लेख (१) तरुण इटली (२) रोमाग्ना, (३) सत्याविष्करण, ह्या विषयांवर होते. नंतर दोन मोठमोठाले व विचारपूर्ण लेख "इटलीमध्यें स्वातंत्र्यप्राप्तीला आजपर्यंत झालेले अडथळे व घडलेल्या चुका" या विषयावर लिहिलेले आहेत. त्यांतील मुख्य व पहिलें कारण म्हणजे उत्तम पुढाऱ्यांची उणीव हें होतें. पुढाऱ्यांचीं मनें स्वातंत्र्यविचारांनीं पूर्ण संस्कृत झालेलीं नव्हतीं ! व लोकांस त्यांनीं भलतीकडेच नेलें. लोकही मनःप्रवर्तनांत पुढें गेलेले नव्हते. त्या योगानें जरी अंतःस्फूर्तीनें त्यांनीं उठावणी केली तरी ती फसत असे. परंतु खरी चूक पुढाऱ्यांच्या कच्या मनांत होती. इटली स्वतंत्र होण्यास सर्वसमर्थ असतांही पुढाऱ्यांनीं भिक्षां-

देहीचा आश्रय केला वगैरे. दुसरें कारण असें दाखविलें आहे कीं, स्वातंत्र्य मिळतांच काय व्यवस्था लावावयाची याचें लोकांस साधारण ज्ञानही दिलेलें नव्हतें. लोकसत्ता स्थापावयाची हें अंतिम लक्ष्य न सांगितल्यानें व तें शक्य आहे असें सिद्ध करून न दाखविल्यानें लोक गोंधळून गेले कीं, समजा, परक्यांना हुसकून दिलें, तरी पुढें काय? त्यांच्यापुढें स्पष्ट कार्यक्रम कांहींच नव्हता.

"व्यक्तीचा" काल आतां संपला आहे. 'समाजा'चा काल आला आहे. मनुष्यव्यक्ति जाऊन आतां समाजव्यक्ति हें आदितत्त्व झालें आहे. राष्ट्रव्यक्तिपर्यंत मानवी उत्क्रांति आलेली आहे. म्हणून आतां क्रांतिशास्त्रांतील आदितत्त्व हें होय कीं, "**क्रांति ही जनपदाकडून जनपदांसाठींच केली गेली पाहिजे.**" हा आमचा ॐकार आहे. आमच्या मतांचें हें सार आहे. आमच्या उपदेशाची ही बेरीज आहे. "**क्रांति ही जनपदाकडून जनपदासाठींच केली गेली पाहिजे." हें आमचें शास्त्र, हा आमचा धर्म, हाच आमचा हृदयाचा विसांवा !** "..............राजसत्ता व गुलामगिरी; महाजन व सामान्यजन; प्यॉट्रीशियन व प्लेबियन; जहागिरदारी व रोमन क्याथोलिसिझम्; रोमन क्याथोलिशिझम् व प्रॉटेस्टंटॅनिझम्; जुलूम व स्वातंत्र्य; हीं इतिहासांतील द्वंद्वें व तदर्थक झालेलीं सर्व द्वंद्वयुद्धें हीं कशाचीं निरनिराळीं स्वरूपें आहेत? अजूनपर्यंत चालू असलेल्या 'विशिष्टाधिकार' व 'जानपदता' यांच्यांतील द्वंद्वयुद्धाचीच भिन्न नांवाखालीं व भिन्न रूपाखालीं निघालेली ती पूर्वावृत्ति होय.

"परंतु विशिष्टाधिकार आतां मात्र मरणाच्या दारीं बसला आहे. व इकडे जानपदाचा उत्कर्ष होत होत अखेर परमेश्वरापर्यंत जाऊन त्यांनीं आपल्या अधिकाराची व कर्तव्याची शासनपत्रिका मिळविली आहे. व आतां या विश्वांतील सर्व द्वंद्वें सुटत सुटत अखेर "ईश्वर व जानपद" "देव व लोक" यांच्या समानाधिकरणाचे नजिक सर्व जगत् आलें आहे.

"**ईश्वर व जानपद," "देव व लोक," हाच आमचा भावी कार्यक्रम आहे,** व म्हणून आम्ही लोकांकडे वळून त्यांना संबोधूं लागणार. त्यांना स्वातंत्र्यप्राप्ति झाली म्हणजे सर्व प्रगति कशी आपोआप होत जाईल व जोंपर्यंत राजकीय परवशता आहे तोंपर्यंत कोणच्याही मार्गांत समाज प्रगमन करूं शकण्यास कसा असमर्थ होतो, हें सिद्ध करून देऊं. नंतर त्यांना त्याच्या पूर्वस्मृतीची आठवण देऊं. त्यांना प्राग्वैभवाचीं निशाणें दाखवूं.

पूर्वी स्वातंत्र्यवीरांनीं धारातीर्थी देह कसे ठेवले ते त्यांना सांगूं. तीं धारातीर्थें त्यांना दाखवूं. त्यांना पॅरिस, वारसा, ब्रुसेलचीं मैदानें दाखवूं व त्यांना उद्देशून सांगूं ' अहो, अशीं कृत्यें पुन्हां करणें, व दंड ठोकून उभें राहणें हें तुमचे हातीं आहे. भीमभयानक बलानें उठा. परमेश्वर तुमच्या पक्षाचा आहे. जुलमानें गांजलेल्यांचा तो सांभाळ करतो. म्हणून ' निजले काय मृतापरि जागे व्हा सिंहसे उठा राहो ' !' व नंतर ह्या शब्दांनीं लोकसमूहाला अवसान भरूं लागलें, ते उठूं लागले, त्यांचे नेत्र उत्साहानें व त्वेषानें चमकूं लागले, प्रचंड समुद्राच्या हृत्स्पंदनाप्रमाणें क्षुब्ध लोकसमूहाच्या अंतः-करणाचा ध्वनत्ध्वनी आम्हांस ऐकूं येऊं लागला कीं आम्हीं पुढें घुसलोंच ! तें लॉम्बर्डीचें मैदान आलें, " लोकहो पहा, तुमची दास्याची वेडी घडणारे अधम हे येथें उभे आहेत ! " आल्पस् पर्वत दिसला, " देशवीर हो, बघतां काय ? आपली खरी सरहद्द ही आहे ! ऑस्ट्रियाशीं युद्ध. "

" लोकपक्षाचा जयजयकार ! जानपदाचा जयजयकार ! कारण, लोक हे परमेश्वरानें पसंत केलेले आहेत. विश्वप्रीति, समाजसहकारिता व दास्यमुक्तता ह्या ईश्वरी नियमांची पूर्तता करण्यासाठीं परमेश्वरानें लोकपक्षाला निवडलें आहे ! "

पुढें मग मॅझिनीनें स्पष्ट मत दिलेलें आहे कीं, लोकसत्तेशिवाय देश-स्वातंत्र्य कायम राहणार नाहीं. इटलीसारख्या भिन्न भिन्न संस्थानांनीं व भिन्न प्रांतांनीं बनलेल्या देशांत राजसत्ता कधींहि चिरकाल टिकणार नाहीं कारण:—

" तत्त्व हें सर्वांना सारखेंच लागू असतें. तत्त्वाचा जय हा सर्वांचा जय होतो. तत्त्वांची पसंती ही सर्वांची पसंती होते. व तत्त्वासाठीं लढाई किंवा सत्ता चालविली कीं त्यांत प्रतिस्पर्धा किंवा खाजगी द्वेष उत्पन्न होत नाहींत. म्हणून स्वातंत्र्यप्राप्ति व लोकसत्ता हीं तत्त्वें विजयी होतील. परंतु राजाचे नांवानें सर्व लोक एकत्र कसे होतील ? तो मनुष्य कोणच्या तरी विशिष्ट प्रांतांत जन्मलेला असतो, वाढलेला असतो. व जरी त्या विशिष्ट प्रांतानें प्रीतीनें तर नव्हेच परंतु स्वाभिमानानें त्यास पाठिंबा दिला तरी इतर प्रांत त्याचा द्वेष करणारच ! परंतु लोकसत्तेच्या तत्त्वानें सर्व एकत्र होतील. "

"लोकसत्तेला इतर राष्ट्रें एवढीं कां भीत आहेत याचें कारण फार निराळें आहे. ते लोकसत्तेच्या तत्त्वाला भीत नाहींत, तर नांवाला भीत आहेत, असेंच

विचारांतीं कळून येईल. कारण फ्रान्समधील भयंकर प्रकाराला लोकसत्ता हें नांव दिलें गेलें. पण खरें पाहतां ती लोकसत्ता नव्हती. लोकसत्ता निर्माण करण्याचा तो प्रयत्न होता. लोकसत्तानिर्मितीची ती क्रांति होती–ती लोकसत्ता नव्हती तर तें क्रांतियुद्ध होतें–हें ध्यानांत ठेवलें व मग लोकसत्तेचा विचार केला कीं सर्व उलगडा होतो. " लोकसत्ता " Republic हा शब्द मूळ कशापासून निघाला आहे ? Republican 'लोकांची वस्तु' ह्यापासून तो शब्द व्युत्पन्न झालेला आहे व त्याचा अर्थ दुसरा कोणचाही नसून ' राष्ट्राची सत्ता राष्ट्राचेच हातीं असणे ' असा आहे. याहून पवित्र शब्द कोणचा असणार ? '

यानंतरचा लेख " क्रौर्य " यावर आहे, नंतर " एकोणिसाव्या शतकांतील कवींस अनुलक्षून " म्हणून एक सुंदर लेख लिहिलेला आहे. त्यावर बायरनचें एक सुरस वचन दिलें आहे. " कविता ही काय आहे ? कविता म्हणून भूत विश्वाचें व भावी विश्वाचें चैतन्य होय. " परंतु हा लेख काव्यविषयक असून त्यांत तत्कालीन नेपोलियन कालाची चर्चा आहे. तथापि कविता म्हणजे काय हें मॅझिनीनें ज्या शब्दांत सांगितलें आहे ते शब्द दिल्याशिवाय रहावत नाहीं:—

" परंतु कविता ही कालाबरोबरच प्रगमन करीत असते. कविता ही चेतना आहे, कविता ही गति आहे, कविता ही कृतीचें अंतस्तेज आहे, भविष्याचा मार्ग प्रकाशित करणारी ती दिव्य चांदणी आहे, घोर अरण्यांतून पलीकडे जाणाऱ्या वाटसरूंस वाट दाखविणारी ती ज्वलद्दीपमाला आहे ! ! ! कविता ही विस्तवाच्या पंखांनीं युक्त अशी धमक आहे. उदात्त विचारांची–आत्मत्यागाचें बल अंगांत संचरविणाऱ्या उदात्त विचारांची–ती दिव्य मूर्ति आहे...............नाहीं, नाहीं ! कविता गतप्राण झाली नाहीं. ती नुक्तीच स्पेनला गेली होती. अर्वाचीन कालाची कविता स्पेनमध्यें लढणाऱ्या गनिमी काव्याच्या योद्ध्यांना जाऊन मिळाली; ज्यांनीं नेपोलियनलाहि आपल्या चिकाटीनें खडे मारले, त्या अद्रिवासियांना स्फूर्ति देत देत, परकीयांच्या नाशास्तव देशभक्तांना उठविणाऱ्या कवनांतून प्रादुर्भूत होऊन ती पर्वतांच्या शिखरोशिखरीं ध्वनित होत आहे ! अर्वाचीन कविता तिकडे जर्मनीमध्यें आपल्या शाळांतून व विश्वविद्यालयांतून निघून स्वातंत्र्यसमराकडे नाचत जाणाऱ्या तरुणवीरांच्या सरस्वतींत संभूत होऊन त्या रणनर्तनाचा ताल धरीत आहे !

"..................काय, आतां पुन्हा व्यक्तिविषयक कविता ? छे, छे, तिचें नांव नको. आतां व्यक्तियुग नसून समाजयुग आलेलें आहे........ कविराजहो, अहो गरुडांचे सखे हो, मागें कां पहातां ? पार्श्वभागीं पहा, अग्रभागीं पहा, अत्यंत उच्चभागीं उडत जा व भविष्यवादी व्हा !

**" कविराज हो, स्वदेशबंधूहो, चला, लोकांकरितां रणकवनें रचूं लागा ! ऑस्ट्रियाच्या उरावर नाचत नाचत तीं रणकवनें गावयास तरुण लोक उतावीळ झाले आहेत ! "**

मग या नंतरचे लेख म्हणजे " कॉसिमोवरील भाषणें, " लोकबंधुत्व, " " जर्मनीची स्थिति, " फ्रेंचांचा व जर्मनीचा तह, " फ्रेंच उदार मतवादी जर्मनलोक व यंग इटली " वगैरे विषयांवर लिहिलेले आहेत. नंतर मॅझिनी व सिस्मांडी*यांच्या मधला पुष्कळसा पत्रव्यवहार प्रसिद्ध केलेला आहे, तो ' यंग इटलीं ' त सिस्मांडीचें अनुमोदनानेंच दिलेला आहे.

नंतर त्या पुढचा महत्वाचा लेख म्हणजे " यंग इटली ' च्या लेखकवर्गाचें स्वदेशबांधवांस संबोधन " या अर्थी आहे. या लेखामध्यें मॅझिनीनें ' यंग इटली ' संस्थेवर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला आहे व प्रत्युत्तरें दिलीं आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीचें मंडन, भित्रेपणाचें व कायदेशीरपणाचें खंडन, परक्यांवर अवलंबून राहणाऱ्या पक्षाचा यथायोग्य समाचार, लोकसत्तेची आवश्यकता वगैरे तत्वांचा मागें दिलेल्या मुद्यांवरच प्रपंच केलेला आहे.

" ...... आम्ही विशिष्टाधिकारत्वाचा नाश करूं. सर्व राष्ट्रांत समतेचें बीज पेरूं. सर्व राष्ट्र एक करूं. आम्ही परक्यांचे आशेवर व वचनांवर भरंवसा ठेवणार नाहीं. सभा भरवून व अर्ज करून भिक्षेकऱ्यासारखें स्वातंत्र्याचा जोगवा मागणार नाहीं. कारण आम्ही हें जाणून आहों कीं, लोकसत्तेचा झेंडा उभारला कीं, राजांची कंबर खचलीच ! आमची पक्की खातरी आहे कीं, समशेरीनेंच क्रांत्या सिद्धीस जातात. आम्ही लोकपक्षाचे आहों. आम्ही लोकपदाशीं बोलूं. लोक आमचें ऐकतील. लोकांच्या मतांस योग्य वळण देऊन आम्ही शक्य तेवढा प्रयत्न करून लढाईस आरंभ करूं. लढाई–लोकपक्षानें चालविलेली, संराष्ट्रीय व गनिमी काव्याची. ही गनिमी काव्याची लढाई जर निश्चयानें व सर्वत्र चालू टेविली तर तिच्याशीं टिकाव धरण्यास कोणीहि समर्थ होणार नाहीं ! "

नंतर मॅझिनीनें आपल्या संस्थेस 'तरुण इटली' हें नांव देऊन तरुण व वृद्ध असे दोन तट केले या आक्षेपाला उत्तर दिलें आहे, व 'तरुण इटली'च्या मताप्रमाणें राष्ट्रसत्तेची रचना कोणच्या तत्त्वांवर व्हावी याचा अत्यंत महत्वाचा नकाशा रेखाटला आहे.

"आह्मी आमच्या त्रिरंगयुक्त निशाणावर 'तरुण इटली' असें नांव लिहिलें आहे याचें कारण असें आहे कीं, तें निशाण पुनरुज्जीवित व अभिनव इटलीचें आहे.

"जे समाजाच्या क्रांतिप्रवृत्तीला यःकश्चित सुधारणांवर संतुष्ट ठेवूं पाहतात; जे भूतकालीन इतिहासाच्या विरुद्ध जाऊन व त्या इतिहासाच्या बोधाला गुंडाळून ठेवून राजसत्तेचें स्तोम माजवितात; जे लोकसत्ताक पद्धतीचा द्वेष करितात; जे राष्ट्रीय पुढारीपणाचा डौल मिरवितेवेळेस पुढें येतात परंतु मृत्यूची वेळ आली कीं मागें घेतात, ज्यांना स्वदेशोन्नति परक्यांचे आधारानें करावयाची मृगजळी आशा लागली आहे; जे राजकीय स्वातंत्र्य पाहिजे, परंतु वाङ्मयात्मक, धार्मिक व तात्विक स्वातंत्र्य नको म्हणून ओरडतात, व त्या राजकीय स्वातंत्र्यासाठीं भिक्षांदेहीवर विश्वास ठेवून स्वदेशानें आत्मनिष्ठापूर्वक केलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळींचा धिःकार करतात; त्यांना व फक्त त्यांनाच मग ते कोणत्याहि दर्जाचे, वयाचे व प्रांताचे लोक असोत-त्या सर्वांना आह्मी म्हातारी इटली म्हणून नांव देतों. कारण तीं भूतकालाचीं माणसें आहेत व त्यांची साठी बुद्धि नाठी झालेली आहे.

"यांच्याशिवाय व फक्त यांच्याचशिवाय जे उरतात ते आम्ही-तरुण इटली-प्रगतीचे लोक, भविष्याचे कर्ते, स्वातंत्र्याचे भक्त-आमचें वय, स्थिति, प्रांत कोणचाही असो. आम्ही त्यांच्यापासून विभक्त झालों आहोंत-कायमचे विभक्त झालों आहोंत.

"स्वतंत्रता, सर्व प्रकारची व सर्व लोकांची

"समता, सामाजिक व राजकीय हक्कांची व कर्तव्यांची

"सहकारिता, सर्व लोकांची, सर्व स्वतंत्रजनांची; मानव्याच्या प्रगतीचें महत्कृत्य पार पाडण्यासाठीं केलेलें संभूय समुत्थान

"हें आमचें चिन्ह आहे, उद्दिष्ट आहे, महत्कार्य आहे.

"ज्याला याहून कांहीं जास्त श्रेयस्कर शिकवावयाचें असेल त्यानें पुढें यावें. तें उघड रीतीनें सांगणें हें त्याचें कर्तव्य आहे. ज्याला याहून उदात्ततर

कांहीं टाऊक नसेल त्यानें आम्हांस येऊन मिळावें. आमचे बंधु व्हावें."

" ज्यांना ह्या दोहोंपैकीं एकही मार्ग पत्करावयाचा नसेल त्यांनीं खुशाल हातपाय पसरून घोरत पडावें. पण उलटें आम्हांलाच क्रियाशून्यतेचा व स्मशानशांततेचा उपदेश करण्याचें धाडस तरी करूं नये.

" **लोक, जानपद** हें आमचें मूलतत्व आहे. समाजरूपी पिरामिडचा हा मूलाधार आहे. आम्ही जानपद याचा अर्थ असा समजतों कीं, राष्ट्र बनविणारा लोकसमाज. नुस्तें समाज म्हणजे राष्ट्र नव्हे. एका तत्वानें, एका उद्देशानें व एकाच कायद्यानें बद्ध असलेले लोक राष्ट्र बनवूं शकतात. राष्ट्र शद्वांत एकीचा अंतर्भाव होतो. तत्त्वैकता, उद्दिष्टैकता, अधिकारैकता ह्याच गोष्टींनीं समाजाला राष्ट्रीयत्व प्राप्त होतें.

" राष्ट्र एक असल्यानें त्याचें प्रतिनिधीमंडलही एकच राहील.

" राष्ट्रीय प्रतिनिधित्वाचा अधिकार हा श्रीमंतीच्या तत्वांवर अवलंबून नसावा, तो लोकसंख्येच्या प्रमाणानें ठरविला जावा.

" राष्ट्राचें खरें खरें प्रतिनिधित्व संपादण्यासाठीं प्रत्येक व्यक्तीला मतदारीचा हक्क असला पाहिजे. ज्या मनुष्याला मतदारीचा हक्क उपभोगितां येत नाहीं, तो नागरिकच नव्हे. समाजाचा करार त्याच्यापुरता मोडला आहे असेंच समजणें भाग आहे. कारण त्या करारास त्याची संमती घेतलेली नाहीं. व म्हणून समाजाचा प्रत्येक कायदा म्हणजे त्याच्या हिशेबीं केवळ जुलमच होय.

" परंतु या प्रत्येक व्यक्तीला मतदारी देण्याच्या विरुद्ध एक महत्त्वाचा आक्षेप असा आहे कीं मतदारीचा योग्य उपयोग करण्याइतकें शिक्षण प्रत्येक व्यक्तीला मिळालेलें नसतें. म्हणून ही अडचण टाळण्यासाठीं अशी व्यवस्था केली जाईल कीं, दुहेरी निवडणुकीची पद्धति योजण्यांत येईल. पहिल्यानें मतदाराची निवडणूक होईल व मग ते मतदार लोक प्रतिनिधींची निवडणूक करतील.

" राष्ट्रीय प्रतिनिधींना राष्ट्रच पगार देईल. व मग त्यांना प्रतिनिधित्वाच्या मुदतीपर्यंत कोणचीहि सार्वजनिक जागा मिळणार नाहीं.

" राष्ट्रीय प्रतिनिधींची संख्या शक्य तितकी जास्त ठेवावी. या रीतीनें लांचलुचपतीचा पुष्कळ बंदोबस्त करतां येतो. फ्रान्समध्यें जेव्हां जेव्हां प्रतिनिधींची संख्या कमी केली गेली तेव्हां तेव्हां स्वातंत्र्याची अवनति होत गेली.

" ते प्रतिनिधी एकत्र मिळून राष्ट्रीय कामें पार पाडितील. राष्ट्राची शक्ति अमर्यादित आहे व म्हणून प्रतिनिधींच्या निवडणुकीवर कोणचाहि दाब दडपशहा ठेवणें म्हणजे राष्ट्राच्या सर्व शक्तिमत्वाचा ऱ्हास करणें होय.

" अशा पूर्ण विचारानें पार पाडल्यास प्रतिनिधींची निवडणूक ही खरी खरी राष्ट्रीय निवडणूक होईल.

" सामाजिक शक्तींची योग्य व्यवस्था, दिग्दर्शन, व सुधारणा करून त्या समाजाला प्रगतीकडे–उत्क्रांतीकडे–नेणें हें प्रतिनिधिमंडलाचें मुख्य कर्तव्य आहे. त्यानें समतेचें संरक्षण केलें पाहिजे. व म्हणून दुःखानें गांजलेल्या अनंत माणसांच्या वर्गाची उन्नति व सुखसमाधान घडवून आणणें हें मुख्य काम आहे.

" आनुवंशिक, दत्तविधानात्मक, दानात्मक, मृत्युपत्रात्मक वगैरे कायदे अशा रीतीनें केले जावेत कीं, थोड्या व विशिष्ट लोकांतच संपत्ती थांबून राहूं नये. किंवा फार थोड्या कुटुंबाच्या हातींच सर्व मालमत्ता अडकून पडूं नये.

" करांची व्यवस्था अशी केली जावी कीं, आयुष्याला अगदीं अवश्य तेवढे पदार्थ करापासून मुक्त असावेत. व चैनीच्या पदार्थांवर प्रमाणानें व वाढत्या रीतीनें कर बसवावे.

" प्रत्येक मनुष्यास त्याच्या समयोग्यतेच्या मनुष्याकडून न्याय दिला जावा एतदर्थ ज्यूरीची पद्धति ( पंचाईत ) अमलांत आणली जावी.

" राष्ट्राचे प्रतिपालक या नात्यानें राष्ट्रप्रतिनिधींचें हें कर्तव्य आहे कीं, **अशा रीतीनें सर्व कारभार चालविला जावा कीं, व्यक्तीच्या स्वातंत्र्याची पराकाष्ठा व राष्ट्राच्या विभवाची परिसीमा हीं एकत्र राहूं शकतील.**

" यासाठींच व्यक्तिस्वातंत्र्याचें पूर्ण संरक्षण झालें पाहिजे. त्याविरुद्ध घडणाऱ्या गुन्ह्यांना कडक शासन केलें जाईल.

" यासाठींच मतस्वातंत्र्य नेहमीं पूज्य मानलें जाईल. व म्हणूनच धार्मिक प्रश्न हे नेहमीं व्यक्तीच्या निष्ठेवर व पसंतीवर सोंपविले जातील.

" यासाठींच लेखनस्वातंत्र्य व मुद्रणस्वातंत्र्य पूर्ण रीतीनें देण्यांत येईल.

" परंतु राष्ट्राच्या विराट्पुरुषाचें लक्ष नेहमीं प्रगमनाकडे पाहिजे आहे. व म्हणूनच शक्य तितकी सुधारणा करण्यासाठीं भविष्यत्कालाकडे एकसारखें सूक्ष्म परीक्षण करीत पहात बसून वर्तमान स्थितीच्या तत्त्वांत काय फरक

करावयाचा हें ठरविणें राष्ट्रप्रतिनिधींचें महत्वाचें कर्तव्य होईल. कारण **राष्ट्र-संरक्षण हेंच कायतें कृत्य नसून राष्ट्रप्रगमन हेंच मुख्य कर्तव्य होय.**

"व म्हणून समाजस्वातंत्र्याचें संरक्षण व समाजएकीकरणाचें पूर्ण स्वातंत्र्य हीं राखलीं जातील. समाजाला सुशिक्षितता यावी एतदर्थ प्राथमिक शिक्षणाची सर्वव्यापक पद्धति सुरू करावी व शिक्षणसंस्थांना उत्तेजन व मदत द्यावी.

"सरकारी अधिकाऱ्यांची निवड ही बुद्धिविषयक श्रेष्ठता, व्यक्तिविषयक सुशीलता व समाजविषयक नीतिमत्ता ह्यांच्या विचारानें ठरविली जाईल.

"गुन्हेगारीचे कायदे अशा रीतीनें केले जावेत कीं, गुन्हेगारांची सुधारणा व सद्वर्तन हीं वाढावींत.

"सार्वजनिक वाचनालयें, वर्तमानपत्रें व विश्वविद्यालयें काढलीं जावींत व बक्षिसें दिलीं जावींत.

"सर्वव्यापक मतदारांच्या हक्काप्रमाणें जें सरकार येईल तें आम्ही शिरसावंद्य मानूं. कारण व्यक्तीनें राष्ट्रीय शब्दाला मान देणें हें तिचें कर्तव्य आहे. परंतु वरील मूलतत्त्वांविरुद्ध जर तें सरकार असेल तर जरी आम्ही राष्ट्राची आज्ञा मान्य करूंच करूं, तरी राष्ट्राला आमच्या मतांचा उपदेश इतक्या जोरानें करूं कीं, राष्ट्रानेंच पुन्हां क्रांति घडवून आणण्यास तयार व्हावें.

"आमचें उत्तर येथें संपलें आहे. हीं आमचीं मूलतत्त्वें आहेत. हीं आमचीं मतें प्रसिद्ध केलीं आहेत. पाहिजे असेल त्यांनीं तीं संरक्षण करावीं. 'तरुण इटली' ह्या मतानें चालणार. इटलीच्या भावी भाग्या इतकीच सुनिश्चित व ज्या स्वातंत्र्यविचारांतून ती प्रादुर्भूत झाली, त्या स्वातंत्र्यविचारां-इतकीच अविनाशी अशी ही 'तरुण इटली' ह्याच मार्गानें चालणार!

"तरुण इटली" अविनाशी रहाणार, कारण प्रस्तुत युगाच्या अंतस्फूर्तींशीं तिची तन्मयता झालेली आहे. व म्हणून सरकारी जुलुम, व्यक्तींचा शंकेखोर-पणा, किंवा परवशतेचें जड जोखड यांच्या योगाने इटलीच्या तरुण वीरांची महत्त्वाकांक्षा व स्वातंत्र्याकांक्षा कालत्रयींही नाश पावणार नाहीं!"

---

# भाग ३ रा.

## आत्मचरित्र.

### खंड २.

Bright goddess of the chain-less mind,
Brightest in dungeons, *liberty* thou art;
Thy palace is within the freeman's heart,
Whose soul the love of the alone can find.
And when thy sons to fetters are consigned
To fetters and the damp vault's day-less gloom
Thy joy is ***with them still*** and unconfined
*Their country conquers with their martyrdom.*

**Byron.**

याप्रमाणें 'तरुण इटली 'ची स्थापना करण्यास आरंभ केला. प्रथमतः मी स्वतः शपथ घेतली. त्या शपथेबरहुकुम मी अजून वागत आहें. व आजन्म वागेन. 'तरुण इटली 'च्या कार्यक्रमाप्रमाणें शिक्षण व उठावणी हीं दोन्हीं कर्तव्यें करण्यास मी आरंभ केला. गुप्त रीतीनें इटलीमध्यें शाखा काढून संस्थेची प्रसृति करण्याच्या खटपटीस लागलों. व इकडे 'तरुण इटली ' या पत्राचें प्रसिद्धिपत्रक छापून प्रसिद्ध केलें. या वेळेस आमच्यापाशीं पैशाचें अगदीं बळाबळ नव्हतें. मी माझे घरून जे थोडेसे पैसे येत असत त्यांतूनच खर्च भागवी. शिवाय माझे जे इतर मित्र होते तेहि हद्दपार झाल्यापासून निर्धन झालेले होते. परंतु लोकाश्रयाच्या भरंवशावर आम्ही वर्तमानपत्र काढण्याचे कामास हात घातला. अशा रीतीनें अंगावर गुप्त संस्था व वर्तमानपत्र अशीं दोन कामें घेतलीं. मी माझा वेळ वर्तमानपत्रासाठीं लेख लिहिण्यांत व गुप्त संस्थेचा प्रसार करण्यांत खर्च करूं लागलों. मी आतां मार्सेलिसमध्येंच राहण्याचा संकल्प केला. तेथून इटलीमध्यें जिनोआ, लेग्हॉर्न वगैरे शहरीं जें माझें मित्रमंडळ होतें, त्याना 'तरुण इटली 'ची कल्पना समजाऊन देऊन नंतर तिच्या शाखा ठिकठिकाणीं उघडण्यासाठीं तिचे नियम, काम कसें करावयाचें याची माहिती, प्रत्येक महत्वाच्या प्रश्नाबद्दल खुलासा,

निरनिराळ्या सूचना, वगैरे धाडीत असें. जिनोआमध्यें माझे असलेले प्रिय मित्र रफिनी बंधुद्वय व लेग्हॉर्नमध्यें असलेले बिनि व ग्युएराझी यांच्या श्रमांकडे सर्व श्रेय आहे कीं, लवकरच जिनोआमध्यें व लेग्हॉर्नमध्यें 'तरुण इटली'च्या शाखा उघडल्या गेल्या पहिलीं राष्ट्रमंडळें तेथें स्थापिलीं गेलीं.

'तरुण इटली' ची रचना ही शक्य तितक्या रीतीनें साधी व फाजिल विधीपासून अलिप्त अशी केली होती. कारबोनारीमधील त्या असंख्य पायऱ्या, वर्ग, इयत्ता वगैरे सर्व काढून टाकून आम्ही दोन वर्ग कायते ठेविले. एक दीक्षागुरु किंवा दीक्षाधिकारी व दुसरा दीक्षित.

'तरुण इटली'च्या तत्त्वांना पूर्ण मान देणारांपैकीं जे सभासद विशेष बुद्धिमान व धोरणी असत त्यांना दुसऱ्यांना दीक्षा देण्याचा अधिकार देण्यांत येत असे व दीक्षागुरु हें नांव मिळत असे. परंतु जे नुसते दीक्षित वर्गांतील असतील त्यांना दुसऱ्यांना दीक्षा देण्याचा अधिकार नसे. इटलीच्या बाहेर एक मुख्य कमेटी नेमलेली असे. इटलींत कितीहि धरपकड झाली तरी संस्थेच्या मुख्य केंद्राला धक्का लागूं नये म्हणून मुख्य कमेटी इटलीच्या बाहेर ठेवली होती. त्या कमेटीचें मुख्य काम म्हणजे 'तरुण इटली' चें निशाण एकसारखें फडकत ठेवावयाचें व इतर देशांतील **लोकसत्ताक व स्वातंत्र्यशाली** वीरांबरोबर शक्य तितका स्नेहसंबंध दृढ करावयाचा. नंतर या मुख्य कमेटीखालीं इटलीच्या महत्वाच्या प्रांतांतून मोठमोठाल्या शहरीं स्थानिक कमेट्या नेमल्या होत्या. यांचें मुख्य काम म्हणजे तात्पुरतीं कामें बजावणें, स्थानिक कृत्यें पार पाडणें, पत्रव्यवहार करणें वगैरे वगैरे असे. सभासदांचीं संख्या ही प्रत्येक शाखेंत सारखीच असे असें नाहीं. त्या प्रत्येक शाखेच्या सभासदांपैकीं लहान लहान टोळ्या करून त्या एकेक दीक्षागुरूच्या ताब्यांत दिलेल्या असत. व या सर्व दीक्षागुरूंवर त्या विशिष्ट स्थानाचा खरा पुढारी हा चालक नेमलेला असे.

अशी, थोडक्यांत म्हणावयाची म्हणजे, 'तरुण इटली' ची रचना होती. पत्रव्यवहाराची पद्धति अशी होती कीं, प्रथमतः दीक्षितांनीं दीक्षागुरूंकडे, नंतर त्या दीक्षागुरूंनीं प्रत्येकीं त्यांच्या स्थानिक चालकाकडे, त्या स्थानिक चालकांनीं त्यांच्या जिल्ह्यांतील मंडलांकडे व त्या मंडलानें इटली बाहेरच्या असणाऱ्या सर्वांत वरच्या केंद्रमंडलाकडे ( Central committee ); अशा परंपरेनें सर्व व्यवहार केला जाई.

द्वा. क्र. ६५३३

केंद्रमंडलाकडून स्थानिक मंडलाकडे व स्थानिक मंडलाकडून केंद्रमंडलाकडे येणाऱ्या निरोप्यांवर विश्वास ठेवण्याचे अर्थी त्यांची खात्री करून घेण्यासाठीं कांहीं खुणा ठेवलेल्या असत. विशिष्ट शब्द, विशिष्ट आकृतीनें कापलेला कागदाचा तुकडा, व हस्तस्पर्शाची ठरलेली लकब ह्या खुणा योजण्यांत येत असत. व त्यांतूनहि फसगत होऊं नये म्हणून त्या दर तीन महिन्यांनीं बदलल्या जात. प्रत्येक सभासद आपल्या ऐपतीप्रमाणें दरमहा ठरलेली वर्गणी देत असे. या वर्गणीपैकीं दोन तृतीयांश रकम प्रांतिक खर्चाकरितां ठेविली जाई. व बाकीची एक तृतीयांश रकम ही केंद्रमंडलाकडे संस्थेच्या रचनेचा खर्च भागण्यासाठीं दिली जाई–नव्हे दिली गेली पाहिजे होती. पहिल्यानेंच असा अजमास होता कीं, छापखान्याचा खर्च हा लेखांच्या विक्रीवरच निघेल.

आमच्या संस्थेचें चिन्ह सायप्रसवृक्षाची एक डहाळी असे. सायप्रसवृक्ष हें एक स्मशान चिन्ह आहे. व तेंच आम्ही आमच्या देशवीरांच्या स्मृतीसाठीं धारण केलें होतें. आमचा सूत्र शब्द 'आतां व आजन्म' हा आमच्या कार्यांत अत्यंत अवश्य अशा दृढ निश्चयाचा व सत्तत्वांचा द्योतक होता.

'तरुण इटली'च्या झेंड्यावर इटली राष्ट्राचें रंगत्रय होतें. श्वेत, रक्त व हरित ( मॅझिनीनें यांचा उद्देश दिला नाहीं परंतु तो स्पष्ट आहे. श्वेतवर्ण हा पावित्र्याचा द्योतक आहे, रक्तवर्ण हा अन्यायाच्या सूडाचा द्योतक आहे व हरितवर्ण–हिरवारंग–हा तारुण्याचा व ताज्या दमाचा द्योतक आहे.) त्या निशाणाच्या एका बाजूस स्वतंत्रता, समता व मानुष्यता हें शब्दत्रय व दुसऱ्या बाजूला राष्ट्रैकता व दास्यमुक्तता हें शब्दद्वय लिहिलेलें असे. पहिल्या बाजूवर इटली देशाचीं अंतस्थ कर्तव्यें असून दुसऱ्या बाजूवर त्याचीं राष्ट्रीय कर्तव्यें लिहिलेलीं होतीं. पहिल्यापासून 'परमेश्वर व मानव्य' हा आमचा मंत्र ठरलेला आहे. 'परमेश्वर व मानुषता' असा हा महामंत्र आमच्या इतर राष्ट्रांशीं असणाऱ्या संबंधांत पाळला जाईल; व 'ईश्वर व लोक' हा मंत्र आमच्या अंतर्गत व्यवस्थेंत पाळला जाईल.

ह्या दोन तत्त्वांच्या किंवा वास्तविक पाहतां एकाच तत्त्वाचीं हीं परिस्थितीनें भिन्न दिसणारीं जीं दोन रूपें 'ईश्वर व जानपद,' 'लोक व देव' ह्यांच्या पासूनच आमच्या संस्थेच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व व्यक्तिविषयक सर्व मतांचा उद्भव झालेला आहे. राष्ट्रांमध्यें प्रादुर्भूत होणारीं भिन्न भिन्न

समाजरूपांतरें निरीक्षण करून त्या सर्वांच्या एकीकरणांत जें सर्वसामान्य तत्त्व दिसून येतें तें ग्रहण करून त्या तत्त्वाच्या भाषेंत राष्ट्राचीं सर्व उपांगें समाविष्ट करण्यांत यशस्वी झालेली राजकीय संस्था म्हटली म्हणजे आमची 'तरुण इटली' हीच होय. राष्ट्राची दास्यापासून मुक्तता, मग स्वतंत्रतेनें भूषित अशा त्या राष्ट्रपुरुषाचें इतर राष्ट्रपुरुषांशीं स्नेह संपादनता व अशा रीतीनें मानवी उत्क्रांतीकडे सर्वांसह अभिमुख होऊन अंतिम तत्त्वाला-परमेश्वराला-जाऊन तन्मय होण्याची कर्तव्यता, हा मनुष्यांचा पूर्णावस्थेचा मार्ग प्रथमतः 'तरुण इटलीनें' शोधून काढला. स्वातंत्र्यसंपादन ही धर्मशीलत्वाची पहिली पायरी होय, राजकीय व धार्मिक कर्तव्यें भिन्न नाहींत व म्हणूनच ऐहिक व पारमार्थिक हीं एकाच तत्त्वाचीं दोन रूपें आहेत असें दाखवून जगांतील व स्वर्गांतील मूर्ख मतवाद्यांनीं माजविलेला विरोध मोडून टाकला.

त्या वेळेस इटलींमध्येंच स्थापन होत गेलेल्या 'तरुण इटली' ह्या गुप्त मंडळीच्या निरनिराळ्या शाखांना मी वारंवार उपदेश व मार्गदर्शन देत असें. त्याचप्रमाणें इटालियन तरुण लोक माझी भेट घेण्यास व उपदेश ऐकण्यास आले म्हणजे त्यांनाही मी वरील तत्त्वांची फोड करून सांगत असें. अशा प्रकारच्या उपदेशांत मी नेहेमीं राजकीय व नीतिविषयक तत्त्वांची सांगड घालीत असे. हजारों वेळां हें काम करावें लागत असे. त्यांतून साधारण मुद्दे खालीं दिले आहेतः—

"नुस्ती क्रांति करूनच थांबावयाचें नाहीं तर शक्य तितका प्रयत्न करून पुनरुज्जीवन करावयाचें.

"आपल्यापुढें जो मुख्य प्रश्न आहे तो खरें पाहिलें असतां राष्ट्रीय संस्कृतीचा-राष्ट्रीय शिक्षणाचा-आहे. परंतु आपल्या मातृभूमीला सध्यां ज्या परतंत्रतेच्या नीच स्थितींत कोंडलेलें आहे त्या पारतंत्र्याचा नाश केल्याशिवाय हें राष्ट्रीय संस्कृतीचें महत्कार्य करणें अशक्य असल्यानें त्या संस्कृतीचीं साधनें म्हणूनच शस्त्रें परजलीं पाहिजेत व क्रांतियुद्ध केलें पाहिजे. परंतु ज्या समशेरी घेऊन आम्ही राजकीय शृंखला तोडणार आहोंत **त्या समशेरीच्या अग्रभागीं 'देव व लोक' हीं तत्त्वें असतील तरच त्या समशेरींना आम्ही स्पर्श करूं.**

"जास्त शोभिवंत व शुभ मंदिर बांधण्याची धमक असेल तरच प्रस्तुतच्या इमारतीचा नाश करण्यांत खरी मजा आहे. स्वदेशबांधवाच्या अंतः-

करणपटावर हक्क व कर्तव्य हे शब्द लिहूं अशी आशा व निष्ठा जर नसेल तर ते शब्द नुस्ते कागदोपत्रीं लिहून काय उपयोग ?

" आपल्या वडिलानीं हीं कर्तव्यें केलीं नाहींत व म्हणूनच आपण तीं अवश्य केलीं पाहिजेत. इटलीच्या देशबंधूंना नुस्तें बंड करण्यास सांगावयाचें नाहीं, तर आपलें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे स्वतंत्र व शक्तिमान राष्ट्र निर्माण करणें होय.

" अशी आमच्या मनाची धर्मनिष्ठा आहे कीं, इटली देशाचें ऐहिक अस्तित्व संपलेलें नाहीं. मानवी उत्क्रांतींत नवीन तत्त्वांची भर टाकण्यास ती अजून समर्थ आहे. तिनें दोन वेळां जगाचें नेतृत्व पत्करिलें होतें. तीच इटली जगाचें नेतृत्व पुन्हां एकदां आपल्याकडे घेण्यास सर्वसमर्थ आहे. आपलें कर्तव्य म्हणजे ह्या नेतृत्वास अत्यंत आवश्यक अशी राजकीय स्वातंत्र्यप्राप्ति करून घेणें हें होय.

" द्रव्यवादित्वानें व्यक्तिधर्माचीं गौणतत्त्वें प्रचलित होतात. परंतु राष्ट्र व समाज निर्माण करण्यास द्रव्यवादित्व समर्थ नाहीं. कारण राष्ट्रनिर्मिति ही व्यक्तींच्या गौण हेतूंनीं घडणारी नाहीं. आपली सर्वांची उत्पत्ति, आपली प्रवृत्ति, आपली अंतिम सार्थकता ही एकच आहे अशी भावना झाल्याशिवाय समाजनिर्मिति होत नाहीं. म्हणून व्यक्तित्व आम्ही झुगारून देऊन समष्टित्व हें उत्क्रांतिरूप अंगिकारतों.

" पूर्वींच्या थोर थोर इटालियनांच्या इतिहासप्रसारानें आम्हीं इटालियन लोकांच्या मनांत स्वसामर्थ्यनिष्ठा उत्पन्न करूं. स्वराष्ट्राचीं भूतकृत्यें ऐकून त्यांचे बाहू फुरफुरूं लागतील. धैर्य, स्वार्थत्याग, नेट, चिकाटी व एकदिलपणा हे सद्गुण त्याचे अंगांत संचरतील. ते सद्गुण आमच्या महत्कार्याला अत्यंत आवश्यक आहेत.

" ज्यांचीं मतें तर्कशास्त्राच्या कसोटीस उतरतात त्यांचा पंथ हा बलिष्ठ असतो. तुमच्या अनुयायांमध्यें नुसता बंडखोरपणा माजवूं नका. प्रत्येकाला त्याचा विश्वास कशांत आहे हें विचारा व ज्यांचा तुमच्या तत्त्वांमध्यें पूर्ण विश्वास असेल त्यांनाच आपल्यांत घ्या. तुम्ही संख्येवर फारसे जाऊं नका, तर मतैक्यावर सर्व विश्वास ठेवा.

" तुम्हाला नवीन झेंडा उभारावयाचा आहे. व म्हणून तो तोलण्याची शक्ति ज्यांच्यांत असेल असेच लोक निवडा. असे लोक म्हटले म्हणजे राष्ट्रां-

तील तरुण जवान हे होत. **तारुण्य हें अवसान, धाडस, करारी व आत्मत्याग यांनीं भरलेलें असतें.** त्यांच्यापासून आपलीं तत्त्वें गुप्त ठेवूं नका. फाजील गुप्तता नाश करते. त्यांना सर्व कळूंद्या इतकेंच नव्हे तर त्यांना तीं तत्त्वें स्पष्ट रीतीनें समजावून सांगा. आपला उद्देश काय व रस्ता कोणचा हें त्यांना कळलें कीं, मग ते काय वाटेल तें करतील.

" भूतकालीं घडलेली फार मोठी चुकी म्हटली म्हणजे तत्त्वांचे जागीं व्यक्तींची योजना होय. स्वातंत्र्यासाठीं अमुक करा असें सांगण्याचे ऐवजीं, आमचा हुकूम म्हणून–अमका सांगतो म्हणून–करा असें सांगितलें जाई.

" ही चुकी सुधारा. व तत्त्वनिष्ठा शिकवा. त्यांना व्यक्तीसाठीं लढाई करावयाची नाहीं असें कळवा. आपल्याला आपल्या प्रिय देशाला मुक्त करण्याकरितां, लोककल्याणाकरितां, निसर्गदत्त हक्काकरितां व ईश्वराकरितां लढावयाचें आहे असें कळवा.

" लोकांस असें समजावून सांगा कीं, राज्यक्रांतीचे पुढारी ज्यांचा राज्यक्रांतींत विश्वास आहे अशा लोकांतूनच निवडावे. ज्यांनीं गुलामगिरीचीं कामें करून मोठेपणा मिळविला आहे, त्यांच्या हातीं राज्यक्रांतीचें चालकत्व सोंपवूं नये. १८३१ सालच्या बंडांतील अशा प्रकारच्या पुढाऱ्यांचें निंद्य वर्तन उघडकीस आणा.

" पुनः पुन्हां लोकांस असें समजावून सांगा कीं, इटली देशाची मुक्तता ही तिचे लोकांचे हातांत आहे. क्रियाकर्तृत्व–एकसारखें झटणें हें मुख्य शस्त्र आहे. उठावणी–पुनः पुन्हां उठावणी–पहिल्या पहिल्यानें येणाऱ्या अपजयांस भीक न घालतां, धैर्य न सोडतां, व निराश न होतां उठावणी–करीत रहावें.

" तडजोड म्हणून सहसा करूं नका. तडजोड ही बहुधा अनीतिकारक व घातक असते.

" **तुम्ही कधींही असें स्वप्नांतसुद्धां आणूं नका कीं तुम्हास लढाई टाळतां येईल. नाहीं, नाहीं, लढाईशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं.** लढाई–भयंकर रक्तपाताची, तुमुल, कठोर अशी–लढाई ऑस्ट्रियाशीं केल्याशिवाय सुटका नाहीं. लढाई टाळतां येणें शक्य नाहीं इतकेंच नव्हे तर तुम्हास तितकें सबलत्व येतांच शक्य तितक्या लवकर त्या लढाईला तुम्हीच आरंभ केला पाहिजे. कारण क्रांतियुद्धांत सदोदित पहिला आघात क्रांतिपक्षानेंच केला पाहिजे. एकदम तुटून पडल्यानें तुमचे असावध शत्रु भयभीत होतात व तुमचे स्नेही आशायुक्त व धैर्ययुक्त होतात.

" परक्या सत्तेपासून कांहींही मिळविण्याची आशा धरूं नका. परके लोक तुम्हांस कधींही मदत करणार नाहींत. तुम्ही असेंच सिद्ध केलें पाहिजे कीं, त्यांच्याशिवाय तुम्हांमध्यें स्वतंत्रता मिळविण्याची धमक आहे.

" व जेव्हां उठावणी कराल तेव्हां ती उठावणी एकाद्या प्रांतातर्फे किंवा जातीतर्फे न करितां ती सर्व इटलीचे नांवानें करा. सर्व देशाचे नांवानें उठा. जर स्वातंत्र्यतत्त्वासाठीं राष्ट्रैकतेच्या नांवानें उठाल व पहिल्या धडक्यासरशीं स्वतःच्या सामर्थ्याचा प्रभाव दाखवाल तर सर्व लोक दुसऱ्याच हल्ल्याला तुम्हांस येऊन मिळतील व अशा रीतीनें तुम्हांस विजय मिळेल. परंतु राष्ट्राचे नावानें व स्वतःचे हिंमतीवर उठलें असतां जरी तुम्हांस अपयश आलें तरी काय ? त्या देशवीरत्वानें तुम्ही राष्ट्रास इतकें उदात्त शिक्षण द्याल कीं, तुमचे पुत्र तुमच्या अपजयाचा फायदा घेऊन व तुमच्या रक्ताची शपथ घेऊन तुम्ही आरंभिलेला पवित्र कार्यक्रम शेवटास नेतील. "

साधारणतः अशा तत्त्वांचा व अशा दिशेचा मी बोध करीत असें. ज्यांना मी हा उपदेश देत असें त्यांपैकीं पुष्कळजण अजून जिवंत आहेत व ते सर्व, मी लिहिल्याप्रमाणेंच उपदेश देत होतों कीं नाहीं, याची साक्ष देतील. माझ्या उपदेशाचा परिणाम फार त्वरित होत असे. इकडे टस्कनी प्रांतांत कमेट्यांची स्थापना अत्यंत जलद रीतीनें होत गेली. जिनोआ शहरीं रफिनी बंधुद्वय, कँपानेला, बेन्झा व संस्थेच्या प्रसारार्थ अत्यंत खटपट करणारे आणखी काहीं तरुण लोक हे सर्व तारुण्याच्या भरांत होते; अप्रसिद्ध दरिद्री व वजन पडावयासारखें कांहीं साधन नसलेले असे होते. परंतु या सर्व अडचणी बाजूस सरल्या व या तरुणापासून त्या तरुणाला व या विद्यार्थ्यापासून त्या विद्यार्थ्याला आग लागत चालली. संस्थेचा प्रसार एखाद्या वणव्याप्रमाणें अनपेक्षित त्वरेनें चालू झाला. इतक्यांत आमचें वर्तमानपत्रहि प्रसिद्ध झालें. त्यामुळें आजपर्यंत नसलेलें व्यक्तिमहत्व आम्हांस मिळालें. तें लेख ज्यांच्या ज्यांच्या हातांत पडले ते ते आमच्या मताकडे वळले. तरुणामागून तरुण आमच्या निशाणाखालीं मिळूं लागले. व्यक्तीच्या व फाजील गौप्याच्या विरुद्ध हा तत्त्वांचा जय होता. प्रत्येक उच्च हृदयांतून आमच्या विचारांचा प्रतिध्वनी निघूं लागला व आजपर्यंत आमच्या इटालियन तरुणांच्या अंतःकरणांत सुप्त असलेल्या उदात्त महत्त्वाकांक्षा 'तरुण इटली' च्या गर्जनेनें खडबडून जाग्या झाल्या.

अशा रीतीनें आम्हांस उत्तेजन मिळालें. आमचीं कर्तव्यें पार पाडण्यास आम्ही प्राणांचीही पर्वा ठेवली नाहीं. आमच्या त्या लहानशा मंडलांतील प्रत्येकजणानें, त्या प्रत्येक देशवीरानें, मेहनत, श्रम किंवा स्वार्थत्याग यांची कमाल करून तीं कर्तव्यें शक्य तितकीं पार पाडलीं. मी असें सांगतों—ज्या तरुणांनीं आपले देह धारातीर्थीं ठेविले त्यांच्याविषयीं व जे अजूनपर्यंत कीर्तीला तुच्छ मानून अप्रसिद्धींत कार्यक्षम आहेत त्यांच्याविषयीं माझें असलेलें कर्तव्य स्मरून—मी असें सांगतों कीं, आमच्या त्या तरुण मंडळाप्रमाणें स्वातंत्र्यकार्याला वाहून घेतलेल्या, एकमेकांवर इतकें अप्रतिम प्रेम करणाऱ्या, इतक्या निर्मल उल्हासानें व अवसानानें झटणाऱ्या, व प्रत्येक दिवशीं, प्रत्येक क्षणीं, इतके अश्रांत श्रम करणाऱ्या, अशा तरुणांचें मंडल मी इतरत्र कोठेंही पाहिलें नाहीं.

ह्या मंडलांत, लॅम्बर्टि, युसिग्लियो, लुस्ट्रीनी, रफिनी, मी व आणखी सुमारें पांच सहा जण इतके होते. त्यांपैकीं बहुतेक मॉडेना मधूनच आलेले होते. कोणीही मदत नसतां, चाकरमाणसें नसतां, कचेरी नसतां, बदली द्यावयाची सोय नसतां, सकाळपासून संध्याकाळपर्यंत व संध्याकाळपासून रात्रीं बारा वाजेपर्यंत आम्ही एकसारखे काम करीत होतों. लेख लिहिणें, पत्रव्यवहार, इटलींतील शाखांचे मार्गचालकत्व, प्रवाशी व तरुण इटालियन यांच्या भेटी घेणें, इटालियन खलाशांना आपल्या पक्षास वळविणें, छापलेल्या लेखांच्या घड्या घालणें, गठ्ठे बांधणें वगैरे मानसिक व शारिरीक कामें एकामागून एक अशीं करण्यासाठीं हमालासारखे आम्ही राबत होतों.

लासेसिलिया नांवाचा सच्छील व खऱ्या कळवळीचा तरुण हा कंपॉझिटर होता. लॅम्बर्टी हा छापलेले लेख तपाशीत असे. तिसरा एक ते लेख गठ्ठे करून वाहून नेत असे—गाडीचें किंवा हमालाचें भाडें वाचवीत असे ! आम्ही सर्वजण अगदीं बरोबरीच्या नात्यानें व सख्या भावांभावांप्रमाणें रहात होतों. एकाच उद्देशानें व एकाच आशेनें बद्ध झालेले भाऊ होतों. इतर राष्ट्रांतील लोकसत्ताकवादी आमच्या प्रयत्नांचा नेट व स्वातंत्र्यप्रीति पाहून आम्हांवर प्रेम करीत व आमच्याबद्दल पूज्यभाव बाळगीत. बहुतेक वेळां आमच्या आम्हींच जमविलेल्या लहानशा पुंजींतून तो सर्व खर्च भागवावा लागत असल्याकारणानें, आमच्या दारिद्र्याची कमाल होई व आम्हांजवळ एक पै देखील राहत नसे. तथापि आम्ही सदोदित आनंदांत व उल्हासांत होतों. आमच्या मुद्रेवर सदा सर्वदा भावी आशेचें स्मित झळकत असे.

१८३१ पासून १८३३ पर्यंतचीं तीं दोन वर्षें हीं आमच्या आयुष्यांतील इतकीं निर्मल, आनंदाचीं व हौशीनें कर्तव्यतत्परतेंत खर्चिलेलीं होतीं कीं, भावी पिढ्यांनीं ती हकीगत अवश्य वाचावी अशी माझी इच्छा आहे. आमच्यावर आमच्या शत्रूंनीं वाटेल तसे हल्ले केले. आमच्यावर कांहीं वेळां जिवावरचीं संकटें आलीं. ती हकीकत पुढें देईनच. परंतु तें युद्ध हें आमच्या शत्रूंनीं उदात्त रीतीनें केलें नाहीं. त्याच्या या त्रासानें, त्यांनीं केलेल्या ह्या विश्वासघातानें, आमच्यांत पाडलेल्या फाटाफुटीनें, आमची कांहीं मंडळी जरी निराश आणि हताश झाली असली तथापि आमचा पक्ष कांहीं हताश झाला नाहीं आमचे आत्मे अजून आशेनें फुललेले आहेत. आम्ही व्यक्ती-बद्दल आतां बेपर्वा झालों आहोंत. आतां मी फक्त कर्तव्यासाठींच—विरक्त, फलाशाविहीन, निर्ममत्वपूर्ण अशा कर्तव्यासाठींच—खपत आहें व आजन्म खपेन. कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ' या कर्तव्यमीमांसेप्रमाणें मी वागणारच, परंतु आमचे मागून येणाऱ्या स्वदेशबंधूंना तरी अशा अधम शत्रूंपासून परमेश्वर सुरक्षित ठेवो !

आमचें पत्र व लेख इटली देशांत गुप्तपणानें प्रसृत कसे करावयाचे हा पहिला प्रश्न येऊन पडला. तेव्हां फ्रान्सपासून इटलीकडे जाणाऱ्या बोटींवरील इटालियनांशीं संधान बांधण्याचा प्रयत्न केला. त्यांमध्यें मॉन्टेनेरी नांवाचा एक तरुण इटालियन होता. त्यानें व इतर कांहीं जणांनीं ते लेख इटली-मध्यें वेळचे वेळीं नेण्याचें काम अतीशय तत्परतेनें व शिताफीनें केलें. हा तरुण मॉन्टेनेरी पुढें कॉलऱ्यानें मेला. पहिल्या पहिल्यानें सरकारची वक्रदृष्टी आमच्या लेखांकडे गेली नाहीं. तेव्हां, तोंपर्यंत लेखांचे पुडक्यांवर कोणातरी एका व्यापाऱ्याच्या वखारीचा पत्ता लिहित होतों. या व्यापाऱ्याच्या नांवाचा सरकारला सहसा संशय येत नसे. त्यांतूनही जिनोआस धाडावयाच्या पुडक्यांवर लेग्हार्न शहरांतील वखारांचें नांव असे व लेग्हार्नच्या पुडक्यांवर दुसऱ्या एका शहराचें नांव असे, व अशा रीतीनें तीं पुडकीं पाठविलीं जात. अशा रीतीनें ज्या पहिल्या शहराला बोट लागेल तेथील ऑफिसर त्या ठिकाणच्या पत्रांबद्दल चौकशी करीत असल्यानें सर्व पुडकीं विन तपासतां सुटत. तीं पुडकीं आमच्या मनुष्याच्या ताब्यांत बोटीवर पडत. पुढें बोट बंदराला लागली कीं, आमच्या आगाऊ सूचनेप्रमाणें त्या शहरांतील संस्थेचा अधि-कारी बोटीवर भेटीला म्हणून येई व जाताना तें पुडकें लपवून घेऊन जाई.

इकडे पोलिस त्या शहराच्या पत्त्यावरील सर्व वस्तु तपाशीत स्वस्थ पडत. परंतु कांहीं कालानें अधिकाऱ्यांचें लक्ष इकडे लागलें. त्या लेखांनीं इतका परिणाम घडत असे कीं, सरकारनें ते लेख पकडून देईल त्याला बक्षिसें लाविलीं व इटलीमध्यें त्यांचा प्रसार होण्यास यत्किंचित्‌ही मदत कोणीं केली तरी त्याला भयंकर शिक्षा देण्याचे हुकूम सुटले. यानंतर एका नेटिव्ह संस्थानिकांनीं आमच्याविरुद्ध जाहिरनामा काढला. जो कोणी आमचे वाचक धरून देईल त्याला त्या वाचकांपासून आलेल्या दंडापैकीं निम्मी रक्कम दिली जाईल व त्याचें नांव प्रसिद्ध केलें असतां आमचे तरुण लोक त्या विश्वासघातक्याचा निःपात करतील म्हणून त्याचें नांव प्रसिद्ध केलें जाणार नाहीं असें फर्मावलें. येथून राजसत्तेशीं आमची प्रत्यक्ष लढाई जुंपली. या झगड्यामध्यें आम्हाला शेंकडों यातना भोगाव्या लागल्या व त्रास पडला, तथापि मी अभिमानानें सांगतों कीं, अखेर आमचाच पक्ष विजयी झाला.

याप्रमाणें सरकारची करडी नजर आमच्या लेखांवर फिरल्यानंतर मग एक नवीनच बेत योजण्यांत आला. राळीच्या किंवा कोळशांच्या पोत्यांची आवक जावक इटलीमध्यें सुरू होती. आम्ही त्या व्यापारासाठीं लहानशी एक वखार काढली व तेथें त्या कोळशांच्या पोत्यांत आपण स्वतःच आपल्या हातांनीं आमच्या लेखांचीं पुडकीं नीट व्यवस्थेनें भरीत होतों. व ह्या कोळशांचीं दहा दहा बारा बारा पोतीं आगबोटीच्या एजंटाचे मार्फत धाडीत होतों. त्या एजंटांना त्या पोत्यांत कोळसेच काय ते आहेत असें कळविण्यांत येई, व तीं पोतीं सुरक्षित पोंचावीं म्हणून भरपूर कमिशन देण्यांत येई. त्या पोत्यांचे पत्तेही ज्यांना आंतलि मर्म माहीत नाहा, अशा व्यापाऱ्यांचे नांवाचे असत. त्या अडत्याचे मार्फत तीं पोतीं इटलीमधल्या व्यापाऱ्यांस मिळालीं म्हणजे तीं पाळत राखून आमच्या आगाऊ सूचनेप्रमाणें तेथील सभासद गिऱ्हाइकांचे मिषानें त्यांजकडे येत व ठरलेल्या खुणेवरून तेवढींच पोतीं निवडून काढून विकत घेऊन जात. व नंतर आमचे लेख गुप्त रीतीनें चोहोंकडे वांटले जात.

आम्हीं योजिलेल्या हजारों युक्त्यांपैकीं ही एक उदाहरणार्थ मीं दिली आहे. या आमच्या गुप्त प्रसृतीच्या कामांत आम्हाला फ्रेंच लोकसत्तावाद्यांचेंही साह्य होई. ह्यांपैकीं बरेच जण आमच्या फार उपयोगी पडले आहेत. मला जिआसोपेलो नांवाच्या तरुणाचें नांव अजून आठवत आहे इटलीमध्यें २००

बंदुका धाडण्यासाठीं आम्हीं त्याच्या जहाजावर नेल्या. त्यानें त्या बंदुका गुप्त रीतीनें पोंचविण्याचें अंगीकृत कार्य तडीस नेण्यास्तव फार प्रयत्न केले. परंतु अखेर तें कृत्य उघडकीस येऊन त्याचें जहाज व सर्व मालमत्ता हिसकाऊन घेतली गेली ! तथापि तो माझ्याशीं फार स्नेहानें वागला. मला वाटतें कीं, तो अजून मार्सेलिसलाच रहात असेल. माझी मनापासून अशी इच्छा आहे कीं, त्याच्या नजरेस हा लेख पडावा. मला त्याची अजून आठवण आहे असें पाहून त्याला अतीशय आनंद होईल, अशी माझी पक्की खातरी आहे. परंतु त्याच्याचबद्दल काय, पण असें स्पष्ट सांगतों कीं, लोकपक्षांतील एकही मनुष्य माझ्याशीं कृतघ्नतेनें वागला नाहीं किंवा मला विसरला नाहीं.

आमच्या लेखांना वाटेल तितके जुलमी नियम व कडक शिक्षा केल्या असतांहि आळा घालतां येत नाहीं, असें पाहून इटलींतील सरकार हताश झालें व शेवटीं त्यानें फ्रेंच सरकाराकडे तक्रार केली व मार्सेलिसमधील आमचा लेखनव्यवसाय बंद पडावा म्हणून विनंती केली ! व फ्रेंच सरकारनें त्याला नंदीबैलासारखी मान डोलविली. परंतु या त्यांच्या अनुमोदनानें आम्ही न भितां तसेंच काम चालू ठेवलें. त्यांनीं आम्हांवर काय काय जुलूम केले ते पुढें देईन.

मध्यंतरीं इटलीमध्यें ' तरुण इटली ' च्या गुप्त संस्थेचा जयजयकार होत चालला. जिनोआपासून जो आरंभ झाला तो शहरोशहरीं संस्थेच्या शाखा पसरत चालल्या. स्थानिक कमेट्याची संख्या वाढत चालली. पुढें सुरक्षित व गुप्तरीतीचा प्रवेश नीओपोलिटन सरहद्दीकडे चालू झाला. पत्रव्यवहार धोक्याचा असल्यानें सदोदित प्रांतोप्रांतीं माणसें धाडण्यांत येत. व त्यांच्या द्वारें निरोप किंवा कामगिरी कळविण्यांत येई व दीक्षित केलेल्या सभासदांचे अवसान कायम ठेवण्यांत येई. तरुण लोक आमच्या लेखांसाठीं उतावीळ झालेले असत. शेवटीं आमच्या लेखाबद्दलची मागणी इतकी वाढली कीं, आम्हीं कितीही प्रती धाडल्या तरी त्या अपुऱ्याच पडत. तेव्हां मग इटलीच्या सर्व बाजूंना गुप्त छापखाने ठेविले व त्यांतून आमच्या पत्राच्या प्रती वाटेल तितक्या काढल्या जात. शिवाय स्थानिक महत्त्वाच्या लेखांची, आमच्याच तत्त्वाचा आणखी प्रसार करण्यासाठीं प्रसिद्धि होत असे. अशा रीतीनें ' तरुण इटली' ही संस्था इटली देशांत एका वर्षाचे आंत एक कार्यकर्ती शक्ति बनली.

हा तत्त्वाचा जय होता. सामान्य दर्जांत जन्मलेले, अप्रसिद्ध असलेले,

ज्याच्या जवळ द्रव्य नाहीं व त्या वेळपर्यंत लोकसंघाचे पुढारी व वजनदार गणलेल्यांच्या मताशीं सर्वथैव विरुद्ध असलेले असे एक मूठभर तरुण उठतात काय, एक संस्था काढतात काय, व जिचा निरनिराळ्या सात सरकारांना व सात सिंहासनांना वचक बसून ते तिच्या नाशार्थ सज्ज झाले अशा त्या प्रचंड शक्तीचे पुढारी होतात काय ! ही एकच गोष्ट सिद्ध करील कीं, त्यांनीं जें निशाण उभारलें होतें तें सत्याचें निशाण होतें.

कोणचीही राजकीय पद्धति नीट निरीक्षण करून पाहिली तर असें आढळून येईल कीं, ती एका तत्त्वज्ञानपद्धतींतून उद्भवलेली आहे, राजकीय गोष्टी घडण्याचे आधीं राजकीय विचार बदलावे लागतात. विचार हे नेहमीं आचारांच्या पूर्वीं उद्भवतात. प्रत्येक नवीन क्रांति ही एक नवीन कार्यक्रम आहे. प्रत्येक क्रांति ही कोणत्या तरी तत्त्वाचा परिणाम असते. म्हणून क्रांतीचे आधीं राष्ट्राला तें तत्त्व बरोबर समजून दिलें पाहिजे. व तें तत्त्व राष्ट्रीय मनानें ग्रहण केलें कीं क्रांति हां हां म्हणतां यशस्वी होते.

फ्रान्सचे सरकारनें इटलीच्या जुलुमी राजाला संतुष्ट करण्यासाठीं १८३२ मध्यें एक हुकूम सोडला. व मला हद्दपारीची शिक्षा दिली. तो ऑगष्ट महिना होता. हद्दपारीची शिक्षा झाली होती तथापि मार्सेलिस सोडणें हें मला अगदीं अशक्य होतें. इटलीमध्यें दळणवळण राखण्याची सर्व सोय आम्हीं मार्सेलिसला उत्तम रीतीनें केलेली होती. व माझ्या लेखनप्रसृतीसाठीं मला मार्सेलिसलाच राहणें भाग होतें. म्हणून त्या हुकुमाला भीक घालावयाची नाहीं असें मीं ठरविलें. व सरकारला मी मार्सेलिस सोडलें आहे असें भासविण्यासाठीं शहरांतच लपून राहिलों. फ्रान्समध्यें त्या वेळेला पुष्कळ देशभक्त हद्दपार होऊन आलेले होते. म्हणून अशी तजवीज केलेली होती कीं, फ्रेंचांच्या सरकारी नौकरींत त्या हद्दपार लोकांनीं थोड्या पगारावर शिरावें व त्या पगारासाठीं कांहीं विशिष्ठ कायदे पाळावे. हे कायदे त्यांची इतर चलनवलनें बंद पाडण्यासाठीं योजिलेले होते. मीं ते कायदे पत्करून नौकरी करण्याचें नाकारिलें व माझ्या शिक्षेच्या विरुद्ध ट्रायब्यून नांवाच्या लोकसत्ताक पत्रात खालील पत्र प्रसिद्ध केलें.

" आपणास हें पत्र धाडण्याचा मुख्य उद्देश मला झालेल्या शिक्षेपासून माझे संरक्षणाकरितां पुरावा पुढें आणणें हा नाहीं. कारण जुलमी राजांच्या मनांत शिक्षा देण्याचें आल्यावर न्यायाच्या आधारानें त्यांच्याशीं भांडत बसून

ती शिक्षा रद्द करण्याचा प्रयत्न करणें हें व्यर्थ आहे. परंतु हें पत्र प्रसिद्ध करण्याचा मुख्य हेतु हा आहे कीं, परक्यांच्या नीच कृती उघडकीस याव्या व लोकांना त्यांचा वीट येऊन त्या परक्यांचा नाश अधिक लवकर केला जावा.

" म्हणून मी माझी तक्रार लोकांच्या पुढें मांडतों.

" वर्तमानपत्रांनीं मला झालेली हद्दपारीची शिक्षा प्रसिद्ध केली आहे. त्यांस माझा अपराध असा सांगण्यांत आला आहे कीं, माझ्या देशाच्या मुक्ततेसाठीं मी गुप्त कट करीत आहें. व इटालियन लोकांनीं स्वदेशरक्षणा-साठीं उठावें अशा आशयाचे लेख लिहून प्रसिद्ध करीत आहें.

" मी असें सांगण्यास तिळमात्रही भीत नाहीं कीं, हा अपराध मीं केला आहे. स्वदेशाची मुक्तता करूं इच्छिणें हा अपराध असेल तर तो मीं केला आहे. **स्वातंत्र्यप्राप्तीचीं महत्सत्यें स्वदेशबांधवांस सांगणें हा जर गुप्त कट असेल तर असला गुप्त कट मी अवश्यमेव करीत आहें.** जर माझ्या इटालियनांस 'अहो तुम्ही निजूं नका. गुलामगिरीच्या अवदशेच्या फेऱ्यांत सांपडूं नका. **गुलामगिरींत जिवंत राहण्यापेक्षां तिचे तुकडे उडवितांना मरणें हें जास्त श्रेयस्कर आहे.** सावध व्हा, दबा धरून बसा व स्वदेशाला व स्वराज्याला संपादन करण्याची पहिली संधि येतांच एका झडपेसरशीं ती गांठा' असें सांगणें-माझ्या परमाप्रिय बंधूंना असें सांगणें,-ह्याला जर राजद्रोही कट कोणी म्हणत असेल तर मी स्पष्ट असें सांगतों कीं, हा राजद्रोही कट मी करीत आलों आहें, करीत आहें व आजन्म करीत राहीन.

" **आपल्या मानवी बंधूंच्या मुक्ततेसाठीं व सन्मानासाठीं गुप्त कट करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.** व जें सरकार स्वतःला उदार मतवादी हें ढोंगी नांव लावून घेतें, त्या फ्रेंच सरकाराला अशा मनुष्याला गुन्हेगार म्हणून समजण्याचा बिलकुल अधिकार नाहीं.

" माझ्यावर दुसरा आरोप असा आहे कीं, मी फ्रान्सदेशाचे सरकार-विरुद्ध बंड करण्याचा व बंडवाल्यांस उत्तेजन देण्याचा प्रयत्न करीत आहें. व या अर्थीं माझीं गेलेलीं पत्रें पोलिसनें पकडलीं आहेत.

"हीं पत्रें कोठें आहेत ? तीं पोलिसनें पारिसच्या भुयारांतून गाडून टाकलीं आहेत ? तीं पुढें आणण्याचें धाडस सरकार कां करीत नाहीं ? मीं हीं पत्रें दाखविण्याची विनंति केली नव्हती काय ? मग तीं दाखविलीं कां नाहींत ? त्यांतील उतारे म्हणून जे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत ते पोलिसनें बनावट

केलेले आहेत. ते मी केव्हांही लिहिले नाहींत. ते खोटे आहेत. मी या खोटें बोलणाऱ्यांचा धिक्कार करतों. ........ आणखी काय पुरावे आहेत ? एक तरी ? नाहीं. नाहीं. हा मात्र खरा गुप्त कट आहे.

" चालूं द्या ! मदांध राजांनों चालूं द्या ! तुम्हीं आमच्यापासून आमची स्वतंत्रता, स्वदेश, आमचें प्रत्यक्ष अस्तित्व, हिसकावून घेतलेलींच आहेत. आतां आमची वाक्स्वतंत्रताही हिसकावून न्या. मार्सेलिस माझ्या इटलीच्या लगत्याला आहे व तेथें इटलीमधून हद्दपार झाल्यानंतर आम्ही येऊन राहिलों. कारण तेथें इटलीला स्पर्श करून धन्य झालेला वारा तरी आम्हांस स्पर्श करीत असे. आतां आमच्या श्वासोच्छ्वासाकरितां इटलीमधून पूत होऊन येणारा तो प्रिय वाराही आमच्यापासून हिसकावून घ्या. मार्सेलिसच्या किनाऱ्यावर उभे राहून जेथें समुद्र व आकाश मिळून जाऊन आमच्या मातृभूमीला लपवूं पहात होतें तिकडे आम्हीं बोट करावें व दृष्टीला शक्य तितकी पुढें ढकलून स्वतःशीं म्हणावें " तिथें प्रिय इटली आहे ! " आतां समुद्राकडे बोट दाखवून "तिथें प्रिय इटली आहे !" असें म्हणण्याचा हक्कही आमच्यापासून हिसकावून घ्या. चालूं द्या. एका नीच कृत्यापासून दुसऱ्या नीच कृत्याकडे चालत रहा. अपमानाच्या व मांगपणाच्या रस्त्यानें असेच चालत जा, म्हणजे तुमचें थडगें तुम्हाला सांपडेल. यांतच लोकपक्षाचें हित आहे. हेंच आमच्या मुक्ततेचें खरें साधन आहे कीं, आजपर्यंत अननुभूत अशा जुलमाच्या व दुष्टपणाच्या काळ्याकुट्ट रंगानें आपलें तोंड फांसून तुम्हीं जगापुढें प्रवेश करावा

" **पण जेव्हां घडा पूर्ण भरेल, तेव्हां लोकपक्षाची ती रणघंटा घणघणूं लागेल, तेव्हां ? जेव्हां स्वातंत्र्याची प्रभात झाल्याची आरोळी उठेल, तेव्हां ? तेव्हां, हे मदांध राजांनों, तुमच्या दुर्दशेला पारावर नाहीं !**

" आणि आमच्याविषयीं विचाराल तरः—आम्ही कर्तृत्ववादी दुर्दैवाच्या करड्या नजरेनें पवित्र झालेले, राज्यक्रांतीच्या नगारखान्यावरले दुंदुभी.—आम्ही ज्या दिवशीं जुलमानें गांजलेल्याच्या कैवारासाठीं धांवत येऊन त्यांच्या स्वातंत्र्यार्थ बेलभंडार उचलला त्याच दिवशीं या आयुष्यातील सुखाला व आनंदाला कायमचा रामराम ठोकलेला आहे ! आमच्या संवगड्यांनों, राग, लोभ, सुखदुःख, यांना आपण लाथ मारलेली आहे. आतां एकत्र व्हा. अभद्य कोट करा. न्यायाच्या जयजयकाराचा दिवस लांब नाहीं. "

जोसेफ मॅझिनी.

माझ्या अजमासाप्रमाणेंच या पत्रानें सरकार जास्त चिडून गेलें; व इटलीच्या सरकारची दुमणीही सारखी सुरूच असल्यानें आमचें ' तरुण इटली ' हें पत्र बंद करण्याचा प्रयत्न फार कसून सुरू झाला. त्या शहराच्या अधिकाऱ्यानें आमच्या कंपाझिटर लोकाना व बातमीदारांना हुसकून देण्याचा धाक दाखविला. प्रसिद्ध करणाऱ्याला कोंडून ठेवण्याचा प्रयत्न केला. मला हुडकून काढण्यासाठीं जंग जंग पछाडले. परंतु या सर्व जुलुमाला आम्हीं धीरानें तोंड दिलें. जे कंपाझिटर हांकून दिले होते, त्यांचे जागीं आम्हीं फ्रेंच लोक ठेवले. त्याचप्रमाणें एका तरुण फ्रेंच मनुष्यानें प्रकाशकत्वाची सर्व जबाबदारी आपल्यावर घेऊन आपले नांवानें पत्र चालू ठेवलें. आमचा खरा लेखकवृंद हा मार्सेलिसच्या आजूबाजूच्या खेड्यांत फुटून राहिला. तेथून लेख मार्सेलिसला आणणें व प्रती छापल्या जाता जातांच तत्काल प्रसार करण्यासाठीं धाडणें हीं कामें अत्यंत शिताफीनें व गुप्त रीतीनें चालविलीं.

व एव्हांपासून माझें तें गुप्त आयुष्य सुरू झालें! तीस वर्षांपैकीं मी वीस वर्षें आपण होऊन बंदिवास भोगीत होतों. एका खोलीच्या चार भिंतींमध्यें मीं स्वतःला गाडून घेतलें होतें. मी रात्रंदिवस त्या खोलींत असें. मला शोधण्याचे त्यांचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. अधिकाऱ्यांचे हाताखालील लोकांनीं, थोड्याशा पैशानें मूठ दाबली जातांच, आमचें गुप्तसेवकत्व पत्करिलें. अधिकाऱ्यांचा हुकूम सुटला कीं, तो त्वरित मजकडे आधींच पाठवून सावधगिरीची सूचना केली जात असे. अशा रीतीनें तपासणीपुरता मी नाहींसा होई. एके दिवशीं ती युक्ति फसली व मी सांपडण्याच्या बेतांत आलों. धरण्यासाठीं पोलिस निघाले; परंतु त्यांवरील नायकाचें मन वळलें गेलें. त्यानें आपल्या स्वतःच्या हाताखालचे शिपाई मजबरोबर देऊन मला सुरक्षित रीतीनें दुसऱ्या एका गांवीं पोंचवून दिलें. इकडे माझ्या खोलींत झाडा आला. तेथें अधिकाऱ्यांस त्या नायकाची शंका येऊं नये म्हणून एक माझ्या तोंडवळ्याचा मित्र बसविला होता. तोच पकडला गेला व मोठ्या डौलानें अधिकाऱ्यांकडे नेला गेला. इकडे मी त्याच वेळेला पोलिसच्या वेषानें त्या मला धरावयास आलेल्या शिपायांच्या रांगेतून राजरोस रीतीनें हलके हलके निघून गेलों. अशा शेंकडों प्रसंगांची हकीकत देण्याचें हें स्थळ नव्हे. चैनी वाचकांच्या मनोरंजनाकरितां मी लिहीत नसून माझ्या देशाला पुढें उपयोगी पडावी अशीच हकीगत देऊं इच्छित आहे व म्हणून मासल्याकारतां वरील गोष्ट दिली आहे.

मी अधिकाऱ्यांच्या तसल्या बारीक चवकशीला न जुमानतां सबंध एक वर्षभर मार्सेलिसलाच होतों, इतकें सांगितलें म्हणजे त्या युक्त्यांची कल्पना येईल. नेहमीप्रमाणें लेख लिहीत होतों, प्रुफें तपाशीत होतों, पत्रव्यवहार करीत होतों व वेळोवेळीं फ्रान्सच्या लोकसत्ताप्रिय पक्षाच्या पुढाऱ्यांची किंवा इटलींतील राष्ट्रपक्षांतील मुख्यांची भेट मध्यरात्रीं घेत होतो.

या वेळेपासूनच माझ्या शत्रूंनीं आपल्या निंद्य कपटप्रयोगांस सुरवात केली. माझ्या लेखांतील एखादें मधलेंच वाक्य त्यांचा मागचा पुढचा संबंध सोडून प्रसिद्ध करावें. भाषांतर करतेवेळीं तें असें केलेलें असावें कीं, माझ्या विचारांचा विपर्यास व्हावा. जेथें जेथें मी जाई तेथें तेथें हे भाडोत्री लेखक माझ्या मागें असतच. घुबडाला जसा प्रकाश नको असतो तशीच ह्या लोकांना राज्यक्रांतीची लढाई नको असते व मग स्वतःचा भ्याडपणा छपविण्यासाठीं ह्यांनीं क्रांतिपक्षाची निंदा करीत सुटावें. यांनीं मला मारेकरी ठरविलें आहे, भ्याड म्हटलें आहे, महत्वाकांक्षी म्हटलें आहे, परोत्कर्ष सहिष्णु म्हणून इतर पुढाऱ्यांच्या मनांत माझा द्वेष भरावण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या मी फ्रेंच लोकांच्या व्यर्थ पाडलेल्या रक्ताचा तिरस्कार केलेला आहे, त्या मला मारेकरी ठरविलें गेलें. माझ्या पक्षाचा मजवर कोप झाला असतांही, इतरांस दुसऱ्या एखाद्या प्रयत्नानें इटली वर आणणें शक्य झाल्यास पहावें म्हणून ज्यांनीं माझी अमर्याद निंदा केली होती, त्यांच्या देखील मदतीला माझें सर्व म्हणणें बाजूस ठेवून ते कांहीं तरी करण्यास तयार होतांच मी हापापलेलों आहे, त्या मला हे महत्वाकांक्षी म्हणत आहेत. माझ्या कट्टया निंदकांनींही जेव्हां जेव्हां स्वातंत्र्यार्थ उठण्याचा आव घातला तेव्हां तेव्हां मी व्यक्तित्व विसरून जाऊन त्यांच्या हातांत हात घातला आहे. मी सर्व संकटांचा मालक झालेलों आहे. तो मी भ्याड व ते शूर ! या वेळेस मजवर जो आरोप केला होता तो खुनास मदत केल्याचा होता. फ्रेंच सरकारला माझ्या गुप्त स्थानाचा पत्ता लागेना. माझें पत्रही बंद होईना. आतां माझी लोकांमध्यें होत असणारी चहा बंद कशी करावी ? तेव्हां त्यांनीं मजवर भलतेसलते व भयंकर आरोप लादून माझी लोकांनींच नाचक्की करावी असा प्रयत्न चालविला. मी फ्रेंच मनुष्याचा खून केला किंवा करण्यास मदत केली हें प्रसिद्ध होताच, मी ट्रायब्यून पत्रांत पुन्हां तक्रार प्रसिद्ध केली व माझ्यावरच्या आक्षेपाच्या समर्थनार्थ एक तरी पुरावा पुढें आणावा म्हणून आव्हान केलें.

"........माझ्या पक्षाच्या पुढाऱ्यांपैकीं मी एक आहें. व मी 'यंग इटली 'चा सभासद आहें. मी स्पष्ट सांगतों कीं, जे आमच्या मतांहून भिन्न आहेत ते सगळे मारले जावे या अत्यंत घातक वाक्याचा उच्चार माझ्या आक्षेपकाच्या अमंगल तोंडाशिवाय कोणींही केलेला नाहीं. आमचीं मतें ज्यांना मान्य आहेत त्यांनाच आम्ही सभासद करितों. आमच्या सभासदांनीं दुसऱ्या कोणालाही मारण्याची शपथ घेतलेली नाहीं. **फक्त ऑस्ट्रियनांना मारण्याची आम्हीं शपथ घेतली आहे व संधि येतांच ती पुरी करणार आहों.**"

मध्यंतरीं ते खून करावे म्हणून मी धाडलेली आज्ञापत्रिका सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यांत आली! इतकें बनावट नीच कृत्य जगावर दुसरें कोठेंही झालेलें नाहीं. मी 'नॅशनल ' नांवाच्या पत्रांत त्या बनावट लेखाचें कापट्य उघडकीस आणलें व मूळ लेख सरकार कां प्रसिद्ध रीतीनें हजर करीत नाहीं म्हणून विचारिलें. या वेळेस बहुतेकांनीं माझी बाजू उचलली होती. परंतु मी मार्सेलिसमध्यें गुप्त रीतीनें रहात असल्यानें मला प्रसिद्धरीत्या कोर्टांत येतां येईना, किंवा दुसऱ्याला कायदेशीर प्रतिनिधित्व देऊन बेअब्रूचा दावा आणतां येईना. अखेर त्या खटल्याचा शेवटचा निकाल होऊन त्यांत 'कट वगैरे कांहीं नव्हता व गुन्हेगारांनीं तें कृत्य स्वतःच्याच ऊर्मीनें केलें.' असें स्पष्ट ठरविलें गेलें.

पुढें इंग्लंडमधल्या सर जेम्स ग्रॅहम नांवाच्या एका प्रधानानें हाच आरोप मजवर केला. परंतु खरी गोष्ट प्रसिद्ध होतांच त्याला भर पार्लमेंटमध्यें हाऊस ऑफ कॉमन्सपुढें माझी माफी मागणें भाग पडलें.

आमच्या 'यंग इटली 'च्या गुप्त मंडळीविरुद्ध जे जे लेख लिहिले गेले आहेत ते ते किती खोडसाळ आहेत हें आमच्या नियमांचें परीक्षण करतांच प्रत्येकाचे ध्यानांत येईल. आमच्या संस्थेच्या शाखा नेपल्स, कार्सिका वगैरे-पर्यंत पसरल्या होत्या. व म्हणून स्थानिक कमेट्यांचे कांहीं नियम स्थानिक परिस्थितीनें भिन्न असत. नियम भिन्न असत, पण तत्त्वें भिन्न नव्हती. आम्हांला शक्य तितक्या रीतीनें आमचीं तत्त्वें आम्ही शाखाशाखांतून पाळ-विलीं. तीं तत्त्वें १८३३ सालीं पुन्हां एकीकृत करून व्यवस्थित स्वरूपांत लिहिलीं होतीं. तीं मुद्दाम पुढें देत आहें. या तत्त्वांना धरून आम्ही आजपर्यंत वागत आहों. 'तरुण इटली'चा अंतिम उद्देश साधण्यासाठीं दोन अंगें योजि-

लेलीं आहेत. प्रथम कर्तव्य म्हणजे इटलीच्या तरुण रक्ताची एकी व शुद्धता हें होय. राष्ट्राचें सर्व शक्तिमत्व म्हणजे तरुण लोक होत. त्यांना आपल्या निशाणाखालीं आणून व स्वदेशाच्या व स्वातंत्र्याच्या नांवानें बांधून घेऊन मग क्रांतिपक्षाच्या खऱ्या खऱ्या पुढाऱ्यांच्या भोंवतीं त्यांना जमवावें. कारण, जेव्हां क्रांतियुद्धाचा पहिला बार उडेल तेव्हां त्याचें चालकत्व जुन्या, जरठ व लब्धप्रतिष्ठित अशा भलत्याच लोकांकडे जाऊं नये अशी व्यवस्था झाली पाहिजे. हें प्रथम कर्तव्य झालें. हें घडून यावें एतदर्थ दुसरें कर्तव्य असें आहे कीं, 'तरुण इटली'च्या पुढाऱ्यांचे व प्रतिनिधींचे मार्फत इटली देशांत जेवढ्या म्हणून गुप्त संस्था 'राष्ट्रैक्य, दास्य–मुक्तता व स्वातंत्र्य' ह्या तत्त्वांसाठीं अस्तित्वांत आलेल्या असतील तेवढ्यांची एकवाक्यता करावयाची.

"त्यांपैकीं पहिलें कर्तव्य करण्याचा अधिकार 'यंग इटली'च्या कोणत्याही सभासदास आहे. त्याचा दर्जा व वर्ग या मानानें प्रत्येकानें तरुण लोकांस आपल्या राष्ट्रधर्माचे दीक्षित करण्याचा प्रयत्न करावा. दुसरें कर्तव्य 'तरुण इटली'चें केंद्रमंडळ व प्रांतिक मंडळें यांजकडे सोंपविलेलें असेल.

संस्थेचीं नैतिक व राजकीय तत्त्वें.

( यांत बहुतेक मागें दिलेलींच तत्त्वें आलेलीं आहेत. म्हणून त्यांविरहित व जास्त व्यवस्थित रीतीनें मांडलीं गेलेलीं तेवढींच खालीं दिलीं आहेत. )

( १ ) सर्व जगत् हें एकाच नियमानें अनुशासित झालेलें आहे. तो नियम म्हणजे प्रगति किंवा उत्क्रांति हा होय.

( २ ) मनुष्य हा अत्यंत महत्कार्यास्तव जन्माला आलेला आहे त्याच्या आयुष्याचें अंतिम लक्ष्य म्हणजे त्याच्या सर्व शक्तीची पूर्ण, स्वतंत्र व व्यवस्थित रीतीनें झालेली वाढ हें होय.

( ३ ) मानवी शक्तिविकासनाचें हें अंतिम साधण्यास मुख्य साधन म्हणजे मनुष्यांचें संभूयसमुत्थान होय.

( ४ ) या मानवी शक्तीचा पूर्ण विकास होण्यास मनुष्यांनीं वरील तत्त्वाचें आधारावर एकनिष्ठेनें, एकाच उद्देशानें व सहकार्यतेनें चाललें पाहिजे.

( ५ ) व म्हणून 'तरुण इटली'चा असा विश्वास आहे कीं, हें सर्व विश्व हें एक कुटुंब आहे. यासाठीं प्रत्येक स्वतंत्र मनुष्यानें सर्व मानवीजातीची सहकारिता घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनुष्यमात्राची बंधुता व सहकरण हीं साधण्याचा प्रयत्न 'तरुण इटली' करीत राहील.

" तथापि आपल्या सर्वसाधारण उद्दिष्टाकडे—मानवीशक्तिविकासनाकडे—सर्व मनुष्यांना सहकरणानें जातां यावें एतदर्थ त्यांना समसमानता संपादण्यासाठीं कोणता तरी एक सर्वसाधारण पाया पाहिजे आहे. विश्वकुटुंबाची घटना करतां यावी एतदर्थ त्यांतील एकेक अवयव होऊं इच्छिणारांना स्वतःचें व सर्व सामान्य असें नांव, शक्ति व अस्तित्व अवश्य पाहिजे आहे.

" म्हणून प्रत्येक लोकांनीं विश्वकुटुंबाचे अवयव होण्याचे आधीं आपलें स्वतःचें असें एक राष्ट्र निर्माण केलेंच पाहिजे.

" राष्ट्रैक्याशिवाय राष्ट्र संभवत नाहीं.

" नित्य व अखंड असें राष्ट्रैक्य हें दास्यमुक्ततेशिवाय शक्य नाहीं. लोकपक्षाची सत्ता हाणून पाडण्याचा प्रयत्न करण्यास जुलमी राजे टपत असल्यानें ते राष्ट्रांची विभागणी केल्याशिवाय रहाणार नाहींत.

" व दास्यमुक्तता ही स्वतंत्रतेच्या पूर्णत्वाशिवाय मिळणार नाहीं.

" कारण, राष्ट्रांतील लोकांनीं आपलें राष्ट्र दास्यमुक्त ठेवण्यास झटावें एतदर्थ ते लोक स्वतंत्र असले पाहिजेत. त्यांना स्वतंत्र रीतीनें विचार करितां आला पाहिजे. त्यांनां वाक्स्वातंत्र्य पाहिजे. त्यांचें प्रत्येक चलनवलन स्वतंत्रतेनें घडेल अशी व्यवस्था पाहिजे. म्हणजे मग राष्ट्राचें पारतंत्र्यापासून रक्षण करण्याची अक्कल व हिंमतही त्या लोकांत येते. व राष्ट्राचे स्वातंत्र्यासाठीं आत्मत्याग करण्याची जबाबदारी ते ओळखूं लागतात. सारांश, राष्ट्रस्वातंत्र्य अबाधित टिकण्यासाठीं व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे आहे.

" व एतदर्थ ' तरुण इटली 'चा उद्देश इटली देशाचें राष्ट्रैक्य, राष्ट्रस्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य मिळविणें हा आहे.

" जेथें जेथें सत्ता ही आनुवंशिक आहे, व एकाच मनुष्याचे हातांत आहे तेथें तेथें व्यक्तिस्वातंत्र्य टिकणें शक्य नाहीं. कारण, सत्तेचा निसर्गच असा आहे कीं, तिची वृद्धि व अमर्यादिता वाढतच जावयाची. आनुवंशिक पद्धति असली कीं, राजाचे व प्रजेचे हितांत विरोध उत्पन्न होतो. क्रांति अपरिहार्य होते. व म्हणून प्रत्येक राष्ट्रानें शक्य तितक्या त्वरेनें ह्या आनुवंशिक राज्यपद्धतीला झुगारून दिलें पाहिजे. म्हणजे क्रांतीचीं संकटें वारंवार येणार नाहींत.

" क्रांति म्हटली म्हणजे ती जानपदाकडून व जानपदासाठींच व्हावयास पाहिजे. लोकांनीं क्रांति करावी यासाठीं, त्या क्रांतीनें त्यांस अलभ्य लाभ

होणार आहे हे सिद्ध केलें पाहिजे. व म्हणून ज्या पद्धतीनें लोकांचा अतिशय फायदा होईल, असंख्य गरीबांस अन्न मिळूं लागेल, प्रत्येक नागरिकाच्या शक्तीचा पूर्ण विकास होण्यास क्षेत्र मिळेल, समता राहील, आपल्यास पाहिजे त्यासच अधिकार देण्याची लोकांचे अंगांत शक्ति व साधन राहील अशी सत्तापद्धति क्रांतीचे नंतर सुरू करण्याचें अभिवचन लोकांस दिलें पाहिजे.

" व अशी सत्तापद्धति म्हटली म्हणजे लोकसत्ताकपद्धति ही होय.

" एतदर्थ ' तरुण इटली ' ही राष्ट्रैक्यवादी व लोकसत्ताकवादी आहे.

" धर्मविषयक स्वातंत्र्य ठेविलें जाईल. परंतु संस्थेचा सर्वसामान्य हेतु हा आहे कीं, विशिष्टाधिकारपद्धतीचा नाश करावयाचा. म्हणून योग्यतेशिवाय कोणचाही अधिकार कोणालाही मिळणार नाहीं.

" आतां या राष्ट्रैक्य, दास्यमुक्तता, स्वातंत्र्य, व लोकसत्ता ह्या महत्तत्त्वांपैकीं अगदीं पहिली गोष्ट जी केली पाहिजे ती दास्यमुक्तता ही होय. राष्ट्रोन्नतीची ही पहिली पायरी होय. म्हणून ' तरुण इटली ' आपलें सर्व बळ प्रथमतः त्या तत्त्वाचे विजयाकडे खर्च करील. ऑस्ट्रियाला हुसकून देऊन परक्यांच्या दास्यांतून स्वदेशभूमि मुक्त होईतोंपर्यंत ' तरुण इटली ' शस्त्रें पैदा करील व स्वातंत्र्ययुद्धार्थ राष्ट्र तयार करण्याचा शक्य तो तो प्रयत्न करील.

" व राष्ट्र एकदां दास्यमुक्त झालें म्हणजे मग बाकीचे व्रेत सिद्धीस नेण्याचा प्रयत्न केला जाईल. क्रांति चालू असतां राष्ट्रीय सत्ता एका तात्पुरत्या व प्रत्येक प्रांतांतून एकेकच प्रतिनिधि घेऊन केलेल्या सरकारचे हातीं राहील. क्रांति पुरी होतांच त्या सरकारचा हक्क संपेल व मग राष्ट्रप्रतिनिधींची निवडणूक राष्ट्राचे मर्जीस येईल त्याप्रमाणें होईल. लढाई गनिमी काव्याची केली जाईल व मग शिस्तवार युद्धपद्धति योजण्यांत येईल व कवाइती फौज उभारण्यांत येईल.

" प्रथम शस्त्रें व विजय, नंतर कायदे व सत्तापद्धति, हा ' यंग इटली'चा कार्यक्रम आहे. लढाई व शिक्षण हीं त्याचीं साधनें होत. पहिल्यासाठीं आम्हीं गुप्त शारीरिक तयारी करतों व दुसऱ्यासाठीं लेख, वर्तमानपत्रें वगैरेचा गुप्त व प्रसिद्ध प्रसार करून मानसिक तयारी करतों.

" तरुण इटलीची रचना ( ही पूर्णत्वानें दिलेली आहे. )

( १ ) " एक **केंद्रमंडळ.**

( २ ) " इटलीच्या प्रत्येक प्रांतांत एक **प्रांतिक मंडळ.**

( ३ ) " प्रत्येक शहरीं एक व्यवस्थापक.

( ४ ) " दीक्षागुरु किंवा प्रचारक.

( ५ ) " दीक्षित.

" ( १ ) केंद्रमंडळांचीं कामें:—इटलीच्या प्रत्येक प्रांतांत असलेल्या प्रांतिक मंडळाची निवड करणें; त्यांच्याकडे सामान्य नियम व सूचना धाडणें; आपल्या व त्यांच्यामधल्या खुणा ठरविणें; संस्थेच्या लेखांची प्रसिद्धि व प्रसार करणें; संस्थेच्या कार्यक्रमाची दिशा ठरविणें व उठावणीचे नकाशे आंखणें; सारांश, कोणत्याही प्रकारचा फाजील दाब न ठेवतां सर्व शाखांतील चळवळींचे एकीकरण व केंद्रीभवन करणें हीं कामें केंद्रमंडळाचीं होत.

" ( २ ) प्रांतिक मंडळाचीं कामें:—आपआपल्या प्रांतांमध्यें संस्थेचीं महत्वाचीं कामें पार पाडणें; संस्थेचा प्रसार करणें; स्वतःच्या प्रांतासाठीं खुणा ठरविणें; प्रांतांतील सभासदांना केंद्रमंडळांतून सुटलेले हुकूम कळविणें; प्रत्येक महिन्यांत आपल्या प्रांतांत संस्थेची प्रगति कशी काय झाली, निरनिराळीं साधनें किती जमवितां आलीं, गांवागांवांतून लोकमताची काय स्थिति आहे व पुढें आतां कोणत्या तजविजी करणें अत्यंत आवश्यक आहे, या सर्वांचा मासिक रिपोर्ट केंद्रमंडळाकडे धाडणें; हीं कामें प्रांतिक मंडळाचीं होत.

" ( ३ ) शहरच्या व्यवस्थापकांचीं कामें:—प्रत्येक शहरीं एक एक व्यवस्थापक तेथील मुख्याधिकारी म्हणून नेमिला जाईल. त्याची निवडणूक प्रांतिक मंडळ करील. तो प्रत्येक महिन्यांत त्या शहरांत काय काम झालें याचा मासिक रिपोर्ट प्रांतिक मंडळाकडे पाठवीत जाईल. त्या व्यवस्थापकाच्या प्रांतिक मंडळाशीं असणाऱ्या पत्रव्यवहाराचें स्वरूप केंद्रमंडळाच्या पत्रव्यवहारासारखेंच असेल.

" ( ४ ) दीक्षागुरु किंवा प्रचारक:—यांची निवडणूक प्रांतिक मंडळ व नगरव्यवस्थापक यांच्या संमतीनें होईल. बुद्धिमान् व उदात्त विचारांचे असेच लोक निवडले जातील. त्यांचें मुख्य कर्तव्य म्हणजे तरुण लोकांस संस्थेच्या धर्माची दीक्षा देणें व त्या दीक्षित लोकांस माहिती व उपदेश देत रहाणें हें होय. तो नगरव्यवस्थापकाशीं पत्रव्यवहार ठेवील. व त्या पत्रव्यवहाराचें स्वरूप हें नगरव्यवस्थापक व प्रांतिक मंडळ यांच्या व्यवहाराप्रमाणें राहील. हे सर्व दीक्षागुरु आपल्या नगरव्यवस्थापकांकडे मासिक रिपोर्ट धाडतील

व त्यांच्याकडून येणाऱ्या हुकुमाचा आपल्या दीक्षितवर्गांत प्रचार करतील.

"(५) दीक्षित किंवा नुस्ते सभासद हे उत्तम वर्तनाच्या लोकांतून दीक्षागुरूकडून निवडले जातील व त्यांस दीक्षा दिली जाईल. परंतु त्यांच्यांत योग्य कर्तृत्व आल्याशिवाय त्यांना दीक्षागुरुत्वाचा अधिकार दिला जाणार नाहीं, म्हणजे त्यांना दुसऱ्याला दीक्षा देतां येणार नाहीं. ज्या दीक्षागुरूनें त्यांना दीक्षा दिली असेल त्याच्या हाताखालीं ते रहातील व त्यांना झालेली माहिती, लागलेली बातमी, किंवा सूचना हीं ते त्या दीक्षाधिकाऱ्याला कळवितील. 'तरुण इटली' ह्या गुप्तसभेच्या तत्त्वांचा प्रसार ते करीत राहतील. व उठावणीची वेळ येतांच सज्ज होतील.

"प्रत्येक सभासदाला एक टोपण नांव दिलें जाईल.

"संस्थेचा प्रसार होणें ही महत्वाची गोष्ट असल्यानें सामान्यवर्गाला व जे नवीन युगांतच जन्माला आलेले आहेत व ज्याच्या आशाही नवीन आहेत, अशा तरुणांना उपदेश देऊन वळविण्याचा प्रयत्न अखंड चालू राहील.

"ज्याला ज्याला म्हणून शक्य असेल त्या त्या सभासदानें प्रत्येकीं रायफल किंवा मस्केट ह्यांपैकीं एक बंदुक व पन्नास काडतुसें जवळ ठेवावीं. ज्यांना हें शक्य नसेल त्यांना ती बंदुक व पन्नास काडतुसें प्रांतिक मंडळाकडून मिळतील.

"ज्याला जी शक्य असेल ती मासिक वर्गणी त्यानें फंडाकडे द्यावी.

"या वर्गणीची रक्कम वेळोवेळीं प्रांतिक मंडळाकडे पाठविली जावी. प्रांतिक मंडळ त्यांतून त्या प्रांताबद्दलचा येणारा खर्च भागवील व एका ठरलेल्या प्रमाणानें केंद्रमंडळाकडे कांहीं रक्कम धाडील. त्या रकमेचा विनियोग प्रवासखर्च, छापणावळ, हत्यारें विकत घेणें वगैरे कामांकडे केंद्रमंडळानें करावा.

"ह्या वर्गणीची रक्कम जमाविणें, ती क्वचित् प्रसंगीं माफ करणें, दीक्षेचे विशिष्ट मंत्र ठरविणें वगैरे दुय्यम प्रतीच्या गोष्टी ह्या प्रांतिक मंडळाकडे सोंपविलेल्या आहेत.

"फाजील ताबा किंवा निष्कारण चवकशी ह्यांचा केंद्रमंडळास तिरस्कार वाटत आहे. व सर्व संस्थेमध्यें एकवाक्यता व क्रियासंगति रहावी इतक्याच पुरता अधिकार ते बजाऊं इच्छित आहेत.

"ह्या गुप्तसंस्थेच्या संकेतपद्धति दोन आहेत पहिली संकेतपद्धति ही केंद्रमंडळ व प्रांतिक मंडळ यांच्या व्यवहारासाठीं असून ती केंद्रमंडळ ठरवीत

जाईल. दुसरी संकेतपद्धति ही प्रांतिक सभासदांसाठीं प्रांतिक मंडळ निवडीत जाईल व वरती केंद्रमंडळाकडे कळवीत जाईल.

" ह्या खुणा तीन महिन्यांनीं किंवा जरूर तर यापेक्षांही लवकर पालटल्या जातील. अशा रीतीनें एका प्रांताच्या खुणा जरी पोलिस लोकांना कळल्या तरी इतर प्रांत अलग व सुरक्षित राहतील.

( ह्यापुढें ' यंग इटली ' वर्तमानपत्रांत मॅझिनीनें इटलींतील धर्मोपदेशकांस उद्देशून एक पत्र प्रसिद्ध केलेलें आहे. त्यांत त्या वेळच्या धर्मविचारांची व धर्मोपदेशकांच्या स्थितीची चर्चा केली आहे व धर्मोपदेशकांनींही देशासाठीं झटलेंच पाहिजे, असें सिद्ध केलें आहे. धर्म म्हणजे जगाचें धारण करतो तो. जगदुद्धार करणें हें धर्माचें अंतिम. त्या जगदुद्धाराला अत्यंत विरुद्ध असणाऱ्या पारतंत्र्याचा नाश करणें हें धार्मिक कृत्य नाहीं असें जर एखाद्या धर्मोपदेशकास वाटत असेल, तर त्या मूर्खाला धर्माची खरी व्याख्याच कळली नाहीं असें सांगून, मॅझिनीनें शेवटीं धर्मोपदेशकांस संबोधून अतिशय उदात्त व उत्तेजक भाग लिहिले आहेत ते खालीं दिले आहेत. )

" जेव्हां क्रांतीचा काल समीप आलेला असतो तेव्हां ती क्रांति न घडूं देण्याची ताकद कोणच्याही मानवी प्राण्यांत नसते. ती क्रांति खुषीनें किंवा बळजबरीनें घडून यावयाचीच व जरी तिला मिळून तिचें धुरीणत्व स्वीकारण्याचा मान धर्मोपदेशक स्वीकारीत नसतील तरी ती क्रांति कांहीं अडून बसणार नाहीं. आम्हीं या मानवी धर्मोपदेशकांकडून तोंड फिरवून त्या प्रत्यक्ष धर्माचाच धांवा करूं ! मनुष्यापुढें तोंड वेंगाडावयाचें सोडून परमेश्वराला आळवूं ! **विशिष्ट वर्गाशींच परमेश्वर बोलतो व आमच्याशीं बोलत नाहीं हें थोतांड आतां पुरे आहे.** परमेश्वर सर्वांची हाक ऐकतो व तो आमचीही ऐकेल. पण **धर्मोपदेशक हीं माणसें आहेत व ते नागरीकही आहेत.** हें कोणीही विसरतां कामा नये कीं, धर्माधिकारी हे आमच्या देशाचाच एक भाग आहेत व जे आम्हीं सर्वांच्या कल्याणाकरितां लढत आहोंत, ज्या आमच्या निशाणावर ' देव व लोक ', ' मानुषता व स्वदेश ' हे शब्द फडकत आहेत त्या आमच्याविरुद्ध जाऊन ते स्वतःचाच नाश करीत आहेत.

" हे माझ्या देशांतील धर्माधिकारी हो, तुम्ही तुमच्या धर्माचे संरक्षणासाठीं झटणार नाहीं काय ? **जो तुमचा धर्म मूर्तिमंत सुंदरता आहे व जी मनुष्याची पवित्रता आहे तो धर्म परचक्राखालीं चिरडत**

**असतांना तुम्हीं स्वस्थ बसणार काय ? स्वदेशाचे स्वातंत्र्या-शिवाय स्वधर्म देखील मरणाचे द्वारीं वसतो हें तुम्हांस अजून कळत नाहीं काय ?** मग तुम्हीं आम्हांस मदत कां करीत नाहीं ? लोकांचे अग्रणी व्हा व त्यांना प्रगतीच्या मार्गाला न्या. हें तुमचें धार्मिकाचें खरें कर्तव्य आहे, व हें प्रगतीला नेण्याचें कर्तव्य पारतंत्र्याचा–राजकीय पारतंत्र्याचा–नाश केल्याशिवाय तुम्ही कसें करणार ? **राजकीय पारतंत्र्यांत इटलीला पाडणें हा ऑस्ट्रियानें अधर्म केला नाहीं काय ? तर मग तुम्हांला व लोकांना दोघांनाही ज्यांनीं परतंत्रतेच्या शृंखलेंत जखडलें आहे त्या ऑस्ट्रियाच्या नरडीचा घोट घेण्यास उठा ! लवकर उठा ! !**

**" अरे, तुम्हांला स्वदेश म्हणून कांहीं नाहीं का ? नागरिकांचें अंतःकरण तुम्हांला नाहीं काय ? तुमची तुमच्या रक्तामांसाच्या स्वदेशबांधवांवर प्रीति नाहीं काय ?**

" म्हणून तुमची व त्यांची सुटका करा. कारण, तुम्हीही, अहो धर्माधिकारी हो, तुम्हींही पारतंत्र्यांतच आहां काय ? तुम्हांस आठवत नाहीं काय कीं, पूर्वी मिलन शहर पारतंत्र्यांत पडतांच लॉम्बर्डीचे लोकांना पुकारून त्या मिलन शहरचे संरक्षणार्थ एक पुढारी धांवत गेला ! तो पुढारी कोण होता ? तो तुमच्यासारखाच एक धर्माधिकारी होता. मग तुम्हीं असे लाजतां कां ? तुम्हींही तुमची पाळी आली आहे म्हणून या इटलीचे लोकांना पुकारून त्यांच्यासह आल्पस् पर्वताकडे धांवत चला. ऑस्ट्रियाचा उच्छेद करून आपण आल्पस्वर आपल्या इटलीच्या स्वातंत्र्याचें निशाण रोवूं !

**" ही भूमि, जेव्हां परमेश्वरानें तिला निर्माण केली, तेव्हां सर्व स्वतंत्र होती. व आतां ? तो परका मदांध त्या ईश्वरी इच्छेसह ह्या मातेला पायांखालीं तुडवीत आहे !** म्हणून परमेश्वराच्या इच्छे-साठीं तरी लढा. आईच्या दुःखासाठीं लढा. लढाईचा ' हरहर महादेव ' उच्चारा. तुमच्या गर्जनेचें अद्वितीय सामर्थ्य आहे. त्याचा उपयोग करा.

**" माझ्या देशांतील धर्मोपदेशकांनों, तुमच्यापैकीं जो पहिल्यानें मनुष्यकर्तव्यता नीट ओळखून ईश्वरी आज्ञा म्हणून स्वदेशाला स्वातंत्र्य देण्यासाठीं रणांगणावर ' हरहर महादेव ' उच्चारील तोच खरा धर्मोपदेशक ! !**

" परंतु जानपदाच्या स्वयंस्फूरित युद्धनादाचे आधीं जर तुम्हीं त्या रण-शद्वाचा उच्चार करणार नाहीं तर, तो परमेश्वर लोकांच्या त्या भयंकर शक्तीच्या प्रचंड स्फोटापासून तुमचें संरक्षण करो ! कारण, लोकशक्तीचा संताप फार भयंकर असतो !

( यानंतर ' यंग इटली ' ह्या वर्तमानपत्रांत ' हंगेरी ' ' इटलीचें ऐक्य ' वगैरे लेख प्रसिद्ध झाले. ते प्रस्तुतकालीं महत्त्वाचे किंवा मनोरंजक नसल्यानें दिले नाहींत. तथापि इतकें सांगणें अवश्य आहे कीं, ह्या राजकीय भविष्य-वाद्यानें हंगेरीबद्दल केलेलीं सर्व भविष्यें खरीं ठरलीं आहेत ! इटलीची राष्ट्रै-क्यता होणें हें मनोराज्य म्हणून म्हणत असत; पण अखेर मॅझिनीचाच भवि-ष्यवाद खरा झाला. व जे त्याला प्रथमतः या हंगेरीच्या व राष्ट्रैक्यतेच्या लेखां-बद्दल हसले, त्यांच्याच डोळ्यांदेखत तीं भविष्यें-तीं मनोराज्यें-खरीं ठरलीं !!!)

' यंग इटली ' पत्रांत माझ्या स्वतःच्या लेखांशिवाय आणखी कित्येक जणांचे लेख छापून प्रसिद्ध झाले. अनंत अडचणी, त्रास व जुलूम चालू असतांच आम्हीं आमचें लेखनाचें काम अव्याहत चालविलें. ह्या इतरांनीं दिलेल्या लेखांपैकीं अत्यंत महत्त्वाचे लेख म्हटले म्हणजे जाकोपो रुफिनी याचा ' राजनिष्ठेची शपथ व तिचा धिक्कार ' यावर; घेरार्डीचा ' ब्रिटिश राज्यपद्धती 'वर; टान्नेरिओचा ' धर्माधिकाऱ्यांची सद्यःस्थिति ' यावर; मेले-गारीचा ' १८३१ चे बंडांत घडलेल्या चुका ' यावर; ॲडव्होकेट बेन्झा याचा " राज्यक्रांतीवर चर्चा; " बुनारोटीचा " राज्यक्रांतीमध्यें लोकसत्ता; " फ्रान्सिनीचा ' लॉंबर्डीमध्यें ऑस्ट्रियाचें अस्तित्व; ' वगैरे वगैरे होते.

सुशिक्षित तरुणांना उद्देशून लिहिलेल्या या लेखांशिवाय आम्हीं वेळोवेळीं लोकशिक्षणासाठीं लहान लहान पुस्तकेंही प्रसिद्ध करीत होतों. ह्या पुस्तकांत उत्तम म्हटलें म्हणजे गस्टव्हो मॉडेनाचा " लहानसा संवाद " हें पुस्तक होय. शिवाय परक्या लेखकांचीं भाषांतरें, जाहीरपत्रकें, हस्तपत्रकें, प्रांतिक वर्तमानपत्रें वगैरे रूपानें एकसारखें लेखन सुरू होतें.

व आमच्या या मेहनतीला पूर्ण यश आलें. राष्ट्रीयसंवेदना जागृत झाली. इटलीच्या प्रत्येक प्रांतांत हजारों तरुणांनीं लोकसत्ताक राष्ट्रैक्याची शपथ घेतली. आमच्यावर शत्रुपक्षाकडूनही भडिमार झाला. पण तो भडिमार इतका मूर्खपणाचा होता कीं, त्या योगानें आमचे हितचिंतक वाढतच चालले.

रोमाग्ना प्रांतांतील " एपोफसीमेनी " नांवाची गुप्त संस्था तिच्या सर्व सभासदांसुद्धां आपण होऊन आमच्या संस्थेस मिळाली. तिचा धुरीण

कार्लोवी आस्को ह्यालाच तेथील प्रांतिक मंडलाचें सभासद नेमलें. दुसरी गुप्त संस्था ' व्हेरी इटालियानी ' हीही आम्हांस मिळाली. व कार्बोनारीझमपैकीं ज्या कांहीं थोड्या शाखा जीव धरून राहिल्या होत्या त्याही बहुतेक आम्हांस मिळाल्या. आमचीं मतें व तत्त्वें पाळण्याच्या शपथा झाल्या व आमचा मार्ग पत्करला गेला. कारबोनारी संस्थेचा मुख्य पुढारी बुओनारोटी हा फार कर्तृत्ववान् असून त्याचे जर्मनींतल्या गुप्त मंडळांशीं झालेले पत्रव्यवहार अति महत्त्वाचे आहेत. तो त्या कारबोनारीचा पुढारीच माझ्याशीं नेहमीं पत्रव्यवहार ठेवूं लागला व आमचा स्नेहसंबंध जुळला. फ्रेंच लोकसत्ताकपक्षापैकीं बहुतेक पुढारी व फ्रान्समध्यें फार वजन असलेले लोक असाच स्नेह ठेवूं लागले. ट्रायब्यूनचे चालक व नॅशनलचे चालक हे सहानुभूति बाळगीत. लफाइट्टे ह्या थोर पुरुषानेंही उत्तेजक निरोप धाडीत असावें. पॉलिश लोकही आमच्याकडे होते. या आमच्या अविश्रांत श्रमाचा असा परिणाम झाला कीं, यूरोपमध्यें क्रांति घडवून आणण्यासाठीं जे जे झटत होते त्या त्या राष्ट्रांतील लोकांना आतां इटालियन क्रांतीचें महत्त्व वाटूं लागलें. इटलीचा कांहीं तरी हिशोब धरला पाहिजे अशी त्यांची खात्री झाली.

१८३३ मध्यें ' तरुण इटली ' ची शक्ति विलक्षण वाढली. त्यांतूनही लॉंबर्डी, जिनोआ, टस्कनी व पोपचे प्रांत यांमध्यें तिचा विलक्षण प्रसार झाला. यापैकीं टस्कनी प्रांताचें मुख्य शहर लेग्हॉर्न हें आमच्या संस्थेच्या त्या प्रांताचें केंद्र होतें. त्या शहरीं ग्युएराझी, बिनि व एन्रिको मेअर ह्यांचे परिश्रम व कर्तृत्व आश्चर्यकारक होतें. पीसा, फ्लारेन्स, सायेना व ल्युका या शहरीं संस्थेच्या शाखा असून त्यांचे चालकत्व वरील मंडळीकडेच होतें. पेट्रोबस्टोजी ( हल्लीं प्रधान आहे. ) हे खजीनदार होते. एन्रिको मेअर संस्थेच्या प्रसारासाठीं रोमला गेला असतां पकडला गेला. परंतु पुरावा न सांपडल्यामुळें सुटला. व माझी प्रत्यक्ष गांठ घेण्यास मार्सेलिसला आला. माझ्या सुदैवानें माझी ज्या ज्या इटालियन तरुणाची गांठ पडली, त्यांच्यांतील अत्यंत कळकळीचे, कर्तृत्वाचे, व प्रेमळ निष्ठेचे तरुणांत एन्रिको मेअर यांची गणना आहे प्रोफेसर पॉलोकॉर्सिनी, मॉन्टेनेली, कार्लोमट्युची ( हल्लीं पार्लमेंटांत सभासद आहे.) कार्लोफेंझी, सेपिनी ( हल्लीं आमच्या विरुद्ध पक्षास मिळून माझ्यावर निंद्य व खोडसाळ आरोप करण्यांत एक प्रमुख सभासद आहे. ) व शेंकडों इतर तरुण लोकांनीं लेग्हॉर्नमधून सुटणाऱ्या ज्वाला प्रांतोप्रांतीं नेऊन जिकडे तिकडे परवशतेच्या कोपाची आग लावून दिली. ऑस्ट्रिया

प्रांतांत गॉडबासि हा पुढारी होता. रोमाग्ना प्रांतांत हल्लीं पैसे मिळूं लागताच, पदव्या मिळतांच व पेन्शनें मिळतांच जे आम्हांला शिव्या देत आहेत, ते सर्व त्या वेळेस 'तरुण इटली'चे अवसानबाज सभासद होते. बोलोग्ना येथें कामकरी वर्गांत गुप्त मंडळ्या जमवून स्वातंत्र्यप्रीतीचीं व स्वातंत्र्ययुद्धाचीं तत्त्वें प्रसृत करण्यासाठीं फेरिनी हा आपल्या कर्तृत्वानें दिव्य तेज उत्पन्न करीत असे. बोलोग्नामध्यें अजून शेंकडों कामकरी लोकांच्या कानांत फेरिनीचीं "लाडक्या देशबंधूनों, आपल्याला आपले हात शत्रूंच्या रक्तात धुतलेच पाहिजेत. त्या शिवाय परवशतेचा मळ निघावयाचा नाहीं." हीं वाक्यें गुणगुणत असतील. रोममध्यें आमचें प्रांतिक मंडळ होतें. नेपल्समध्यें पाएरिओ, बेलिनी, लिओपार्डी व त्याचे स्नेही यांनीं एक स्वतंत्र संस्था फार जोरदार रीतीनें चालविली होती. परंतु आमचें एकमेकांचें दळणवळण सुरू होतें व त्यांनीं मला कळविलेलें होतें कीं, त्यांची मंडळी दमदार व सज्ज असून आमच्या कार्यक्रमाप्रमाणें आयत्या वेळेस येऊन मिळण्यास तयार होती. माझ्याशीं त्यांचा आंकड्यांमधून पत्रव्यवहारही चालू असे.

परंतु जिनोआ–माझें जन्मस्थान–ह्यामध्यें तर संस्थेची भरभराट विलक्षण होत गेली होती. जिनोआमध्यें नुसते तरुण लोक व सामान्य वर्गाचे पुढारीच आम्हांस मिळाले होते असें नाहीं, तर सरदार वर्गांतीलही पुष्कळ पुढारी मिळाले होते. आमचें शक्तिमत्त्व कबूल करून मार्किस रोन्होरेडो व आणखी कांहीं सरदार हे संस्थेच्या निशाणाखालीं आले. पिडमाट प्रांतात संस्थेचें काम जरा हलके हलके सुरू झालें. परंतु तेथेंही अखेर संस्थेची प्रसृति पूर्ण झाली. प्रत्येक महत्त्वाच्या शहरीं शाखा उघडलेल्या होत्या. व त्यांच्या उपशाखांचा विस्तार हा तर कानाव्हीजमधील शूर लोकांपर्यंत जाऊन पोंचला होता. ॲडव्होकेट अझेरिओ (१८२१ मध्यें हद्दपार झालेला, साएन्ड्रा (व्यापारी), रॅन्कोडेप्रटिस (मुख्य प्रधान व नेमस्तपक्षाच्या विरुद्ध पंथाचे हल्लींचे पुढारी) स्टारा व आणखी कित्येक जण हे आमच्यांतील अत्यंत करारी व कर्तृत्ववान् तरुणांपैकीं असत यांशिवाय ज्यांचीं नांवें येथें देत बसणें व्यर्थ आहे असे पुष्कळ वजनदार व श्रीमान लोक हे प्रत्यक्ष रीतीनें जरी आम्हास मिळाले नव्हते तथापि आम्हीं कोणच्याही कृत्याला जोराचा आरंभ करतांच आपण पूर्ण मदत करूं म्हणून वेळोवेळीं कळवीत असत.

आतां आमच्याजवळ क्रांतीचीं पुष्कळ साधनें जमलीं होतीं. संस्थेच्या

दुहेरी कर्तव्याप्रमाणें शिक्षण व गुप्त लढाईची तयारी हीं दोन कर्तव्यें पार पाडण्यात झटत असतां शेंकडों संकटें दर क्षणीं दत्त म्हणून उभीं राहूं लागलीं. शिवाय आम्हीं उत्पन्न केलेल्या जागृतीचा व चैतन्याचा उपयोग जितका लवकर करून घेतां येईल तितका घेणें हें भाग पडूं लागलें. कारण त्या चैतन्याच्या ऊष्णतेनें सरकारला आंच लागूं लागली व लवकरच त्यावर पाणी ओतण्यासाठीं सरकार भयंकर चौकशी व जुलूम करील असा रंग दिसूं लागला. हें पाणी ओतलें जाण्याचे आधीं त्या चैतन्याच्या विस्तवाला फुंकून त्याच्या ज्वाला उठविणें व त्यात पारतंत्र्याचें भस्म करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत आवश्यक भासूं लागलें. व आम्हीं उठावणीचा प्रयत्न केला.

याच वेळेला सार्डीनिया संस्थानाची मदत मिळेल अशी आशा उत्पन्न झाली. त्या संस्थानाजवळ युद्धविशारद शिपायाचें कवाइती व व्यवस्थित शिक्षणाचें सैन्य होतें. त्या सैन्याला जो कोणी त्याच्यावरचा अधिकारी नेमला जाईल, त्याच्या हाताखालीं शिस्तीनें वागण्याचें वळण मिळालेलें होतें. अशा रीतीनें तें संस्थान बरेंच बलवान् होतें. व सुदैवानें त्या संस्थानानें आम्हांला अत्यंत महत्त्वाच्या व लष्करी डावपेंचांत अतिशय उपयोगीं अशा दोन जागा देण्याचें कबूल केलें. एलेसंल्ड्रीया व जिनोआ ह्या त्या जागा होत. शिवाय ह्याच दोन शहरीं आमच्या संस्थेचें बल अपरिमित होतें. इटलीच्या मध्य-भागीं उठावणी केली असती तर ऑस्ट्रियाचा तेथें प्रत्यक्ष संबंध असल्यानें त्यास एकदम जागे केल्यासारखें होतें. म्हणून वरील दोन भागीं उठावणी करणें श्रेयस्कर वाटलें. नेपल्समध्येंही आरंभ करितां येईना. कारण, नेपल्समध्यें आरंभ होतांच ते लोक पुढें घुसत चालतील कीं नाहीं याची मला खात्री वाटेना. व उठावणी केल्यानंतर पुढें घुसल्याशिवाय जयाची दुसरी तोड नाहीं. भूतकालामध्यें याच अपराधानें उठावण्या निरर्थक झाल्या आहेत. एकदां उठावणी झाली कीं, तिचा प्रसार भराभर होत गेला पाहिजे. हल्ले करून सर्व शहरें एकदम हालवून सोडलीं पाहिजेत. म्हणजे शत्रूंचें बल विभागून जातें व मित्रांना अवसान चढतें. हें न करितां भ्याडासारखें हिशोब करीत व आंकडे मोडीत दबून बसण्यात ज्यांना मोठा शहाणपणा वाटतो त्या बैठ्या व मठ्ठ पुढाऱ्याच्या या असल्याच चुकांना मागें शेंकडों वेळां अपजय आलेला आहे.

आमचा शत्रु म्हणजे ऑस्ट्रिया होय. त्याला रणांगणांत उतरून एकदम आव्हान करणेंच भाग होतें. त्याच्यावर पहिला वार क्रांतिपक्षाकडून व्हाव-

यास पाहिजे होता. कारण, नाहीं तर तोच वार करून उठावणी दाबून टाकता. परंतु आम्हीं एकदम आपण होऊन त्याच्यावर तुटून पडलों असतों म्हणजे तो घाबरता. शिवाय ऑस्ट्रियाचा द्वेष आमच्यांत त्या वेळेस सर्व इटलीभर इतका प्रज्वलित झालेला होता कीं, त्याच्याशीं लढाई करणें हें सर्वत्रांनाच मान्य झालें असतें. अशा कारणासाठीं मीं असें ठरविलें कीं, बंडाला आरंभ सार्डीनियन संस्थानांतूनच करावयाचा. जिनोआ व एलेसेन्ड्रिया हे केंद्रबिंदु ठरवावयाचे. त्याच वेळेस सुरवातीची खूण होतांच आम्हीं हद्दपार झालेले देशभक्त लोक ह्यांनीं बाहेरून सॅव्हायवर स्वारी करावी, म्हणजे तो प्रांत सरहद्दीवर असल्यानें आम्हांस इटलींत घुसण्यास मार्ग मिळता इतकेंच नव्हे तर फ्रान्समधल्या लोकसत्ताक मंडळींचें आमच्यांशीं प्रत्यक्ष दळणवळण रहातें, असा बेत योजून आम्हीं सैन्यास वळविण्याच्या प्रयत्नास लागलों. त्यांच्या अगदीं वरचे अधिकारी आम्हांस मिळावयास कबूल होईनात. परंतु दुसऱ्या वर्गाचे अधिकारी लोकांस इटलीच्या एकराष्ट्रीयत्वाची व स्वातंत्र्याची कल्पना रुचून ते मदत करण्यास तयार झाले. इटलीमध्यें असलेल्या बहुतेक रेजिमेंटमध्यें दळणवळण सुरू करण्यांत व त्या परस्परांमध्यें एकदिल करण्याचें काम अव्याहत सुरू ठेवण्यांत आम्हांस पूर्ण यश आलें. जिनोआ व एलेसान्ड्रिया हीं दोन बंडाचीं मुख्य ठिकाणें करण्याचें आम्हीं ठरविलें असल्यानें त्या शहरीं जीं शस्त्रागारें होतीं तेथें प्रवेश करण्याचा आटोकाट प्रयत्न केला व अखेर त्या शस्त्रागारांवरील तोफखान्याचे अधिकाऱ्यांत आमचा पूर्ण शिरकाव झाला. सैन्य वळविण्यात आम्हीं अगदीं वरच्या अधिकाऱ्यांची फारशी पर्वा केली नाहीं. कारण, ते अधिकारी मिळाले तर फारच चांगलें हें जरी खरें आहे तथापि ते न मिळाल्यास कांहीं मोठेंसें नुकसान होत नसतें. शिपाईलोक हे त्यांच्या तुकडीवरच्या अधिकाऱ्यांच्याच पूर्ण ताब्यांत असतात. त्यांना अगदीं श्रेष्ठ सेनापतीची ओळख देखील नसते. अशा स्थितींत तुकडीवरच्या अधिकाऱ्यांचे म्हणण्याप्रमाणेंच शिपाईलोक ताबडतोब वागल्याचीं इतिहासांत शेंकडों उदाहरणें आहेत. सामारझानो हा सेनापती सर्व सैन्यास बंडास मिळावयास सांगत असतांही जे घोडेस्वार बंडाला मिळाले नाहींत तेच त्यांच्यावरच्या अधिकाऱ्यानें हुकूम देतांच क्रांतिपक्षास ताबडतोब येऊन मिळाले होते. सर्जंट गिस्मांडी याच्या हुकुमावरून वरिष्ठ अधिकारी काय म्हणत आहेत याची दादही न घेतां सर्व रेजिमेंट

क्रांतिपक्षाकडे आली होती. तेव्हां मुख्य अधिकाऱ्यांपेक्षां दुय्यम प्रतीच्या अधिकाऱ्यांचाच सैन्याशीं प्रत्यक्ष संबंध असल्यानें शिपायी आपल्या पक्षाकडे वळविण्याचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे त्यांच्यावरील दुय्यम अधिकारी यांना दीक्षा देणें हें होय. व म्हणून आम्हीं कारपोरल्स्, सर्जंटस् व कॅप्टन्स यांना भराभर दीक्षा देत गेलों. बाकी राहिलेल्या मुख्य सेनापतींमध्येंही दोन वर्ग असतात. एक अगदींच विरुद्ध व दुसरा अविरुद्ध. पहिल्या वर्गांत नैसर्गिक रीत्याच फार थोडे लोक असतात. जेव्हां सर्व राष्ट्र स्वातंत्र्यासारख्या परम मंगल व सकलसुखमूलक अशा कार्यासाठीं रणांगणांत उतरतें, तेव्हां परवशतेचा जयजयकार अंतःकरणापासून करणारे नराधम मनुष्याचे सुदैवानें फार तुरळक सांपडतात. त्यांच्या अंतःकरणांत सहानुभूतीच बहुधा असते. पण भयानें, अनिश्चयानें व शंकेखोरपणानें ते उघड मिळूं शकत नाहींत. अशा लोकांचा जो **दुसरा अविरुद्ध** वर्ग त्यांतील कांहींजण उदासीन राहतात परंतु बाकीचे मागून मिळूं इच्छितात. उदाहरणार्थ गिफ्रेंगा यांनीं स्पष्ट अभिवचन दिलें होतें कीं, जर उठावणी यशस्वी होणार असा रंग दिसला तर आपण प्रत्यक्ष रीतीनें येऊन मिळूं व यश येण्याचा रंग दिसूं लागतांच जे उदासीन असतात त्यांनाही अवसान चढतें व विरुद्ध असतात ते अविरुद्ध होऊं लागतात. तेव्हां दुय्यम प्रतीचे अधिकारी व शिपायी वळविले कीं, सैन्य पूर्णपणें क्रांतिपक्षाला मिळणें किंवा न मिळणें हें सर्वस्वीं लोकांच्या उठावणीच्या जोरावर अवलंबून राहतें व जर कांहीं वेळ चांगला नेट धरला तर सर्व सैन्य बंड करावयास चुकत नाहीं. मात्र आधीं त्यांचीं मनें तयार करण्याचें काम पूर्ण होत आलें पाहिजे. म्हणजे पहिल्या पहिल्यानें देखील ते मनापासून उठावणीविरुद्ध लढत नाहींत. व बंडाचें स्वरूप आशायुक्त दिसतांच उघड रीतीनें येऊन मिळूं लागतात.

इतकें काम जुळत आल्यावर मी उठावणी करण्याचें नक्की ठरविलें व प्रांतिक मंडळाचें अनुमोदन घेऊन पैशाची मागणी केली. परंतु दुर्दैवानें मी मागितले तितके पैसे तर मिळाले नाहींतच, परंतु अगदीं अवश्य इतकी देखील रक्कम गोळा झाली नाहीं. काय चमत्कार असेल तो असो, परंतु ही गोष्ट नेहमीं प्रत्ययास येते कीं, जे लोक प्रसंगीं स्वातंत्र्यासाठीं आपलें रक्त खर्चण्यास तयार असतात तेच लोक त्यांचें कमी रक्त वेंचण्याचा संभव असतांही पैसे देण्यास कांकू करतात !

उठावणीचा बेत व कार्यक्रम हा जिनोआ, अलेसान्ड्रिया, व्हर्सेली, ट्यूरिन, लोमेलिना, वगैरे ठिकाणचे शाखाध्यक्षांस कळविला. जिनोआमध्यें तेथील तयारी उत्तम रीतीनें करण्यासाठीं मी मार्सेलिसहून जाण्याचें ठरविलें व निघण्याची सर्व गुप्त व्यवस्था केली. परंतु जिनोआला जाण्याचे पूर्वी फ्रेंच लोकसत्ताक पुढाऱ्यांचें नक्की अनुमोदन घेऊन व सर्व व्यवस्था ठरवून मग मार्सेलिस सोडावयाचें असें मी ठरविलें.

नंतर फ्रेंच लोकसत्ताक पुढाऱ्यांना मीं मार्सेलिसला बोलाविलें. ते आल्यानंतर आमचा बेत ठरला कीं, इटलीमध्यें लोकसत्तेच्या नांवानें बंड उभारलें जातांच त्यांनीं फ्रान्समध्यें एकसमयावच्छेदेंकरून उठावणी करावी. हें ठरविण्याचें कारण असें होतें कीं, इटलीनें लोकसत्ताक व्हावें असें फ्रेंच सरकारचें मत नव्हतें. म्हणून तें नेहमीं इटलीच्या विरुद्ध प्रयत्न करीत असे. तेव्हां फ्रान्समध्येंच लोकसत्तेची उठावणी झाली म्हणजे फ्रेंच सरकार घरचे कज्जे मिटाविण्यांत गुंतलें जाईल व मग त्यास इटलीकडे लक्ष देण्यास शक्य होणार नाहीं. लायन व पॅरिस येथें बंडें उभारण्याचें ठरवून ते फ्रेंच लोकसत्ताक पुढारी मार्सेलिसहून गेले. अशा रीतीनें सर्व बेत जुळून आला. परंतु तो अमलांत येण्याचे आधींच एका क्षुल्लक गोष्टीनें सर्व काम ढांसळून जाण्याचे रंगांत आलें

आमच्या 'तरुण इटली'च्या लेखांचा विस्तृत प्रसार व सरकारनें त्यांचेविरुद्ध हजारों जुलूम चालविले असतांही त्यांची अखंडता, यांवरून आमचें गुप्त मंडळ किती प्रबळ झालें होतें याची सरकारला कल्पना आली होती. त्यानीं त्या गुप्त चळवळीचा केंद्र शोधून काढण्याचा हवा तितका प्रयत्न केला, पण व्यर्थ झालें. तो अंतर्गत केंद्र जेथें केव्हांही नव्हता तेथेंच ते शोध करीत गुंतले होते. १८२१ सालीं ज्यांनी बंड केलें होतें त्या पुढाऱ्यांच्या पक्षकारात व श्रीमान लोकांत या चळवळीचें मूळ असावें असें त्यांस वाटत होतें. अशा विस्तृत गुप्त मंडळीचा अद्भूत प्रसार व पोलिसला व सरकारला खडे चारून राज्यक्रांतीच अवघड काम अखंड रेटण्याचें सामर्थ्य, याचे मुळाशीं लोकप्रसिद्ध नसलेले व स्वतःच्या अद्वितीय कर्तबगारीशिवाय व इच्छाशक्तीशिवाय ज्याच्याजवळ कोणच्याही प्रकारें द्रव्यबळ किंवा साधनबळ नव्हतें असे मूठभर तरुण लोक असावेत व त्यांच्या नेटानें हें सर्व चक्र फिरत असावें ही गोष्ट त्या पोलिसला ग्रहण करतां येईना. परंतु त्या श्रीमान

लोकांवर तें सरकार एकदम जुलूम करण्यास धजेना. कारण जर खरे पुढारी निराळेच असतील तर ह्या भलत्यांवरच रट्टा बसलेला पहातांच ते जास्त सावध होतील. अशा भीतीनें पोलिस दबून राहून सर्व तपास काढण्याची इच्छा करीत होते अशांत जर एकदम उठावणी झाली असती तर त्यांना तयारी करण्यास देखील अवसर मिळाला नसता. परंतु मार्चच्या अखेर एका क्षुल्लक गोष्टीनें सर्व बेत फसविला.

तोफखान्यावरील दोघां शिपायांत एक खाजगी तंटा झाला. त्या शिपायापैकीं एकजण आमच्या संस्थेंत असून त्या दुसऱ्यासही दीक्षा देण्याचा त्यानें प्रयत्न केलेला होता. व तेव्हां 'तरुण इटली' ची कांहीं माहिती त्यानें त्यास दिली होती. हा खाजगी तंटा विकोपास गेला. व त्या दुसऱ्या शिपायानें रागाचे भरांत तुझें गुप्त फोडणें माझे हातीं आहे, मी आतां तुझा जीव घेववीन, असा धाक आमच्या त्या सभासदास उघड रीतीनें घातला. हें वाक्य उच्चारतांच पोलीस सावध झालें व एकापासून दुसऱ्याच्या गुप्तस्फोटाला आरंभ झाला. ही गोष्ट मला कळतांच याचे किती अनिष्ट परिणाम घडणार हें माझ्या लक्षांत आलें. मीं ताबडतोब निरोप धाडला कीं, "एकदम उठा, नाहीं तर नाश झाला आहे." पुढाऱ्यांस एकतर हा निरोप पोंचला नसेल किंवा तिकडे त्यांनीं लक्ष दिलें नसावें. उठावणी झाली नाहीं. सरकारनें इतक्या घाईनें व कडक रीतीनें चवकशी चालविली कीं, त्यावरून त्यांना आंतून किती धाक वाटत होता हें स्पष्ट दिसून आलें. सर्व बराकीवर व तोफखान्यांवर पहारा बसला. शिपायांचे झाडे झाले. त्यांत कित्येक ठिकाणीं 'यंगइटली' चे लेख सापडले गेले. त्या लेखांचे मालक अटकेंत पडले. थोडेच दिवसांत त्यांचे जितके प्रिय मित्र तितक्यांना पकडलें गेलें. नंतर प्रत्येक शिपायाचे चेहरे बघण्यांत येत. व ज्यांचे मुद्रेवर घाबरल्याचीं किंवा भयाचीं चिन्हें दिसतील त्याना तेवढ्याच पुराव्यावरून धरावयास आरंभ झाला. ही गोष्ट फक्त जिनोआपुरतीच होती असें नाहीं. ट्युरीन, अलेसान्ड्रिया व चम्बेरी येथील तुरुंग 'संशयानें' अडकविलेल्या कैद्यांनीं गच्च भरले. धरते वेळेसही एक खुबी केली जात असे. पहिल्यानें जे पकडले त्यांच्या मागोमाग दुसरे पकडावयाचे नाहींत तर थोड्या वेळानें पकडावयाचे; म्हणजे त्या एकंदर प्रकारांवरून दुसऱ्यांस असें वाटावें कीं पहिल्यानीं आपलीं नांवें दिलींच असलीं पाहिजेत, तेव्हां आतां आपण नाहीं म्हणून छपविण्यांत कांहीं

हाशील नाहीं. अशा रीतीनें आधींच गुप्त फुटलें असावें अशा संशयानें ग्रस्त झालेल्या कैद्यांस मग मरणाचा धाक घातला जाई. ‘ नांवें सांगा नाहीं तर फांशीं जाल, ’ असें कळविण्यांत येई. एक सरकारी नौकर व तीन लष्करी शिपायी नावें सांगण्याइतके नामर्द होते. बाकीच्यांपैकीं कांहींनीं तर स्वतःचाच तेवढा अपराध कबूल करून क्षमा मागण्याचें बायकी कृत्य आरंभिलें. परंतु इतरांचीं नांवें देण्याचें साफ नाकारलें. परंतु त्यांनीं स्वतःचा अपराध कबूल करतांच त्याचे सर्व मित्र अनायासेंच पकडण्यांत आले. मोठ्या शहरांचे तुरुंग भरल्यानंतर मग लहान लहान शहरीं धरपकड सुरू झाली. चहूंकडे तिचा वचक बसला. आमच्यापैकीं कांहीं पळून गेले, कांहीं दबून राहिले. पुढाऱ्यांच्या मनांतून एकदां येई कीं, आतां उठावणीचा इषारा द्यावा. परंतु अखेर संशयानें नाश झाला. जाकोपो रफिनी व जिओव्हेनी यांनीं इषारा दिला नाहीं. याचें कारण त्यांची उदात्त मनोवृत्ति होय. ‘ स्वतःचा बचाव करण्यासाठीं यांनीं उठावणी करून सर्व नाश केला. ’ असें लोकांनीं क्वचित् पराजय झाला असतां म्हणूं नये म्हणून त्यांनीं इषारा न देतां धैर्यानें संकटांस तोंड देण्याचा उपक्रम केला. थोडेच दिवसांत उठावणी करणें अशक्य झालें. बराकींत जाण्याची सक्त मनाई झाली. सरकारनें आमच्याविरुद्ध अगदीं नीच आरोपांच्या कड्या पिकवून लोकांनीं आमचा तिरस्कार करावा असा प्रयत्न चालविलाच होता आम्ही शहरांना आग लावणार होतों ! आम्ही खून पाडणार होतों ! नाना दुष्ट कंड्या पिकूं लागल्या. सरकारच्या ह्या नीचपणास सीमाच नाहीं. लोकपक्षाकडे थोडासा अतिरेक होऊन एखाद्यानें संतापाचे भरात, एखादा खून केला कीं, सरकार तें कृत्य माझ्या ‘ खंजिराच्या उपपत्तीचें ’ आहे म्हणून म्हणतें. पण माझ्या पक्षांतील त्या अतिरेकापेक्षां या दिवसाढवळ्या व कायदेशीर रीतीनें पाडलेल्या हजारों खुनांची उपपत्ति कोणी लिहिली होती ! ती त्यांनींच व अहंमन्य सरकारनेंच नव्हे काय ? परकें सरकार म्हणजे सैन्य, संपत्ती व कायदा यांचे आधारानें भर दिवसा राजरोस रीतीनें सर्व जगाचा खून पाडण्यासाठीं स्थापलेली मंडळी होय.

अशा रीतीनें धरपकड करून उठावणी बंद व अशक्य केल्यानंतर सरकारचा योग्य मार्ग म्हणजे कायदेशीर रीतीनें पुढाऱ्यांची चौकशी करणें हा होता. परंतु त्यांचें क्रौर्य आतां दुप्पट वाढलें. एक तर पोटांतली भीति व दुसरी भ्यालों असें दाखविलें गेल्याबद्दल उत्पन्न झालेली शरम. या दोन

मनोविकारांचा परिणाम दुप्पट क्रौर्यांत झाला. सार्डीनियन प्रांतांचा त्या वेळचा इतिहास असा आहे कीं, त्याचें वर्णन करण्यास टॅसिटसच पाहिजे आहे व त्याला देखील आपली लेखणी रक्तांत बुडवावी लागणार आहे. ज्यांना ज्यांना परक्यांच्या जुलमाची व जुलमी राजांच्या क्रौर्याची कल्पना पक्की करून घ्यावयाची असेल त्यांनीं त्यांनीं हा इतिहास वाचावा. आयांनीं आपल्या मुलांना तो वाचून दाखवावा म्हणजे गुलामगिरीचीं फळें काय असतात हें शिकवावयास दुसरा ग्रंथ उघडणें नको !

ज्यांना संशयावर धरलें होतें त्यांच्या आप्तांना इकडे सांगण्यांत आलें कीं, घाबरण्याचें बिलकुल कारण नाहीं, त्यांची सुटका लवकरच होईल. परंतु त्याच वेळेस तिकडे तुरुंगामध्यें अपराध कबूल करविण्यासाठीं व नांवें फोडण्यासाठीं भयंकर जाच सुरू होते. नरकाच्या यातनांचें शास्त्रीय ज्ञान व अत्यंत खोल द्वेष या द्वयाला जितके शक्य तितके प्रकार शोधण्यांत आले. कोणाला लालूच दाखविली; कोणाला अत्यंत त्रासदायक असे घालून पाडून प्रश्न करून करून दमविलें; व लवकर किंवा उशिरां, पण मरणाचें भय हें सर्वांस दाखविलें. जे साधारण भित्रे दिसले त्यांना ते विचारीत, " तूं स्वतः अपराधी आहेस हें आम्हांस पक्कें कळलें आहे व तुला तोफेच्या तोंडीं देण्याची शिक्षा कायम झाली आहे. चोवीस तासांची मुदत आहे. परंतु तूं जर तुझ्या स्नेह्यांचीं व कटवाल्यांचीं नांवें देशील तर तुझें आयुष्य बचावण्याची आम्हीं हमी घेतों." आतां ज्यांचें धैर्य व सच्छील हें विश्रुत होतें त्यांना ते विचारीत, " आम्हांला अंतःकरणांत तुमच्याबद्दल फार दुःख वाटत आहे. तुम्हीं जें केलेंत तें फार उत्तम विचारानें केलेंत. तुम्हांला जें स्तुत्य कृत्य वाटतें त्याच्यासाठीं तुम्हीं झटलांत. पण ज्यांच्यासाठीं तुम्हीं स्वार्थत्याग करण्यासही तयार झालांत त्यांची नीचता मात्र तुमच्या ध्यानांत आली नाहीं. ज्याना सन्मित्र म्हणून त्यांचीं नांवें न सांगतां तुम्हीं मरणही पत्करीत आहां, त्यांच्यावर तुमचा अंध विश्वास आहे. तुमचें कुटुंब व तुमचा प्राण हीं, ज्यांनीं आधींच विश्वासघातानें तुमचीं नांवें आम्हांस कळविलीं आहेत, त्यांच्यासाठीं खर्च करीत आहां ! पहा, तुमच्या त्या मित्रांनींच तुमचें हें नांव आम्हांस कळविलें आहे. मग त्यांचीं नांवें देऊन आपल्या इष्टमित्रांना व बायकापोरांना जाऊन कडकडून भेटण्याची संधी कां घालवितां ? कबुली न द्याल तर निंद्य मृत्यूशिवाय कांहीं एक मिळणार नाहीं." असें सांगून व त्या संशयानें

चंचल झालेल्या मनाचा ताबडतोब फायदा घेऊन त्यांनीं त्याचें नांव कळविल्याचें एक बनावट पत्र काढावें व त्या पत्रावर त्यांच्या मित्रांची केलेली बनावट सही दाखवून त्या मित्रांनीं विश्वासघात खरोखर केला आहे असें त्या कैद्याला पक्कें वाटूं देण्याचा प्रयत्न करावा, अशाच रीतीनें माझा परमप्रिय मित्र रफिनी जाकोपो यास फसविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. ज्यांच्यापासून त्यांना नुस्ती स्वतःचीच कबुली पाहिजे होती, त्यांच्यावर निराळा प्रयोग होत असे. तुरुंगांत ज्या कोठडींत त्यांना ठेवलेलें असें त्यांतच दुसरा एक पोलिस कैद्याचे ढोंगानें ठेविलेला असे. त्यानें निराशेच्या व विश्वासाच्या प्रत्येक क्षणाचा फायदा घेऊन त्या देशभक्त कैद्याची कबुली घेण्याचा प्रयत्न सहानुभूतीच्या ढोंगाखालीं करावा. मिग्लिओ नांवाचा एक सर्जंट पकडला होता. त्याचेच कोठडींत जिनोआमध्यें एक कैदी होता. त्या कैद्यानें डोळ्यांत पाणी आणून मिग्लिओस म्हणावें कीं, मीही एक गुत कटवाला आहे. पुढें एके दिवशीं तो म्हणाला कीं, माझ्यापाशीं एक पत्रव्यवहाराचें साधन आहे, आपण पाहिजे तर आपल्या घरीं पत्र द्यावें. मिग्लिओनें शाई वगैरे नसल्यानें अखेर आपली एक शीर कापली व त्या रक्तांत थोडेसें पत्र लिहून मोठ्या विश्वासानें त्या कैद्यापाशीं दिलें. हा कैदी पोलिस होता. तेंच रक्तांत लिहिलेले पत्र मिग्लिओच्याविरुद्ध पुरावा म्हणून उपयोगी पडलें ! कैद्याच्या खिडकीखालीं मांगानें त्याच्या इतर स्नेह्यांना फांशी ठोठावल्याचा हुकूम वाचावा. तें जाहीरपत्रक ऐकतांच घाबरून जाऊन कैद्यानें नांवें कळवावीं व जीव बचावण्याचा प्रयत्न करावा, असा बेत असे. आणखी एक राक्षसी युक्ति असे. दोन स्नेही एकमेकांसमोरच्या खोलींत ठेवले जात. पैकीं एकास दुसऱ्याच्या हालांचें वर्णन ऐकविलें जाई. थोड्याच वेळांत ह्या कैद्यास आपल्या स्नेह्याच्या खोलीपुढें शिपाईलोक दवडत आल्याचा आवाज ऐकूं येई थोड्या वेळांत एक बंदुकीचा बार उडविण्यांत येई. तो ऐकतांच ह्या कैद्यास आपल्या स्नेह्याला गोळी घालून मारिलें हें खरें वाटूं लागे व कबुली दिल्यास तुझें आयुष्य बचावेल हें वचन त्याच्या पुन्हां कानीं पडे ! जिओव्हॅनीरी हा आपला अनुभव लिहितो कीं, "सर्जंट लोकांना फांशी दिल्यावर त्यांनीं पिआनेव्हिया यालाही फांशीं दिला, अशी माझी समजूत करण्याचा प्रयत्न केला. पिआनेव्हिया ( हा देशद्रोही सर्वांचीं नांवें सांगून दिल्यानें जिवंत सोडला गेला. ) याची कोठडी माझे शेजारीं असे. तो तेथें रोज गात असे. एके

दिवशीं त्याचें गाणें एकदम बंद झालें. त्याच्या खोलींत त्या शहरचा आले-सान्ड्रिया ) अधिकारी शिरला. सर्व रात्रभर शिपायांचें जाणें येणें वगैरे आवाज मला ऐकूं येत होते. इतक्यांत मलाही उपदेश देण्यास एकजण आला. पुढें मला विचारण्यांत आलें कीं, तुला बरें वाटतें का? बरें आहे, माझें मन शांत आहे, असें मीं उत्तर केलें इतक्यांत त्या खोलींतून पिआनेव्हिया याला नेल्याचा भास करविण्यांत आला. तीन बार उडाले व पियानेव्हिया हा गोळी घालून मारला गेला असें मला वाटून मीं अश्रुपात केला."

कांहीं देशभक्त कैद्यांची छळणूक निराळ्या रीतीनें करण्यांत येई. त्यांच्या खोलीचे बाहेर रात्रीं एकसारखे आवाज व गडबड सुरू ठेवण्यांत येई. त्या योगानें झोंप लागणें अगदीं अशक्य केलें जाई. अशा रीतीनें तीन चार रात्री झोंपेशिवाय गेल्यानंतर मग त्यांना प्रश्नांचा व चौकशीचा एकसारखा लकडा लावण्यांत येई. त्या चौकशीचें व प्रश्नांचें स्वरूप किती भयंकर व छळणूकीचें असतें हें, ज्यांनीं त्याचा अनुभव घेतला असेल त्यांच्याच ध्यानांत येईल. अशा रीतीनें मनाचें व शरीराचें सर्व सामर्थ्य क्षीण झाल्या-नंतर मग त्या कैद्यास पूर्ण कबुली दिल्यास पूर्ण मुक्तता होईल अशी आशा लावण्यांत येई! यावरही ताण करावयाची म्हणजे नैसर्गिक व शुद्ध अशा कुटुंबप्रेमाला बाटवून त्या कैद्याच्या बापाला, वृद्ध मातेला किंवा पत्नीला अधिकाऱ्याबरोबर कबुली देऊन सुटण्याची विनंती करण्याकरितां आणण्यांत येइ! जिओर्व्हेनीरी म्हणतो, "माझी कोठडी ही अतिशय काळोखांत होती व तेथें उद्विग्नता मूर्तिमान वास करीत असे. त्या कोठडीला एकच खिडकी असून तिला दुहेरी गज मारलेले होते. एका भिंतीला एक कडी होती तेथें मला सांखळदंडानें बांधून टाकलेलें असे! मला रोज सांगण्यांत येई कीं, राजाची आज्ञा म्हणजे परमेश्वरी हुकूम होय, व ज्यांनीं तो अमान्य केला असेल, त्यांना शिक्षा देणें पुण्य होय. माझी खोली फांशीची मार्गप्रतीक्षा करीत बसलेल्या व्हाचिएरी ह्याच्या समोर होती. त्याच्या खोलीचें दार मुद्दाम उघडे टाकण्यांत येई. माझ्या दाराला नंतर तीन भोकें पाडिलीं व त्यांच्या समोर मला दिसेल अशा बेतानें व्हाचिएरी ह्याला बसविण्यांत आलें. त्याच्या पायांत जंगी बेड्या अडकाविल्या होत्या. त्याच्या बाजूला दोन शिपाई नंग्या तरवारी घेऊन उभे होते. ते कांहीं एक बोलत नसत. हा भयंकर देखावा माझ्या डोळ्यांपुढें एक आठवडाभर सारखा होता. दुर्दैवाचा

व बीभत्सतेचा कळस करण्यासाठीं माझ्या शेजारच्या खोलींत एक अतिशय दुखणेकरी आणून ठेविला होता व त्याचें कण्हणें व मोठमोठाल्या भयप्रद आरोळ्या ह्या अखंड सुरू होत्या. कांहीं दिवसांनीं मला दुसऱ्या कोठडींत नेण्यांत आलें. तेथें इतका ओलावा होता कीं, माझ्या हातापायांला कळा लागल्या. माझें आंग ठणकूं लागलें. आतां मात्र माझें शरीर व मन कृशतम झालें आहे असें पाहून मग उलट सुलट प्रश्नांना सुरवात झाली. माझी मति पूर्ण गोंधळून जाईल इतके घोंटाळ्याचे, पुनरुक्तीचे व त्रासदायक प्रश्न विचारले जात मी एखाद्या आरोपाचें निरसन करूं लागलों कीं, एव्हेनरी मध्येंच थांबवी व 'हं, संभाळून व सावधगिरीनें उत्तर दे,' असें म्हणे. तेव्हां अर्थातच माझी जास्त लटपट उडे. लगेच थोड्या वेळानें त्यांनीं आवाज बदलून सांगावें कीं, 'बस्स. यावरून आपला अपराध स्पष्ट झालेला आहे. आतां विरुद्ध पुरावा सर्व तयार आहे. आपला संरक्षणासाठीं चालविलेला लपंडाव फसला आहे.' अखेर माझी खात्री झाली कीं, मरण हें निश्चित आहे. मग त्यांनीं, माझे मित्रांनीं माझें नांव कळविल्याचे पुरावे दाखविले. सेग्रेव्हओरा इत्यादिकांचे कबुलीजबाब वाचून मी अतिशय गोंधळून गेलों. मला वाटूं लागलें कीं, मी आतां वेडा होणार. पुढें चौकशीची वेळ आली. मला माझा पक्ष मांडण्यास वकील देतां येत नाहीं, म्हणून हुकूम आला. बरें मी माझा स्वतःचाच वकील होऊं इच्छित असतां माझा पक्ष लिहून काढण्यास खटल्याचे दोन दिवस झाले तरी, शाई मिळेना, दऊत मिळेना !!! माझे आईबाप त्या शहरीं माझेसाठीं आलेले कळतांच त्या चांडाळांनीं त्यांना शहर सोडण्यास हुकूम दिला !! अखेर मला ते देतील तोच ॲडव्होकेट पाहिजे असल्यास स्वीकारावा असा हुकूम देण्यांत आला मी तें पत्करलें; परंतु तो येतांच माझे संरक्षणाचे कांहीं बेत करावयाचे ऐवजीं मला सांगूं लागला, माझी स्थिति फारच भयंकर झालेली आहे. ज्याच्याशींच काय तें मला मन मोकळें करून पुरावा जमविण्याचें बोलतां यावयाचें तोच मला म्हणणे कीं, मी गुप्त संस्थांचा एक अतिशय उद्योगी सभासद आहे, हें सरकारला पक्कें कळलें आहे. व म्हणून शिक्षा न होणें हें केवळ अशक्य आहे फक्त एकच तोड आहे, व ती तोड म्हणजे सर्व गोष्टी कबूल करून नांवें सांगणें ही होय. माझ्या इतर मित्रांनीं–एझेरिओ, स्टारा यांनीं–आमचे सर्व बेत फोडले आहेत. व ट्यूरीनहून परवागी येतांच त्यांची मुक्तताही केली

जाईल. ही शेवटची पर्वणी आहे. मी कबुली देऊन सुटावें दोन वेळां मीं तें करण्याचें नाकारलें. पण तिसऱ्यांदा पुन्हां तीच तोड सुचविण्यांत आल्यावर त्या पैशाच्या वशीकरणाला मी बळी पडलों. " या भयंकर जुलमाला कित्येक शरण गेले. जे कित्येक धैर्याच्या मेरूसारखे अचल राहिले, ते फांशी दिले गेले. एक युवा मात्र-ज्याचें अतःकरण इतकें शुद्ध व इतकें उदात्त होतें कीं, त्यांत जगतीवरील सर्व राजाच्या वचनानें किंवा भयानें एक काडी इतकी चंचलता उत्पन्न झाली नसती किंवा नामर्दपणा स्पर्शूं शकला नसता त्या तरुणानें आपला पवित्र आत्मा त्या भुलविणाऱ्या पिशाच्यापासून व आपला देह त्या फांशी देणाऱ्या मांगापासून सुरक्षित रीतीनें परलोकाकडे धाडून दिला ! एके दिवशीं रात्रीं त्यानें आपल्या तुरुंगाच्या दरवाज्यांतून एक खिळा उपटून काढला. व त्याला आपल्या मानेंत ठोकून दिला ! ह्या जगताच्या असह्य गुलामगिरीविरुद्ध व स्वदेशाच्या पारतंत्र्याविरुद्ध शेवटची आरोळी ठोकून त्यानें विश्वजनकाच्या गळ्यांत मिठी मारिली ! विश्वजनकाकडे जाण्याचा त्याला अधिकार होता. कारण तो शुद्ध पवित्र व पापभीरु होता. तो अत्यंत गोड स्वभावाचा तरुण होता; त्याची प्रीती निर्मल, अत्यंत व अखंड रसदा होती. इतक्या मधुर हृदयाचा व इतक्या पवित्र व अखंड प्रेमाचा तरुण मीं आजपर्यंत पाहिला नाहीं. तो माझा मित्र होता. माझा अगदीं पहिला व अगदीं श्रेष्ठ मित्र होता. युनिव्हर्सिटीमधल्या बालपणापासून तों त॰त १८३१ पर्यंत जाकोपोरफिनी व मी भावाभावासारखे राहिलों व तेव्हां प्रथम तुरुंगानें व मग हद्दपारीनें आमची कायमची ताटातूट केली. त्यानें वैद्यकीचा व मी कायद्याचा अभ्यास चालविला होता. पण प्रथमतः वनस्पतिशास्त्राची अभिरुचि, वाङ्मयांत दोघांनाही वाटणारी रमणीयता, नंतर रूढरचनावादी व अद्भुत रचनावादी यांच्या मधला रणसंग्राम व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणणे आमच्या अंतःकरणाची नैसर्गिक एकतानता, या योगानें आम्हीं हलके हलके एकमेकांस आकर्षूं लागलों. अखेर त्या आकर्षणानें जवळ जवळ येतां येतां आम्ही एकजीव होऊन गेलों. आमची परम सीमा झाली होती. इतकी परम सीमा कीं, असलें स्वर्गीय प्रेम व असला दविक स्नेह मी आजपर्यंत इतरत्र पाहिला नाहीं. पुढेंही आजन्म तो मला पहावयास मिळणार नाहीं. त्याच्याहून उदात्ततर व पूर्णतर आत्मा मी कोठेंही पाहिला नाहीं, असा माझा दृढ समज आहे. व मी आनंदानें व

दुःखानें–दुःखमिश्रित समाधानानें–सांगतो कीं, त्या आत्म्यावर त्याची शुभ्रता दूषित करण्यास एकही कलंक येण्याचे आधींच तो आत्मा ब्रह्मस्वरूपीं लीन झाला. पर्वतावर एका ठिकाणीं लिलींच्या फुलाचा ( एक शुभ्र व अतिशय कोमल पुष्प ) एक ताटवा आहे. या फुलांची श्वेतता व त्याचा तो नाजूक व मनोहर सुगंध यांचें आम्ही दोघांनीं फार कौतुक करीत असावें. त्या लिली फुलाला पाहिलें कीं, माझ्या रफिनीची मूर्ति माझे डोळ्यासमोर उभी राहते त्या फुलासारखाच तो शुचिव्रत व नम्र असे. त्याची खांद्याकडे किंचित् लवलेली विनयशील मान हीं हेखील, त्या फुलाच्या देहाचा तो किंचिन्मात्र असलेला बाक पाहून, माझ्या हृदयाला दिसूं लागते.

पूर्ववयांतच त्याचे वडील भाऊ वारल्यानें त्यांच्या अंतःकरणांत जिची मूर्ति नित्य वास करीत असे, व जिची त्याच्यावर निःसीम प्रीति असे, अशा त्याच्या आईच्या नित्य दुखण्याने व आणखी बऱ्याच कारणांनीं त्याचें आयुष्य दुःखमय झालेलें होतें. त्याचें मन फारच कोवळें व त्याचे मनोविकार सूक्ष्मचेतन असत. त्या योगानें तरुणपणापासून त्याच्या मनाची उदासीन वृत्ति होऊं लागली केव्हां केव्हां तर निराशेची कमाल होऊं पाही. परंतु गुलामगिरीत रखडणें भाग पडलेल्या बहुतेक तीव्र बुद्धीच्या लोकांप्रमाणें तो जगाला शिव्या देण्यास मात्र केव्हांही तयार नसे. मनुष्यांपासून त्याला फारच थोडें सुख मिळालें, तथापि तो त्यांच्यावर प्रेम करीत असे. त्याच्या समकालीन मनुष्यांबद्दल त्याला फारसा सन्मान वाटत नसे. पण मनुष्यजातीबद्दल–वास्तविक रीतीनें ज्या पूर्णावस्थेंत मनुष्य असला पाहिजे व एके काळीं असणार आहे तशा मनुष्यजातीबद्दल–त्याची फार पूज्यबुद्धि असे. त्याच्या काळची परिस्थिति व त्या वेळचीं माणसें यांच्या संसर्गानें जी निराशा उत्पन्न होण्याचा संभव होता ती निराशा त्याच्या मनाला धार्मिक सत्याचें पाठबळ असल्यानें शिवली नाहीं. प्रगतीचे उदात्त तत्त्व–ज्याच्या योगानें पूर्वकालीन दैवाचे जागीं देव आणून बसविला तें तत्त्व–हें त्याच्या अंतःकरणांत स्वयंस्फूर्तीनेंच उद्भूत झालेलें होतें व इतिहासपरिज्ञानानें दृढ झालेलें होतें. प्रतिभादिष्ट उत्तमता हेंच मनुष्याचे इतिकर्तव्य, परमेश्वर तिचा जनक व ( बहुतेक वेळां दुर्लक्ष केली गेलेली ) अंतस्फूर्ति ही मार्गदर्शिका असा त्याचा दृढ विश्वास होता. तो उदासीन असे, कारण; नीतिमत्तेचा पूर्ण अभाव आहे असें त्यास दिसून आलें. त्याला पाहिल्यापासून वाटूं लागलें कीं, आपलें लक्ष्य मिळण्यापूर्वी आपला

ह्या जगांतला वास संपणार. तथापि त्याची वृत्ति ही सदोदित शांत असे. कारण, तो हें जाणून होता कीं, ह्या आयुष्याचें अंतिम सुखप्राप्ति हें नसून कर्तव्याची पूर्तता, ईश्वरप्रेरित कामगिरीची बजावणी, हेंच आयुष्याचें खरें पर्यवसान होय. व तत्काल यशाचा संभव नसला तरी आयुष्य हें कर्तव्य-पूर्ततेसाठींच खर्च केलें पाहिजे. सुख होतें आहे कीं नाहीं यावरून आयुष्याची परीक्षा करावयाची नसून कर्तव्य घडतें आहे कीं नाहीं यावरून ती करावयाची असते. त्याला जेव्हां हसूं येई तेव्हां तें हसणें हें बळी पडणाऱ्या महात्म्याच्या हसण्यासारखें असे. पण तो हांसत असे. त्याची मनुष्यजाती वरील प्रीति ही शिलर ( जर्मन कवि ) च्या प्रीतीसारखी प्रतिभापूर्ण प्रीति होती. त्या प्रीतींत व्यक्ति लीन होऊन गेली होती. प्रीतीसाठींच प्रीति होती. पण ती प्रीति होती. त्याच्या व्यक्तिविषयक दुःखानें तें त्याचें स्मित व ती त्याची प्रीति यांच्यावर कांहींएक अनिष्ट परिणाम होऊं शकला नाहीं. जेव्हां सरकारी जुलमाला प्रथम आरंभ झाला तेव्हांच जाकोपो रफिनी याला आपला नाश होणार हें पक्कें कळून चुकलें व तो शांतरीतीनें विधिघटनेच्या विल-सिताची मार्गप्रतीक्षा करीत बसला. त्याला धरण्याचा हुकूम सुटल्याची गुप्त बातमी त्याला कळविली गेली; पण त्यानें पळून जाण्याचें नाकारलें. जेव्हां त्याला तसें करण्याचा आग्रह करण्यांत आला तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, ज्यांनीं आपल्या उदाहरणानें आपल्या बांधवांस संकटांत ढकललें त्यांनीं त्या संकटाचे फटके प्रथम सोसले पाहिजेत. जेव्हां धरला गेला तेव्हां त्याला अतिशय छळणुकीचे असे हजारों प्रश्न विचारण्यास आरंभ झाला; पण त्यानें त्या सर्वांचीं उत्तरें हांसत हांसत शांत रीतीनें द्यावीं. पुढें त्याला भयंकर यातना व धाकदपडशा यांच्या माऱ्यापुढें उभें रहावें लागलें. तरी तो अढळ उभा राहिला. शेवटीं त्यानें माझें नांव सांगावें म्हणून मी त्याचें नांव पोलि-सला कळविलें असें सांगण्यांत आलें. रफिनीचें नांव माझिनी कळवील, हें त्याला कसें खरें वाटणार ! तेव्हां त्या नीचांनीं माझी बनावट सही केलेलें एक पत्र काढलें व तें त्याच्या पुढें ठेवलें. रफिनीला धरावा अशा अर्थी मजकूर व त्याखालीं माझिनीचे हस्ताक्षरांत हुबेहुब सही ! जाकोपोचें चित्त तळमळूं लागलें ! त्याला त्याच्या स्वतःवर देखील विश्वास ठेवावासा वाटेना. न जाणों आपलें मन देखील क्वचित आपल्या स्वतःलाच फसवील व सर्व गोष्टी फोडून शत्रूंस शरणागत होईल असा अविश्वास उत्पन्न झाला. मनानें

तो अविश्वास करण्याचे आधींच त्यानें दाराचा खिळा उपटला व जितक्या पवित्र शुचितेनें त्यानें आयुष्य कंठिलें होतें तितक्याच शुचितेंत व पूतपावनतेंत त्यानें तें आयुष्य स्वातंत्र्यदेवतेच्या स्वाधीन केलें ! स्वदेशार्थ पवित्र मरण वरून तो चिरंजीव झाला. तो देशवीर झाला.

आत्महत्या हें पातक फांशी देण्याच्या पातकाइतकेंच भयंकर आहे असें माझें ठाम मत आहे. आयुष्य हें परमेश्वरानें निर्मिलें आहे. व ज्यानें त्याचा पापवृत्तीनें अपव्यय केला आहे त्याला पश्चात्ताप होऊन पुन्हां आपल्या त्या ईश्वरदत्त कामगिरीवर रुजू होण्याची संधि हिरावून घेते म्हणून फांशी ही जितकी निंद्य आहे, तितकीच ईश्वरी कामगिरीवरून त्याच्या परवानगीशिवाय पळून जाण्याचा प्रयत्न होतो म्हणून आत्महत्या ही निंद्य आहे. परंतु जाकोपोच्या उदाहरणांत आत्महत्येला पवित्र आत्मार्पणाचें उच्च स्वरूप आलेलें आहे. स्वतःला, "तुझा उजवा डोळा तुझ्याविरुद्ध जात असेल तर तो उपटून काढ व दूर फेंकून दे. जेव्हां दुष्ट दुर्जनांच्या निंद्य वशीकरणास बळी पडून तुझे हातून पाप घडेल असा जबरदस्त संभव आहे तेव्हां तुझें आयुष्य देहांतून उपटून काढ व दूर झुगारून दे. पवित्र स्वदेशाच्या विरुद्ध पाप करण्यापेक्षां आपल्या स्वतःविरुद्ध पाप केल्याचा आरोप आपल्या शिरावर घेणें अधिक इष्ट आहे. या क्षुल्लक पापाविरुद्ध तो दयासागर त्याच्या क्षमेच्या विस्तृत छत्राखालीं तुला आश्रय देईल." असें तात्विक सत्य जो जाणतो त्याच्या महत्त्वाच्या कृत्याइतकेंच जाकोपोचें कृत्य शुद्ध व उदात्त आहे.

ज्यांनीं देशद्रोह करून नांवें कळविलीं त्यांपैकीं देखील बहुतेकांस शिक्षा झाल्याच. कांहींजण सोडून देण्यांत आले; कारण, त्यांनीं गुप्त फोडण्यांत फारच महत्वाची मदत केली होती. न्यायाचा अद्‌भुत फार्स उडाला. स्वतः जे सामील होते ते तर फांशी दिले गेलेच, पण ज्यांचा अपराध म्हणजे त्यांनीं गुप्त मंडळ्यांचा निषेध केला नाहीं एवढाच काय तो, त्यांना देखील तीच शिक्षा झाली. ज्यांनीं ज्यांनीं सरकारचे विरुद्ध कांहीं तरी लिहिलें त्या सर्वांना निरनिराळ्या शिक्षा देण्यांत आल्या. ज्यांना मरणाच्या शिक्षा झाल्या त्यांपैकीं कांहींचीं नांवें देतों:—टॅम बोरेली एका ब्रिगेडचा कॅप्टन होता; गव्होटा एक लष्करी शिक्षक; बिग्लिआ सर्जंट होता; मारिनी; सासारी लेफ्टेनंट; गोविओ सर्जंट; व्होचिएरी वकील. ज्यांना मरणाची शिक्षा झाली असतां ते पळून जाऊं शकले त्यांपैकीं:—स्कोवाझी ॲडव्होकेट; ऑर्जेनो लेफ्टेनंट; व्हेनेंटी

वगैरे सर्जंट; जिओव्हॅनी रफिनी ( जाकोपाचा भाऊ ); वर्धिनी अॅडव्होकेट; मार्क्विस रोव्हरेटो व आणखी शेंकडों जणांना परत येतांच मरणाच्या शिक्षा ठोठाविल्या जाव्या असें ठरलें तेव्हांच, मलाही मरणाची शिक्षा देण्यांत आली.

टॅपॅझा ह्याला वीस वर्षांची कैद देण्यांत आली. हा राजसैन्यांत लेफ्टनेंट होता. ऑर्सिनी डॉक्टर ह्यालाही तितकीच सजा झाली. कित्येकांना राजाचा परत हुकूम सुटेपर्यंत कैद झाली सरदार लोकांना कांहीं दिवसांनीं मुक्त करण्यांत आलें. ही सर्व अंदाधुंदी न्यायाच्या दिखाऊपणाला देखील झुगारून करण्यांत आली. चार्लस आल्बर्ट ह्याला रक्ताची तृषा लागली व त्याला रक्त पाजण्यांत आलें. कित्येक ठिकाणीं इतके भयंकर प्रकार घडले कीं ते वर्णन करण्याला लेखणीला कांटा उभा राहतो. उदाहरणार्थ असंख्य प्रकारांतून एक प्रकार देतों. व्होचिएरी ह्याला फांशीवर नेतांना त्यानें अशी विनंति केली कीं, फांशीकडे मला माझ्या घरच्या रस्त्यावरून नेऊं नये. घराच्या दारांशीं त्याचीं दोन अर्भकें, त्याची बहीण व त्याची बायको–तेव्हां गरोदर असलेली– हीं उभीं होतीं. म्हणून मला दुसऱ्या रस्त्यानें न्यावें असा तो आर्जव करूं लागला. परंतु राजाच्या आधारानें मांगाहून मांग बनलेल्या त्या फांशीच्या अधिकाऱ्यांनीं तें म्हणणें नाकारून त्याला मुद्दाम त्याच्या घरावरून नेण्यांत आलें त्याला फांशीकडे नेतांना पाहतांच त्याच्या बहिणीला वेड लागलें ! राजसत्तेचीं हीं क्रूर व अधम कृत्यें पाहून कोणाला पुन्हा गुलामगिरी व राजसत्ता पाहिजे आहे ? मला फार अभिमान वाटतो कीं, ज्या पक्षाचा मी अभिमानी आहे त्या पक्षाला जेव्हां जेव्हां जय मिळाला तेव्हां तेव्हां आमच्या लोकसत्तेनें आपल्या देशबंधूंच्या रक्तांत हात न भरवितां व असे राक्षसी सूड न घेतां आपलें नांव अदूषित ठेवून रोम, व्हेनिस, व नेपल्स येथें लोकसत्तात्मक पद्धतीचा झेंडा फडकविला आहे.

ह्या भयंकर प्रकारांची बातमी कळतांच माझे मनोविकार कसे झाले हें सांगत बसावेंसें मला वाटत नाहीं. मी फक्त घडलेल्या गोष्टी देत असून, माझ्या अंतःकरणाचा इतिहास लिहित बसलेला नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, हें सर्व ऐकूनही मला व माझ्या मित्रांनां असेंच वाटलें कीं, उठावणी करण्याची अवश्यकता व कर्तव्यता अजून कायमच आहे. कृतींत व बोलांत मेळ नसणें ह्या दुर्गुणानें इटलीला आजपर्यंत नागविलें आहे. राज्यक्रांतीचीं आम्हीं शिकवित आलों तीं तत्त्वें सर्वांना मान्य झालीं खरीं, पण

त्याच्या विजयासाठीं अवश्य तो स्वार्थत्याग व नेट मात्र अजून इटालियनांत उत्पन्न झाला नव्हता. ही कृतिपराङ्मुखता सुधारणें व आमच्या पक्षाच्या ह्या नीतिमत्तेची कड धरणें हें आमचें कर्तव्य होतें. आम्हांस असें सिद्ध करणें भाग होतें कीं, जेव्हां आपण एका मतावर व तत्त्वावर निष्ठा ठेवतों व लोकांच्या आयुष्याची जबाबदारी शपथपूर्वक रीतीनें आपले शिरावर घेतों, तेव्हां दिलेल्या वचनाप्रमाणें कृति करणें हें आपलें कर्तव्य आहे. मग वाटेल तीं संकटें येवोत, पण कितीही उदात्त किंवा उदार अशा व्यक्तिविषयक मनोविकारास झुगारून एकदां जें करतों म्हणून म्हटलें तें करणें आपणांस भाग आहे. आम्ही इटलीच्या बाहेर बंड उभारूं म्हणून वचन दिलें होतें. तें करूं म्हणून आम्हीं म्हटलें होतें तदर्थच तें करणें श्रेयस्कर आहे, असें आम्हीं ठरविलें. शिवाय झडपेसरशी उठावणी झाली असती तर जयाचा संभव होता. इतके लोक जरी फाशीं गेले व तुरुंगांत पडले, तथापि आमच्या प्रचंड तयारीचे मानानें खरा शोध असा फारच थोड्यांचा लागला. व जरी घाबरून, अनिश्चित होऊन व एक विचार सुटून आमचा पक्ष विस्कळला होता तरी त्याची संख्या फार होती, व एकदां उठावणीला आरंभ झाला असता कीं ते सर्व एकत्र होण्याचा अजून संभव होता. मी वर दिलेल्या जुलुमानें सर्वत्र संताप व भयंकरपणा उत्पन्न झालेला होता व आम्ही ठरल्याप्रमाणें आरंभ केलेला पाहताच आसपासच्या इटलींतील भागांवरही उठावणी होईल, असा आमचा पूर्ण भरंवसा होता. हा आमचा विश्वास बरोबर होता कीं नाहीं हें सांगण्यासाठीं मीं एकच गोष्ट देतों. आम्हीं उठण्याचा नक्की बेत केला आहे हें कळतांच, जिनोआमध्यें पुन्हां जमवाजमव सुरू झाली. पुन्हां तरुण लोकांना हुरूप चढला व शहरांत उठावणीला यश न येण्याचें मुख्य कारण तेथील तरुणांच्या अंगांत त्यांच्या शुद्ध स्वदेशप्रीतीबरोबर अनुभव नव्हता हेंच होय या दुसऱ्या उठावणींत ग्यारिबाल्डी प्रमुख होता. परंतु अपजय आल्यावर पळून जाण्याशिवाय आत्मरक्षणाचा दुसरा मार्ग त्याला उरला नाहीं ग्यारिबाल्डीची व माझी ओळख येथूनच झाली. तो "तरुण इटलीचा" सभासद होता. व त्याचे मंडळींतलें टोपण नांव बोरेल हें होतें. असो. असा विचार करून आम्ही उठण्याचा बेत नक्की केला. व मी मार्सेलिसहून निघून जिनिव्हा ( स्वित्झर्लंड जवळ ) मध्यें जाण्यासाठीं तयार झालों. तिकडे जाऊन ज्या प्रदेशांत आम्हांला तें कृत्य करावयाचें

होतें, त्या प्रदेशाची बारीक पहाणी केली. जिनिव्हाचें सरकार आपल्याच शेजारीं शस्त्रांची व सैन्याची तयारी करूं देणार नाहीं हें मी जाणून होतों. म्हणून मी दरबारांतील मोठमोठ्या व वजनदार लोकांचीं मनें वळविलीं. फेझी मला त्या वेळेस पूर्ण अनुकूल होता. अशा रीतीनें जिनिव्हाच्या सरकाराकडून होणाऱ्या अडथळ्याचें स्वरूप कमी करून मीं लोकांचीही त्या कृत्याला सहानुभूति असल्याची खात्री करून घेतली. वेळ येतांच ज्यांचा ज्यांचा उपयोग होईल असा संभव होता त्यांची त्यांची मी दाट ओळख करून घेतली. मी तेथें एक L'Europe Centrate नांवाचें पत्र काढलें व त्यांतून सॅव्हाय–ज्या प्रांतावर आम्हांला स्वारी करावयाचा तो प्रांत–स्वतंत्र करण्याच्या इच्छेचा लोकात फैलाव करूं लागलों. इकडे सॅव्हायमध्येंही गुप्त चळवळी चालविल्या. व गुप्त दळणवळण सुरू केलें. त्यावरून माझी अशी खात्री झाली कीं, जिनिव्हाचे सरकारविरुद्ध त्या प्रांतांतून सॅव्हाय जिंकून इटलीवर उतरतां येईल. सॅव्हाय जुलमाखालीं चिरडलें जात होतें व तेथेंही क्रांतीची इच्छा प्रबळ होऊं लागली. मी तेथल्या वजनदार नागरिकांच्या गांठी घेतल्या. थोनोन, बॉनेव्हिले, चम्बेरी वगैरे शहरांत लाकपुढाऱ्यांनीं मला जेव्हां विचारलें कीं, सॅव्हाय जिंकण्यांत जय आला तर मग आमच्या प्रांताची काय वाट करावयाची ? तेव्हां मी त्यांना सांगितलें कीं, इटलीला मिळावें किंवा फ्रान्सला किंवा स्वित्झर्लंडच्या संयुक्त संस्थानांना मिळावें हें ठरविणें सर्वस्वीं तुमच्या लोकांच्याच मर्जीवर राहील. तुम्ही स्वतंत्र झालांत म्हणजे काय पाहिजे तें ठरवा. मला वाटतें स्वित्झर्लंडला मिळावें.

सॅव्हाय प्रांतांत हे प्रयत्न करून इकडे सैन्य जमविण्यास आरंभ केला. पॉलिश, जर्मन व इटालियन हद्दपार देशभक्त एकत्र केले. या पॉलिश व जर्मन लोकांशीं एकवाक्यता केल्यानें इटलीचें कार्य व जर्मनी व पालंड ह्यांचें कार्य ह्यांत परस्परांत प्रेमभाव वाटूं लागला. यूरोपच्या स्वातंत्र्याचा आरंभ इटलीच्या स्वातंत्र्याबरोबर होणार अशी मला आशा वाटूं लागली. ' तरुण यूरोप ' ही कल्पना 'तरुण इटली' ह्या कल्पनेची जनयित्री आहे. व म्हणून इटली स्वतंत्र होतांच दुसरें तत्काल कर्तव्य म्हटलें म्हणजे यूरोप स्वतंत्र करणें हें होय. त्या यूरोपखंडाच्या स्वातंत्र्याचा झेंडा पहिल्यानें माझ्या इटलीच्या आल्प्स्च्या पर्वतावर फडकणार हें पाहून माझा आनंद गगनांत मावेना. दोनदां जिनें जगाचें नेतृत्व पत्करलें आहे, तीच माझी इटली तिसऱ्यांदा

जगाच्या स्वातंत्र्याची व लोकपक्षाच्या विजयाची नेत्री होणार. ही किती थोर कल्पना आहे ! तिनें मला मारून टाकिलें ! हें आमचें सैन्य हें यूरोपच्या संयुक्त संस्थानांच्या सैन्याचें बीज होतें. ही कल्पना पुढें ठेवताच जर्मन, पॉलिश वगैरे ढ्पार आम्हांस येऊन मिळालें. त्यांच्या कमेट्या केल्या. लष्करी रचना व डावपेंच शिकविण्याचे कामात मला बिआन्को वगैरे लष्करी लोकांनीं चांगली मदत केली. त्या वेळेस मी रहात होतों त्या जिनिव्हामधील वसतिगृहात इतर तरुण मंडळी एकत्र झाली. रफिनी अगॉस्टिनो, नायकोला फॅब्रिझी, युसिलियो लम्बार्टि व आणखी किती तरी तरुण देशभक्तांचें मंडल तेथें जमलें तें सर्व वसतिगृह आमच्याच ताब्यांत घेतलें. व तेथें पोलिसचा प्रवेश होईनासा झाला. सिआनीनें लॅम्बर्डीचे ( इटली ) जे श्रीमान लोक स्वित्झर्लंडमध्यें रहात होते, त्यांना वळवून नेहमीं मजकडे घेऊन यावें. गॅस्पेरी बेलक्रेडी हाही अत्यंत उमदा, मेहनती, कीर्तिसाठीं नव्हे तर कर्तव्यासाठींच झटणारा असा होता त्याच्या दीर्घोद्योगाला सीमा नव्हती. तो वैद्य होता. या गॅस्पेरी बेलक्रेडीचें नाव मी येथें मुद्दाम देतों. कारण हा अनंत परिस्थिति पालटल्या असतांही पालटला नाहीं. व आमच्या तत्त्वाशीं व माझ्याशीं शेवटपर्यंत इमानानें वागला. तो माझा एक प्रिय व विश्वासू मित्रहोता.

आम्हीं पैसे जमविण्याचा उपक्रम पुन्हां सुरू केला. गॅस्पेरी याच्या बोलांत व कृतींत अत्यंत मेळ असे. त्यानें पैशाची चांगली मदत केली. आम्हीं बेलजममधून शस्त्रें जमविलीं व काडतुसें वगैरे सर्व साहित्य तयार करण्यासाठीं सर्वजण आनंदानें व नेटानें कामास लागलों. सर्व व्यवस्था नीट चालली. परंतु तें कृत्य जितकें शक्य तितकें लवकर करण्याची आवश्यकता होती. परंतु याच वेळीं इटलीमधल्या ज्या गुप्त मंडळ्यांनीं पैशाची मदत देण्याचें कबूल केलें होतें. त्यांनीं अशी एक अट लावावयास आरंभ केला कीं, त्या योगानें कार्याचा सर्वस्वीं नाश जरी न झाला तरी सपाटून व्यत्यय उत्पन्न व्हावा. ती अट म्हणजे ही होय कीं, त्यांनीं कोणचें तरी जबाबदार नांव पाहिजे आहे असा हट्ट धरला. स्वारीच्या नेतृत्वासाठीं कोणी तरी नावाजलेला लष्करी अंमलदार असला पाहिजे. त्याच्या अंगीं नुसती योग्यताच नव्हे तर त्याच्या नांवाचें लोकात वजनही पाहिजे आहे. याच वेळेस सेनापती रमोरिनो हा पोलंडमधून परत आला होता. वास्तविक पहातां त्याचें पोलंडमधील वर्तन लोकपक्षाला विशेषसें रुचलें नव्हतें. तथापि फ्रान्समध्यें परत

आल्यावर त्याचा जंगी सन्मान करण्यांत आला. शिवाय त्याचें जन्मस्थान सॅव्हाय प्रांत हाच असल्यानें तेथें त्याचें फार वजन असे. शिवाय जिनोआमध्यें त्याची आई असे. तेथेंही विशेषतः सर्व इटलींत गुलामगिरींत पडलेल्या लोकांना त्यांच्याच पैकीं एकाचा परस्थाकडून पवित्र कार्यांत झालेला सन्मान पाहून साहजिकच वाटणारा अभिमान वाटत होता. पण यापेक्षां जास्त काळजी कोणी घेतली नाहीं. शेवटीं असें ठरलें कीं, मी त्याची भेट घ्यावी व रमोरिनो ह्यास स्वारीचें आधिपत्य द्यावें.

या बेताचे विरुद्ध मी शक्य तितकी तक्रार केली. पॉलिश लोकांतील श्रेष्ठ हद्दपार देशसेवकांकडून व रमोरिनोच्या लष्करी डावपेचाचें मी जें सूक्ष्म निरीक्षण केलें त्यायोगानें इटलीच्या प्रांतिक मंडळाचे उलट माझें मत झालेलें होतें मी त्यांना पुनः पुनः सांगितलें कीं, नवीन परिस्थितीला नवीन माणसें पाहिजे असतात. हें तत्व आपण आजपर्यंत शिकवीत आलेलों आहोंत. नवीन परिस्थितींना नवीन माणसें लागतात. प्रत्येक महत्वाच्या क्रांतीमध्यें धाडसाच्या प्रसंगांनीं माणसें निर्माण केलीं, माणसांनीं प्रसंग घडविले नाहींत, हें आपल्या ध्यानांत येईल. मी त्यांना समजावून सांगितलें कीं, आपल्या हातीं असलेल्या कामांत दोन भाग असतात. पहिला उठावणीचा व दुसरा त्याच्या नंतर जुंपणाऱ्या लढाईचा, यांपैकीं हा पहिला उठावणीचा भाग ज्यांनीं तो जुळवून आणिला त्यांच्याच हातांनीं पार पडणें इष्ट आहे. एकदां यात जय झाला कीं मग जरी आपण वाटेल तो पुढारी नेमला तरी त्याला आपला कार्यक्रम फिरवितां येणें अशक्य होईल. म्हणून मग त्या वेळेस आपण एकादा जुना सेनापती आणूं. परंतु या सांगण्याचा कांहीं उपयोग होईना. तत्वाच्या बलापेक्षां व्यक्तीचे इभ्रतीवर जास्त विश्वास ठेवणाऱ्याना तें कसें रुचणार! त्यांनीं मला कळविलें कीं, रमोरिनो असला तरच आपण उठूं. मी तरीही नेट धरला असता. परंतु माझ्या लक्ष्यांत आलें कीं, माझ्या सर्व आक्षेपाचा विपरीत अर्थ केला जात आहे. मी माझे एकट्याचेच हातात मुलकी व लष्करी ह्या दोन्ही सत्तांचें पुढारीपण एकत्र ठेवण्यासाठीं काय तो धडपडतों आहें व रमोरिनोला न बोलाविण्यांत व्यक्तिविषयक महत्वाकांक्षेशिवाय माझा दुसरा कांहींही हेतु नाहीं अशी त्यांची समजूत झाल्याचें मला स्पष्ट दिसूं लागलें. मी महत्त्वाकांक्षी आहें! अजून ते जिवंत आहेत कीं ज्यांनीं हा माझ्यावर आलेला आरोप जेव्हां मला पहिल्यानें कळला तेव्हां माझ्या हृदयातलें

काहूर व डोळयांतले अश्रुबिंदु पाहिले आहेत. मी इतका निरपराधी होतों कीं, असला आरोप मजवर लादला जाईल याची कल्पना देखील मला शिवली नव्हती. तथापि महत्कृत्यासाठीं पवित्रतम उद्देशानें व दुसऱ्यांवर पूर्ण निष्ठा ठेवून जे आपलें सर्व आयुष्य वाहतात त्यांच्याच कपाळीं अविश्वास, लोकनिंदा व लोककुशंका ह्या लिहिलेल्या असतात. हें माझ्या भावी आयुष्यांत कळून येणारें सत्य तेव्हां मला पहिल्यानें किंचित् कळूं लागलें. व आतां तर ह्या आयुष्याला त्याचा पूर्ण अनुभव आलेला आहे. असो. मी हटतें घेतलें–मला वाटतें ही मीं चूक केली–व रामोरिनोला बोलाविलें. त्यानें आमचा सर्व बेत सूक्ष्म रीतीनें ऐकून घेतला व तें पुढारीपण स्वीकारलें. आमचा असा बेत ठरला कीं, स्वारीच्या सैन्याचे दोन भाग करावयाचे. पहिल्याची पूर्ण व्यवस्था करावयाचें मी अंगावर घेतलें व तो भाग जिनिव्हाहून निघावा असें टरलें. दुसरा भाग रामोरिनोनें तयार करावा, व त्यानें लायनहून निघावें. कारण तो म्हणाला कीं, लायनमध्यें आपलें फार वजन आहे. त्यानें सैन्याची रचना करण्यासाठीं अगदीं अवश्य म्हणून प्रथम चाळीस हजार फ्रँक मागितले व मीं ते त्याला दिले. १९३३ च्या आक्टोबरमध्यें आम्हीं उठावणी केलीच पाहिजे असें ठरविलें. व तो घाइघाईनें निघून गेला. जातांनां त्याच्या सेक्रेटरीच्या जागीं आम्हीं एका तरुण मॉडेनीज ( इटली ) ची नेमणूक करवून घेतली. हा तरुण मॉडेनीज माझा फार विश्वासाचा होता व त्यानें रामोरिनोच्या हालचालीची सगळी बातमी कळविण्याचें पत्करिलें होतें.

ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेच्या आधीं माझ्या बाजूच्या सैन्याची सर्व तयारी पूर्ण झाली होती. परंतु रामोरिनोची कांहींच वार्ता कळेना. मीं त्याला पत्रावर पत्रें टाकलीं, पण सर्वत्र शून्यता. माझ्या विश्वासू मॉडेनीजनें रामोरिनोची सर्व हकीकत कळविली. तो जुगार खेळण्यांत गुंतला होता. त्यानें पैसे उधळून टाकले. व सैन्याच्या तयारीचें तो नांव घेईना. मी त्याच्याकडे माणसें धाडलीं. तो पारिसला गेला होता तिकडे कांहीं लोक धाडले, अखेर एकसारखा लकडा लावल्यावर रामोरिनो म्हणूं लागला कीं, अनंत विघ्नें आल्यानें मध्यंतरी त्याला कांहीं करतां आलें नाहीं, तथापि थोडी मुदत मिळावी. आम्ही नाइलाजानें नोव्हेंबर महिन्यापर्यंत मुदत दिली. परंतु नोव्हेंबरही निघून गेला. डिसेंबरमध्यें अखेर निरोप आला कीं, हजार लोकांनां जमविण्याचें जें वचन त्यानें दिलेलें होतें त्यापैकीं पुरते शंभर देखील तयार करतां आले नाहींत.कारण असें सांगितलें गेलें

कीं, पारिलच्या पोलिसांनां ती वर्दी लागली व त्यांनीं रामोरिनोला प्रश्न केले. व त्याच्या प्रत्येक कामांत अडथळा येऊं लागला. असें कांहीं तरी सांगून त्यानें मीं दिलेल्या ४०००० फ्रँक पैकीं १०००० कायते परत केले. मला खरें कारण मागाहून असें कळलें कीं, फ्रेंच सरकारनें त्याचें सर्व देणें देऊन टाकण्याचें अंगावर घेतल्यानें रामोरिनो यानें आमचे बेत विस्कलित करण्याचें काम पत्करिलें होतें. या सर्व गडबडींत योग्य संधि निघून गेली. इटलीमध्यें आमच्या पक्षांतील कांहींकांनां शिक्षा झाल्या, बाकीचे भीतीनें दबले व सर्वत्र निराशा पसरली. इकडे ज्या शेकडों पॉलिश, जर्मन, स्विस वगैरे शिपायांनां स्वारीचा बेत कळलेला होता त्यांच्यांत गुप्तता फार वेळ राहणें अशक्य झालें. शेंकडों पोलिस जिनिव्हाला येऊन उतरले. आमच्यावर गुप्त पहारा ठेवला गेला. व जिनिव्हाचे सरकारला आम्हां परक्या हद्दपार देशभक्तांना काढून द्यावयाचा नेट लागला. मग आम्हीं आमची मंडळी जवळ जवळच्या अंतरावर वांटून ठेवली. पण आमच्यापासून दूर गेल्यानें त वारंवार मुदत लांबल्यानें ते कंटाळून गेले. त्यांनां कायम जुळवून ठेवण्यासाठीं पगार सुरू केला. तो आयत्या वेळेसाठीं ठेवलेला सर्व खजिना संपून चालला. अशा विलक्षण पेंचांत आम्हीं पडलों. शिवाय इतरत्र हद्दपार झालेले लोक आम्हांस उठावणी लवकर न केल्यास आपण सोडून चालते होऊं किंवा एकटेच उठूं, असे निरोपावर निरोप धाडूं लागले. फ्रेंच सरकारनें जे पॉलिश हद्दपार परत येऊं इच्छितील त्यांना पैसे, माफी व मदत देण्याचे जाहिरनामे काढले. त्यांना अडकावून ठेवण्याकरतां पुन्हां पगार वाढवावे लागले. व ही सर्व गैरव्यवस्था चालली असतांही मला खरें सांगण्याची चोरी झाली. इटलीमध्यें सर्वांची समजूत पक्की झालेली होती कीं, रामोरिनो हा सेनापति होणार व तो झाला तरच उठावयाचें. बरें, त्यांनां सांगावें कीं, रामोरिनो येत नाहीं, तर त्यांचें धैर्य गळावयाचें. बरें, त्यांना वाटूं लागणार कीं, हें कार्य अशक्य आहे म्हणूनच रामोरिनो सोडून गेला. रामोरिनोचें दुर्वर्तन मीं सांगितलें असतें तरी तो प्रतिस्पर्धी नको म्हणून त्याला काढण्यासाठींच मी ही खटपट चालविली आहे असा संशय यावयाचा. व तो न येऊं देण्यास मजजवळ रामोरिनोच्या दुर्वर्तनाचा लेखी पुरावा नव्हता. व या सर्व अडचणी जणूं काय थोड्याच होत्या म्हणून एक नवीन अडचण उत्पन्न झाली. बोनारोटी हा इतका वेळ माझ्याबरोबर एकमतानें काम करीत असतां आतां एकदम विरुद्ध जाऊं लागला. व

उठावणी करण्याचे विरुद्ध प्रयत्न करूं लागला. तो जातीचा फ्रेंच, त्याची सर्व भिस्त पारिस शहरावर. पारिसच्या बाहेरच्या जगावर त्याला बिलकूल विश्वास नसे. इटालियनांनीं बंड तें काय करावें अशी त्याला घमेंड वाटूं लागली. पण तो मला सोडून चालता झाल्यानें फार हानी झाली. कारण, माझ्या सैन्यांत जे स्विस होते ते सगळे कारबोनारी संस्थेतलें होते व तो त्यांचा पुढारी पडला. अशा रीतीनें माझा सगळा बेत ढांसळला. या अशा अनंत अडचणींत व नवीन नवीन संकटांत मी कसा धीर धरीत गेलों हें माझें मलाच समजत नाहीं. त्या वेळेस माझें युद्ध म्हणजे अन्टीयस राक्षसासारखें होतें. ( या राक्षसास असा वर होता कीं, तो भुईवर आला कीं त्याची शक्ति पुन्हां वाढावी. याप्रमाणें जों जों तो जमिनीवर आपटला जाई तों तों जास्त प्रबळ होऊन उठे. अखेर त्याची ही शक्ति हर्क्युलिसच्या ध्यानांत आली व त्यानें अन्टीयस ह्याला हवेंतल्या हवेंतच चिरून टाकला.) या अन्टीयसप्रमाणें मी पडतों न पडतों तोंच पुन्हां दुप्पट जोरानें वर उसळत असें. मी स्विस लोकांपैकीं प्रत्येकाला भेटलों व बोनोरोटीच्या वजनाचा नाश करून पुन्हां त्यांना माझ्या पक्षास वळविलें. मीं ताजा फंड जमविला. लायनमध्यें फ्रेंच सरकारला गुंतवून ठेवण्यासाठीं उभारणी करण्यास रोसेल्स, निकोलो, वगैरेनां नेमलें. पण इतक्या अडचणी आल्या असतां स्वारी करण्याचें सोडावें असें मीं कां ठरविलें नाहीं ? स्वारी करावयाचीच अशा हट्टास मी कां पेटलों ? कारण इटलीमध्यें वाट पहात बसणाऱ्या आमच्या तरुण मंडळाला सॅव्हाय मधल्या लोकांना, फ्रेंचलोकसत्ताकवाद्यांना, इटलीच्या हद्दपार देशभक्तांना व सर्व जगाला स्वारीचे बेत स्वप्नवत् होत असें एकदम कळविणें म्हणजे मी ज्या पक्षाचा अभिमानी आहे व जो पक्ष मला सत्य वाटत आहे त्या पक्षाला कलंक लावल्यासारखें झालें असतें. स्वारी बंद ठेवणें ! त्यापेक्षां लढतां लढतां स्वदेशार्थ देह ठेवून आपल्यामागून येणाऱ्या देशभक्तांना एक अनुकरणीय उदाहरण तरी कां घालून देऊं नये ? शिवाय एखाद्या महत्कृत्याच्या धुरीणत्वाचे जागीं माझ्या वाचकांपैकीं जे कोणी असतील, त्यांना हें ठाऊक असेल कीं, महत्कृत्यें एकदां थोड्याशा आकाराला आलीं कीं, कांहीं वेळानें तीं आपल्या पूर्वीच्या धुरीणांचेच धुरीण होतात. व त्यांना सोडून चालतें होणें हें अशक्य होतें. या नवीन अडचणीची व्यवस्था लावण्यांत सर्व नोव्हेंबर व दिसेंबर निघून गेला. सैन्यांत इतका अविश्वास माजत चालला होता व

आमचें द्रव्यबल इतकें संपुष्टांत आलें होतें कीं, उठावणीला एकदम आरंभ केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. म्हणून जानेवारीची अखेर ही उठावणीची नक्की वेळ ठरवून लायनमध्येंही त्याच वेळेला उठावणी करावी हें नक्की केलें. मी पुन्हां रामोरिनोला लिहिलें कीं, आम्हीं आतां जानेवारीच्या विसाव्या तारखेस उठणार हें निश्चित आहे. तेव्हां पूर्वीं जरी नाहीं तरी त्यांनीं आम्हांस निदान आयत्या वेळेस तरी येऊन मिळावें व सेनापतित्व स्वीकारावें. त्याचें उत्तर येण्याच्या पूर्वींच मी सर्व तयारी करून ठेविली. नक्की दिवस व कोठून कोठून निरनिराळया तुकड्यांनीं निघावयाचे त्या जागा हें सर्व निश्चित केलें धान्याचा पुरवठा, निरनिराळे मार्ग, दळणवळणांची साधनें वगैरे सर्व ठरवून टाकली. जिनिव्हाचे सरोवराचे कांठावर शस्त्रागारें करून ठेवलीं होतीं व फ्रेंच व रामोरिनो येतांच त्यांच्यासाठीं बोटींचीं तयारी करून त्यांनीं एका ठरलेल्या स्थळीं जमावें व त्या शस्त्रागारांतून शस्त्रें घ्यावीं व जे खुद्द जिनीव्हाहून निघतील त्यांनींही त्याच ठिकाणीं येऊन रामोरिनोला मिळावें हा बेत होता बंडाचें मुख्य ठिकाण सेंट ज्युलिएन हें ठरविलें होतें. तें ताब्यांत घेण्याइतकें सैन्य आम्हांपाशीं होतें. तेथून सॅव्हायमध्यें बंडे एकदम व्हावी म्हणून माणसें धाडलेलींच होती. मला असें वाटत होतें कीं, रामोरिनोनें मी उठावणीनंतर तुम्हांस मिळेन असें कळविलें असतां फार बरें होईल. पण त्यानें मी आयत्या वेळेसच येतों असें कळविलें. ह्या योगानें आणखी नाश झाला. कारण पुन्हां उशीर लागूं लागला. तो मलाच थांबावें म्हणून निरोप धाडूं लागला. अखेर दोघां जनरलांसह तो एकदांचा जानेवारीच्या २१ तारखेला आला. त्याच्या तोंडावर ओशाळेपणाची छटा दिसत होती. माझ्याशी बोलत असतां त्यानें वर डोळा केला नाहीं. त्या वेळेपर्यंत त्यानें फ्रेंच सरकाराशीं आमची तयारी विस्कळून टाकण्याचा केलेला करार मला माहीत नव्हता. तरी मला त्याच्यांत विश्वासघात करण्याची इच्छा आढळून आली. मी नेहमीं त्याच्याजवळ असावें व सेंट ज्युलिएनला येतांच त्याच्या हातीं अधिकार जाऊं न देण्याचा शक्य तर प्रयत्न करावा, असें मी ठरविलें. कारण, मला अशी खात्री होती कीं, एकदां उठावणी झाली कीं, मग आमच्या पक्षाचे सामर्थ्यावर लोकांचा भरंवसा बसेल व मग लोक रामोरिनो वगैरेच्या व्यक्तिविषयक इभ्रतीवर अवलंबून राहणार नाहींत. मी मागच्या कृत्यांचा बिल्कूल उल्लेख केला नाहीं. मी आमच्या सैन्याची याद व हालचालीचा कार्यक्रम त्याचे स्वाधीन

केला. मी त्याला अधिकाऱ्यांच्या नेमणुकी पसंत आहेत का म्हणून विचारलें त्यानें प्रत्येक गोष्टीला अनुमोदन दिलें, पण सेनापतीचा अधिकार ताबडतोब आपल्याकडे दिला जावा असें तो म्हणूं लागला. मी त्यांस विरुद्ध गेलों व तुमच्यावर तसें केल्यास फार जबाबदारी पडेल असें दिखाऊ कारण कळविलें. परंतु तो व ज्यांचा व्यक्तिविषयक नांवावर भरंवसा होता ते ऐकेनात. त्यानें लगेच आपले पुढ्यांतले कांहीं अधिकारी नेमले. मी जनरल ज्यूफरबरोबर त्याला एका बाजूला नेऊन पुन्हां सर्व हालचाली निरीक्षण करून ठरवून घेतल्या व अखेर एकदांचें निघावयाचें ठरवून मी परत आलों.

ता. १ फेब्रुवारी या दिवशीं आम्हीं निघालों. जिनिव्हाच्या सरकारनें मला वाटलें होतें त्यापेक्षां ज्यास्त जोराचा अडथळा केला. आमच्या बोटी पकडून ठेवण्यांत आल्या. मी रहात होतों त्या वसतिगृहाला शिपायांचा वेढा बसला. आमचीं माणसें विलक्षण टोपी घातली म्हणून, हत्यार घेतलें म्हणून, वाटेल त्या संशयावर पकडण्यांत आलीं परंतु आम्हीं एकसारखी मेहनत करून तेथील सर्व लोकांनां आमच्या बाजूस वळविलेलें होतेंच. ते लोक आतां पुढें आले व शिपायांच्यामध्यें व अधिकाऱ्यांच्याहीमध्यें आमचोविषयीं सहानुभूति असल्यानें ते नागरिकांच्या दबकावणीसरशीं आम्हांस त्रास देण्याचें बंद करते झाले. आमचीं सर्व माणसें ठरलेल्या ठिकाणीं जमूं शकलीं. त्यांनीं आपापलीं हत्यारें घेतलीं. तें सर्व सैन्य सरोवर उतरून जाई तोंपर्यंत मी मागें राहिलों व रात्रीं रफिनी व आणखी एका दोघांसह ज्या बोटीला निरुपयोगी म्हणून टाकण्यांत आली होती त्या बोटीनें परतीराला आलों.

परंतु भयंकर आशाभंग व फसवणूक आमचे नशिबीं लिहिलेली होती. आमच्याबरोबर जे जर्मन हद्दपार होते त्यांच्या अवसानाला पारावर नाहींसा झाला. त्यांनां त्या कार्याचें खरें कठिण स्वरूप कळलें नाहीं. ते उघड रीतीनें लढाईच्या ऐटींत चालूं लागले. परंतु वाटेंत स्विस सरकारचे भागांतून जावयाचें होतें. त्या सरकारनें हें पाहतांच ते कोणीकडे जात आहेत हें ताडिलें व त्यांच्यांत फाटाफूट केली. कांहींनां वेढून टाकलें, कांहींना पळवून लाविलें व कांहीं तितक्याही संकटांतून वाट काढीत काढीत आम्ही मार्गप्रतीक्षा करीत उभे होतों त्या ठिकाणीं आले. पण फार उशीरां आले. इकडे रामोरिनोचें पॉलिश सैन्य जेव्हां सरोवर उतरूं लागलें, तेव्हां आणखी एक अक्षम्य चुकी करण्यांत आली. सर्वांची शस्त्रें काढून घेऊन तीं एकाच बोटींत

घालण्यांत आली. सरकारी पोलिसनें आधीं ती बोट पकडली व मग सहज-रीतीनें त्या पॉलिश शिपायांनां कैद केलें. अशा अनेक युक्त्यांनीं आमच्यापैकीं तीन चतुर्थांश माणसें कमी झालीं व याहून महत्वाचें संकट म्हणजे रामोरिनोला जी पाहिजे होती ती तक्रारीला जागा करून दिली गेली. वास्तविक पहातां ज्याला उठावणी करून जय मिळविण्याची खरोखरी इच्छा व क्रांति-युद्धाची प्राथमिक माहिती तरी आहे त्याला आमची स्थिति स्पष्ट कळून आली असती. त्या कमी झालेल्या सैन्यानें देखील आम्हांला सेंट ज्युलियन शहराचा ताबा घेतां आला असता. कारण, आम्ही येत आहोंत असें पाहून व शहरचें संरक्षण करण्याची हिंमत गळून शत्रूचें सैन्य तें शहर सोडून आधींच निघून गेलें होतें व पुढें जाऊन बसलें होतें. ही फार सुदैवाची व महत्वाची गोष्ट घडून आली होती, एकदां सेंट ज्युलियनला जाऊन आम्ही पोंचलों असतों कीं, ताबडतोब ठिकठिकाणीं खूण होण्याची वाट पहात बसले-ल्यांनां उठण्याचा इषारा दिला असता व मग आमच्या सैन्याची कमतरता एक क्षणभरही टिकली नसती. शिवाय आधींच आमच्या बाजूला असलेल्या जिनिव्हाचे लोकांनां आमचें हें कृत्य पाहून जास्त हुरूप येता व आमचें त्या सरकारनें अडकवून ठेवलेलें सर्व सैन्य सोडून देणें त्यास भाग पडलें असतें व तें बाकीचें सैन्य आम्हांस लवकरच येऊन मिळतें. म्हणून रामोरिनोला सेंट ज्युलियन शत्रूंनीं सोडून दिल्याची महत्वाची खबर मुद्दाम कळविण्यांत आली. व आतां तरी त्यानें आपलें वचन पाळावें व त्याला माझ्या प्रति-स्पर्धेची यत्किंचितही शंका येण्यास जागा राहूं नये म्हणून मी ताबडतोब एक मस्केट बंदूक घेतली व सैन्यामध्यें जाऊन साधारण शिपायांच्या रांगेंत उभा राहिलों. परंतु रामोरिनोनें सरोवरावर लोक पकडले हें ऐकतांच पूर्वींचा सर्व कार्यक्रम सोडून दिला व त्या सरोवराचे कांठाकांठानें एकसारखे चोवीस तास फिरत फिरत घालविले. सैन्याला कांहींच उमज पडेना. निराशेनें ते वेडे झाले व अखेर सर्व नाश झाला. ती रडकथा मी येथें सांगत बसत नाहीं. फक्त माझ्यासंबंधीं तेवढी हकीगत देतों.

या स्वारीच्या जुळवाजुळवींत मी माझ्या देहाला न झेंपेल इतका त्रास दिला होता. गेल्या तीन महिन्यांत मी एकसारखा राबत होतों. ह्या शेवटच्या आठवड्यांत मी एकही रात्र अंथरुणावर काढली नाहीं. बिछान्याला म्हणून शिवलों नाहीं. खुर्चीवर दहा पंधरा मिनिटें एखादुसरी डुकली येईल

तेवढी कायती झोंप. त्यांतही त्या निरनिराळ्या काळज्या, अविश्वासाची भीति, विश्वासघात होणार याबद्दल झालेली खात्री,परंतु इतरांना उत्तेजन यावें एतदर्थ वरवर उत्साह दाखविण्याचें अतिशय त्रासदायक काम, दरक्षणीं अनपेक्षित रीत्या होणाऱ्या फसगती व त्या कार्यानें शिरावर आलेली भयंकर जबाबदारी या सर्व गोष्टींच्या भाराखालीं माझें शरीर व माझें मन हें खचून चिरडून जाऊं लागलें. मी बंदुक घेऊन शिपायांत जेव्हां शिरलों, तेव्हांच मला ताप भरला होता व आजूबाजूच्या शिपायांनीं धरल्याशिवाय मला उभें राहण्याचीही शक्ति नव्हती. त्या रात्रीं भयंकर थंडी पडलेली होती. व निष्काळजीपणानें मी माझा झगा घरीं विसरलों होतों. इतक्यांत कोणी माझ्या अंगावर झगा घातला खरा, पण मागें वळून त्याचे आभार मानण्याचीही माझे अंगांत ताकद उरली नव्हती, मधून मधून माझ्या ध्यानांत यावें कीं, आपलें सैन्य ठरल्याप्रमाणें सेंट ज्युलिएनकडे चाललें नसावें. असें वाटतांच मीं सर्व शक्ति एकटून रामोरिनोकडे धांवत गेलों व त्याला आयत्या वेळेस हालचाल भलत्याच रीतीनें न करण्याविषयीं कळकळून विनंती करूं लागलों. त्यानें डौलानें व अगदीं निक्षून पुन्हां पुन्हां म्हणावें कीं, थोड्याच वेळांत आपले पॉलिश लोक येतील तोंपर्यंत सरोवराचें कांठींच आपण हिंडूं. मला इतकें पूर्ण आठवत आहे कीं, मी त्याला शेवटची विनंती करीत असतां व तो ती नाकारीत असतां आमच्यापैकीं कांहीं शिपायांनीं बार काढले. ईश्वरानें अखेर निर्णयाचा क्षण आणला असें वाटून मी उत्साहानें बंदुकीच्या ठिकाणाकडे धांवलों व बंदुक घेऊं लागलों. यानंतर मला कांहीं एक आठवत नाहीं. माझ्या डोळ्यांना अंधेरी आली व वायूचा झटका येऊन मीं जमीनीवर धाडकन् पडलों.

वायूच्या लहरी मधून येत व मी किंचित् शुद्धीवर येई व पुन्हां बेशुद्ध होई. या किंचित् शुद्धीमध्यें मला ग्युसेपी लॅम्बर्टि विचारी, "तूं काय घेतलें आहेस?" त्याला व माझ्या इतर कांहीं मित्रांनां हें ठाऊक होतें कीं, सदोदित धरलें जाण्याची भीति असल्यानें व धरलों गेलों तर मजकडून कबुली घेऊन नांवें फोडविण्याकरितां मजवर अनंत जुलूम करण्यांत येतील ही खात्री असल्यानें मी माझ्याजवळ एक जालीम विष नेहमीं लपवून ठेवीत असें.

परंतु त्याचा "तूं काय घेतलें आहेस?" हा प्रश्न ऐकून त्या अर्ध्या शुद्धीमध्यें मी निरालाच अर्थ घेतला. मला वाटलें कीं, तूं किती पैसे घेतलेस

व आपल्या मित्रांशीं विश्वासघात करण्याचें पत्करलेंस, अशा अर्थी तो मला विचारीत आहे. या कल्पनेबरोबर माझ्या देहाचा तिळपापड झाला व मला एक अतिशय जोराचा वायूचा झटका येऊन मी निचेष्ट पडलों. त्या स्वारींत हजर असलेल्यापैकीं जे अजून जिवंत आहेत, ते सर्व सांगतील कीं, मी लिहिलें आहे तें पूर्ण सत्य आहे. माझ्या आयुष्यांतील ती अत्यंत भयंकर रात्र होती. ज्यांनीं त्यावेळच्या माझ्या या स्थितीवर हास्यात्मक चुटके लिहिले व माझी चेष्टा करण्याचा प्रयत्न केला त्यांना परमेश्वर क्षमा करो !

माझ्या दुःस्थितीची रामोरिनोला बातमी कळतांच त्याच्या मार्गांतला मुख्य कांटा बाजूस सरला असें त्याला वाटलें. त्यानें आपला घोडा आणविला, सैन्यानें फुटून निघून जावें म्हणून जाहीरनामा वाचला व घोड्यावर बसून तो आपल्या घराकडे दौडत निघून गेला ! कार्लोबियान्कोला त्याच्या जागीं नेमण्याचा घाट सुरू झाला. परंतु त्या जबाबदारीपुढें तो कचरला. कारण सैन्य बहुतेक फुटत आलें होतें. तें सर्व पूर्ण विस्कलित झालें व आपआपल्या घरीं निघून गेलें.

मी शुद्धीवर आलों तेव्हां मला असें आढळलें कीं, आपण परक्या जातीच्या शिपायांनीं वेष्टिलेले असून एका लष्करी बराकींत आहोंत. माझ्या शेजारीं माझा मित्र अंजेलो यूसिग्लिओ हा बसलेला होता. मीं त्याला विचारलें " आपण कोठें आहोंत ? " " स्वित्झर्लंडमध्येंच आहोंत, " त्यानें दुःखानें उत्तर केलें. " व सैन्य ? " " तेंही स्वित्झर्लंडमध्येंच ! "

माझा ' तरुण इटली 'चा पहिला भाग येथें समाप्त झाला.

# भाग चवथा.

## आत्मचरित्र.

### खंड ३.

"I slept and found that life is beauty,
I woke and found that life is duty !!!"

'अथचेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिंच हित्वा पापमवाप्स्यसि ॥ १ ॥
सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ २ ॥'

'श्रीमद्भगवद्गीता.'

'तरुण इटली' च्या पहिल्या भागाचा शेवट अपजयांत झाला. पुढें काय करावयाचें ? या अपजयाला भिऊन व अपयशानें निरुत्साह होऊन स्वदेशोद्धाराच्या कार्यांतून मीं आंग काढून बाजूस सरणें ठीक होईल काय ? योग्य काळ आपण होऊन येई तोंपर्यंत किंवा मजहून श्रेष्ठ पुढारी मिळे तोंपर्यंत इटलीचें राजकारण सोडून देऊन मी माझ्या व्यक्तीच्या व्यवसायांत लक्ष घालावें काय ? माझ्या नैसर्गिक प्रवृत्तीला अनुकूल अशा विविध शास्त्रांच्या अभ्यासांत मग्न व्हावें काय ?

पुष्कळांनीं मला असेंच करण्याचा उपदेश दिला. त्यांच्यापैकीं कांहींची अशी खात्रीच झाली होती कीं, गुलामगिरीच्या घाणींत आज शेंकडों वर्षें इटली देश कुजत पडलेला असल्यानें आमच्या उदात्ततर लक्षाचें आकलन करण्याची त्याची ताकद नष्ट झालेली होती. आपल्याच स्वयंस्फूरित चळवळीनें तो कांहीं करील तर करील. बाकीच्यांनीं राजकारणांतून आंग काढून घेण्यास मला सांगितलें, तें अशासाठीं कीं, त्या स्वातंत्र्ययुद्धाचें तोंड लागतें न लागतें तोंच ते कंटाळून गेले होते. व आमच्या शिरावर लटकत असलेली जुलमाची तरवार आतां सुटून मानेवर येणार असें पहातांच त्यांची कंबर खचून गेली होती. आतां पुरे हें राजकारण व देशोद्धार, असें ह्मणून

ते आपल्या पोटोबाची पूजा बांधण्याच्या तयारीला लागूं इच्छीत होते. इतक्यांत सॅव्हायवरील स्वारीचा बीमोड झालेला ऐकून इटलीमध्यें अनर्थपरंपरा सुरू झाल्याची बातमी आली. मग तर कोणी मला तोंड काढूं देईना. धुगाऱ्या तिकडे उदव उदव करणाऱ्यांनीं आतां आमच्या दुर्दैवी पक्षावर शिव्यांचा भडिमार चालविला. इटलींतून निराशेशिवाय दुसरी बातमी येईना. पळापळी, विश्वासघात, कैद, फाटाफूट यांच्याविरहित दुसरें बोलणें नाहीं. इकडे स्विट्झर्लंडमध्यें ज्या लोकांनीं आह्मांला सहानुभूति दाखविली होती त्या लोकांना आमचा वीट येऊं लागला. जिनिव्हाचें सरकारला चहूंकडून आह्मांला हुसकून देण्याविषयींची पत्रें व निकराच्या आज्ञा येऊं लागल्या, व आतां आह्मीं पराभूत झालेलों असल्यानें त्या लोकांनीं, "त्रासदायक व परके कोठून तरी आले व आमच्या स्विट्झर्लंडच्या इतर युरोपियन सरकारशीं असलेल्या स्नेहसंबंधाच्या नाशास कारणीभूत होऊन नसती उठाठेव करीत बसले." असें ह्मणून आमची निंदा करण्यास आरंभ केला. त्या सरकारनें पकडापकडीचे हुकूम सोडले. आमची लष्करी सामुग्री पकडण्यांत आली. आमचा खजिना सगळा संपुष्टांत येत चालला. आमच्या भोंवतीं जमलेल्या हद्दपारांना पोटाला मिळण्याची पंचाईत पडून त्यांच्या हालांला पारावार नाहींसा झाला. निराशेचा व अडचणींचा कळस झाल्यानें आपसा आपसांत वाद व द्वेष सुरू झाला. उदासीनता व अंधःकार ह्यांनीं गुरफटून टाकलें. फ्रान्समध्यें लोकसत्ताक पक्षाची उठावणी यशस्वी होणार ह्मणून आश्वासनें जरी आह्मांकडे धाडलीं गेलीं तरी माझा त्यावर विश्वास बसेना व सर्व प्रकारच्या उपदेशांहून व संकटपरंपरेहूनही माझ्या मनाला रात्रंदिवस टोंचीत असलेलें कारण ह्मटलें ह्मणजे माझ्या वृद्ध मातेची आठवण ही होय. तिचें कसें होईल? जर एकाद्या विचाराला हार जाऊन माझा विश्वास ढळावयाचा संभव असला तर तो ह्या विचारांत होता!

परंतु ह्या बाह्य संकटांना भीक न घालणारें असें एक महत्तत्त्व माझ्या अंतःकरणांत निवास करीत होतें. माझा निसर्ग हा स्वयंस्वतंत्र असे. माझा आत्मा हा पराधीन झालेला नव्हता. तेव्हांपासूनच माझी अशी पक्की खात्री असे कीं बाह्य मायापाशाचें जाळें तोडून टाकून स्वतंत्र रीतीनें वागण्याचें सामर्थ्य मनुष्याच्या आत्म्यांत वसत आहे. मानवी आत्म्यानें बाह्योपाधींचें दास न बनतां त्या बाह्योपाधींनांच आपलें दास बनविलें पाहिजे. माझ्या ठायीं वसत

असलेलें चैतन्य हें बहिरंगांतून अंतरंगांत उतरलेलें नव्हतें, तर तें अंतरंगांतून बहिरंगांत संचारत असे. तें चैतन्य उसनें आणलेलें नव्हतें. तर तें निसर्गदत्त होतें. आह्मीं जें कांहीं कार्य हातीं घेतलेलें होतें तें केवळ प्रतिक्रियेचें कार्य नव्हतें किंवा आमची उठावणीही एखाद्या रोगी मनुष्यानें जागा बदलण्याकरितां केलेली हालचाल नव्हती. आह्मांस स्वतंत्रता पाहिजे होती. ती परवशतेची प्रतिक्रिया ह्मणूनच केवळ नव्हे, तर मनुष्याच्या उदात्ततर कर्तव्याची पूर्णता करण्याचें मुख्य साधन तीच असल्यानें ती मिळविण्यास आह्मीं प्रयत्न करीत होतों. आमच्या निशाणावर लोकसत्तात्मक राष्ट्रैक्याचीं महत्तत्त्वें झळकत होतीं. आमचा प्रयत्न कशासाठीं होता ? आमचा प्रयत्न नवीन राष्ट्र उत्पन्न करण्याचा, दोन कोटी लोकांना जिवंत करण्याचा, महन्मंगल प्रयत्न होता, अशा शुभ लक्ष्यास्तव झगडणाऱ्यांनां एकट्या दुकट्या पराजयाची पर्वा ती कसली आली आहे ? विपत्ति ह्या महत्कार्यांत महत्स्वरूपानेंच यावयाच्या. मग महद्विपत्तीमध्यें अचलासारखें अढळ धैर्य धरून उभें राहण्याचें शिक्षण आमच्या स्वदेशबंधूंनां देणें हें आमचें कर्तव्यच नव्हतें काय ? कर्तव्य सोडण्यापेक्षां स्वतःच त्या विपत्तींत धीरानें उभें राहून हें शिक्षण देण्याचा दुसरा योग्य मार्ग कोणचा असणार ? व जर आह्मीं आतां कचरलों तर राष्ट्रैक्याच्या अशक्यतेचें हें आणखी एक उदाहरणच ह्मणून शत्रूपक्षाला नवीन पुरावा मिळूं दिल्यासारखें होणार नाहीं काय ? इटली देशांत मुख्य दुर्गुण जो होता तो हाच होय की, तिला स्वातंत्र्याची इच्छा जरी होती तरी तें मिळविण्याची ताकद आपल्यांत आहे ही आत्मनिष्ठा नव्हती. चटकन् निराशा होत असे व ज्या सातत्याशिवाय सद्गुण देखील निष्फल होतात, तें प्रयत्नांचें सातत्य व ती श्रमांची चिकाटी हीं लोकांत आढळत नव्हती. लोकाच्या विचारांत व आचारांत एकवाक्यता नव्हती. स्वातंत्र्यप्रेम व तत्प्राप्त्यर्थ संकटें सोसण्यास अवश्य तो करारीपणा हे उत्पन्न करण्यास मुख्य साधन जी लेखणी ती उचलणें आतां अशक्य झालें होतें. कारण, इटलीमध्यें अशा प्रकारचे लेख पोलिस लोकांच्या वक्रदृष्टीला चुकवून प्रसृत करणें शक्य नव्हतें. तेव्हां आतां जिवंत शिक्षण देण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. निश्चयाचे महामेरू, निर्धाराचे निधि, निराशेला ज्यांनीं लाथाडलें आहे, जुलमी पाठलागाला ज्यांनीं भीक घातली नाहीं, उत्कट आत्मनिष्ठेच्या बळानें प्रत्येक पराभवांत ज्यांनां भावी

जयाचें स्मित आढळत आहे, जे उद्यां टप्पा घेऊन उसळण्यासाठींच आज पडून घेत आहेत, पुनरुत्पतनास्तवच पतन स्वीकारीत आहेत, जे धर्मयुद्धाला सदा सर्वदा कास कसून उभे आहेत व वाटेल ती विपत्ति येवो, वाटेल तितके पराजय येवोत किंवा वाटेल तितका काल लागो पण अखेर जयश्री ही आपल्यालाच वरणार आहे. अशा निष्ठेनें जे प्रफुल्लहृदय आहेत अशा नररत्नांचें मंडल हेंच इटलीला पुनरुज्जीवन देण्यासाठीं अवतरलें मूर्त शिक्षण होय. त्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. आह्मीं यःकश्चित् पक्षाभिमानानें उद्युक्त झालेलें नव्हतों, तर स्वदेशभक्तीच्या राष्ट्रधर्मांचे आह्मी दीक्षित होतों. जुलुमाला पक्षाभिमान मारतां येईल, पण धर्मज्योति कधींहि मालवितां येणार नाहीं.

माझ्या अंतःकरणावर सांचलेलें संशयाचें तमःपटल झाडून टाकून मी पुनश्च हरि ॐम् ह्मणावयास सुरवात केली.

इटलीमध्यें आह्मीं आजपर्यंत विणलेलें जाळें पार तुटत आलें होतें. अशा वेळेला थोडें दिवस पडूनच छपावयास पाहिजे होतें. कारण, आमच्या पक्षाला बसलेली दहशत त्या मुदतींत कमी होत जाती व विशेषतः आमच्या देशशत्रूंनां, आपणांस पुरता जय मिळाला व आमचा कायमचा नाश झाला अशी सुरक्षितता वाटूं लागून ते पुनः झोंपी जाते. परंतु इटलीमध्यें कांहीं न करण्याकरितां जी मुदत ठरवावी लागली तीमध्यें इटलीचें बाहेरचें पुष्कळ काम करितां येण्यासारखें होतें. आमच्या दुसऱ्या उठावणीला इतरत्र असणाऱ्या लोकसत्ताकवाद्यांचें पाठबळ व यूरोपच्या इतर देशांची सहानुभूति हीं अवश्यमेव पाहिजे होती व ती पैदा करण्याचा प्रयत्न या अवधींत करतां येण्याची संधि होती. १८३४ पासून १८३७ पर्यंत माझ्या चळवळी या धोरणानेंच चाललेल्या होत्या. आमच्या आजपर्यंतच्या लेखानें इतर देशांतही थोडासा परिणाम केलेला होता. सॅव्हायच्या धाडसी प्रयत्नाचें योगानें आमच्याजवळ परके हद्दपार देशभक्त बरेच गोळा झाले होते. ह्यांतील बहुतेक जर्मन व पॉलिश देशभक्त होते. व बाकीचे स्पेन, फ्रान्स, व इतर देशांतील होतें. यांच्यातील प्रमुखांत हॅरोहेरिंग ह्याची गणना आहे. हा खरा खरा लेखक व स्वातंत्र्यदेवीचा प्रेमळ एकनिष्ठ वारकरी होता. कारण, तो त्या देवतेसाठीं पोलंड, जर्मनी व ग्रीस येथील रणमंदिरांतून तिची उपासना करण्यास्तव रणनर्तन करीत आला होता. आमचा पाठलाग होऊन आम्हीं दशदिशांकडे

फाकले जाण्याचे आधीं या निरनिराळ्या देशांतील हद्दपारांत मी विश्वकुटुंबाच्या कल्पनेचें बीज पेरण्यास सुरवात केली. ह्या लोकसंघाच्या एकीकरणाची व सहकार्यतेची इच्छा सर्वत्र होती, पण ती अमलांत आणण्याचा मात्र कोणीही प्रयत्न केला नाहीं.

परंतु माझ्या विश्वकुटुंबित्वाच्या कल्पनेंत व कार्बोनारीच्या विश्वकुटुंबित्वांत फार महत्त्वाचा भेद आहे. त्यांच्या मतें मनुष्यसमाजाचीं दोनच रूपें आहेत. पहिलें व्यक्ति व दुसरें मनुष्यजाति. मनुष्यजातीचें अंतिम हित हें साध्य आहे. व व्यक्ति हें साधन आहे. परंतु माझ्या मतानें हीं दोनच रुपें मान्य करणें प्रशस्त नाहीं. मनुष्यजातीचें उच्चतम व अत्यंत हित करणें हें साध्य आहे ही गोष्ट मला कबूल आहे. परंतु त्या मानव्याच्या अंतिमतेचें साधन शक्ति आहे असें मानणें अपुरें होत आहे. व्यक्तीची कल्पना ही फार कोती कल्पना आहे. मानव्याच्या उच्चतम हितासारख्या महत्कार्यांची पूर्तता करण्यास व्यक्ति असमर्थ आहे. तिची शक्ति त्या कार्याच्या मानानें फारच अपुरी आहे. म्हणून तें मानव्याच्या अत्युच्च पूर्णतेचें साध्य साधण्यास व्यक्तीहून ज्यास्त सबळ असें हत्यार पाहिजे आहे. व तें हत्यार म्हणजे देश किंवा राष्ट्र होय. एकाच विशिष्ट तत्त्वानें, एकाच विशिष्ट मनःप्रवृत्तीनें व एकाच विशिष्ट अंतर्बहिर्गत रचनेनें समसमान असणाऱ्या शेंकडों व्यक्ति मिळून एक राष्ट्र होतें. व या विशिष्टत्वाच्या मानानें त्या राष्ट्रास एक विशिष्ट कर्तव्य प्राप्त झालेलें असतें. हें कर्तव्य करण्यास त्या राष्ट्रानें एकत्ररीत्या तयार झालें पाहिजे. म्हणजे एका व्यक्तीहून महत्तर कृत्यें पार पाडण्याची शक्ती एका राष्ट्रांत उत्पन्न होईल व मग हें सबलतर साधन योजिल्यास मानव्याच्या अत्युच्च पूर्णतेचें जें साध्य तें साधतां येईल. तेव्हां माझ्या मनाप्रमाणें मानव्याची पूर्तता हें साध्य, राष्ट्र हें साधन व व्यक्ति ही साधनसामग्री होय. कार्बोनारी ह्या राष्ट्राच्या कल्पनेला विसरली होती व म्हणून तिचें महत्साध्य तिला पार पाडतां येईना. व्यक्तीपासून आरंभ करून एकदम विश्वविचारावर उडी मारूं पाहणें शक्य नाहीं. लोकांच्या हृदयांतून स्वदेशाची कल्पना पार धुडकावून देणें, राष्ट्रीयत्व एकदम नाश करून टाकणें, परमेश्वरानें निरनिराळ्या जातींनां जीं विशिष्ट कर्तव्यें दिलीं आहेत त्यांचा घोंटाळा करणें, विश्वकुटुंबांत निरनिराळ्या राष्ट्रपुरुषांकडे आलेलीं विशिष्ट कर्तव्यें न जाणतां त्या सर्व राष्ट्रपुरुषांना विनष्ट करून—कोणत्या कोणाला ठाऊक—विलक्षण

एकी करण्याच्या मार्गें लागणें व ज्या सोपानपंक्तीनें पूर्णतम व अंतिम लक्ष्याकडे मनुष्यजातीला चढून जाणें शक्य आहे, त्या व्यक्ती, राष्ट्र व मानव्य या सोपानपंक्तीला मोडून तिचे तुकडे करणें म्हणजे अशक्य तें शक्य करूं पहाणें होय. प्रस्तुत युगांतील मुख्य कर्तव्य म्हणजे राष्ट्रकल्पनेची व मानुष्यतेची एकवाक्यता करावयाची हें होय. मनुष्यजातीच्या करारपत्रावर प्रत्येक व्यक्तीनें सही करावयाची नाहीं, तरी प्रत्येक राष्ट्रानें सही करणें शक्य आहे. तें राष्ट्र समान, स्वतंत्र व एका नांवाखालीं, एका निशाणाखालीं व एकाच विशिष्ट कर्तव्यासाठीं जमलेल्या व्यक्तींनीं बनलेलें असलें पाहिजे. व व्यक्तींनीं वरील गुणांनीं मंडित व्हावें अशी जर इच्छा असेल तर त्यांना राष्ट्रीयत्वाची व स्वदेशाचीच कल्पना समजावून दिली पाहिजे. प्रत्येक देशाला मानवी कुटुंबपूर्णतेचे कार्यांत एक विशिष्ट कर्तव्य करावयाचें असतें, तें कर्तव्य त्या देशाला स्पष्टपणें सांगितलें गेलें पाहिजे. हें कर्तव्य केल्याशिवाय राष्ट्र कधींही नामशेष व्हावयाचें नाहीं. फ्रेंच रेव्होल्यूशनपर्यंत व्यक्तियुग होतें. त्यांचा ' हक्क ' या तत्त्वापुढें प्रवेश झाला नव्हता. परंतु माझ्या मतानें आतां नवीन युग लागलेलें आहे. आतां व्यक्तियुग संपून राष्ट्रयुगाला आरंभ झाला आहे. व्यक्तींचा हक्क संरक्षण करणें हें कांहीं अंतिम साध्य नव्हे. व्यक्तीचा हक्क संरक्षण करणें हें साध्य धरल्यास मनुष्यांतील द्वेष कधींही विझणार नाहींत. हक्काचें तत्त्व पुढें ठेविलें कीं, आपमतलबीपणा उत्पन्न झालाच. म्हणून आतां 'कर्तव्य' हें तत्त्व पाळलें पाहिजे. आयुष्य हें हक्काच्या बजावणी करितां नसून तें कर्तव्यपूर्ततेकरितां आहे. हक्कांत स्वार्थाची कल्पना आहे. कर्तव्यांत परमार्थाची कल्पना आहे. कर्तव्य हेंच आयुष्याचें अंतिम आहे, ही गोष्ट राष्ट्रयुगांतील प्रधान तत्त्व होय. म्हणून व्यक्तींच्या हक्काचे ऐवजीं व्यक्तिकर्तव्याचें तत्त्व व व्यक्तियुगाचे ऐवजीं समष्टियुगाची कल्पना ही माझ्या मतानें लोकांस शिकविली जाणें भाग होतें.

तेव्हां मानवी जातीची अत्युत्कट उन्नति हें जें साध्य तें साधण्याचे कामीं आपआपलीं निसर्गनिर्दिष्ट विशेष कर्तव्यें बजावण्यास तीं कर्तव्यें ओळखून स्वतंत्र व समसमान व्यक्तींनीं एकीभूत झालेलीं निरनिराळीं राष्ट्रें एकदिलानें व एकवाक्यतेनें झटतील व परस्परांचे हितार्थ झटत झटत सर्व मनुष्यजाति उद्धार पावेल. हें माझें सारसर्वस्व होतें. व तें उपदेशिण्यासाठीं मी " तरुण यूरोप " ही संस्था काढण्याचें ठरविलें.

मध्यंतरीं आमच्या पाठलागाला भयंकर रीतीनें आरंभ झाला. जे हद्दपार देशभक्त आम्हांस मिळाले होते, त्यांस गुन्हेगारांप्रमाणें सरहद्दीपर्यंत पहाऱ्यांतून नेण्यांत आलें. व अमेरिकेकडे किंवा इंग्लंडमध्यें पाठविण्यांत आलें. कांहींनीं आपलीं नांवें बदलून लहान लहान खेड्यांमध्यें प्रवेश केला. या सर्वांपेक्षां आह्मां इटालियन देशभक्तांचा भयंकर रीतीनें पाठलाग सुरू असतांनांही आह्मीं सर्व निसटून गेलों. मी रफिनी व मेलेगारी यांसह जिनिव्हाहून निघालों. कांहीं दिवस लॉसेने येथें छपत छपत काढलें. पुढें बर्ने या गांवीं रहाण्याची स्विट्झर्लंडचे सरकारनें परवानगी दिली. मीं आमच्या हद्दपारांनां उत्तेजन यावें एतदर्थ एक लहानसें चोपडें लॉसेनला असतांनांच प्रसिद्ध केलें, त्यांतील कांहीं भाग खालीं देतों.

## हद्दपार देशभक्तांस पत्र.

" ते फक्त दोनशें देशभक्त होते. ते भक्त दोनशेंच होते, पण त्यांनीं सर्व यूरोपखंडाला चळचळ कांपविलें, यूरोपच्या राजांनीं त्या दोनशें जणांविरुद्ध जंगी कट केला. त्यांचें अवाढव्य सैन्य, सर्व यूरोपचे पोलिस लोक, हेर, प्रधानमंडळें, कारस्थानपटु हुकुमाचीं बाडें, तरवारीचे ढीग, या सर्वांना पुरून ते दोनशें देशभक्त उरले आहेत. यूरोपच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हे सर्व अधम राजे, ज्यांना परमेश्वर चांगल्या लोकांची खरी परीक्षा पहाण्यासाठीं या जगावर धाडीत असतो, ते हे नीच राजे व त्यांचे अम्मलदार आह्मांस शोधण्यासाठीं, हुसकून देण्यासाठीं, आमची निंदा करण्यासाठीं व आमच्यावर सूड उगविण्यासाठीं एकसारखे धडपडत होते. त्यांनीं हद्दपारांच्या शिकारीला आरंभ केला. सतत चार महिने गरीब स्विट्झर्लंडच्या सरकारापुढें रशिया, फ्रान्स, जर्मनी, वगैरे सर्व सरकारांकडून विनंतीच्या हुकुमांचे ढीगचे ढीग पडत होते. ' जमलेल्या हद्दपारांना हुसकून द्या, त्याची फळी मोडा. ' ही एकच आरोळी सर्व यूरोपभर उठली होती. सर्व यूरोप दोनशें देशभक्तांपुढें भयानें घाबरून गेलें. परंतु भयानें आंग लटलट कापत असतांना वरून वरून मात्र ह्या नामर्दांनीं केवढी ऐट दाखविली! त्यांच्या वर्तमानपत्रांतून लेख येऊं लागले कीं, हे हद्दपार देशभक्त शाळेंतून नुकतीच सुटलेलीं पोरें आहेत. जन्मापासून त्यांनां गुप्तकटांच्या व्यसनांची चटक लागलेली आहे. नीतीच्या अतिरेकानें ते मदांध झालेले आहेत. जें असाध्य तें

साध्य करण्यासाठीं आकाशाला गवसणी घालण्याच्या मागें ते लागलेले आहेत! त्यांना या व्यसनासाठीं चांगली चरचरीत शिक्षा दिलीच पाहिजे. पण अशा पोरासोरांचें भय बाळगण्याचें बिलकूल प्रयोजन नाहीं.

"ते तरुण होते? होय. होय. अर्थात ते तारुण्याच्या भरांत होते. जरी त्यांच्या भ्रुकुटीवर दुःखाची व गंभीर विचाराची छटा आलेली होती तरी ते तरुण होते. जरी आईच्या प्रेममय चुंबनापासून हिसडून घेऊन त्यांना अधम राजांनीं दूर झुगारिलें होतें, तरी ते तरुण होते. जरी कुटुंबप्रेमाच्या व गृहसौख्याच्या कोमल व प्रेमल सुखांस ते पारखे झालेले होते, तरी ते तरुण होते. तीं नवीन विश्वाचीं संतानें होतीं, तीं नवीन धर्माचीं बालकें होतीं. कारण, त्या नवीन विश्वानें व त्या राष्ट्रधर्मानें त्यांना जन्म देतांच त्या तरुणांपुढें वनवासाचा देवदूत आला. त्या नूतन बालकांत स्वार्थपराङ्मुखवृत्ति, आत्मार्पणक्षमता व तारुण्यशुचिता पाहून प्रसन्न होत्साता तो देवदूत त्यांना पवित्र व मधुर मंत्राच्या उच्चारानें विश्वप्रीतीची व तत्कालीन वृद्धांना अनाकलनीय अशा उच्च राष्ट्रधर्माची दीक्षा देता झाला.

"त्या वनवासी देवदूताच्या पंखाचा स्पर्श होतांच पावन झालेली ती त्या अभिनव बालकांची दृष्टी भविष्यकालांत घुसूं लागली. ज्ञात्यांच्या आंधळ्या दृष्टीला जें दिसणें अशक्य आहे तें त्यांच्या त्या दिव्य दृष्टीला दिसूं लागलें. यूरोपच्या गुलामगिरीचा प्रेतसंस्कार त्यांनां दिसूं लागला. गुलामगिरीच्या राखेचा ढीग दिसला त्या ढिगांतून विजयश्रीच्या प्रभेनें मंडित झालेलें दिव्य स्वातंत्र्ययुग उदय पावतांना दिसलें. राष्ट्रें पुनरुज्जीवित झालेली व आजपर्यंत परस्परांशीं भांडत बसलेले भिन्न भिन्न लोक एकत्र मिसळून सर्व मनुष्याजाति हातांत हात घातलेली व बंधुत्वानें, विश्वासानें, आनंदानें डुलत डुलत प्रगमनाकडे चाललेली अशी त्यांनीं पाहिली. सर्व राष्ट्रें नेमानें एकत्र झालेलीं आहेत. व त्यांच्यावर स्वातंत्र्याच्या, समतेच्या व मानुषतेच्या देवदूतांनीं आपल्या शुभ्र पंखांचें दिव्य छत्र धरलेलें आहे असें त्यांना दिसूं लागलें! भविष्याची परमसृष्टी त्यांना गोचर होती झाली. तें मागें वळले व त्या वनवासाच्या देवदूताला विचारूं लागले, या दिव्य युगाची प्राप्ती व्हावी एतदर्थ आह्मीं कोणचें कर्तव्य करावें? देवदूत म्हणाला—मी वनवासावरील अध्यक्ष आहे. तुह्मीं माझे मागें या. त्या दिव्य युगाच्या प्राप्तीसाठीं तुह्मांला माझेमागें आलें पाहिजें. मी तुम्हांला कर्तव्यशून्यतेच्या निद्रेंत घोरत पडलेल्या

राष्ट्रांतून नेतों. तुम्हीं त्यांना स्वोदाहरणानें शिक्षण देत चला. जुलुमानें गांजलेल्यांना व दुःखानें त्रस्त झालेल्यांना आनंदी करीत चला. तुम्हीं जगाचें कल्याण करीत चला. परंतु तुम्हांला मात्र कोणीही सुख देणार नाहीं. तुम्हीं ज्यांचे कल्याणार्थ झटाल तेच तुम्हांला उपेक्षेनें धिक्कारितील व लोकनिंदेचा तुमच्यावर भडिमार होईल. परंतु मी परलोकीं तुमचें दुःखपरिमार्जन करीन.

" हें शिरसावंद्य करून ते तरुण प्रवासाला निघाले. जानपदाच्या कर्णांत पवित्र मंत्रांचा उच्चार करूं लागले. जिकडून जिकडून गुलामगिरीच्या चरकांत चिरडले गेल्यानें फोडलेली शूर लोकांची आरोळी त्या तरुणांच्या अंतःकरणाला ऐकूं आली तिकडे तिकडे ते धांवत गेले. व जेव्हां जेव्हां हताश लोकांची रडकथा त्यांनीं श्रवण केली तेव्हां तेव्हां "उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्" या तत्त्वाचा उपदेश त्यांनीं दिला.

" व देवदूतानें भविष्य केल्याप्रमाणें लोकनिंदा ही त्यांच्या पाठीस हात धुवून लागली. त्यांच्या मार्गांत कृतघ्नतेशिवाय त्यांना दुसरें कांहीं आढळलें नाहीं. परंतु ज्या ज्या प्रदेशांत त्या महायात्रेनें आपली चरणधूलि झाडली ते ते प्रदेश त्यांच्या चरणांच्या मुद्रांनीं मुद्रित झालेच झाले. ज्या लोकांनीं त्यांची निंदा केली त्यांनाच आढळून आलें कीं, त्यांच्या राष्ट्रांत कांहीं आश्चर्यकारक फेर झालेला आहे. त्यांचें राष्ट्र पूर्वीपेक्षां निश्चयानें उदात्ततर झालेलें आहे. ही महायात्रा निघाल्याची बातमी यूरोपच्या राजांना कळली मात्र तोंच त्यांचें धाबें दणाणलें. इटलीच्या भोंवतीं फांशीच्या खांबांचें कुंपण घातलें गेलें. जर्मनीनें ती महायात्रा आपल्या देशांत घुसूं नये म्हणून रानोमाळ पहारे बसविले. फ्रान्स—स्वतंत्र फ्रान्स—त्यानें देखील देशभक्तांना आपल्या देशांतून फांशीकडे नेण्यासाठीं केलेल्या मार्गाप्रमाणें मार्ग दिला. कारण, फ्रान्समधून त्यांना दारिद्र्यांत मरण्यासाठीं इतर देशीं पाठवून देण्यांत आलें. व स्विट्झर्लंडनें भयानें थरारून आपल्या आश्रयार्थ आलेल्यांना हुसकून दिलें. ते मूठभर देशभक्त या स्विट्झर्लंडकडे मोठ्या आशेनें बघत होते. परमेश्वरानें स्वतंत्रतेला महाल असावा म्हणून आल्प्सवर स्विझर्लंड उत्पन्न केलें. व तें स्विट्झर्लंड नीच कारस्थानांच्या डावपेंचांनीं जुलुमी राजांची पायरी झाली आहे! जुलुमी राजांच्या दबकावणीला भिऊन या लोकसत्ताक संयुक्त संस्थानानें आम्हांस आजपर्यंत पाळलें असूनही पराजय होतांच शत्रूंच्या हवालीं

करण्याचा घाट घातला आहे ! व या लोकांत अजून असा एकही महात्मा निघत नाहीं कीं, तो त्या जुलमी राजांच्या धमकावणीच्या पत्रांस आग लावून देऊन म्हणेल,"नाहीं, नाहीं, देशभक्त हद्दपारांना आम्हीं असे अनाथ करणार नाहीं. दुःखी जनांना सोडून देण्याचें पातक आम्हांकडे घेणार न हीं. आम्हीं या पवित्र देशभक्तांना स्विट्झर्लंडमधून घालवून देत नाहीं. व जर तुम्हीं बलात्कारानें आम्हांवर स्वारी करूं पहात असाल तर परमेश्वर, आमचा आल्पस् पर्वत व आमची असिलता हीं तुमच्यापासून आमचें संरक्षण करण्यास समर्थ आहेत." असें जर स्विट्झर्लंडनें आतां सांगितलें तर या राजांची त्याला नकार देण्याची छाती नाहीं. जे दोनशें देशभक्त हद्दपारांपुढें चळचळ कांपत आहेत, त्या भित्र्या राजांची स्विट्झर्लंडच्या रणशूरांशीं झुंज घेण्याची बिलकूल छाती नाहीं.

" परंतु तसें करण्याची स्विट्झर्लंडची धृति गळाली. तुम्हीं तुमच्या घरीं आश्रय मागावयास आलेल्या पवित्र याचकांस जुलुमी राजांचे ताब्यांत दिलेंत. तुम्हीं परमेश्वर व मनुष्य ह्यांच्या मधली सांखळी जी भूतदया तिचे तुकडे उडविलेत !

" ते स्वदेशभक्त निघून गेले आहेत, ते अज्ञातवासांत, वनवासांत भटकत आहेत. परमेश्वर त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवो व त्यांच्या अंतःकरणावर आपल्या शांततेचा प्रकाश पाडो. यूरोपनें जी हद्दपारीची शिक्षा दिली आहे त्या हद्दपारीच्या महायात्रेंत त्यांचीं अंतःकरणें शमयुक्त राहोत. तरुण हद्दपारांनो, निराश होऊं नका. तुम्ही तुमच्या हृदयकमलांत अभिषिक्त केलें भविष्य विसरूं नका. या महायात्रेला राष्ट्रधर्मांतील कर्तव्यतेची योग्यता द्या. ज्या नवीन धर्माचे आपण दीक्षित झालां आहां, त्या धर्माच्या जयास्तव धर्मवीरांची फारच जरूर होती. धैर्यानें सोसलेली विपत्ति हें दैदीप्यमान रत्न घेऊन भवितव्यता ही राष्ट्रधर्माच्या योध्यांचे मस्तकांना भूषित करीत असते. तुम्हीं जें भविष्य पाहिलेंत तें येणारच येणार. परमेश्वरानें जें लिहिलें आहे तें राजांच्या आज्ञापत्रिका व झारांचे जुलूम यांनीं पुसलें जाईल काय ? वादळांतील गडगडणाऱ्या अभ्रांनीं आकाशमंडलांतून सूर्यनारायण पुसला जाईल काय ? उत्क्रांतीचा विश्वव्यापक नियम–सर्वांच्या सहकरणानें सर्वांची परमोन्नति–हा विश्वप्रगतीचा नियम वर लिहिलेला दिसत आहे. स्वर्गांत हा नियम अविनाशी आहे. व या पृथ्वीवर लोकशक्ति अविनाशी आहे. ती

लोकशक्ति व तें भविष्य अमर्त्य आहे. तो दिवस येणारच येणार कीं, ज्या दिवशीं, गुलामगिरीला जे पक्के जखडलेले, सक्त पहाऱ्यांत बंदीत टाकलेले व दास्यपंकांत खोल रुपलेले म्हणून आज वाटत आहेत तेच लोक, तेंच प्रचंड जानपद, तो मानव्याचा बलभीम, खडबडून उभा राहील, आकाशाकडे दृष्टी फेंकील, परमेश्वराची अनुज्ञा मिळवील व मग एका मुष्टीसरशीं जुलुमी सिंहासनें पालथीं पाडील, बंधनें तटातट तोडून टाकील, बेड्यांचे तुकडे उडवील, अन्यायाच्या मर्यादा झुगारून देईल व स्वतंत्रतेच्या मंदिरांत स्वातंत्र्यदेवीसमोर पूर्ण स्वतंत्र होऊन स्वातंत्र्यप्रीतींत लीन होऊन जाईल !

" व त्या भाग्याच्या शुभदिवशीं स्वदेशावर अत्यंत प्रेम केल्याच्या अपराधाबद्दल ज्यांना आज हद्दपारीची शिक्षा झाली आहे ते जर जिवंत असतील, तर मग मनुष्यजाति त्यांच्यावर शुभाशींची वृष्टि करील व जर त्यांच्यापैकीं सर्व लढतां लढतां स्वर्गांत वर चढून गेलेले असले व एकटा मागें राहिलेला असला तर तो आपल्या देशबंधूंच्या पवित्र अस्थि ज्या समाधींतून चकाकत असतील त्या समाधींपुढें येऊन, गुडघे टेंकून व तेथील उगवलेलें गवत किंचित बाजूस सारून त्या देशभक्तांच्या कानांत सांगेल कीं, " बांधवहो, आनंदाचा दिवस उगवला आहे. कारण त्या वनवासाच्या देवदूताचे शब्द सत्य झाले आहेत व आपण गुलामगिरीला ठार मारलें आहे. " व तो ह्या जगतीवरचा शेवटचा हद्दपार देशभक्त होईल. कारण त्यापुढें जगावर फक्त जानपदांचीच सत्ता चालत राहील !"

आम्हीं बर्नें येथें आलों तरी आमच्या त्रासाची समाप्ति झाली नाहीं. परंतु त्या पोलिसचवकशीच्या, भावी काळाच्या व प्रस्तुत कठिण प्रसंगाच्या काळजींत चूर असतांनाच आम्हीं पॉलिश, जर्मन व इटालियन देशभक्तांपैकीं सुमारें अठरा जणांनीं पोलंड, जर्मनी व इटली येथील नूतन पक्षाच्या चळवळी एकाच दिशेनें चालविण्यासाठीं खालील मानवी सबंधुतेच्या करारनाम्यावर सही केली.

" आम्हीं खालीं सही करणार, स्वातंत्र्य व प्रगति यांचे भक्त, सर्व मानवी जातीच्या समतेंत व सबंधुतेंत निष्ठा ठेवणारे;

विश्वव्यापक असा जो प्रगमनाचा नीतिनियम त्याचे योगानें मनुष्यजातीची अखंड उन्नति होत जाऊन तिच्या सकल शक्तींची स्वतंत्ररीत्या व

एकतानतेनें पूर्ण वाढ होऊन ह्या विश्वांतील तिच्याकडे असलेलें महत्कर्तव्य करावयास ती मनुष्यजाति समर्थ होणार अशी निष्ठा धरणारे;

मनुष्यजातीला ही कर्तव्यक्षमता संपादावयास एकच साधन आहे कीं, तिच्यांतील सर्वजणांनीं स्वतंत्रतेनें व स्वेच्छेनें एकत्र होऊन सहकरणाच्या तत्त्वावर आपआपलीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. अशा प्रकारचें स्वेच्छा-युक्त व स्वतंत्र सहकरण करणें ही गोष्ट समसमानांतच शक्य आहे. कारण, प्रत्येक प्रकारची असमता ही स्वातंत्र्याची उणीव दाखविते. व स्वातंत्र्याची उणीव असली कीं, स्वेच्छेप्रमाणें करणें अशक्य होतें. व म्हणूनः—

**स्वातंत्र्य, समता, व मानुषता हीं तीन तत्त्वें सारखींच पूज्य आहेत.** प्रत्येक सामाजिक प्रश्नाचें बरोबर उत्तर काढण्यास ह्या तीन संख्या विचारांत घेतल्याच पाहिजेत व जेव्हां जेव्हां या तिहींपैकीं एक संख्या गाळली जाते तेव्हां तेव्हां बाकीच्या दोन विचारांत घेतल्या असतांनाही सामाजिक प्रश्नाचें उत्तर चुकलेलें असलेंच पाहिजे.

यद्यपि वर सांगितल्याप्रमाणें मानवी जातीचें उद्दिष्ट एकच आहे, त्या मानवी कुटुंबानें तें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं तीं तत्त्वें पाळलीं पाहिजेत तीं तत्त्वें जरी सर्वत्र सारखींच आहेत, तथापि त्या मुख्य उद्देशाच्या प्राप्तीचें महत्कार्य सुलभ रीतीनें साधावें म्हणून श्रमविभागाचे तत्त्वानुरूप प्रत्येक व्यक्ति व प्रत्येक लोक यांच्या वांटणीला एक एक विशिष्ट कर्तव्य आलेलें आहे. हें कर्तव्यकर्म केल्यानें ती व्यक्ति किंवा तें राष्ट्र आपलें स्वतःचे विशिष्ट जबाबदारींतून सुटतें व ती जबाबदारी पुरी करण्यांतच मानवी जातीचे अंतिम साध्यार्थ असणारें आपलें कर्तव्य बजावितें.

हें व्यक्तिविशिष्ट कर्तव्य बजाविलें जाण्यास व त्या कर्तव्याची ती पूर्तता ज्या रीतीनें मानवी जातीचें अंतिम सुलभ होईल अशा रीतीनें घडवून आणण्यास व्यक्तींची व लोकांची सहकारिता असणें अत्यंत अवश्य असल्यानें त्यांच्या संस्था स्थापण्यासाठीं,

मनुष्यत्व व नागरिकत्व यांचे हक्क ओळखून, व लोकोद्धाराच्या पवित्र कार्याला जे आपलें बुद्धिसर्वस्व व शक्तिसर्वस्व अर्पण करण्यास उत्सुक असतात त्यांना परमेश्वर व मानुषता यांच्या स्फूर्तीनें जी सदसद्विवेकबुद्धि लाभली जाते त्या विवेकबुद्धीच्या आज्ञेला मान्यता देऊन,

मानवी जातीच्या प्रगमनार्थ पहिली पायरी जी राष्ट्रसमिति त्या आमच्या

निरनिराळ्या राष्ट्रसमितींत आपलें व्यक्तिविशिष्ट कर्तव्य बजाविण्यास्तव ‘यंग पोलंड,’ ‘यंग जर्मनी, व ‘यंग इटली,’ ह्यांमध्यें प्राथमिक दीक्षा घेऊन, आज तारीख १५ एप्रिल १८३४ सालीं स्वतःच्या कर्तव्यतत्परतेसाठीं स्वतःची हमी देऊन, आम्हीं खालीलप्रमाणें वागण्याचा निश्चय करीत आहोंतः—१ ‘यंग जर्मनी, ‘यंग पोलंड, व ‘यंग इटली’ या तिन्हीही संस्था लोकसत्ताक असल्यानें, मानव्यहितार्थ झटणाऱ्या असल्यानें, व स्वातंत्र्य, समता व प्रगति ह्या तत्त्वांवर विश्वास ठेवीत असल्यानें, या सर्वसामान्य तत्त्वांच्या विजयासाठीं, आजपासून तत्प्रीत्यर्थ केल्या जाणाऱ्या कर्तव्यांत एकमेकीनें एकमेकींची सहकार्यता संपादण्याचा निश्चय करून, समसमान बंधुत्वाच्या नात्यानें एकत्र होत आहेत.

( २ ) जीं मुख्य तत्त्वें या संस्थेनें पाळलीं पाहिजेत त्यांची याद दुसरीकडे दिली आहे. या तीन संस्थांनीं तीं सर्व तत्त्वें पूर्ण रीतीनें पाळीत राहिलें पाहिजे.

( ३ ) सर्वसामान्य तत्त्वांप्रमाणें सामान्य कर्तव्य पार पडत असतां या तीन संस्थांचीं विशिष्ट कर्तव्यें करण्याची त्यांना स्वतंत्रता आहे. त्यांच्या विशिष्ट कामगिरींत त्यांच्यावर कोणाचाही ताबा नाहीं.

( ४ ) ‘तरुण पोलंड,’ ‘तरुण जर्मनी,’ व ‘तरुण इटली’ यांचा आघातक व संरक्षक तह झाला आहे. त्यांच्या देशांना मुक्त करण्यासाठीं ते एकवाक्यतेनें झटतील. व एकमेक एकमेकांना मदत देतील.

( ५ ) राष्ट्रीय प्रतिनिधींच्याकडून या “तरुण यूरोप”च्या केंद्र मंडळाची रचना व काम चालविलें जाईल.

‘तरुण यूरोप’ची तत्त्वमालिका.

( येथें मुख्य मुख्य तेवढीं तत्त्वें दिलीं आहेत. )

परमेश्वर एक आहे.

त्याचें मुख्य शासन एकच आहे.

व त्या शासनाचे अधिकारी मानव्य हें आहे.

मनुष्यजातीच्या सर्व शक्तींचा जेव्हां पूर्ण विकास होईल तेव्हांच तिला आपलें खरें कर्तव्य काय हें निश्चितरीत्या कळून येईल. व त्या कर्तव्याचे ज्ञानाप्रमाणें कृति घडण्यास मनुष्यजातीनें संभूयसमुत्थान केलें पाहिजे. सहकारी एकीकरणाशिवाय व भूतदयेशिवाय मनुष्याची उन्नति होणें अशक्य आहे.

परमेश्वराचा जो विश्वव्यापक नीतिनियम आहे तो एकच व सर्वत्र सारखा लागू आहे. **त्या परमेश्वराचा असा हुकूम आहे कीं, सर्व मनुष्यें स्वयंस्वतंत्र, समसमान, व भाऊ आहेत.**

स्वतंत्रता म्हणजे प्रत्येक मनुष्याला आपल्या शक्तींचा आपलें कर्तव्य बजाविण्यांत व तत्प्रीत्यर्थ सुसाधनें योजण्यांत स्वेच्छेनुरूप व्यय करतां येणें, या कामांत त्याला कोणचाही अडथळा न येणें. त्याच्या स्वेच्छेची मर्यादा इतकीच कीं, त्या योगानें दुसऱ्यांच्या हक्कांविरुद्ध वर्तन न घडलें पाहिजे. म्हणजे–**प्रत्येक मनुष्याचें विशिष्ट कर्तव्य हें मानवी समाजाच्या कर्तव्याशीं एकवाक्यतेंत असलें पाहिजे.** ह्या मर्यादेशिवाय प्रत्येक मनुष्याची इच्छा स्वतंत्र असून तिला इतर कसलेंही बंधन नाहीं.

समसमानता म्हणजे सर्व मनुष्यांचे हक्क व कर्तव्यें हीं सारखींच आहेत. सर्व समाजाच्या श्रमाचें जें फल असेल त्या फलांत प्रत्येक मनुष्याचा त्याच्या श्रमाचे प्रमाणानें हिस्सा आहे.

सबंधुता म्हणजे मनुष्यामनुष्यांत वसणारी परस्पर प्रीति होय. आपल्याशीं लोकांनीं जसें वागावें असें आपल्यास वाटतें तसें आपण लोकांशीं वागलें पाहिजे.

प्रत्येक विशिष्टाधिकार हा समतेचा भंग होय.

प्रत्येक स्वेच्छाचारी जुलुम हा स्वतंत्रतेचा भंग होय.

प्रत्येक आपलपोटेपणाचें व अहंमन्यतेचें कृत्य हा सबंधुतेचा भंग होय.

आतां व्यक्तींच्याबद्दल वर सांगितलेलीं तत्त्वेंच राष्ट्रांनाही लागू आहेत.

कारण, व्यक्ति हें राष्ट्राचें जसें मुख्यांग आहे तसेंच राष्ट्र हें मानवी समाजाचें मुख्यांग होय. व्यक्तीचा राष्ट्राशीं जो संबंध तोच राष्ट्राचा मानवी जातीशीं संबंध आहे.

व म्हणून परमेश्वराच्या व्यक्तिविषयक नियमाप्रमाणेंच त्याचा राष्ट्रविषयक नियमही आहे. **त्या परमेश्वराचा हुकूम असा आहे कीं, सर्व राष्ट्रें स्वयंस्वतंत्र, समसमान व भाऊभाऊ आहेत.**

मानव जातीची अंतिम रचना अशीच असली पाहिजे कीं प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र, सम व सबंधु अशा व्यक्तींनीं बनलेलें आहे व त्या राष्ट्रांची स्वतंत्र, सम व सबंधुतेच्या नात्यानें एकी झालेली आहे; प्रत्येक राष्ट्र लोकसत्ताक आहे व तीं राष्ट्रें मिळून **लोकसत्ताक संयुक्त राष्ट्रसंघ** निर्माण झालेला

आहे; व त्या लोकसत्ताक संयुक्त राष्ट्रसंघानें सर्वसामान्य तत्त्वांच्या व सर्वसामान्य कराराच्या अनुरोधानें सर्व व्यवस्था चालविली आहे. अशा रीतीनें सर्व मनुष्यजाति नीतिनियमानुसार अंतिम उद्धाराकडे जाऊं लागेल तेव्हांच तिनें जगच्चालकाचा विश्वव्यापी हुकूम पाळला असें होईल.

ह्या 'तरुण यूरोप'च्या करारावर मी, मेलेगारि, रफिनी, घिग्लिओनि, कॅम्पॅनेला वगैरेनीं सही केली. पॉलिश वगैरे देशभक्तांच्या सह्या झाल्यावर आमचें तें दिव्य मंडल विभागलें गेलें. कॅम्पॅनेला फ्रान्समध्यें गेला. मेलेगॅरी लासानेला गेला. व त्यांच्यापैकीं प्रत्येक जण त्या संस्थेची प्रसृति करण्यासाठीं अविश्रांत श्रम करीत होते. गस्टॅव्हो मॉडेना हा स्वित्झर्लंडमध्येंच कांहीं दिवस राहिला. पुढें त्याचें ग्युलिआ या सुंदर, निश्चयी व प्रेमळ स्त्रीवर प्रेम बसून त्यानें तिच्याशीं विवाह केला. ही स्त्री तिच्या स्वाधीन झालेल्या स्वदेशासाठीं (इटलीप्रीत्यर्थ) अश्रांत श्रम करणारी निघाली. व्हेनिशिया येथील युद्धाचे समयीं ती सदोदित आपल्या शूर व देशाभिमानी नवऱ्याजवळ स्वदेशसेवेंत तत्पर असे. इकडे मी, रफिनी व घिग्लिओनी हे ग्रेंचन येथें एका खाजगी खाणावळींत राहिलों. त्या खाणावळीचे मालकाच्या कुटुंबानें आम्हाला फारच ममतेनें वागविलें. त्याची सुशील पत्नी, त्याचीं मुलें, व तो स्वतः यांची आम्हांला सुख देण्यासाठीं जणूं काय चढाओढच लागलेली होती. त्यांच्या प्रयत्नानें सरकारकडून होणारे पुष्कळ त्रास टळले.

माझ्या 'तरुण यूरोप' ह्या संस्थेचा मूळ उद्देश असा होता कीं, यूरोपमधल्या लोकसत्ताक चळवळींना एका केंद्रांत आणून त्यांच्या प्रयत्नांची एकवाक्यता करावी. म्हणजे एखादें राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याकरितां लढावयास तयार होतांच सर्व राष्ट्रांनीं त्याला मदत देण्यास तयार झालें पाहिजे. जरी प्रत्यक्ष कृतीची मदत न झाली तरी निदान इतर राष्ट्रांच्या राजसत्तांनीं त्या लढणाऱ्या राष्ट्राचे उलट कृत्य करण्यास धजूं नये इतका लोकमताचा दाब तरी प्रत्येक राष्ट्रांत उत्पन्न व्हावा. अशा उद्देशानें आम्हीं निरनिराळ्या राष्ट्रांत प्रांतिक केंद्रें नेमिलीं व मुख्य केंद्राशीं त्यांचें व्यवस्थित दळणवळण सुरू केलें. शपथेचा मसुदा, संकेतरीति वगैरे गुप्त संस्थेचे रचनेस अवश्य तेवढें सर्व तयार केलें. मी हें जाणून होतों कीं,'तरुण यूरोप'चा उद्देश हा इतका विस्तृत आहे कीं, अनंत स्वयंसेवकांच्या मदतीनें व बऱ्याच कालानें तो क्वचित फलद्रूप होऊं शकता. सर्व यूरोपच्या चळवळी केंद्रीभूत करणें,

हें त्या कालाला अगदीं कठिण होतें हें मी पूर्ण जाणून होतों. माझी आशा इतकीच होती कीं, कशा तरी रीतीनें ते विचार पुढें यावे. आरंभ करावा, मग त्या कार्याची समाप्ति कोठेंही व केव्हांही पूर्ण होवो.

मी माझ्या पत्राचे किंवा मला आलेल्या पत्रांचे उतारे केव्हांही राखून ठेवले नाहींत. माझ्या स्वतःच्या पत्रांचे उतारे त्यांची मला फारशी किंमत वाटेना म्हणून ठेवले नाहींत. शिवाय माझें आयुष्य एका देशांतून दुसऱ्या देशांत भटकत फिरण्यांत गेलेलें असल्यानें, ज्या देशांतून मला भटकावें लागलें त्या सर्व देशांतील सरकाराशीं असणाऱ्या माझ्या हाडवैरामुळें मजवर संकटांची एकसारखी वृष्टि सुरू असल्यानें, व मित्रांच्या येथें ठेवलेले थोडेसे कागदपत्र नष्ट झाल्यानें मी अखेर असा निश्चय–आतां मला तो चुकीचा वाटत आहे–केला कीं, जेव्हां जेव्हां एखादें नवीन संकट येऊं पाही तेव्हां तेव्हां सर्व पत्रव्यवहार जाळून फस्त करावयाचा. व याप्रमाणें मी करीत गेलों. त्यामुळें त्या वेळेच्या माझ्या देशोदेशीं सुरू असलेल्या अत्यंत श्रमसाध्य व विस्तृत पत्रव्यवहाराचा आतां मागमूसही उरलेला नाहीं. फक्त लॅमेनिसला गेलेल्या एका पत्राची प्रत त्याच्या एका मित्रानें राखून ठेवलेली आहे. त्या माझ्या विविध विषयांवरील पत्रव्यवहाराची साधारण कल्पना यावी एतदर्थ मी तें पत्र प्रसिद्ध करीत आहें.

ता. १२ आक्टोबर १८३४.

“ ता. १५ सप्टेंबरचें आपलें पत्र पावलें. मीं त्या अत्यंत मूल्यवान पत्राला सदोदित जपून ठेवीन. कांहीं क्षण इतके चमत्कारिक असतात कीं, त्यांच्या ताब्यांत आमचीं मनें सांपडतांच दुःखमय भूतकाल व असह्य वर्तमानकाल यांच्या स्मरणाचे भाराखालीं आमचें हृदय दबून जातें, आमचा धीर गळूं लागतो व भविष्याच्या यशस्वीपणाबद्दल मन साशंक होऊं लागतें. अशा या निरुत्साही क्षणामध्यें सर्व संशयांच्या पटलाला विध्वंसून स्वकर्तव्याची धुरा जास्त नेटानें धारण करण्याची शक्ति आपल्या पत्रांतील उत्साहक विचारानें खात्रीनें येईल. मी आपणांस ‘ तरुण इटली ’चा एक अंक धाडीत आहें. त्यांत आमचीं बहुतेक तत्त्वें ग्रथित केलेलीं आहेत.

“.........आपण दुसरा एक विचार लिहिलेला आहांत, तो वाचून तर मला फार दुःख झालें. तुम्ही म्हणतां कीं, आपलें राजकीय स्वातंत्र्य इतरांचे मदतीशिवाय मिळविणें हें इटली देशास अशक्य आहे.

" ह्याच मताच्या प्रसृतीनें व उपदेशानें आपल्यांतील स्वातंत्र्यसंपादनाची ताकद नष्ट केलेली आहे. राजकीय स्वातंत्र्य संपादणें इटलींस अशक्य आहे ? अशा रीतीनें दोन कोटी साठ लक्ष लोक, ज्या लोकांच्या जवळ आल्प्स् पर्वत, ॲपिनाइन्स पर्वत हे आहेत, ज्यांचें संरक्षण करण्यास दोन्ही बाजूंनीं समुद्र सज्ज आहे, ज्यांना पूर्व पराक्रमांनीं भरलेलीं तीन हजार वर्षे राष्ट्रीय सामर्थ्याची साक्ष देऊन उत्साहित करण्यास मूर्तिमान उभीं राहिलेलीं आहेत, त्या दोन कोटी साठ लक्ष लोकांच्या राष्ट्राला आपण भागूबाईसारखें नामर्द ठरवीत आहां काय ? दुसऱ्याच्या तोंडाकडे स्वातंत्र्याच्या तुकड्यासाठीं पहात बसावयाचा उपदेश करून आपण इटलीच्या वांट्याला जगांत कांहींच कर्तव्यता आली नाहीं असें ठरवीत आहां काय ? कारण, स्वतंत्रतेची किंमत कळल्याशिवाय स्वतंत्रता मिळावयाची नाहीं. व ती किंमत भिक्षेवारी स्वातंत्र्य मिळवून कळत नसते, तर स्वतःचे मर्दपणावर स्वातंत्र्यप्राप्ति करून घेतली असतांच त्या स्वातंत्र्यरत्नाची खरी किंमत कळत असते.

" अहो, इटलीमध्यें सामर्थ्याची कमतरता नाहीं. तिचें सामर्थ्य इतकें भक्कम आहे कीं, हल्लीं असलेल्या संकटांपेक्षां दुप्पटीनें भयंकर अशीं संकटें आलीं तरी ती कचरणार नाहीं. इटलीमध्यें जें नाहीं तें आत्मावलंबन होय. इटलींत निष्ठा नाहीं. स्वातंत्र्यांत किंवा समतेच्या तत्त्वांत निष्ठा नाहीं असा माझा भाव नसून या तत्त्वांच्या अंतिम जयांत तिची निष्ठा नाहीं. परमेश्वर हा अन्यायानें गांजलेल्यांचा कैवारी आहे ह्यांत इटलीची निष्ठा नाहीं. आपल्या आत्मबलांत व आपल्या तरवारींत तिची निष्ठा नाहीं. जानपदांत, ज्यांना इतके दिवस रणांगणांत केव्हांच उतरूं दिलें नाहीं त्या लोकपदांत, तिची निष्ठा नाहीं. एक कर्तव्य, एक उद्दिष्ट, एक दुःख, एक आशा यांनीं प्रेरित होऊन केलेल्या उठावणींत एक जरी जय आला तरी त्या एका जयाच्या उत्तोलनदंडानें सर्व आसमुद्रवलयांकित देश वर उठवितां येईल, ह्यांत इटलीची निष्ठा नाहीं. तत्त्वासाठीं सर्व लोक एकत्र कसे होऊं शकतात ह्या तत्त्वबलांत तिची निष्ठा नाहीं.

" परंतु ही निष्ठा, हा विश्वास, ज्या एकाच गोष्टीची आजपर्यंत उणीव भासत होती ती ही आत्मनिष्ठा आतां इटलीमध्यें प्रादुर्भूत होऊं लागली आहे. मी लिहीत आहें ह्या वेळेला देखील १८३० व ३१ च्या बंडाच्या चुक्या समजाऊन घेऊन इटली ती निष्ठा शिकली आहे. त्या निष्ठेचा प्रादुर्भाव

आमच्या सुशिक्षित तरुणांत गोचर होत आहे. त्या तरुणांतून तें तेज जानपदाला मिळेल याबद्दल आतां कांहीं संशय नको. कारण, ह्या स्वातंत्र्य-प्रीतीला व ह्या आत्मनिष्ठेला आतां राष्ट्रधर्माचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. **स्वदेश हा स्वधर्माइतकाच पूज्य झाला आहे.** आत्मविद्येचें पुनरुज्जीवन कसें झपाट्यानें होत आहे तिकडे पहा. आमच्या 'तरुण इटली' तल्या लेखांचीं पारायणें करण्यासाठीं केवढालीं संकटें सोसण्यास तरुण लोक तयार झाले हें ध्यानांत आणा. वारंवार पराभव येत असूनही क्रांतिकारक उठावण्या कशा एकामागून एक होत आहेत याचा विचार करा. आमच्या राष्ट्रधर्म-प्रचारकांकडे पहा. आमच्या देशवीरांकडे पहा. परमेश्वराची आज्ञा म्हणून, स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांसारखें पूतपावन कृत्य नाहीं अशा दृढ विश्वासानें, जानपदाला स्फूर्ति देऊन गुलामगिरीचे तुकडे उडविण्यासाठीं कृतितत्पर होणें ही गोष्ट अजूनपर्यंत इटलींत घडली नव्हती. आजपर्यंत लोक स्वदेशार्थ झटले, परंतु त्यांनां अंतिम उद्देशाची स्पष्ट कल्पना नव्हती. परंतु गेल्या दोन वर्षांत जे देशवीर सॅव्हाय, जिनोआ, ट्यूरिन, एलेक्झांड्रिया व नेपल्स मध्यें स्वदेशार्थ देहपात करते झाले त्यांच्यापुढें एक स्पष्ट व उदात्त कार्यक्रम होता. त्यांनीं त्या कार्यक्रमासाठीं घेतलेल्या शपथांस्तव प्राण ठेवले. इटली ही स्वतंत्र होण्यास स्वयंसमर्थ आहेच आहे या निष्ठेसाठीं प्राण दिले. अशा दृढ निश्चयानें व अशा श्रद्धेनें ' मानव्य व राष्ट्र ' ह्या देवतांसाठीं लोकपक्षाचे ध्वज जेव्हां उभारले जातात तेव्हां त्यांना खालीं पाडण्याची कोणाची छाती आहे ?

" महाराज, आमच्या मागच्या अपजयांवर जाऊं नका. भूतकालांत व भविष्यकालांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. आमच्या देशाचे आजपर्यंत स्वातंत्र्यास्तव केलेले सर्व प्रयत्न फसले हें खरें आहे. परंतु ते सर्व प्रयत्न एखाद्या राजवंशाचे किंवा लष्करी जातीचे होते. तीं बंडें अविजयी झालीं; कारण कीं, प्रत्येक भयंकर राज्यक्रांतीला यश येण्यास समर्थ अशीं " ईश्वर व लोक " हीं तत्त्वें त्यांनां ग्रहण करतां आलीं नाहींत. म्हणूनच त्या सर्वांचा विश्वासघातानें नाश झाला. तीं बंडें सर्व राष्ट्रांचीं नव्हतीं. म्हणून त्यांत विश्वासघात होणें हें अपरिहार्यच होतें. इतके दिवस इटलीचे शत्रू व मित्र तिला असेंच सांगत आले कीं, " तुझे स्वतःचे पुत्र तुझें संरक्षण करण्यास असमर्थ आहेत." कोणीहि अशी गर्जना केली नाहीं कीं, " ऊठ ! ऊठ ! हे इटली देशा,

स्वसामर्थ्यनिष्ठेनें ऊठ. तुझा सर्व आधार त्या परमेश्वरावर व तुझ्या शूर पुत्रांवर आहे !"

" भिक्षा मागून स्वातंत्र्य ! तें कसें मिळणार ? व तें मिळालें–शशशृंग लाभलें तरी त्याची शाश्वति कशी धरावयाची ? ज्या स्वातंत्र्याकरितां कांहीं एक खर्चावें लागलें नाहीं त्या स्वातंत्र्यावर इटलीची प्रीति तरी कशी बसणार ? तें स्वातंत्र्य संभाळण्याची ताकद ज्यांना आत्मश्रद्धा नाहीं अशा लुळ्या राष्ट्राला कशी येणार ? व ही आत्मश्रद्धा जेथें स्वातंत्र्य हें उष्ट्या तुकड्यासारखें परक्यांनीं दिलेलें आहे तेथें कशी उत्पन्न होणार ?

" तें कांहीं नाहीं. एक धाडसाचें कृत्य तडीस गेलें कीं दुसरें करण्याचें अवसान चढतें. कायदेशीर लटपटीनें किंवा परक्याच्या साह्यानें जुळवून आणलेलीं शेंकडों कृत्यें जें शिक्षण देतील त्याहून हजारों पटीनें जास्त असें नैतिक शिक्षण परवश राष्ट्राला त्यांतील लोकांनीं केलेली एक उठावणी देईल.

" मी माझे विचार शक्य तितक्या रीतीनें प्रसृत करीत आहें. यामध्यें मला हजारों संकटें येत आहेत. परंतु त्यांनीं मी निराश होत नाहीं. कांहीं वर्षांपासून माझ्या व्यक्तीला ज्या ज्या वस्तूंपासून यत्किंचितही सुख होण्याचा संभव असेल त्या त्या वस्तूंविषयीं मीं पूर्ण उदासीनता व विरक्तता धारण केली आहे. माझ्या प्रियकर आईपासून, माझ्या बहिणीपासून, जें जें मला प्रिय आहे त्या त्या पासून वियुक्त होऊन मी लांब वनवासांत पडलेलों आहें. माझ्या जिवाचा कलिजा–माझा अत्यंत प्रिय बाळमित्र–रफिनी जाकोपो हा तुरुंगांत स्वदेशासाठीं मृत्यु पावला आहे. ह्या कारणानें व माझ्या मलाच ठाऊक असलेल्या इतर कारणांनीं मीं माझ्या व्यक्तीचें आयुष्याची व या देहाच्या सुखाची सर्व आशा सोडली आहे. व माझ्या आत्म्याला सांगून ठेवलें आहे कीं, " तुला अशाच स्थितींत मरण येणार ! हात धुवून पाठीस लागलेल्या दुष्टांच्या पाठलागांत सत्कृत्यांचाही जगानें विपर्यास केलेला असतां ज्या उद्देशासाठीं आयुष्य वाहिलें त्या उद्देशाच्या अर्ध्याच वाटेवर, अशा स्थितींत तुला मरण येणार !" परंतु जेव्हां माझ्या इटलीच्या पुनरुज्जीवनाची कल्पना माझे डोळ्यांसमोर उभी रहाते तेव्हां माझा आनंद ब्रह्मांडांत मावेनासा होतो ! इटली ! स्वतंत्र इटली ! त्या इटलींत माझी व्यक्ति लीन झाली आहे !

"माझी तुमच्याच पुस्तकाचे वाचनानें अशी खात्री झाली आहे कीं, स्वातंत्र्य

आपल्यास मिळणारच मिळणार–आपल्यापैकीं प्रत्येकानें मी स्वतंत्र होणारच असें ह्मणण्याचा अवकाश ! स्वातंत्र्यासाठीं वाटेल तें सोसण्यास व वाटेल तें खर्चिण्यास प्रत्येकजण तयार होण्याचा अवकाश !

" अशा निश्चयानें स्वतंत्रतेसाठीं वाटेल तें सोसण्यास व वाटेल तें खर्चिण्यास लोक अजून तयार नाहींत हें मला कबूल आहे. परंतु ह्मणून ते केव्हांही तसें करण्यास तयार होणार नाहींत असें समजावयाचें काय ? आज त्यांच्यांत निष्ठा नाहीं ह्मणून ती पुढेंही येणार नाहीं असें ह्मणतां येईल काय ? वर्तमानकाल गुलामगिरीचा आहे, परंतु भविष्यकाल स्वातंत्र्याचा येणार नाहीं काय ?

" आह्मांस रागें भरा–एखाद्या भविष्यवाद्याप्रमाणें आमचे दोष, आमची अशक्तता, आपसांतील भांडणें, धाडसाची उणीव यांचें अविष्करण करा. परंतु महाराज, त्याच वेळेला अशीही भविष्यवाणी होऊं द्या कीं, " ज्या दिवशीं तुमच्यांत जास्त मर्दपणा व जास्त बंधुभाव उत्पन्न होईल तो दिवस तुमच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा शुभ दिन होय. 'आतां स्वातंत्र्यच पाहिजे.' असा तुमचा दृढ संकल्प होण्याचा अवकाश कीं, तुह्मांला तुमच्या शत्रूंचें भय नको, परक्यांची मदत नको, तुह्मांस स्वातंत्र्यदेवी प्रसन्न झाल्याविना राहाणार नाहीं."

" महाराज, आतां मी आपली रजा घेतों. तुमच्या ठिकाणीं माझी पूज्यबुद्धि आहे हें आपण विसरूं नये. ती जर नसती तर तर वरीलप्रमाणें माझें अंतःकरण मोकळें करून मी तें आपणांस दाखवूं धजलों नसतों. "

**जोसेफ मॅझिनी**

इ. स. १८३४ चे शेवटीं मी " तरुण स्विट्झर्लंड " ही संस्था स्थापली. तिच्या शाखा स्विट्झर्लंड मधल्या मुख्य मुख्य भागांत पसरल्या. स्विट्झर्लंड देशाचें त्या वेळेस व हल्लींही मला फारच महत्त्व वाटत आहे. हें महत्त्व केवळ त्या देशाच्या स्थितीपुरतेंच आहे असें नसून इटली देशाच्या भाग्योदयाशींही स्विट्झर्लंडच्या स्थितीचा प्रत्यक्ष संबंध आहे. इ. स. १३३८ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेपासून तों तहत आजपर्यंत त्या चिमुकल्या राष्ट्रावर परक्या अमलाचें किंवा राजसत्तेचें नांव नाहीं. सर्व यूरोपमध्यें अद्वितीय व अभूतपूर्व असणारा देखावा स्विट्झर्लंडमध्यें पहावयास सांपडतो. जुलमी व महत्वाकांक्षी राष्ट्रांच्या वेढ्यामध्यें असूनही आज पांच शतकें त्या

आल्प्स् पर्वताच्या प्राकारावर लोकसत्तेचें स्वातंत्र्ययुक्त निशाण सर्व जगाला प्रोत्साहन व शुभभविष्य कथन करण्यासाठीं एकसारखें फडकत राहिलेलें आहे! पांचवा चार्ल्स्, चवदावा लुई, नेपोलियन बोनापार्ट आले व नामशेष होऊन गेले. परंतु तें लोकसत्तेचें स्वातंत्र्यांकित निशाण अढळ, अचल व पवित्र राहिलें आहे! तें निशाण तसेंच अढळ रहावें या उद्देशानें मी "तरुण स्विट्झर्लंड" ही संस्था स्थापली होती. स्विट्झर्लंडमध्यें संयुक्तसंस्थान-पद्धतीचा किंचित् भाग असल्यानें त्या निरनिराळ्या संस्थानांवर शेजारचीं राष्ट्रें आपला दाब बसवीत. तो दाब मोडावा व स्विट्झर्लंडच्या लोकसत्ताक राज्याला बळकटी यावी एतदर्थ मी प्रयत्न चालविले. कोणच्याही दुसऱ्या राष्ट्राच्या अंतर्गत चळवळींत व रचनेंत मुद्दाम ढवळाढवळ करणें हें महत्पाप आहे असें मी समजतों. परंतु जेथें सर्व युरोपचा प्रश्न येत आहे तेथें व तेवढ्या पुरतेंच ह्या रचनेच्या फिरवाफिरवीबद्दल प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. स्विट्झर्लंडनें स्वतंत्रपणाबरोबरच सर्वसमर्थत्वही संपादावें व यूरोपच्या जुलमी राजांना इतर देश गुलामगिरींत ठेवण्यासाठीं मदत करण्याचें अमंगल कृत्य त्या राष्ट्रांतील लोकांस पसंत पडूं नये व तें कृत्य आम्हीं करणार नाहीं असें उघड सांगण्याचें धाडस व शक्ति त्यांच्यांत यावी एतदर्थ जरूर तेवढेंच काम मी करीत होतों. हल्लीं त्या वेळच्या माझ्या सुधारणांपैकीं बहुतेक घडून आल्या आहेत व मी जी संस्था स्थापली त्या संस्थेंतील कर्त्या पुरुषांकडे त्या सुधारणांचें महत्त्वाचें श्रेय येत आहे. या संस्थेच्या मतप्रसारासाठीं १८३५ मध्यें मीं एक वर्तमानपत्र काढलें. तें आठवड्यांतून दोनदां प्रसिद्ध होत असे. व एक भाग जर्मन भाषेंत व दुसरा फ्रेंच भाषेंत छापला जाई. या कार्यासाठीं आम्हीं बायेने येथें एक छापखाना विकत घेतला. प्रोफेसर वीनगार्ट नांवाचे स्विस गृहस्थ सर्व व्यवस्था ठेवीत. त्या छाप-खान्यांत आम्हीं हद्दपार देशभक्तांना कामावर ठेवीत होतों. स्विट्झर्लंडमधल्या प्रमुख गृहस्थांची एक कमेटीही आम्हांस मदत करीत असे. आमच्या पत्रा-शिवाय लहान लहान पुस्तकेंही आम्हीं पुष्कळ प्रसिद्ध करीत होतों. त्या पत्राचें नांव 'तरुण स्विटझर्लंड' हें होतें व मी त्याचा एडिटर होतों. परंतु पत्रावर एका दुसऱ्याच गृहस्थाचें नांव होतें. या पत्रामध्यें राजकीय विषयांची चर्चा आम्हीं फार उदात्त पद्धतीनें चालविली होती. राजकारण हा धर्माचाच एक भाग आहे. राजकारणाला नीति आहे. स्वदेशाचा उद्धार ज्या शास्त्रानें होतो

तें शास्त्र भिन्नरूपानें एकदां राजकारणांत व एकदां स्वधर्मांत प्रकट होतें. रूपें व नांवें भिन्न आहेत, परंतु त्या दोन्ही शास्त्रांचा उद्देश सारखाच असल्यानें तीं दोन्हीही एकाच महत्तर शास्त्राचीं अंगोपांगें होत. मानवी जातीला प्रगमनाकडे नेणें हा सर्व धर्मांचा पाया आहे. व स्वदेशोद्धार, स्वातंत्र्य व दास्यमुक्तता यांचाही पाया मानवी जातीची प्रगमनात्मक उन्नति हाच आहे. ह्मणून देशाचें राजकारण व देशाचा धर्म हे सारखेच पवित्र आहेत. अशा पोक्त, विचारी व तत्त्वज्ञानयुक्त रीतीनें आह्मीं राजनीतीला धर्मविचारांचे उच्च स्वरूपाप्रत नेली. देशाभिमान व धर्माभिमान यांची सांगड घातली. स्वदेश व स्वधर्म हीं एकाच महत्तत्त्वाचीं भिन्न रूपें आहेत हें सिद्ध केलें. आमच्या या गंभीर विचारपद्धतीनें आमच्याविषयीं लोकांत सहानुभूति उत्पन्न होऊन आह्मांला बरेच लेखक येऊन मिळाले.त्यांत कांहीं प्रॅटेस्टंट धर्मांतील प्रमुख लोक होते. कांहीं कर्तृत्ववान तरुण लोक होते.व विशेष आश्चर्यकारक गोष्ट ही कीं, कित्येक स्त्रियाही त्या संस्थेला मिळाल्या होत्या. या स्त्रियांपैकीं ज्यांनीं आपल्या मुलांना कोणच्याही राजकीय पक्षाला, त्या पक्षामध्यें मत्सर व दुही यांशिवाय कांहीं एक निष्पन्न होत नसल्यानें, आजपर्यंत मिळूं दिलें नव्हते त्याच कुलीन मातृवर्गानें आमच्या संस्थेंत शिकविलें जाणारें देशाभिमानाचें व राजकारणाचें धर्माइतकें सोज्वल व पवित्र स्वरूप पाहून आपल्या पुत्रांस राजकारणांत निष्ठापूर्वक प्रयत्न करावयास लावलें. सुमारें सहाएक महिन्यांनीं आमच्या प्रयत्नाला फळें येऊं लागलीं. स्विस तरुण लोक आपल्या देशाच्या उन्नतीसाठीं तयार झाले इतकेंच नव्हे, तर आमच्या इटली देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्यासही सिद्ध झाले. आह्मी वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांनीं आमच्या मताचा फैलाव फारच जलद होऊं लागला. आजपर्यंत सर्व लोकसत्ताक चळवळीचें पारिस हें आगर समजलें जात होतें. व त्याप्रमाणें सर्व सरकारांचा त्या शहरावर डोळा असे. तिकडे शांतता असली ह्मणजे मग इतर कोणत्याही दिशेकडून भीति नाहीं अशी त्यांची समजूत होती. परंतु आमच्या मंडळीची स्विट्झर्लंडमध्यें चाललेली प्रगति पाहून त्यांना अत्यंत भीति उत्पन्न झाली. फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रिया येथील राजांनीं आमचेविरुद्ध एकच कोलाहल केला व स्विस सरकारनें आम्हांस फोडून काढून द्यावें अशी निकराची मागणी केली. या मागणीप्रमाणें आम्हांस स्विटझर्लंडमधून घालवून देण्यास कांहीं तरी कारण पाहिजे म्हणून ठरलेल्या युक्त्या, गुप्त हेर व भलते सलते आरोप ह्यांचा

प्रयोग करण्यास आरंभ झाला. त्या वेळेला लेसिंग नांवाच्या कोणा मनुष्याचा एका अप्रसिद्ध मारेकऱ्यानें खून केला. ही संधी साधून आमच्यावर नाहीं नाहीं ते खोडसाळ व अश्लील आरोप करण्याचा सपाटा सुरू झाला. आम्हीं हद्दपारांनीं स्विट्झर्लंडमध्यें एक मारेकऱ्यांची गुप्त मंडळी स्थापन केलेली आहे व तेथून सुटणारे हुकूम सर्व देशांतील शाखा पाळीत आहेत वगैरे वगैरे अनेक कुभांडें रचलीं गेलीं. मग आमच्या तोंडचे कांहीं शब्द पकडण्याकरितां व आमच्या अंतर्गत मुद्यांचा स्फोट करण्याकरितां हजारों निंद्य प्रकार योजिले गेले. एक जुलस ह्मणून कोणी मनुष्य अत्यंत दरिद्री मनुष्याचें ढोंग करून आमच्या नौकरीला रहाण्याचा प्रयत्न करूं लागला. इकडे एक जर्मन ज्यू आपलें नांव बदलून गुप्त मंडळींची एक शाखा काढण्याचे मिषानें लोकांस फसवूं लागला. फ्रान्सचे सरकारानें एक माझ्या नांवाचें खोटें आज्ञापत्र रचून तें आमच्या इटालियन हद्दपार देशभक्तांस ठिकठिकाणीं धाडून दिलें. त्यांत असा मजकूर दडपला होता कीं, सॅव्हॉयच्या स्वारीनंतर दूर दूर पसरलेल्या सर्व देशभक्तांनीं ग्रेचन येथें (माझा त्या वेळेस तेथेंच मुक्काम असल्यानें) जमावें ह्मणजे तेथून पुढें स्वारी करण्यांत येईल. अशीं नीचपणाचीं व खोटें बोलण्याचीं हजारों उदाहरणें देतां येतील. परंतु त्या सर्वांचा कळस अजून व्हावयाचाच होता. ता. २० मे १८३६ सालीं मला एका माझ्या मित्राकडून अचानक निरोप आला कीं, स्विट्झर्लंडच्या मी रहात होतों त्या भागाच्या शिपायांना काडतुसें वांटण्यांत आलीं आहेत. व ते कोठें तरी सरकारी हुकुमावरून जात आहेत. बहुधा मजबद्दल कांहीं गडबड असावी. थोडेच तास जातात न जातात तोंच दोनशें शिपायांची टोळी येऊन मी व रफिनी हे ज्या ठिकाणीं रहात होतों, त्या वसतिगृहाला वेढा घालती झाली. मला आलेल्या प्रथम सूचनेच्या व वेढ्याच्या दरम्यान हरो हेरिंग हा एकदम तेथें आला होता. तो फ्रान्समध्यें होता. परंतु तें माझ्या नांवचें खोटें विनंतिपत्र त्याला मिळालें होतें. व तें हातीं पडतांच आह्मांस येऊन मिळणें हें कर्तव्य समजून तो फ्रान्सहून निघून मजकडे आला. त्याच्यापाशीं इंग्रजी परवाना होता. मी त्याला त्याचें नांव छपविण्यास सांगितलें होतें. परंतु आमच्या भोंवतीं चाललेली ही धरपकड पहातांच त्या माझ्या मित्रानें आपलें खरें नांव हरो हेरिंग हें पोलिसास कळवून तो आपण होऊन त्या वेढा देणाऱ्या शिपायांचे स्वाधीन झाला. आह्मां

सर्वांना कैद करून तुरुंगांत घालण्यांत आलें. परंतु इकडे निराळाच प्रकार सुरू झाला होता. आह्मांस पकडल्याची बातमी सर्वत्र पसरली, व त्या ठिकाणचे स्विस तरुण लोक एकत्र जमून आमची सुटका झाली तर बरें, नाहीं पेक्षां आपण स्वतः तुरुंगावर हल्ला करून त्यांस सोडवूं असा जोर धरून शह देते झाले. आमच्या वसतिगृहाची एक प्रहरभर बारीक झडती झाली असतांही त्यांत एक देखील बंदूक, जाहीरनामा, हस्तपत्रक किंवा त्या जर्मनीवरील बनावट स्वारीच्या बेताबद्दल कसलेंही दर्शक सांपडलें नाहीं. तेव्हां नाइलाज होऊन आह्मांस चोवीस तासानंतर एकही प्रश्न न विचारतां सोडून देण्यांत आलें. परंतु थोड्याच वेळानें तो प्रांत सोडून जावयाचा हुकूम आमचे हातीं देण्यांत आला.

आह्मीं त्या हुकुमाप्रमाणें स्वित्झर्लंडचा तो प्रांत सोडून दिला. व त्याच्या सरहद्दीपलीकडच्या लगेना नांवाच्या पहिल्याच ल्हानशा खेड्यांत जाऊन राहिलों. तेथील प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकानें आमचें फारच स्वागत केलें. ज्या धर्माचा शत्रूंकडून छळ होत आहे, परंतु ज्या धर्माचा भावी विजय हा सुनिश्चित आहे अशा पवित्र धर्माचे आह्मीं पुरोगामी आहोत, अशा पूज्य भावानें त्यानें आमची व्यवस्था ठेविली. परंतु हा पाठलाग इतक्यानेंच संपला नाहीं. स्विट्झर्लंडच्या सरकारनें ज्या देशभक्तांना सॅव्हायच्या स्वारीचे वेळीं हद्दपारीची शिक्षा दिली होती त्यांपैकीं बरेचजण पुन्हां गुपचूप रीतीनें त्या देशांत शिरलेले स्विस सरकारास आढळले त्यांनीं फ्रेंच सरकारची खुशामत करण्याकरितां त्या देशभक्तांना पुन्हां हुसकून दिलें. परंतु स्विस सरकार भीत आहे असे पाहून फ्रान्सला जास्तच जोर आला. तुह्मीं हद्दपार देशभक्तांपैकीं अजूनही ज्यांना आंत ठेविलें आहे, त्यांना हाकून देत नसाल तर फ्रेंच सरकारास बळजोरीनें तसें करणें भाग पडेल. असा अत्यंत अपमानास्पद निरोप स्वित्झर्लंडच्या सरकारास आला. हा निरोप धाडून फ्रेंचसरकार स्वस्थ बसलें नाहीं. तर मला पकडण्यास्तव स्वित्झर्लंडमधून घालवून देण्यास कांहीं तरी निमित्त करावें ह्मणून एक अत्यंत नीच कुभांड रचूं लागले. ही निंद्य गोष्ट मी येथें मुद्दाम नमूद करीत आहे. राजसत्तेच्या खालीं केवढा अंधःकार माजलेला असतो हें ह्या गोष्टीनें तरी लोकांस नीट कळो !

सन १८३६ च्या जुलैमध्यें कान्सील नांवाच्या पारीसमधल्या पोलिसांपैकीं एक जणाला फ्रेंच प्रधानानें इटलीच्या हद्दपारांचा बारीक तपास काढण्या-

करितां स्वित्झर्लंडमध्यें धाडून दिलें. त्याला असें सांगण्यांत आलें होतें कीं, त्यानें प्रथम आमच्याशीं स्नेह संपादन करावा. आमचा पूर्ण विश्वास बसवून घेण्याकरितां फ्रेंचांच्या राजावर टपलेला मारेकरी आलिब्राड याचे आपण सहकारी आहों, असें आह्मांस कान्सीलनें कळवावें. त्याचा आमच्या मंडळींत प्रवेश झाला ह्मणजे फ्रेंच सरकारनें आमचा तो स्नेह उघडकीस आणावा व कान्सील हा आलिब्राडचा सहकारी असल्यानें आपण त्याला आपल्या देशांतून काढून द्या, ह्मणून स्वित्झर्लंडच्या सरकारास कळवावें. कान्सील हा राजाच्या होऊं घातलेल्या खुनामध्यें सामील होता असें सरकारी रीतीनें जाहीर केलें ह्मणजे त्याचा व आमचा स्नेह पाहून इतरत्र आमचाही त्या खुनाशीं संबंध असलाच पाहिजे, असा ग्रह होणें अपरिहार्य होतें. हा ग्रह स्वित्झर्लंडचे सरकारनें मुद्दाम करून घेऊन आह्मांला व त्याला हद्दपारीची शिक्षा एकदम द्यावी ह्मणजे त्यालाही आमच्या मनांत कसलाही संशय येऊं न देतां आह्मांबरोबर आह्मी जाऊं तेथें तेथें फिरतां येईल. अशा रीतीनें स्वित्झर्लंडमधून आह्मांस हद्दपार करूनच थांबावयाचें नाहीं, तर आह्मी लंडनमध्यें आल्यानंतरही त्या कान्सीलनें आम्हांतच राहून आमच्या सर्व हालचाली फ्रेंच पोलिसास कळवाव्या असा डाव होता. त्याला पैसे देण्यांत आले व त्याला अधिकाऱ्यांशीं पत्रव्यवहार कसा ठेवावयाचा हें सर्व ठरून पत्ता देण्यांत आला. आमच्याकडे येण्यासाठीं तो ४ जुलै रोजीं निघाला. त्याच्यावर ठरल्याप्रमाणें खोटा आरोप ठेवून त्याची शाबिती केली. व तें सर्व प्रकरण स्वित्झर्लंडच्या सरकाराकडे आलें. इकडे जुलै १० ला कान्सील बर्नें येथें आला. बर्नें येथें त्यानें दोघां तिघां देशत्यागाची शिक्षा झालेल्या इटालियनांशीं स्नेह करण्याचा प्रयत्न केला. त्यांपैकीं आरेलि ओबर्टेला हा इटालियन मनुष्य असाच एक नीच हेर होता. कांहीं दिवसांनीं लंडनमध्यें मी याच्या निंद्य कृति उघडकीस आणून त्याला तुरुंगांतही ढकलला. तो त्या वेळेस बर्नें येथें देशत्यागाची शिक्षा झालेल्या देशभक्ताचें सोंग घेऊन राहिला होता. कान्सील हा त्या सर्व इटालियनांना, आपण फरेंच गुप्तमंडळीचे सभासद आहोंत व बर्नें येथें शाखा उघडणार आहों, असें सांगू लागला. लवकरच त्यानें राजाच्या खुनासंबंधीं बोलणें लावलें व त्याबद्दल माझी भेट घेण्याची इच्छा दर्शविली. मीं ताबडतोब तें सर्व ढोंग ओळखलें. आलिबाडाला राजाच्या खुनांत मदत करणारा मनुष्य हा आपला बेत ज्याच्याशीं रस्त्यांत किंवा एखाद्या दुकानांत एक

अर्धा तासही पुरी बोलाचाली झाली नाहीं त्याला सांगेल हें अशक्य आहे. त्यावरून तो हेर असावा असें मी ताडलें. व त्याची भेट घेण्याचें नाकारिलें. मी माझ्या बर्नें येथील मित्रांना कळविलें कीं, त्याला एकांतांत गांठून व मार देण्याचा धाक दाखवून त्याच्यापाशीं असलेलें सरकारी कागद हिसकून घ्यावे. त्याप्रमाणें त्याला एका ठिकाणीं ता० ७ आगष्ट रोजीं आमच्या इटालियन हद्दपारांनीं गांठला व माझ्या सांगण्याप्रमाणें अगदीं घाबरवून सोडला. तेव्हां त्यानें सर्व कागदपत्र स्वाधीन केले. व सर्व अपराध कबूल केले. तेथील फ्रेंच वकीलही ह्या हेराला साह्य होताच. त्यानें याला कोणाकोणावर डोळा ठेवावयाचा याची एक याद दिलेली होती. तीमध्यें माझें, रफिनीचें व आणखी कांहीं जर्मन देशभक्तांचीं नांवें होतीं. आम्हीं तो सर्व पुरावा गोळा करून त्याची स्वित्झर्लंडचे पोलिसांस वर्दी दिली. ता० १६ आगष्ट रोजीं सरकारी चौकशी सुरू झाली. या चौकशींत कान्सीलची स्पष्ट जबानी व अपराधाची कबुली प्रसिद्ध झाली आहे. इतकें असूनही फ्रेंच सरकारानें स्वित्झर्लंडशीं उघड उघड दंडादंडीला आरंभ करण्याचा घाट घातला. व आपला त्या कान्सीलशीं कांहीं संबंध नाहीं असें म्हणण्यास निर्लज्जपणानें आरंभ केला. या कारस्थान्यांच्या जातीला लाज नाहीं. यांना सत्याची ओळख नाहीं. इटलींतील नेमस्त पक्षाला या नीच सरकारी अधिकाऱ्यांच्या हस्तस्पर्शांत धन्यता वाटे. पण मला तरी त्यांच्या हाताचा अपवित्र विटाळ कधींही न होवो! त्यांच्यांतील अत्यंत वरचा मनुष्य हा, रानटी भाषेंत पण सत्य बोलणाऱ्या व वाईट कामांत धरलें गेलें असतां लज्जेनें काळें ठिक्कर पडणाऱ्या, इमानी कामकऱ्यापेक्षांही फारच नीच आहे.

कान्सीलची चौकशी केल्यानें फ्रेंच सरकार रागावलें आहे असें पाहून स्वित्झर्लंडची तिरपिट उडाली. व इकडे फ्रेंच सरकाराला जास्त जोर येत चालला. मी माझ्या "तरुण स्वित्झर्लंड" पत्रांत जुलै २ सन १८३६ च्या अंकांत लिहिलें, "तुमच्या देशाची सुरक्षितता व स्वातंत्र्य हें तुमच्या पूर्वापार धैर्य, अभिजातता व स्वाभिमान या सद्गुणांवर अवलंबून आहे. ज्या स्वातंत्र्यांत स्वरक्षणाची धमक नाहीं किंवा सत्यप्रतिपादनाची हिंमत नाहीं, तें स्वातंत्र्य काय कामाचें? जिच्या हृदयांत भीतीनें धडक भरली आहे, जिच्या तोंडावर लज्जेची कालिमा आली आहे व जी एखाद्या बटकीसारखी राजसत्तेच्या व परक्यांच्यापासून क्षणिक अस्तित्वाची भिक्षा मागत दारोदार फिरत

आहे, त्या स्वतंत्रतेला धिःकार असो! देशत्यागाची महति ज्यांना कळत नाहीं, आतिथ्याचें पावित्र्य जे पायांखालीं तुडवीत आहेत, देशभक्त हद्दपारांना निर्लज्ज वनांत हुसकून देण्याचें ज्यांचे बेत चालले आहेत व यातना व स्वार्थत्याग यांनीं पवित्र झालेल्या मस्तकावर जे काट्यांचा मुकुट ठेवूं इच्छित आहेत त्या नष्टांना परमेश्वर पाहून घेवो! ज्या लोकांना असें सांगण्याची छाती होत नाहीं कीं, "देशत्याग केलेले हे देशभक्त लोक परमेश्वरानें आमच्या गृहीं धाडलेले आहेत. ते आमचे बंधु आहेत! त्यांची व आमची सन्माननीयता राखणें हें आमचें कर्तव्य आहे." व हें न सांगतां जे त्या हद्दपारांची उपेक्षा करीत आहेत, त्यांना धिःकार असो! ख्राइस्टनें ह्मटलें आहे, "भुकेल्यांना अन्न द्या. व तृषित असतील त्यांना पाणी द्या! भुकेले असतील त्यांना अन्न द्या! आमचे आत्मे भुकेले आहेत, आह्मांला अन्न द्या! स्वातंत्र्य हेंच आत्म्याचें अन्न होय! तें स्वातंत्र्य सर्वांना द्या!" स्विट्झर्लंडमध्यें, इतरत्र चहूंकडे आहे त्याचप्रमाणें, लोकपक्ष हा जास्त समंजस होता. स्वदेशाच्या सन्मानाकरितां स्वार्थत्याग करण्यास लोक सज्ज झाले. फ्रेंच सरकाराचा त्वेष सर्वांना चढला व सर्वांना प्रतिकार करण्याचें अवसान भरलें. रिडनला १०००० लोकांची व व्हीडीकेनला २०००० लोकांची, अशा देशाभिमानजन्य सभा चहूंकडे भरूं लागल्या! परंतु शेवटीं स्विट्झर्लंडचे सरकारनें हार खाल्ली व फ्रेंचांवर केलेले आरोप परत घेतले. उघड रीतीनें "यंग स्विट्झर्लंड" पत्र बंद करितां येईना ह्मणून त्यांनीं जर्मन भाषांतरकारास, नंतर कंपॉझिटरांस व नंतर पत्रव्यवहार करणाऱ्यांस निरनिराळ्या आरोपानें पकडून व अशा रीतीनें पत्र चालविणें अशक्य करून आपला उद्देश सिद्धीस नेला. नाइलाज झाल्यानें जुलई १८३६ च्या शेवटीं पत्र बंद पडलें. माझ्या शेवटच्या लेखांत मी लिहिलें:...आमच्यापैकीं कांहींना इटलीमध्यें व कांहींना अमेरिकेमध्यें निघून जाण्याची ताकीद आली आहे. असें कां? आह्मी असा कोणता अपराध केला आहे? कोणत्या कायद्यानें आह्मांस ह्या शिक्षा देण्यांत येत आहेत? कोणाचा पुरावा घेतला गेला आहे? आह्मांसाठीं कायदा नाहीं. आह्मांसाठीं न्यायासन नाहीं. आमच्या वतीनें कोणचाही देशभक्त असें विचारीत नाहीं कीं, "देशत्याग केलेल्या लोकांनाही नैसर्गिक हक्क आहेतच. त्यांना न्याय देण्यासाठीं उघड चवकशी झालीच पाहिजे. सार्वजनिक रीतीनें व संरक्षणाचा पूर्ण हक्क देऊन जो न्याय होतो तोच खरा न्याय होय. परंतु

गुप्त रीतीनें व तोंड बांधून जो फैसला देण्यांत येतो, तो मनुष्यजातीविरुद्ध व परमेश्वराविरुद्ध केलेला भयंकर अपराध होय.

एके दिवशीं १८३४ मध्यें एक मनुष्य मजकडे येऊन माझा प्रतिपाल करा असें म्हणूं लागला. तो हद्दपार होता. वीस वर्षें झालीं, तो हद्दपार होता. एकाकी व दरिद्री अशा देशभक्ताला वनवासामध्यें भोगाव्या लागणाऱ्या असह्य यातना तो भोगून बसला होता. त्याला बर्नेहून जिनिव्हास घालवून देण्यांत आलें. नंतर जिनिव्हाहून फ्रान्समध्यें हुसकिलें गेलें. फ्रान्समधूनही जवळ परवाना नाहीं म्हणून त्यास पुन्हां हद्दपार करण्यांत आलें. तेथून पायीं चालत चालत तो पुन्हां बर्ने येथें आला. व तेथें असलेल्या इटालियनांनीं त्याची कांहींशीं व्यवस्था लावली. परंतु थोडेच दिवसांत त्याला सरकारनें धरून फिरून जिनिव्हाला घालवून दिलें. तेथें त्याला आलेला पहातांच तेथील अधिकाऱ्यांनीं हुकुमाविरुद्ध परत आल्यामुळें कांहीं दिवस त्याला तुरुंगांत घातलें व पुन्हां एकदां उडाणटप्पू म्हणून घालवून दिलें. या वेळेला तो मला भेटला. आपला वृत्तांत सांगत असतां त्याच्या नेत्रावाटे अखंड अश्रुधारा वाहत होती. मला त्याची अतिशय दया आली. थोडेच दिवसांत त्याला इंग्लंडमध्यें धाडून देण्याची आज्ञा झाली. स्विट्झर्लंड व फ्रान्स या देशांतून तंगड्या तोडीत तोडीत त्यानें प्रवास केला. तो निओपोलिटन ( नेपल्स्-इटली-मधला ) होता. त्यानें नांव करोसी हें होतें. इंग्लंडला जाण्यासाठीं फ्रान्सवर पायीं प्रवास करून अखेर तो समुद्रयानांत बसला. तोंच त्याचा अनंत यातनांनीं झिजलेला देह निःसत्व होत होत तो त्या समुद्रप्रवासांतच मरण पावला ! त्याचे आईबाप अजून जिवंत आहेत ! त्याला भाऊ आहेत, त्याला बहिणी आहेत ! लोकसत्तेसाठीं व देशस्वातंत्र्यासाठीं असले कष्ट ज्यानें सोसले, त्या देशभक्तावर परमेश्वर दया करो !

अखेर मला शिक्षा झाली-स्विट्झर्लंडांतून कायमची हद्दपारीची शिक्षा झाली. मला हें कळतांच मी सावध झालों व पुन्हां तेथेंच राहिलों-मी हजारों पोलिसच्या तपासण्यांस भीक न घालितां तेथेंच राहिलों. व तसा वाटेल तितके दिवस राहिलों असतों. परंतु १८३६ चे डिसेंबरचे सुमारास ज्या माझ्या दोन मित्रांसह मी गुप्तवासांत होतों त्यांच्या प्रकृतीवर त्या भयंकर जाचाचा व असह्य दिनक्रमाचा परिणाम होऊं लागला, म्हणून मग मीं त्या दोघांसुद्धां १८३७ च्या जानेवारींत लंडनला आलों.

त्या वर्षाच्या आधींच्या कांहीं महिन्यांत संकटांची व कष्टांची परमावधी झालेली होती. दुर्दैवाच्या माऱ्याखालीं माझें सर्व अंग बधिर झालें होतें. कोणच्या विलक्षण मानसिक रचनेनें असेल तें असो, परंतु अत्यंत महत्वाच्या प्रसंगाच्या सुद्धां तारखा माझ्या ध्यानांत रहात नाहींत. तथापि त्या १८३६ सालच्या शेवटल्या महिन्याचें स्मरण मीं शेंकडों वर्षें वांचलों तरी बुजणार नाहीं. माझ्या आत्म्यावर नैतिक वादळ उठून तो त्यात नष्ट होण्याच्या अगदीं बेतांत आला होता. त्या प्रसंगाचा उल्लेख देखील मी मोठ्या कष्टानें एवढ्या-चसाठीं करीत आहें कीं, माझ्याप्रमाणें ज्यांनां यापुढें तसल्या विपत्तींत पडावें लागेल त्यांनां, आपल्याच एका बंधूवर असा प्रसंग गुदरला असतां त्या वादळांत जरी त्याला गारांच्या सड्याचा झोड मिळाला व जरी त्याचें सर्व शरीर रक्तबंबाळ झालें तरी तो अखेर सुरक्षित रीतीनें पार पडूं शकला, हें ऐकून कांहीं तरी धीर येईल व संशयपटलाचा नाश होऊन आत्मोन्नतीचा मार्ग सुलभ होईल. मला वाटतें, ज्यांनीं ज्यांनीं आपल्या स्वतःला एखाद्या महत्कार्याला वाहून घेतलेलें आहे व ज्यांच्या अंतःकरणातील प्रेमलता ही टव-टवीत आहे, त्यांनां त्यांनां एकदां तरी या संशयाचे वादळांत सांपडावें लागत असेलच. तें संशयाचें वादळ माझ्या आत्म्याला गुरफटूं लागलें. माझें मन हें नैसर्गिकरीत्याच प्रेमाचें भुकेलेलें होतें. प्रेमानें तें तुडुंब भरलेलें असे. माझ्या आईच्या सुस्मितावर तें पोसलें जात असतांनां जितकें उल्हासमय असे तितकेंच उल्हासमय व आनंदमय तें अजूनही होतें. माझ्यासाठीं जरी नाहीं तरी इतरांच्या कल्याणासाठीं तरी तें आशेनें फुललेलें असे. परंतु या माझ्या प्रेमाकांक्षी, आनंदी, आशायुक्त व कोमल मनाभोंवतीं त्या महिन्यांत दुःखाचा, निराशेचा, व विश्वासभंगाचा इतका भयंकर वणवा पेटला कीं, माझ्या आयुष्याचा उत्तरार्ध मला स्पष्ट दिसूं लागला. एकाकी वनवासांत ज्या लढाईत मी आजन्म लढत आलों त्या लढाईत कोणचाही उत्साहक भाग शिल्लक राहिलेला नाहीं, अशा स्थितींत माझें आयुष्य मला कंठीत बसावें लागणार हें मला दिसून येऊं लागलें. माझ्या प्रिय इटली देशाच्या सर्व आशा बहुतकाळ पावेतों खुंटून रहाणार असें मला वाटूं लागलें. माझ्या पक्षांतील धुरीणांची वाताहत झाली आम्हीं स्विट्झर्लंडमध्यें केलेल्या कामाचा नायनाट करण्यांत आला. आम्हांला विभागून देशोदेशीं हुसकून देण्यांत आलें. दारिद्र्यानें पाठ पुरविली. ज्या पवित्र कार्याच्या जयासाठीं आम्हीं झटत होतों त्या कार्याच्या

पूर्ततेंत अनंत व अनिवार्य विघ्नें दत्त म्हणून उभीं राहिलीं इतकेंच नव्हे, तर असल्याही संकटांतून तरून जाण्यास आजपर्यंत माझे अंगांत सामर्थ्य उत्पन्न करणारी माझी तत्त्वनिष्ठा देखील डळमळूं लागली. सर्व दिशा संशयाच्या तमोपटलांनीं व्याप्त झाल्या. ज्या मार्गाला आरंभ करण्यापूर्वींच तो दुःखाच्या कांट्यांनीं पूर्ण भरलेला आहे हें आम्हांस माहीत होतें त्या मार्गाचें आक्रमण करण्याची ज्यांनीं ज्यांनीं मजबरोबर शपथ घेतली होती त्यांच्यांपैकीं एकएकाचा विश्वास उडत चालला. ज्या कठिण व असमान युद्धांत मीं उडी घेतली होती त्या युद्धांत लढण्याबद्दल माझ्या असलेल्या उदात्त व परार्थपरायण हेतूंचा माझ्या जिवलग मित्रांकडूनही विपर्यास होऊं लागला. त्या वेळेसही माझ्याविरुद्ध असलेल्या बहुजनमताला मी भीक घातली नसती. परंतु ज्यांच्यावर माझ्या हृदयाचा पूर्ण विश्वास, जे माझ्या प्रीतीचें केंद्र झालेले होते, त्या दोघां तिघां व्यक्तींनींहि जेव्हां माझ्या मनांत महत्त्वाकांक्षा, किंबहुना उदात्त हेतूशिवाय वाटेल तो नीच हेतु, याचेंच वास्तव्य आहे, अशी शंका घेण्यास आरंभ केला तेव्हां मात्र मी निराशेच्या पूर्ण ताब्यांत गेलों व माझा जीव कासावीस होऊं लागला. माझ्या विश्वासाच्या व प्रेमाच्या मित्रांचें हें वर्तन अशाच वेळेला घडून आलें कीं, ज्या वेळेला विश्वासाची व प्रेमाची मला तहान लागलेली होती. शत्रूंचे सर्व दिशांनीं मजवर हल्ले चाललेले होते. माझ्या सत्कृत्यावर दुष्ट हेतूंचे पांघरूण घातलें जात होतें अशा वेळेला मला उत्कट आशा लागली कीं, माझ्या जिवाच्या मित्रांजवळ मी माझें अंतःकरण उघडें करीन, त्यांच्या संवादानें व प्रेमळ सहानुभूतीनें माझ्या आत्म्याला प्रोत्साहन मिळेल, या जगांतील सर्व सुखांवर मी जाणून बुजून पाणी सोडलें याचें खरें मर्म ते ओळखतील व दुःखसंवेदनांनीं मी तळमळत असतां आपल्या प्रेममय मधुर हास्याचे अमृतबिंदु मला देतील— मला उत्कट आशा होती कीं, माझे परम मित्र तरी निदान मला सोडणार नाहींत ! माझ्या या तृषित मनाला व माझ्या या उत्कट आशेला निराशेशिवाय कांहीं मिळालें नाहीं ! विस्तार न व्हावा म्हणून मी इतकेंच सांगतों कीं माझ्या भावासारखे मला प्रिय असणारे माझे एकदोन मित्र या अत्यंत जरूरीच्या वेळींच मला सोडून देते झाले !

जेव्हां मला दिसून आलें कीं, सर्व जगांत मी एकटा पडलेलों आहें, एकटा-फक्त माझ्या परमप्रिय आईशिवाय व तीही लांब इटलीमध्यें राहिलेली व

माझ्यासाठीं तळमळत असलेली !-तेव्हां या भयाण शून्यतेनें दचकून मी मागें वळलों. माझ्या मागें संशय उभाच होता त्याच्या मी ताब्यांत सांपडलों. कीचित् मीच चुकत असून सर्व जग बरोबर असेल काय ? क्वचित् माझी कल्पना ही स्वप्नवत् असेल ? माझें लक्ष्य मनोराज्य असेल ? तें अंतिमलक्ष्य नसून मला मात्र चुकून तें तसेंच आहे म्हणून वाटत असेल ? माझ्या कोत्या विचारांनांच मी धरून बसलों असेन ? केवल जयासाठीं–जयांच्या उद्देशासाठीं नव्हे–मी लढत नसेनना ? माझ्या अंतःकरणांतील नैसर्गिक स्फूर्तीनें मर्यादित अशा कक्षेमध्यें लहान लहान सद्गुणांची प्राप्ति करून घेण्याचे ऐवजीं व नजीकचीं व सोपीं तितकींच कर्तव्यें करण्यांत समाधान मानण्याचे ऐवजीं, महत्वाकाक्षेच्या किंवा अहंमन्यतेच्या फेऱ्यांत सांपडून " प्रांशुलभ्ये फले मोहादुद्बाहुरिव वामनः " अशी माझी हास्यास्पद स्थिति झाली नसेलना ?

ज्या दिवशीं या संशयपिशाच्चानें मला पछाडिलें त्या दिवशीं मी अत्यंत दुर्दैवी आहें इतकेंच मला वाटलें असें नाहीं, तर मी गुन्हेगार आहें, मीं घोर अपराध केलेला आहे–ज्या घोर अपराधाची बोंचणी माझ्या हृदयाला सतत लागलेली आहे, परंतु ज्याचें परिमार्जन करण्याची संधि निघून गेली आहे अशा भयंकर अपराधाचा मी अधिकारी झालों आहें–असें मला वाटूं लागलें. ॲलेसान्ड्रिया व चाम्बेली येथें ज्यांनां गोळ्या घालून मारण्यांत आलें त्यांच्या आकृति, पाप व पश्चात्ताप यांच्या मूर्तिमंत प्रतिमा, माझ्या डोळ्यांपुढें उभ्या राहूं लागल्या. त्यांनां पुन्हां सजीव करण्याची माझ्यांत ताकद नव्हती ! किती मातांचा तळतळाट माझ्या मस्तकावर पडला आहे ! किती मातांना मीं रडविलें आहे व जर मी इटलीच्या तरुणांस ह्या महत्कृत्यांत देह ठेवण्यासाठीं अशीच चेतना देत राहिलों, एक राष्ट्र–स्वतंत्र राष्ट्र–करण्यासाठीं त्यांच्या प्रतिमा उद्दीपित करीत राहिलों, तर आणखी किती मातांनां रडावें लागेल !! व जर हें एक राष्ट्र–हें स्वतंत्र राष्ट्र–हें नुसतें काल्पनिक मनोराज्यच असेल तर मग ? आजपर्यंत दोन वेळां भूगोलाच्या सुधारणेचें निशाण तोलून धरल्यानें जर माझी इटली क्षीण झालेली असेल, जर त्या क्षीणतेमुळें तिनें अर्वाचीन, तरुण व सशक्त राष्ट्रांच्या अमलांत रहावें असा ईश्वराचाच संकेत असेल, व जर त्या ईश्वरी संकेतानुरूप कर्तव्यशून्यतेंत नांव नाहीं, निशाण नाहीं, अशा स्थितींतच इटलीनें रहावें हें अपरिहार्य असेल, तर मग भविष्याबद्दल जबाबदारी घेऊन त्या काल्पनिक लक्ष्याच्या प्राप्तीसाठीं शेंकडों व हजारों

माणसांना त्यांच्या देहाचा व त्यांनां प्रिय असलेल्या सर्व वस्तूंचा कायमचा त्याग करावयास उत्तेजित करण्याचा अधिकार मला कोणी दिला ?

या सर्व संशयांचा माझ्या अंतःकरणावर किती भयंकर परिणाम झाला हें मी सांगत बसत नाहीं. मी इतकेंच सांगतो कीं, या पश्चात्तापानें व अनिश्चिततेनें मला वेड लागलें. रात्रीं झोंपेंतून मी फाडदिशीं उठावें व वायूच्या झटक्यासारखें दाराकडे धांवत जावें ! कारण, माझा परमप्रिय जाकोपो रफिनी मला हांक मारीत आहे असें मला वाटावें ! जे माझे स्नेही तुरुंगांत आहेत व माझ्यापासून हजारों कोसाच्या अंतरावर आहेत हें मला कळत होतें, त्याच स्नेह्यांनां बघण्यास, ते दूर आहेत हें जाणत असतांही, ते शेजारच्या खोलींतच भेटतील अशा अपरिहार्य विचारानें मीं माझ्या खोलींतून बाहेर यावें ! यःकश्चित् कारणानें, एखाद्या शब्दानें किंवा जरा कठोर आवाजानें, मीं एकदम रडूं लागावें. त्या वेळेस लंडनमध्यें चोहोंकडे बर्फ पडलेलें होतें. मला वाटूं लागे कीं, पृथ्वीनें शववस्त्र परिधान केलेलें असून ती मला मीही त्याखालीं यावें म्हणून बोलावीत आहे. जे माझ्याभोंवतीं असत त्यांच्या मनांत माझ्याविषयीं तिरस्कार उत्पन्न झालेला आहे अशी माझी भावना होई. आयुष्य सुकून जात आहे व जिवाच्या सर्व शक्ति क्षीण होत चालल्या आहेत असें मला वाटावें. ती माझ्या मनाची भयंकर स्थिति आणखी कांहीं दिवस जर टिकती तर मी एक तर कायमचा वेडा झालों असतों किंवा आत्महत्येच्या पापाचा अधिकारी झालों असतों. मी खोलींत भयंकर उदासीनतेंत बसलों आहे इतक्यांत शेजारच्या खोलींत एका तरुण स्त्रीनें माझ्या दुःखस्थितीचें अनुमान करून एका ओळखीच्या मनुष्याला माझ्या खोलींत येऊन माझी उदासीनता घालवावी म्हणून आग्रह केला असतां तो म्हणाला, "छे ! छे ! तो आपल्याच रंगांत आहे. गुतकट रचीत व एकलकोंडें बसण्यांतच त्याला खरें सुख होतें." हाय ! हाय ! दुसऱ्याच्या मनाची स्थिति जाणणें हें मनुष्यांनां किती दुर्घट आहे ! सहानुभूतिशिवाय—व ती या जगांत दुर्मिळ असते—खऱ्या खऱ्या सहानुभूतीशिवाय लोकांच्या मनोविकारांचा किती विपर्यास केला जातो !

एके दिवशीं सकाळीं मी जागा होतों तों एखाद्या महत्संकटांतून मुक्त झालेल्या मनुष्याप्रमाणें माझें मन समाधानयुक्त व माझा आत्मा शांत झाला आहे असें मला वाटलें. झोपेंतून ज्या क्षणीं मी प्रथम जागा होई तो क्षण

मला अत्यंत उद्विग्नतेचा जात असे. दुःखमय अस्तित्वाला त्या जागृतीपासूनच आरंभ होत असे व तो क्षण म्हणजे सर्व दिवसभर भोगाव्या लागणाऱ्या अनिर्वचनीय यातनांची बेरीजच माझ्या मनापुढें मांडित असे. मी वर वर्णन केलेल्या या महिन्यांत झोपेंतून जागें होतांच या पहिल्या क्षणीं माझ्या दुःखाला व उद्विग्नतेला पारावार नसे. परंतु त्या दिवशीं सर्व पृथ्वी मला समाधान देण्याकरितां स्मितवती झाली आहे व सूर्याचा तो शुभ्र प्रकाश माझ्या त्या क्षीण देहांतील जीवशक्तींना प्रफुल्लित करण्यासाठीं आपले आशीर्वादयुक्त किरण मजवर पाडीत आहे असें मला भासूं लागलें. माझ्या मनांत अगदीं पहिला विचार जो आला तो हा कीं, तुझीं सर्व दुःखें हीं अहंमन्यतेचीं फलें आहेत, कारण, तुझी आयुष्याची व्याख्या चुकलेली आहे. आतां मला किंचित् शांतता वाटूं लागल्यानें तत्कालीन परिस्थितीचें व माझें स्वतःचें निरीक्षण मी करूं लागलों. माझ्या नीतिशास्त्राची सर्व इमारत मीं पुन्हां उभारिली. सर्व तत्त्वज्ञानाचा मुख्य पाया आयुष्याची इतिकर्तव्यता हाच आहे. सर्व प्रश्न हे आयुष्याच्या व्याख्येवर अवलंबून असतात. आयुष्याच्या इतिकर्तव्यतेची बरोबर व्याख्या ठरविणें व ती सिद्धांतपद्धतीनें समजून घेणें ही मुख्य गोष्ट असून इतर सर्व मुद्दे दुय्यम प्रतीचे ठरतात. हिंदुस्थानांतील प्राचीन धर्मांत आयुष्य हें ईश्वरध्यानार्थ आहे. अशी आयुष्याची इतिकर्तव्यता ठरल्यानें गतिमांद्य, क्रियाशून्यता, व परमात्म्यांत जीवात्म्याला विसरणें हें आर्य लोकांचें मुख्य लक्षण झालें. ख्रिश्चन धर्मांत, आयुष्य हें पापपरिमार्जनार्थ आहे, अशी आयुष्याची व्याख्या असल्यानें दुःखें हीं मनुष्यांची परीक्षा करण्याकरितां येतात. विपत्ति निमूटपणें किंबहुना आनंदानें सोसल्या जाव्या व त्या दुःखांचा किंवा विपत्तींचा प्रतिकार करणें हें आपलें कर्तव्य नाहीं, अशीं मतें प्रतिपादन केलीं गेलीं. याच व्याख्येनें पृथ्वी ही यातनाभूमि ठरली व मोक्ष मिळण्याचा मुख्य मार्ग म्हणजे पार्थिव वस्तूविषयीं उदासीनता किंवा तिटकारा हाच होय अशी समजूत झाली. पुढें १८ व्या शतकांतील जडवाद उत्पन्न झाला व त्या जडवादानें आयुष्य हें सुखसंपादनार्थ आहे ही आयुष्याची आसुरी व्याख्या प्रकट केली. या योगानें अनेक रूपें धारण केलेल्या अनेक माणसांमध्यें अहंमन्यता उत्पन्न झाली. सर्व मनुष्यजातीच्या सुखासाठीं म्हणून लढाईला आरंभ केला जाई व स्वतःचे हित होतांच लढाई सोडून व्यक्ति व राष्ट्रें परत येत. विपत्तीला भिऊन महत्कृत्यें सोडून दिलीं

जात व तत्त्वापेक्षां जड वस्तूंनां व सुखासारख्या जड विकारांनां जास्त महत्त्व देण्यांत येई. या व्याख्येचा आपल्या मनावर किंचित् ताबा राहिला आहे असें मला आढळून आलें. ‘आयुष्य हें सुख आहे,’ या निंद्य व अधोगामी विचारांचा मीं माझ्या आत्म्याला नैसर्गिक तिटकारा पहिल्यापासूनच होता. मीं या विचारांचीं पाळेंमुळें इतरांच्या मनांतून नाहींशीं केली. परंतु तीं माझ्या मनांतून मात्र अजिबात घालविलीं गेलीं नव्हतीं. मला न जुमानतां तीं तेथें पुन्हां जवळ होऊं लागली होतीं. परंतु माझ्या मनांत सुखाची जी इच्छा होती ती विषयी सुखाबद्दल नव्हती. सुखाच्या उच्चतम स्वरूपात ती इच्छा प्रादुर्भूत झालेली होती. प्रेमाच्या–प्रीतीच्या–रूपानें ती माझ्या मनांत वास करीत होती. प्रीति ही अत्यंत पवित्र वस्तु आहे. व परमेश्वराच्या आज्ञेनें तिचा हृदयामध्यें जेव्हां जेव्हां अवतार होईल तेव्हां तेव्हां तिचा आपण साभार स्वीकार केला पाहिजे. प्रीति ही परमेश्वरानें आपल्या अंतःकरणांत प्रकाश व उत्साह देण्याकरितां दिलेली देणगी होय असें मी मानावयास पाहिजे होतें. परंतु प्रीति ही माझा हक्क किंवा हें माझें बक्षीस नसून देणगी आहे असें मानण्याचे ऐवजीं मी नकळत त्या प्रेमाची–त्या प्रीतीची–कर्तव्यपूर्ततेच्या कामीं आशा धरून बसलों. प्रीतीचें खरें स्वरूप मला कळलें नाहीं. प्रीतीला ऐहिक आशेचें बंधन नसावें. परंतु मी चुकून प्रीतीची पूजा न करितां तदुत्पन्न सुखाची पूजा करूं लागलों. हें सुख जेव्हां मिळणार नाहीं असें दिसलें तेव्हां अर्थातच सर्व गोष्टींविषयीं मी निराश झालों. प्रीतीसाठींच प्रीति धरण्याचे ऐवजीं तीपासून सुख होतें म्हणून ती असावी असें मला वाटत होतें. पण हें सर्व चुकीचें होतें. आनंद व दुःख यांना भुलून किंवा भिऊन अंतिम साधण्याचे कार्यांत अंतर पडूं देतां कामा नये. आत्म्याच्या अमरत्वांत माझा विश्वास पूर्ण रीतीनें दृढ झालेला नव्हता. हा जन्म कांहीं एकदम आलेला नाहीं किंवा एकदम नष्ट होणारा नाहीं. अनंत जन्मांतून प्रगमन होतां होतां आत्मा पूर्ण स्वरूपाला मिळतो. या जन्मपरंपरेंतील दुःखें हीं, ज्या पर्वताचे शिखरावर परमेश्वराचें वास्तव्य आहे, त्या पर्वतावर चढून जाण्याच्या कार्यांत अवश्य असणारे श्रम होत. ज्या पूर्ण स्वरूपाचें पृथ्वीवर किंचित् चिन्ह दिसत आहे त्या पूर्णत्वाप्रत जाण्यास या जन्मपरंपरेशिवाय व तिच्यांतील दुःख-भोगाशिवाय दुसरा मार्ग नाहीं. या ऐहिक परंपरेंतील एका जन्मांत माझ्या

व्यक्तिदीपाला प्रकाशित करण्यास एखादा किरण सांपडला नाहीं म्हणून मी या विश्वांत सूर्यच नाहीं असें कसें म्हणूं ? तो मला आढळत नव्हता किंवा त्याचेकडे बघण्याची माझी छाती नव्हती इतकेंच काय तें खरें. इतर सामान्य जन ज्याप्रमाणें अहंकाराच्या तडाक्यांत सांपडतात त्याचप्रमाणें स्वतःला मुक्त मानीत असतांच मीही त्या अहंकाराच्या ताब्यांत गेलेलों होतों. फरक इतकाच कीं, माझ्या मनांतील अहंकार जरा उच्च स्वरूपाचा होता.

**आयुष्य ही दैविक कामगिरी आहे. आयुष्य हें कर्तव्य आहे.** आयुष्याच्या इतर सर्व व्याख्या चुकलेल्या असून त्यांचें अनुगमन करणारांना दुर्मार्गी नेणाऱ्या आहेत. धर्म, शास्त्र, तत्त्वज्ञान ह्यांच्यामध्यें बाकींच्या मुद्यांवर कितीही भेद असला तरी त्या सर्वांची एका मुद्याविषयीं मात्र एकवाक्यता आहे कीं, प्रत्येक अस्तित्व हें लक्ष्य आहे, मनुष्यांच्या सर्व शक्तींचा पूर्ण विकास करणें व त्या पूर्ण विकसित शक्तींची एकतानता व एकवाक्यता करून आयुष्याचें अंतिम उद्दिष्ट शोधण्याकडे प्रवृत्ति ठेवणें हें तें लक्ष्य होय. मानव्याचें अंतिम साध्य साधण्याचे कामीं प्रत्येक व्यक्तीनें झटलें पाहिजे. परंतु कालस्थितीप्रमाणें प्रत्येक व्यक्तीला हें अंतिम साधण्यासाठींच दुय्यम प्रतीचीं कर्तव्यें प्रथम करावीं लागतात. ह्या दुय्यम प्रतीच्या कर्तव्यांची पूर्तता ही मानवीशक्तिविकासनास व सहकरणास मदत करते व अशा रीतीनें अबाधित व अंतिम सत्याचें संपादन सुलभ करूं लागते. एका मनुष्यास त्याच्या अगदीं नजीकच्या कांहीं थोड्याशा व्यक्तींचीच नैतिक व बौद्धिक प्रगति करणें शक्य असतें व म्हणून त्याचें तेंच दुय्यम लक्ष्य होतें दुसऱ्या एखाद्या मनुष्यास त्याच्या अंगीं विशेष शक्ति असल्यानें किंवा जास्त अनुकूल परिस्थिति असल्यानें राष्ट्रोद्धार करणें, स्वदेशाला संजीवन देणें किंवा सामाजिक व धार्मिक सत्यांचें प्रकटीकरण करणें हें शक्य असतें व म्हणून त्याचें दुय्यम लक्ष्य ठरतें.

मानवी जातीची अजून बालदशाच आहे. व म्हणून तिचें ज्ञान व तिची शक्ति हीं फारच मर्यादित आहेत. आपलीं विशिष्ट कर्तव्यें कोणचीं आहेत हें ठरविणें फार जड जातें; परंतु आपल्या प्रत्येकाच्या वांट्याला कांहीं तरी विशिष्ट कर्तव्य आलेलें आहे हें अनुमानानें सिद्ध करितां येतें. जर आयुष्य हें केवळ खाऊन मरण्यासाठींच नसेल तर हें अगदीं स्पष्ट आहे कीं, ह्या अस्तित्वांत जे कांहीं थोडेसे क्षण आपल्या वांट्याला आलेले आहेत

त्यांमध्यें ज्या स्वरूपांत आपण समाविष्ट झालेलों आहोंत, स्वरूपाची त्या शक्य तितकी उन्नति करण्यास झटणें हें आपलें कर्तव्य आहे.

आयुष्य ही देवाची कामगिरी आहे व म्हणूनच कर्तव्य हेंच आयुष्याचें शासन होय. त्या दैविक कामगिरीचें पूर्ण स्वरूप ओळखून त्या कर्तव्याची पूर्तता करण्यांतच आपल्या अस्तित्वाच्या प्रगमनाचीं बीजें आहेत. आत्मा अमर आहे. परंतु त्याच्या पूर्ण स्वरूपाप्रत त्यानें किती वेळानें व कशा रीतीनें जावें हें ठरविणें हें आपल्या हातीं आहे. प्रत्येकानें एखाद्या मंदिराप्रमाणें आपल्या आत्म्यास पावित्र्यांत ठेवावें. त्याला अहंकाराचा स्पर्श देखील होऊं देऊं नये. आपल्या आयुष्याचा प्रश्न, त्या प्रश्नाचें अत्यंत महत्व व त्याची धार्मिक पवित्रता ओळखून, प्रत्येकानें आपल्यापुढें ठेवावा. मग आपल्या भोंवतीं असणाऱ्या मनुष्यांनां कशाची अत्यंत आवश्यकता आहे हें नीट रीतीनें पहावें. मग आपल्या स्वतःच्या शक्तीची यथार्थ किंमत ठरवून त्यानें आपल्याला त्या आवश्यक गोष्टींपैकीं कोणचा भाग उचलतां येईल हें अजमावून ठरवावें. हें त्याचें ह्या आयुष्यांतील कर्तव्य ठरेल, परंतु हें कर्तव्य ठरवितेवेळीं कोणचाही व्यक्तिविषयक किंवा पक्षपाती विचार उपयोगी नाहीं. पूर्वग्रहानें किंवा दुराग्रहानें भलतीकडे वहावत न जातां, सर्व मानव्याचा विचार मनांत घेऊन अंतर्गत स्फूर्ति व आयुष्याच्या पवित्रतेनें व प्रेमानें उचंबळणारी विचारजागृति यांच्या सहाय्यानें, हा कर्तव्याचा प्रश्न सोडविला पाहिजे. **ज्या कालांत व ज्या परिस्थितींत आपला जन्म परमेश्वरानें घातला आहे त्या कालांत व त्या परिस्थितींत मनुष्यजातीला ज्यांची अत्यंत आवश्यकता असेल त्या वस्तूंच्या प्राप्त्यर्थ आपआपल्या शक्तीप्रमाणें आपला भाग ठरवून घेऊन, तो कर्तव्य ह्मणून स्वीकारून ती परमेश्वराची कामगिरी आहे ह्मणून समजून, माझ्या तरुण बंधूनों, तुह्मीं एकदां तिकडे आपलें आयुष्य अर्पण करण्याचा निश्चय केलात ह्मणजे मग मात्र तुम्हीं कोणच्याही संकटाला भीक घालतां कामा नये.** तुमच्या सर्व शक्तीं खर्च करून तें कर्तव्य पूर्ण करा. तें कर्तव्य पूर्ण करा, मग त्यांत तुमच्यावर लोक प्रीति करोत वा तुमचा द्वेष करोत. तें कर्तव्य पूर्ण करा, मग तुह्मांला इतर लोक साह्य करोत किंवा बहुधा तत्त्वनिष्ठेच्या वांट्याला येणारा एकांतवास तुमच्या साह्याला येवो. तुमचा मार्ग तुह्मीं स्पष्ट रीतीनें आंखलेला आहे. व ह्मणून दुःखाला व मोहाला दाद न देतां जर त्या मार्गाचें आक्रमण करून इच्छित

स्थलाला तुम्हीं जाणार नाहीं तर तुम्हीं भ्याड आहांत असें ठरलें जाईल. एका पॉलिश कवीचें एक सुंदर कवन मला आठवत आहे. त्या कवनांत त्या कवीला त्याची देवता सांगत आहे, "जा व मजवर पूर्ण विश्वास ठेव. तूं स्वतःच्या वैभवाचा विचार मनांत आणूं नकोस, तर ज्यांनां मीं तुझ्या स्वाधीन करीत आहें त्यांच्या हिताचा विचार कर. तुझ्याविषयीं लोकांनीं तिरस्कार व्यक्त केला, गर्वानें तुच्छ मानलें, तुझी छळणूक केली, तरी शांत रहा. कारण ह्या सर्व गोष्टी नाश पावतील, परंतु तुझें सत्कृत्य मात्र अबाधित राहील. जा व कर्तव्य हेंच तुझें आयुष्य मान. जरी तुझें अंतःकरण डळमळूं लागलें, जरी तुझ्या बंधूंकडून तुला साह्य मिळेनासें झालें, तरी तूं सदोदित कर्तव्यतत्पर रहा. अबाधित, अखंड व सतत कर्तृत्वरत हो. म्हणजे तूं स्वर्गीय संतानांत गणला जाशील." या सुंदर कवितेंत एकच दोष आहे. यांत बक्षिसाची आशा लावलेली आहे. ही आशा नष्ट व्हावी अशी माझी इच्छा आहे. ज्यांनां महत्कृत्यें करावयाचीं आहेत त्यांनीं त्यांनीं बक्षीस काय मिळेल हे बिलकूल पहातां कामा नये. **परमेश्वराकडून सत्कृत्यरततेला जे बक्षीस मिळावयाचें तें मिळेलच मिळेल. परंतु त्या बक्षिलाचा विचार आपल्या मनांत येतां उपयोगी नाहीं.** फल देणें वा न देणें हा अधिकार परमेश्वराचा आहे. आपला अधिकार कर्तव्य करण्याचा आहे. भविष्यधर्मांतील अनुज्ञा अशी आहे कीं, "तूं परहितरत हो व तुझी सर्व व्यवस्था परमेश्वराकडे सोंपीव." 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा कर्मफलहेतुर्भूर्माते संगोस्त्वकर्मणि'॥ हें तत्वज्ञान पूर्ण रीतीनें समजून घेण्यास मीं काय बौद्धिक श्रम केले, या आयुष्याच्या मूलतत्त्वांच्या अनुरोधानें जिवांत जीव आहे तोंपर्यंत वागण्याचा निश्चय मीं कसा केला, सॅव्होनाच्या तुरुंगांत जें माझें पवित्र कर्तव्य म्हणून मीं ठरविलें तें पवित्र कर्तव्य—**माझ्या प्रियतम देशाचें लोकसत्तात्मक राष्ट्रैक्य**—तें महत्कर्तव्य लोकनिंदेचा किंवा दुःखाचा वाटेल तितका भडिमार झाला तथापि नेटानें व निश्चयानें पार पाडावयाचें असा दृढ संकल्प करून मी पुनः कर्तृत्वतत्पर कसा झालों हें सर्वथैव येथें मीं सांगत बसत नाहीं. त्या वेळेस ज्या ज्या कठिण व परीक्षेच्या प्रसंगांतून मी गेलों त्या त्या प्रसंगांचीं टिपणें मीं करून ठेविलीं होतीं व तीं सर्व "एका अप्रसिद्ध माणसाची हकीगत" या नांवाच्या लहानशा निनांवी पुस्तकांत प्रसिद्ध करणार होतों. मीं अतिशय वारीक अक्षरांत पातळ

कागदावर ती सर्व हकीगत लिहून रोमच्या क्रांतीचे वेळेस मजबरोबर घेऊन त्या शहराला गेलों, परंतु परत येत असतां फ्रान्समध्यें ते कागद हरवले गेले. त्या वेळचे मनोविकार व विचार आतां पुन्हां लिहून काढणें अशक्य आहे. मी कोणाचीही मदत न घेतां शुद्धीवर आलों याचें मुख्य कारण हें कीं, धार्मिक विचारांचा व इतिहासाचा मेळ घालून मीं माझें तत्त्वज्ञान ठरविलें. परमेश्वराच्या कल्पनेपासून मी प्रगतीच्या तत्त्वावर उतरलों. ह्या विश्वप्रगतीच्या तत्त्वावरून आयुष्याच्या खऱ्या व्याख्येवर आलों. आयुष्य ही दैविक कामगिरी आहे व म्हणून कर्तव्यतत्परता हाच आयुष्य नेण्याचा मुख्य नियम होय हें मीं ठरविलें. आयुष्य ही कामगिरी आहे, आयुष्य हें कर्तव्य आहे, ह्यांत दृढ विश्वास बसल्यावर मग मीं माझ्या आयुष्याच्या कर्तव्यांत पुन्हां केव्हांही अविश्वास किंवा आळस करावयाचा नाहीं अशी शपथ घेतली. डॅन्टे ह्या कवीनें म्हटल्याप्रमाणें स्वात्मार्पणांतून मी शांतीप्रत आलों. ही शांति जबरीनें व निराशेनें मिळाली होती हें मला कंबूल आहे. कारण, मी दुःखाशींच स्नेह संपादिला व मी त्याचें पांघरूण करून त्यामध्यें जाऊन बसलों. परंतु कशाही रीतीनें ती मला मिळालेली असो, पण ती शांति होती. कारण, तेव्हांपासून आरडाओरड न करितां सहन कसें करावें हें मी शिकलों. मला सहनशीलता आली व शमयुक्ततेंत व स्वात्मलीनतेंत आयुष्य कसें न्यावें हें पूर्ण कळून आलें. मी ह्या ऐहिक अस्तित्वांतील व्यक्तिविषयक सर्व सुखांनां कायमचा दुःखमय रामराम ठोकला. माझ्या स्वतःच्या हातानें मीं थडगें खणलें–परंतु तें प्रीतीसाठीं नव्हतें; कारण परमेश्वर साक्ष देईल कीं, आतां माझे केश शुभ्र झाले आहेत तथापि माझ्या तारुण्याच्या भरांत माझें मन जितकें प्रेमळ होतें तितकेंच तें अजूनही आहे. म्हणून प्रीतीला नव्हे तर फलाशेला, उत्कंठेला, प्रीत्युत्पन्न समाधानाच्या इच्छेला, गाडून टाकण्यासाटीं मीं तें थडगें खणलें.) व त्यावर माझ्या हातानें माती लोटली. कारण, त्यांत पुरून टाकलेला अहंकार पुन्हां वर येऊं नये.) कोणास दिसूंही नये. कांहीं प्रसिद्ध असलेलीं व कांहीं कोणासच माहीत नसलेलीं अशीं अनंत कारणें घडून आल्यानें माझें आयुष्य दुःखमय होतें, दुःखमय आहे व लवकरच तें संपणार नसेल तर असेंच दुःखमय रहाणार आहे. परंतु त्या वेळेपासून माझ्या या व्यक्तिविषयक दुःखाला मीं केव्हांही माझ्या कर्तव्याच्या आड येऊं दिलें नाहीं. माझ्या आयुष्याच्या उत्तरार्धांत जी थोडीबहुत

प्रेमाची देणगी (कारण, दुसरी कशाचीही मला जरूर नसून मी फक्त प्रेमाचा भुकेला आहें,) परमेश्वरानें मला देऊन माझ्या अस्तित्वाच्या असह्यत्वाचा थोडासा भार कमी केला, त्या प्रेमाच्या देणगीबद्दल मी त्या विश्वाच्या चालकाचा अत्यंत आभारी आहें. परंतु प्रीतीच्या या समाधानालाही जरी मी अंतरलों असतों, तरी मला अशी खात्री आहे कीं, मी आहें तसाच असतों. इटलींतील उष:कालाच्या रम्यतेनें मंडित झालेला सूर्य मस्तकावर प्रकाशित असो किंवा उत्तरध्रुवाकडील प्रेताची कळा धारण केलेलें बर्फमय वातावरण पसरलेलें असो, त्यामुळें आपल्या कर्तव्यांत कांहीं एक फरक होत नाहीं. परमेश्वर हा ऐहिक वातावरणाचे पलीकडे स्वर्गाधिष्ठित झालेला आहे. त्याच्या आज्ञेनुरूप असणाऱ्या कर्तव्याचा, निष्ठेचा व भविष्याचा तारा आपल्या हृदयाकाशांत अखंड चमकत असतो; मग त्याचा प्रकाश एखाद्या थडग्यांतील मिणमिणणाऱ्या दिव्याप्रमाणें भयंकर अंधारांत प्रतिबिंबित होवो किंवा न होवो!

इंग्लंडमध्यें माझ्या निवासाचा पहिला भाग हा राजकीय दृष्ट्या कांहीं फारसा महत्वाचा गेला नाहीं. एक तर माझ्या मनाला नैतिक विपत्तींचा झालेला त्रास व दुसरें असें कीं, त्या मनश्चंचलतेला दारिद्र्याचें मिळालेलें पाठबळ. माझ्या मातापितरांनीं मला जितके पैसे धाडले तितके सर्व मी इटलीच्या कार्यास्तव काढलेलें कर्ज फेडण्यांत घालवून बसलों. व शिवाय इतरांसाठींही बरेच पैसे खर्च केले. १८३७ व ३८ सालीं दारिद्र्यानें माझी पाठ पुरविली होती. मन उदासीन व पोटाला अन्न नाहीं! मीं माझ्या मातापितरांना ती दु:खद अवस्था कळवून माझी अडचण टाळली असती; कारण, त्यांनीं मजसाठीं वाटेल तो त्रास सोसून मला मदत धाडली असती. तथापि या हतभाग्यासाठीं ज्यांनीं आजपर्यंत अमर्यादित स्वार्थत्याग केलेला होता त्यांना पुन्हां त्रास न व्हावा एतदर्थ मीं माझी स्थिती त्यांच्यापासून छपवून ठेविली. मी गुपचुप रीतीनें दारिद्र्याशीं झुंजत होतों. माझ्या आईनें किंवा माझ्या जिवलग मित्रांनीं मला आठवण ह्मणून दिलेल्या प्रियवस्तूंनांही पुन्हां परत मिळण्याची आशा सोडून मी गहाण टाकीत चाललों. त्यानंतर थोडथोड्या किंमतीच्या वस्तु गहाण ठेविल्या. शेवटीं एके दिवशीं शनवारीं माझा एक जुना कोट व बुटांचा एक जोड घेऊन एका दुकानीं मी गेलों व त्याबद्दल रविवारापुरतें अन्न मला मिळालें! नंतर मजजवळ कांहीं उरलें

नाहीं, तेव्हां माझ्या देशांतील कांहीं जण मजला जामीन झाले व मी दुकानों-दुकानीं उधार मागत हिंडूं लागलों. हें दुकानदार दुर्दैवी लोकांचें सर्व वित्त हरण करतात. शेंकडा चाळीस पन्नास व्याज घेण्याच्या बोलीनें मनुष्याच्या दुर्दैवाचा फायदा घेऊन त्याला किरकोळ रकम देतात.–व दारूबाजांनीं व दुराचारांनीं भरलेल्या दुकानांत आठवड्या:आठवड्यांनीं त्याची सव्याज फेड करून घेतात. या सर्व लज्जास्पद प्रकारांचा मी क्रमाक्रमानें अनुभव घेऊन बसलों. हा अनुभव केव्हांही अत्यंत त्रासदायक झाला असता. परंतु माझ्या त्या वेळच्या स्थितींत तर या त्रासाला पारावार राहिला नव्हता. मी एकटा, एकलकोंडेपणांत पडलेला, कोणी माहिती द्यावयास नाहीं, मनाला स्वास्थ्य नाहीं, पोटाला अन्न नाहीं, अनोळखी लोकांच्या गजबजलेल्या बाजारांत नीचावस्थेंत उभा व जेथें दारिद्र्यांत सांपडलेल्या मनुष्याला निर्दय रीतीनें वागविण्याची पद्धति प्रचलित आहे, अशा लंडन शहरांत रहात असलेला! परंतु या भयंकर परिस्थितीशीं मीं शौर्यानें झुंज घेतली. मी या प्रसंगाची हकीगत फक्त एवढ्याचसाठीं देत आहें, कीं, मजप्रमाणेंच ज्यांच्यावर असे प्रसंग गुदरतील त्यांनीं माझ्या उदाहरणाकडे पाहून तरी आपला धीर सोडूं नये किंवा स्वतःला नीच व यःकश्चित लेखूं नये. माझी अशी इच्छा आहे कीं, मातांनीं आपल्या बालकांना कंटकपणा येईल व आयुष्यांतील सर्व संकटांना पाठ देण्याची हिम्मत राहील अशा प्रकारचें शिक्षण द्यावें. कारण, यूरोपच्या या क्रांतिकारक स्थितींत आपल्या व आपल्या नातलगांच्या परिस्थितीवर आपला ताबा रहाणें बिलकूल शक्य नाहीं. अशा चंचल कालांत मुलांना चैनींत व विलासांत वाढविण्यापेक्षां व त्या योगानें त्यांच्या अंगांतील संकटक्षमता व काठिण्य नष्ट करण्यापेक्षां जर आया आपल्या मुलांना लहानपणापासून कंटक बनवितील तर त्या मुलांचें खरें कल्याण केल्यासारखें होईल. नैसर्गिक रीतीनेंच जे विलासीपणांत वाढलेले होते व सुखाचे दिवसांकरितांच वास्तविक जे योग्य होते असे कित्येक तरुण लोक, ज्या संकटांत मीं हांसून खेळून दिवस काढले त्याच संकटांत कचरून जाऊन, गुन्हे करण्यास किंवा आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेले मी पाहिले आहेत. संकटक्षमतेच्या व कंटकपणाच्या या अभावाचें मुख्य पाप माझ्या मतें त्यांच्या मातृवर्गाकडे आहे. माझी आई—तिचें नामोच्चरण सदोदित धन्य असो—भावी कालाची सूक्ष्म दृष्टीनें परीक्षा करून मला असेंच शिक्षण देती झाली

कीं, ज्या योगानें दुर्धर प्रसंगांतही अढळ रहाण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य यावें. आपल्या मुलाला भविष्यकाळीं सुख होईल अशी शिक्षा देणारी जी प्रीति तीच खरी व दूरदर्शी प्रीति होय.

दारिद्र्याचा तो पहिला तडाखा सोसल्यानंतर मग मी वाङ्मयात्मक प्रयत्नानें कांहीं तरी मिळविण्याच्या नादास लागलों. मीं कांहीं ठिकाणीं ओळखी पाडल्या व बराच माहीत झालों. पुष्कळ मासिकपुस्तकांत माझे लेख घेतले गेले व अशा रीतीनें साधारण दर्जाप्रमाणें रहाण्याइतकीं साधनें मला मिळवितां आलीं. त्या लेखांमध्यें काय दोष आहेत किंवा काय गुण आहेत हें ठरविणें वाचकांकडे आहे. ते सर्व लेख या मालेंत प्रसिद्ध केलें जात आहेत. इटालियन विषय घेऊन किंवा इतर विषयांत मधून मधून इटलीचा संबंध आणून मीं त्या लेखांच्या द्वारें इंग्लिश लोकांचें लक्ष माझ्या देशाकडे लागावें असा प्रयत्न केला. त्या वेळेस इटलीबद्दल इंग्लिश लोक पूर्ण रीतीनें उदासीन होते. परंतु या लेखांमुळें हलके हलके त्यांच्यांत चळवळ उत्पन्न होऊन १८४५ मध्यें त्यांची इटालियन कार्याला पूर्ण सहानुभूति मिळविण्यासाठीं मला एक कायमचें मंडळ स्थापतां आलें. आपल्या राष्ट्रैक्याबद्दल इंग्लंडमधल्या पूर्ण सहानुभूतीचें श्रेय माझ्या या मंडळाकडेच बहुतांशीं येत आहे.

स्वतंत्रतेच्या पुष्कळ दिवस मिळत आलेल्या शिक्षणानें इंग्लंडमध्यें व्यक्तिगौरवाची उदात्त कल्पना व व्यक्तिमात्राबद्दल आदरबुद्धि हे सद्गुण प्रामुख्यानें वास करीत आहेत. त्यांनां एकदां एखादें मत पसंत पडलें ह्मणजे मग त्याप्रमाणें कृति केल्याशिवाय ते स्वस्थ बसणार नाहींत. व जरी एखादें मत त्यांनां पसंत नसलें तरी जर कोणी तें अगदीं मनापासून प्रतिपादन करूं लागला तर तें आदरपूर्वक ऐकून घेण्यास ते तयार असतात. त्यांची मैत्री ही प्रथम जडत नाहीं, परंतु एकदां जडली कीं मग कायमची झाली असें समजावें. केवळ तोंडापुरतेंच त्यांचें प्रेम नसून तें त्यांच्या वर्तणुकींत जास्त उतरत असतें. व जरी एखाद्या दुसऱ्या मुद्यावर मतभेद असला तरी त्यांचें प्रेम अढळ असतें. माझ्या प्रत्येक विचाराला त्या वेळेस अशक्यतेच्या अक्षदा लावण्यांत आल्या होत्या. परंतु माझ्या स्वार्थत्यागी चरित्रानें त्या विचारांत माझी किती पूर्ण निष्ठा आहे हें पक्कें समजून त्या माझ्या कळकळीनेंच कित्येक थोर मनाचे इंग्लिश लोक माझे स्नेही झाले. ज्या भूमीमध्यें ( इंग्लंडमध्यें ) मी हा मजकूर लिहीत आहें त्या भूमीचें नामोच्चारण मी सदोदित कृतज्ञतेनेंच करीत राहीन. कारण, इंग्लंड ही माझी दुसरी स्वदेशभूमि झाल्यासारखी मला वाटत

आहे. मी हें चरित्र माझ्या व्यक्तिविषयक वृत्तांताकरितां लिहीत नसून तें तत्कालीन राजकीय चळवळींच्या वृत्तांतासाठीं लिहीत आहें व म्हणून माझ्या पुष्कळ मित्रांचीं नांवें देत बसण्याचें हें स्थळ नाहीं. तथापि ॲशर्स्ट नांवाच्या कुटुंबाचें नांव दिल्याशिवाय मला रहावत नाहीं.

बऱ्यांच विद्वान इंग्लिश लोकांशीं झालेली ओळख व इटलीमध्यें सुरू असलेल्या वाङ्मयात्मक जागृतीवरील इंग्लंडमध्यें पहिल्या एक दोन वर्षांत मीं लिहिलेले लेख यांच्या योगानें माझे मनांत फार दिवस अपूर्ण राहिलेली एक इच्छा प्रबळ झाली. ज्याच्या लेखांचा इटलीवर अत्यंत महत्वाचा परिणाम झालेला आहे त्या फास्कोलोचे सर्व ग्रंथ प्रसिद्ध करावे असा माझा मनोदय होता. फास्कोलोनें इटलीमध्यें अवसानप्रपूरित वाङ्मय निर्माण केलें. त्यानें देशभक्तीच्या व स्वदेशाच्या कल्पनेचीं बीजें पेरलीं. त्याला देशत्यागाची शिक्षा झाल्यानंतर त्यानें बहुतेक अर्धीमुर्धीच पुस्तकें लिहिलेलीं होतीं तीं सर्व गोळा करण्यास आरंभ केला. तेव्हां इटलीमध्यें अज्ञात असलेला फास्कोलोचा एक ग्रंथ मला उपलब्ध झाला. लेटेस "अपोलोजीटिका" हा ग्रंथ सांपडतांच मला फार आनंद झाला. आजपर्यंत याची उपेक्षा झालेली पाहून गुलामगिरींत रखडणाऱ्या राष्ट्राला सद्गुणांची किंमत किती कमी कळत असते व आपल्या थोर पुरुषांच्या कृतीबद्दल त्यांची किती अनावस्था असते हें पाहून मला फार वाईट वाटलें. त्या ग्रंथाचीं कांहीं पानें गहाळ झालेलीं होतीं, पण फास्कोलोच्या एका ट्रंकमध्यें तींही सांपडलीं. परंतु इतके दिवस धूळ खात पडलेल्या या ग्रंथास मी इतका महत्त्वाचा मानीत आहे असें पाहतांच त्या पुस्तकवाल्यानें, फास्कोलोनें डॅन्टेची ती आवृत्ति प्रसिद्ध करण्याचें ठरविलें होतें ती आवृत्ति मी विकत घेत असल्यासच तो मुख्य ग्रंथ द्यावयाचा असा आग्रह धरला व किंमत ४०० पौंड मागूं लागला. मजजवळ तर पुरते ४०० पेन्स देखील नव्हते. अखेर एका इटालियन प्रकाशकास महत्प्रयासानें ते दोन्ही ग्रंथ विकत घेण्यास तयार केलें. परंतु पुढें पहातों तो डॅन्टेची आवृत्ति पूर्ण तयार केलेली नव्हती. फास्फोलोनें कांहीं भागच लिहिलेला होता व बाकीच्या भागावर टीपा वगैरे देणें तसेंच राहिलें होतें. ही अपूर्णता त्या इटालियन पुस्तकप्रकाशकास कळली तर तो तीं मुळींच विकत घेताना. म्हणून मी गुपचिप रीतीनें त्या पुस्तकप्रकाशकास कळूं न देतां डॅन्टेच्या काव्याचा फास्कोलोनें अपुरा टाकलेला भाग स्वतः टीपा देऊन व पाठभेद घालून लिहिला. सहा

महिने माझ्या लहानशा खोलींत हस्तलिखित प्रतींचे ढीग पसरलेले होते. मीं अगदीं काळजीनें व फास्कोलोच्या विचाराशा शक्य तितकी तन्मयता करून तें काम पुरें केलें व अखेर 'फास्कोलोचे राजकीय लेख', हें पुस्तक प्रसिद्ध केलें व डॅन्टेची आवृत्तीहीं छापून काढली.

आतां मला असें वाटतें कीं, डॅन्टेच्या आवृत्तींत माझा असलेला भाग फास्कोलोचे भागापासून भिन्न आहे हें प्रसिद्ध करण्यास कांहीं हरकत नाहीं व ह्मणून मीं हल्लीं हें गौप्यस्फोटन करीत आहें.

इ. सन १८४४ सालीं बंडीएरा बंधूंनीं इटलीवर मोहीम केली. "बन्डीएरा बंधूंचा वृत्तांत" ह्या लेखामध्यें मी त्याची सर्व महत्वाची हकीगत दिलेलीच आहे. हा लेख त्यांच्या मृत्यूनंतर लवकरच लिहिलेला असून तो या मालेंत प्रसिद्ध केला आहे. ह्मणून त्याबद्दल जरी कांहीं विशेष चर्चा येथें करावयास नको आहे, तथापि त्या वेळेस इंग्लिश पोस्टखात्यानें सरकारी हुकुमावरून माझीं पत्रें गुप्त रीतीनें फोडण्याचें निंद्य कृत्य कसें केलें याबद्दल थोडीशी हकीगत देणें प्राप्त आहे. मीं पूर्वीं कान्सील नांवाच्या हेराची जी हकीगत दिली आहे तितक्याच नीचतेचें कृत्य इंग्लिश प्रधानमंडळानें केलेलें आहे. १८४४ च्या मध्यभागीं जूनमध्यें किंवा जुलैमध्यें माझ्या असें ध्यानांत आलें कीं, माझीं पत्रें मला सुमारें तास दोन तासांच्या अंतरानें उशिरां येऊन मिळतात. इंग्लंडमध्यें निरनिराळ्या पोष्ट आफिसांमधून जनरल पोष्ट ऑफिसमध्यें सर्व पत्रें धाडण्यांत येत व तेथें ज्या तासाला तीं पत्रें तेथें पोंचतात त्या तासाचा शिक्का मारण्यांत येई. नंतर सुमारें एक दोन तासांत सर्व पत्रें ज्याचीं त्यास मिळत. मला शंका आल्यावर मीं पत्रावरील छाप वगैरे फार लक्ष लावून पाहूं लागलों. तेव्हां मला असें आढळून आलें कीं, माझ्या पत्रांवर दोन शिक्के पडल्याच्या खुणा स्पष्ट दिसून येत. व त्यांपैकीं पहिला छाप नाहींसा करण्यासाठीं दुसरा मारण्यांत येत असे. याचा उद्देश अर्थातच असा होता कीं, पहिला तास खोडून मला पत्र उशीरां आलें असें न भासूं देतां दुसऱ्या छापानें एक दोन तास पुढें ढकलले जावे व पहिल्या छापांतील तास ओळखतां येऊं नये. इतक्या पुराव्यानेंच माझी खात्री झाली. परंतु इतर लोकांस तें खरें वाटेना. कारण, ब्रिटिश लोकांचा इमानीपणा जगविख्यात आहे असें त्यांचें ह्मणणें पडे ! ते मला माझ्या संशयाबद्दल हसूं लागले. ते शिक्के अशाच रीतीनें मारलेले असत कीं, खरा तास कांहीं केलें तरी

ओळखतां येऊं नये व ही अस्पष्टता जणूं काय घाईघाईनें शिक्का मारला गेला ह्मणूनच झाली आहे असें भासावें. मग नक्की तपास करण्याकरितां मीं माझ्या नांवावर कांहीं पत्रें सकाळीं लंडनमधल्या एका पोष्टांत टाकलीं. त्या पत्रांवर पहिला शिक्का अर्थातच सकाळीं दहा वाजल्याचा पडला पाहिजे होता. त्याप्रमाणें तो पडला. परंतु तीं पत्रें मजकडे येण्याचे आधीं सरकारी हुकुमाप्रमाणें एका गुप्त कचेरींत गेलीं. फोडून वाचून व पुन्हां बंद करून नंतर त्या कामासाठींच नेमलेल्या एका स्वतंत्र शिपायाकडून तीं मला दुपारीं दोन तास उशिरानें मिळालीं ! या सर्व निंद्य कृत्यास दोन तास लागत हें छपविण्याकरितां पत्रें मिळाल्याचा शिक्का दहा वाजतां जो पडला होता त्यावरच नेहमींप्रमाणें दुसरा एक शिक्का मारण्यांत आला व तो बाराचा होता. दहाच्या वरील शून्यावरच दोनचा शिक्का मारला होता. परंतु हलगर्जीपणानें हें काम बेमालूम केलें गेलें नव्हतें. याहूनही जास्त खात्री करून घेण्यासाठीं मीं साक्षीदारांसमक्ष एकाच वेळेला कांहीं माझ्या नांवाचीं व कांहीं मी रहात होतों त्याच पत्त्यावर, परंतु बनावट नांवावरचीं, अशीं पत्रें पोष्टांत टाकलीं. साक्षीदारांसमक्ष माझीं पत्रें दोन तासांनीं मागून आलीं या मजकुराची साक्ष त्यांनीं मला लिहून दिली. या विश्वासघाताचा आणखी तलास काढून पुराव्याची सांखळी बळकट करण्यासाठीं मीं दुसऱ्या कांहीं युक्ति योजिल्या. पत्रांत कांहीं वाळूचे बारीक कण, बारीक बीं किंवा केंस घालावे व तीं पत्रें माझे नांवावर टाकावीं. ते कण वगैरे अशा रीतीनें ठेवलेले असत कीं पत्रें फोडल्याशिवाय ते पत्रांतून गळणें शक्यच होणार नाहीं. कांहीं वेळां पत्र डकवितांना मुद्दामच तिरपें डकवावें व तें ध्यानांत ठेवावें. तें पत्र जेव्हां मिळे तेव्हां तो तिरपेपणा नाहींसा झालेला असे. या व इतर कांहीं रीतीनें निःसंशय रीतीचा पुरावा गोळा केल्यावर मीं तें सर्व कृत्य थामस् डंकसनी या नांवाच्या एका पार्लमेंटच्या सभासदाचे कानांवर घातलें व सर्व पुरावा त्याचे स्वाधीन केला. शिवाय पार्लमेंटला ह्या कृत्याची चौकशी व्हावी ह्मणून एक अर्ज केला.

ब्रिटिश सरकारवर मीं केलेल्या ह्या आरोपानें विलक्षण चळवळ उडाली. मुख्य प्रधानांनां प्रश्नावर प्रश्न विचारण्यांत आले. त्यांनीं प्रथम प्रथम उडवाउडवीचींच उत्तरें दिलीं. पुढें माझा बारीक तपास काढून मीं पुरावा गोळा केल्याशिवाय हा आरोप केलेला नाहीं ही जेव्हां त्यांची खात्री झाली तेव्हां तें

नीच कृत्य केल्याची त्यांनीं कबुली दिली. पण ती तरी किती निंद्य पद्धतीनें! पार्लमेंटमध्यें मागें अशीं पत्रें फोडण्याचा एक कायदा पास झालेला आहे ह्मणून आह्मीं तीं पत्रें फोडलीं व शिवाय मॅझिनी हा दुर्वर्तनी आहे ह्मणून तसें करणें भाग पडलें असें सांगण्यांत आलें. सर जेम्स ग्रॅहॅम ह्या प्रधानानें फ्रान्समध्यें असतांना मीं एका खुनी मनुष्यास साह्य दिलें ह्मणून मजवर आरोप केला. मीं त्याचें उत्तर धाडून तो सिद्ध करण्याविषयीं सार्वजनिक आव्हान केल्यावर सर जेम्स ग्रॅहॅम यानें—या इंग्लिश प्रधानानें—भर हाऊस ऑफ कामन्समध्यें माझी सपशेल माफी मागितली. (याच वेळेला मॅझिनीचे वर्तनाबद्दल थॉमस कार्लाइल यानें 'टाइम्स' ला धाडलेलें पत्र फार महत्त्वाचें आहे):—

टाइम्सकर्ते यांस:—मॅझिनीचे पत्रांविषयीं लिहितांना आपल्या कालच्या अंकांत आपण त्या निंद्य कृतीचा निषेध केला आहे हें ठीकच आहे, परंतु तुह्मीं असें लिहिलें आहे कीं, मॅझिनी हा तुह्मास मुळींच माहिती नाहीं व तो अतिशय नीच कोटींतला मनुष्य जरी असता तरी त्याचीं पत्रें फोडणें हें गुन्हा करण्यासारखें होय असेंच तुमचें मत तुह्मीं दिलें असतेंत.

आतां या तुमच्या उल्लेखानंतर जर मीं मॅझिनीची कांहीं माहिती दिली तर ती बरीच उपयुक्त होईल यांत शंका नाहीं. मी असें सांगतों कीं, मॅझिनी हा बहुतेक थोर व कर्त्या लोकांस माहीत आहे व तो अतिशय नीच कोटींतल्या मनुष्यांहून फार फार श्रेष्ठ आहे. आज बरींच वर्षें मॅझिनीची ओळख असण्याचा मान मला मिळालेला आहे. व त्याच्या व्यावहारिक ज्ञानाबद्दल माझें कांहींही मत असलें तरी मोठ्या खुषीनें मी अशी साक्ष देण्यास तयार आहें कीं, आजपर्यंत जर मी कोणचा एखादा बुद्धिवान्, सद्गुणी, महान् योग्यतेचा, उदारात्मा असा नरमणी पाहिला असेल तर तो मॅझिनी हाच होय. ज्यांची संख्या दुर्दैवानें या जगांत फारच थोडी आहे व जे अद्वितीय ह्मणून ठरलेले आहेत अशा देशवीरत्वाच्या पदवीला योग्य असलेल्या महंतांत त्याची गणना आहे. देशवीरत्वाचा जे खरा अर्थ जाणतात व बभ्रा न करितां आपआपल्या परीनें शक्य तितक्या उदात्ततेंत त्याप्रमाणें आचरण करतात, त्या साधु पुरुषांत मॅझिनीची मी गणना करतों.

परंतु पत्रव्यवहारासंबंधीं जो मुख्य प्रश्न आहे, त्याचा विचार अवश्य झाला पाहिजे. ब्रिटिश पोष्टऑफिसमध्यें आजपर्यंत आपण विश्वास ठेवीत

होतों. त्याचप्रमाणें पत्रें हीं अत्यंत पूज्य मानलीं गेलीं पाहिजेत. लोकांचीं पत्रें नकळत फोडणें हा गुन्हा खिसे कातरण्याच्या गुन्ह्याहूनही अत्यंत भयंकर व राक्षसी आहे. जेव्हां एखादा नवीन गनपॉवडर प्लॉट फोडावयाचा असेल किंवा एखाद्या राष्ट्रघातकी विश्वासभंगाला उघडकीस आणल्याशिवाय राष्ट्रनाश होत आहे अशा अपवादात्मक प्रसंगीं पाहिजे तर पत्रें फोडा, परंतु इतर देशचे बादशाहा जेव्हां तुमची मदत मागावयास येतात तेव्हां त्यांस साफ असें सांगा कीं, अशा निंद्य रीतीनें हें ब्रिटिश राष्ट्र तुम्हांस मदत करूं इच्छित नाहीं. कळावें.

तारीख १५ जून १८४४.

आपला आज्ञांकित,

**थॉमस कार्लाइल.**

पार्लमेंटच्या कायद्याचें जें कारण सांगण्यांत आलें होतें त्याबद्दलही मी चौकशी करण्यासाठीं कमेटी नेमविली. ही भयंकर रीत केव्हांपासून सुरू आहे याचा संपूर्ण इतिहास उघडकीस आला. पार्लमेंटमधल्या दोन्ही हॉउसेसच्या त्या कमेटीच्या निकालांत-जरी तो निकाल फार संभाळून संभाळून लिहिला गेला होता तथापि--असें स्पष्ट कबूल केलें गेलें कीं, १८०६ पासून १८४४ पर्यंत अधिकारावर आलेल्या सर्व प्रधानांनीं हें निंद्य कृत्य केलेलें आहे. **स्पेन्सर, कॅनिंग, मॉर्किस ऑफ् लॅन्सडाउन, लॉर्ड पामर्स्टन, ड्यूक ऑफ वेलिंग्टन, लॉर्ड रसेल, नॉर्चेडि** व आणखी कित्येक प्रधान यांनीं लोकांचीं पत्रें त्याच्या नकळत फोडलेलीं आहेत ! व तींही भयंकर संकट निवारणार्थ किंवा स्वराष्ट्रसंरक्षणासाठींच केवळ नव्हेत अथवा इतर देशांत गुलामगिरीचा जुलूम अबाधित चालावा म्हणून माझींच पत्रें किंवा इतर देशभक्तांचींच पत्रें फोडलीं जात होतीं असें नव्हे, तर खुद्द इंग्लिश लोकांची, व खुद्द थॉमस डन्कोम यांचीं स्वतःचींही पत्रें फोडलीं जात होतीं ! व गुन्हेगारीच्या कायद्यांत ज्याला कडक शिक्षा आहेत अशा भयंकर अपराधांनीं तें पत्रें फोडण्याचें कृत्य छपविण्यांत येई ! खोटे छाप मारणें, बनावट शिक्का करणें वगैरे गुन्हे कांहीं एक शिक्षा न होतां चालू होते. फ्रान्समध्यें व स्विट्झर्लंडमध्यें तेथील सरकारनें माझ्याशीं नीच कपटप्रयोगानें विश्वासघात केल्याची हकीकत मागें दिलेलीच आहे. परंतु त्यांनां, मी त्यांच्या राज्यपद्धतीचा विध्वंस करूं पाहत होतों असें तरी म्हणण्यास जागा होती. परंतु इंग्लंडमध्यें मी काय केलें होतें ?

मी त्यांच्या सरकाराविरुद्ध कांहीं कट करीत असल्याचा त्यांनां यत्किंचितही संशय आलेला नव्हता. तथापि इतर सरकारांनां खुष करण्यासाठीं एखाद्या बंद्या गुलामाप्रमाणें या इंग्लंडनें माझ्या देशावर असलेल्या पारतंत्र्यास कायम ठेवण्याकरितां मदत दिली.

माझीं पत्रें फोडलीं जात हें कबूल केल्यावर मग तरी जें सत्य तेंच प्रसिद्ध करावयाचें होतें. पण नाहीं. पार्लमेंटमध्यें जेव्हां असे प्रश्न विचारण्यांत आले कीं, माझ्या पत्रांतील मजकूर आस्ट्रिया वगैरे परक्या सत्ताधीशांनां कळविला जात होता कीं नाहीं, तेव्हां लार्ड अबर्डीन यानें त्याचें उत्तर दिलें. ह्या गृहस्थांनां सर्व इंग्लंड त्यांच्या मनमोकळेपणाविषयीं व सत्यप्रीतीविषयीं मान देत होतें. ज्यांचा शब्द वेदतुल्य मानला जात असे त्या या इमानी व उदार लॉर्ड अबर्डीननें भर पार्लमेंटमध्यें उत्तर दिलें कीं, "त्या पत्रव्यवहारांपैकीं एक अक्षरसुद्धां कोणच्याही विदेशी सरकारला कधींही कळविण्यांत आलेलें नाहीं." टाळ्यांचा गजर झाला–प्रधानांच्या कोणच्या वाक्याला टाळ्यांचा गजर होत नाहीं ? थोडेच दिवसांत कमेटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. व त्यांत असें लिहिलें कीं, "या पत्रव्यवहारांतील कांहीं भाग विदेशी सरकारांनां कळविण्यांत आला. (हाऊस ऑफ लॉर्डस.) विदेशी सरकारविरुद्ध होणाऱ्या उठावणीस बंद करतां येईल इतका मजकूर त्यांस कळविला जात होता. (हाउस ऑफ कामन्स.)"

माझीं पत्रें ज्या वेळेस फोडलीं गेलीं त्याच वेळेस बॅन्डीएरा बंधूंची उठावणी होणार होती. व याबद्दलचीं मला आलेलीं पत्रें इंग्लंडनें इटलीच्या जुलुमी सरकाराला पाठवून त्या देशवीरबंधुद्वयाच्या नाशाची तयारी करविली. इंग्लंडच्या सरकारनें हें अधम कृत्य केलें यांत कांहीं नवल नाहीं. 'राज्याचें प्रधान अंग हे राज्यकर्ते, परंतु अम्मल चालवीत नाहींत.' 'शक्तित्रयांच्या समतोलनांत प्रगतीचें खरें रहस्य आहे.' वगैरे वेडगळ व ठरलेल्या त्याच त्याच कोट्या लढवून मर्यादित राजसत्तेची पद्धति जेथें सुरू आहे त्या राष्ट्रांत अनीति ही प्रचलित असावयाचीच. त्यांतील सर्व सरकारी अधिकारी व्यक्तिविषयक दृष्टीनें कितीही इमानी ह्मणवीत असले तथापि या असत्य व निसर्गविरुद्ध राजसत्तेंत विश्वास ठेवूं लागल्यानें ते प्रत्येक कृत्यांत धरसोडीचें निंद्य आचरण करूं लागतात. आयुष्य हें सरळ रीतीनें व एकरूपतेंत नेण्याच्या ऐवजीं व्यक्ति व अधिकार यांत ते भेद करण्यास शिकतात. व्यक्तिरीत्या जे

घोर अपराध म्हणून ठरतात तेच कारस्थानी व मंत्री या नात्यानें ते खुशाल करीत असतात. अशा रीतीनें हे राजकीय अनीति करूं लागले कीं, त्यांच्या हाताखालील अंमलदारही अनीतिमान होतात. त्यांस लगेच असें वाटूं लागतें कीं, दुसऱ्याचीं पत्रें फोडून त्याचीं गुप्त कृत्यें चोरणें-दुसऱ्याची मालमत्ता सरकारी हिताकरितां चोरणें-हें जर कायदेशीर आहे तर मग तशींच कृत्यें आमच्या कुटुंबाचे हिताकरितां करणें कायदेशीर कां नसावें ? यूरोप खंडावर कोणच्याही देशांत फुटलीं जात नाहींत इतकीं पत्रें इंग्लंडमध्यें फुटलीं जात आहेत. व ज्या पत्रांत कांहीं रक्कम पाठविली जाते त्या पत्रांबद्दल साक्ष देतांनां पोष्ट ऑफिसचे सेक्रेटरी त्या कमेटीपुढें म्हणतात, " आंत रक्कम असलेल्या पत्रांविषयीं नांवच काढणें नको ! ते पैसे रस्त्यांत फेंकून दिले काय व पोष्टांत फेंकले काय सारखेंच. या कामांत भयंकर लुटालूट चालू आहे वगैरे. " जेव्हां लॉर्ड अबर्डीननें पत्रें फोडण्याचें ठरविलें तेव्हां अर्थातच दुय्यम अधिकाऱ्यांनां त्या कटांत सामील करावें लागलें. सुमारें १०० निरनिराळ्या अगदीं खालच्या दर्जाच्या नोकरांस ही गोष्ट माहीत होती. या नोकरांत अज्ञान व दरिद्री लोकांचांच भरणा असल्यानें ते सार्वजनिक अडचणींत जें केलें जातें तेंच खाजगी अडचणींतही करूं लागणार. इंग्लिश लोक नीतिभ्रष्ट झालेले आहेत. राजकीय पापांच्या राशी पडत असतांनांही त्यांच्या खाजगी वर्तनास कालिमा लागत नाहीं अशी त्यांची समजूत झालेली आहे. वर्तनाच्या-खाजगी व सार्वजनिक वर्तनाच्या-एकवाक्यतेची कांहीं लाज असती तर त्यांनीं लॉर्ड अबर्डीनच्या अपराधाबद्दल चांगली शिक्षा दिली असती. परंतु त्या राष्ट्राला त्याची लाज नाहीं. भर पार्लमेंटमध्यें ज्या दिवशीं त्या लॉर्डनें हें धडधडीत खोटें विधान निर्लज्जपणानें केलें त्या दिवसापासून जर सर्वांनीं एखाद्या भामट्याप्रमाणें त्याला आपल्या घरांत पाय ठेवूं द्यावयाचा नाहीं असा निश्चय केला असता व त्याच्याशीं असलेला संबंध तोडून टाकला असता तर त्यापासून इतरांनां वचक बसला असता. परंतु सरकारी इभ्रतीचे नांवाखालीं भामटेगिरी करण्यास इंग्लंडला लाज वाटली नाहीं. इतकेंच नव्हे तर सर्व गवगवा झाल्यावर व वरवर मोठें बकसाधुत्व दाखविल्यावरही त्या प्रधानमंडळाची बदल झाली नाहीं किंवा त्यास किंचित्‌ही तोशीस लागली नाहीं ! फार तर काय, पण थोड्याबहुत प्रमाणावर लोकांचीं पत्रें अजूनही फोडलीं जात आहेत.

परंतु या प्रसंगाचा फायदा घेऊन मीं माझ्या स्वदेशाची स्थिति इंग्लंडच्या लोकांपुढें मांडण्यास आरंभ केला. आजपर्यंत त्यांचें इटलीकडे अगदीं दुर्लक्ष झालेलें होतें. परंतु सर जेम्स ग्रॅहॅम याला मीं सार्वजनिक पत्र लिहिल्यापासून इटलीकडे सर्वांचें लक्ष लागूं लागलें. ह्या वेळेपासून इटलीविषयक चळवळ मीं सारखी चालू ठेवली होती. त्या चळवळीचा व माझ्या इटालियन मंडळाचा शेवटीं इतका परिणाम झाला कीं, शेंकडों सार्वजनिक सभा भरल्या इटलीसाठीं संस्था स्थापन झाल्या. पार्लेंटमध्यें माझ्या स्वदेशाबद्दल महत्वाची चर्चा सुरू झाली. व या इंग्लिश सहानुभूतीचा आमच्या पुढील प्रयत्नांत बराच उपयोग झाला.

(सर जेम्स ग्रॅहॅम यांना धाडलेल्या सार्वजनिक पत्रांतील कांहीं भाग खालीं दिलेला आहे.)

" माझीं पत्रें उघडण्यांत आपण एका व्यक्तीविरुद्ध वर्तन केलें आहांत असें नाहीं. व्यक्तिविषयक हक्कांनाच नव्हे तर इंग्लंडनें माझ्या राष्ट्राच्या हक्काला पायांखालीं तुडविलें आहे. तुह्मीं व्यक्तीविरुद्ध अपराध केला इतकेंच नसून तुह्मीं राष्ट्रनियमाविरुद्ध, विश्वनियमाविरुद्ध, त्या विश्वाच्या चालकाचे नियमाविरुद्ध अपराधी ठरत आहांत. ऑस्ट्रिया व इटली या दोहोंतून तुम्ही ऑस्ट्रियाला निवडला आहांत ! वाईट व चांगलें या दोहोंतून तुह्मी वाईट निवडलें आहे. पशुतुल्य बळाचे जोरावर अप्रतिहत चाललेला अन्याय व त्या जाचांतून सुटण्यासाठीं नैसर्गिक क्रोधानें प्रयत्न करणारा न्याय या दोहोंतून तुम्हीं पशुतुल्य अन्यायाला निवडलें आहे. पारतंत्र्य व स्वातंत्र्य ह्यांच्या लढाईत इंग्लंड पारतंत्र्याच्या बाजूनें लढत आहे ! मांगाच्या पक्षाला मिळून ते मांग झालेले आहेत ! " सर्व जग राजकीय व धार्मिक स्वातंत्र्यानें भूषित असावें, " ह्या महामंत्राच्या ऐवजीं " आम्हीं तेवढे स्वतंत्र, बाकी सर्वजण गुलाम," या अधमवृत्तीचा व या राक्षसी इच्छेचा तुम्हीं अंगिकार केला आहे!

" व मी साऱ्या जगाबरोबर तुमची निर्भर्त्सना याच अपराधासाठीं करीत आहे. आतां आम्हीं सावध झालेलों आहोंत. आतां तुम्हीं आमचीं पत्रें फोडलींत काय किंवा न फोडलींत काय सारखेंच ! आम्हीं एक तर पत्रांत महत्वाचा मजकूर लिहिणार नाहीं, किंवा पत्रें पोष्टमार्गानें धाडणार नाहीं. हा कांहीं मुद्दा नव्हे. माझ्या राष्ट्राविरुद्ध तुम्हीं वर्तन करून आपल्या तोंडाला अक्षम्य कालिमा लावून घेतलात हा माझा मुख्य मुद्दा आहे.

तुम्हीं आम्हांला क्रांतिकारक म्हणून म्हणतां व तें विशेषण निंदाव्यंजक आहे असें तुम्हीं समजतां ! पण आम्हीं राज्यक्रांतिकारक आहोंत म्हणजे काय करीत आहोंत याचा कधीं तरी विचार केला आहांत काय ? जवळ-जवळ तीन कोटि लोकांवर ऐंशीहजार ऑस्ट्रियनांनीं राज्य करावें हें लज्जास्पद आहे असें आमचें ह्मणणें आहे. इटली देश स्वतंत्र व्हावा असें आमचें ह्मणणें आहे. स्वातंत्र्य, ज्या स्वातंत्र्यासाठीं तुह्मीं राज्यक्रांत्या करून; ( हें ध्यानांत ठेवा कीं, तुह्मींही राज्यक्रांत्या केल्यात. ) आतां त्याचा उपभोग घेत आहां, **तें पूर्ण स्वातंत्र्य आह्मांस पाहिजे असें आमचें ह्मणणें आहे.** आमचें असें ह्मणणें आहे कीं, आह्मांस जिवंतपणा पाहिजे आहे; आमच्या सर्व शक्तींच्या विकासनासह जिवंतपणा पाहिजे आहे; परमेश्वराला पसंत असलेला जिवंतपणा पाहिजे आहे; जगाच्या बरोबर समानाधिकारानें आह्मांस प्रगमन पाहिजे आहे; आमच्या भोंवतीं हेरांच्या पहाऱ्याचे ऐवजीं स्वदेशबंधूंचें प्रेममंडल पाहिजे आहे; **आह्मांस सल्लागार हवा असून मालक नको आहे; आह्मांस तुरुंग नको असून देश हवा आहे ! ! !**

" यांपैकीं तुह्मीं कोणच्या महत्त्वाकांक्षेला नांवें ठेवूं इच्छित आहां ? यांत तुह्मांला काय अपवित्र दिसत आहे ? तुमचें असें ह्मणणें आहे काय कीं, इटलीला देव नाहीं ? इटलीचा मुख्य देव ह्मणजे तो आस्ट्रियाचा राजा ? त्याला धिःकार असो !

" येशूख्रिस्तानें, महाराज, क्रांतीच केली नाहीं काय ? आमच्यासारखाच त्यानें शांततेचा भंग केला नाहीं काय ? असद्धर्मीय लोक त्यांच्या अज्ञानांधकारांत शांत रीतीनें घोरत होते. ही शांतता खाइस्टनें मोडली. खाइस्टनें त्या लोकांच्या संस्थापित राज्याविरुद्ध चळवळ केली. आतां आह्मीं क्रांति करण्याचा प्रयत्न करून शांतता भंग करितों व संस्थापित राज्यांना उलथून पाडूं इच्छितों हें अत्यंत पाप आहे असें ह्मणणारें तुमचें राष्ट्र शांतताभंगाचे व संस्थापित राज्याची क्रांति केल्याचे अपराधाबद्दल खाइस्टचे विरुद्ध लढण्यास तयार होईल काय ?

" ह्मणून जे लोक आह्मां देहत्यागाची शिक्षा झालेल्या स्वदेशभक्तांस शांतताभंग न करण्याचा उपदेश करितात, ते अन्यायाची व जुलमाची तरफदारी करितात. आतां कसली शांतता ! आतां होणारा संग्राम टाळण्याचें मनुष्याचे हातांत राहिलें नाहीं.

" परंतु संग्रामाशिवाय स्वातंत्र्य मिळण्याचा जर कोणी दुसरा मार्ग दाखवीत असेल, शांततेनें जाऊन आमचें राष्ट्र आम्हास सांपडेल हें जर कोणी सिद्ध करील तर संग्रामापासून परावृत्त होऊन त्या विषयाची शांत रीतीनें प्राप्ति करून घ्यावयास आम्ही तयार आहों. तें आमचें कर्तव्य आहे. पण तो मार्ग कोण दाखवित आहे ? आमचें राष्ट्र शांतपणानें वर आणतां येईल हें कोण सिद्ध करीत आहे ! सांखळदंडांनीं बांधून टाकलेल्या मनुष्यास अगमनाची इच्छा असेल तर त्यानें प्रथमतः त्या सांखळदंडाचे तुकडे उडविले पाहिजेत त्या सांखळदंडास कायम ठेवून तो मुक्त कसा होणार ? परवशतेचा कंठ चिरल्याशिवाय राष्ट्र स्वतंत्र कसें होणार ?

" जेव्हां तुम्हां इंग्लिश लोकांना कांहीं लक्ष्य साधावयाचें असेल तेव्हां तुम्हांला गुप्त मंडळाची व क्रांतियुद्धाची जरूर नाहीं, कारण तुम्ही स्वतंत्र आहांत. तुम्हांला सार्वजनिक मार्ग मोकळे आहेत. मग तुम्ही गुप्त कटांच्या आडमार्गांतून व बंडाच्या दलदलींतून कां चालत जावें ! तुम्ही सत्याचे सामर्थ्यावर विश्वास ठेवतां, तुम्ही सकाळ व संध्याकाळ त्या सत्याचा उघड उघड उपदेश देतां. वर्तमानपत्रें व भाषणें दर दिवशीं व दर क्षणीं त्याचा उहापोह करितात. मोठाल्या सभांत त्याचा खल होतो. लोकांना तें पटू लागतें. पार्लमेंटांत त्या सत्याचें समर्थन होतें व बहुमतानें तें पसृत होतें. आम्हां परतंत्र लोकांना पार्लमेंट नाहीं, किंवा पीठासनें नाहींत, किंवा मुद्रणस्वातंत्र्य नाहीं, किंवा वाक्स्वातंत्र्य नाहीं, किंवा सभास्वातंत्र्य नाहीं, किंवा आमच्या अंतःकरणांत खवळलेले विचार व्यक्त करण्याचें एकही साधन ठेवलेलें नाहीं. **अशा स्थितीचा उच्छेद गुप्त मंडळ्यांशिवाय आम्हीं कसा करावा ?**

" महाराज, इटलीदेश हा एक प्रचंड तुरुंग आहे. त्याच्याभोंवतीं मूठभर तुरुंगवाल्यांचा व शिपायांचा पाहारा आहे. त्यांतील लोकांना तरवारीचे धारेवर नाचविलें जात आहे. आम्हीं बोलूं लागलों कीं, आमची मुस्कटदाबी केली जाते. आम्हीं जरा हालचाल केली कीं, आमच्या उरांत तरवार भोंसक ण्यांत येते. आम्हीं सर्वत्रांनीं अंतिम लक्ष्याचा आरंभ केला कीं तो गुन्हा ठरतो. आम्हांला तोंड बांधून बुक्यांचा मार सुरू आहे. अशा स्थितींत स्वतंत्रतेच्या जीवदायी, शुद्ध व पवित्र वातावरणांत–त्या परमेश्वरी वातावरणांत–स्वच्छंद श्वासोच्छ्वास करण्यासाठीं मोकळ्या जागेंत येण्यास, त्या तुरुंगाचे दरवाचे फोडून टाकण्याचा, त्यांतील खिडक्यांचे गज उपटून

झुगारून देण्याचा त्या कैदखान्याला धुळीस मिळविण्याचा व त्या तुरुंग वाल्यांत तुडवून जमीनदोस्त करण्याचा **गुप्त व दृढ संकल्प** ठरविण्याशिवाय आम्हांस दुसरा मार्ग नाहीं.

"साध्यावरून साधनाची परीक्षा करावी लागते हें तत्त्व जसें मर्यादित आहे तसेंच शक्तीचा उपयोग करूं नये हें तत्त्वही मर्यादित आहे. पापेक्षां मला हें जास्त अनुकरणीय वाटतें कीं, जोपर्यंत एखाद्या सत्कृत्याच्या पूर्ततेंत युक्तिवादाचा एखादा तरी मार्ग खुला असेल तोंपर्यंत शक्तीचा उपयोग होऊं नये. परंतु जेव्हां युक्तिवाद निष्फळ होतो, जें आपणाला सत्य वाटत आहे तें उघड रीतीनें प्रतिपादन करण्याचा नैसर्गिक हक्क जुलुमानें तुमच्या-पासून राजरोस रीतीनें हिरावून घेतलेला असतो, जेव्हां महद्विचार हे तरवारीचे टोकानें दाबून टाकिले जातात, तेव्हां मग तुमची दाद तुम्हींच लावून घेतली पाहिजे. जेव्हां तुमचा पक्ष सत्य आहे अशी तुमची खातरी आहे, परंतु बहुमत तुमच्याकडे नाहीं, असें होत असेल तेव्हां शांत रीतीनें तुरुंगांत किंवा फांशीवर त्या सत्याचें प्रतिपादन करा. पण आपसांत लढाई करण्याचा तुम्हांस अधिकार नाहीं. परंतु जेव्हां तुमचा पक्ष सत्य आहे इतकेंच नव्हे तर तो बहुमतही आहे असें होईल तेव्हां मग स्वदेशांत चैतन्य संचरवा, उठा व शक्तीचे बळावर परक्यांचा उच्छेद करा. **परमेश्वरानें दिलेल्या दोन हातांत सामर्थ्य असूनही जर तुम्हीं पशुतुल्य जुलुमाचा अन्याय नांदत ठेवाल तर तुम्हीं आपल्या ह्या भ्याडपणानें बैलाहूनही बैल ठराल !** पवित्र कार्यीं शुद्ध हेतूनें ईश्वरी शक्तीचा उपयोग जर न कराल तर तुम्हीं परमेश्वराचा व सत्याचा आज्ञाभंग कराल. अशा दैविक शक्तीचा तिरस्कार करणें हा नामर्दपणा होय. स्वदेश पारतंत्र्यांत असतांना व इतर मार्ग खुला नसतांना जे युद्धापासून परावृत्त होऊं इच्छितात ते भूतदयेच्या ढोंगाखालीं आपले क्लैब्य झाकूं पहात असतात.

"तुम्हीं इंग्लिश लोक आम्हांला डौलानें उपदेश करतां कीं, आमच्या लेखांनीं लोक खवळून जातात. होय, होय, आमच्या लेखांनीं लोक चैतन्यपूरित होतात. लोकांत गुलामगिरीबद्दल असंतोष पसरला जावा म्हणूनच आम्हीं लेख लिहितों व आमच्या देशांत भाषणस्वातंत्र्य किंवा मुद्रणस्वातंत्र्य नसल्यानें आम्हीं ते गुप्तरीतीनें प्रसृत करितों. तुम्हीं मला सांगतां कीं, गुप्तमंडळ्या स्थापन करणें हें बेकायदेशीर आहे. माझें

असें उत्तर आहे कीं, सत्यास्तव मंडळ्या स्थापन करणें हें कायदेशीर आहे व त्या हक्काचा गुप्ततेनें दुरुपयोग केव्हां होतो तर जेव्हां प्रसिद्धपणें हा हक्क अंमलांत आणण्याची परवानगी असेल तेव्हां. **प्रसिद्ध मंडळ्याची पूर्ण परवानगी असेल तेथें गुप्तमंडळ्या ह्या बेकायदा आहेत. जेथें सत्यप्रतिपादनाची असत्यानें बंदी केलेली आहे तेथें गुप्तमंडळ्या ह्या परम पवित्र आहेत !!**

जेव्हां ख्रिश्चन लोकांनां बेकायदा ठरविण्यांत आलें तेव्हां पवित्र धर्माधिकारी देशवीरांच्या थडग्यांतून जमा होऊं लागले व तेथें सभा भरवूं लागले. कशासाठीं? केवळ ईशप्रार्थनेसाठीं? नाहीं, नाहीं, ते जीजसच्या धर्ममतांचा फैलाव कसा करावा, धर्मरक्षणार्थ कोणचीं साधनें योजावी व प्रत्यक्ष असद्धर्मीयांच्या गोटांतील अधिकाऱ्यांसच कसें वळवावें या गोष्टींचा खल करीत असत. गुप्त मंडळ्या भरवीत असत. इंग्लंडमधल्या शांत स्थितीला लागू पडणारीं तत्त्वें आमच्या असामान्य व क्षुब्ध स्थितीला लागू पडणार नाहींत. आह्मांस मोकळ्या असलेल्या एका मार्गाचीही आपण जेव्हां निंदा करतां तेव्हा अप्रत्यक्ष रीतीनें असेंच ह्मणत असतां कीं, पारतंत्र्य हें अभिलषणीय आहे व स्वातंत्र्य हें तिरस्करणीय आहे! मी प्रत्येक इंग्लिश मनुष्यास हा साधा प्रश्न करितों कीं, समजा, ऐंशी हजार फ्रेंच शिपायी तुमच्या छातीवर तुह्मी चळवळ करूं लागलांत कीं, नाचावयास तयार ठेवलेले आहेत. अशा स्थितींत तुह्मीं कोणचे ‘शांत व कायदेशीर’ उपाय योजिले असतेत? जे तुह्मीं योजिले असतेत तेच उपाय आह्मीही योजीत आहों, या उपायांना आज तुह्मीं गुप्त कट ह्मणून निंद्य समजत आहां; उद्यां आह्मांला यश आलें तर तुह्मींच त्यांचा जयजयकारही कराल.

“तुह्मी ह्मणतां आह्मांला हल्लीं शिक्षण मिळत आहे! ज्या शाळांतून, “प्रजेनें चाकराप्रमाणें आपल्या धन्याच्या आज्ञेंत वागलें पाहिजे; त्यांच्या राजाची सत्ता त्यांच्या व्यक्तीवर व मालमत्तेवर अबाधित चालली पाहिजे” असें नेभळें शिक्षण देण्यांत येतें, त्या शाळा व तें शिक्षण हें आम्हांस काय जाळावयाचें आहे! ज्या युनिव्हर्सिटींतून शिकविले जाणारे इतिहास हे परक्या अधर्मांकडून तपासून आणावे लागतात त्या युनिव्हर्सिटींत नामर्दपणाशिवाय काय सांपडणार आहे! तसेंच आमची पूर्वीपेक्षां सुधारणा होत आहे हें खरें आहे. पण ती सुधारणा ही परक्यांच्या प्रयत्नांचें फळ नसून उलट ती त्यांच्या तिला हाणून पाडण्याच्या क्रियेची प्रतिक्रिया आहे!

आमच्या व्यापारावरून व अन्नाच्या महर्गतेवरून ही आमची दुःस्थिती स्पष्ट होत आहे. परंतु आमच्या दुःस्थितीचें हें कांहीं खरें माप नव्हे. जी भाकर, महाग असो वा स्वस्त असो, पण दुसऱ्याची उष्टी आहे ती आह्मी खात आहों. जी गुलामांना दिलेली भाकर आहे ती स्वस्त असली काय व नसली काय ? तुह्मी आंकडे मोडून आह्मी सुखी आहों किंवा दुःखी आहों हें कसें ठरविणार ? गुलामगिरीची नीचता मोजणारी एकादी रकम तुमच्या आंकडेशास्त्रांत आहे काय ? गुलामगिरी ? आमच्या पूर्वजांच्या ध्वजावर परक्यांचें नांव खोदणारी गुलामगिरी ! नीतिमत्तेचा नाश करणारी गुलामगिरी ! माझ्या राष्ट्राला ठार मारणारी गुलामगिरी ! !

"व या गुलामगिरीचा नाश आतां झाल्याशिवाय राहणार नाहीं. १८२०, १८२१, १८३१ या सालीं झालेलीं प्रचंड राष्ट्रीय बंडें व तेव्हांपासून दरसाल होणाऱ्या उठावण्या ह्या कांहीं उगीच झालेल्या नाहींत. स्वातंत्र्य मिळविण्याचे हे प्रयत्न फसले. परंतु ते व्यर्थ झालेले नाहींत. त्यांनीं राष्ट्राला जिवंत शिक्षण दिलेलें आहे. १८३२ पासून "तरुण इटली"नें आपलें निशाण उभारलें आहे. वाग्द्वारा व मुद्रणद्वारा त्या गुप्त सभेनें राष्ट्रीय तत्त्वांचा प्रसार जोरानें केलेला आहे. व तीं तत्त्वें आमच्या राष्ट्रीय कर्तृत्ववान् लोकांच्या अंतःकरणांत रुजलेली आहेत. तिनें राष्ट्रांत स्वातंत्र्यचैतन्य उत्पन्न केलेलें आहे. व बहुतेक अंशीं राष्ट्रीय पुढाऱ्यांत एकवाक्यता घडवून आणलेली आहे. इटलीमध्यें तेव्हांपासून घडलेल्या प्रत्येक चळवळीवर 'तरुण इटली'चा कमीजास्ती प्रमाणानें परिणाम दिसत आलेला आहे. आतां आमच्या उठावण्यांत केंद्रीभवन होत नाहीं हा महादोष आहे. व ह्मणूनच आमच्या पक्षाला आजपर्यंत अपयश आलेलें आहे परंतु परमेश्वराच्या इच्छेनें तें केंद्रीभवन व समकालोत्थान लवकरच घडून येईल व आजपर्यंत खर्चिलेल्या देशवीरांच्या रक्ताचा सूड घेण्यांत येईल अशी मला पक्की खात्री आहे.

"व मी माझ्या स्वतःबद्दल असें सांगतों कीं माझें जें आयुष्य अजून शिल्लक असेल त्यांत, पूर्वीप्रमाणेंच, माझ्या दुर्दैवी देशाच्या अभ्युन्नतीसाठीं, माझ्या इटलीच्या स्वातंत्र्यासाठीं, वाग्द्वारा, लेखनद्वारा व क्रियाद्वारा मीं रात्रंदिवस अखंड प्रयत्न करीत रहाणार. मग वाटेल तें संकट येवो ! ज्यांना स्वदेशासाठीं कांहींच करावयाचें नसेल त्यांनीं माझ्यावर निंदेचा खुशाल वर्षाव करीत बसावें !"

मे १८४५. **जोसेफ मॅझिनी.**

माझ्या मताचा गर्भितार्थ असाच होता कीं, लोकांसाठींच प्रयत्न करावयाचा इतकेंच केवळ नव्हे, तर तो लोकसाह्यानेंच घडवून आणावयाचा. जानपदासाठींच व जानपदाकडूनच सर्व प्रयत्न झाले पाहिजेत. मीं लंडनमध्यें आल्यानंतर तेथें असलेल्या इटालियन कामकरी वर्गाचें मनौदार्य व स्वार्थनिवृत्ति पाहून मला फार हुरूप आला. त्या वेळेपर्यंत आपल्या देशांतील या महत्वाच्या भागाकडे–कामकरीवर्गाकडे–माझें जावें तितकें लक्ष गेलेलें नव्हतें. त्यांचें निरीक्षण करण्याची आजपर्यंत न आलेली संधी एकदम आल्यानें मी तिचा उपयोग करून घ्यावयाचा निश्चय केला.

विस्तीर्ण लंडन शहरांतील रस्त्यांतून कित्येक लहान मुलें बाजाची पेटी वाजवीत फिरून चरितार्थ चालवीत असत. त्या मुलांशीं मी नेहमीं बोलत असावें. या योगानें एका भयंकर धंद्याचा मला सुगावा लागला. लंडनमध्यें पांच सहा इटालियन लोक चांगल्या रीतीनें स्थायिक झालेले आहेत यांच्या हातून वाटेल तें दुष्कृत्य त्यांचा फायदा होत असल्यास घडत असे. हे मधून मधून इटलीस परत जात व गरीब लोकांनां मोठमोठ्या आशा दाखवून त्यांचीं पोरें अडीच वर्षांच्या मुदतीनें करार करून आपल्या नौकरींत ओढून घेत असत. त्या करारांत परत येते वेळीं जरूर तितका खर्च व आजपर्यंत केलेल्या श्रमाचा पुष्कळसा मोबदला तुम्हांला दिला जाईल असें त्या मुलांना वचन दिलेलें असे. हा करार इटलीमध्यें अगदीं कायदेशीर पद्धतीनें लिहून दिला जाई. परंतु त्या अज्ञ गरीब लोकांस हें कळत नसे कीं, इटलीमध्यें लिहिलेला करार इंग्लंडच्या कॉन्सलच्या सहीशिवाय इंग्लंड देशांत निरुपयोगी होतो. नंतर तीं गरीब मुलें लंडनमध्यें आलीं ह्मणजे मग त्यांना गुलामासारखें वागविलें जाई. त्यांनां सकाळीं एक लहान चहाचा पेला व एक भाकरीचा तुकडा दिला जाई व बाजाची पेटी देऊन त्यांना शहरांत घाडलें जाई. त्यांच्या संध्याकाळपर्यंतच्या मिळकतीवर त्यांची संध्याकाळची भाकर अवलंबून राही. ठरलेली रक्कम जो तोपर्यंत मिळवून आणणार नाहीं त्याला चोप देण्यांत येई व भाकर मिळत नसे. या भयंकर जाचानें कांहीं मुलें उपासानें मरत असत. त्यांनां दारिद्र्याचें ढोंग व विश्वासघात करणें भाग पडे. व अशा रीतीनें हजारों तरुण इटालियन नीचवृत्ति होत असत. अखेर कांहीं तरी दोष लावून त्या पोरास कराराचे शेवटीं एक दमडीही न देतां हुसकून देण्यांत येई. इटालियन सरकारनें या कामीं लक्ष घातलें असतें तर पुष्कळ बंदोबस्त होता.

मीं ही स्थिती सुधारण्यास निराळा उपाय योजिला. त्यांच्या संरक्षणासाठीं मीं एक संस्था काढली व एक फुकट शाळा उघडली. या शाळेंत त्यांनां त्यांच्या हक्कांचें राष्ट्रीय शिक्षण देण्यांत येई. केव्हां केव्हां त्यांना सल्ला देऊन मी त्यांच्या मालकांवर खटले करविले. तेव्हां मग ते बरेच वचकून राहूं लागले. ही इटालियन शाळा १८४१ सालीं नोवेंबर महिन्यांत उघडली गेली. व १८४८ पर्यंत चालली होती. यासाठीं इटलीमधल्या प्रचंड राज्यक्रांतींत मी गुंतलों गेलों व दोन वर्षें इटलींतच होतों. त्यामुळें व पुढें इटलीमध्येंच सर्व व्यवस्था करण्याचें शक्य होत असल्यानें ती शाळा बंद केली. या सात वर्षांत शेंकडों तरुण इटालियनांस आम्हीं बौद्धिक व नैतिक शिक्षण दिलें. आमच्या लहानशा बिन्हार्डी ते प्रथम भीत भीत जिज्ञासेनें येऊं लागले व लवकरच आमच्या दयार्द्र वागणुकीनें पुष्कळ सुधारले गेले. त्यांना आपण सुशिक्षित होऊन परत घरीं जाणार याचा अभिमान वाटूं लागला. रात्रीं ९ ते १० चे मध्यंतरी आपापलीं वाद्ययंत्रें घेऊन ते आमचेकडे येत. त्यांना वाचन, लेखन, अंकगणित, भूगोल व रेखाशास्त्र यांचें मूलभूत शिक्षण मिळत असें. रविवारीं संध्याकाळीं आम्हीं त्या सर्वांनां एकत्र जमवावें व मग एक तासभर इटालियन इतिहासावर व्याख्यान द्यावें. ज्या योगानें गुलामगिरीचा वीट येऊन त्यांचीं मनें उदात्त होतील अशा प्रकारचा उपदेश एकसारखा चालू होता. दोन वर्षेंपर्यंत मी दर रविवारीं इटलीच्या इतिहासावर व्याख्यानें देत होतों. मीं त्यांना ज्योतिषशास्त्रांतील प्रमेयेंही सांगत असें. माझें असें मत आहे कीं, ज्योतिषशास्त्र हा पूर्ण धार्मिक विषय आहे. व मनाची आकुंचित मर्यादा मोडून त्याला विस्तीर्णता द्यावयास या विषयासारखा दुसरा विषय नाहीं. यासाठीं अंतरिक्षांतल्या चमत्कारांची साधी व मनोरंजक माहिती प्राथमिक शिक्षणाबरोबर सोप्या भाषेंत अवश्य दिली जावी. फिलिपो पिस्टुसी यांनीं शंभरापेक्षां जास्त व्याख्यानें 'मानवी कर्तव्य' या विषयावर दिलीं. ह्या गृहस्थांची इटलीमध्यें शीघ्र कवित्वांत फार ख्याती झालेली होती. यांनांच मी त्या शाळेचे व्यवस्थापक नेमलेले होते. व त्यांनीं तें काम अतिशय उत्सुकतेनें करीत असावें.

हें काम फार पवित्र होतें व तें तितक्याच पावित्र्यांत पार पाडलें गेलें. सर्व मदत फुकट मिळत होती. व्यवस्थापक, मदतनीस, शिक्षक, ज्यांनीं ज्यांनीं आमच्या शाळेला मदत केली त्यांनीं एक पै देखील घेतली नाहीं.

तरी त्या सर्वांना स्वकष्टानें कुटुंबपोषण करावें लागत होतें. प्रत्येक वर्षी नोवेंबरमध्यें आमच्या शाळेचा वार्षिक समारंभ होत असे. तेव्हां सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसें दिलीं जात व त्यांना मेजवानी देण्यांत येई. या भोजनप्रसंगीं आम्हीं स्वतः आपल्या हातांनीं पंक्तींत वाढीत फिरावें. मग देशाभिमानोत्तेजक गाणीं व पदें म्हटलीं जात. आमच्या व्यवस्थापकानें आपल्या शीघ्र कवितेंत राष्ट्रीयस्वातंत्र्योद्दीपक कवनें ताबडतोब रचून गावींत. अशा प्रसंगीं मनावर केवढा परिणाम होतो ? वर्षभर शिक्षण देत बसून जो संस्कार मनावर होत नसे तो या एका संध्याकाळीं घडून येऊन स्वदेशाची ज्योत प्रत्येक अंतःकरणांत प्रदीप्त होत असे. त्या दुर्दैवी व गुलामगिरींत वाढलेल्या तरुणांना आतां स्वसामर्थ्य कळून आलें. आपण माणसें आहोंत, आपण जिवंत आहोंत, आपल्याला आपल्या शिक्षकां सारखेच आत्मे आहेत हें त्यांस कळून येऊं लागलें. आमच्याबद्दल मनांत किंतु असलेले कांहीं लोक या वार्षिक समारंभाला येत व एका तासांत आमच्या त्या प्रेमानें व स्वदेशाभिमानानें ओथंबलेल्या वर्तनास पाहून संतुष्ट होत व स्वतः उदात्ततर होऊन परत जात. आमच्या या शाळेला प्रथम प्रथम फार त्रास देण्यांत आला. जे इटालियन धंदेवाले होते त्यांना व सार्डिनियन धर्मोपदेशकांना हा आमचा प्रयत्न अर्थातच आवडला नाहीं. परंतु त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन आमची शाळा अबाधित चाललेली पाहिल्यावर मग त्यांचे डोळे उघडले. त्यांनींही एक शाळा काढली. नंतर अमेरिकेंत मध्यंतरीं मी बऱ्याच ओळखी केल्या होत्या त्यांचे द्वारें तेथेंही एक शाळा स्थापिली. १८४२ सालीं न्युयॉर्क (अमेरिका) येथें ग्युसेपीनें आमच्या सारखीच शाळा काढली व बोस्टन येथें प्रो. बॅची यांनींही एक शाळा उघडली.

या शाळेच्या योगानें लंडनमधल्या कामकरी इटालियन वर्गांशीं माझें दळणवळण सुरू झालें. मीं त्यांच्यापैकीं निवडक लोकांची मदत घेऊन दुसऱ्या एका राष्ट्रीय प्रयत्नास हात घातला. मीं कामकरी वर्गाची संस्था स्थापन केली व "ॲपोस्टोल टोपोपोलेरी" हें पत्र काढलें. या पत्रांतील माझ्या लेखांचें धोरण माझ्या "मानवी कर्तव्यें" या निबंधावरून दिसून येईल. हा निबंध याच पत्रांत प्रसिद्ध झाला.

इकडे स्वित्झर्लंडमध्यें व पोलंडमध्यें आम्हीं मागेंच केलेल्या स्नेहसंबंधाला विशेष बळकटी येत चालली. व आम्हीं अंतर्राष्ट्रीय चळवळी पुन्हां जोरानें चालविल्या.

( यापुढील चरित्र माझिनीनें स्वतंत्र रीतीनें न देतां तें निरनिराळ्या लेखांत गुंफून दिलें आहे. लेख संपूर्ण भाषांतर करीत बसण्याइतके प्रस्तुत प्रसंगीं उपयुक्त नाहींत. कारण, त्या वेळेच्या हालचालींची चर्चा त्यांत केलेली आहे. परंतु माझिनीचें चरित्र त्याच्याच भाषेंत सांगितलेलें तरुण देशभक्तांस कळणें अवश्य असल्यानें त्या महात्म्याच्या आत्मचरित्राचा पुढील भाग त्या लेखांतून शक्य तितक्या कसोशीनें निवडून खालीं दिलेला आहे. )

याच वेळेस माझ्या देशांत एक भिकार व अनीतिमान पंथ उत्पन्न झाला. त्या पक्षाचें नांव नेमस्त उर्फ नेभळा पक्ष ('Moderate party.') असें असे. या पक्षाची पूर्वपरंपरा त्याच्या प्रस्तुत नीचतेला साजेल अशीच आहे. आस्ट्रियनांनीं आमच्या देशावर सत्ता स्थापिली हें यांच्या मतानें फार उत्तम झालें ! ' तरुण इटली ' च्या तत्त्वांचा जंगी प्रसार होऊन स्वातंत्र्याच्या व स्वबलाच्या पवित्र तेजानें सर्व राष्ट्र तरुण चैतन्यमय झालेले पहातांच यांच्या अंगाला कंप सुटला. व यांच्या ' कायदेशीर ' चळवळींना आरंभ झाला. जुलमाला तरवारीचे अग्रानें भोंसकून पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याचे ऐवजीं यांनीं लोकांना नेमस्तपणाचा व शांततेचा उपदेश करावा. नेमस्तपणानें हलकें हलकें कायदेशीर चळवळी करा, नाहीं तर राज्यकर्ते असंतुष्ट होतील व मग आपल्यास कांहींच मिळावयाचें नाहीं हा यांचा उपदेश होता. राज्यकर्ते असंतुष्ट झाल्यास आम्हांस कांहीं मिळावयाचें नाहीं ? इटलीच्या दोन कोटी लोकांनीं सिंहगर्जना केल्यावर स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं ? व तें राज्यकर्त्यांना संतुष्ट ठेवून मिळणार आहे ? त्यांचा प्रत्येक शब्द म्हणजे एकेका निसर्गसिद्ध तत्त्वाचा प्रतिरोधी आहे. आजपर्यंत राजसत्तेकडून जे जे हक्क हिसकावले गेले ते ते या नेभळ्या पक्षाच्या भिक्षांदेहीनें नव्हेत, तर आमच्या सबळ पक्षाच्या गर्जनेनेंच होत. जेव्हां जेव्हां लोकांनीं नृसिंहस्वरूप धारण केलें तेव्हां तेव्हांच हक्क मिळत गेले. राज्यकर्त्यांनीं संतुष्ट होऊन ते हक्क दिलेले नाहींत, तर भयानें कंपित होऊन दिलेले आहेत. म्हणजे राज्यकर्त्यांनीं ते दिले असें नव्हे तर आम्हीं ते हिसकाऊन घेतले. व पुढेंही जर कांहीं मिळण्याची आशा असेल तर ती लोकशक्ति जेव्हां ते हक्क हिसकावण्यास तयार होईल तेव्हांच होय. पण लोकांत व राष्ट्रसामर्थ्यांत या बुळग्या पक्षाचा विश्वास कोठें आहे ? ग्यारिबॉल्डीनें स्वारी करून दक्षिण इटली स्वतंत्र करीतों पर्यंत या नेमस्तांनीं ग्यारिबॉल्डीच्या बेतांनां नाकें मुरडलीं.

पण लोकांनीं चालविलेल्या चळवळींनां प्रथम जरी नाकें मुरडलीं जातात तरी त्यांत लोकांनां किंचित यश येतांच या नेमस्तांचे धुरीण गंभीरपणानें सांगतात कीं, हें आमच्या कायदेशीर चळवळीचें फळ आहे.

परंतु अखेर राष्ट्र सत्याच्या व स्वातंत्र्याच्या प्रतिभेनें तेजस्वी होऊं लागलें. १८४६ व ४७ सालांत जिकडे तिकडे ऑस्ट्रियाविरुद्ध जंगी चळवळ सुरू झाली. अन्कोनामध्यें भर रस्त्यांत “ परकीयांनां हुसकून द्या, ” ह्मणून गर्जना होऊं लागल्या. जिनोआमध्यें ४०००० लोकांनीं एक जंगी मिरवणूक काढली व संराष्ट्रीय निशाण उभारून प्रसिद्ध रीतीनें नवीन राष्ट्राचा जन्मोत्सव केला. याप्रमाणेंच ठिकठिकाणीं तरुणांचा “ ऑस्ट्रियाशीं लढाई ” हा जयघोष ऐकूं येऊं लागला. अशा वेळेला कोणाला स्फूर्ति उत्पन्न होणार नाहीं! पण नेमळ्या पक्षाला हें आकलन करतां येईना. याच वेळेला लोकपक्षाचें चैतन्य वाढवून परमेश्वराची आज्ञा जें राष्ट्रस्वातंत्र्य त्याचे मंगलप्राप्तीकडे सर्व लक्ष द्यावयाचे ऐवजीं हे नेमस्त लोक राजसत्तेशीं खलबतें करण्यांत गुंतलेले होते. कायदेशीर निबंध लिहून देशभक्तीचें सोंग करीत होते. रेलवेची एखादी ओळ जास्त वाढवावी ह्मणून जीव तोडून खटपट करीत होते व राजसत्तेनें किंचित सामोपचारानें घेतल्यास लोकांची खळबळ शांत होईल ह्मणून उपदेश देत होते! लोक शहाणे झाले ह्मणजे त्यांनां सत्ता देऊं हें ह्मणणें अगदीं असत्य आहे.

परसत्तेंत जे सद्गुण अशक्य असतात ते सद्गुण अंगीं आले ह्मणजे स्वातंत्र्य मिळणार ? हें अशक्य आहे. लोकसत्तेचे सद्गुण लोकसत्ताच शिकवते हें या मतिमंदांनां कळलें नाहीं तरी तें लोकांना कळलें. मिलनकडे चळवळीचा कळस झाला. व्हेनिसला ज्वालामुखी फुटण्याच्या बेतास आला. प्रथम लहानसहान चळवळी झाल्या. ऑस्ट्रियानें त्या जुलुमानें दाबण्याचा प्रयत्न केला व राज्यक्रांतीचा भडका उठला. मिलनमध्यें सर्व तरुण स्वदेशार्थ तरवार उपसून रणांगणांत उडी घेते झाले. इतक्यामध्यें कांहीं बारीक सारीक हक्क राजसत्तेनें दिल्याची बातमी आली. पण शाबास, माझ्या राष्ट्रतरुणांनों शाबास! त्यांनीं त्या भिक्षेच्या तुकड्यांनां भीक घातली नाहीं. कुत्र्यासारख्या फेंकलेल्या तुकड्यावर ते संतुष्ट झाले नाहींत. त्यांनां गुलामगिरीचे अनंत हक्क नको होते तर त्यांनां स्वातंत्र्याचा एकच हक्क पाहिजे होता. ते उठले. राज्यक्रांतीचा चौघडा धडधडला. ते सर्व तरुण लोक

' तरुण इटली'चे सभासद होते ! ते तत्त्वासाठीं प्राण देणारे होते. त्यांनीं तारीख १८ रोजीं राज्यक्रांतीला आरंभ केला. " मिलन् शहरांत सर्व रस्ते नागरिकांनीं अडकवून ठेविले आहेत. तरुण लोक रायफली, तरवारी, पिस्तुलें, खंजीर वगैरे जें सांपडेल तें शस्त्र घेऊन बाहेर पडले आहेत. त्रिरंगभूषित राष्ट्रध्वज उभारले गेले आहेत. दशदिशांनीं ' इटलीचा जयजयकार ' ' लोकसत्तेचा जयजयकार ' ' स्वातंत्र्यदेवीकी जय ' ' राष्ट्रदेवीकी जय ' ह्या जयजयकारांचा ध्वनि दुमदुमत आहे ! " अशा आशयाचें पत्र इंग्लंडच्या वकिलानें लिहिलें होतें. ट्युरीनला तारीख १९ ला बातमी आली. तेथील लोकांच्या अवसानाला पारावार नाहींसा झाला. तरुणांच्या झुंडी मिलनकडे लढण्यासाठीं चालल्या. तारीख २१ ला त्या लोकसत्तेचा खरा प्रभाव दृग्गोचर झाला व तारीख २२ ला त्या वीररसाला विजयदेवता वरती झाली ! मनारानें पोर्टाटोसा जिंकून घेतला. रस्तोरस्तीं लोकसत्ताक निशाणें हल्ला रेंटीत चाललीं ! ऑस्ट्रियाचें सैन्य हटत हटत अखेर शहर सोडून पळून गेलें ! मिलनमध्यें लोकसत्ता स्थापन होणार असा रंग दिसूं लागला !

व येथें पिडमांट संस्थानचे राजानें आपलें बोट घुसविलें. लोकसत्ता मिलनमध्यें स्थापन झाली असतां ती लाट आपल्याही संस्थानांत उसळेल अशा भीतीनें त्या संस्थानानें मिलन शहर आपली सत्ता कबूल करीत असेल तर आपण मदत देण्यास तयार आहों असें कळविलें. परक्यांच्या ताब्यांतून सुटण्यासाठीं उत्सुक झालेल्या लोकांनीं ही मदत स्वीकारिली व लोकसत्तेचाच नव्हे तर ऑस्ट्रियाशीं लढून नुकत्याच मिळविलेल्या स्वातंत्र्याचाही नाश करून घेयला. ( मॅझिनीनें अनेक कागदपत्रांचे आधार देऊन निर्विवाद रीतीनें असें सिद्ध केलें आहे कीं, पिडमांटच्या राजानें जी मदत दिली ती स्वदेशाकरितां नसून केवळ लोकसत्तेचा नाश करावा ह्मणूनच दिली. व अखेर आस्ट्रियाशीं परस्पर तह करून मिलनला विश्वासघातानें सोडून देऊन आपण चालता झाला. ) आपल्याप्रमाणेंच परवशतेंत पडलेल्या दुबळ्या संस्थानाचें स्वामित्व कबूल केल्यानें मिलनच्या पुढाऱ्यांनीं अनेक रीतीनें आपला नाश करून घेतला.

दुबळ्या राजाकडून देशस्वातंत्र्य मिळत नसतें हें ते विसरले. शिवाय मिलनची बातमी ऐकून व बंडाचें राष्ट्रीय स्वरूप पाहून त्याला सर्व लोक मिळावयास तयार झाले असतांना ते बंड एका संस्थानाची तुंबडी भरीत आहे

हें पहातांच इतर सर्व संस्थानें बंडाचे विरुद्ध झालीं. बरें, पारतंत्र्याचा नायनाट होत असता तर इतकेंही सर्व लोक विसरले असते, पण तें पारतंत्र्य लोकशक्तीनेंच चिरण्याचे ऐवजीं एका दुबळया संस्थानाच्या मोडक्या तलवारीवर सर्व गोष्टी सोंपवून लोकांनां परत लावण्यांत आलें! ग्यारीबाल्डीकडे तिरस्कारयुक्त दुर्लक्ष केलें. तरुण स्वयंसेवकांस फोडून घरीं बसविलें. इतर शहरीं बंड करण्याचे प्रयत्न सोडून दिले. अतएव बंडाचें राष्ट्रीयत्व घालवून परदास्याची शृंखला पुन्हां पायांत पाडून घेतली!

असो. मिलनच्या ऑस्ट्रियावर मिळविलेल्या जयाची वरील बातमी आह्मां देशभक्त हद्दपारांनां कळली. मिलन स्वतंत्र झालें, ही बातमी ऐकतांच वनवासांत काळ कंठणाऱ्या या प्रेतांत नवीन आत्मा घातला गेला. अनंत यातना व भूतकालीन दुःखें यांची विस्मृति झाली. सर्व विश्वासघातकी विनष्ट झाले. एकच विचार मनांत उरला. एकच शब्द जिव्हेवर उरला कीं, ‘आमचा स्वतांचा देश कायम आहे! ज्याच्या सेवेसाठीं आमचे देह बळी देतां येतील असा आमचा इटली देश कायम आहे!!’ आणि त्या इटलीकडे आह्मी धांव घेतली. अभिमानानें मस्तकें उन्मुख करून व आनंदानें हृदय उचंबळवून वनवासांत जातांनां ज्या प्रदेशांतून शिव्याशाप घेत घेत आह्मीं आलों होतों त्याच प्रदेशांतून आतां आमच्या देशाचा जयशयकार ऐकत ऐकत आह्मीं इटलीकडे धांवत आलों!

स्वातंत्र्याच्या समरभूमीकडे वायुवेगानें आह्मीं चाललों! “लोकसत्तेचा जयजयकार” सुरू झालेला आह्मीं ऐकला. मिलनमध्यें मी येतांच गडबड सुरू झाली. त्या वेळेस शहरांतील लोकांत विलक्षण अवसान चढलेलें होतें. राष्ट्रफंडाकडे हजारों रुपये जमा झाले. पुढाऱ्यांनां लाखों रुपये बिन व्याजीं देण्यांत आले. राष्ट्रीय स्वयंसेवकांत नांवें नोंदण्याची अहमहमिका तरुणांत सुरू होती. इकडे तरुण स्त्रियांनीं तर आपल्या स्वदेशाभिमानानें त्या तरुणांसही मागें टाकलें. स्त्रियांनीं काडतुसें तयार करण्यास आरंभ केला. त्या दारोदार राष्ट्रफंडाकरितां भिक्षा मागत हिंडू लागल्या. त्यांनीं जखमी देशवीरांच्या शुश्रूषेसाठीं दाईचें काम केलें! नेपल्समध्येंही जंगी चळवळ चालली. युनिव्हर्सिटींतून विद्यार्थी निघाले. सैन्य स्वदेशार्थ लढण्यास तयार झालें. मी मिलनला येतांच लोकसत्ताक पक्षाचें केंद्रीभवन केलें. परंतु मी येण्यापूर्वी मिलनचा ताबा लोकांकडून निघून पिडमांटच्या संस्थानिकाकडे गेला होता.

अशा स्थितींत मी व माझे स्नेही हे जरी लोकसत्ताक होते तरी परकीयांना हुसकून देण्याचें कृत्य प्रथम पार पाडावें एतदर्थ लोकसत्तेचा प्रश्न बिलकूल न काढतां स्वस्थ बसलों? इतकेंच नव्हे तर ऑस्ट्रियाच्या नाशार्थ सर्व पक्षांनीं एक व्हावें असा उपदेश देऊं लागलों.

आमच्या अंतःकरणाची पहिली इच्छा, आमच्या आयुष्याचें पहिलें कर्तव्य, ह्मणजे दास्यमुक्तता हें होय. परक्यांच्या हातून स्वदेश पूर्ण स्वतंत्र करण्यासाठीं आमचा पहिला प्रयत्न होता व होईल. नंतर मग दुसरा हेतु राष्ट्रैक्य हा होय. कारण, एकराष्ट्रीयता संपादिल्याशिवाय, राष्ट्राचें आज शतकों शतकें पडलेले तुकडे संजीवनानें एकत्र केल्याशिवाय, इटली एकराष्ट्र झाल्याशिवाय, स्वातंत्र्य कधींही टिकणार नाहीं. आमचें तिसरें लक्ष्य ह्मटलें ह्मणजे लोकसत्ता हें होय. ह्या लोकसत्तेचा जय भविष्यकालीं होणारच होणार अशी माझी खात्री आहे. आजच्यानें काय झालें आहे! आज जें अशक्य वाटत आहे तें घडून येण्यास भविष्याच्या उदरांत पुष्कळ जागा आहे. मग मी घाई कशाला करूं? जर कोणी स्वातंत्र्याची व राष्ट्रैक्याची हमी घेत असेल तर मी आनंदानें—माझी निष्ठा म्हणून नव्हे, कारण तसें होणें अशक्य आहे लोकसत्तेसाठीं करण्याचे प्रयत्न तहकूब करीन हें मीं प्रसिद्धपणें सर्वांना कळविलें. त्या संस्थानिकासही मीं उघड रीतीनें सांगितलें कीं, ऑस्ट्रियाशीं युद्ध चालू ठेवण्यांत मी तुम्हांस वाटेल ती मदत देण्यास कबूल आहें.

परंतु त्याला माझी खात्री येईना. एके दिवशीं त्या राजाचा एक अधिकारी मजकडे आला व मी लोकसत्ताक पक्षाला राजपक्षाकडे ओढून आणावें म्हणून विनंति करूं लागला. मला त्या प्रांताचे मुख्य प्रधानाची जागा देऊं करण्यांत आली! पण मीं माझें मत स्पष्टपणें कळविलें कीं, मी लोकसत्तेचा अध्वर्यु आहे तसाच राहीन. कारण, माझ्या स्वदेशाची त्याशिवाय खरी उन्नति होणार नाहीं हें मला पक्कें माहीत आहे. परंतु माझा स्वदेश स्वतंत्र व्हावा व तो एक व्हावा ही माझी इच्छा इतकी प्रबळ आहे कीं, राजा या दोन गोष्टी केल्याशिवाय राहणार नाहीं असें लेखी वचन मला देईल तर मी लोकसत्ताक पक्षाच्या सर्व चळवळी बंद करून ऑस्ट्रियाच्या बेडीला तोडण्यास तुमच्यासह प्रयत्न करीन. हें माझें पहिल्यापासूनच ठरलेलें आहे. व माझ्या पक्षाचें वर्तन इतका वेळ याच धोरणानें चाललेलें आहे. हें लेखी वचन देण्याचें कबूल करण्यांत आलें. मी तें लिहून द्यावें असें ठरलें. त्याप्रमाणें

मीं तें लिहूनही दिलें. थोडेच दिवसांत हें वचन देण्यास राजा कबूल नाहीं ह्मणून मला कळविण्यांत आलें. तरी आह्मीं युद्धाच्या जयाविषयीं आटोकाट प्रयत्न केले. मी स्विट्झर्लंडमधील स्वयंसेवकांची मदत देऊं केली ती नाकारण्यांत आली. मजविरुद्ध लोकांमध्यें द्वेष सुरू करण्याचा प्रयत्न सुरू झाला. माझेविरुद्ध भिंतीवर जाहिराती लाविल्या गेल्या कीं, " मी माझ्या आईच्या राजकीय मतांचा धिक्कार करून तिचें तोंड पहाण्यासही गेलों नाहीं ! तिचें दर्शन करण्याचें मीं नाकारलें ! " हाय, हाय ? याच वेळेला मी इटलीमध्यें वीस वर्षांच्या वनवासांतून परत आलों आहें असें ऐकून माझी प्रेमळ आई माझ्या त्या वनवासावर, त्या माझ्या मस्तकावर व माझ्या देशनिष्ठेवर शुभाशींची वृष्टि करण्यास्तव जिनोआहून निघून मिलनकडे येण्यासाठीं प्रवास करीत होती !

एके दिवशी रात्रीं बारा वाजतां मला मिलनच्या अधिकाऱ्याचें बोलाविणें आलें. मिलनला नेमलेलें तात्पुरतें सरकार युडिनच्या पराभवाची बातमी ऐकून गांगरून गेलें होतें. मी त्यांच्याकडे गेलों. तेथें आमच्या लोकसत्ताक पक्षाची पुष्कळ प्रमुख मंडळीही आली होती. त्या अधिकाऱ्यानें ' स्वदेशास आतां तारा ' म्हणून विनंति केली. मीं एका कागदावर काय काय गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत हें टिपलें व त्यांनीं सांगितलें कीं, तुम्हीं लोकांचा उपमर्द केल्यानें अप्रिय झालेले आहांत, म्हणून लोकप्रिय असे पुढारी नेमून ह्या गोष्टी पार पाडल्यास परक्यांचा नाश सहज करतां येईल. मला नांवें सांगावीं म्हणून विनंति करण्यांत आल्यावरून मीं तीन नांवें सांगितलीं व त्यांनां माझ्या लोकसत्तेच्या प्रयत्नांची शंका देखील येऊं नये म्हणून मुद्दाम आमच्या पुढाऱ्यांचीं नांवें गाळून तीन निरनिराळ्या पक्षाचे लोक निवडले. सैन्य कसें तयार करावयाचें ह्याची पंचाईत पडूं नये म्हणून मी स्वतः एक हजार तरुण स्वयंसेवकांचें सैन्य देतों अशी हमी घेतली. फक्त माझ्या हस्ताक्षरांत व माझ्या सहीचा जाहीरनामा मला काढूं द्यावा असें सांगितलें. हें झाल्यावर मी परत येण्यास निघालों. त्यांनीं टाळ्यांचा गजर केला व सर्वसंमति प्रदर्शित केली.

दोन दिवसांनीं ही संमति परत घेण्यांत आली. कारण राजाला आमच्या सैन्याचा विश्वास पटेना ! आतां एकी करण्यास कोण तयार नव्हते—लोकसत्ताक कीं राजसत्ताक लोक ?

मला पुष्कळांकडून तें मिलनचें तात्पुरतें सरकार उलथून पाडून सर्व सत्ता आपले पक्षाकडे घेण्याचा आग्रह करण्यांत आला. तें निर्जीव सरकार उलथण्यास एक क्षणही लागला नसता ! पण मीं तसें करण्याचें नाकारलें. कोणच्याही रीतीनें दुही नको म्हणून मीं त्यांच्यांत बिलकुल ढवळाढवळ केली नाहीं.

अखेर जें व्हावयाचें तेंच झालें. मिलनचे रक्षणाची राजाला केव्हांच काळजी नव्हती. त्यानें आधल्या दिवशीं मिलन शहर ऑस्ट्रियाचे ताब्यांत देण्याचा गुप्त करार केला व दुसऱ्या दिवशीं नीचतेचा कळस करण्यासाठीं मिलनचे लोकांसमक्ष शहरचें संरक्षण करण्याची शपथ घेतली ! व लगेच गुपचिप रीतीनें पळ काढून शहर ऑस्ट्रियाच्या हवालीं केलें.

लोकसत्ताक पक्षीयांची अखंड धन्य असो ! त्यांनीं जें वचन दिलें तें शेवटपर्यंत पाळलें. प्रथम परक्यांचा उच्छेद व स्वदेशस्वातंत्र्य, मग स्वदेशाची एकी, व मग तें स्वातंत्र्य व ती एकी अबाधित टिकण्यासाठीं लोकांच्या परवानगीनें लोकसत्ता स्थापणें, ह्या कार्यक्रमास आम्हीं शेवटपर्यंत पाळलें. ऑस्ट्रियाशीं लढतांना रणांगणांत शेवटपर्यंत टिकलेले वीर लोकसत्ताक होते ! मिलनच्या दाराशीं परका उभा असतांही युद्धोन्मुख झालेले तरुण लोकसत्ताक होते. व राजाच्या तहाला न जुमानतां मिलनचे रणांगणावर तळपणारा शेवटचा शूर ग्यारिबॉल्डी हाही लोकसत्ताक होता ! लोकसत्ताक पक्षानेंच मिलनच्या बंडाला आरंभ केला व राजसत्तेशीं मिळूनही शक्य तोंपर्यंत त्यांनीं ऑस्ट्रियाशीं झुंज घेतली इतकेंच नव्हे, तर राजसत्तेनें धूम पळ काढून आपला जीव बचावला असतांनाही आमचा पक्ष रणांगणांत अढळ ठाण मांडून उभाच होता.

मिलनला सर्व आशा निष्फळ झालेल्या पाहून मीं तें शहर सोडलें. त्या वेळेस माझ्या मनावर दुःखाचा केवढा पर्वत कोसळला होता हें त्या एका परमेश्वरास ठाऊक ! मोंझा या गांवीं ग्यारिबॉल्डी आपल्या लहानशा शूर टोळीला घेऊन उभा होता. मी त्या टोळीला जाऊन मिळालों. त्या टोळीचें लोकसत्तांकित निशाण अजून फडकत होतें. तें त्या तरुण शिपायांनीं मोठ्या प्रेमानें माझ्या स्वाधीन केलें. ‘ ईश्वर व जानपद ’ या मंत्राचा उच्चार करणारें तें निशाण सहा महिन्यांनीं रोमच्या तटावर दिव्य तेजप्रभेंत तळपणार होतें ! तें निशाण माझ्या स्वदेशाचें चिन्ह होतें ! मीं तें अत्यंत पूज्यभावानें

स्वीकृत केलें ! त्या वेळची उत्साहक हकीकत जनरल मेडिसि यानें दिलेली आहे. ती येथें देतों:—" जनरल ग्यारिबॉल्डी कस्टोझा येथें राजसैन्याचा पराभव झाल्यानंतर मोंझा या गांवीं जाण्याकरितां आपल्या ४००० सैन्यासह त्वरेनें निघाला. इतक्यांत माझ्या हाताखालीं असलेल्या आघाडीचे टोळीनें मॅझिनी आल्याची वर्दी दिली. आगष्ट तारीख ३ सन १८४८ या दिवशीं सकाळीं ही गोष्ट घडली. मी पहातों तों खांद्यावर रायफल घेतलेली आहे, व माझ्या टोळीमध्यें साधारण शिपायांचे जागीं आपली नेमणूक व्हावी म्हणून परवानगी विचारीत आहे, असा मॅझिनी माझे दृष्टीस पडला. त्या महात्म्या देशभक्तास पहातांच एकच जयजयकार सुरू झाला ! माझ्या शिपायांनीं सर्वानुमतें आपलें "देव व लोक" ह्या तत्त्वद्वयांनीं अंकित झालेलें निशाण त्याच्या हवालीं केलें.

" मॅझिनी आल्याची बातमी कळतांच गांवांतील सर्व लोक इकडे लोटले. ते त्याच्याभोंवतीं गर्दी करून उभे राहिले. त्यानें कांहीं तरी बोलावें म्हणून त्यास विनवूं लागले. त्या वेळेस त्यानें केलेला उपदेश सर्वांच्या कानांत अजून गुणगुणत असेल. 'इटलीवर अखंड प्रेम करा व वाटेल तें संकट आलें तरी निराश होऊं नका !' हे त्याचे शब्द ऐकून लोकांत विलक्षण स्फुरण चढलें. व आम्हीं मोंझा ह्या गांवांकडे निघालों.

" हा प्रवास सैन्यास फारच श्रमाचा झाला. पाऊस एकसारखा पडत होता व आमचें सर्वांग ओलें चिंब झालें होतें. जरी विद्यार्जनांत सर्व काळ गेलेला होता तरी ह्या असह्य त्रासदायक प्रवासामध्यें मॅझिनीचें सातत्य व गंभीरता हीं अद्वितीय होतीं. त्याच्या शारिरिक स्थितीबद्दल आम्हांस काळजी वाटून त्याला मागें रहाण्याबद्दल आम्हीं हजारों वेळां सांगितलें असतांनाही तो मागें राहिला नाहीं किंवा सैन्य सोडून रेंगाळला नाहीं. इतकें देखील एकदां घडलें कीं आमच्यापैकीं एका तरुणानें अंगरखा घातला नसल्यानें त्याला थंडी वाजत असेल असें जाणून मॅझिनीनें आपला अंगरखा बळें बळें त्याला घालावयास लावला. पुढें मिलन शहर शरण गेल्याचें आम्हांस कळलें व ऑस्ट्रियानें आमचा पाठलाग सुरू केला. त्या वेळेस माझी टोळी पिछाडीचे रक्षणाकरितां नेमली गेली. माझ्या टोळीनें शत्रूचें निवारण शेवट-पर्यंत उत्तम रीतीनें केलें. या भयंकर प्रसंगीं मॅझिनीचें प्रचंड आत्मबळ, धाडसीपणा व निश्चय यांचा कळस झाला ! आमच्यांतील अत्यंत शूर

मनुष्यांनींही तोंडांत बोट घातलें. आमच्या तरुणांना मॅझिनीबरोबर संकट सोसण्यास अत्यंत अभिमान वाटे. त्याचें वास्तव्य, त्याचें धैर्य व त्याचे शब्द यांनीं तरुण शिपायांस उत्साह मिळे. झटापटीचें तोंड लागतांच मॅझिनी पहिल्यानें उडी टाकी व ज्या देशनिष्ठेचा तो अध्वर्यु होता तिचे कार्यीं देह ठेवण्यास सदोदित तत्पर राही. त्याच्या या कृत्यांनींच सर्व सैन्य सुरक्षित व सुव्यवस्थित राहिलें. हीं कृत्यें मॅझिनीला इतकीं भूषणभूत आहेत कीं, तीं अप्रसिद्ध राहणें चांगलें नाहीं. आमची अशी पक्की खात्री आहे कीं, नागरिकत्वाच्या अनंत गुणांना या थोर पुरुषामध्यें शिपाईगिरीचेही सद्गुण मिळालेले आहेत! मॅझिनी हा उत्तम नागरिक व शूर शिपायी होता. व हे दोन्हीही गुण त्यानें स्वातंत्र्यदेवीच्या विजयाकडे खर्च केले!"

वास्तविक पहातां मिलन शहर पडलें तरी बंडवाल्यांनीं धीर धरावयास पाहिजे होता. परंतु राज्यक्रांतीचे कामांत एक अक्षम्य चूक केली जाते ती ही कीं, राजधानी पडली कीं, सर्व प्रांत पडला असें लोक समजतात. स्वातंत्र्याच्या युद्धांत स्वदेशाची खरी राजधानी म्हटली म्हणजे जेथें देशभक्तांचें निशाण फडकत असेल तीच होय. स्वतंत्र आयुष्य किंवा पवित्र मरण स्वीकारण्याचा निश्चय करून स्वातंत्र्यवीर स्वराष्ट्राचे निशाणास जेथें जेथें नेतील तेथें तेथें राजधानी त्यांच्या मागोमाग हिंडत असते. परंतु ही गोष्ट त्या वेळेस कळली नाहीं व सर्व प्रांत ऑस्ट्रियाचे ताब्यांत गेला. ग्यारिबॉल्डीनें मात्र मनुष्यप्रयत्नाला शक्य तेथपर्यंत रणांगण सोडलें नाहीं व जेव्हां सोडलें तेव्हां कोणचाही अपमानास्पद करार न करतां वीराला साजेल अशाच रीतीनें सोडलें. मीं मिलनमध्यें असतांना तेथील तरुणांनीं मला बन्डीएरा बंधूंच्या निधनतिथीच्या दिवशीं व्याख्यान देण्यास सांगितलें. तेव्हां मीं एक भाषण केलें.

"जेव्हां हे तरुणांनों, या पवित्र मंदिरांत देशभक्त बन्डीएरा बंधूंच्या स्मरणास्तव मीं आपली वाक्सेवा करावी म्हणून तुम्हीं मला आज्ञा केलीत तेव्हां मला असें वाटलें कीं, त्या देशभक्तांच्या सेवेचा हा कांहीं सत्य मार्ग नव्हे. मृतांसाठीं शोक काय म्हणून करावा! स्वातंत्र्यवीरांची खरी पूजा बांधावयाची असल्यास त्यांनीं आरंभिलेल्या महायुद्धांत जयश्रीला वरलें पाहिजे. **स्वातंत्र्यवीरांचा सन्मान करण्याचा एकच मार्ग आहे व तो स्वातंत्र्य मिळविणें हा होय.** परंतु आपण तें स्वातंत्र्य मिळविलें आहे काय? ज्या

धारातीर्थी त्या स्वातंत्र्यवीरांनीं आपले देह ठेवले तें कोसेंझाचें रणांगण अजून पारतंत्र्यांतच आहेना ? ज्या भूमींत त्या स्वातंत्र्यवीरांनीं जन्म घेतला ती व्हेनिसची भूमि परक्यांच्या पायांखालीं अजून तुडविली जात आहे ना ! मग व्याख्यानें कसलीं देतां ! **चला, आधीं स्वदेशाची मुक्तता करूं ! चला, आधीं गुलामगिरीचा उच्छेद करूं ! व त्या क्षणापर्यंत दुसरा कोणचाही शब्द न उच्चारतां फक्त हरहरमहादेवाचीच गर्जना करूं !**

" परंतु लगेच दुसरा विचार मनांत आला कीं, आमच्या स्वातंत्र्यासाठीं आम्हीं इतके धडपडत असतां आम्हांला यश मिळत नाहीं याचें कारण शोधण्यासाठीं आम्हीं आधीं आपआपसांत बोललें पाहिजे. तें कारण असें आहे कीं, आमच्या ज्या देशभक्तांनीं आपलें रक्त देशस्वातंत्र्यासाठीं खर्चिलें त्यांच्याप्रमाणें आपण मरूं किंवा मारूं या निश्चयानें उठलेलों नाहीं. तो जोर व ती स्वातंत्र्यनिष्ठा आम्हांत नाहीं. आमचे प्रयत्न दुबळे व संशयग्रस्त असतात. परमेश्वर व देश हे विरोधी नसून एकरूपच आहेत अशी पूर्ण निष्ठा ठेवून आपण अजुन जरी उठूं तरी विजयाला खेंचून आणूं ! आपण स्वातंत्र्य मिळवूं व मग जे देशवीर आजपर्यंत स्वदेशार्थ तळमळत पतन पावले आहेत त्यांना सांगूं, " तुमचें रक्त वायां गेलें नाहीं. आपला देश स्वतंत्र झाला आहे ! ' प्रीति करा. तरुणहो, प्रीति ही परमेश्वराकडे नेणारी सोपानपरंपरा आहे. आपल्या कुटुंबावर प्रीति करा. परंतु ती आंधळी प्रीति नसावी. ती प्रीति दैविक, शुद्ध व कर्तव्यस्वरूपी असावी. ती सुखलालसेनें नसावी तर ती प्रीतीसाठींच प्रीति असावी. कर्तव्याच्या आड न येणारी, कर्तव्याला उत्साह देणारी, अशी ती प्रीति असावी !

**" तरुण हो, स्वदेशभूमीवर प्रेम करा ! जेथें तुमचे पूर्वज स्वर्गीय निद्रा घेत आहेत ती भूमि म्हणजे तुमची स्वदेशभूमि होय ! ज्या भाषेमध्यें तुमच्या प्रेमाची मूर्ति तुमच्याशीं पहिले प्रेमशब्द उच्चारती झाली ती भाषा जेथें बदली जाते ती तुमची स्वदेशभूमि होय ! स्वदेश हें परमेश्वरानें तुम्हांला दिलेलें गृह होय. या गृहामध्यें वाढून तुम्ही त्याचे स्वरूपाला पोंचावें असा त्याचा हेतु आहे. स्वदेश हा तुमचा अभिमान, हें तुमचें वैभव, हें तुमचें चिन्ह आहे ! त्या स्वदेशाला तुमचे विचार, तुमचे उपदेश, तुमचें रक्त अर्पण करा ! त्या स्वदेशाला आपल्या पूर्व-**

**जांच्या भविष्याप्रमाणें भव्यतेला व सुंदरतेला न्या ! व आपण त्याला कोणचाही कालिमा न लावतां जगांतून जात आहोंत असें म्हणतां येईल अशा रीतीची काळजी घ्या. तुम्ही अशा रीतीची काळजी घ्या कीं, तुम्हीं जाण्याचे आधीं स्वदेश स्वतंत्र होईल ! तो स्वदेश, परमेश्वराप्रमाणेंच, एक असला पाहिजे. त्याचे तुकडे पाडतां कामा नये. तुम्हीं अडीच कोटी माणसें आहां. तुम्हांला अद्वितीय कर्तृत्वतेज प्राप्त झालेलें आहे. यूरोपच्या इतर राष्ट्रांनीं ज्याचा हेवा करावा असा वैभवशाली भूतकाल तुमच्या मागें उभा आहे. व आशेनें फुललेला भविष्यकाळ तुमच्या पुढें उभा आहे. तुम्हीं वर दृष्टि फेंकलीत कीं, रमणीयतम आकाश व तुम्हीं खालीं दृष्टि फेंकिलीत कीं, कमनीयतम भूमि तुमचे अभिनंदनार्थ स्मितवती होत आहे. परमेश्वराच्या अंगुलीनें तुमच्या राष्ट्राच्या मर्यादा आंखल्या आहेत ! परमेश्वरानें आल्प्सचा व समुद्राचा तुमच्या भोंवतीं पहारा ठेवला आहे. या राष्ट्रांत भीमबलवान लोक निपजावेत असा त्याचा हेतु आहे. व म्हणून ज्या आकाशाला गुलामगिरीचा डाग पडला आहे, त्या आकाशाखालीं रहावयास तुमच्या अडीच कोट लोकांतील एकही मनुष्य तयार नसला पाहिजे. एतदर्थ तुमचें राष्ट्र स्वतंत्र करा व रोम हें त्या स्वातंत्र्याचें मंदिर होऊंद्या !**

"मनुष्यजातीवर प्रेम करा ! स्वदेश हा तुमचा पाळणा आहे. व मनुष्यजाति ही तुमची माता आहे. तिच्यावर प्रेम केल्याशिवाय तुम्हीं त्या पाळण्यांतील आपल्या बंधूंवर प्रेम करावयास शिकणार नाहीं. आल्प्सच्या पलीकडे व समुद्राच्या पलीकडे इतर राष्ट्रें गुलामगिरींतून सुटण्यासाठीं धडपडत आहेत ! त्यांनांही तुम्हीं शक्य तेव्हां मदत करा. भूतदया ठेवा व तरुणांनों, ध्येयावर अत्यंत प्रेम करून त्याला पूज्य माना. तात्विक ध्येयासाठीं स्वार्थत्याग करा. दुःखाला कंटाळूं नका. संकटांना त्रासूं नका. आयुष्य हें सुख नाहीं, तर आयुष्य हें कर्तव्य आहे.

"माझ्या तरुण बंधूंनों, आपल्या प्रेमानें लुब्ध होऊन आपले देशवीर त्यांच्या आत्मिक स्वरूपानें जर येथें आलेले असतील तर हे शब्द त्यांच्या पवित्र तेजानेंच प्रस्फूरित झालेले आहेत असें समजून त्यांचें ग्रहण करा. परमेश्वर तुम्हांला साह्य करो व इटलीला सुखी करो ! !"

मिलन शहर सोडून मी स्विट्झर्लंडकडे परत जातों तोंच टस्कनीकडे बंडाची ज्वाला भडकल्याची बातमी आली. रोमहून पोप पळून गेला. व्हेनिस अजून टिकाव धरून होतें. टस्कनीमध्यें आमच्या पक्षाकडे सत्ता येऊं पहात होती. मग मला रहावेना. मी स्विट्झर्लंड सोडून जलमार्गानें पुन्हां इटलीकडे वळलों. मध्यंतरीं रोमला एक सार्वजनिक पत्र टाकून उत्साह देण्याचा प्रयत्न केला. मी ता. ८ फेब्रुवारी १८४९ या दिवशीं टस्कनी-मधल्या लेग्हार्न शहराला आलों. याच दिवशीं टस्कनीचा संस्थानिक पळून गेल्याची बातमी येऊन धडकली. ती प्रसिद्ध करण्याचें काम लोकांनीं मजकडेच दिलें.

( लेग्हार्नला मॅझिनीचा जंगी सत्कार झाला. परंतु स्वतःचे सन्मानाची हकीगत मुळींच न देण्याची या महात्म्याची वहिवाट दिसते. म्हणून त्या वेळच्या वर्तमानपत्रांतील एक उतारा खालीं देतों:—

"आज सकाळीं आम्हां नागरिकांना आमच्या जोसेफ मॅझिनीचा लाभ झाला. ज्याचा इटलीचें सरकार व राजे लोक दृढ द्वेष करीत आहेत, जो आजपर्यंत आपल्या देशनिष्ठेपासून तिळभरही ढळला नाहीं व जो धंदेवाईक देशभक्तांहून अनंत पटीनें निर्मळ व उज्वल स्वातंत्र्यभक्तीनें युक्त आहे तो जोसेफ मॅझिनी दिसतांच जिकडे तिकडे एकच जयजयकार झाला. चर्च-मधल्या घंटांचा घणघणाट सुरू झाला. व ज्या रस्त्यानें तो जाईल असा अजमास होता तिकडे शहरांतील नरनारींचा लोट वाहूं लागला. रस्त्यांतून हजारों ध्वज उभारले गेले. देशभक्तांचें रायफल सैन्य व स्वयंसेवकांचें सैन्य रांगेनें उभें करून त्या शहराचा नुकताच लोकांनीं निवडलेला अधिकारी ग्युएराझी हा सार्वजनिक गृहापुढें मॅझिनीला राष्ट्रीय मुजरा करण्यासाठीं उभा राहिला.

"दुपारीं लेग्हार्नमधले हजारों कंपू "देव व लोक" यांचा उच्चार कर-णारीं लाखों राष्ट्रीय निशाणें मिरवीत मिरवीत सार्वजनिक मैदानाकडे लोटूं लागले. 'इटलीचा जयजयकार असो' 'मॅझिनीचा जयजयकार असो' 'मॅझिनी हा लेग्हार्नच्या लोकसत्तेचा प्रेसिडेंट निवडला आहे.' वगैरे ध्वनि-समूहानें अंबर नादित झालें. ज्या रस्त्याला रोंखून धरून जुलमी सत्तेनें लोकांवर गोळ्या झाडिल्या तोच रस्ता मॅझिनीच्या येण्याकरितां राखून ठेविला होता. अहाहा, परकीयांच्या जुलमांचा आधार झालेला तो रस्ता तुडवीत तुड-

वीत मॅझिनी येऊं लागला असें पाहतांच देशभक्तांचा आनंद गगनांत मावेना !
"राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं लढून विजयी झालेलें राष्ट्रीयसैन्य व सर्व संस्थानचे अध्यक्ष लोक त्या महात्म्या इटालियनास पाहतांच त्यास अभ्युत्थान देते झाले. मग मॅझिनी लोकांत येऊन उभा राहिला. नंतर व्यासपीठावर चढला. तेव्हां लोकांच्या जयजयकारांनीं दशदिशा घुमूं लागल्या. मॅझिनी ह्मणाला, 'मी लेग्हार्नला वनवासांतून आलेलों आहे! ज्यांना तुह्मीं आपल्या स्वतंत्र शहराचे अधिकारी निवडले आहांत ते माझे मित्र झाले आहेत. लेग्हार्नची स्मृति माझे मनांत सदोदित जागृत होती व आज तेंच लेग्हार्न स्वातंत्र्यार्थ आपलें रक्त ओतून इटलीमध्यें धन्य नगर झालेलें पाहून मला अतिशय अभिमान वाटला आहे. तुम्हीं माझा जो सत्कार करीत आहां तो मी ज्या तत्त्वांचा–ज्या स्वातंत्र्य, ऐक्य, व लोकसत्ता ह्या तत्त्वत्रयीचा–अभिमानी आहे त्या तत्त्वांचाच सन्मान करीत आहां असें मी समजतों. कारण, आपण व्यक्तीकडे दुर्लक्ष करून तत्त्वालाच मान दिला पाहिजे. मला आपणांस एक आनंदाची बातमी कळविण्यास अभिमान वाटत आहे कीं, तुमच्या विजयाला भिऊन तुमच्या प्रांतांतील ऑस्ट्रियाचा हस्तक पळून गेला आहे. आतां स्वातंत्र्याचा जयजयकार होऊं द्या! बेबंदशाही व अंदाधुंदी न करितां लोकांना आपली सत्ता चिरस्थाई करण्याची ताकद आहे हें सिद्ध करा. झोंपी जाऊं नका, तर लढाईला सज्ज व्हा. कारण इटली स्वतंत्र झाला पाहिजे......' त्याच दिवशीं स्पेशल ट्रेननें मॅझिनी पुढें निघून गेला.")

लेग्हार्न हें शहर प्रथमपासून लोकसत्ताप्रिय आहे. व भविष्यत्कालीं इटलींतील लोकसत्तेचा पहिला जय तेथेंच होणार असा माझा भरंवसा आहे. फेब्रुवारी तारीख ९ ह्या मंगल दिवशीं सर्व लोकांच्या अनुमतानें रोमला लोकसत्ताक राज्याची द्वाही मिरविली गेली. माझ्या आयुष्यांतील श्रमांचें चीज होणार असें दिसूं लागलें. मी फ्लॉरेन्सला गेलों व टस्कनी प्रांतानें या वेळेस रोमच्या लोकसत्तेला मिळावें ह्मणून आग्रह केला. एकटे रहाल तर उद्यां तुमचें अनंत श्रमांनीं मिळविलेलें स्वातंत्र्य बुडेल ह्मणून मी जीव तोड-तोडून सांगितलें. रोमला मिळून दोन्ही प्रांत एक झाले असते तर किती बहार उडती ! पण तें त्या वेळेस त्यांना रुचेना ! मागून मी सांगत होतों तें सर्व प्रत्ययास आलें, मीं येथून निघून रोममध्यें प्रवेश केला. मी येण्याचे आधींच लोकांनीं माझी प्रतिनिधि ह्मणून निवडणूक केलेली होती !

रोम हें माझ्या तारुण्याचें स्वप्न होतें ! माझ्या विचारांचा तो उद्भव होता ! माझ्या आत्म्याचा तो धर्म होता मार्चच्या आरंभीं एका संध्याकाळीं मीं रोममध्यें प्रवेश केला. गंभीरपणानें–पूज्यतेनें–माझें अंतःकरण भरून आलें. त्या पवित्र शहरीं प्रवेश करतेवेळेस मिलनच्या पराजयानें व फ्लॉरेन्सच्या मूर्खपणानें माझें मन करपून गेलेलें होतें. परंतु रोमच्या लोकद्वारांतून प्रवेश करूं लागतांच माझ्या अंगांत विद्युत्तेजाचा संचार होऊं लागला नवीन जीवनाचा झरा वाहूं लागला. मला पुनः रोमचें दर्शन घडणार नाहीं, परंतु मरते वेळेस माझा शेवटचा विचार माझ्या रोम पत्तनाचा असेल ! व माझीं हाडें कोठेंही पडलीं तरी माझी अशी खात्री आहे कीं, ज्या दिवशीं रोमवर एकीकृत व स्वतंत्र इटलीचें लोकसत्तात्मक निशाण फडकूं लागेल त्या दिवशीं त्या माझ्या हाडांतही पुन्हां एकदां चैतन्य संचरूं लागल्याशिवाय रहाणार नाहीं.

रोमला लोकसत्ताक राज्य नुकतेंच स्थापिलें असल्यानें सर्वत्र गैरव्यवस्था होती. सैन्यांत सुमारें १६००० लोक होते. परंतु त्यांची रचना व सामग्री फारच दरिद्री होती. मी ता. १६ मार्च रोजीं लोकसभेपुढें एक सूचना आणली कीं, आपलें पहिलें कर्तव्य ह्मणजे मिळविलेलें स्वातंत्र्य रक्षण करणें व स्वदेशाचे बाकीचे भाग स्वतंत्र करणें. ह्या दोन्हीही कर्तव्यांसाठीं आपल्याला आधीं सबलत्व संपादिलें पाहिजे. यास्तव आपण पांचजणांचें युद्धमंडल निवडूं. त्या मंडलानें युद्धपद्धतीचा पूर्ण विचार करून रोमची लोकसत्ता सबल करावी. ता. १८ रोजीं हें मंडल निवडलें गेलें. पिसाकेन हा त्या मंडलांतला जीव होता. पिसाकेनचें व माझें पूर्ण मतैक्य असे. त्यानें सैन्य ४५००० पर्यंत वाढविलें. मध्यंतरीं ऑस्ट्रियानें पिडमांटचा नोवेरा एथील लढाईंत पूर्ण पराजय केल्याची बातमी आली. तेव्हां ता. २९ मार्च रोजीं लोकसभेनें सर्व सत्ता केंद्रीभूत करण्यासाठीं साफी, आर्मिलीनी व मॅझिनी हें अधिकृतत्रय निवडलें आहे असें जाहीर केलें. ता. २५ एप्रिलपर्यंत आह्मीं सैन्याची शक्य तितकी तयारी केली. त्या तारखेला आस्ट्रिया नजिक येत असल्याची बातमी कळली. रोमनें लढावें किंवा शरण जावें ! छे, छे, रोमनें शरण जावें व सर्व इटलींत अनीतीचा प्रसार करावा ! त्यापेक्षां मरण आलेलें काय वाईट ! शरण जाऊन जो फायदा होता त्यापेक्षां मरण स्वीकारलें असतां अनंत पटीनें जास्त फायदा होता. शरण जाऊन परवशता मिळाली

असती, परंतु मरण स्वीकारलें असतां स्वतंत्रता मिळणार होती ! रोमची हीच मनीषा होती. मीं एका सैन्यावरील अधिकाऱ्याला विचारलें असतां त्याचें मत लढाईचे विरुद्ध पडलें. तेव्हां दुसरें दिवशीं सर्व सैन्य एकत्र केलें व त्यास 'शरण कीं युद्ध' हा प्रश्न विचारला. आकाश दुभंग होईल अशी आरोळी उठून "युद्ध" ही गर्जना झाली. तेव्हां लोकसभेच्या व सर्वांच्या पूर्ण संमतीनें आम्हीं युद्धच स्वीकारलें. व एकटा ऑस्ट्रियाच जर आमचा शत्रु असता तर आम्हीं त्याला क्वचित् पुरून उरलों असतों. पण मध्यंतरी फ्रान्सनें विश्वासघात करून पोपला परत आणण्यासाठी आमच्यावर सैन्य धाडलें. इटलींत दोन चोरांचे डावपेंच सुरू होते. ऑस्ट्रियाचा मिलन वगैरेकडे जय होतांच त्याची सत्ता प्रबळ न व्हावी एतदर्थ फ्रान्सनें पोपचें निमित्त पुढें करून रोमच्या राजकारणांत ढवळाढवळ करण्यास आरंभ केला. याही संकटास आम्हीं भीक घातली नसती. पण फ्रान्सनें शेवटपर्यंत आमच्याशीं विश्वासघात केला. ऑस्ट्रियाचे जुलुमापासून रोमचें लोकसत्ताक राज्य संरक्षण करण्यासाठीं म्हणून फ्रेंच लोक आम्हीं नको नको म्हणतां आम्हांस मदत धाडूं लागले ! तेव्हांच हें कपट आमच्या लक्षांत आलें. परंतु अशा अडथळ्यांनां आम्हीं भ्यावें काय ? आम्हीं भ्याड ठरावें काय ? माझें मत फ्रेंचांनां अडथळा करावा असें होतें. परंतु सर्व लोकांच्या बहुमत संमतीशिवाय कांहींही करावयाचें नाहीं असा माझा निश्चय होता. म्हणून लोकसभेची बैठक करविली. क्वचित् माझ्या वजनामुळें लोक मजसारखाच निकाल देतील म्हणून मी त्या दिवशीं मुद्दाम सभेला गेलों नाहीं. लोकमत हें मला सदोदित पूज्य आहे. अधिकृतत्रयींपैकीं साफी व आर्मेलिनी हे हजर होते. परंतु मला सांगावयास अभिमान वाटतो कीं, त्या लोकसभेनें लोकसत्तेच्या बाण्यास काळिमा लावला नाहीं. राजसत्ता शरण जावोत, परंतु लोकसत्ता विजय किंवा मरण यांपैकीं एक स्वीकारतात. आम्हीं रोमच्या रस्तोरस्तीं लढाईची तयारी चालविली. ( त्या वेळेला माझिनीनें काढलेला जाहिरनामा येथें देतों :—

" लोकसत्तेचें जानपद हो ! ऑस्ट्रिया नजीक येत आहे. बोलोग्ना पडला आहे—आठ दिवसपर्यंत स्वार्थत्यागाची व वीररसाची कमाल करून पडला आहे. त्या शहरची शेवटची आरोळी 'सूड' ही आहे. प्रत्येक इटालियन अंतःकरणानें त्या पवित्र आरोळीची पूर्तता करावी. नागरिक हो, लोकसत्ता

तुमच्यापासून शौर्याच्या उत्कर्षाची आशा करीत आहे. तुम्हीं लोकसत्तेचा उच्चार केलात, आतां आचार करण्याची वेळ आलेली आहे. तुमच्या मतावर तुमच्या रक्ताचा शिक्कामोर्तब ठोका! म्हणजे मग तीं पवित्र मतें अबाधित रहातील! प्रत्येक शहर व प्रत्येक गांव बोलोग्नाचा सूड उगविण्यासाठीं उठलें पाहिजे. प्रत्येक देवळांत शत्रूंच्या निधनाची घंटा वाजली पाहिजे. तुमच्या पर्वतांतून या दरीपासून त्या दरीपर्यंत पवित्र क्रोधाची गर्जना झाली पाहिजे. प्रत्येक शिखरावर गुलामगिरीच्या मढ्यास जाळण्यासाठीं वैश्वानराच्या ज्वाला भडकल्या पाहिजेत. स्वातंत्र्याचे रक्तध्वज शहरांवरून व घरांवरून फडकत राहिले पाहिजेत व लढाईचा हर हर महादेव स्वदेशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत दुमदुमला पाहिजे! ईश्वर स्वातंत्र्याच्या बाजूला आहे. व तुम्हीं एका शपथेनें बांधलेलें, स्वदेशाच्या पवित्र कार्यी देह ठेवण्यास सज्ज झालेले, तीन कोटि लोक आहांत! तीन कोटि लोक जें करूं ह्मणतील तें करण्यास स्वयंसमर्थ आहेत! इटलीच्या पुत्रांनों, लोकसत्तेच्या जानपदांनों, शतकों-शतकें प्रयत्न करतां करतां आज खरी पर्वणी आली आहे. आजचा क्षण इतिहासांतील त्या पवित्र क्षणांपैकीं आहे कीं ज्या क्षणीं राष्ट्रांच्या जीवनाचा किंवा मरणाचा एकदम निकाल लागतो.

"तर मग जिवंत रहाणार किंवा मरणार? वैभवानें व सामर्थ्यानें वैभव-युक्त होणार कीं अखंड गुलामगिरीचा शिक्का कपाळावर ठोकूं देणार? स्वतंत्र राष्ट्र ह्मणून जगाला मान्य होणार कीं प्रेतांचे ढिगारे पडलेली स्मशानभूमि ह्मणवून घेणार? आपले, आपल्या देवालयांचे व आपल्या यज्ञदेवांचे स्वतंत्र मालक होणार कां जुलमी राजांच्या गोठ्यांतील गुरें बनणार? सत्कीर्तीनें अमर रहाणार कीं दुर्लज्जेनें अमर रहाणार? यांतून आपण काय पसंत करीत आहां? परमेश्वर व मानव्य तुमच्या पसंतीप्रमाणें तुमची किंमत ठरवील!

"ह्मणून उठा व जय संपादा. ग्रीस उठलें व त्याला जय मिळाला. स्पेन उठलें व त्याला सुयश मिळालें. स्वित्झर्लंड उठलें व त्याला स्वातंत्र्य मिळालें! मग इटलीलाच स्वातंत्र्य कां मिळणार नाहीं? जय कां मिळणार नाहीं? आपण का मनुष्य नाहीं? तर चला. जो आतां स्वदेशार्थ कांहीं तरी रक्त सांडणार नाहीं तो पापी ठरो! शत्रूंच्या भोंवतीं विस्तवाचा व ओसाड प्रदे-शाचा वेढा पडो! लोकसत्ता जशी आतांपर्यंत शांत होती तशीच आतां

पवित्र क्रोधानें संतप्त व भीमभयानक होवो ! रोम अढळ होवो ! इटलीचा जयजयकार होवो !!! ”

२१ मार्च १८४९.

मध्यंतरीं ग्यारीबॉल्डी रोमला येऊन मिळाला. तारीख २९ रोजीं फ्रेंचांचा हल्ला सुरू झाला. त्या वेळेस रोमच्या लोकांनीं जें शौर्य दाखविलें तें इतिहासांत अजरामर राहील. मॅझिनीनें लोकांस अतर्क्य उत्तेजन दिलें, फ्रेंच लोकांचा हल्ला चढला असतां त्या दिवशीं रोमन तरुणांनीं इतकी शर्त केली कीं, फ्रेंचांनां मागें हटावें लागलें इतकेंच नव्हे तर त्यांनां बेदम मारही बसला. त्यांचे ६०० शिपायी मेले व २०० कैद करण्यांत आले. इटलीच्या स्वयंसेवकांपैकीं फार तर ३०० लोक जायां झाले असतील ! इतक्यांत नेपल्सकडून रोमवर सैन्य येत असल्याची बातमी आली. तिकडे ग्यारीबॉल्डी त्वरेनें गेला व त्यांस पिटाळून मागें परतविलें. लोकसभेनें फ्रेंच कैदी परत धाडून दिले, तथापि फ्रेंचांनीं विश्वासघात करून ठरलेल्या मुदतीच्या पूर्वींच रोमवर पुन्हां हल्ला केला. त्या वेळेस निघालेला मॅझिनीचा जाहीरनामा पुढें दिला आहेः—

“ रोमन लोक हो, फ्रेंचांनीं विश्वासघात केला आहे.

“ रोमन लोकहो, ह्मणून सावध व्हा ! उठा ! तटाकडे चला ! नगरद्वारांकडे चला ! मोर्चांकडे चला ! सर्व शहर एका विचारानें उठूं या ! प्रत्येक जण लढूं लागा व प्रत्येक जण जय मिळेलच अशी खात्री ठेवा. आपले पूर्वजांची आठवण करा व थोर व्हा. सत्याचा जय होऊं द्या. व ऑस्ट्रियाच्या या नीच दोस्ताचा नाश होऊं द्या. लोकसत्ता चिरंजीव असो ! ”

तारीख ३ जून.

या दिवशींही इटालियन स्वयंसेवकांपुढें फ्रेंच लोकांनां हटावें लागलें. लगेच मॅझिनीनें दुसरा जाहीरनामा काढलाः—

“ रोमन लोक हो, शाबास शाबास ! तुह्मीं इटलीची अब्रू राखिलीत ! पूर्वजांच्या इभ्रतीला धक्का लागूं दिला नाहींत.

“ कालच आह्मीं तुम्हांला तुह्मीं थोर व्हा ह्मणून ह्मटलें. आज आह्मीं तुह्मांला तुह्मीं थोर आहांत ह्मणून ह्मणतों. असेच रहा. सातत्य धरा. चिकाटी धरा. रोमनलोक अद्भूतपूर्ण चमत्कार करण्यास समर्थ आहेत. रोम अविनाशी आहे. चला ! तटाकडे चला ! नगरद्वाराकडे चला ! मोर्चांकडे चला !

तुमची भूदेवी तुमच्यावर आशा ठेवून आहे ! तुमची राष्ट्रदेवी तुमचा पराक्रम पहात आहे ! लोकसत्ता चिरंजीव असो ! ”

या युद्धांत रोमन बायकांनीं जितका पराक्रम केला तितका इतरत्र पुरुष देखील करीत नसतील. मॅझिनी तारीख ९ जूनच्या जाहीरनाम्यांत ह्मणतो, “ रोमन नारीजन हो, तुमचे प्राणपति, तुमचे बंधुगण, तुमचे पोटचे गोळे युद्धांत गुंतले आहेत ! स्वदेशभूला स्वातंत्र्य देण्याच्या पवित्र युद्धांत गुंतले आहेत ! अशा वेळेला तुह्मींही स्वदेशाची सेवा करा. कारण तुह्मीं रोमन स्त्रिया आहांत ! ” ग्यारीबॉल्डीही आपल्या प्रयत्नांची शर्थ करीत होता. परंतु ऑस्ट्रिया व फ्रान्स या दोन शत्रूंच्या जंगी सेनेला एकटें रोम किती दिवस टिकणार? लोकांनीं धैर्याची कमाल केली, पण फ्रेंचांचें एकेक पाऊल पुढेंच पडत चाललें. अखेर युद्धाचा नक्की विचार करण्याकरितां मॅझिनीनें लष्करी अधिकाऱ्यांची सभा बोलाविली.

त्या सभेंत मीं ह्मटलें “ आतां आपणांस तीन मार्ग खुले आहेत. शरण जाणें; शहर नामशेष होईपर्यंत झटणें; किंवा रोम सोडून देऊन सर्व सैन्यासह बाहेर पडणें. पैकीं पहिला मार्ग लोकसत्तेला कलंक लावणारा आहे. दुसरा निरुपयोगी शौर्याचा आहे. परंतु तिसरा मात्र माझ्या मतानें योग्य दिसत आहे. रोम सोडून देऊन ससैन्य आपण बाहेर पडूं व असावध असलेल्या आस्ट्रियावर हल्ला करूं. आपल्याला सध्यां कोंडून पडावें लागलें आहे. ही कुंडी फोडून बाहेर पडलों कीं, मग आपण संरक्षण करण्यास समर्थ होऊं. रोम फ्रेंचांच्या ताब्यांत जाईल, पण लोकसत्ता आपणांबरोबर सुरक्षित राहील. ” माझ्या या मतावर वादविवाद झाला. एनेझाना वगैरे ‘शहरांतच लढावें ’ असें ह्मणाले. रोसेली ( मुख्य सेनापति, ) पिसाकेनी व ग्यारीबॉल्डी हे माझ्या मताला अनुकूल झाले. लोकसत्तेच्या अखंड कीर्तीस्तव हें सांगणें भाग आहे कीं, आमच्या त्या शूर स्वातंत्र्यवीरांपैकीं एकाही मनुष्यानें ‘ शरण जाण्याच्या ’ कलमाखालीं सही केली नाहीं ! मी तो निकाल घेऊन ताबडतोब लोकसभेकडे गेलों. त्यांनां तो निकाल व माझें मत सांगितलें. परंतु दुर्दैवानें त्यांनीं कांहीं एक ऐकिलें नाहीं. मीं आधींच त्यांतील सभासदांचीं मनें वळविलीं असतीं तर ते विरुद्ध जातेना, हें माझ्या मित्रांचें ह्मणणें कांहीं अंशीं खरें आहे. अखेर त्यांनीं फ्रेंचांनां शरण जाण्याचाच निश्चय केला. व मला हा निरोप फ्रेंचांकडे नेऊन देण्याचा हुकूम करण्यांत आला. मीं उत्तर

दिलें कीं, लोकसत्तेचें संरक्षण करण्याकरितां माझी निवडणूक झालेली आहे. ती लोकसत्तेचा नाश करण्याकरितां नव्हे. मीं या शद्बांबरोबरच माझ्या जागेचा राजीनामा धाडला. मजप्रमाणेंच अधिकृतत्रयींतील बाकी राहिलेल्या दोघांनींही राजीनामा दिला. फ्रेंचांनां शरण निघालों ह्मणजे ते रोमचें संरक्षण करतील अशी लोकसभेला आशा वाटली व ह्मणून ता. ३ जुलै रोजीं रोम शहरांत फ्रेंचांचा प्रवेश झाला !

एखाद्या मनुष्याच्या प्रियतमेची स्मशानयात्रा निघाली असतां त्याला जें दुःख होत असेल तें दुःख मला त्या वेळेस झालें ! आमची लोकसभा व अधिकारी एकामागून एक वनवासांत धाडून देण्यांत आले. ज्या दवाखान्यांतून आमचे शूर शिपाई स्वतःच्या जखमांपेक्षां स्वदेशाच्या जखमांनींच विव्हळत पडले होते, त्या दवाखान्यावर फ्रेंचांनीं केलेले हल्ले मी पहात होतों ! हाय, हाय, माझ्या देशवीरांच्या नुकत्याच सांडलेल्या रक्तावर परके लोक नाचत चाललेले मी पहात होतों ! मी रस्त्यांतून मुद्दाम हिंडलों. मला असें सिद्ध करावयाचें होतें कीं, मीं रोमवर फार जुलूम केला व तेथें मी अप्रिय झालों होतों अशा ज्या कागाळ्या माझ्या परक्या शत्रूंनीं पिकविल्या होत्या त्या अजिबात खोट्या आहेत. मी माझी छाती वाटेल त्या खंजीरासाठीं उघडी ठेवली होती. परंतु रोमन लोकांपैकीं तर काय पण शत्रुपक्षांपैकींही कोणीं तिला भोंसकलें नाहीं !

रोमकरितां मीं काय केलें नसतें ! अजून माझे बेत चालूच होते. मी सेनापति रोसेली याजकडे गेलों व जर मीं माझ्या जबाबदारीवर लोकांचें बंड पुन्हां उभारलें तर ते मला मिळतील कीं नाहीं हें विचारलें. त्यांनीं तें कबूल केलें, परंतु तेव्हां वेळ हुकून गेली होती. पुन्हां मीं असें ठरविलें कीं, रोसेलीनें फ्रेंचांनां भांडण टाळण्याचें निमित्त सांगून फौजेच्या टोळ्या बाहेर धाडण्याचा बेत करावा. मीं वेष पालटून फौजेबरोबर जावें. तेथें थोडा विसांवा घेऊन पुन्हां शत्रूंनां झुकांडी देऊन लढाई चालू करावी. हाही बेत पसंत ठरला. परंतु इतक्यांत ग्यारिबॉल्डी आपल्या शिपायांसुद्धां लढत लढत बाहेर पडला. हें ऐकतांच फ्रेंच सावध झाले व सैन्यास तळ हालविण्याचा हुकूम सुटला. आमचें सैन्य लौकरच भंगून नामशेष झालें. हे सर्व बेत नाशकारक व विलक्षण होते. परंतु त्या क्षणीं माझे सर्व विचार एका लढाईच्या विचारांत लीन झालेले होते.

परकीयांनीं माझ्या केंसालाही धक्का कसा लावला नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें. मार्गरेट फुलर नांवाची सुशील स्त्री व माझा जिवलग मित्र ग्युरिया मॉडिना यांनीं मीं रोम सोडावें ह्मणून फार कळकळीनें विनंति करीत असावें. अखेर मीं रोम सोडलें. मी परवाना वगैरे कांहीं एक न घेतां दुसऱ्या एका शहरीं गेलों. तेथें परवाना मिळेना ह्मणून मग मी एक स्टीमर निघत आहे असें पाहतांच तिच्या अधिकाऱ्याला भेटलों. तो कॉर्सिकन होता. त्याला मी हलकेंच माझें नांव सांगितलें. व बिन पासानें मला नेण्याचें धाडस करण्यास तो कबूल झाला. मी गुप्त रीतीनें त्या स्टीमरवर आलों. ती मार्सेलिसला जाणार होती. परंतु त्या स्टीमरवरच अपवित्र देखावा माझे दृष्टीस पडला. रोमन लोकांतील आमच्याविरुद्ध पक्षाचे लोक ऑस्ट्रियाकडे डेप्युटेशन घेऊन चालले होते ! मी त्यांच्याकडे बघितलेंही नाहीं. परंतु त्यांनीं मला ओळखलें. त्या अधिकाऱ्याला धाक पडला कीं, क्वचित् ही गोष्ट ते ऑस्ट्रियाला कळवितील. काय असेल तें असो, पण त्यांनीं ती माझी बातमी फोडली नाहीं व मी मार्सेलिसला सुरक्षित पोहोंचलों. फ्रेंच लोकांच्या–माझ्या शत्रूंच्या–प्रदेशांतून काय काय युक्त्या करून मी प्रवास केला व परवाना नसतांही जिनिव्हापर्यंत कसा पोंचलों हें येथें सांगत बसण्यांत हंशील नाहीं.

आम्ही रोमला तुरुंगाशिवाय व शिक्षेशिवाय लोकसत्ता चालविली. आम्हीं एकमेकांवर अढळ विश्वास ठेवला. आम्हीं विरुद्ध पक्षापैकीं कोणाच्या केंसालाही धक्का लावला नाहीं. इतकेंच नव्हे तर आमच्याविरुद्ध कट चाललेला कळतांच त्या पुढाऱ्यांस धरण्याचे ऐवजीं मीं मानिएनीला निरोप धाडला कीं, आपण शत्रूंशीं गुप्त व्यवहार सुरू ठेवला आहांत. एवढीच काळजी घ्या कीं, तें कृत्य लोकांच्या नजरेस न पडावें अशा रीतीनें शत्रूंशीं दळणवळण चालवावयाचें असल्यास खुशाल चालवा ! तो सगळा विश्वास, तें अढळ धैर्य, तें हल्ल्यांतील देशवीरांचें शौर्य हे सर्व सद्गुण उच्च ध्येयांचे परिणाम आहेत. स्वातंत्र्याची व लोकसत्तेची कल्पनाच अशी आहे कीं, तिचा स्पर्श होतांच सर्व उदात्त वृत्तींचा विकास व्हावा.

हल्लीं त्या १८४९ सालचें रोमन लोकांनां स्मरण आहे कीं नाहीं हें मला नक्की सांगतां येत नाहीं. परंतु रोमन मातांनां जर आपलें कर्तव्य बजाविणें असेल तर त्यांनीं आपल्या अर्भकांनां त्या स्वातंत्र्ययुद्धांत पडलेल्या असंख्य देशवीरांच्या कथा सांगाव्या. ज्या जागेवर लोकपक्षाचा तरुण कवि गोफ्रेडो

मामेली हा लढत लढत पडला ती पवित्र जागा दाखवावी. असह्य जखम झाली असतांही आपल्या १९ शिपायांसह ३०० फ्रेंचांच्या तुकडीवर चालून जाऊन हल्ला करीत करीत मानारा ज्या स्थळीं पडला; रामोरिनो व डेव्हेरिओ हे २० शिपायांनिशीं १०० फ्रेंचांच्या हल्ल्यास न जुमानतां आपल्या स्थाना-पासून ढळण्याचें नाकारल्यानें ज्या स्थळीं मारले गेले; व्हिला पॅम्फेली; व्हिला कार्सिनी; रोम शहरांतली प्रत्येक शिला; ज्यांच्या तोंडावर शौर्याचें स्मित व जिव्हेवर लोकसत्तेचा जयजयकार आहे अशा धारातीर्थीं देह ठेवणाऱ्या देशवीरांच्या रक्तांनीं भिजवून पूतपावन झालेलीं सर्व स्थळें; हीं जर माता आपल्या बाळकांनां दाखवितील तर कोणताही इटलीचा युवा गुलामगिरीला पुन्हां मुजरा करणार नाहीं!!!

# भाग पांचवा

## खंजीराची उपपत्ति

(इ. स. १८५६)

.......................................।
जीवांचा प्रभव जया कर्मे तें कर्म धर्म बा समज ॥ १ ॥
जोडे धर्म बरा तरि अनृतहि बोलोनि धर्म जोडावा।
जोडे अधर्म सत्यें तरि सत्याचाहि संग सोडावा ॥ २ ॥
जो रानीं चोरांनीं धरिला त्याची करावया मुक्ति।
लेश विचार न करितां बोलाव्या तेथ शतमृषा उक्ति॥ ३ ॥

**मोरोपंत-महाभारत (कर्णपर्व)**

(राज्यक्रांति व स्वातंत्र्ययुद्ध यांसारख्या अद्भुत प्रसंगीं प्रत्येक राष्ट्रांत जुलमाचा प्रतिकार जुलमानेंच केला जातो व द्वेष द्वेषाला बळी पडतो. ज्यांनीं असंख्य लोकांवर अप्रतिहत सत्ता चालविलेली असेल व निसर्गदत्त राष्ट्रीय हक्कांचा चुराडा केला असेल अशा कित्येक नराधमांनां त्यांच्या पापाचें प्रायश्चित्त एखादा देशाभिमानी खंजीर देऊन टाकितो. अशा प्रकारच्या वधांत व सामान्यतः ज्याला व्यवहारांत खून म्हणतात त्या खुनांत एक विशेष फरक आहे हें कोणाही विचारी मनुष्याला कबूल करावें लागेल. अशा प्रकारच्या राष्ट्रीय वधाची बरोबर मीमांसा करण्यासाठीं मॅझिनीनें एक लेख लिहिला होता. त्या लेखाला ' मानिन ' ( Manin ) नांवाच्या एका प्रसिद्ध इटालियन देशभक्तानें ' लंडनटाइम्स ' पत्रांत दूषण दिलें होतें. व तें पत्र पाहून आपलें स्पष्ट मत प्रसिद्ध करून गैरसमज दूर करण्यासाठीं खालील लेख मॅझिनीनें लिहिला होता. या लेखांत ' खून ' कोणचा व ' वध ' कोणचा व तो केव्हां दूषणास्पद होतो व त्याची जबाबदारी प्रथम जुलम व अन्याय करणारांवरच कशी असते हें मॅझिनीच्या मताप्रमाणें प्रतिपादन केलें आहे.)

इ. स. १८४८ सालीं ज्या वेळेस आपण लोकसत्ताक राज्याचे धुरीण होतां त्या वेळेस व्हेनिसच्या केलेल्या सुप्रसिद्ध रक्षणानें व त्यानंतर हद्दपारीची शिक्षा झाली असतां दाखविलेल्या थोरपणानें आपण आम्हां सर्वांना फार

प्रिय झालां होतां. परंतु तेंच आपण एका राजाच्या पायांपुढें आपलें—मी 'लोकसत्ताक' म्हणणार नाहीं, परंतु राष्ट्रीय निशाण अर्पण करण्यास तयार झाल्याचें जेव्हां मीं ऐकिलें तेव्हां तुमच्याबद्दल व माझ्या इटलीबद्दल मला अत्यंत दुःख होऊन मी स्तब्ध राहिलों.

व ती स्तब्धता मी अजूनही कायम ठेविली असती. परंतु आपल्या नुक्त्याच प्रसिद्ध झालेल्या एका पत्रांत आपण आमच्या पक्षावर इतका भयंकर आरोप केला आहे कीं, त्याचें निरसन न करणें म्हणजे त्या आरोपाला संमति दिल्यासारखें किंवा त्याकडे दुर्लक्ष केल्यासारखें होणार आहे. तें पत्र आपण एका परक्या देशांत प्रसिद्ध केलें आहे. 'लंडन टाइम्स' मध्यें तें प्रसिद्ध झालें आहे. हें वर्तमानपत्र राजकीय कुटिल कारस्थानांत पटाईत आहे व हल्लीं मध्य व दक्षिण इटलीमध्यें कांहीं स्थानिक सुधारणांची आवश्यकता आहे व असें प्रतिपादन करून आपल्या राष्ट्रीय हेतूंचे विरुद्ध जात आहे. ह्या पत्रानें ऑस्ट्रियाशीं मैत्री करावी म्हणून उपदेश केलेला आहे. ह्या पत्रानें इटलींतील राज्यक्रांतीच्या प्रत्येक प्रयत्नाचे विरुद्ध द्वेषमूलक लेख लिहिण्याचा विडा उचललेला आहे व त्यांतील पुढाऱ्यांच्या विरुद्ध निंदाव्यंजक कंड्या पिकविल्या आहेत. लॉम्बर्डीच्या लोकांनीं स्वातंत्र्यार्थ केलेल्या प्रत्येक थोर प्रयत्नांच्या वेळेस ह्याच वर्तमानपत्रानें पिसाळून जाऊन भुंकार केलेला आहे व वारंवार आपण इटालियन लोक अनीतिमान आहोंत व स्वातंत्र्यास अपवित्र आहोंत, अयोग्य आहोंत, म्हणून डांगोरा पिटलेला आहे. जणूं काय १८४८ व ४९ सालीं रोम, मिलन व तुमचें व्हेनिस वगैरे ठिकाणच्या लोकांनीं जुलूम व अनीति ह्या लांछनापासून अलिप्त राहून स्वातंत्र्यपात्रतेंत आम्हीं कोणच्याही राष्ट्रापेक्षां कमी योग्यतेचे नाहीं असें सर्व यूरोपच्या प्रत्ययास आणून दिलेलें नाहींच !

अशा या वर्तमानपत्रांत स्वतःच्या व राष्ट्रीय मानाच्यासाठीं तरी तूं पत्र प्रसिद्ध करावयास नको होतें. परंतु सर्व नीतिमत्तेचा मक्ता आपणच काय तो घेतलेला आहे अशी घमेंड बाळगणाऱ्याला तें पत्र प्रसिद्ध करून आपण आपल्या शत्रूंचे हातीं आपल्या राष्ट्रीयपक्षाविरुद्ध व आपल्या देशाविरुद्ध लढण्यासाठीं एक भयंकर हत्यारच देत आहोंत हें कसें कळणार ! हल्लीं टाइम्स पत्राचे जे चालक आपल्यापुढें स्थानिक सुधारणेचें भ्रामक चित्र ठेऊन आपलें लक्ष त्या अंतिम साध्यापासून–राष्ट्रस्वातंत्र्य व राष्ट्रैक्य

यांपासून–भलतीकडेच नेत आहेत तेच चालक योग्य संधि साधून तुझ्या-वरच टीका करतील व त्याच पत्राचा आधार घेऊन आपण इटालियन लोक अत्यंत भयंकर अनीतिमान व यूरोपच्या सहानुभूतीला अपात्र आहोंत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल.

परंतु हें उत्तर मी मजसाठीं लिहीत नाहीं. कारण, मला आतां निंदा व स्तुति ह्या गोष्टी सारख्याच आहेत. परंतु माझ्या सर्व पक्षाचेतर्फे मी तुला असें विचारतों कीं, ही खंजिराची उपपत्ति केव्हांपासून इटलीमध्यें मान्य करण्यांत आली ? ती कोणी प्रतिपादन केली ? व तिची अंमलबजावणी शब्दांत व कृतींत–करण्यास कोण तयार झाले ?

खंजीराच्या ह्या मीमांसेचा अर्थ जर तुम्ही खालील वाक्याप्रमाणें समजत असाल; जो गुलाम झालेल्या, ज्यांना देश नाहीं, ज्यांना स्वदेशाचें निशाण नाहीं, अशा लोकांना असा उपदेश करीत असेल कीं, " अरे उठा, मारा किंवा मरा. तुम्हीं मनुष्य नसून चालतीं बोलतीं यंत्रें आहांत ! व त्या यंत्राचा उपयोग परकीय सत्तेच्या चैनीसाठीं होत आहे. तुम्हीं राष्ट्र नाहीं तर तिरस्कृत व ज्यांचे आनुवंशिक हक्क हिसकावून घेतलेले आहेत अशा गुलामांची जात आहांत. तुम्हीं इटालियन–अस्सल इटालियन–नाहीं, परंतु सर्व यूरोपचे बंदे गुलाम आहांत. तुम्हांला राष्ट्रीय नांव नाहीं, तुम्हांला राष्ट्रीय धर्म नाहीं. तुम्हीं मनुष्यांचा एक बाजार आहांत. व तुम्हीं शून्यवत् झालेले आहां. तुमचें प्रथम कर्तव्य पुरुषत्व संपादण्याचें व नागरिक होण्याचें आहे. प्रत्येक शिक्षणाचा आरंभ येथून झाला पाहिजे. ज्यांना अस्तित्व आहे त्यांच्याच हातून प्रगमन घडत असतें. उठा. उठा तर व आपलें अस्तित्व शाबीत करा ! **उठा पशुतुल्य बलाचे जोरावर जे कोणी तुम्हांस अडथळा करण्यास येतील त्यांचा प्रचंड शक्तीनें व परमेश्वर सुचवील त्या मार्गानें संहार करण्यासाठीं उठा.** पवित्र क्रोधानें संतप्त होऊन उठा. जर तुमच्यावर जुलूम करणाऱ्यानें तुम्हांस निःशस्त्र केलें असेल तर नवीन शस्त्रें उत्पन्न करा. तुमच्या क्रूसांतील लोखंडाचीं हत्यारें घडवा. तुम्हीं काम करीत असलेल्या कारखान्यांतील खिळे, तुमच्या रस्त्यांतील दगड, यांचींही हत्यारें होतील. कारखान्यांतील हत्याराच्या तुम्हांला सुऱ्या करतां येतील. परक्या अधमांनीं ज्या शस्त्राचे बलावर तुमच्या-पासून तुमचा मान, तुमची संपत्ति, तुमचे हक्क व तुमचें आयुष्य हिसकावून

घेतलें असेल त्याच शस्त्रांनां युक्तीनें किंवा एकदम हल्ल्यानें परत लुटून आणा. व्हेस्परच्या खंजीरापासून तों पालफाक्सच्या सुरीपर्यंत व बालिलाच्या दगडापर्यंत **ज्याच्या योगानें तुमच्या शत्रूंचा निःपात होऊन तुम्हांस स्वतंत्रता मिळेल तीं तीं** सर्व शस्त्रें तुमच्या हातांनां धन्य करोत ! "–ह्या त्याच्या उपदेशाला जर तुम्हीं खंजीराची मीमांसा म्हणत असाल तर मी स्पष्ट सांगतों कीं, हीं वाक्यें माझीं आहेत व तीं तुमचींही असलीं पाहिजेत. ज्या हत्यारानें शस्त्रांच्या कारखान्यांत मिनकोव्हिचचा खून केला त्याच हत्यारापासून व्हेनिसच्या बंडाला आरंभ झाला व त्याच व्हेनिसच्या बंडाचें धुरीणत्व तूं स्वीकारलें होतेंस.

परंतु जो लोकांस असें सांगतों कीं, " मारा–स्वातंत्र्ययुद्धाचा आरंभ करण्यासाठीं नव्हे तर लढाई करण्याची शक्ति नाहीं किंवा इच्छा नाहीं म्हणून फक्त जखम करण्यासाठीं–अंधारांत, ज्यांच्या अस्तित्वानें किंवा निधनानें राष्ट्रीय मुक्ततेंत मुळींच फरक होत नाहीं अशा व्यक्तिविशेषांनां मारा. उन्नतिकारक गुप्त कटांचे ऐवजीं अवनतिमूलक सूड घेण्याचा आरंभ करा. नागरिकत्वाचीही योग्यता संपादण्याचे आधींच व शत्रूला पश्चात्ताप किंवा सुधारणा करण्याची फुरसत न देतां शिक्षा करण्याचा स्वयंमन्य हक्क स्थापित करा. "–ह्याच्या ह्या उपदेशाला जर तुम्हीं खंजीराची मीमांसा म्हणत असाल तर मी विचारतों कीं, असली भाषा कोणीं वापरली ? ह्या भयंकर उपपत्तीचा उच्चार इटलीमध्यें कोणीं केला ? हें स्पष्ट सांगणें किंवा आपला आरोप परत घेणें हें तुझें कर्तव्य आहे.

फक्त एकदां इ. स. १८४९ त कांहीं दुष्ट किंवा बिघडविलेल्या लोकांनीं अंकोनामध्यें ही भाषा वापरली होती. आम्हीं–आमच्या लोकसत्ताकपक्षीयांनीं अंकोनाला वेढा घालून याचें उत्तर दिलें. व फ्रेंच रेव्होल्यूशननंतर कधींही झाला नाहीं असा मतभेद व पक्षभेद झाला असतांनांही आम्हीं अत्यंत जोरानें ह्या माथेफिराऊ क्रौर्याचा बंदोबस्त केला. त्या वेळच्या लोकसत्ताक राज्यानें भयंकरपणा किंवा सूड यांपासून पूर्ण अलिप्त राहून व वेढ्यासारख्या भयंकर स्थितींतही एकाही मरणाच्या शिक्षेवर सही न करतां रोम शहर सोडिलें आहे.

त्या वेळेपासून गुलामगिरीच्या अंधःकारांत इटली देश पुन्हां गुरफटून गेल्या कारणानें जुलमाचीं तुरळक कृत्यें कांहीं व्यक्तींचे हातून घडलीं आहेत.

**हीं कृत्यें अश्रुत व अखंड अशा गुलामगिरीच्या त्रासाचीं उत्तरें आहेत.** ज्यांच्या बापाचा किंवा भावाचा बंदुकीच्या गोळीनें किंवा असह्य छलानें लष्करी कमिशनांकडून वध झाला आहे अशा कांहीं व्यक्तींकडून हीं कृत्यें केलीं गेलीं आहेत. त्या कृत्यांना दोष देण्याचा किंवा निरर्थक म्हणून त्यांबद्दल दुःख प्रदर्शित करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. परंतु त्यांचें खापर एखाद्या पक्षावर सरसकट रीतीनें लादून यूरोपच्या पुढें तीं कृत्यें कधींही अस्तित्वांत नसलेल्या तत्त्वाचीं फळें आहेत म्हणून म्हणण्याचा मात्र कोणा-सही अधिकार पोंचत नाहीं. अनंत उदाहरणांतून एकच मी देतों. सरव्हिएरि नांवाच्या लॅाम्बर्डीमधील एका मनुष्याला रोज २० याप्रमाणें एक आठवडा-भर फटके मारण्यांत आले. कारण, त्यानें मॅन्यूआमध्यें तुरुंगांत त्याचेच बरोबर असलेल्या कालव्ही नांवाच्या देशभक्त कैद्यास त्याचें आपलेकडे असलेलें कर्ज ऑस्ट्रियनांकडून त्यास देहान्त शिक्षा होण्याचे आधीं परत केलें जावें म्हणून कांहीं पैसे देण्याची व्यवस्था केली होती. ऑस्ट्रियनांनीं ते पैसे देण्याचें नाकारलें इतकेंच नव्हे, तर तेच पैसे फांशीच्या दोरासाठीं व मांगासाठीं म्हणून ठेवून घेतले. आतां जर त्या देशभक्त सरव्हिएरीच्या किंवा कालव्हीच्या बापानें किंवा भावानें सांपडेल तें हत्यार घेऊन बाजारांत जो त्यांच्यावर जुलूम करणाऱ्या जातीचा पहिला मनुष्य भेटेल त्यास भोंसकून मारिलें तर तें कृत्य खंजीराच्या उपपत्तीचा परिणाम आहे म्हणून म्हणण्याचें धाष्टर्य तूं करशील काय ?

**ज्या स्थितीमध्यें देशभक्ति हा अपराध होतो; त्या देशभक्तीच्या अपराधासाठीं किंवा अपराधाच्या नुस्त्या संशयासाठींही देश-भक्तांच्या आयुष्याची व मालमत्तेची राखरांगोळी केली जाते; बेफाम, अखंड व अत्यंत राक्षसी जुलूम विचारस्वातंत्र्याला नष्ट करतो; निम्मे इटलीमध्यें तरवार हाच कायदा झालेला असतो, परकी अंमलाच्या उद्दामपणास जेथें अंत नाहींसा होतो; अत्यंत त्रासदायक अशा पोलिसच्या कायद्यानें व निर्लज्ज हेरांच्या सुळ-सुळाटानें संतापांत प्रत्यहीं भर पडते व पदोपदीं होणाऱ्या अपमानानें द्वेषाची जेथें परमावधी होते; त्या स्थितीमध्यें गुप्त कटांवांचून संरक्षणाचा दुसरा मार्ग नसतो.** लोकांनी ज्याचा योग्य तिरस्कार केलेला आहे, अशा सत्तेच्या हातून होत असलेले अनंत जुलूम;

लोकशिक्षणाची उणीव; अस्तित्वांत असलेल्या सर्व संस्थांबद्दल उत्पन्न झालेला अपरिहार्य तिरस्कार; गुप्त जुलमाविरुद्ध न्याय मिळण्याची पूर्ण अशक्यता; शक्तिमान अधिकाऱ्यांच्या स्वयंमन्य लहरींत उद्यांची शाश्वति नसल्यानें साहजिकच उत्पन्न झालेला आयुष्याबद्दलचा तिटकारा; राष्ट्रीय विचाराकडे युरोपियन राजांचें असलेलें नीच दुर्लक्ष व अर्ध्या अधिक शतकापर्यंत दाबून ठेवली असतांनाही लोकसंघांत उत्पन्न झालेली विस्तृत महत्त्वाकांक्षा–या गोष्टींमध्यें खंजिराकडून घडलेल्या प्रत्यक्ष परिणामांचें खरें मूळ आहे.

जेव्हां एखादी व्यक्ति स्वतःच्याच स्फूर्तीनें असलीं कृत्यें करते तेव्हां त्या स्फूर्तीचें मूळ कारण मी वर दिलेल्या परिस्थितींत शोधिलें पाहिजे. व ती परिस्थिति जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत तीं कृत्येंही कायम रहाणारच हें स्पष्टपणें सांगणें भाग आहे. जेव्हां जेव्हां इटलीला स्वातंत्र्यसूर्याच्या निदान एका किरणाचा तरी स्पर्श झाला तेव्हां तेव्हां प्रत्येक ठिकाणीं आमच्या देशबांधवांनीं कशी क्षमाशीलता दाखविली हें यूरोपच्या निदर्शनास आणून देणें भाग आहे. नुकत्याच एका इंग्लिश प्रधानानें हाऊस ऑफ कामन्समध्यें काढलेल्या उद्गारांतील, “ इटली देशांतील शहरें लोकसत्ताक निशाण रोमवर फडकत असतांना दोषापासून व गुन्ह्यापासून जितकीं अलिप्त होतीं तितकीं केव्हांही अलिप्त नव्हतीं. ” हें सत्य यूरोपला सांगणें अवश्य आहे. पुन्हां एकदां आपल्या भयंकर जुलमांचें चित्र रंगविणें व ऑस्ट्रिया हा लोकसंघाच्या एकमतानें दर्शविलेल्या इच्छेच्या विरुद्ध, हट्टानें, ज्यावर त्याचा हक्क मुळींच नाहीं तें बळकावून ठेविण्याचा प्रयत्न करीत आहे, हें कंठशोष होई तोंपर्यंत सांगणें अवश्य आहे. रोममध्यें प्रगतीचा प्रत्येक मार्ग बंद केल्यानें फ्रान्स, पोपला परत आणण्याची इच्छा आपल्या खलित्यांत दर्शविल्याबद्दल इंग्लिश प्रॉटेस्टंट गव्हर्नमेंट, व इटली राष्ट्र होण्यासाठीं धडपड असतांना तिला अडथळा केल्यानें सर्व यूरोप, हेच सर्वजण आमच्या देशामध्यें अंधःकारांत चकाकणाऱ्या खंजिराबद्दल, त्या परमेश्वरापुढें व मनुष्यजातीपुढें जबाबदार ठरत आहेत ! व जेव्हां जेव्हां अशिक्षित, अनाथ व दास्यत्रस्त लोकांची तक्रार अशा खंजिराचें भयंकर स्वरूप धारण करते तेव्हां तेव्हां ज्यांनीं मानवी जातीला गुलामगिरींत ठेवलें त्या नराधमांनीं त्या दोषांचें खापर आपल्याच माथ्यावर फोडलें पाहिजे !

मला वाटतें कीं, असें स्पष्ट सांगणें हें तुझें कर्तव्य होतें. फांशीच्या सुरीखालीं तळमळणाऱ्यांना ‘ तुम्हीं मात्र तुमच्या सुऱ्यांचा उपयोग करूं नका, ’

म्हणून सांगणें हें रोममय विषारी वातावरणांत रहाणाऱ्या मनुष्यांनां 'तुमचें रक्त शांत रीतीनें तुमच्या नाड्यांतून वाहूं द्या व स्वतःच बरे व्हा.' असें सांगण्यासारखेंच आहे. जे शहाणे, 'राजकीय सत्तेंत जे उत्पन्न झालेले व त्यांतील दास्यांतच गढलेले असतात त्यांच्या अंगीं लोसत्ताचालकत्वाचे गुण आल्याशिवाय लोकसत्ताक राज्याला आरंभ करावयाचा नाहीं.' म्हणून म्हणतात ते जी चुकी करतात तसलीच चुकी वरील गोष्टींतही घडत असते.

व्यक्तिविषयक कृत्यांनां माझी पसंती केव्हांही नव्हती. मला त्या कृत्यां-बद्दल वाईट वाटतें. परंतु त्यांची निंदा करण्यास मात्र माझें अंतःकरण धजत नाहीं. जेव्हां एक मनुष्य ( व्हॅन्डोनी ) मिलनमध्यें येतो, आपल्या एका स्नेह्यास अतिशय आग्रह करून एक इटालियन नॅशनल नोट घ्यावयास लावतो व लगेच पोलिसकडे-परक्या पोलिसकडे-धांवत जाऊन त्या स्नेह्यास पकडून देतो, तेव्हां जर एखादा शेतकरी उठला व त्या पाप्याच्या नरडीचा त्यानें भर रस्त्यांत दिवसाढवळ्या घोट घेतला, तर अशा वेळीं ज्यानें समाज-भय व जुलमाचा तिरस्कार दाखविण्यासाठीं व केवळ या सार्वजनिक हेतू-साठींच आपल्याला संकटांत पाडून घेतलें अशा त्या शेतकऱ्यावर दगड फेंकण्याचें धाष्टर्य मजकडून होत नाहीं.

**तेव्हां एखाद्या पवित्र तत्त्वाच्या अभ्युदयासाठीं किंवा विजया-साठीं अत्यंत आवश्यकता नसेल अशा कोणच्याही समयीं रक्ताचा एकही बिंदु पाडणें ह्याचा मला अत्यंत तिटकारा आहे.** माझ्या मतानें तर समाज स्वतःचें संरक्षण करण्यास समर्थ असल्यानें मरणाची शिक्षा देणें हें दोषास्पद आहे व एखाद्या विजययुक्त लोकसत्ताक राज्याचा फांशी अजिबात बंद केल्याचा हुकूम केव्हां सुटेल याची मी मार्गप्रतीक्षा करीत आहें. व्यक्ति-विषयक सूडाबद्दल-मग ते दुष्ट मनुष्यांवर कां उगविलेले असेनात, कायदे-शीर इलाज थकले म्हणून कां घडलेले असेनात-मला अत्यंत दुःख वाटतें व एका शिपायाच्या मरणाच्या शिक्षेवर ती शिक्षा लष्करी नियमाप्रमाणें ठरलेली असतांनांही मी सही केली नाहीं. यावरून मला आशा वाटते कीं, माझ्या मताचा विपर्यास केला जाणार नाहीं. म्हणून मी स्पष्ट म्हणतों कीं, **राष्ट्राच्या आयुष्यांत व इतिहासांत कांहीं प्रसंग इतके अपवादात्मक असतात कीं, त्या वेळेला समाजाचे सामान्य नीतिसिद्धांत अपुरे असतात व म्हणून तशा समयीं परमेश्वराकडून व स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीकडून जी स्फूर्ति होईल तीप्रमाणें प्रत्येकानें वागलें पाहिजे.**

व म्हणूनच ज्यूडिथच्या हातांत चकाकणारी व होलोफर्वेसच्या आयुष्याचा अंत करणारी तरवार धन्य आहे ! हार्मोडियसनें गुलाबाचे फुलांत ठेविलेली तरवार म्हणूनच पवित्र आहे ! ब्रूटसचा खंजीर म्हणूनच पवित्र आहे ! म्हणूनच त्या व्हेस्पसला आरंभ करणाऱ्या सिसिलियनाची सुरी व त्या 'टेलचा' बाण हीं पवित्र आहेत ! जेव्हां न्याय नाहींसा झालेला असतो; पवित्र लोकमताचा प्रतिकार व नायनाट हा एखाद्या जुलमी प्राण्याच्या भीतीनें घडून येतो; ज्या परमेश्वरानें त्या लोकांनां स्वतंत्र रहावें म्हणून उत्पन्न केलें असतें त्या परमेश्वराचा जेव्हां इच्छाभंग होतो; अशा वेळीं जर एखादा नरोत्तम पुढें येईल, खाजगी द्वेष किंवा दुसऱ्या कोणच्याही दुष्ट हेतूचा ज्यास कलंक लागलेला नाहीं अशा अंतःकरणांतील स्वदेशधर्माच्या प्रेमानें प्रेरित होऊन पुढें येईल, व आपल्या अंतर्यामीं असलेल्या अखंडित व अबाधित सत्वाला स्मरून त्या जुलमी नराधमाला विचारील, "नराधमा, तूं माझ्या लक्षावधी बंधूंचा छळ करतोस ? जें परमेशानें त्यांनां निसर्गदत्त दिलेलें आहे तें त्यांच्यापासून हिसकावूं पहातोस ? त्यांचीं शरीरें नष्ट व त्यांचे आत्मे मलिन करतोस ? माझी प्रिय देशभूमि तुझ्यामुळें मरत पडली आहे ! गुलामगिरी, अपमान व छल

---

१ '**ज्यूडिथ**'—ह्या शूर स्त्रीनें स्वतःचे देशासाठीं होलोफर्वेस ह्याच्या तंबूंत शिरून त्याचा प्राण घेतला.

२ '**हार्मोडियस**'—या अथेन्सच्या नरवीरानें हिपार्कस याचा खून पाडून अथेन्समध्यें लोकसत्तेचा पाया घातला. अथेन्सच्या देशवीरांत याची प्रामुख्यानें गणना होते.

३ '**ब्रूटस**'—सीझर हा रोमच्या लोकसत्तेला बुडवून स्वतःच बादशहा होणार आहे अशा समजुतीनें सीझरच्या छातींत खंजीर भोंसकून त्यास ठार मारण्याचे कामांत यानें पुढाकार घेतला होता.

४ '**टेल**'—ह्या स्विट्झर्लंडच्या देशवीरानें आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेवलें आहे. आस्ट्रियाचे प्रतिनिधीनें एका काठीवर राजाची टोपी ठेवून तिला सर्व स्विस् लोकांनीं मुजरा करावा असा हुकुम सोडला. परंतु तसें करण्याचें टेलनें नाकारलें. ह्या उद्दामपणाबद्दल स्वतःचे पोराचे डोक्यावर ठेवलेलें लिंबू तीक्ष्ण बाणानें उडविण्याची टेलला आज्ञा झाली. टेल हा धनुर्विद्येंत निपुण असल्यानें त्यानें तें लिंबू वरच्यावर उडविलें. परंतु ह्या गर्दींत लपवून ठेवलेला दुसरा बाण खालीं पडला. "हा बाण तूं काय म्हणून आणलास ?" असें त्या जुलमी म्लेंच्छानें विचारतांच, "अरे दुष्टा ! तुझा प्राण घेण्यासाठीं." असें ओरडून टेलनें त्या अधमाचें शिर तत्काल उडविलें. थोडेच दिवसांत देश स्वतंत्र झाल्याची पवित्र वार्ता सर्व स्विट्झर्लंडमध्यें दुमदुमूं लागली.

यांच्या इमारतीचा तूं पाया आहेस. मीं तुझे तुकडे उडवून त्या इमारतीस धुळीस मिळवितों ! अशा उदाहरणांत जेव्हां यःकश्चित् एखादी व्यक्तीही लक्षावधी लोकांवर जुल्म करणाऱ्याची बरोबरी करते व त्यास शासन करूं शकते तेव्हां या विलक्षण साम्यांत मला परमेश्वराचें अंग असलेंच पाहिजे असें वाटूं लागतें. मलाच काय ? बहुतेकांच्या अंतःकरणांना हेंच वाटत असतें. मी फक्त तें स्पष्ट बोलून दाखवितों.

मानिन, अशा सत्कृत्यावर तिलांजली सोडण्यास मी तुझ्याप्रमाणें तयार नाहीं किंवा ढळढळीत अन्यायानें ' तुम्हीं भितरे आहांत ' असें मी म्हणणार नाहीं. फार तर मी इतकेंच म्हणेन, ' कशासाठीं तुम्हीं वध करतां ? ' जर मनुष्याला आपल्या मानवी बंधूंच्या आयुष्याचा अंत करण्याचा हक्क असेल तर हेर, देशद्रोही व जो परक्या अधमापासून पैसे स्वीकारतो, आपल्याच देशबांधवांचे हालहाल करीत त्यांना फांशीकडे ओढीत नेतो व स्वदेशाची गुलामगिरी सहन न केल्याच्या अपराधाची शिक्षा देऊं पाहातो, ह्या सर्वांवर त्या हक्काची अंमलबजावणी करण्यास बिलकूल हरकत नाहीं. हें जरी खरें आहे तरी या एकट्याला मारण्याचा उपयोग काय ? त्या सर्वांना मारण्याची कांहीं तयारी झाली आहे काय ? आपणांस राष्ट्र उत्पन्न करावयाचे आहे. त्या पवित्र कल्पनेंत व त्या कार्यांत यश यावें म्हणून करण्याचे कर्तव्यांतच आपल्या हक्कांचें बीज आहे. मुख्य गोष्ट जी केली पाहिजे ती जुलुमाभोंवतीं फिरणाऱ्या थोड्याशा उपग्रहांचा नायनाट करणें ही नसून त्या मुख्य जुलुमाचा नायनाट करणें ही होय. जोंपर्यंत तो मुख्य जुलुम कायम आहे, जोंपर्यंत देशांत परक्यांच्या तरवारी कायम आहेत, तोंपर्यंत देशद्रोही लोकही कायमच रहाणार. तर मग एकट दुकट प्रयत्न न करतां तुमची सर्व शक्ति एकीकृत होऊंद्या. सर्व मिळून उठण्याचे तयारीला लागा. परक्यांनी चढाई केली आहे तिकडे संघटितशक्तीनें एकदम वळा, मग तुमची निसर्गदत्त भूमि सर्व प्रकारच्या जुलुमांपासून व नीचतेपासून मुक्त होईल. **आपला स्वतःचा देश स्वतंत्र करण्यासाठीं लढण्याचा हक्क परमेश्वरानें तुम्हांला दिलेला आहे.** एखाद्या दुसऱ्या अन्यायी व्यक्तीला मारण्यांत आपण स्वतःवर जबाबदारी ओढून घेतों.

अशा रीतीनें त्या लोकांच्या कृत्याची परीक्षा केली पाहिजे. परंतु तूं त्यांच्यावर तिलांजली सोडूं इच्छितोस ? त्यांच्यापैकीं कांहींनीं उठून जर तुला

विचारलें कीं, " मानिन, तूं आम्हांला इतर पुढाऱ्यांप्रमाणेंच परक्या सत्तेचा द्वेष शिकविला आहेस. इतरांप्रमाणेंच तूं आमच्या मनांत स्वदेशस्वातंत्र्य-तृष्णा उत्पन्न केली आहेस. तर मग पूर्वीप्रमाणेंच आतांही आम्हाला तें साध्य प्राप्त करून घेण्यास कां नेत नाहींस ? आतां आम्हांस सोडून कां देतोस ? तुला आमचे खंजीर आवडत नाहींत म्हणतोस तर आम्हांला बंदुका दे ! तूं व आम्हांला अत्यंत प्रिय असलेले बाकीचे पुढारी एक होऊन इष्ट घटिका आली आहे असें कां सांगत नाहीं ? हें तूं कां करीत नाहींस ? तुला काय वाटतें ? तुला अशी आशा वाटते कीं काय कीं परकीय सत्ता आपल्या इटली देशाला स्वतंत्र करील ? नाहीं, नाहीं ! तें कधींही शक्य नाहीं ! चल तर, आमच्या हाताला तुझ्या डोक्याचें साह्य दे. तरच तुला आम्हांस उपदेश करण्याचा हक्क प्राप्त होणार आहे ! "

अशा ह्या प्रश्नांस तूं काय उत्तर देशील ?

# गनिमी काव्याचे नियम.

## ( इ० स० १८३२ )

' ऐसे अवघेचि उठतां, । परदळाची काय ती चिंता ॥
हरणें पळती उठतां चित्ता. । चहूंकडे ॥ १ ॥

' श्रीसमर्थ रामदास. '

( खालील नियम मॅझिनीनें आपल्या गनिमी टोळ्यांकरितां केलेले होते. यूरोपच्या प्रख्यात लष्करी अधिकाऱ्यांनीं या नियमांची फार तारीफ केलेली आहे. मॅझिनीनें स्वदेशस्वातंत्र्यार्थ उपयोगी असणाऱ्या प्रत्येक साधनाचा किती सूक्ष्म रीतीनें अभ्यास केलेला होता व लेखनकलेप्रमाणेंच युद्ध कलेंत ही गोष्ट तरुण तयार करण्यासाठीं त्या महात्म्यानें कसे प्रयत्न चालविले होते हें खालील लेखावरून दिसून येईल. स्वदेशाला स्वतंत्र राष्ट्र करण्यास मन व हात हे दोन्ही स्वातंत्र्याचे तालमींत तयार झाले पाहिजेत. मनानें स्वातंत्र्याचें चिंतन केलें पाहिजे व हातानें त्याचें रक्षण केलें पाहिजे. खरा मनुष्य म्हणजे तो नागरिक व शिपाई असला पाहिजे. जगताच्या प्रस्तुत स्थितींत आपले नैसर्गिक व न्याय्य हक्क कायम ठेवण्यास मनांत त्या हक्कांची व हातांत ते

हक्क संभाळण्याची ताकद पाहिजे आहे. ‘ तरुण इटली ’ ह्या गुप्त मंडळीनें आपल्या लेखणीनें इटलीचें मन तयार केलें व आपल्या तरवारीनें इटलीचे हात तयार केले. अशा रीतीनें ज्या राष्ट्राचें मन स्वदेशी व हात सशस्त्र झालेले आहेत त्या राष्ट्रास स्वातंत्र्यलक्ष्मी प्रसन्न कां होणार नाहीं ? मॅझिनीचें तत्त्वज्ञान असें होतें. व ह्मणून त्यानें स्वदेशाच्या मानसिक शिक्षणाप्रमाणेंच त्याच्या शारीरिक शिक्षणाची उन्नति करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न केले. ज्या राष्ट्राला बळ नाहीं तें राष्ट्र नेभळें होय व जें राष्ट्र नेभळें आहे तें आपलें स्वातंत्र्य संपादणार कसें व संपादिलें तरी संभाळणार कसें ! पुढील नियम ‘ तरुण इटली ’ या पत्रांत प्रथम प्रसिद्ध केले गेले. )

गनिमी युद्ध हें राष्ट्रीय संग्रामाची पहिली पायरी होय व ह्मणून गनिमी टोळयांची रचना अशा रीतीनें करण्यांत यावी कीं, त्यांनां लढतां लढतां राष्ट्रीय सैन्याची योग्यता यावी व त्यांचेंच पुढें राष्ट्रीय सैन्य करतां यावें.

गनिमी युद्धांत वरवर ज्या चळवळी एकमेकांपासून अगदीं भिन्न दिसतात त्यांच्यांतच अंतर्गत एकवाक्यता असली पाहिजे. यासाठीं गनिमी टोळया निरनिराळया पसरलेल्या असल्या तरी त्या सर्वांनां एकरूपतेंत आणण्यासाठीं एक मुख्य केंद्र नेमलेलें असावें. या मुख्य केंद्रानें सर्वसाधारण रचना, सेनानींची निवडणूक व नेमणूक, सर्व टोळयांनां अवश्य असणारे नीतिनियम व त्या सर्व भिन्न भिन्न तुकड्यांमध्यें एकाच तत्त्वाची स्फूर्ति उत्पन्न होऊन त्यास तत्त्वाच्या जयासाठीं लढण्यांत एकमत व एकवाक्यता राहील अशी व्यवस्था ठेवावी.

गनिमी टोळयांचें मुख्य राजकीय कर्तव्य ह्मणजे त्यांनीं आपण सशस्त्र व सज्ज होऊन इतरांस लढण्याची चेतना देणें हें होय. प्रत्येक टोळीवर तत्पक्षीय तत्त्वांचा व नीतीचा जिवंत ठसा उमटलेला पाहिजे आहे. अतिशय कडक शिस्त ठेवणें हें अत्यंत आवश्यक आहे इतकेंच नव्हे, तर तें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. कडक शिस्त पाळणें हें त्यांचें राष्ट्रविषयक पवित्र कर्तव्य आहे. कडक शिस्त पाळणें हें त्यांच्या पक्षाचे जयासाठीं त्यांनां आवश्यक आहे. कारण, शिस्तीचे अभावीं अंदाधुंदी व जुलुम सुरू झाला असतां त्यांचे स्वदेशबंधु त्यांनां मदत व सहानुभूति देणार नाहींत.

स्त्रिया, दुसऱ्याची मालमत्ता, व्यक्तिमात्राचे हक्क, पेरलेली शेतें, यानां काडीचाही धक्का न लागेल अशी पूर्ण खबरदारी घेतली जावी.

गनिमी पथकें हीं राष्ट्राचे ललकारदार आहेत. त्यांनीं स्वातंत्र्ययुद्धाची ललकारी द्यावी व सर्व राष्ट्राला युद्धप्रवृत्त करावें. परंतु राष्ट्रावर त्यांची कोणच्याही प्रकारची सत्ता नाहीं. राष्ट्र त्यांचे मालक व ते राष्ट्राचे चाकर होत.

व ह्मणून कोणच्या तत्त्वावर युद्ध चालावें व कोणच्या साध्यांत निष्ठा ठेविली जावी हें ठरविण्याचा सर्व हक्क राष्ट्रीय इच्छेकडे आहे.

क्षमाशीलता ही मनःस्वातंत्र्याचें निदर्शन आहे व यासाठीं लोकसत्ताक पक्षीयांनीं नेहमीं क्षमाशील असावें. धर्मसमजुती, देवालयें, भिन्नधर्मीय प्रचार यांना उपद्रव देऊं नये व जोंपर्यंत धर्मगुरू व उपाध्यायवर्ग आपल्याविरुद्ध जात नाहींत तोंपर्यंत त्यांच्या देहास धक्का लावूं नये.

कोणत्याही व्यक्तीस मागील अपराधाची माफी मागण्यास लावणें किंवा त्याबद्दल शिक्षा देणें हा राष्ट्राचा हक्क आहे व ह्मणून गनिमी पथकांनीं तो हक्क बजावूं नये. राष्ट्रीय सूड हा राष्ट्रानेंच उगवावा. तो व्यक्तीनें उगविणें हें अन्याय्य आहे.

हे नियम अंमलांत आणण्यासाठीं शिपायांनीं निवडलेल्या प्रतिनिधींची त्या टोळीवरील क्याप्टनच्या अध्यक्षत्वाखालीं एक पंचायत स्थापिली जाईल. या पंचायतीकडून ज्या शिपायांना गैरकायदा वर्तनाबद्दल शिक्षा झालेली असेल त्यांचीं नांवें मुख्य केंद्राकडे धाडिलीं जातील व तीं योग्य वेळीं तिजकडून प्रसिद्ध केलीं जातील.

प्रत्येक टोळीचा क्याप्टन हा त्या टोळीचे वर्तनाबद्दल मुख्य केंद्राकडून जबाबदार समजला जाईल.

निंद्य वर्तनाची शाबिती झाल्यास तो क्याप्टन मुख्य केंद्राचे हुकुमाप्रमाणें कामावरून दूर केला जाईल. किंवा प्रसिद्धपणें त्याला शिक्षा देण्यांत येईल.

जेव्हां एखाद्या टोळीनें निंद्य कृत्यें व जुलुम केल्याच्या बऱ्याच व वारंवार तक्रारी येतील तेव्हां त्या टोळीची राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या पवित्र कार्यांत लढण्याची योग्यता नाहीं असें ठरवून तिला नोकरींतून मुख्य केंद्रानें काढून टाकावी. या हुकुमावरही जर ती टोळी तशीच राहिली तर ज्यांना निशाण नाहीं व उद्दिष्ट नाहीं अशा लोकांनीं मांडलेला तो पुंडावा आहे असें समजण्यांत यावें.

आपआपल्या संरक्षणासाठीं व शाश्वतीसाठीं योग्य ते ते उपाय योजण्याची प्रत्येक पथकास मुभा आहे. राष्ट्रीय उठावणीचा प्रसार जितका

करवेल तितका प्रत्येकानें करवावा. राष्ट्रीय क्रांतीविरुद्ध जे जे कोणी आघातक किंवा विघातक प्रयत्न करतील, जे जे गांवशत्रूस देशभक्तांच्या हालचाली कळवितील, व इटालियन देशबंधूंशीं कोणच्याही प्रकारानें वैर मांडतील त्यांस तावडतोब कडक शिक्षा करण्याचा हक्क प्रत्येक गनिमी पथकास आहे.

प्रत्येक गनिमी पथकास आपल्या अस्तित्वरक्षणाचा पूर्ण हक्क आहे व आपल्या पक्षाला बळकटी यावी एतदर्थ शक्य तितकी साधनसामुग्री मिळविणें हें त्याचें कर्तव्य आहे.

शत्रूंपासून मिळालेल्या लुटीवर, जुलमी सत्तेच्या हिरावून आणलेल्या खजिन्यावर, श्रीमंत असूनहि जे आपलेच लोक राष्ट्रपक्षास मदत न करण्याचा आत्मघातकी निश्चय करतात त्यांच्यापासून बलात्कारानें हिसकावून आणलेल्या पैशावर, व ज्या ज्या प्रदेशांतून देशभक्तांचें सैन्य जात असेल त्या त्या प्रदेशांकडून मागणीप्रमाणें आलेल्या खंडावर, गनिमी टोळ्यांनीं आपआपली उपजीविका करावी.

मिळविलेल्या लुटीवर सर्व टोळीचा हक्क आहे. यासाठीं परिस्थितीप्रमाणें त्या टोळीनेंच पसंत केलेल्या नियमानुरूप अधिकारी व शिपाई यांच्यामध्यें त्या लुटीची वांटणी केली जाईल.

सरकारी खजिना लुटला गेला तर त्याच्यावर राष्ट्रपक्षाचा हक्क राहील. त्या टोळीच्या क्याप्टनवर त्या रकमेची जबाबदारी आहे. खजिनदाराला क्याप्टननें त्या रकमेबद्दल चिठ्ठी लिहून दिली पाहिजे.

बळजोरीनें उकळलेल्या खंडण्यांची विल्हेवाट मुख्य केंद्राच्या अनुरोधानें क्याप्टननें लावावी.

प्रदेश प्रदेशांवर धान्याच्या पुरवठ्याच्या ज्या मागण्या करावयाच्या त्या होतील तितक्या कमी प्रसंगी कराव्या. ही रसद पोंचतांच शक्य तितका प्रयत्न करून त्याबद्दल रोख पैसे द्यावें. जेव्हां टोळ्यांपाशीं पैसे नसतील तेव्हां क्याप्टननें आपल्या नांवाची एक चिठ्ठी लिहून त्यांना किती रसद मिळाली हें टिपावें व ती चिठ्ठी त्या प्रदेशाचे अधिकाऱ्याजवळ द्यावी. अशा रीतीनें लढाई संपतांच कोणत्या प्रदेशांतून किती मदत आली हें ठरवितां येईल.

स्वतःच्या टोळीचें कोणत्याही प्रकारचें नुकसान न करितां जितकी रक्कम पाठवितां येईल तितकी क्याप्टननें मुख्य केंद्राकडे धाडून द्यावी.

स्वतःच्या टोळीला काय खर्च लागला वगैरे हिशोब क्याप्टननें अगदीं चोखरीतीनें ठेवला पाहिजे. हा हिशोब मुख्य केंद्रानें नेमलेल्या मुलकी कामगाराकडून तपासला जाईल. ह्या मुलकी अधिकाऱ्याची लष्करी अंमलदार राष्ट्रनियम यथास्थित पाळतात किंवा नाहीं यावर देखरेख राहील.

गनिमी काव्याच्या युद्धांत सर्व टोळ्यांनीं मोठमोठालीं शहरें वश करून घेण्याचा प्रयत्न करावा. परंतु लहान लहान खेड्यांनां उघडपणें उठावणी करण्यास प्रोत्साहन देऊं नये. कारण शत्रू त्या खेड्यावर सहज रीतीनें भयंकर सूड उगवूं शकेल. त्या खेड्यांतील जे लोक स्वदेशभक्त गनिमी पथकांनां मिळण्यास तयार असतील त्यांनीं गांव सोडून देऊन टोळींत येऊन हजर व्हावें. बाकीच्यांनीं अंतर्गत मदत करावी.

प्रत्येक टोळीनें शक्य तितक्या रीतीनें आपलें मनुष्यबळ वाढवावें. परंतु केंद्रमंडळाकडून भावी राष्ट्रीय सैन्यांतील पथकांची जी संख्या ठरली असेल तितकी भरती झाली ह्मणजे मग नवीन येणाऱ्या स्वदेशभक्त शिपायांपासून नवीन टोळींची रचना करावी.

गनिमी युद्धास आरंभ होतांच पहिल्या टोळ्यांचे क्याप्टन लोक हे मुख्य केंद्राकडून निवडले जातील किंवा मान्य केले जातील. लढाईत मेलेल्या अधिकाऱ्यांचे जागेवर त्यांच्याच खालच्या वर्गांतील अधिकाऱ्यांची निवडणूक होऊन योजना केली जावी. ठरलेल्या संख्येपेक्षां जास्त झालेल्या भरतीची नवीन टोळी करण्यांत आली कीं, तिच्या क्याप्टनची निवडणूकही पूर्वीच्या क्याप्टननें व त्याच्या नजिकच्या अधिकाऱ्यांनीं करावी. भावी राष्ट्रीय सैन्यांत आपल्याला जागा भरावयाची आहे ह्मणून कोणत्याही टोळीनें गनिमी काव्यास अडथळा येईल असा उपाय योजण्याचें प्रयोजन नाहीं.

कोणच्याही प्रांतावर फार बोजा न पाडतां उपजीविका चालवितां यावी व अत्यंत त्वरेनें फुटून जातां यावें व छपून बसतां यावें इतका सुटसुटितपणा अंगांत यावा ह्मणून प्रत्येक टोळीनें पंचवीसपासून पन्नासपर्यंत शिपायांच्या तुकड्या कराव्या व ठरलेल्या भागांत आपआपल्या कमांडरचे ताब्यांत राहून लढाई चालू ठेवावी.

या टोळ्यांचा ठरलेला पोषाख ह्मणजे एक शर्ट होय. लढाईचे पहिले भागांत या पोषाखाचे भानगडींत पडूंच नये. एक लहानसें राष्ट्रीय चिन्ह काय तें ठेवलें ह्मणजे वेळ येतांच फुटून जाण्यासाठीं किंवा एकदम

नाहींसें होण्यासाठीं तें चिन्ह झुगारून दिलें कीं, मागमूस नाहींसा होतो. व शत्रूला राष्ट्रयोद्धे कोण हें ओळखतां येत नाहीं. दुसरें, लढाई चालू असतां एका ठरलेल्या जातीची एक कापडी पट्टी दुरून शत्रूंस दिसणार नाहीं अशा बेतानें वापरावी. जर शर्ट घालावयाचा असेल तर तो अधिकाऱ्यांनीं व शिपायांनीं सारख्याच रंगाचा घालावा, ह्मणजे शत्रूंस अधिकारी तेवढेच निवडून मारतां येत नाहींत.

अगदीं अवश्य अशीं शस्त्रें ह्मटलीं ह्मणजे प्रत्येक शिपायापाशीं एक मस्केट किंवा रायफल बंदूक, एक बायोनेट व एक खंजीर हीं असलीं पाहिजेत. याशिवाय प्रत्येक शिपायापाशीं काडतुसें, भाकर व मद्य, एक बारीक पण चिवट रशी, कांहीं खिळे व शक्य असल्यास एक लहानशी कुऱ्हाड इतक्या सामानाची हलकीशी पेटी असावी. शिपायाचे कपडे अशा रीतीनें केलेले असावेत कीं, त्याला सुटसुटित रीतीनें रहातां यावें. त्यांची आकृति फारच विशिष्ट नसावी. नाहींतर फुटून जाण्याची वेळ आल्यास ते सहज धरले जातील.

सर्व प्रकारच्या हालचालींचे हुकूम हे शिंगें वाजवून कळविले जातील. खालील हालचाली अतिशय महत्त्वाच्या आहेत ह्मणून त्यांच्या खुणा नक्की ओळखण्याचें शिक्षण शिपायांना उत्तम दिलेलें असावें:–१ अघाडीचा हल्ला. २ उजवीकडून हल्ला, ३ डावीकडून हल्ला. ४ एकवटून हल्ला. ५ रायफलवाल्यांचा हल्ला. ६ परत एकवटणें. ७ पिछेहाट.

प्रत्येक टोळींतील खालचे अधिकारी रिकामे वेळांत गनिमी काव्याला अत्यंत जरूर अशा कवाइतीचें शिक्षण देत जातील. ही कवाईत फारच थोडी पण महत्त्वाची आहे:—बंदुका भरण्यांत व उडविण्यांत चपलता, झटकन फुटून निसटून जाणें, ताबडतोब जमाव करणें.

गनिमी सैन्याचें मुख्य धोरण असें असावें कीं, शत्रूचा शक्य तितका मारा टाळून व स्वतःला कोणत्याही संकटांत होतां होईतों गुंतवून न घेऊन शत्रूंनां मात्र एकसारखा त्रास देत देत त्यांचा साधेल तसा नाश करीत रहावें. त्यांच्या दारूगोळ्यांचा नाश करावा. त्यांची रसद लुटून फस्त करावी. त्यांचा धीर व विश्वास उडून जावा. त्यांची कवाईत विस्कलित व्हावी. सारांश, त्यांस त्रस्त व निराश्रित स्थितींत आणावें. एकदां ते शत्रु त्रासून हताश झाले व गोंधळून गेले कीं, झटकन सर्व टोळ्यांनीं एकदम उठावणी करून एक चांगलीशी लढाई द्यावी.

हें शक्य व्हावें एतदर्थ, शक्य तितके वेळां शत्रूंच्या पिछाडीवर किंवा आजूबाजूंवर हल्ले करावे. शत्रूची लहान तुकडी, आघाडीचीं ठाणीं, चुकून लांबलेली टोळी किंबहुना एकट दुकट आढळणारा कोणचाही लहानसा भाग पाहिला कीं, जोरासरशीं तो मारून झोडून काढावा. त्यांची रसद, दारूगोळा, व खजिना पाडाव करावा. मार्गांत दबा धरून बसून त्यांच्या बातमीदारांनां व टपालवाल्यांनां धरून शत्रूंचें दळणवळण बंद पाडावें. पूल पाडून टाकावे. पाणउतारे व रस्ते यांचा नाश करावा. शत्रूंच्या झोंपेच्या व विश्रांतीच्या वेळा साधून निकराचा हल्ला चढवावा. त्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांनां व सेनापतींनां अचुक मारण्याचा प्रयत्न करावा.

गनिमीयुद्ध हें मुख्यत्वेंकरून विचारयुक्त साहसाचें युद्ध आहे. हें धाडसाचें युद्ध आहे. हें पदचापल्याचें युद्ध आहे. ही दबत टपत लढाई आहे.

गनिमी काव्याच्या टोळीच्या कॅप्टनानें सर्व गोष्टी विचारांत घेऊन शांत रीतीनें घाट ठरवावा, ठरविलेला घाट तडकेसरशीं अंमलांत आणावा, विसावा न घेतां कुच करीत जावें, पातें मिटतें न मिटतें तोंच मागें फिरावें, व सदा सर्वदा शत्रूच्या हालचालीची बित्तं बातमी काढीत असावें.

शिस्तवार युद्धपद्धतीप्रमाणेंच या गनिमी पद्धतींतही मुख्य लक्ष दळणवळण कायम ठेवण्याकडे दिलें पाहिजे. एका टोळींतील निरनिराळ्या तुकड्यांमध्यें व त्या निरनिराळ्या टोळ्यांमध्यें सलग व दळणवळण हीं अखंड कायम रहातील अशी खबरदारी घेतली जावी. ही सलग व हें दळणवळण इतकें पक्कें पाहिजे आहे कीं, एकाच वेळीं व ठरलेल्याच रीतीनें सर्वांनां उठावणी करतां यावी.

शिस्तवार युद्धपद्धतींत सेनानीच्या अंगीं मुख्य गुण हा पाहिजे आहे कीं, केव्हां लढाई द्यावी व जय घ्यावा. परंतु गनिमी काव्यांतील सेनानीचे अंगी जो मुख्य गुण अवश्य हवा असतो तो हा कीं, सतत हल्ले चढविणें, शत्रूची शक्य तितकी नासधूस करणें व अंगावर बाजू येत आहे असें बघतांच झटकन मागें फिरणें.

ज्या टोळीला वेढा पडला तिचा नाश झालाच ह्मणून समजावें. पिछेहाटीचा मार्ग हा नेहमीं मोकळा राखला पाहिजे. प्रत्येक कॅप्टननें फुटून जाण्याची वेळ आल्यास शिपायानें कोठें व केव्हां एकत्र व्हावें हें आधीं स्पष्ट सांगितल्याशिवाय शत्रूवर हल्ला करण्यास आरंभ करूं नये.

शत्रूवर हल्ला करण्याची उत्तम वेळ ह्मटली ह्मणजे रात्रीं बेरात्रीं, विश्रां-

आत्मचरित्र व राजकारण २४७


तीचे वेळीं, किंवा लांब मजल मारून आल्यावर ते दमून गेले असतांनां.

सैन्यांत अचुक नेम मारणाऱ्यांचाच भरणा पाहिजे आहे. दुसरा बेत योजणें भाग पडल्याशिवाय हल्ल्याचे वेळेस गनिमी टोळ्यांनीं आपले नेमबाज शिपाई एकमेकांपासून शक्य तितके लांब पसरावे. हल्ल्याच्या वेळेस शिपायाशिपायांमध्यें जितकें जास्त अंतर असेल तितकी शत्रूच्या गोळीबाराची भीति कमी होते. शिवाय लांबच लांब रांग पसरलेली असली म्हणजे थोड्या सैन्यानें शत्रूच्या पुष्कळ सैन्यास गुंतवितां येतें.

ज्या प्रांतांत झुडपें, रान किंवा उंच सखल प्रदेश असेल त्या प्रांतांत गनिमी योद्धयांसाठीं जें निसर्गदत्त संरक्षण उत्पन्न झालेलें असतें तें त्यांचे खंदक व छपण्याच्या जागा होत. प्रत्येक पर्वताच्या रांगा हे त्यांचे किल्ले होत.

गनिमी टोळ्यांच्या हालचाली ह्या झटक्याच्या, अखंडित व अनपेक्षित अशा असाव्या. शत्रूंनां त्यांचें नेहमीं पूर्ण अज्ञान असलें पाहिजे. टोळ्यांनीं दुर्गम स्थलीं घुसून बसावें किंवा प्रसंग पाहून धडाक्यांत फुटून जावें. म्हणजे शत्रूंनां त्यांचा मागमूस केव्हांही लागणार नाहीं.

साधारण रीतीनें असें सांगतां येईल कीं, गनिमी टोळ्यांनीं खालील आकृतीप्रमाणें ठाण मांडावें.




अ ह्या जागीं टोळीनें उभें रहावें. ब जागीं शत्रूचा तळ आहे. प्रथम पिछेहाटीचें ढोंग करावें व शत्रूंनां आपण खरीच पिछेहाट घेत आहोंत असें वाटतांच झरकन पुढें सरकून हल्ला चढवावा. गोंधळलेले शत्रू सावध होऊन जमवाजमव करून हल्ल्याचा जोरानें प्रतिकार करूं लागले कीं, ताबडतोब मागें वळून पसार व्हावें.

प्रत्येक कॅप्टननें खालील तीन गोष्टींचा पूर्ण अभ्यास केलेला असावा. (१) ज्या प्रदेशांत लढाई चालवावयाची असेल त्या प्रदेशाची अतिशय सूक्ष्म माहिती. (२) आपल्या पथकांतील प्रत्येक इसमाचा स्वभाव व विशिष्ट योग्यता याची पूर्ण परीक्षा. (३) शत्रूकडील निरनिराळे प्रकार, त्यांची रचना, त्यांचे डावपेंच, व त्यांची संख्या यांचें नक्की ज्ञान.

प्रत्येक गोष्टीबद्दल अतिशय गुप्तता ठेवीत जावी. अगदीं भागच तितक्या गोष्टी मात्र सैन्यांत कळवाव्या.

आपल्या हालचालीचा प्रदेश निवडतांना ज्या भागांतून आपले बहुतेक शिपायी आलेले आहेत तोच भाग निवडावा व अगदीं भाग पडल्याशिवाय तो सोडून दुसरीकडे जाऊं नये. कारण, त्या भागांचें शिपायांनां पूर्ण ज्ञान असतें व तेथील लोकांत त्यांचे नातेवाईक व स्नेही असल्यानें फार उत्तम सहाय्य मिळवितां येतें.

आपल्या हालचालीच्या कक्षेत प्रत्येक टोळीनें निरनिराळ्या स्थळीं कांहीं शिपायी कायमचे ठेवून घ्यावे. हें अगदीं अवश्य अशासाठीं आहे कीं, वेळ पडतांच लढाईचे प्रसंगीं त्याचा राखून ठेवलेल्या सैन्यांसारखा उपयोग होतो. व शिवाय सर्व प्रकारची नक्की बातमी काढतां येते. मात्र या शिपायांची माहिती कॅप्टन व त्यांचे बातमीदार यांशिवाय कोणालाही नसावी.

या शिपायांनीं गुप्त रीतीनें शत्रूंची सर्व बातमी हेरावी. शत्रूंकडील हालचाली, सैन्य, बेत, रसद, हेर, वेष, स्थल, मोठमोठ्या अधिकाऱ्यांचीं बिऱ्हाडें ह्या सर्व गोष्टींची नक्की माहिती मिळवावी. त्या भागांतील लोकांची सहानुभूति, त्यांच्याकडून किती रसद मिळणें शक्य आहे, त्यांतील गुप्त वाटा व दुर्गम स्थळें वगैरे सर्व माहिती अगदीं सूक्ष्म व गुप्त रीतीनें मिळवून ती नजीकच्या टोळीवरील कॅप्टनास कळवावी. त्या राखून ठेवलेल्या सैन्याची रचना व त्यांच्याशीं ठेवण्याची दळणवळणपद्धति ह्या गोष्टी कॅप्टननें अतिशय काळजीनें ठरवाव्या.

कॅप्टननें आपले हुकुम शक्य तोंपर्यंत तोंडी धाडावे. लेखी हुकूम होईल तितकें करून टाळावेत. माहिती दोन निरनिराळ्या मार्गानें आणावी. म्हणजे एकाची बातमी किती यथार्थ आहे हें दुसऱ्याचे बातमीवरून कळून येतें. आपल्या स्वतःचे हेरांशिवाय स्वयंप्रवृत्त दूतांनीं सांगितलेल्या बातमीवर विश्वास ठेवूं नये. त्याचप्रमाणें शत्रूकडून फुटून आलेल्यांवरही पूर्ण विश्वास ठेवूं नये. बहुत करून हे फसवणुकीचे प्रयत्न असतात.

शक्य ते ते प्रयत्न करून शेतकरी वर्गाशीं स्नेह संपादावा. हें आपलें कर्तव्य आहे व यांतच आपलें हित आहे.

शत्रूंचे नुकसान करण्याचा खरा मार्ग म्हणजे त्यांचे अधिकारी, त्यांचे घोडे, व त्यांची रसद यांचा नाश करीत रहाणें हा होय.

शत्रूंच्या पुरोगामी भागावर आपल्या हेरांची दृष्टी नेहमीं असावी. या पुरोगामी भागावर संधि साधून हल्ला करण्याचें ठरवावें. प्रथमतः आपले कांहीं लोक त्यांच्या मार्गावर धाडून ठरलेल्या ठिकाणीं झाडें तोडून, दगड रचून, रस्ता उखळून टाकून तो मार्ग अडवून ठेवावा. शत्रूंचें सैन्य त्या ठिकाणीं आलें. कीं, ते अर्थातच गोंधळून जातात. त्यांना कूच करतां येत नाहीं. अशा रीतीनें तो पुरोगामी भाग गोंधळला कीं, एकदम हल्ला चढवावा. तिनिसांजा शत्रु चालून दमलेला असतांना किंवा तो एखाद्या पुलावरून, रानांतून किंवा दरींतून चाललेला असतांना उडी मारून गांठावा व हल्ला निकरानें चढवावा.

केव्हां केव्हां शत्रूचा पुढील भाग जाऊं द्यावा. मग आपल्या टोळींतील अगदीं लहानसा भाग घेऊन एका ठरलेल्या बाजूवर हल्ला करण्याचें ढोंग करावें. शत्रूपासून त्या जागेवर सर्व जोर खर्चूं लागला कीं, लगेच टोळींतील बाकीच्या सर्व सैन्यानें शत्रूचे केंद्रावर मारा द्यावा. पहिला तडाका पुढील गाड्यांच्या पहिल्या रांगेंतील घोड्यांवर लगावावा. ज्या मार्गानें शत्रूच्या त्या सैन्याला मुख्य सैन्याची मदत येण्याचा संभव असेल त्याच्या विरुद्ध दिशेनें हल्ला करावा ह्मणजे आपली टोळी कोंडली जाण्याचा संभव नसतो. अशा वेळेला सैन्याचा चौथा भाग राखून ठेवावा.

शत्रू पाणउतार्‍यांतून चालला असतांनाही वरील रीतीनेंच हल्ला करणें किंवा दबलेल्या जागेंतून धडक घेऊन बाहेर पडणें किंवा अचानक मारा करणें तो करावा. शत्रूचा कांहीं भाग त्या पाणउतार्‍यांतून, दरींतून किंवा आपण दबलेल्या ठिकाणापासून पुढें गेल्याशिवाय केव्हांही हल्ला करूं नये. कारण, नाहीं तर ते एकदम मागें जातील. पण त्यांचा कांहीं भाग अटकला गेला ह्मणजे त्यांच्यांत एकदम गोंधळ उडतो. प्रथम त्यांच्या बाजूवर एक फेर झाडावी व मग रांगेवर तुटून पडावें. हल्ला इतक्या निकराचा व धडाक्याचा असावा कीं, शत्रूस विचार करण्यास अवसरच सांपडूं नये. शत्रु किंचित् वेळानें शुद्धीवर येऊन सांवरू लागले कीं, आपण मागें पडून जलदीनें पसार व्हावें. होईल तितकें करून शत्रूंचा मारा सुरू होऊन तो अंगावर घेत घेत मागें पडण्याचा प्रसंग टाळावा. परंतु शत्रूशीं लढत लढत पिछेहाट करणें भागच पडलें तर मग पुढील व्यवस्था करावी. आपल्या टोळीच्या रांगा कराव्या. त्या एकामागें एक अशा जिन्यासारख्या उतरत्या रीतीनें रचाव्या. त्यांच्यामध्यें दोन गोळ्यांचें अंतर असावें. या व्यूहानें मागें पडत चलावें.

शत्रु गोळीच्या टप्याइतका जवळ आला कीं, धडाक्यांत सर्वांनीं मिळून एक फैर झाडावी. ह्या गोळीबारानें शत्रू दबतो न दबतो तोंच पुन्हा हटत जावें. परंतु हटतांनां व्यूह मोडूं नये. अशा पद्धतीनें या ठिकाणाहून त्या ठिकाणीं, या अडथळ्यांतून त्या अडथळयांत, संरक्षण करीत करीत अगदीं नजीकच्या मार्गानें निसटून जावें.

खुल्या मैदानांत केंव्हांही लढाई देऊं नये. जेव्हां दरींतून किंवा कोणच्याही अरुंद मार्गांतून जाणें असेल तेव्हां भोंवतालच्या उंच टेंकड्या ताब्यांत घेऊन किंवा तेथून धोका नाहीं अशी पक्की खात्री करून घेऊन मगच जावें.

हें पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, तुम्हांला किंवा शत्रूंनां प्रत्येक पर्वतांत कोणचा ना कोणचा तरी रस्ता असतोच.

नेहमीं भलत्या दिशेला जाळ करून ज्यांच्यावर शत्रूंचा संशय नाहीं असे आपले हेर धाडून भलतीकडेच शिंगें वाजवून आपल्या खऱ्या ठिकाणाचा व आपल्या खऱ्या दिशेचा शत्रूस पत्ता न लागू देतां आपण दुसरीकडेच जात आहों अशी त्याची फसगत करीत जावी.

जेव्हां शत्रूंच्या बंदुकवाल्यांसमोर आपले शिपायी असतात तेव्हां त्यांना फैर झाडण्याचा नुसता धाक दाखवावा व शत्रूकडून पहिली फैर उडेतोंपर्यंत आपण आरंभ करूं नये. त्यांची ठिणगी उडालेली दिसली कीं, मग आपण गोळ्या झाडाव्या.

साधारणरीत्या उंच लक्ष्यावर बंदुक मारतांनां नेम किंचित जास्त उंच धरावा. खोल लक्ष्यावर किंचित जास्त खोल धरावा.

शत्रूंचें सैन्य अंतरावरून मोजावयाचें असल्यास त्यांच्या चालण्याचे आवाजावरून तें मोजतां येतें. साधारण नियम असा आहे कीं, तो आवाज जितका एकसारखा येत असेल तितकी शत्रूंची जास्त संख्या असते. त्यांच्या धुरळ्यावरूनही मोजणी शक्य आहे. पण धुरळा हा वाऱ्यावर व प्रदेशाच्या रुक्षतेवर अवलंबून असतो. जमिनीजवळ कान देऊन ऐकण्याची संवय केली असतां बहुतेक नक्की अजमास करतां येतो व ही संवय लवकर होते. एक बार उडाला कीं सरासरी बारा माणसें एकंदरींत मोजतात. परंतु केव्हां केव्हां शत्रू मुद्दाम फसविण्यासाठीं सपाटून बार उडवितात.

गनिमी सैन्यानें रणांगण शत्रूंच्या व आपल्या लढाईचे पायाच्या मध्यंतरीं पाडावें. लढाईचा पाया आपल्या पाठीशीं सुरक्षित राखावा.

# बंडीएराबंधु व कोसेंझा येथील इतर देशवीर यांचा वृत्तांत.

( जुलै २५, १८४४ )

"Who for his country dies, has lived long enough."

'एमिलिओ बंडीएरा.'

'देशस्वातंत्र्याच्या कार्यी लढतां जो मरतो ॥
नर तो ह्या शुभ मरणानेंची चिरंजीव ठरतो !' ॥ १ ॥

'विनायक'

१८१३ मध्यें इटलीच्या देशयुद्धांत मरण पावून जो देशवीर झाला त्या जाकोपो रफिनी यासः—माझ्या प्रियतम बंधुराया, तुझें नांव माझ्या जिव्हाग्रीं व तुझी पवित्र मूर्ति माझ्या मनोमंदिरीं क्रीडा करीत असतांनां लिहिलीं गेलेलीं हीं पुढील पृष्ठें माझ्या त्वद्विषयक पूज्यभावाचें निदर्शक म्हणून तुला अर्पण करीत आहें. ह्या जगावर जे जे निष्ठायुक्तता व स्वात्मार्पणता ह्या सद्‌गुणांनीं मंडित झालेले आहेत त्या सर्वांत मला तुझ्यासारखा दुसरा कोणी धन्य पुरुष आढळला नाहीं. प्रियतम रफिनी, ह्या ऐहिक अस्तित्वांत असतांनां तूं मजवर जसें प्रेम करीत होतास तसें अजूनपर्यंत करीत आहेस काय ? तूं आतां देवदूत झाला असशील, आतां मी तुझ्या प्रेमाला योग्य नाहीं असें मला वाटूं लागलें आहे; तथापि देशवीरत्वानें तूं धन्यतरतेला गेल्यापासून दोन तीन वेळां असें घडलें आहे कीं, जेव्हां मी माझ्या स्वदेशाच्या व स्वतःच्या दुःखानें व आशाभंगानें त्रस्त झालों होतों, जेव्हां संशय पिशाच्याच्या तडाक्यांत माझा आत्मा सांपडला होता परंतु पूर्ण नष्ट झाला नव्हता, तेव्हां मला वाटतें कीं, तूं माझ्या वतीनें परमेश्वरापाशीं माझी मध्यस्थी केलीस व ज्याच्या योगानें एकाएकीं त्या त्रस्त स्थितींतून मुक्त होण्यास व आपल्या पवित्र युद्धार्थीला पुन्हां सज्ज होण्यास मी सशक्त झालों त्या अविनाशी निष्ठासामर्थ्याचा, या तुझ्या दुर्दैवी मित्राच्या मस्तकाचें प्रेमानें चुंबन करून तूं त्याच्या हृदयांत संचार करविला आहेस.

मला साह्य हो ! मला निराशेनें पकडूं नये म्हणून मला साह्य हो ! ज्या

मंडलांत अस्मज्जगापेक्षां उच्चतर शक्तीनें व पूततरप्रीतीनें भूषित झालेला तुझा दिव्य देह हल्लीं वास्तव्य करीत असेल व ज्या मंडलांत तुझ्यामागून स्वातंत्र्य-युद्धांत पतन पावलेले देशवीर तुझ्या भेटीला आलेले असतील त्या मंडला-पासून त्या सर्व देशवीरांसह परमेश्वराला, त्या जगत्पित्याला, त्या जगद्गुरूला तूं अशी प्रार्थना कर कीं, इटलीला त्याच्याच इच्छेनें प्राप्त झालेलें निसर्गदत्त स्वातंत्र्य व वैभव हीं देण्यासाठीं त्यानें आतां विलंब न करतां लवकर धांवून यावें !

परंतु ज्या अंधुक प्रकाशाला मी इतके दिवस उषःकालाचें निदर्शक समजत होतों तो प्रकाश जर तुटलेल्या ताऱ्याच्या शेवटच्या चकाकीचाच असेल; जर इटलीवर परमेश्वरी स्वातंत्र्याचीं किरणें पडण्याचे पूर्वीं दुःखाच्या व दुर्दशेच्या रात्रीचीं कित्येक कंटाळवाणीं वर्षें अजून जावयाचींच असतील; तर तुझ्यावर माझी जी अखंड प्रीति असे व असणार आहे त्या प्रीतीसाठीं प्रिय बंधुराया, मला साह्य हो ! तुझ्या या दीन मित्रानें असा विचार करावा, असा आचार करावा, असें जगावें व असेंच मरावें कीं, त्याला यावज्जन्म पापाचा स्पर्शही होऊं नये. विपत्ति असह्य झाल्या म्हणून किंवा आशा-भंगाचा कळस झाला म्हणून त्यानें आपली तत्वनिष्ठा केव्हांही सोडूं नये. परमेश्वर व त्याच्या शासनाखालीं प्रगमन करणारी मनुष्यजाति या तत्त्वां-वरील त्याची निष्ठा ढळूं नये. आणि जन्मपरंपरेंतून जात जात जेव्हां तो दिव्य योनीप्रत येऊन तुला पुन्हां भेटेल तेव्हां त्याच्यावर ह्या जगांत केलेल्या प्रेमाबद्दल पश्चात्ताप होऊन तुला तुझ्या पंखानें तुझें दिव्य मुख झांकण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून तूं मला साह्य हो !

लंडन आक्टोबर १८४४.

मीं हीं खालील पृष्ठें बन्डीएरा बंधूंच्या शेवटच्या इच्छेसाठीं व आपल्या स्वातंत्र्यार्थ ज्यांनीं देहत्याग केले ते देशवीर कसे होते याचें इटलीला पूर्ण ज्ञान व्हावें म्हणून लिहीत आहें. वास्तविक रीतीनें आणखी कांहीं वर्षांनंतर कोसेंझाच्या ह्या देशवीरांचा वृत्तांत मी लिहिणार होतों. परंतु तें कर्तव्य आतांच करण्याचें कारण असें आहे कीं; आस्ट्रियन पत्रें व इटलींतील पोलिस लोक हे देशवीर बंडीएरा बंधूंबद्दल वाटेल त्या कंड्या पिकवून निंदात्मक समजुती प्रचलित करीत आहेत. ह्या निंदेचा पुनरुच्चार व प्रतिध्वनि करून शेंकडों भित्रे व असंख्य मूर्ख लोक जिवंत असणाऱ्यांविरुद्ध नव्हे–

कारण असल्या निंदेची आम्हीं काय थोडी पर्वा करणार आहोंत-परंतु ज्या देशवीरांचें पवित्र नामोच्चारण प्रत्येक इटालियनानें नम्रशीर्ष होऊनच केलें पाहिजे, त्या मृतदेशवीरांच्या विरुद्ध त्यांच्या कीर्तीला काळिमा लावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

बंडिएरा बंधूंनीं उतावीळपणा केला इतकेंच म्हणून हे भ्याड लोक स्वस्थ राहत नाहींत, तर त्या प्रसंगाचा फायदा घेऊन हे सर्व प्रकारच्या उठावणींचा धि:कार करूं लागतात. विचारीपणाच्या डौलाखालीं आपला नामर्दपणा छपवूं पहातात. इटलीमध्यें स्वतःचें स्वातंत्र्य मिळविण्याची शक्ति नाहीं व यासाठीं तिनें तें भिक्षेवारी मिळवावें म्हणून हे उपदेश देऊं लागतात. उठावणी व स्वातंत्र्ययुद्ध यांना नीच कृत्यें म्हणण्यांत येतें व जे जे यांत भाग घेतील किंवा त्यांनां उत्तेजन देतील ते सर्व पापी ठरले जातात. ह्या पक्षाला कृतितत्परतेची एवढी भीति कां वाटते हें सांगतां येणें कठीण नाहीं. अशा मर्दपणाचे प्रयत्न करण्याची यांच्यांत छाती नाहीं, परंतु आपण नामर्द आहोंत हें कबूल करण्याची मात्र यांनां लाज वाटते. उठावणी झाली असतां तिला साह्य देण्याचें काम अंगावर येईल या भीतीनें हे दिवाभीत नेभळे उठावणी करणें हेंच मूर्खपणाचें कृत्य आहे असें प्रतिपादन करूं लागतात. स्वतःचा नामर्दपणा झांकण्यासाठीं मर्दपणा दुर्गुण आहे असें शिकविलें जात आहे.

व त्या योगानें आपल्या तरुण अंतःकरणांतून सर्व तेज निघून जात आहे. ज्या थोड्या निःसीम देशभक्तांनीं स्वात्मार्पणाचीं उदात्त उदाहरणें घालून दिलीं आहेत त्यांचा जयजयकार करण्याचे ऐवजीं त्यांची निंदा चालली आहे. कृतिवंतांची निंदा झाल्यानें तरुण लोक कर्तव्यशून्य बनत चालले आहेत. व सर्व राष्ट्राला अशा रीतीनें शिथिलता येण्याचा पूर्ण संभव आहे. ह्या प्रकारानें आपण शिथिल होत चाललेले पाहून आपल्या शत्रूंनां जास्त अवसान चढत चाललें आहे ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मजवर जे घाणेरडे आरोप करण्यांत आलेले आहेत त्यांची मला मुळींच किंमत वाटत नाहीं व ती किंमत वाटत असली तरीही मी व्यक्तिविषयक मजकूर लिहून जे आपणां सर्वांपेक्षां फार फार श्रेष्ठ ठरलेले आहेत त्या देशवीरांनां अर्पण केलेली हीं पृष्ठें विटाळलीं नसतीं. आपलें हें कर्तव्य आहे कीं, भावी पिढ्यांना बन्डीएरा बंधूंचीं नांवें कोणच्याही दोषानें अकलंकित व स्वातंत्र्यप्रेमानें विभूषित अशान्त पवित्र

भाषेंत ऐकूं जावींत. आपल्या तरुणांनीं त्यांना पक्षांध लोक समजण्याचे ऐवजीं त्यांची खरी योग्यता ओळखून त्यांस पवित्र देशवीरांच्या पदवीनें लेखूं लागावें. व शत्रूंना धास्ती पडण्यासाठीं व मित्रांना उत्साह येण्यासाठीं सर्व जगाला असें स्पष्ट कळावें कीं, इटलीच्या स्वातंत्र्याची कल्पना ही मुद्दाम लादल्याशिवाय, घरच्या विरुद्ध जुलमाला न जुमानतां, लष्करांतील दुष्परिणामांना फेटाळून, स्वतःच्या लोकांकडून अविश्वास दाखविला जात असतांही व एकाकीपणांतही आपल्या नैसर्गिक प्रेमानें योग्य ऋतु येतांच प्रत्येक तरुण शेतांत फोफावूं लागले.या लेखांत त्यांच्या पत्रांतील जे थोडे उतारे दिले आहेत त्यांवरून ही गोष्ट सिद्ध होणार आहे. तीं मूळ पत्रें माझ्यापाशीं राखून ठेवलेलीं आहेत व ज्यांच्या आत्म्यांना निर्मल प्रीतीनें व उच्च स्वार्थत्यागानें पावित्र्य प्राप्त झालेलें आहे, अशा विभूतींचा मला आज दहा वर्षें जो संगतिलाभ झाला त्याचीं स्मारकें म्हणून तीं पत्रें मी धार्मिक पूज्य बुद्धीनें मजजवळ अशीच राखून ठेवणार आहें.

अटिलिओ व एमिलिओ हे बन्डीएराबंधु व्हेनिस शहरीं जन्म पावले. त्यांच्या बापाचें नांव बारन बंडीएरा असें असून त्यानें इटलीच्या देशभक्तांना विश्वासघात करून कैद केल्याचें सर्वप्रसिद्धच आहे. आपल्या लहानपणापासूनच ह्या बन्डीएरा बंधुद्वयानें इटलीचें राष्ट्रैक्य व्हावें म्हणून काय बेत योजावे याचा विचार करीत असावें. यांची मला आलेलीं पत्रें मी येथें सर्व दिलीं असतीं. परंतु त्यांतील कांहीं नांवें प्रसिद्ध करणें हें सध्या इष्ट नसल्यानें व त्यांनीं योजलेले कांहीं बेत आजच फोडल्यास आपल्या देशाची हानी होण्याचा संभव असल्यानें तितका भाग गाळणें मला भाग पडत आहे. परंतु बाकीचा भाग मी जशाचा तसाच देत आहें. त्यांत मजविषयीं जे उद्गार असतील ते कितीही निरर्थक असले व माझ्या धैर्याची व मतनिष्ठेची त्यांनीं केलेली तारीफ ही एकदां हद्दपारीची शिक्षा झाल्यावर मग स्वातंत्र्यमत प्रकट करण्यांत कांहीं विशेष स्वार्थत्याग करावा लागत नाहीं म्हणून कितीही अवास्तव असली तरी, ह्या व्यक्तिविषयक प्रश्नाला मध्यें घुसडून मी त्यांच्या पवित्र शब्दांना गाळूं इच्छित नाहीं. सन १८४२ च्या शेवटीं अटिलिओनें एका टोपणनांवाखालीं मला पुढील पत्र टाकलेंः—

" महाराज,–आज बरींच वर्षें झालीं, मी तुमच्या ठिकाणीं प्रेम व पूज्यबुद्धि ठेवून आहें. आपल्या इटली देशाला हल्लीं परक्याच्या सत्तेनें जो कलंक

लागला आहे, तो धुवून टाकण्यासाठीं जे देशभक्त अखंड श्रम करीत आहेत त्यांचें धुरीणत्व आपल्याकडे आलेलें आहे अशी माझी समजूत आहे. मला हें माहीत आहे कीं ‘ तरुण इटली ’ ह्या गुप्तमंडळीचे आपण संस्थापक आहांत व ‘ तरुण इटली ’ ह्या पत्राचें संपादकत्वही आपणांकडेच आहे. त्या पत्राचा कोणचाही अंक मला आजपर्यंत मिळाला नव्हता, परंतु नुक्तेच मला तुमचें “ अपोस्टोलेटो पोपोलेरी ” या पत्राचे कांहीं अंक वाचावयास मिळाले, ते वाचून मला दुहेरी आनंद झाला. एक तर माझीं मतें आपल्या सारख्या थोर पुरुषांनांही मान्य आहेत हें पाहून मला समाधान वाटलें व दुसरें कीं, अप्रत्यक्ष रीतीनें कां होईना, पण आपल्याशीं पत्रव्यवहार करण्याचें शक्य झालें.

“ कमींत कमी एक वर्ष झालें असेल, मी आपल्या पत्याचा शोध करीत आहें. मीं या कामासाठीं नाना प्रयत्न केले. कांहीं दिवसांपूर्वीं माझा एक मित्र इंग्लंडला जावयास निघाला. तो लंडनला येऊन तुमचा तपास काढणार आहे व तुम्हांला माझी हकीकत सांगून आपल्याशीं पत्रव्यवहार सुरू करण्याची माझी इच्छा आपणांस कळविणारच आहे. आपण परवानगी द्याल तर मी पत्रव्यवहार सुरू करीन. कारण, स्वदेशाचे कल्याणाला कांहीं मदत होईल अशी मला आशा आहे. परंतु आपल्याशीं पत्रव्यवहार सुरू करण्याचे आधीं मी आपणांला माझी कांहीं हकीकत कळवीत आहें. कारण पुढें मागें अनोळखी मनुष्यावर आपण एकदम भरंवसा उगीच ठेवला असा पश्चात्ताप होण्याचा तुम्हांला प्रसंग येऊं नये. जर माझा मित्र ठरल्याप्रमाणें तुम्हांला भेटला असेल तर या वेळेस बहुधा आपल्याला माझी हकीकत कळलीच असेल. पण त्याला काम फार व वेळ थोडा असल्यानें क्वचित तो तुम्हांला भेटूं शकला नसावा.

“ मी इटालियन आहें व अजून वधार्ह ठरलेलों नाहीं. मी लष्करी धंद्यांत शिरलेलों आहें. मी परमेश्वराचे अस्तित्वांत विश्वास ठेवतों. पुनर्जन्म व मनुष्यप्रगमन हीं तत्त्वें मला मान्य आहेत. माझी विचारपरंपरा अशी ठरलेली आहे कीं, प्रथम मानवी जातीचें कल्याण, नंतर स्वराष्ट्रकल्याण, नंतर कुटुंबकल्याण, व नंतर व्यक्तिकल्याण, ही मनुष्यकर्तव्याची सोपानपंक्ति आहे. प्रत्येक हकाला न्यायाचें पाठबळ असलें पाहिजे अशी माझी निष्ठा असल्यानें इटलीवर चाललेल्या जुलुमाचें निर्दालन करण्यांत आपण मनुष्यजातीचे

कल्याणार्थच झगडत आहों असें मला वाटतें. ह्या स्वतःसिद्ध सत्याचे समर्थनार्थ इटलीवर किती अनर्थांचा मारा होत आहे तिकडे लक्ष दिलें म्हणजे पुरे. इटलीची मुक्तता ही मनुष्यजातीच्या मुक्ततेचाच भाग आहे असें मानून प्रस्तुत संकटाबद्दल मी समाधान मानून घेतों. नैसर्गिक रीतीनेंच निर्भय विचार व त्वरित कृति असा माझा स्वभाव असल्यानें व वरील तत्त्वविचारांत माझा विश्वास असल्यानें मी त्या तत्त्वांचा जय व्हावा एतदर्थ माझें सर्व आयुष्य तिकडेच अर्पण करण्याचें सहजगत्याच ठरविलें. माझ्या देशाच्या सद्यःस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करतांच मला असें पक्कें कळून आलें कीं, आपल्या देशाच्या उद्धाराचे खरे प्रयत्न करण्यास गुततेशिवाय दुसरा मार्गच उरलेला नाहीं. खरोखरच गुतकटाशिवाय जुलुमाखालीं चिरडलेल्या परतंत्र लोकांनां स्वातंत्र्य संपादनाचें युद्धसाहित्य तयार करण्यास अन्य मार्ग कोठून सांपडणार !

माझें आयुष्य स्वदेशाला अर्पण केल्यापासून माझी मुख्य इच्छा अशी आहे कीं, ज्यांनां ज्यांनां स्वदेशस्वातंत्र्याची लालसा असेल व जे जे त्यासाठीं प्राण देण्यासही तयार असतील त्यांनां त्यांनां एका एकीभवनांत आणावें. कोणचाही उघड प्रयत्न करावयाचे आधीं त्या सर्वांनीं एकमेकांचे विचारानें व एकमेकांच्या शक्ति एकत्र करून सर्वांस पसंत असा एक कायम मार्ग ठरवावा. असें न केलें तर लवकर किंवा उशिरां पण निरनिराळ्या पुढाऱ्यांत आपल्या हेतूला अत्यंत घातक अशी यादवी माजल्याशिवाय रहाणार नाहीं. मी आपली ओळख करून घेण्यास आपलेच शब्द उच्चारीत येत आहें, 'आपण एकत्र जमूं या, खल करूं या व बंधूबंधूंसारखे कर्तव्यपूर्ततेस्तव झटूं या.' माझ्या विनंतीचा अव्हेर करूं नका. क्वचित् आपल्याला असें आढळून येईल कीं, इटलीच्या स्वातंत्र्ययुद्धांत पहिल्यानें उभारलेला हात माझा असेल."

हें पत्र मला मिळालें त्याच वेळेस ज्या मित्राला 'ॲटिलियोनें माझी भेट घेऊन मला तोंडी माहिती देण्यास सांगितलें होतें, त्या मित्रानें त्याचें काम बजाविलें. ह्याचें नांव 'डोमेनिको मोरो' हें असून हा लष्करांत लेफ्टेनंट होता. व ह्याचाही जन्म व्हेनिसलाच झाला होता. आपल्या इतर स्नेह्यांसह व सवंगड्यांसह हाही देशभक्त कोसेंझा येथें देशवीरांचें मरण वरता झाला. कांहीं दिवसांनीं मला 'एमिलिओ बन्डीएरा' याचें पत्र आलें, त्यांत तो कनिष्ठ बंधु लिहितो, "माझी व माझ्या भावाची अशी खात्री आहे कीं, आपल्या

दुर्दैवी इटली देशाची मुक्तता करण्याकडे आपलें सर्वस्व अर्पण करणें हें आपणां प्रत्येकाचें मुख्य कर्तव्य आहे. आम्हीं 'तरुण इटली' या नांवाची गुप्त मंडळी स्वातंत्र्यसमयाची तयारी करीत आहेत असें ऐकून होतों. व म्हणून त्या मंडळींत आपला प्रवेश व्हावा म्हणून फार खटपट करीत होतों. तीन वर्षेपर्यंत सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. तुमचे लेख इटलीमध्यें पसार होण्याचें बंद केलें गेलें व सरकारनें सर्व लोकांची अशी समजूत करून दिली कीं, सॅव्हायच्या उठावणीला अपयश आल्यानें 'तरुण इटली' ची फाटाफूट होऊन ती मंडळी लयास गेली........त्या वेळेस आह्मांला तुमचीं मुख्य तत्त्वें जरी माहित नव्हतीं तथापि आमचीं तत्त्वेंहि तुमच्याशीं पूर्ण एकरूपच होतीं. आमचीहि अशीच इच्छा होती व आहे कीं, आमचा प्रिय देश स्वतंत्र, एकीभूत व लोकसत्ताक असावा. आम्हीहि आमची सर्व आशा आपल्या स्वावलंबनावरच ठेवीत होतों. परक्यांच्या दाराशीं भिक्षा मागत न फिरतां सशक्तता येतांच रणांगणांत उडी घेऊन शत्रूस आव्हान द्यावयाचें असाच आमचा बेत होता."

बंडीएरा बंधूंचें नीतिशास्त्र परमेश्वर, मानव्य व स्वदेशभूमि या पायावर रचलेलें होतें. परमेश्वराचे अस्तित्वावरून त्यांनीं अर्थातच असें सिद्ध केलें कीं, सर्व मनुष्यजाति सबंधुत्वानें व सहकरणानें वागल्यासच उन्नतीकडे जाईल. सर्व विश्व हें प्रगमनोन्मुख आहे. व तें प्रगमन एकमेकांचीं टाळकीं सडकून होणारें नसून एकमेकांवर प्रेम व मदत करूनच होणारें आहे. हें मनुष्य जातीचें परस्परांशीं असणारें प्रेमळ व सहकारी वर्तन योग्य रीतीनें पार पडण्यास कर्तव्याच्या पवित्र तत्त्वाचा अंगिकार केला पाहिजे. अशा रीतीनें मानवी जातीचें प्रगमन हें उद्दिष्ट व कर्तव्य ही वर्तननीति ठरवून त्यावरून मग प्रत्येक देशाकडे कोणतें विशिष्ट कार्य येत आहे हें त्यांनीं ठरविलें. व मानवीजातीच्या उन्नतीला प्रवर्तक असें स्वदेशाकडे आलेलें विशिष्ट कर्तव्य ओळखून त्याप्रमाणें मग व्यक्तिविषयक कर्तव्य काय आहे हें त्यांनीं निश्चित केलें. ही कर्तव्यबुद्धि व हा तत्त्वविचार त्यांच्या मनांत, जरी ते बौद्धिक मार्गांतून दूर जाऊन लष्करी खात्यांत शिरलेले होते तरी, नैसर्गिक रीतीनेंच प्रादुर्भूत झाला. कारण, त्यांचा आत्मा हा भूतदया, देशप्रीति व कर्तव्यनिष्ठा यांनीं पवित्र झालेला होता. त्या दोघांचीही आपल्या आईवर फारच प्रीति होती. परंतु ती प्रीति ही मनुष्याला देवदूतांच्या योग्यतेला नेणारी प्रीति असून

तीं त्याला पशूंच्या नीचतेला नेणारी लंपटता नव्हती. मनुष्याच्या उच्चतम कर्तव्याला आड येणारी ती प्रीति नव्हती, तर उलट त्या कर्तव्याची पूर्तता करण्यासाठीं हृदयांतील अहंकाराला पार हुसकून देऊन त्या ठिकाणीं जें उन्नत, उत्तम व सुंदर असेल त्याचेंच अधिष्ठान करविणारी होती. ॲटिलिओचें लग्न झालें होतें व त्याला अपत्यही होतें. परंतु या बालकाचे रूपानें परमेश्वरानें ॲटिलिओकडे एका तरुण जीवाला शिक्षण देण्याचें जें कर्तव्य दिलें होतें त्या कर्तव्यानें ॲटिलिओच्या स्वदेशसेवेला जास्त प्रोत्साहन मिळालें. त्या बालकाकडे पाहून ॲटिलिओ स्वदेशसेवेपासून ढळला नाहीं इतकेंच नव्हे, तर त्या बालकाला शिक्षण देण्याचें आपल्या कृतीवर अवलंबून आहें हें जाणून तो जास्त नेटानें स्वदेशसेवेला सिद्ध झाला. त्याच्या त्या सुशील पत्नीवर–ती त्याच्या विरहानें मृत्यु पावली हें पुढें मी सांगणार आहे—तो आपल्या प्राणाहून जास्त प्रेम करीत असे. ती त्याच्या हृदयाचा विसांवा होती. तिच्या पाशीं तो शक्य तितके सर्व बेत विश्वासानें सांगत असे.

ह्यानंतर आमच्या मधला पत्रव्यवहार मला उघड उघड कारणांकरितां प्रसिद्ध करतां येत नाहीं; तथापि १८४३ च्या शेवटीं आलेल्या पत्राचा एक उतारा देतों. ॲटिलिओ लिहितो:—"इटलीमध्यें बंडाची ज्वाला धुमसूं लागली आहे असें मला कळलेल्या बातमीवरून दिसलें. हें जर खरें असेल तर आपल्या भाग्याची–स्वातंत्र्यसूर्योदयाची–पहांट फटफटूं लागली आहे! अशा वेळेला प्रत्येक खऱ्या स्वदेशभक्तानें आपापलें कर्तव्य करण्यास सज्ज असलें पाहिजे. व म्हणून त्या ठिकाणीं प्रत्यक्ष हजर राहण्यासाठीं मी तिकडे जाण्याचीं साधनें शोधीत आहें.... ... ... ... ... असा माझा बेत आहे व यावरहि जर या कामांत मला अपयश आलें तर तो माझा अपराध नव्हे. माझा हेतु असा आहे कीं, मीं त्या भागांत शिरण्याबरोबर एक गनिमी टोळी तयार करावयाची. तिचा पुढाकार घेऊन पर्वतांत घुसावयाचें व मग तेथून मृत्यु येईपर्यंत स्वदेशार्थ लढत रहावयाचें. मीं हें पक्कें जाणून आहें कीं, ह्या धाडसाचा तादृश उपयोग कांहीं विशेष होणार नाहीं. परंतु ह्या कृत्याचा नैतिक परिणाम मात्र विलक्षण होईल यांत कांहीं एक शंका नाहीं. कारण, ह्या योगानें आपल्या या अधम शत्रूंच्या अंत:करणांत भयंकर धडकी भरेल. मी त्या शत्रूच्या विश्वासू लष्करांतील असल्यानें मी उठावणी करून उठलों कीं, ज्या लष्कराचे बळावर तो परका मदोन्मत्त झाला आहे त्याच लष्करांत अविश्वास

उत्पन्न झाल्यानें तो खात्रीनें गांगरून जाईल व त्याची मिर्मिशक्ति नाहींशी होईल. दुसरें असें कीं, मजप्रमाणेंच जे इतर इटालियन लोक परक्या सत्तेला लाथ मारण्यास मूर्खपणाच्या व पापकारक अशा लष्करी शपथांमुळें कचरत आहेत त्या सर्वांनां मीं उदाहरण घालून दिल्यासारखें होईल. तिसरें असें कीं, आपल्या पक्षांतील लोक शत्रूंच्या बलाबद्दल मुद्दाम फुगविलेल्या बातो ऐकून गर्भगळित होतात. त्यांनां शत्रूंच्या लष्करांतच बंडाची ज्वाला धगधगलेली पाहून खात्रीनें अवसान चढेल."

या पत्रावरून ॲटिलियोला उठावणी करण्यास कोणीही चिथाविलें नसून तोच स्वयंस्फूर्तीनें किती उतावीळ झालेला होता हें दिसून येईल. वाचकांनां हें आठवतच असेल कीं, १८४३ मध्यें वरील पत्र लिहिलें जाण्याचे सुमारास इटलीमध्यें भयंकर असंतोष माजला होता. गुप्त मंडळ्यांची तयारी जंगी होती. सरकारचा जुलूम या गुप्त कटांनां मारण्यासाठीं जों जों वाढूं लागला तों तों असंतोष व लोकक्षोभ जास्त जास्त होऊं लागला. ह्या स्थितीचा फायदा घेऊन योग्य रीतीनें त्या असंतोषांतून धडकलेल्या ज्वालेला व्यवस्थित स्वरूप देण्यांत आलें असतें तर इटलीच्या राज्यक्रांतीला तेथूनच आरंभ करवितां आला असता. ह्या असंतोषाची व रोमाग्नांतील प्रमुख शहरांतून सरकारी सैन्याशीं लोकांच्या उडालेल्या लहान झटापटींची बातमी येतांच बन्डीएरा बंधूंना शेवटचा दिवस जवळ आला असें वाटूं लागलें. इतक्यांत राज्यक्रांतीला अत्यंत उपयोगी अशा मुराटोरीच्या गनिमी टोळयाही बाहेर पडल्या व मध्यइटलीभर बंड उठल्याची बातमी पसरली. वाटेल ते प्रयत्न करून अखेर बन्डीएरा बंधूंनीं त्या चळवळीच्या कांहीं पुढाऱ्यांशीं दळण वळण पाडलें. परंतु त्यांनीं सुचविलेल्या मार्गाचा त्या पुढाऱ्यांनीं स्वीकार केला नाहीं. प्रथम 'पुढें पाहूं' ह्मणून कळविलें, नंतर विनाकारण ढकलाढकली सुरू झाली व शेवटीं एका सर्वव्यापी उठावणीच्या भलत्या व अशक्य नादाला लागून त्या पुढाऱ्यानीं लोकांचा जोम दिरंगाईनें व्यर्थ दवडला. बन्डीएरा बंधूंनां जी एक लहानशी रक्कम पाहिजे होती ती देण्याचेंही नाकारण्यांत आलें. परंतु ॲटिलियोनें या त्याच्या झालेल्या फसवणुकीबद्दल मजजवळ एक चकार शब्दही काढला नाहीं. कचित् माझे जे परम मित्र होते त्यांच्याविरुद्ध लिहिण्यास तो धजला नसावा किंवा त्याच्या उदात्त स्वभावानुरूप व्यर्थ काथ्याकूट करण्याचा त्याला वीट आला असावा. गेल्या ८-९

वर्षांमध्यें इटलींत एक नवीन वर्ग उत्पन्न झालेला आहे. हा वर्ग देशभक्तीचें ढोंग करण्यांत अगदीं पटाईत आहे. परंतु वास्तविक रीतीनें पहातां स्वतःचा व स्वतःच्या देशाचा दुर्लौकिक करण्याचे कामाशिवाय इतर कोणच्याही कामांत ह्यांची तत्परता दिसून येत नाहीं. ते भित्रे आहेत इतकेंच नव्हे तर ढोंगीहि आहेत. हे लोक अधिकारानें किंवा संपत्तीनें वजनदार समजले जातात. परंतु हे कांहीं अंशीं राज्यक्रांतीच्या शास्त्राचें अक्षरही कळण्याची अक्कल नसल्यानें परंतु बऱ्याच अंशीं स्वतःच्या भ्याडपणानें कोणच्याही प्रकारच्या जोरदार चळवळीला विरुद्ध असतात. दुर्दैवानें ह्या नेभळया पक्षासच पुढारी पुढारी म्हणून मिरविलें जातें व त्या योगानें आपले तरुण लोक साहजिक रीतीनेंच त्यांच्या उपदेशाकडे लक्ष देतात. ह्या स्वयंमन्य नेभळया पुढाऱ्यांना स्वतः तर स्वदेश वर आणण्याची ताकद नाहींच नाहीं; परंतु जर कांहीं धाडसी व स्वार्थत्यागी देशभक्तांनीं स्वदेशस्वातंत्र्य मिळविण्याचा जो एकच उपाय तो योजण्याच्या मसलतीला आरंभ केला कीं, हे नामर्द लोक तो बेत हाणून पाडण्यास तयार असतात. ते म्हणतात, स्वातंत्र्य उत्तम आहे पण तें घाईनें मिळवून उपयोगी नाहीं. ते म्हणतात, आपल्या तरुणांचें वर्तन नीतिदृष्ट्या सुधारलें पाहिजे. ते म्हणतात, शत्रूचें लष्करी सामर्थ्य अवाढव्य आहे. आंकडेशास्त्राचे हे लोक फार चहाते आहेत. आंकडे मोड-मोडून मोजणी करून, पुन्हां मोजणी करून अखेर आहे त्याहून तिप्पट संख्या होईतोंपर्यंत यांचें गणित चालतें. ८०,००० आस्ट्रियन लोक खुद्द इटलींत आहेत ते; अधिक ८०,००० आस्ट्रियामधून येणार आहेत ते; अधिक ८०,००० आस्ट्रियन तिकडून–तिकडून ह्मणजे कोठून हें परमेश्वरास माहीत !–येणार आहेत ते ! असे वास्तविक संख्येपेक्षां तिप्पट शिपाई आहेत असें दाखवून ताज्या दमाच्या शूर तरुणांपुढें निराशेचें रडगाणें गाइलें जातें. इतक्यावरही जर कांहीं लोकक्षोभाची ज्वाळा उठलीच तर संधि साधून हे लोक तिचा किंचित् अनुवाद करूं लागतात, व तिचें पुढारीपण हातांत येतांच मग 'कसे' व 'केव्हां' या विषयावर उपदेश करूं लागतात. यावेळीं त्यांच्या दिसून येणाऱ्या घातकपणाची निंदा करावी तेवढी थोडीच आहे. कारण, जर ती चळवळ पावसाळ्यांत सुरू झाली असली तर ते 'वसंताची वाट पहाणें चांगलें' ह्मणून म्हणतात. वसंतांत फुलें फुलतात व तेव्हां शरीरांतून किंचितसें रक्त बाहेर गेल्यास

तितकें प्रकृतीला ज्यास्त सुखकारकच होतें ! बरें, ती लोकक्षोभाची चळवळ जर वसंत ऋतूंत सुरू झाली तर मग पावसाळ्याची वाट पहाणें चांगलें ह्मणून ह्मणतात. पावसाळ्यांत नद्यानाले तुडुंब भरुन वहात असतात व द्राक्षांचे बागाआड दडण्यास फार सुलभ होतें ! क्रांतिशास्त्राचें प्रत्यक्ष कृतीनें ज्यांनां ज्ञान झालेलें आहे त्यांचे साधे व सरळ बेत खोडून काढण्यांत येतात व मोठमोठ्या अवाढव्य बेतांची योजना करण्याचा डौल दाखविण्यांत येतो. प्रांतांतून उठावणी करण्याचे ऐवजीं मोठमोठ्या राजधानींतून उठावणी घडवण्याचें घाटूं लागतें. परस्परविरोधी पक्षांचें एकीकरण केल्यावर मग उठावयाचें ह्या द्राविडी प्राणायामाची योजना, जे आधींच एकमत झालेले आहेत त्यांनांच घेऊन आरंभ करण्याच्या सोप्या मार्गाचे ऐवजीं, करण्यांत येते. अशा रीतीनें या पंधरवड्यापासून त्या पंधरवड्यापर्यंत ढकलाढकली सुरू होते व मध्यंतरीं लोकक्षोभाची अनियमित ज्वाला विझूं लागते. आपसांत मतभेद व पक्ष विपक्ष होतात व अखेर उठावणीचा सर्व जोम नाहींसा होतो. जे कृति करून दाखविण्यासाठीं सारखे धडपडत असतात असे जवान लोक बहुधा दिरंगाई होत चालली ह्मणजे निराश होऊं लागतात. व तेही फाजील विचारी बनूं लागतात. आणि कांहीं खऱ्या खऱ्या तेजानें चैतन्ययुक्त असणारे ज्वलद्देशभक्त तरुण लोक निराशेनें येणाऱ्या धैर्यासह कांहीं तरी धाडसाचें कृत्य करण्यास प्रवृत्त होतात. मध्यंतरीच्या कालांत लोकक्षोभाचा सुगावा काढून परकें सरकार सावध होतें. ते आपले हेर वाढवितात. सैन्य सज्ज करून ठेवतात. हलके हलके व सावधपणानें ज्यांचें त्यांनां विशेष भय वाटत असेल असे लोक कैद करतात व अशा रीतीनें लोकांचे सर्व गुप्तकट फुटले आहेत असें पहातांच सर्व देशभर पळापळीला सुरवात होते. जे भ्याड व कमकुवत पुढारी आपल्या स्वतःच्या नामर्दपणानें हें संकट ओढवून घेतात तेच पुन्हां डौलानें पुढें येतात व ह्या फसलेल्या उठावणीकडे बोट दाखवून ह्मणतात, "तरी आह्मीं सांगत होतों कीं, असल्या प्रयत्नानें देश वर यावयाचा नाहीं." मूर्ख व भोळे लोक हें ऐकून फसतात व आपणही ह्मणूं लागतात कीं, पूर्ण स्वातंत्र्य हें मनोराज्य आहे.

व मग आमच्या माता फांशीवर उभ्या असणाऱ्या देशवीरपुत्रासाठीं ढसढसां रडूं लागतात. इकडे त्या देशवीरांच्या प्रेतांवरही सूड घेण्यासाठीं अधम पोलिसलोक तयार असतात. लोकक्षोभाला दाबण्यासाठीं सरकार

कांहीं हक्क देण्याची कंडी पिकवितें. ही कंडी ऐकतांच 'वसंताची वाट पाहणारे' पुढारी लोकांस शांत होण्याचा उपदेश देतात व त्यांच्या ८०,००० आस्ट्रियन सैन्याला तीननें गुणून व पुन्हां गुणून अंक मोडण्यास आरंभ होतो! इटलीमध्यें आजपर्यंत ज्या शेंकडों उठावण्या फसल्या त्यांचा हाच इतिहास आहे.

इटलींत बंडाला यश यावें अशी लोकांची खरोखरच इच्छा असेल तर त्यांनीं हें पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, अहिनकुलाप्रमाणें परस्परविरोधी पक्षांचें संमेलन होण्याची व्यर्थ आशा त्यानें केव्हांही करूं नये. त्या प्रत्येकाचें ध्येय निरानिराळें असल्यानें त्यांचे एकीकरणावर उठावणी अवलंबून ठेविली कीं, ती तशीच गर्भावस्थेंत कायम रहाणार यांत शंका नाहीं. तसेंच बंडाचा आरंभ बहुधा राजधान्यांतून करूं नये. कारण राजधान्यांत साहजिकपणेंच शत्रूंचे सैन्यांचा तळ पडलेला असतो. तेथें हेरांचा व पोलिसांचा सुळसुळाट असतो. तेथें आरंभ झाला ह्मणजे तो निष्फळ करणें परक्यांनां तेव्हांच सुलभ होतें, व बंडाच्या प्रारंभींच अपयश आलें कीं बंड अशक्य झालें असें समजावें. **बंड अशाच ठिकाणीं उभारावें कीं, जेथें प्रथम आपणास जय येईल.** कितीहि लहान कां असेना, पण आरंभींच्या उठावणीस जय मिळत गेला पाहिजे, ह्मणजे बंडाची ज्वाला धडाक्यांत पसरते व मग अपजय आले तरी लोक पहिल्या जयांच्या व प्रस्तुत बलाच्या आधारानें जोरावूं लागतात. ह्मणून जे लोक स्वदेशार्थ प्राणत्याग करण्यास तयार असतील व ज्यांचें ध्येय पूर्ण स्वातंत्र्य हेंच असेल तितक्याच मर्द देशभक्तांनीं, भ्याड पुढाऱ्यांनां न विचारतां, ज्या जागीं प्रथम प्रयत्न यशस्वी होईल असा संभव असेल तेथें एकदम योग्य संधि साधून रणांगणांत गनिमी काव्यानें उडी घ्यावी. शेवटीं जे लोक असें ह्मणतात कीं, लोक सुशिक्षित झाले, नीतिमान् झाले, स्वातंत्र्याला योग्य झाले ह्मणजे आपण उठावणी करूं, त्या लोकांनां परिस्थितीचें मुळींच ज्ञान नाहीं असें समजावें. शिक्षण मिळाल्यावर स्वातंत्र्य मिळवावयाचें, पण स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय शिक्षण मिळणार कसें? जेथें स्वदेश मेलेला आहे, जेथें स्वराष्ट्र चैतन्यरहित आहे, जेथें शिक्षण देण्याचीं साधनें ऑस्ट्रियन लोकांच्या हातीं आहेत तेथें शिक्षण मिळणार कसें? आस्ट्रियन लोक तुम्हांला स्वातंत्र्याला योग्य तें शिक्षण कसें देतील? कसें देऊं देतील? अशा स्थितींत शिक्षणाचा पहिला धडा ह्मणजे

बंड करणें हाच होय. **परवशता आहे तोंपर्यंत स्वातंत्र्यशिक्षण नाहीं. ह्मणून स्वातंत्र्यशिक्षणाच्या शाळेची पहिली पायरी ह्मणजे परवशतेवर आघात करणें ही होय.** लोकांत सद्गुण नाहींत हें खरें आहे व ह्मणूनच तर बंडाची आवश्यकता आहे. लोक सद्गुणी असते तर त्यांना बंड करावें लागलेंच नसतें, कारण लोक सद्गुणी असते तर ते परतंत्रच झाले नसते ! यां परिस्थितींत राष्ट्राला जो पहिला सद्गुण शिकवावयाचा तो पारतंत्र्यनाशाचाच होय. १७८९ मध्यें फ्रेंच लोक, १८०८ मध्यें स्प्यानिअर्ड लोक व १८२१ मध्यें ग्रीक लोक हे आपल्या इटली देशांतील हल्लींच्या स्थितीहून ज्यास्त सुशिक्षित मुळींच नव्हते तरी त्यांनीं शिक्षणास आरंभ कोठून करावा हें ओळखतांच पारतंत्र्याचा नाश करण्यासाठीं रणांगणांत उडी घेतली, पराक्रमाचा उत्कर्ष करून दाखविला, स्वात्मार्पणाचा कळस केला व स्वातंत्र्याचा जयजयकार झाला–ते लोक सुशिक्षित झाले !

तेव्हां इटलींत यशस्वी उठावणी करण्यास मूर्खपणाच्या आक्षेपांना भीक घालून दिरंगाई करण्यांत हांशील नाहीं. मुख्य विचार करावयाचा तो हा कीं, चहूंकडे असंतोष माजला कीं नाहीं; देशाभिमानाची ज्योत पेटली आहे कीं नाहीं; लोक स्वातंत्र्यसमराला उत्सुक व तयार आहेत कीं नाहींत. लोकांची अशी उत्सुकता व तयारी गुप्त व उघड रीतीनें घडवून आणली ह्मणजे मग त्यांना वाचतां किती येतें व अंकगणित किती येतें हें पाहण्याची कांहीं एक आवश्यकता नाहीं. स्वातंत्र्याची अभिरुचि व त्यासाठीं देहपात करण्याची योग्यता आली कीं उठवणीची नौबत धडधडूं लागण्यास कांहीं हरकत नाहीं. इटलींत ही नौबत झडूं द्यावी अशी संधि आली आहे अशी बन्डीएरा बंधूंची खात्री होती व माझीही अशीच खात्री आहे. इटली सज्ज आहे. ‘तरुण इटली’ कर्तृत्व करण्यास सज्ज आहे. व जर हे “वसंताची वाट पहाणारे” ढवळाढवळ न करते तर यापूर्वींच तें कर्तृत्व पारही पडलें असतें.

असो. वर लिहिल्याप्रमाणें ॲटिलिओ व एमिलिओ यांच्या बेताचा स्वीकार मध्यइटलींतील पुढाऱ्यांनीं केला नाहीं किंवा त्यांना पैसेही दिलें नाहींत. ती उठावणी फसल्यासारखी झाली, परंतु या योगानें आस्ट्रियन लष्करी अधिकाऱ्यांचें या बन्डीएरा बंधूंवर लक्ष वेधलें. त्यांना गुप्त रीतीनें धरण्याची तजवीज चालली. हें ऐकतांच ते दोघेहि बंधु मार्च २८, १८४४ या दिवशीं इटलींतून पळून गेले. त्या वेळेस एमिलियो मला लिहितोः—

" कोणाचा अपराध घडला हें जरी मला ठाऊक नाहीं तथापि आह्मांस मदत करण्यांत आली नाहीं. ज्याच्या योगानें कचित पूर्ण जय मिळाला असता त्या बेताचा त्यांनीं तिरस्कार केला. खरोखर आह्मीं लष्करांत उठावणी केली असती तर आमच्या या उदात्त उदाहरणानें स्फुरण पावून आपले ४०,००० देशबंधु, जे आस्ट्रियाच्या लष्करांत ढोंगी व पापकारक अशा लष्करी शपथांनीं बद्ध आहेत परंतु ज्यांचें अंतःकरण स्वदेशाकडे ओढत आहे, ते सर्व त्या बंधनाचे तुकडे उडविण्यास सिद्ध झाले असते. आमच्या केंसालाहि उघड रीतीनें धक्का लावण्याची शत्रूची छाती नव्हती. आह्मांला एकदम पकडण्याचा मूर्खपणाचा हुकूम (आस्ट्रियाला हा हुकूम सोडण्याची हिंमत झाली असती काय !) सुटला असता तर त्या योगानें आमचे संरक्षकच वाढले असते. परंतु शेवटीं ऑफस झालें. बोलोग्नीजनां हुसकून दिलें गेलें. धडपड सुरू झाली. व जे स्वदेशार्थ लढण्यासाठीं अधीर झाले होते व सरकारचे लक्षांत ज्यांचें हें वर्तन पूर्ण आलें होतें त्या आह्मांस पुढाऱ्यांकडून चेष्टा करण्यासारखा व भाजीपाल्यांना सांगावा तसा निरोप आला कीं, ' वसंताची वाट पहा ' ! परंतु आह्मीं निराश झालों नाहीं......
या बेताला एक लहानशी रक्कम पाहिजे होती. माझ्या भावाला ती कोठेंहि मिळेना. इकडे सरकारनें आह्मीं राजद्रोही आहोंत अशी पूर्ण खात्री करून घेऊन, परंतु उघड रीतीनें आह्मांस धरण्याचें सामर्थ्य नसल्यानें, युक्तीनें पकडण्याचा घाट घातला. त्यांनीं माझ्या भावाला व्हेनिसकडे येण्याचा हुकूम केला व वाटेनें त्याचेवर जर्मन हेरांचा पहारा ठेवला. माझ्या भावानें पुन्हां एकदां पैसे मिळविण्याचा व वाटेल तें संकट आलें तरी उठावणी करण्याचा प्रयत्न केला. पण सर्व व्यर्थ झालें. हें पहातांच ज्या दिवशीं व्हेनिसला हजर होण्याचा हुकूम सुटला होता त्या दिवसाच्या आधींच तो पळाला. मीहि त्याच वेळेला ट्रिस्टीहून पळालों......................या संकटाचें सर्व पाप त्या विश्वासघातकी पुढाऱ्यांवर पडो. त्यांना माझ्या मित्रानें कळविलें कीं, आतां तुह्मीं साह्य देणार नाहीं तर ते नाश पावतील. तेव्हां यांनीं लिहिलें कीं, त्यांचा नाश झाल्यासारखाच आहे. मला हें माहिती आहे कीं तुह्मांला या दिरंगाईची व फसवणुकीची कांहींच माहिती लागलेली नाहीं. व ह्मणून आपण पूर्ण निरपराधी आहांत. परंतु ज्यांनीं विश्वासघात केला त्या बकसाधूंना मी माझा इटली देश स्वतंत्र होतांच लोकपक्षीय न्याया-

सनासमोर ओढून आणीन व त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवीन. पारतंत्र्य व अपमान हे जास्त दिवस कसे टिकवावे याचा विचार करणारे हे देशद्रोही लोक स्वतंत्र इटलीपुढें चळचळ कापूं लागतील !"

'सिरा' येथून ॲटिलिओ लिहितोः—

"गेल्या जानेवारीपासून (१८४४) माझ्याविषयीं व आपल्या कार्याविषयीं बऱ्याच महत्वाच्या गोष्टी घडून येत आहेत. मिझिरेली नांवाच्या एका मनुष्यानें माझे सर्व बेत सरकारला कळविले आहेत.................. या हुकुमाप्रमाणें मला व्हेनिसला जाणें भाग पडलें. तिकडे जाणारें तारूं तारीख ३ मार्चला सिद्ध झालें. या तारवांत मीं पाय ठेविला असता कीं, व्हेनिसच्या ऐवजीं मला अंधार कोठडीच पहावी लागती हें मीं पक्कें जाणून होतों. ह्मणून आणखी जास्त संकटें ओढविण्याचे आधीच मी गुप्त रीतीनें पळून गेलों. अनंत यातना भोगीत भोगीत अखेर मीं सुरक्षित रीतीनें येथें पोंचलों. त्या वेळेस माझा भाऊ व्हेनिस येथें होता. त्याला निरोप धाडण्यांत मला यश आलें. माझा विश्वासघात करणाऱ्याला माझ्या भावानेंहि वर्तन माहीत होतें व ह्मणून माझ्या भावानेंहि संकट टाळण्यासाठीं माझें उदाहरण गिरवावें असें मीं त्याला कळविलें. परंतु मला अजूनपर्यंत त्यांची कांहीं एक बातमी कळली नाहीं ! ह्या संकटाची बातमी कळतांच माझ्या प्रियतम आईची व माझ्या सुशील पत्नीची काय अवस्था होईल ? त्या हें दुःख कसें सोसतील ? हाय ! हाय ! मानवी जातीचें व स्वदेशभूमीचें कल्याण करण्याचें माझें प्रथम कर्तव्य आहे. असें मीं पूर्ण जाणत आहें व मला अशी आशा आहे कीं, माझें वर्तनही त्याचप्रमाणें राहील. परंतु मला हें कबूल करावें लागत आहे कीं, या कर्तव्याप्रीत्यर्थ मला भारी किंमत पडत आहे !"

ॲटिलिओ हें पत्र लिहीत असतांच त्याची प्रेमळ पत्नी त्या दुःखाचे धक्क्यानें मृत्यु पावली होती ! एमिलिओनें ॲटिलिओ पळून गेला असावा ह्मणून बातमी देतांच तिचें हृदय दुभंग झालें. तरी त्या गोष्टीबद्दल जोंपर्यंत नक्की कांहीं कळलें नव्हतें तोंपर्यंत तिनें चकारशब्द काढला नाहीं. विरहाचें असह्य दुःख तिला आंतल्याआंत दग्ध करीत होतें. परंतु आपल्या प्रिय पतीचें सुरक्षित पोंचल्याचें पत्र येतांच तिचें हृदय फुटून ती आक्रोश करूं लागली. ती कोमल लतिका जळूं लागली. कांहीं दिवसांचे आंत ती साध्वी झुरून झुरून मरून गेली ! ज्यांनां ज्यांनां तिची माहिती होती ते सर्व

सांगतात कीं, ती सुंदरतेंत जितकी अद्वितीय होती तितकीच बौद्धिक व नैतिक सद्गुणांत श्रेष्ठ होती. इटलीमध्यें स्वदेशस्वातंत्र्यार्थ ज्या कित्येक स्त्रियांचे बळी पडले त्यांतच हिचाही बळी पडला. ह्या स्त्रियांची माहिती ज्या हतभाग्यांनां त्यांच्या विरहाचें दुःख भोगावें लागतें त्यांशिवाय कोणासही नाहीं! इटलीच्या ह्या नीच परवशतेंत देशभक्तांनां स्वतःचे नव्हेत तर आपल्या प्रियतमांचेहि बळी द्यावे लागत आहेत!

ॲटिलिओचे निरोपाप्रमाणें एमिलिओहि पळाला व कार्फ्यू येथें आला. परंतु या देशभक्ताला वनवासाचें एकच संकट सोसावें लागणार नव्हतें, तर त्याहूनही भयंकर असें दुसरें एक संकट त्याच्यापुढें दत्त ह्मणून उभें राहिलें. ह्या दोन भावांनीं लष्करांतून एकदम पळ काढल्यानें आस्ट्रियाचे सैन्यांत एकच खळबळ उडाली. या एकदम नाहींशा झालेल्या भावांचें उदाहरण कचित् इतर तरुण शिपाई वळवितील ही एक भीति, व दुसरी जास्त भयंकर घडकी झटली ह्मणजे ज्या सैन्यावर सर्व मदार ठेविलेली त्या सैन्यांत स्वातंत्र्येच्छा व राष्ट्रकटांचा शिरकाव झाल्याचें या कृत्यानें उघडकीस आलें! ही खळबळ दाबण्यास एकच मार्ग होता. बन्डीएरा बंधूंच्या या पलायनास पोरकट म्हणून त्यास राष्ट्रीय प्रयत्नाचें स्वरूपच देऊं नये व यःकश्चित खाजगी गोष्ट ह्मणून तिकडे दुर्लक्ष केल्यासारखें दाखवावें असा ऑस्ट्रियन सरकारनें बेत करून सौम्य उपाय योजण्यास आरंभ केला. ह्याची हकीकत एमिलिओचे ( एप्रिल २२, १८४४ ) पत्रांत जशी आहे तशीच देतों:—

"मी हल्लीं कार्फ्यू येथें आहे. लॉम्बर्डी व व्हेनिस या प्रांताचा मुख्य गव्हर्नर आर्चड्युक रेनिएरी यानें माझ्या आईकडे एक मनुष्य धाडला. जर मातापित्यांचें आपल्या पुत्रावर जें वजन असतें तें खर्च करून तिला कार्फ्यूहून मी व्हेनिसला यावें असें माझें मन जर वळवितां येईल, तर त्याच्या स्वतःच्या सन्मानाची शपथ घेऊन त्यानें वचन दिलें कीं, एमिलिओला नुस्ती माफी होईल इतकेंच नव्हे तर त्याला पुन्हां नौकरीवर घेण्यांत येईल. दुष्ट गुप्त मंडळींच्या नादीं लागून बिघडलेल्या या तरुणाला कांहीं एक शिक्षा न होतां त्याला सन्मानानें वागविण्यांत येईल. ॲटिलिओला मात्र माफी मिळेलच असें नक्की जरी सांगतां येत नाहीं तरी बहुतेक अंशीं राजाच्या उदार स्वभावानुरूप ती माफी मिळावी अशी खटपट केल्यास यश येईल.

"हें ऐकतांच त्यावर विश्वास ठेवून व फार आशा धरून माझी आई घर

सोडून निघाली व मजकडे आली. त्या वेळेस माझ्या मनाला मनोविकारांच्या किती भयंकर वादळांत सांपडावें लागलें असेल याची तुह्मींच कल्पना करा !

"माझ्या आईला मी पुनःपुन्हां सांगितलें कीं, मीं येथेंच रहावें अशी माझ्या कर्तव्याची आज्ञा आहे. अहाहा ! माझ्या स्वदेशाला मीं परत यावें ही तर माझ्या मनाची उत्कटतम इच्छा आहे ! परंतु जेव्हां मी स्वदेशाला परत येईन तेव्हां, आई, गुलामगिरीच्या नरकांत किड्यासारखें जीवन ठेवण्यास येणार नाहीं तर सन्माननीय स्वातंत्र्ययुद्धांतील मरण वरण्यास येणार आहें ! इटलीमध्यें मीं यावें ह्मणून तें आणलेले हे गुलामगिरीचे परवाने योग्य नाहींत. इटली देशांत येण्यासाठीं मजजवळ खरा खरा परवाना आहे व तो ह्मटला ह्मणजे हा माझ्या हातांतील तीक्ष्ण खड्ग होय ! मी तुझ्यावर, आई, माझ्या प्राणाहून जास्त प्रेम करीत आहें. परंतु हातीं घेतलेल्या सद्धर्म कार्यांत कोणचेंही निर्मल प्रेम आड येतां उपयोगी नाहीं. मी राजाच्या निशाणाला सोडून पळालों. राजाचें निशाण सोडतां येईल, परंतु स्वदेशभूमीचें निशाण कधींही सोडतां यावयाचें नाहीं !

"हें सर्व मीं माझ्या आईला सांगितलें. दुःखानें त्रस्त झालेल्या व ममतेनें वेडावलेल्या माझ्या आईला मी काय ह्मणतों हें उमजत नाहीं ! तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वहात आहेत ! ती मला दोष लावते आहे ! तिचे ते अश्रु पाहून माझें हृदय जळूं लागतें. तिचे ते-मी निरपराधी असतांही दिलेले-दोष ऐकून माझ्या अंतःकरणावर तरवारीचे वार होतात ! माझ्या आईनें मला कृतघ्न, अमानुष, राक्षसी, खुनी ह्मटलें. तिच्या रोदनानें मी तळमळूं लागलों, परंतु या तळमळण्याचा माझ्या विवेकबुद्धीवर कांहीं परिणाम झाला नाहीं. मी हें जाणून आहें कीं, तिच्या या दुःखाची व अश्रूंची जबाबदारी माझ्यावर नसून ती त्या परक्या अधम चांडाळांवरच पडत आहे ! इतके दिवस मी माझ्या प्रियकर देशाच्या प्रेमानेंच सज्ज झालों होतों. परंतु, आतां माझ्या आइच्या या स्थितीनें, ज्या दुष्टांच्या महत्त्वाकांक्षेनें माझ्या देशावर पारतंत्र्य लादून आमच्या प्रियकर कुटुंबांनां असल्या असह्य संकटांत ढकललें त्या दुष्टांच्या द्वेषानेंही त्यांच्या नरडीचा घोट घेण्यास मी दुप्पट सज्ज झालों आहें. माझ्या देशाचा सूड आणि माझ्या आईचा सूड ! परक्या अधमांवर दोन सूड उगवावयाचे आहेत !

" ...........माझे समाधानासाठीं तुह्मीं एक शब्द तरी बोला, तुमच्या

सहानुभूतीनें शेंकडों मूर्खांनीं व हजारों नामर्द लोकांनीं घेतलेल्या अनंत आक्षेपांचें निरसन झालें असें मला वाटून माझ्या मनाला उत्साह येईल."

भविष्यकालांत आपलें नांव अजरामर राखण्यासाठीं जीं जीं उदात्त कृत्यें, त्यांच्या मृत्यूसह, बन्डीएराबंधूंनीं केलीं त्या सर्वांत आईच्या विनंतीला अमान्य केल्याचें कृत्य अत्यंत उदात्त आहे असें मला वाटतें. माझें हें ह्मणणें शेंकडों जणांना कबूल होणार नाहीं हें मी जाणून आहें. शेंकडों जणांनीं असल्या प्रसंगांत धीर सोडला असता इतकेंच नव्हे, तर त्या कृत्यांचे गोड गोड भाषेनें मंडनही केलें असतें. एका रक्ताचें व एका मांसाचें बंधन पूज्य आहे. कौटुंबिक प्रेमाचा इतर सर्व कर्तव्यांवर अबाधित ताबा आहे, वगैरे वाक्यांखालीं त्यांनीं आपल्या दौर्बल्याला छपविण्याचा प्रयत्न केला असता. हीं वाक्यें वरवर विचार करणाराला खरीं भासोत. परंतु मला त्यांचा मथितार्थ असाच वाटत आहे कीं, "आह्मीं स्वतःपुरतें पहाणारे आहोंत. व या अहंकाराला व अप्पलपोटेपणाला सद्गुणांचें स्वरूप देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

सर्वसाधारण रीतीनें बोलावयाचें ह्मणजे हल्लीं मनुष्यें प्रेम करीत नाहींत. प्रेम ही परमेश्वरानें मनुष्यांना दिलेली सर्वोत्तम देणगी होय. प्रेम हें उच्चतर योनींतील अस्तित्वाचें वचनपत्र आहे. परंतु त्या पवित्र प्रेमाला नास्तिकांनीं लंपटतेचें, पशुबुद्धीचें व तामसी व्यसनाचें स्वरूप दिलें आहे. जगकर्त्याच्या उत्सर्जनाचें जें मुख्य चिन्ह आहे, सृष्टीचें जें मूल आहे व समाजाचें जें बीज आहे, तें कुटुंब परम पवित्र आहे. परंतु अशा या कुटुंबाला कर्तव्य असें कांहींच नाहीं काय ? पुरुष व स्त्री हीं जगाचीं दोन तत्त्वें आहेत व ह्मणून विश्वोन्नतीच्या कार्यांत त्यांच्याकडे व्यक्तिविषयक सुखाहून उन्नततर अशीं कर्तव्यें आलेलीं आहेत. परंतु हल्लीं जिकडे पहावें तिकडे या कुटुंबकर्तव्याला विषयलंपटतेचें घाणेरडें स्वरूप प्राप्त झालें आहे. पुरुष व स्त्री हीं नांवें खोडून टाकून नर व मादी हीं नावें उच्चारिलीं जात आहेत !

इटलीमध्यें हल्लीं असलेला दुर्दैवी मातृवर्ग अशाच कोत्या शिक्षणांत वाढलेला आहे. समाजाचे रचनेस स्त्रीवर्गाकडे येणाऱ्या कर्तव्याचें त्यांना भयंकर अज्ञान आहे. गुलामगिरींत वाढलेल्या या माता आपल्या मुलालाही भयभीत रीतीनें असेंच शिकवूं लागतात कीं, ज्या कोणाची सत्ता आपणांवर असेल त्याची चाकरी आपण करूं लागावी. इकडे इटलीचा पितृवर्ग हा प्रत्येक कुटुंबाच्या पाळतीवर सरकारी हेर आहेच हें जाणून आपल्या मुलाला

अविश्वासाचें व एकलकोंडेपणाचें शिक्षण देऊं लागतो. मातृवर्ग त्या अर्भकांनां गुलामगिरीचे धडे देणार व पितृवर्ग त्यांनां फाजील शंकेखोर व तुसडे करून ठेवणार. पुढें इटलीमधल्या तरुण युवति युवजनांपासून ‘ मी केवळ तुझ्यासाठींच जिवंत राहीन ’ अशी शप्पथ घेणार. परंतु विषयलालसेचा पहिला बहर सरतांच त्या युवतींनां आढळून येतें कीं, आपल्याकडे आपल्या पतीचें पूर्ण दुर्लक्ष झालेलें आहे. कारण, जे नीच नागरिक आहेत ते नीच पति व स्नेहशून्य मित्र असावयाचेच. जेथें राजकीय पारतंत्र्य आहे तेथें सत्पातित्व व सन्मित्रत्व कधींहि आढळणार नाहीं.

परंतु जर इटलीच्या तरुण युवति आपल्या प्रियकरांस असें सांगतील कीं, “ तुमचें कर्तव्य म्हणजे मजबरोबर ‘ जिवंत राहण्याचें ’ नसून उच्च आनंदाचा अनुभव घेणें हेंच होय. म्हणून तुम्हांला जेव्हां दुःख होईल तेव्हां तुम्हीं समाधानासाठीं मजकडे येत जा. आपलीं हीं दोन शरीरें आपण एकजीव करून हें पवित्र आयुष्य नेऊं. देह दोन, परंतु अंतरात्मा एक, अशा रीतीनें हें आपलें संयुक्त जिवन आपण जें जें उन्नत असेल, उदात्त असेल, ईश्वरी असेल त्या त्या वस्तूला अर्पण करूं. ” जर आपला पितृवर्ग आपल्या तरुणांस असा उपदेश देईल कीं, “ आयुष्याची खरी व्याख्या सुखलंपटता ही नाहीं. परंतु ह्या जगांतील उच्च कर्तव्यें पार पाडून भावी उच्चतर योनींत प्रगति करून घेण्याची आयुष्य ही एक पायरी आहे. ” जर आपल्या माता बालकांनां सांगतील कीं, “ तुम्हीं जीजसचें अनुकरण करा. मनुष्यजातीसाठीं तो आनंदानें फांसावर चढला. सत्यासाठीं त्यानें फांसावरून उपदेश दिला. प्रेमाची खरी खूण ही आहे. सत्यासाठीं सत्प्रेम हें आत्मार्पण करवितें. ”— तर कुटुंबप्रेमाचा खरा हेतु सफल झाला असें होईल. कुटुंबप्रेमाची ही उच्च कल्पना जर मातृवर्ग, पितृवर्ग, व पत्निवर्ग यांनां येईल तर आपला देश, देशवीरांच्या पराक्रमानें स्वतंत्र होईल व मग फांशीवर चढलेल्या किंवा वनवासांत झिजून झिजून मेलेल्या तरुणांसाठीं तरुणींनां रडण्याचा प्रसंग पुनरपि येणार नाहीं. ही प्रेमाची खरी व्याख्या होय. मला वाटतें कीं खरें प्रेम तेंच कीं जें उच्चतम सत्याचें समर्थन करतें, आपण त्या सत्याच्या विजयासाठीं सतत यत्न करतें व आपल्या आवडत्या प्रीत वस्तूलाही त्या सत्याच्या यशास्तव प्रयत्न करावयास लावतें. अॅटिलिओ व एमिलिओ यांच्या मातेविरुद्ध एकही शब्द बोलण्याच्या भयंकर पापापासून परमेश्वर मला

सहानुभूतीनें शेंकडों मूर्खांनीं व हजारों नामर्द लोकांनीं घेतलेल्या अनंत आक्षेपांचें निरसन झालें असें मला वाटून माझ्या मनाला उत्साह येईल."

भविष्यकालांत आपलें नांव अजरामर राखण्यासाठीं जीं जीं उदात्त कृत्यें, त्यांच्या मृत्यूसह, बन्डीएराबंधूंनीं केलीं त्या सर्वांत आईच्या विनंतीला अमान्य केल्याचें कृत्य अत्यंत उदात्त आहे असें मला वाटतें. माझें हें ह्मणणें शेंकडों जणांनां कबूल होणार नाहीं हें मी जाणून आहें. शेंकडों जणांनीं असल्या प्रसंगांत धीर सोडला असता इतकेंच नव्हे, तर त्या कृत्यांचें गोड गोड भाषेनें मंडनही केलें असतें. एका रक्ताचें व एका मांसाचें बंधन पूज्य आहे. कौटुंबिक प्रेमाचा इतर सर्व कर्तव्यांवर अबाधित ताबा आहे, वगैरे वाक्यांखालीं त्यांनीं आपल्या दौर्बल्याला छपविण्याचा प्रयत्न केला असता. हीं वाक्यें वरवर विचार करणाराला खरीं भासोत. परंतु मला त्यांचा मथितार्थ असाच वाटत आहे कीं, "आह्मी स्वतःपुरतें पहाणारे आहोंत. व या अहंकाराला व अप्पलपोटेपणाला सद्‌गुणांचें स्वरूप देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

सर्वसाधारण रीतीनें बोलावयाचें ह्मणजे हल्लीं मनुष्यें प्रेम करीत नाहींत. प्रेम ही परमेश्वरानें मनुष्यांनां दिलेली सर्वोत्तम देणगी होय. प्रेम हें उच्चतर योनींतील अस्तित्वाचें वचनपत्र आहे. परंतु त्या पवित्र प्रेमाला नास्तिकांनीं लंपटतेचें, पशुबुद्धीचें व तामसी व्यसनाचें स्वरूप दिलें आहे. जगकर्त्याच्या उत्सर्जनाचें जें मुख्य चिन्ह आहे, सृष्टीचें जें मूल आहे व समाजाचें जें बीज आहे, तें कुटुंब परम पवित्र आहे. परंतु अशा या कुटुंबाला कर्तव्य असें कांहींच नाहीं काय? पुरुष व स्त्री हीं जगाचीं दोन तत्त्वें आहेत व ह्मणून विश्वोन्नतीच्या कार्यांत त्यांच्याकडे व्यक्तिविषयक सुखाहून उन्नततर अशीं कर्तव्यें आलेलीं आहेत. परंतु हल्लीं जिकडे पहावें तिकडे या कुटुंबकर्तव्याला विषयलंपटतेचें घाणेरडें स्वरूप प्राप्त झालें आहे. पुरुष व स्त्री हीं नांवें खोडून टाकून नर व मादी हीं नांवें उच्चारिलीं जात आहेत!

इटलीमध्यें हल्लीं असलेला दुर्दैवी मातृवर्ग अशाच कोत्या शिक्षणांत वाढलेला आहे. समाजाचे रचनेस स्त्रीवर्गाकडे येणाऱ्या कर्तव्याचें त्यांनां भयंकर अज्ञान आहे. गुलामगिरींत वाढलेल्या या माता आपल्या मुलालाही भयभीत रीतीनें असेंच शिकवूं लागतात कीं, ज्या कोणाची सत्ता आपणांवर असेल त्याची चाकरी आपण करूं लागावी. इकडे इटलीचा पितृवर्ग हा प्रत्येक कुटुंबाच्या पाळतीवर सरकारी हेर आहेच हें जाणून आपल्या मुलाला

अविश्वासाचें व एकलकोंडेपणाचें शिक्षण देऊं लागतो. मातृवर्ग त्या अर्भकांनां गुलामगिरीचे धडे देणार व पितृवर्ग त्यांनां फाजील शंकेखोर व तुसडे करून ठेवणार. पुढें इटलीमधल्या तरुण युवति युवजनांपासून ' मी केवळ तुझ्यासाठींच जिवंत राहीन ' अशी शपथ घेणार. परंतु विषयलालसेचा पहिला बहर सरतांच त्या युवतींनां आढळून येतें कीं, आपल्याकडे आपल्या पतीचें पूर्ण दुर्लक्ष झालेलें आहे. कारण, जे नीच नागरिक आहेत ते नीच पति व स्नेहशून्य मित्र असावयाचेच. जेथें राजकीय पारतंत्र्य आहे तेथें सत्पातित्व व सन्मित्रत्व कधींहि आढळणार नाहीं.

परंतु जर इटलीच्या तरुण युवति आपल्या प्रियकरांस असें सांगतील कीं, " तुमचें कर्तव्य म्हणजे मजबरोबर ' जिवंत राहण्याचें ' नसून उच्च आनंदाचा अनुभव घेणें हेंच होय. म्हणून तुम्हांला जेव्हां दुःख होईल तेव्हां तुम्हीं समाधानासाठीं मजकडे येत जा. आपलीं हीं दोन शरीरें आपण एकजीव करून हें पवित्र आयुष्य नेऊं. देह दोन, परंतु अंतरात्मा एक, अशा रीतीनें हें आपलें संयुक्त जिवन आपण जें जें उन्नत असेल, उदात्त असेल, ईश्वरी असेल त्या त्या वस्तूला अर्पण करूं. " जर आपला पितृवर्ग आपल्या तरुणांस असा उपदेश देईल कीं, " आयुष्याची खरी व्याख्या सुखलंपटता ही नाहीं. परंतु ह्या जगांतील उच्च कर्तव्यें पार पाडून भावी उच्चतर योनींत प्रगति करून घेण्याची आयुष्य ही एक पायरी आहे. " जर आपल्या माता बालकांनां सांगतील कीं, " तुम्हीं जीजसचें अनुकरण करा. मनुष्यजातीसाठीं तो आनंदानें फांसावर चढला. सत्यासाठीं त्यानें फांसावरून उपदेश दिला. प्रेमाची खरी खूण ही आहे. सत्यासाठीं सत्प्रेम हें आत्मार्पण करवितें. "— तर कुटुंबप्रेमाचा खरा हेतु सफल झाला असें होईल. कुटुंबप्रेमाची ही उच्च कल्पना जर मातृवर्ग, पितृवर्ग, व पत्निवर्ग यांनां येईल तर आपला देश, देशवीरांच्या पराक्रमानें स्वतंत्र होईल व मग फांशीवर चढलेल्या किंवा वनवासांत झिजून झिजून मेलेल्या तरुणांसाठीं तरुणींनां रडण्याचा प्रसंग पुनरपि येणार नाहीं. ही प्रेमाची खरी व्याख्या होय. मला वाटतें कीं खरें प्रेम तेंच कीं जें उच्चतम सत्याचें समर्थन करतें, आपण त्या सत्याच्या विजयासाठीं सतत यत्न करतें व आपल्या आवडत्या प्रीत वस्तूलाही त्या सत्याच्या यशास्तव प्रयत्न करावयास लावतें. अंटिलिओ व एमिलिओ यांच्या मातेविरुद्ध एकही शब्द बोलण्याच्या भयंकर पापापासून परमेश्वर मला

परावृत्त करो ! पण माझी अशी इच्छा आहे कीं, तिनें हा लेख वाचावा. माझी अशी खात्री आहे कीं, या जन्मांत किंवा उच्चतर जन्मांत हें तिला कळून आल्याशिवाय राहणार नाहीं कीं, तिच्या पुत्रांनीं तिच्यांवर खरें प्रेम जर केव्हां केलें असेल तर तें त्यांनीं ज्या वेळेस आर्च ड्यूक रेनीएरी याची तिच्या विनंतीनेंही माफी मागण्याचें नाकारलें त्याच वेळीं होय !

बन्डीएराबंधूंनीं अशा रीतीनें शत्रूची निंद्य माफी मागण्याचें नाकारल्यावर आस्ट्रियाचे सरकारनें त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप आल्याचें प्रसिद्ध केलें. बन्डीएराबंधू हे ' यंग इटली ' ह्या गुप्त सभेस मिळाले आहेत व त्यांनीं त्या राजद्रोही संस्थेतर्फे भयंकर राजद्रोह केला आहे या आरोपाबद्दल जर कांहीं तक्रार असेल तर त्यांनीं व्हेनिस येथें सरकारी न्यायासनासमोर ९० दिवसांचे आंत हजर व्हावें असा जाहिरनामा लागला. ह्या जाहिरनाम्याचें वर्तमानपत्रांचे द्वारें बन्डीएराबंधूंनीं उत्तर प्रसिद्ध केलें, " आमच्या ज्या कृत्याला तुम्हीं राजद्रोहाचा दोष म्हणून म्हणत आहां तें कृत्य केल्याबद्दल आम्हांला धन्यता वाटत आहे. परक्यांच्या सत्तेचा उच्छेद करणें व स्वदेशाचें निसर्गदत्त स्वातंत्र्य मिळविणें हें अत्यंत पवित्र कृत्य आहे. आमच्यापुढें देवानें दोन गोष्टी ठेविल्या होत्या. राजद्रोह व देशद्रोह. त्यांपैकीं आम्हीं राजद्रोह निवडला. कारण, देशद्रोहाच्या भयंकर नरकगामी पापाला स्पर्श करण्याची आमची छाती होईना. आम्हीं हें जाणून आहोंत कीं, आमचा मृत्यु ठरलेला आहे. केव्हां तरी मरण येणारच होतें. मग स्वदेशाला गुलामगिरींत ढकलणाऱ्या अधम शत्रूचे निशाणाखालीं मरून नरकास जावें कां स्वदेशाचे निशाणाला तोलतां तोलतां मरण वरून स्वर्गास जावें ? आम्हीं हें स्वर्गगामी मरण पत्करिलें आहे ! " या उत्तरानंतर थोडेच दिवसांत आणखी एक युवा आस्ट्रियाच्या लष्करांतून पळून बन्डीएराबंधूस येऊन मिळाला. हा युवा त्या बंधूंच्या वतीनें लंडनमध्यें येऊन मला भेटलेला तरुण **डोमेनिकोमोरो** हाच होय. हा लष्करांत लेफ्टेनंटचे जागेवर होता. याचें वय फक्त बावीस वर्षांचें होतें. या तरुणाची मुद्रा अत्यंत रमणीय होती. त्याला पाहतांच डॉन्टेच्या ' त्याची कांति गौर, त्याची मुद्रा रमणीय व त्याचें वर्तन विनयशील असे, ' ह्या वर्णनाचें स्मरण होतें. कुमारिकेचा विनय व सिंहाचें शौर्य हें त्या तरुणांत एकत्र झालें असल्यानें तो एखाद्या देवदूतासारखा दिसत असे.

इकडे इटलीमधला असंतोष जास्त जास्त वाढूं लागला. १८४३ मध्यें

दाबून टाकलेली लोकांची चळवळ आतां १८४४ मध्यें पुन्हां प्रादुर्भूत होऊं लागली. आतां ती लहान सहान प्रमाणावर नव्हती. मध्य देश व्यापून ती दक्षिणेपर्यंत पसरली होती. कोसेंझा येथें तर तेथील लोकांपैकीं कांहीं तरुण सशस्त्र होऊन बाहेर पडले. ती उठावणी सहज दाबली गेली, परंतु तिचा जनतेवर फारच विलक्षण परिणाम झाला. सिसिलीवरही जुलुमाचा अतिरेक झाल्यानें तो भाग बंडासाठीं उतावीळ झाला होता. त्या वेळेस सिसिलीमध्यें उठावणीची इच्छा इतकी प्रबळ झाली होती कीं, 'वसंताची वाट पहाणारे' जर आडवे पडले नसते तर बंडाची ज्वाला त्वरित भडकली असती. वर्तमानपत्रांतून लोकांच्या चैतन्याची वाट स्पष्ट दिसूं लागली. कांहीं पत्रांतून तर आतां लवकरच बंड होणार म्हणून भविष्यवादही झाले. अशा लेखांचा उपयोग अशा वेळेला फारच असतो. ह्या योगानें लोकांनां अवसान भरूं लागतें. जे झोंपीं गेलेले असतात तेही जागे होतात. व यूरोपला व देशाला सहजरीतीनें तयारी ठेवण्याविषयीं सूचना मिळते. एकदम बंड झाल्यास लोक त्या धक्क्यानें गांगरून जातात, परंतु 'बंड होणार' 'बंड होणार' अशी लोकवार्ता उठविली कीं, लोक तो धक्का सोसण्याचें धैर्य धरितात, इतकेंच नव्हे, तर तो धक्का शत्रूच्या नरडीपर्यंत पोंचेल अशी तयारीहि करितात. इकडे शत्रूंचा धीर नुसत्या बातमीनेंच निम्मे खचून जातो. इतकी मात्र सावधगिरी पाहिजे कीं, अशा रीतीनें शत्रूंस गांगरविण्याचें आधीं चांगली तयारी ठेवावी. शिवाय 'बंड होणार' अशी आरोळी वारंवार ठोकल्यानें शत्रूंचा त्या आरोळीवरील भरंवसा नाहींसा होतो व ते सावध होण्याचे ऐवजीं दुर्लक्ष करूं लागतात. अशा रीतीनें त्यांनां दोनदां तिनदां फसविलें कीं मग एकदम उठावणी करावी. सारांश, अशा लोकवार्तेनें लोकांची बंडाची भीति कमी होते व शत्रूला फसवितां फसवितां तो गैरसावध झाला कीं गांठतां येतें. परंतु त्या 'वसंताची वाट पाहणाऱ्यांस' हें कांहीं कळेना. त्यांनीं त्या पत्रांची निंदा चालविली. व चळवळीचा खरा जोम दिरंगाईनें दवडला. परंतु रोमकडे मात्र विलक्षण जोर दिसूं लागला. ही बातमी कार्फ्यू येथें बन्डीएरा बंधूंस कळली. त्यांनीं रणांत उडी घेण्याचा निश्चय केला व सर्वानुमतें ते त्याच्या तयारीला लागले.

हा निश्चय करण्यांत त्या बंधुद्वयाचा खरा हेतु कोणालाच पूर्ण समजलेला नाहीं. व त्यांच्यावर उतावीळपणाचा व अदूरदृष्टीचा आरोप करणारांनां

तर तो मुळींच समजलेला नाहीं. ब्रण्डीएरा बंधूंना जयाची मोठीशी आशा अशी केव्हांच नव्हती. इटलीचा विजय होणारच होणार ही त्यांची खात्री होती, परंतु या विजयाला आरंभ होण्यास इटालियन लोकांच्या बोलांत व कृतींत पूर्ण मेळ पाहिजे आहे असें त्यांचें मत होतें. **स्वातंत्र्यासाठीं बोलावयासच नव्हे तर मरावयास तयार झालें पाहिजे.** इटलीच्या लोकांत अजून आयुष्याची एकवाक्यता नाहीं. " चित्ते वाचि क्रियायां च महतामेकरूपता " ही एकरूपता इटलीच्या लोकांत नाहीं. जडवादानें मनुष्याच्या उच्च शक्तींचा व उदात्त कर्तव्यबुद्धीचा सर्वस्वीं नाश होतो. त्या जडवादानेंच इटलीच्या पुढाऱ्यांत वारा वाहील तशी पाठ देणाऱ्यांचा एक पक्ष उत्पन्न झाला आहे. ध्येयासाठीं प्राण देणारी निष्ठा लय पावली असून जिकडे तिकडे भ्याड व अल्पसंतुष्ट आंधळ्यांचा बाजार भरला आहे. अमुक तत्त्व सत्य आहे कीं नाहीं हें पहाण्याचे ऐवजीं तें सुलभ आहे कीं नाहीं हें आधीं ठरविण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते. कर्तव्य कोणचें हें ठरविण्याचे ऐवजीं फायदा कशांत आहे इकडे लक्ष देण्यांत येतें. व म्हणून डान्टेनें आपल्या सूक्ष्म दृष्टीनें पाहिलेलें इटलीचें ध्येय या अदूरदृष्टी आंधळ्यांनां दिसत नाहीं ! परमेश्वरानें इटलीला किती थोर कामगिरी दिली आहे ! तिचे ईश्वरदत्त हक्क किती पवित्र आहेत ! व ते हक्क संपादन करण्याची व संरक्षण करण्याची तिची शक्ति किती अवाढव्य आहे ! **जेव्हां ईश्वर राष्ट्राला त्याचे जन्मसिद्ध हक्क देतो, तेव्हां तो ते बजाविण्याची ताकदही देतोच देतो !** स्वदेशाभिमान हा सोपा नाहीं. तें उच्चतम कर्तव्य आहे. परंतु त्यांनां सुलभ स्वदेशाभिमान पाहिजे आहे तो कसा मिळणार ? **स्वदेशाभिमान हें पवित्र, भव्य व निर्धारयुक्त असें एक कडक व्रत आहे. स्वदेशाभिमान हा धर्म आहे. हा प्रगमनाचा—प्रगतीचा—उत्क्रांतीचा मार्ग आहे. घाईनें न धांवतां पण आळसानें न थांबतां आकाशांतील ताऱ्याप्रमाणें तो ईश्वरी ध्येयाकडे–मग तें ध्येय नजिक असो किंवा दूर असो तिकडे–एकसारखा चाललेला आहे.** त्यांचा स्वदेशाभिमान अशा प्रकारचा नाहीं. जरा संकटें आलीं कीं ते त्यापासून परावृत्त होतात. त्यांचेंच उदाहरण पाहून कित्येक तरुण लोकही उठावणीच्या आरंभीं योग्य अवसान दाखवितात. परंतु जरा अपयश येतांच धीर सोडून स्वस्थ बसूं लागतात. हा दोष गेल्याशिवाय इटली स्वतंत्र व्हावयाची नाहीं.

नेट व चिकाटी हे विजयाचे आधारस्तंभ आहेत. संकटांना भिऊन कर्तव्य सोडण्याची दुष्ट खोड इटालियनांनीं सोडली पाहिजे. ते सर्व स्वातंत्र्याभिमानी असले तथापि, स्वातंत्र्यकृतीच्या वेळेस जर ते कचरूं लागले तर या 'क्रियेवीण वाचालते' चा कांहीं एक उपयोग नाहीं. बन्डीएरा बंधूंची अशी पक्की खात्री होती कीं, जिला वैभवयुक्त व विजयशाली भूतकाल प्राप्त झाला आहे ती इटली भविष्यकालींही तितकीच महनीय होणार. परमेश्वराचे आज्ञेवरून प्राप्त झालेलें स्वातंत्र्य तिला मिळणार व त्याचा उपयोग ती मनुष्यजातीच्या प्रगमनाकडे करणार. अशी निष्ठा धरून त्या बंधुद्वयानें अंतिम विजयाला आड येणारा हा धरसोडीचा व कातरतेचा दोष इटालियन तरुणांमधून निघून जावा ह्मणून आपला देह स्वदेशदेवीला अर्पण करावयाची इच्छा धरली. आपल्या ह्या स्वात्मार्पणानें इटालियन तरुणांना एक कित्ता मिळावा व त्यांनींही स्वातंत्र्याकरितां 'जीव जावो अथवा राहो' असा निश्चय करावा एवढाच त्यांचा हेतु होता. इतकें घडलें तरी आपल्या देहाचें सार्थक होईल असें समजून तत्काल विजयासाठीं नव्हे तरी केवळ देशवीरत्व मिळविण्यासाठीं ते सज्ज झाले.

कार्फ्यू येथें आल्यानंतर थोडेच दिवसांनीं ता. १० मे १८४४ रोजीं ॲटिलिओनें मला पत्र लिहिलेः—" माल्टा येथून आलेलें तुमचें पत्र मला पोंचलें. माझ्याविषयीं आपण फार काळजी वाहतां याबद्दल मी आपला आभारी आहे. तुमच्या प्रीतीनें सत्कृत्य करण्यास किती अवसान चढतें ह्मणून सांगूं! आपणां दोघांनांही जीं तत्त्वें मान्य आहेत त्यांच्या सत्यासत्याची शंका मला येईल असें मनांत सुद्धां आणूं नका. इटली-स्वतंत्र, दास्यमुक्त, एकीकृत, लोकसत्तेनें विभूषित, रोम ही जिची राजधानी आहे अशी इटली-ही माझी राष्ट्रधर्माची दीक्षा आहे. आपल्या देशबंधूंच्या 'शस्त्र उचला' ह्या आरोळीचा ध्वनि माझे कानांत सारखा घणघणत आहे व मीं त्याचेसह लढावयास व जरूर तर मरावयास जाण्याची सिद्धता केली आहे. मी ही व्यवस्था करण्याचे गडबडींत असल्यानें मला आपल्याला सविस्तर हकीकत देतां येत नाहीं, परंतु तुह्माला मुख्य गोष्टी कळविल्याशिवाय मी राहणार नाहीं. मी दोन बेत जुळवीत आणलेले आहेत. एक... ... ...... व दुसरा कॅलेब्रिआवर उतरण्याचा. पहिल्या बेतास जास्त पैसा व जास्त वेळ लागेल. परिस्थितीनें मला दुसरा बेत पसंत करावा लागत आहे. या बेताला पैसे

मिळावे ह्मणून मी व माझ्या भावांनीं ज्या कांहीं वस्तु आमच्याबरोबर आणल्या होत्या त्या सर्व अगदीं येईल त्या किंमतीस आम्हीं विकीत आहोंत. परंतु त्यांची एकंदर किंमत ५०० फ्रँक देखील येणार नाहीं व आह्मांला तर ३००० फ्रँक पाहिजेत. ह्मणून तुह्मी मागें एकदां आह्माला देऊं केलेल्या ३००० फ्रँकची मला आतां मागणी करावी लागणार व म्हणून मी ‘ नाय-कोला फॅब्रिझि ’ ( मॅझिनीचा एक परम स्नेही ) याला ती रक्कम मला धाडून देण्याविषयीं लिहिलें आहे. या बिनपरवानगीबद्दल क्षमा करा. मी हें कृत्य माझ्या स्वतःच्या कल्याणासाठीं करीत नसून आपल्या कार्याचें कल्याणासाठीं करीत आहे व मीं माझी अशी समजूत करून घेतली आहे कीं, आपण स्वदेशाभिमानाच्या प्रत्येक प्रयत्नाला परवानगी व साह्य देणारच आहांत. आतां आपली रजा घेतों. व जर ही शेवटचीच भेट असेल तर महाराज, मी आपली कायमची रजा घेतों ! ” या पत्राचे शेवटीं स्नेहाच्या शेवटच्या उमाळ्यानें अंतःकरण भरून येऊन एमिलिओनें खालील ओळी लिहिल्या आहेतः—“ माझ्या भावा, तुला मीही एक ओळ लिहितों, कारण क्वचित् आमचे तुला हे शेवटचेच शब्द असतील. तूं आमच्या देशावर जे जे उपकार केले आहेस त्याबद्दल परमेश्वर तुला धन्य करो ! मृत्यूच्या जबड्यांत उडी घेण्याचे आधीं मी हें स्पष्ट रीतीनें प्रसिद्ध करतों कीं, प्रत्येक इटालियन अंतःकरणांत तुम्हांविषयीं पूज्यता व कृतज्ञता असली पाहिजे. जीं आमचीं तत्त्वें आहेत तींच तुमचींही आहेत याचा मला अभिमान वाटतो आणि जेव्हां मी स्वदेशांत पाय टाकीन व तरवार उपसून रणांत उसळेन तेव्हां आजपर्यंत तुह्मी जी गर्जना करीत आलांत तीच गर्जना मीही करीन ! प्रत्येक गोष्टींत आह्मीं दरिद्री आहों, तथापि आह्मीं तुला आमच्या मृत्युपत्राचे व्यवस्थापक नेमतों. अशी व्यवस्था व्हावी कीं, आमच्या देशबंधूंच्या अंतःकरणांत आमची स्मृति कायम असावी !—एमिलिओ. ”

या पत्रानंतर एका बाजूला हे दोघे बंधु व दुसऱ्या बाजूला मी व माझा मित्र फॅब्रिझि अशी ओढाताण सुरू झाली. आह्मीं त्यांना त्यांच्या या असहाय्य व उतावळ्या बेतापासून परावृत्त करीत होतों व ते तो बेत सिद्धीस नेण्यास भगीरथ प्रयत्न करीत होते. जे ३००० फ्रँक बन्डीएरा इटलींतच होते तेव्हां देऊं केले होते ते आतां वेळ निघून गेल्यामुळें धाडून देण्याचें फॅब्रिझीनें नाकारलें. व अशा रीतीनें त्यांचा मेमध्यें निघण्याचा बेत आह्मीं

मोडून काढला. ता. २१ मेला ॲटिलिओनें मला आणखी एक निराशायुक्त पत्र टाकलें:-"..........परंतु ही सर्व तयारी नायकोला याचे पत्रानें व्यर्थ झाली. त्यानें तुम्हीं देऊं केलेले ३००० फ्रँक दिले नाहींत. व आमच्या मित्रांनां आमच्या या मूर्ख व नाशकारक बेताला मदत देऊं नये म्हणून कळविलें........परंतु दारिद्र्यानें आमचा धीर सुटेल असें आपणांस वाटूं देऊं नका. आम्हांला वाईट इतकेंच वाटतें कीं, आमचे बळी आतां निरर्थक पडतील. यापूर्वी जमले असतें तर कांहीं विशेष करून दाखवितां आलें असतें. परंतु तें जरी आतां अशक्य झालें आहे तरी माझ्या स्वदेशाला देण्यास आमचें स्वतःचें असें अजून कांहीं तरी आहेच. आतां दुसरें कांहीं जवळ नसल्यानें दुःखानें व दुर्दशेनें पीडित झालेले हे आमचे देह मानव्याला व मातृभूमीला आम्हीं अर्पण करणार. तिकडे बोलोग्ना प्रांतांत पुन्हां धरपकड सुरू झाली आहे. आमच्या पूर्वजांच्या अपराधांबद्दल आम्हांस पूर्ण दंड अजून झाला नाहीं असें सनातन न्यायदेवतेला अजून वाटत आहे काय ? आमचा परिणाम कांहींही होवो. आम्हीं तरुण पिढीला अढळ चिकाटीचा व अखंड निश्चयाचा कित्ता घालून देणार. इंग्लिश पोस्टखात्याच्या पूर्ण इमानीपणावर भरंवसा ठेवून तुम्हीं मला इकडे पत्रें टाकीत जावीं. ॲटिलिओ."

ॲटिलियोच्या या "इंग्लिश पोस्टाच्या पूर्ण इमानीपणांत" असलेल्या विश्वासाला इंग्लिश राष्ट्रानें फार प्रशंसनीय उत्तर दिलें ! सतत सात महिने अत्यंत नीच हेरांनाही लाज वाटेल अशा घोर प्रकारानें पत्रें उघडून व पुन्हां डकवून इंग्लिश राष्ट्रांतील 'सन्माननीय' लोकांनीं माझा पत्रव्यवहार माझ्या नकळत फोडलेला आहे व त्यांतील सर्व बातम्या ऑस्ट्रियाला कळविल्या आहेत. ॲटिलिओ व एमिलिओ या तरुण वीरांचा नाश करण्यास हा इंग्रजी 'सन्माननीय' विश्वासघात कारण झालेला आहे. या बंधुद्वयाचे बेत द्रव्याभावीं ढांसळले गेले परंतु, त्यांचा निश्चय ढासळला नाहीं. इटलींतून असंतोष व लोकक्षोभ भडकत चालल्याच्या बातम्या त्यांना रोज मिळूं लागल्या. नायकोला फॅब्रिझीनें त्या देशवीरांस वळविण्याचा सर्व प्रयत्न केला. पण व्यर्थ. त्याच वेळेला **रेसिओटी** नांवाच्या देशभक्तानें लंडनहून कार्फ्यू येथें प्रयाण केलें. हा देशभक्त १८०० सालीं जन्मला. त्याच्या वयाच्या अठराव्या वर्षापासूनच इटलीच्या राष्ट्रैक्याची कल्पना त्याच्या हृदयांत खेळूं लागली व त्यानें ती सिद्ध करण्याची शपथ घेतली. मी शपथा मोडण्या-

करितांच घेतलेल्या पाहिल्या आहेत, परंतु रोसिओटी यानें शपथ घेतली इतकेंच नव्हे तर ती पाळलीही. १८२१ मध्यें त्याची व माझी ओळख झाली. तो साधा, सरळ व इमानी असून त्याची बुद्धिमत्ता श्रेष्ठ होती. ती अंतःकरणाची बुद्धि होती. नुसती डोक्याची बुद्धि ही अनीतिमान् होऊं शकते; परंतु ही अंतःकरणाची बुद्धि ध्येयासाठीं स्वात्मार्पणही करण्यास तयार असते. तो ज्या दिवशीं जन्मला त्या दिवसापासून तों त्यानें डोळे मिटले त्या दिवसापर्यंत त्याचें आयुष्य म्हणजे एक दुःखाची मालिकाच होती. तथापि मी पहिल्यानें त्याला इटलींत जसा पाहिला तसाच तो मला लंडनमध्यें १८४४ सालीं आढळला. अगदीं लहानपणीं त्याची विवेकबुद्धि जितकी शांत व पवित्र होती तितकीच ती त्या वेळेसही होती. जे सद्गुण इतरांनां मोठ्या पराकाष्ठेनें शिकावे लागतात, ते त्याचा केवळ स्वभावच बनले होते. त्याची ती शुद्ध व शांत मुद्रा पाहिल्यावर कोणासही असें वाटलें नसतें कीं, ह्या मनुष्यानें निबिड व दुर्धर संकटांत आपलें सर्व आयुष्य खर्चिलें आहे. व या क्षणीं देखील हा लंडन शहर सोडून मृत्यूशीं झुंज खेळण्यासाठीं लगबगीनें निघत आहे. त्याची माझी ओळख झाल्यावर १८१५ सालीं त्यानें लढाईचें शिक्षण मिळण्यासाठीं स्पेनमध्यें देशभक्तांचे लष्करांत नौकरी धरली. तो आपल्या बायकामुलांना लिहितो:—"मी पुन्हां एकदां स्वतंत्रतेसाठीं स्पेनच्या समरांत लढणार आहें. जर दैवानें खैर केली तर तिकडे जें अनुभविक युद्धकलेचें ज्ञान मिळेल तें स्वदेशस्वातंत्र्यार्थ अर्पण करण्याचा माझा उद्देश आहे." यानंतर लवकरच इटलीहून उत्साहकारक बातम्या आल्यानें त्यानें स्पेन देश सोडला व स्वदेशाला परत येण्याचा प्रयत्न केला. परंतु तो इटलींत शिरत असतांनां फ्रेंचांच्या हातीं सांपडला व मार्सेलिसला कैदेंत पडला. कांहीं दिवसांनीं तेथून मुक्तता झाल्यावर तो इंग्लंडला आला. येथें पुन्हां सर्व जुळवाजुळव करून तो माल्टा व कार्फ्यू येथें जाण्यास उत्सुकतेनें निघाला. ... ... ...

ॲटिलिओ ता. ६ जूनला लिहितो:—"रोसिओटी भेटला. त्याची इटलीला सुरक्षित रवानगी करतों. पण त्यानें एकटेंच कां जावें ! वीस निश्चयी देशभक्त येथें आहेत. ते आम्हीं त्या बरोबरच जातों." दुसऱ्या दिवशीं एमिलिओचें पत्र आलें:—"रोसिओटीबरोबर जें कृपापत्र आपण धाडलेंत त्याबद्दल मी

आपला फार आभारी आहें. महाराज, ' तरुण इटली 'चे अंक ज्यावेळेस मला मिळत व इतर कांहीं करतां येईना म्हणून मी ते तरुण लोकांस एकत्र जमवून दाखवीं व ह्या परक्या अधमांनां तुडविण्याचें उत्तेजन देईं तेव्हांपासून माझें तुमच्यावर अखंडित प्रेम आहे. माझें कांहींही झालें तरी माझा निश्चय हा अढळ रहाणार. इटलीला माझें मन, माझें हृदय, माझे बाहू अर्पिलेले आहेत ! ज्यांनीं इटलीला सन्मानाला नेली आहे त्या तुम्हांलॉ माझी बंधुप्रीति अर्पिलेली आहे. रोसिओटी व आम्हीं तो गुंतागुतीचा प्रश्न सोडवीत आहोंत ! आतां आपली रजा घेतों. लोभाची इच्छा धरणारा आपला ' एमिलिओ. ' '

यानंतर ता. १२–१३ ला बन्डीएरा बंधु व इतर वीस देशभक्त हे रोसिओटीसह कार्फ्यूहून निघून इटलीकडे निघाले. त्यांचें शेवटचें पत्र खालीं देतों.— कॉर्फ्यू, जून ११, १८४४

" अत्यंत प्रिय मित्रा, रोसिओटीला पूर्वी ठरलेल्या ठिकाणीं धाडण्याची आम्हीं शिकस्त केली, परंतु सर्व प्रयत्न निष्फल झाले. बोट मिळेना. इतक्यांत कॅलेब्रियाहून उत्साहक बातमी आली. तरी तेथें पुढाऱ्यांची धरसोड सुरू आहे. अशा वेळेला दृढनिश्चयाचें उदाहरण घालून देण्यासाठीं आम्हीं थोडेच तासांत तिकडे जाण्याचें धाडस करणार आहोंत. जर आम्हीं सुरक्षित रीतीनें पोंचलों तर आम्हीं योध्यांस व कारस्थान्यांस शोभेल असेंच वर्तन करूं. इतर १८ देशभक्त इटालियन–बहुतेक हद्दपारांपैकीं—आमच्या बरोबर आहेत. आम्हांला कॅलेब्रिया प्रांताचा एक पूर्ण माहितगार वांटाड्या मिळाला आहे. जर आम्हीं इटलींत सुरक्षित पोंचलों तर ही खात्री असूं द्या कीं, आजपर्यंत ज्या तत्त्वांचा आपण अभिमान धरला व ज्या तत्त्वांनींच आपला देश ह्या प्रस्तुतच्या नीच गुलामगिरींतून विजयशाली स्वातंत्र्याप्रत नेतां येईल अशी आपली खात्री आहे त्याच तत्वांचा अंगिकार करूं. जर आम्हीं रणांत पतन पावलों तर आमचें हें आत्मार्पणाचें उदाहरण आमच्या परमप्रिय देशबंधूंनां शिकवावयास सांगा. **कारण, आयुष्य हें उदात्ततेनें व उपयुक्ततेनें खर्चिण्यासाठीं दिलेलें** आहे. **व आम्हीं ज्या कार्यांत लढणार आहोंत व मरणार आहोंत तें स्वदेशस्वातंत्र्याचें कार्य हें जगांतील मनुष्यमात्रांनां स्पृहणीय अशा सर्व कर्तव्यांपेक्षां अत्यंत पवित्रतम व पूज्यतम कर्तव्य आहे. हें स्वदेशाचें कार्य**

**आहे ! हें स्वातंत्र्याचें कार्य आहे! हें समतेचें कार्य आहे ! हें मानवी उत्क्रांतीचें कार्य आहे !**

" आमच्याबरोबर येणाऱ्या इतर देशभक्तांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.— ( १ ) डोमेनिको मोरो. ( २ ) नार्डी—हा १८३१ पासून हद्दपार झालेला आहे. ( ३ ) मिलन—१८३२ पासून हद्दपार आहे. ( ४ ) ल्युपाटेली—१८३१ मध्यें तुरुंगांत पडला व नंतर हद्दपार झाला. ( ५ ) पायाझोली—१८३२ पासून हद्दपार. ( ६ ) मेरिआनि—ऑस्ट्रियाचे तोफखान्यावर होता. ( ७ ) नेटोली. ( ८ ) बर्टी वगैरे वगैरे. आतां इतक्यावरही जर आम्हांला अपयश आलें तर तो दोष नशिबाकडेच आहे.

आपले— { नायकोला रेसिओटी.
एमिलिओ बन्डीएरा. "

ह्या पत्रानें मला गोंधळल्यासारखें झालें. त्यांचा बेत एकदम कसा फिरला हें माझ्या पूर्ण ध्यानांत येईना. परंतु आतां कांहीं गोष्टी उघडकीस आल्या आहेत. इंग्रजसरकारनें नीचपणाची कमाल करून माझीं पत्रें फोडलीं व त्यांत आमचे ठरलेले बेत ऑस्ट्रियाला कळविले. त्यावरून ऑस्ट्रिया वगैरेंनां हें नक्की समजलें कीं, हद्दपारांपैकीं कांहीं लोक इटलींत कोठेंही बंडाची आरोळी उठली कीं, तिकडे जाण्यास जय्यत तयारी करून आहेत. परंतु सरकाराला नक्की बेत किंवा पत्ता फारसा कळला नाहीं. अशा स्थितींत उत्तम युक्ति म्हणजे हीच होती कीं, त्या हद्दपारांस भलत्याच आशादायक बातम्या कळवून मुद्दाम इटलींत आणावें व मग झटकन गांठून त्यांचा नाश करावा. ह्या योगानें फूट पाडून व फसवून हा देशभक्तांचा वर्ग प्रबळ होण्याचे आधींच चिरडून टाकतां येईल. दुसरी गोष्ट अशी कीं, इतर हद्दपार लोक पुनरपि इटलीच्या लोकक्षोभावर विश्वास ठेवणार नाहींत. बन्डीएरा बंधूंच्या तीव्र स्वातंत्र्यप्रीतीनें उतावीळपणा हा त्यांच्यांत नखशिखांत भरला होता व ते या सांपळ्यांत सहज सांपडले. ह्या वेळेला इतक्या बारीक गोष्टी घडलेल्या आहेत कीं, त्यावरून ऑस्ट्रियानें बन्डीएरा बंधूंचा विश्वासघात केला असें म्हणतां येतें. कार्फ्यू येथें कॅलेब्रिआमधून एका मागून एक अशीं दोन जहाजें आलीं. त्यांच्या कप्तानानें कॅलेब्रिआंत रानारानांतून देशभक्त लोक उठल्याची बातमी दिली. परंतु त्यांनां 'पुढारी' मिळत नाहींत व ते हद्दपार देशभक्तांनीं आम्हांस फसविलें असें म्हणत आहेत इतकें सांगून त्या कप्तानांनीं अशी

विनंति केली कीं, कार्फ्यूहून 'पूर्वी लष्कराचा अनुभव असलेल्या' देशभक्तांनीं अशा वेळेला जाणें फार श्रेयस्कर होईल. शिवाय ते म्हणाले कीं किनाऱ्यावर फार निकडीचा पहारा नाहीं. यानंतर लगेच एक मनुष्य आला. याला अर्थातच बन्डीएरा बंधूंच्या उत्साहास उतावीळ करण्याकरितां धाडलेला होता. वरील कप्तानांच्या ढोंगी बातम्या ऐकून फसत आलेल्या त्या देशभक्तांस हा मनुष्य कॅलेब्रिआचे रानांत जेथें स्वदेशभक्त सशस्त्र होऊन जमा झालेले होते तेथें नेण्यासाठीं स्वयंसेवक 'वाटाड्या' झाला. ठरलेल्या ठिकाणीं एक जहाजही अचुक आलें. हे सर्वजण ठरल्याप्रमाणें कार्फ्यूहून निघाले. व कॅलेब्रिआंत उतरले. तथापि बन्डीएरा व इतर देशभक्त तसेच पुढें चालले. पांच दिवस प्रवास केल्यानंतर ते थकले. वाटेंत त्यांच्यावर लहान लहान हल्ले झाले. त्यांचें निवारण करीत करीत ते खिंडींत आले. तेथें पहातात तों त्यांच्या पांचपट जास्त अशा शत्रुसैन्याचा त्यांनां वेढा पडला. ते लढले, त्यांच्यांतील कांहीं लोक धारातीर्थीं पडून धन्य झाले! बाकीचे शत्रूनें कैद केले. त्यांची लष्करी चौकशी झाली. व त्यांनां गोळी घालून मारण्याचा हुकूम सुटला!

याचे किंचित् आधीं बन्डीएरा व रेसिओटी यांच्या सहीचा जाहिरनामा निघाला होता. त्याचा मथळा " स्वतंत्रता, समता, दास्यमुक्तता, राष्ट्रैकता व लोकसत्ता " असा होता. त्याचा मसुदाः—

"**स्वतंत्रता, समता, दास्यमुक्तता, राष्ट्रैकता व लोकसत्ता**! यापुढें राजा म्हणून ठेवावयाचा नाहीं! इटालियन लोकहो, परमेश्वरानें सर्व मनुष्यांनां समतेंत उत्पन्न केलें आहे! आपण सर्वजण त्याचेच अंश आहों. त्याच्याशिवाय आपणांवर दुसरी कोणाचीच मालकी नाहीं. राजा हा कःपदार्थ आहे. राजांनीं तुम्हांला चिरडण्याशिवाय व तुडविण्याशिवाय काय केलें आहे? स्वदेश गुलामगिरींत पिचत आहे! अपमानानें जळत आहे! **उठा! स्वातंत्र्य मिळवा व राजसत्तेला लाथ मारून लोकसत्तेची ग्वाही फिरवा!!**"

"लष्करी चौकशी चालली असतांनां त्यांच्या मुद्रेंतील व भाषणांतील रम्यता, शुचिता व त्यांच्या वर्तनाची गंभीरता पाहून सर्वांच्या मनामध्यें पूज्यभाव व विस्मय उत्पन्न होई." असें एक इतिहासकार लिहितो. शिक्षेचा हुकूम सुटल्यावर त्या देशवीरांच्या मुखावर एक प्रकारची विलक्षण कांति

झळकूं लागली. सत्यासाठीं व न्यायासाठीं जे बळी पडतात त्या महात्म्यांप्रमाणें हे सर्व देशवीर अढळ व शांतरीतीनें उभे होते. ज्या दिवशीं त्यांनां गोळी घालून मारण्याचें ठरलें होतें त्यादिवशीं सकाळीं त्यांनां गाढ झोंप लागली होती. नंतर त्यांनां जागें केल्यावर त्यांनीं अगदीं हौसेनें आपले केंस वगैरे व्यवस्थित केले. व एखाद्या धार्मिक समारंभास जावयाचें असतां जसें पवित्र रीतीनें वागावें तसें सुस्नात होऊन ते तयार झाले. तारीख २५ जुलै हा तो पुण्यदिन होता. एक धर्मोपदेशक त्यांचेकडे आला. त्यांनीं त्याला सभ्य भाषेंत परत जावयास सांगितलें. नार्डी त्यांनां म्हणाला कीं तुमच्यापेक्षां आह्मांला बायबल छान कळत आहे. रोसिओटी वगैरे म्हणाले कीं, जीजसनें मुक्त केलेल्या मनुष्यजातीला पुनर्मुक्त करण्यासाठीं आम्हीं मृत्यु वरीत आहोंत, तेव्हां आम्हांला धर्मोपदेश करण्यापेक्षां ज्यांनीं मनुष्यजातीला परवश केलेली आहे त्या अधम राजांनांच धर्मोपदेश दिला जावा. शक्य तितक्या झोंकदार रीतीनें पोषाख केलेले, सदसद्विवेक बुद्धीच्या प्रसन्नतेचें स्मित ज्यांच्या मुद्रेवर विलसत आहे, परस्परांशीं शांत रीतीनें तत्वविचार चालला आहे, असे ते देशवीर देवदूतासारखे हांसत हांसत गोळीच्या टप्यांत येऊन उभे राहिले. एमिलिओनें ह्मटलें, ' पितृभूमीचा जयजयकार असो !' सर्वांनीं तोच जयजयकार केला ! आतां गोळ्या सुटणार तोंच एमिलिओनें " देशस्वातंत्र्याच्या कार्यी लढतां जो मरतो, नर तो ह्या शुभमरणानेंच्चि चिरंजीव ठरतो!" ह्या राष्ट्रगीताची गर्जना केली. तोंच बंदुकीची पहिली फैरी उडाली. परंतु ॲटिलिओची गोळी हुकली ! क्षणा दो क्षणांत दुसरी एक गोळी येऊन त्या देशवीराचे छातींत घुसली. ' इटलीकी जय ! स्वातंत्र्य देवीकी जय ! म्हणून त्यानें प्राण सोडला !!

' इटली कीं जय !' ही त्यांची शेवटची आरोळी होती. परमेश्वरानें व त्यांच्या स्वदेशबंधूंनीं ती ऐकिली आहे.

' इटलीकी जय !' तरुण देशबंधूंनों, हा जयजयकार व्यर्थ जाईल काय? हे शब्द व्यर्थ जाऊं देणार का त्यांनां आपल्या रक्तांत मिसळून कोसेंझाच्या देशवीराचे आत्मे शांत करणार ? मी तुम्हांस माझे स्वदेशाचे नांवानें विचारतों-ज्या देशवीरांनीं आपले देह प्रियतम इटलीसाठीं अर्पण केले त्या सर्व देशवीरांच्या नांवानें मी तुह्मांस विचारतों कीं, हा स्वदेशाचा जयज़यकार स्वातंत्र्यदेवीचा जयजयकार तुह्मीं तुरुंग, फांशी, वनवास व जुलूम याच्या

छातीवर नाचत नाचत खरा करून दाखवाल कां गुलामगिरीच्या नरकांत पिचत राहून किड्यासारखें आयुष्य दवडणार! तरुण अंतःकरणांनो, "इटलीकी जय! स्वातंत्र्यदेवीकी जय!" हा मंगल जयजयकार करणार कां "परवशतेकी जय! ऑस्ट्रिया चिरंतन असो!" म्हणून अमंगल शंखध्वनि करणार!

तुमच्यामध्यें कांहीं ढोंगी लोक अजून कायम आहेत. ते तुम्हास बन्डीएरा बंधूंच्या मृत्यूबद्दल नक्राश्रु ढाळून म्हणतील कीं, हें फाजील धैर्य आहे, हें धाडस निरुपयोगी आहे व हें देशवीरत्व निष्फल आहे. ते सांगतील कीं, कर्त्या लोकांचे तात्कालिक फायद्याशिवाय पडलेले बळी हें अंतिम साध्य जवळ आणण्याचें ऐवजीं दूर मात्र नेतात. असलें देशवीरत्व मूर्खपणाचें आहे.

असा उपदेश देणाऱ्या या ढोंगी लोकांकडे थुंकूनदेखील पाहूं नका. या मित्र्या कारस्थान्यांच्या व भ्रष्ट नास्तिकांच्या अपवित्र व अमंगल सल्ल्याला ऐकून तुम्हीं तुमच्या निर्मल अंतःकरणाची शुचिता घालवूं नका. जीजस् फांशी गेला हें कृत्यही ह्यांच्या दृष्टीनें अपवित्र ठरेल! जर त्यांनीं लटपट करून तो फांशीचा प्रसंग टाळला असता तर तो यांच्या मतानें मोठा कारस्थानी ठरला असता! असल्या या स्वात्मार्पणाची नैतिक दिव्यता या आंकडेमोड्यांस कळणार नाहीं.

नाहीं, नाहीं. **देशवीरता कधींहि वांझ होत नाहीं!** महासत्यें सिद्ध करण्यासाठीं आत्मार्पण करणें ही नीतिशास्त्राची परम सीमा आहे. गुलामगिरीचा अंमल चढून सर्व माणसें नीचतेंत लोळत असतांना जेव्हां एखादा नरमणी उठून उभा रहातो व म्हणतो, 'हें सत्य आहे व त्याची पूजा बांधावयास मी माझें देहपुष्प अर्पण करतों,' तेव्हां त्याच्या त्या देहार्पणांतून—त्याच्या त्या तेजस्वी मरणांतून—एक दिव्य ज्योति निघते व ती अखिल मनुष्यजातीमध्यें नवीन चैतन्य उत्पन्न करते!

कोसेंझाचे देशवीरांनीं आपणांस असें शिक्षण दिलें आहे कीं, आपल्या कर्तव्यासाठीं मनुष्यानें जीवन ठेवलें पाहिजे. त्यांनीं सर्व जगास सिद्ध करून दाखविलें आहे कीं, इटालियन लोकांस कसें मरावें हें माहीत आहे. त्यांनीं युरोपची खात्री करून दिली आहे कीं इटली आतां स्वतंत्र होणारच होणार. एखादा प्रेमलोलुप आपल्या प्रियतमेच्या भेटीला जितक्या उत्सुकतेनें जातो तितक्या उत्सुकतेनें ह्या देशवीरांनीं मरणाची भेट जी घेतली ती कांहीं ते

वेडे होते किंवा मूर्ख होते ह्मणून नव्हे. त्यांचे तें पवित्र मरण ह्मणजे देशधर्माचें बीज आहे ! तें परमेश्वरी आज्ञापत्रक आहे ! त्यांचे देह व्यर्थ कसे जातील ? मृत्यूचें साह्य घेऊन आतां त्यांच्या थडग्यांतून ते अत्यंत महत्वाची देशसेवा करीत आहेत. त्यांच्या समाधींतून देशाभिमानाच्या अनंत ज्वाला भडकून राहिल्या आहेत ! व लवकरच इटलीवर नेमलेले देवदूत त्या ज्वालांपैकीं एक ज्वाला हातीं घेऊन त्वेषाचा अग्नि एकसारखा भडकावून देतील. त्या पवित्र हुताशनांत गुलामगिरीची राख होऊन जाईल; रोम–अधमाधम पोपचें रोम नव्हे तर लोकसत्तेचें रोम–प्रकाशमान होईल; व त्या रोमकपत्तनाच्या दिव्य प्रकाशानें मनुष्यजाति सन्मार्गाचें आक्रमण करूं लागेल.

अशा रीतीनें उदात्त मरण स्वीकारून कोसेंझाचे देशवीर स्वर्गास गेले. इटलीचें स्वातंत्र्य, इटलीची लोकसत्ता, इटलीची दास्यमुक्तता व इटलीचा जयजयकार या राष्ट्रधर्मासाठीं ते मेले. व याच राष्ट्रधर्मासाठीं हा माझा अत्यंत कमी किंमतीचा परंतु देशप्रीतीनें त्यांच्याइतकाच तुडुंब भरलेला देह मीही अर्पण करणार आहें !

देशवीरत्वाचें नैतिक बळ हें परम सामर्थ्य देत असतें. देशवीरत्व हें निष्फळ नसतें. तथापि तुह्मी देशार्थ नुसते बळी पड असा मी आपणास आग्रह मात्र करीत नाहीं. देशवीरत्वाला पूज्यतेनें वंद्य मानावें. परंतु त्याचा उपदेश करणें धोक्याचें आहे. कारण तुह्मीं नुसते बळी पडावें अशी माझी इच्छा नसून तुह्मी लढावें व विजयी व्हावें हीच माझी इच्छा आहे. या विजयाला अत्यंत आवश्यक असा मरणाचा तिरस्कार हा तुह्मांस यावा, तुह्मी मरणाला तुच्छ मानावें व " हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्" या निश्चयानें युद्धाला सज्ज व्हावें ह्मणून मृत्यूची भीति ज्यांनीं झुगारून दिली व स्वदेशाला देह कसे अर्पण करावें हें इटलीच्या तरुणांस शिकविलें त्या कोसेंझाच्या देशवीरांचें तुह्मीं अभिनंदन करावे अशी माझी इच्छा आहे. मरणाच्या जबड्यांत व्यर्थ पडूं नये. परंतु वेळ आल्यास मागेंहि सरूं नये. मरणाची वेळ स्वदेशाचा तोटा करूनही लांबणीवर टाकूं नये. नेहेमीं पोकळ विचार करीत न बसतां कार्याला आरंभ करावा. नेट धरावा. चिकाटीनें शत्रूच्या नरड्यास मिठी द्यावी. अशा सतत उठावणीनें शत्रू भिऊं लागतो. तो जास्त जुलूम करूं लागतो. जास्त जुलमानें जास्त लोकक्षोभ उत्पन्न होतो. लोकक्षोभामुळें धाडस येतें. व धाडसानें काम फत्ते होतें. अशा

महत्कार्यांत एकट दुकट किंवा शेंकडों अपजय आले तरी ढळूं नका. धीर धरा, कारण आपलें कार्य यशस्वी झालेंच पाहिजे. आपल्या शत्रूंनां हें कळत आहे म्हणून ते आपणांवर शिव्याशापांचा वर्षाव करीत आहेत. हे त्यांचे शाप निःसत्व बीजाप्रमाणें व्यर्थ होतील. परंतु आपण जें बीज पेरीत आहोंत तें निष्फल होणार नाहीं. ईश्वर त्याच्यावर देखरेख ठेवील. त्या बीजांवर देशवीरांच्या रक्ताचा पाऊस पडेल. त्यांत तीं बीजें अंकुरित होतील. आणि जेव्हां त्यांनां बहार येईल—मग तो आपल्या थडग्यावर आला तरी देखील परमेश्वराचे आभारच आहेत कारण–तेव्हां आपण इतर कोठें तरी कृतकृत्यतेच्नें समाधान पावूं !

आम्हीं आमच्या शत्रूंनां सांगतों कीं, तुम्हीं जुलुम करा. पण तुम्हांला चळचळ भ्यालेंच पाहिजे. जेव्हां रोमन सीनेटनें 'क्रेम्युशियस कार्डो' याचा इतिहास जाळावयाचा असा हुकूम सोडला तेव्हां एक रोमन पुढें सरसावला व म्हणाला, "मलाही जाळा, कारण मला तो इतिहास पाठ येत आहे !" या मदांधांनां आमचेंही तसेंच उत्तर आहे. तुम्ही कितीकांना माराल ? तुम्हांला माणसें मारतां येतील, पण तुम्हांला ध्येय मारतां येईल काय ? ध्येय अजरामर आहे. ध्येयाचा नाश कोण करणार ? त्या स्वातंत्र्यध्येयाचा संचार होऊन एकदां का लोकशक्तीचा समुद्र खवळला कीं, बापड्यांनों, मग तुमच्या दुर्दशेला पारावार नाहीं ! !

REFBK-0006733

वा. क्र. 8033

# आमचीं प्रकाशनें, एजन्सी व इतर पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निबंधकार टिळक संपादक न. चिं. केळकर | | ०–१२–० |
| २. | चिमणरावाचें चऱ्हाट चिं. वि. जोशी | ... | २– ०–० |
| ३. | विनोदसागर कॅ. गो. गं. लिमये | ... | १– ०–० |
| ४. | मधुलहरी व इतर कविता–माधव ज्युलियन | ... | १– ०–० |
| ५. | स्त्रीजीवनविषयक कांहीं प्रश्न सौ. कमलाबाई टिळक | ... | २–१२–० |
| ६. | आम्रराई गिरीश | ... | १– ४–० |
| ७. | फलभार ,, | ... | १– ०–० |
| ८. | शारदाविहार ( शारदोपासक सम्मेलन अध्यक्षीय भाषणांचा संग्रह ) | ... | २– ८–० |
| ९. | निर्माल्य श्री. आपटे | ... | २– ०–० |
| १०. | अद्वैत सिद्धांत दर्शन द. वा. जोग | ... | १०– ०–० |
| ११. | व्यक्ति आणि वाङ्मय श्री. के. क्षीरसागर | ... | १– ८–० |
| १२. | मॅट्रिक आसपासच्या वाटा ( देशी व परदेशी उच्च शिक्षणक्रमाची माहिती ) स. अ. रानडे | | २– ८–० |
| १३. | बुद्धिबळाचा खेळ पडसलगीकर | ... | २– ८–० |
| १४. | पौर्णिमा उत्तररात्र साधुदास | ... | १– ४–० |
| १५. | वद्य प्रतिपदा साधुदास | ... | २– ८–० |
| १६. | वद्य द्वितिया साधुदास | ... | २– ८–० |
| १७. | रणविहार साधुदास | ... | १– ०–० |
| १८. | वनविहार साधुदास | ... | १– ०–० |
| १९. | गृहविहार साधुदास | ... | १– ०–० |

| | | | |
|---|---|---|---|
| २०. | मराठीचा संसार भाग १ | ... | २- ०-० |
| २१. | ,, ,, २ | ... | २- ०-० |
| २२. | निरंजन रघुनाथाचे ग्रंथ | ... | ८- ०- |
| २३. | बुद्धिबळाचा मार्गदर्शक | ... | ०- ४- |
| २४. | सामान्यज्ञानदीपिका का. ना. भिडे | ... | १- ८- |
| २५. | नलदमयन्ती स्वयंवराख्यान संपादक श्री. रा. पारसनीस | ... | १- ४- |
| २६. | दाजी भाग १ —ताम्हनकर | ... | ३- ८-० |
| २७. | एकच प्याला (प्रस्तावना) प्रा. श्री. के. क्षीरसागर एम्.ए. | | २- ८- |
| २८. | अभिनव काव्यप्रकाश—प्रा. रा. श्री. जोग, एम्. ए. | | ६- ०- |

( सुधारून वाढविलेली द्वितीयावृत्ति )